५८

म. ग्रं. सं. ठाणे

विषय चारित्र

सं. क्र. ८३४

RLFBK-0009837

लक्ष्मीबाई टिळक

# स्मृति-चित्रें

[ संक्षिप्त ]

REFBK-0009837

२३४५८ दि: ७/८/७ ...
८३४ ३०/५/५८

संपादक :
देवदत्त नारायण टिळक

८८३७

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली

*Smriti-Chitren* by Smt. Lakshmibai Tilak
Abridged by Sri D. N. Tilak
Sahitya Akademi (1958)

वितरक :
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.
३८३ नारायण पेठ, पुणे २

मुखपृष्ठ :
पुष्पा कौशिक

किंमत : ५ रुपये

# अनुक्रमणिका


१ माहेरीं ... १

२ सासरीं ... १३

३ सासुरवास ... २७

४ पेंडशांकडील आमचा मुक्काम ... ४५

५ सप्तश्रृंग ... ६२

६ बुटींच्या बागेंत ... ७७

७ राजनांदगांव ... ९७

८ ख्रिस्ती धर्माकडे वाटचाल ... ११५

९ बहिणीच्या घरट्यांत ... १३८

१० भाऊ-भावजयांचा आसरा ... १६१

११ दिराच्या दारांतून सत्तेच्या घरांत ... १७७

१२ दोघांचा एक संसार ... १९९

१३ कांहीं संस्मरणीय गोष्टी ... २२२

१४ राहुरीचें घर ... २४६

१५ नगरांतील ते दिवस ... २६७

१६ बालकवींच्या आठवणी ... २८७

१७ नवा संसार ... ३१५

१८ आयुर्मार्गी आक्रम नवा ... ३३६

१९ श्रीमती ... ३५७

२० आई ... ३७७



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रमांक वि: ...

क्रमांक ... नों: दि: ...

23875
२.१३५

# लक्ष्मीबाई

( प्रस्तावनालेखिका : कमलाबाई देशपांडे )

*“ स्वभावोक्ती साधी म्हणुनिच अलंकारिं सरसा ”*

रे. टिळक — ‘ माझी भार्या ’

‘ स्मृतिचित्रें ’ वाचीपर्यंत लक्ष्मीबाई ह्या मला एक ‘ श्रुति ’ होत्या. ‘ तुम्ही कवि भिकारिण मीं हो तुमच्या दारीं ’ ही त्यांची पहिली छापलेली कविता. या कवितेमुळें त्यांचें नांव प्रथम माझ्या कानांवर पडलें. पुढें मासिक मनोरंजनाच्या वसंत अंकांत ‘ करंज्यांत मोदक कशाला ’ ही त्यांची कविता प्रसिद्ध झाली, आणि ह्या नव्या कवितेमुळें सगळे रसिक खडबडून जागे झाले व म्हणूं लागले कीं, “ सगळ्याच मोदकांत ही नवी करंजी कुठून आली ? ” या कवितेनें व त्या कवितेवरील ऐकलेल्या चर्चेनें या कवयित्रीबद्दलची माझी श्रुति पक्की झाली. रे. कवि टिळकांच्या ह्या पत्नी. टिळकांच्या कविता त्या वेळीं फार लोकप्रिय होत्या. त्यांच्या इतर कवितांबरोबर ‘ वनवासी फूल ’ हें त्यांचें खंडकाव्य मीं वाचलें होतें, नव्हे त्याचीं पारायणें केलीं होतीं. दर वेळीं या कवि टिळकांच्या त्या ‘ लक्ष्मीबाई ’ पत्नी होत ही माझी आठवण पक्की होऊन जाई. शिवाय दुसरें कौतुक असें वाटे कीं टिळक हे ख्रिश्चन कवि म्हणून प्रसिद्ध, परंतु त्यांची कविता पहावी तर अस्सल बाळबोध वळणाची व गीतेचें तत्त्वज्ञान सांगणारी. भाषा सुबोध व शुद्ध आणि मनःप्रवृत्ति सात्त्विक. त्यांची ‘ माझी भार्या ’ ही कविता वाचून तर त्यांच्याबद्दल व त्यांच्या पत्नीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल माझी जिज्ञासा फारच वाढली.

‘ केलें काव्य परंतु येथ मम हो संबंध कांहीं नसे। ’ असें कवीनें आग्रहानें सांगितलें तरी लक्ष्मीबाईंच्या स्वरूपाची छाया त्या कवितेंत आहे हा

वाचकाचा ग्रह कांहीं दूर होत नाहीं व या कवितेवरून लक्ष्मीबाई कशा असतील याबद्दल माझ्याहि कांहीं कल्पना बनल्या. पुढील वर्षी साताऱ्याहून पुण्यास येऊन मी हुजूरपागेंतील शाळेंत जाऊं लागलें. मी इंग्लिश सहावींत आलें व कु. तारा टिळक ही इंग्लिश पांचवींत तेथेंच असल्याचें मला कळलें. मला फार आनंद वाटला. कारण 'आनंद' मासिकांत टिळकांनीं आपल्या मुलीची कविता 'बाभळीच्या फुलास' ही कांहीं वर्षांपूर्वी पाठविली होती. ती मीं वाचली होती व तेव्हांपासून ही मुलगी पहाण्याची मला उत्सुकता होती. बोर्डिंगच्या मेट्रन श्री. सारजाबाई बापट यांचेमार्फत मीं त्या मुलीची ओळखहि करून घेतली; पण माझ्या श्रुतिमधील लक्ष्मीबाईंची मूर्ति पूर्णपणें साकार झाली ती 'संजीवनी' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या स्मृतिचित्रांमुळें. यापूर्वीहि त्यांना ओळखणाऱ्या मंडळींची गांठ पडल्यास त्यांच्याबद्दल जास्त माहिती मिळविण्याची संधि मी साधीत असें. कोणी सांगत, "त्या शंभर टक्के ख्रिस्तानुयायी आहेत," तर कोणी सांगत कीं, "अहो त्या फक्त नांवाच्या 'ख्रिस्ती'! आपण त्यांचे घरांत गेलों व त्यांच्याशीं बोलत बसलों तर आपण एका कोंकणस्थ ब्राह्मण स्त्रीशीं बोलत आहोंत असें वाटतें." पण पुढें इतरांना मला विचारावें लागलेंच नाहीं. 'स्मृतिचित्रें' छापून पुरीं झालीं व त्यावरून त्या मुळांत होत्या कशा, त्यांचे मनावर कोणते बरेवाईट परिणाम झाले व शेवटीं त्या बनल्या कशा हें त्यांचेकडून मला त्यांच्या शब्दांत वाचावयास मिळालें व वाचून आदरानें व कौतुकानें मस्तक विनम्र झालें.

*　　　*　　　*

आणि आदर कां वाटूं नये? कारण चरित्र सांगणाराला जी एक त्रयस्थाची भूमिका घेतां यावी लागते ती त्यांना साधली आहे. वारकरी मंडळींत एक भारुड प्रसिद्ध आहे.—

*"सांगतें तुम्हां मी वेगळे निघा।*
*नि वेगळे निघोनि संसार बघा"*

या गाण्यांतील सासुरवाशीण सून नवऱ्यास सांगते कीं, "तुम्ही या सासूच्या

घरांतून वेगळे निघा व मी माझा संसार कसा मांडतें तो पहा. " या रूपकांत जिवाला उपदेश आहे. जिवानें या जगांतील मायेच्या पसाऱ्यांतून वेगळें होऊन स्वतःचें स्वरूप ओळखावें, त्यांतील सुखदुःखांत आपण गुरफटूं नये व थोडें दूर राहून अलिप्तपणें संसाराकडे पहावें म्हणजे मग खरा परमानंद कळतो, असें जिवास या गाण्यांत शिकवावयाचें आहे. हा अलिप्तपणा लेखकाला साधला तर संसारांत घडलेल्या घटनांचें मूल्यमापन लेखक बरोबर करूं शकतो व वाचणारालाहि लिहिणाराच्या अनुभवाचा आनंद मिळतो. ही अलिप्तपणाची वृत्ति साधणें कठिण आहे पण लक्ष्मीबाईंना तीच नेमकी साधली. लग्न झालें बाराव्या वर्षाच्या आंत, व गांठ पडली ती टिळकांसारख्या विद्वान् व प्रेमळ, खऱ्या पण विक्षिप्त वल्लीशीं. त्यांनीं लिहिलेल्या गोष्टी वाचतांना मनरंजन होतें खरें पण मनांत आल्याखेरीज रहात नाहीं कीं, या गोष्टी मागाहून वाचायला गोड. 'युद्धस्य कथा रम्या' पण प्रत्यक्ष अनुभवायला कांहीं त्या गोड लागल्या नसतील. मुलगा घरांत उपाशी व म्हणून नवऱ्याला तांदूळ विकत आणावयास लक्ष्मीबाईंनीं रुपया दिला तर तांदुळाऐवजीं घरांत कांचेची दौत आली आणि तीहि पुन्हा बायको कौतुक करीना म्हणून टिळकांनीं फोडली. या दौतीचें लक्ष्मीबाईंना उपाशीपोटीं कौतुक कसें वाटणार? त्या वेळीं त्या प्रसंगानें त्यांना धाय धाय रडवलेंच असणार.

पण दुसरें असेंहि दिसतें की, अशा विक्षिप्त माणसांत वागावयाची त्यांना जन्मापासून संवयच पडली होती. त्यांच्या वडिलांना 'सोवळें' झालें होतें असें त्या सुरुवातीलाच सांगतात आणि मीठ, साखर इत्यादि वस्तु धुवून घेतांना सोवळ्याची अंमलबजावणी कशी होई याचें वर्णन करून त्यांतील विसंगतीनें आपणच हसूं लागतात. वडील हे असे तर सासरे त्याहून चमत्कारिक. पैठणी-साठीं व बांगड्यांसाठीं त्रास देणें तर राहोच पण जेवावयास सून बसली रे बसली कीं चुकलेलें काम दाखवून अर्ध्या जेवणावरून तिला उठवावयाची, बायकोस मी आजारी आहें म्हणून खोटेंच पत्र पाठवावयाचें व गरोदर बायको कल्याणहून माखोड्यास चालत आली तर गोड शब्दांऐवजीं तिच्या

कमरेत लाथ हाणावयाची, या गोष्टीं ऐकून हसूं येण्याऐवजीं वाचकालाहि चीड व संताप आल्याखेरीज रहात नाहीं. लक्ष्मीबाई जन्मापासून अशा विचित्र स्वभावाच्या माणसांचे हाताखालीं वाढल्या. दुबळ्या मनाच्या माणसाचा या परिस्थितींत मानसिक कोंडमारा होऊन त्यांत विकृतीहि उत्पन्न व्हावी अशी ही परिस्थिति, पण त्यांचे स्वभावांत त्यामुळें विकृति तर उत्पन्न झाली नाहींच उलट त्यांच्या अंतरंगांतील मानसिक कोंबच मूळचा निकोप व जोरदार, त्यामुळें या बाह्य परिस्थितीनें तो खुरटून तर गेला नाहींच पण स्वतःच्या खेळकर व आनंदी वृत्तीनें भोंवतालच्या परिस्थितीवर आनंदाची छाया पसरूं शकला. त्या स्वतःबद्दल म्हणतातच कीं, "मी मनानें जिवट व शरीरानें चिवट आहे." तें अक्षरशः खरें वाटतें. लक्ष्मीबाई या हिंदु स्त्रियांचे संस्कार जन्मतः घेऊन आलेल्या, पण त्यांतील त्यांचें वैशिष्ट्य असें कीं, नवऱ्याबरोबर सावलीप्रमाणें जरी गेल्या तरी मेल्या मनानें गेल्या नाहींत. प्रसंग पडेल तेथें आपलें म्हणणें टिळकांना ऐकवून प्रसंगीं त्यांच्याबरोबर भांडूनहि त्या वागल्या. विशेषतः टिळकांच्या मनाची धार्मिक विचाराचे बाबतींत चलबिचल सुरूं झाली आणि ती लक्षांत येऊन त्यांना बचावण्यासाठीं त्या ज्या झगडल्या, तें पाहून त्यांच्याबद्दल कौतुक वाटतें. नवरा कांहीं वेगळ्या विचारांत आहे हें लक्षांत येतांच त्यांनीं त्यांचा पाठपुरावा केला. चुलीवरचें थालपीट करपलें, पाठीचें धिरडें झालें पण टिळकांचा माग त्यांनीं काढला व या अस्वस्थ मनःस्थितींतच त्यांची कविता जन्म पावली. पण याहिपेक्षां टिळक ख्रिस्ती झाल्यापासून स्वतः लक्ष्मीबाई ख्रिस्ती होईपर्यंतचा कथाभाग फारच हृदयद्रावक वाटतो. रे. टिळक कोणाला न कळवतां ख्रिस्ती बनले. त्या दिवसांत धर्मान्तर ही गोष्ट लोकांना मृत्यूपेक्षांहि भयंकर वाटे. आप्तेष्टांना धक्का बसला, लक्ष्मीबाई तर एकदम डोक्यावर परिणाम होऊन भ्रमिष्ट बनल्या, व आतां या मुलीचें व तिच्या मुलाचें संगोपन कसें काय करायचें ही एक नवीनच काळजी त्यांच्या भावाबहिणींस उत्पन्न झाली. आप्तमंडळी दिलदार, त्यामुळें लक्ष्मीबाईंना व मुलाला अन्नवस्त्र पुरविणें त्यांना अशक्य नव्हतें. पण टिळक

स्वस्थ बसूं देत नसत. बायकामुलांस मजकडे पाठवा असें म्हणून प्रसंगीं कोर्टाचीहि भीति घालीत आणि धर्म सोडलेल्या टिळकांकडे त्यांचीं 'बायकामुलें' पोचविणें त्यांच्या आप्तांस योग्य वाटत नसे. यामुळें सर्व माणसांस एक प्रकारचा कांच निर्माण झाला. लक्ष्मीबाईनाहि धर्मान्तर पसंत नव्हतें पण धर्म सोडलेल्या नवऱ्याची बायको म्हणून त्यांची सामाजिक स्थिति केविलवाणी होती. प्रथम थोडे दिवस टिळक हिंदु धर्मात परत येतात कीं काय या खटपटींत गेले व पुढें टिळक परत येणें शक्य नाहीं व आपण आपला जन्म मुलास घेऊनच काढला पाहिजे याची त्यांना खात्री पटली. मिळमिळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें म्हणतात तें येथेंच. दिवसेंदिवस आपली स्थिति सामाजिक दृष्ट्या काय होणार हें त्यांना दिसूं लागलें. त्यांना सुवासिनी म्हणून समजावें कीं विधवा म्हणून समजावें या प्रश्नाची चर्चा होऊं लागली व आप्तेष्टांनीं जरी प्रेमानें संभाळलें तरी शेवटीं तें सर्व धर्माचें असें त्यांना वाटूं लागलें. मुलाचें शिक्षण करणें हें त्यांचे डोक्यानें घेतलें होतें त्यासाठीं त्या माहेर सोडून पंढरपुरीं दिराकडे आल्या, पण कोठेंहि जा टिळक आपले पाठोपाठ दत्त म्हणून उभे रहात व त्यांचें हें आगमन घरच्या मंडळीना त्रासदायक होई. तेव्हां एक दिवस विठोबाचे देवळांत रडत बसल्या असतां एका बाईनें सल्ला दिला कीं, "तूं अशी आप्तेष्टांची भीड व लौकिक पाहूं नकोस. सरळ मुलास घेऊन कोणाला न कळवतां गाणगापुरास जा व सुचेल त्या मार्गानें, स्वयंपाकपाणी करूनहि, पोट भर." व त्याप्रमाणें लक्ष्मीबाईंनीं दुसरे दिवशीं पंढरपूर सोडावयाचें ठरविलें. पण योगायोग म्हणतात तो असा, रात्रींच टिळकांची तार आली कीं, "मी येतों" कारण टिळकांची तीव्र इच्छा अशी होती कीं आपल्या बायकोनें व मुलानें आपलेकडे यावें. ते वारंवार पत्रें लिहून तिला आपल्या घरीं बोलावीत, व ती येत नाहीं असें वाटल्यावर वाटेलतसें वेडेंवाकडें त्यांना लिहीत. टिळक धर्मान्तराबद्दल बोलत नसत पण इतरांना तें अटळ वाटे म्हणून लोकांचा तिला टिळकाकडे जाऊं देण्यास विरोध. हा आजचा दिवस लक्ष्मीबाईंच्या आयुष्यांत क्रांति करणारा होता. टिळकांची तार न पोंचून

त्या गाणगापुरास न कळत निघून जात्या तर कदाचित् त्यांचे आयुष्यास वेगळें वळण लागलें असतें पण त्यापूर्वीच टिळक पंढरपुरास आले व लक्ष्मी-बाईंच्या मनाचा झगडा पुन्हां वाढला. दीर कोणताच सल्ला देईना. शेवटीं लक्ष्मीबाईंनीं स्वतःच निश्चय केला कीं आपण टिळकांबरोबर नगरास जावयाचें व वेगळें विन्हाड करून दत्तूचें शिक्षण करावयाचें. परंतु टिळकांबरोबर घराबाहेर टाकलेल्या ह्या पावलापासून लक्ष्मीबाईंचें धर्मान्तर लोकदृष्टीनें झाल्या-सारखेंच झालें व धर्मान्तरित माणसाला मिळणारी तुटक व निष्प्रेमाची वागणूक त्यांना मिळूं लागली. उलट रे. टिळक व त्यांचे खिस्ती बांधव लक्ष्मीबाईंचा नगरचा मुक्काम सुखाचा करण्याचा प्रयत्न करूं लागले. या सर्वांचा परिणाम त्यांचे मनावर नकळत खरा पण धर्मान्तराला अनुकूलच झाला असणार. या द्विधर्मी घरांत नवरा खिश्चन व बायको व मुलगा हिंदु अशी स्थिति कांहीं दिवस चालली. टिळक अमूर्त परमेश्वराची प्रार्थना करीत तर लक्ष्मीबाई देवी, गणपति आदि सर्व देवांची पूजा करीत. लक्ष्मीबाई आपलें सोवळें ओवळें मुकाट्यानें सांभाळीत परंतु टिळकांचा प्रत्येक बाबतींत आग्रही स्वभाव. पुष्कळदां ते भलताच आग्रह धरीत. शेवटीं महाबळेश्वरीं एके दिवशीं गोष्टी निकराला आल्या. लक्ष्मीबाईंची इच्छा समोरील विहीरीवरून स्वतः पाणी आणावें व स्वतःचें सोवळें चालवावें. टिळकांचा भलताच आग्रह कीं, आपल्या बायकोनें असें पाणी भरणें आपणांस शोभत नाहीं. त्यापेक्षां मुसलमानानें भरलेलें पाणी हिनें कां पिऊं नये? शेवटीं अगतिक होऊन त्यांनीं पाण्याचा पेला ओठाशीं नेला व तो उलटून पडून लक्ष्मीबाई आजारी पडल्या. टिळकांना मागाहून वाईट वाटलें व त्यांनीं सोवळ्या ओवळ्याचा आग्रह मी सोडतों असें सांगितलें पण लक्ष्मीबाईंची प्रतिक्रिया उलटी होती. एवीतेवीं ह्यांच्याबरोबर दिवस काढायचे ते त्यांच्याच कलानें काढणें बरें असें त्यांना वाटलें असावें. त्यांच्या जातिभेदाच्या कल्पना ढांसळून पडल्या व त्यांनीं मनोनिग्रहानें सांगितलें कीं, 'मी ह्यापुढें जातिभेद व शिवाशिव मानणार नाहीं.' त्यांना स्वतःस वाटलें कीं, आपणांस साक्षात्कार झाला परंतु या साक्षात्कारा

पाठीमागें जातिभेदाबद्दल निर्णय होणें किंवा नवऱ्याच्या मनाप्रमाणें वागून त्यांच्याशीं समेट करणें या दोन गोष्टींपैकीं कोणती गोष्ट जास्त परिणामकारक झाली असेल हें सांगणें कठिण वाटतें. टिळकांनीं खाण्यापिण्याच्या इतर बाबतींत त्यांना दुखविलें नाहीं व आणखी कांहीं दिवसांत हें द्विधर्मी कुटुंब लक्ष्मीबाईंच्या धर्मान्तरानें एकधर्मी बनलें. ख्रिस्ती झाल्यानंतरचे आपले अनुभव सांगतांना त्या ज्या वेळीं मोठ्या अभिमानानें सांगतात कीं'' आज पस्तीस वर्षें झालीं, माझ्या घरांत मांस शिजत नाहीं.'' त्या वेळीं मनांत येतें कीं हिंदुधर्म सोडला तरी हिंदुधर्मांतील मांसाशननिषेध त्यांचे मनांत जिवंत होता व तो टिकूं दिल्याबद्दल टिळकांचा त्यांना अभिमान वाटत होता. त्यांनीं जातिभेदाच्या कल्पना सोडल्या व अनाथ अपंगांना जवळ केलें तें ख्रिस्ताची शिकवण त्यांना पटली म्हणून. एरवी दुसरी एकादी हिंदु स्त्री कोणतीहि वाटेंत दिसलेली अनाथ मुलगी तिच्या जातीची चौकशी न करतां अशी जवळ करूं शकली नसती. परंतु 'शेवटीं पतीला सतीवांचुनी देव नाहीं.' हीं हिंदुधर्माची शिकवणच ख्रिस्तीधर्म स्वीकारतांना त्यांच्या पाठीशीं उभी होती. असें वाटतें कीं, हिंदुधर्मीय लोक धर्मान्तरित लोकांच्या बाबतींत जर जास्त सहानुभूति दाखविते अगर टिळकांचा ओढा जर बायकोकडे कमी असता, धर्मान्तर करूनसुद्धां जर त्यांनीं बायकोवरील निरतिशय प्रेम कायम ठेवलें नसतें तर हें धर्मान्तर झालें नसतें. हें धर्मान्तर झाल्यावर बनलेल्या लक्ष्मीबाई म्हणजे ख्रिस्ताच्या परोपकाराच्या आत्मसात केलेल्या कल्पना व पतीबरोबर जाण्यांतच हित आहे, 'मांसाशन त्याग' हेंहि एक श्रेष्ठ तत्त्व आहे या हिंदु धर्मांतील युगानुयुगाच्या कल्पना ह्यांचा एक समन्वय आहे. परिणामीं हे सर्वच प्रसंग मोठे हृदयद्रावक वाटतात. पण यांतच लक्ष्मीबाईंच्या मनाचा कणखरपणा दिसून येतो. त्यांची सगळी आप्तमंडळी मायेनें त्यांना टिळकांकडे जाऊं देत नसत. त्यांची बहीण तर म्हणे कीं, " मने, आम्हीं तुला आडवून धरतों, कारण, "मैने, तुझा ग पिंजरा मायेचा ॥ " पण नवरा व आप्तेष्ट यांपैकीं कोणतें पत्करावयाचें हा प्रश्न आला तेव्हां त्यांची स्पष्ट विचारसरणी कळते. टिळकांकडे जाऊं नको. तुझी मी पैशाची सोय करतों असें

श्री. पेंडशांनीं सांगितल्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, "माणसानें दिलेलें पुरत नाहीं व देवानें दिलेलें सरत नाहीं." ही त्यांची जीवन-निष्ठा, आणि ती पाहून स्त्री असो कीं पुरुष असो वंदनीय अशा व्यक्तींत त्यांचें स्थान अढळ ठरतें.

येथपर्यंत त्यांच्या जीवनांतील प्रसंगांबद्दल झालें. पण हे सर्व प्रसंग त्यांनीं कसे सांगितले आहेत हें पाहणेंहि तितकेंच आनंदाचें आहे. वाङ्मयामध्यें चरित्र विभागांत अव्वल दर्जाचें स्थान मिळविणारी ही लेखिका निरक्षर होती असें म्हटलें तर फार मोठी अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांना लहानपणीं शाळा नव्हतीच. टिळकांनींच थोडेंफार काय लिहायला वाचायला शिकवलें तें. पण तेंहि धड नव्हतें. मुळाक्षरें व जोडाक्षरें त्यांना पुष्कळदां अडवीत. लेखन करतांना 'मनुष्य' या शब्दांतील 'ष्य' हें जोडाक्षर कसें अडलें व त्यांनीं तें इतर पुस्तकांतून कसें शोधून काढलें याचें सुंदर वर्णन त्याच एके ठिकाणीं करतात. परंतु वाङ्मयीन आवड त्यांच्यांत जन्मजात असावी. टिळकांसारख्या कविपतीचा सहवास आणि ह्या विक्षिप्त कवीबरोबर दिवस काढतांना व त्याच्या मानसिक आंदोलनाबरोबर ताल देतांना हृदयास पडणाऱ्या पिळांतून त्यांची कवित्वशक्ति जागृत झाली व स्वतःच्या दुःखाचें मनोनिवेदन करतांना आपोआप जमणाऱ्या कवितेच्या ओळी त्या कोळसा, खडूचा तुकडा किंवा दौत व काड्याच्या पेटींतील काडी यांच्या सहायानें भिंतींवर व जमिनीवर लिहूं लागल्या. रोज जागा बदलणाऱ्या त्यांच्या वडाऱ्याच्या संसारांत त्यांचें वाचन किती झालें तें समजत नाहीं. घरांत कामाचा रद्दा व दारिद्रय यांच्या विवंचनेंतच बाईचा सारा वेळ जाई, पण पुढें धर्मान्तर झाल्यावर निदान मानसिक स्थिरता आली व भोंवतालचें ख्रिस्ती वातावरण उपकारक झालें असावें. वाचन पुढें वाढलें असेल. त्यांच्या लेखनाची चेष्टा त्यांच्याच मुलांनीं व कवि ठोंबऱ्यांनीं कशी केली तें त्याच सांगतात. अर्थात या लेखनाचेंहि कांहीं शास्त्र असूं शकतें याची जाणीव होणें त्यांच्या संसाराच्या पसाऱ्यांत कठीणच, त्या स्वतःबद्दल विनोदानें एके ठिकाणीं म्हणतात,

षट् शास्त्रांचीं नांवें मजला माहित नाहींत पुरीं ।
तरी मी जगांत शास्त्रीण खरी ।।

पण या गोष्टी जरी माहीत नसल्या तरीसुद्धां गोष्टी सांगण्याची कला त्यांना जन्मजात आहे. लांबलचक वाक्यांपेक्षां वेचक शब्दांची त्रोटक वाक्यें लिहिण्यांतच त्यांचा हातखंडा आहे. ‘ काळजी काय ती खाण्याची व नाण्याची ’ ‘ जन्मभर माझी बेरीज व टिळकांची ख़जाबाकी चालू असे. ’ एकादें लांबलचक सुसंगत कथानक सांगण्यापेक्षां प्रत्येक प्रकरणांत एकादी घटना त्या चमकदारपणें सांगतात. सांगण्यामध्यें पूर्वींच्या आठवणीमुळें होणाऱ्या दुःखापेक्षां एक प्रकारचा संतुष्टपणाच दिसतो. “ झालें गेलें आतां काय त्याचें. त्या आतां गतगोष्टी ” अशा तऱ्हेनें त्या गतगोष्टींतील दुःखाकडें अलिप्तपणें पाहूं शकतात. सासऱ्याचा विक्षिप्तपणा सांगतांना एकादा शब्द त्या चिडून लिहित्या तर तें क्षम्य ठरतें. पण तेहि प्रसंग अशा लीलेनें त्या वर्णन करतात कीं, “ मामंजी रागावले, उपकरणीं घासलीं नाहींत. पण मी तरी काय करूं. उपकरणीं तांब्याचीं, पाणी विहिरीचें, राख लाकडाची व दिवस पावसाचे. ” ही छोटीं अनुप्रासयुक्त वाक्यें त्यांच्या लिहिण्यांत सहज येऊन जातात. पण तें कांहीं त्यांना अनुप्रास अलंकार माहीत होता म्हणून नव्हे. साहेब गांवांत आला ह्या बातमीनें घाबरलेल्या त्यांच्या माहेरच्या गांवांतील बायका रस्त्यांत कशा गोंधळून जाऊं लागल्या ह्याचें त्या सुरेख वर्णन करतात; पण तें कांहीं त्यांनीं रघुवंशांतलें तसलें वर्णन वाचलें होतें म्हणून नव्हे. या तऱ्हेनें त्यांचें लिखाण शैलीनें सुबोध, सहज स्फुरलेल्या थोड्या अलंकारानीं व वर्णनांनीं मनोहर विसंगति टिपण्याच्या त्यांच्या जन्मजात स्वभावामुळें विनोदी व भोंवतालच्या माणसांच्या सहानुभूतिमुळें हृद्य असें भासतें आणि हें सर्व स्वयंभू आहे हेंच त्यांचें वैशिष्ट्य !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्र. २३८५८ दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम २३८५ दि: ५/२
क्रमांक ... नों: दि: ३

# मा हे रीं

ह्या कांहीं कांहीं आठवणी म्हणजे श्रुति होत.

माझी आई व आत्याबाई त्र्यंबकेश्वरच्या देवळांत बोलत उभ्या होत्या. आत्याबाईंना मूलबाळ नव्हतें. त्यांना मुलांची आवड फार. तशीं माझीं सारींच भावंडें त्यांच्या घरीं वाढलीं, पण त्यांना अगदीं आपलें म्हणायला कोणी हवें होतें. ह्यावेळीं आईनें त्यांना कबूल केलें कीं ह्या खेपेला मुलगा होवो मुलगी होवो ती तुमची. त्या दोघी आपल्या वचनाला जागल्या व जन्मापासूनच जवळ जवळ मी आत्याबाईंच्या घरांत वाढलें.

नानांना, म्हणजे माझ्या वडलांना सोवळें झालें होतें. त्या सोवळयामुळें घरांत आम्हां सर्वांना जाच असे आणि म्हणूनच आत्याबाईंच्या घरीं आम्हां मुलांना अगदीं मोकळें वाटे.

नानांना झालेल्या सोवळयाची गोष्ट अशी सांगतात :

सत्तावन सालच्या बंडांत आजोबांना* पकडण्यांत येऊन ताबडतोब फांशीं देण्यांत आलें. हे आजोबा म्हणजे माझ्या आईचे वडील. त्यांचें व माझ्या वडलांचें एकमेकांवर बापलेकांसारखें प्रेम असे. सासऱ्याच्या फांशीचें वृत्त ऐकतांच नाना उठून दूर – पंचवटीच्याहि पलीकडे तपोवनांत आंघोळीला गेले. इकडे आत्याबाई भावाच्या आंघोळीची तयारी करून बसली होती. पण नाना जे सकाळीं बाहेर गेले ते संध्याकाळीं दिवेलागणीला ओलेत्यानें घरीं आले.

त्यांना कोणीं विचारलें, नाना तुम्ही होतां कोठें ? आणि असे ओलेत्यानें कां

---

* वासुदेव भगवंत जोगळेकर

घरीं आलां ? तसें त्यांनीं उत्तर केलें, मी तपोवनांत गेलों होतों, तेथें एका महाराचा शिंतोडा माझ्या अंगावर उडाला आहे. मला विटाळ झाला आहे. आतां दुरून माझ्या अंगावर पाणी घाला. मी आंघोळ करतों.

हें सोवळें, शेवटपर्यंत म्हणजे पंचवीस सव्वीस वर्षें कायम राहिलें.

ह्या सोवळ्यानंतर बारा तेरा वर्षांनीं माझा जन्म झाला.

नानांच्या सोवळ्यानें नुसतें घरदारच नाहीं, तर सारा गांव त्रासून गेला होता. त्यांना ब्राह्मणाचासुद्धां विटाळ व्हायचा! मग इतरांची काय कथा? घरांतील बायकांना हळदीकुंकवाहून परत घरीं येतांना न्हाऊन घरांत यावें लागे. स्वैंपाकघरांतहि नानांची करडी नजर असे. स्वैंपाक ओलेत्यानें व तोहि उजव्याच हातानें झाला पाहिजे. एक हात मोडल्याप्रमाणें बाजूस राहिला पाहिजे. आणि हें काम पडे आईवरच. कोणी शेजारी घरीं आला – आणि अर्थात् शेजार ब्राह्मणाचाच असावयाचा – तर तो परत जातांना आईनें त्याच्या मागें पाणी शिंपडीत जायचें!

पण नाना एकदां सकाळीं बाहेर गेले कीं मग मात्र आमची सगळ्यांची मजा असे. ते गेले, कीं शेजारच्या बायका आमच्या घरीं बसायला येत. आम्हींहि पोरेंसोरें खेळायला गोळा करावीं. आई तर माणसांची फार भुकेली. तिनें दुसऱ्यांच्या मुलांना आंघोळी घालाव्या, सासुरवासणींच्या समजुती घालाव्या, कोणाला औषधें द्यावीं, कोणाशीं गोड बोलावें; एकदा तर एका मराठ्याच्या घरीं जाऊन तिनें तेथें पुरणाच्या पोळ्या करून दिल्या होत्या!

पण हें सारें अगदीं चोरून! नानांचें राज्य अगदीं निराळेंच होतें. बाहेरून येणाऱ्या सर्व जिनसा ते धुवून घेण्यास लावीत. मग तें तिखटमीठ असलें तरी धुवावें लागे. एकदा त्यांनीं मुलांना मीठ धुण्यास सांगितलें. पोरांना नानांची खोड मोडायचीच होती. त्यांनीं मीठ एका पंचांत घालून चांगलें भिजविलें व तो पंचा खुंटीला टांगून ठेवला. थोड्याच वेळांत मीठ विरघळून गळून गेलें. नाना झोळींत मीठ पाहातात तों आंत कांहीं नाहीं! तेव्हांपासून मीठ, गूळ, साखर, तेल, तूप ह्या जिनसा धुतल्यावांचून घरांत खपूं लागल्या.

हीं जिनसा धुण्याचीं कामें बहुतकरून आई व आजी ह्यांच्यावर पडत. नाना सांगतील त्या जिनसा त्या धूत किंवा धुतल्याचा बहाणा करीत. मीठ, साखर धुण्याचें काम जोंपर्यंत आई किंवा आजीकडे असे तोंपर्यंत तीं कधीं विरघळलीं नव्हतीं ! त्या पुष्कळ वेळेस या धुण्याच्या बाबतींत लबाड्या करीत व आम्हांलाहि खोटें बोलण्यास शिकवीत. त्याचें कारणहि तसेंच होतें. शेतांतून धान्य घरीं आलें कीं तें सांठवावयाच्या आधीं धुतलें पाहिजे असा नानांचा कडक नियम असे. नाहींतरी वीस वीस मण धान्य आईनें व आजीनें कसें धुवायचें ? त्या काय करीत, कीं थोडेंसें धान्य धुऊन त्याचा थर सर्व राशीवर घालीत. नाना घरीं आले म्हणजे त्यांनीं सर्व मुलांच्या जबान्या घ्याव्या. मुलें सारीं आधींच पढवून ठेवलेलीं असावयाचीं. तेव्हां तीं बहुतकरून सारखीच गोष्ट सांगत. पण जर का एखादा घाबरून चुकला – म्हणजे खरें बोलला – तर साऱ्या घरांत गोंधळ सुरू व्हावयाचा ! बायकांनीं तेवढ्या सगळ्या विटाळलेल्या वस्तु नानांच्या नजरेखालीं धुवून काढायच्या, पोरांनीं खोटें बोलल्याबद्दल रगडून मार खायचा व पोरांना मारून झाल्यावर मारतांना त्यांना शिवल्यामुळें झालेल्या विटाळाबद्दल नानांनीं पुन्हा आंघोळ करायची !

एकदा घरांत जांबाच्या तीन पाट्या पडल्या होत्या. वास्तविक त्या आमच्या खेड्याहून म्हणजे जलालपुराहून नाशकास विकायला जायच्या – पण त्या विटाळल्या होत्या. धुतल्या नव्हत्या. नाना सकाळीं बाहेर जात ते अगदीं अंधार पडेपर्यंत हातपाय धूत व आंघोळ करीत बसत. संध्याकाळपर्यंत आम्हांला मोकळीक असे. संध्याकाळपर्यंत त्या पाट्यांतील जांब उचलून खावेत कीं नाहीं ह्यांतच सारा वेळ गेला. शेवटीं ठरलें कीं एकेकानें दाराशीं पाळीपाळीनें उभें राहावें व बाकीच्यांनीं जांब खावेत. होतां होतां मीच एकटी राहिलें. पण माझ्या वेळेस कोणी दाराशीं उभें राहीना. तेव्हां मीच आपली दारापर्यंत गेलें व कोणी नाहीं असें पाहून जांब उचलून खाऊं लागलें. इतक्यांत नाना येऊन माझ्या पुढ्यांत दत्त म्हणून उभे राहिले. त्यांना पाहातांच मी जीव घेऊन पळालें ती कोपऱ्यांतील मुसळामागें लपलें. नानांनीं मागील दारीं जाऊन

शिताफळीचा एक चांगला फोक काढून आणला व मला मुसळामागून ओढून यथेच्छ चोप दिला, माझा मार पाहून बिचाऱ्या आजीला अतोनात दुःख झालें. घरांतील इतर माणसांची पांचावर धारण बसली. त्यांना भीति पडली कीं आतां जर ही पोरगी नांवें सांगूं लागली तर साऱ्यांना मार बसूनच्या वसून वर संपूर्ण घरदार धुवावें लागणार तें वेगळेंच.

एक दिवस मी गव्हाच्या राशीजवळ निजलें होतें. जवळच माझी एक बाहुली पडली होती. त्या बाहुलीला मीं लुगडें नेसविलें होतें. खेळतां खेळतां मला लागली झोंप. बाहुलीचें लुगडें गव्हाच्या राशीला व मला लागलें होतें. नाना आले. त्यांनीं तें पाहिलें. बाहुलीच्या लुगड्यानें गहूं विटाळलेले पाहतांच त्यांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यांनीं मला खसकन् ओढली व चांगला मार देण्यास सुरुवात केली. माझ्या मधल्या बहिणीला आणि भावालाहि कसलासा विटाळ झाला होता; मार देऊन झाल्यावर मला त्यांच्या बरोबर गंगेवर* आंघोळीला पाठवून दिलें.

गंगेवर जातांजातां आम्ही तिघांनीं ठरविलें कीं आज कोणींतरी पाण्यांत बुडून मरायचें. असें कोणी मेलें म्हणजे नानांचे डोळे उघडतील व ते कोणाला त्रास देणार नाहींत. आम्ही तिघे गंगेंत डुंबूं लागलों. सर्वांचा बेत एकच कीं नानांना चांगली दहशत बसवायची. मला तर मारच बसला होता. तेव्हां नानांची खोडकी जिरविण्याचा हा बेत पार पाडण्याचें मीं पक्केंच ठरविलें होतें. पाण्यांत पडल्यावर माझ्या नाकातोंडांत पाणी जाऊं लागलें, मी थकलें. त्याच वेळीं आमच्यासमोर शेजारचे एक गृहस्थ संध्या करीत बसले होते, त्यांचें माझ्याकडे लक्ष जाऊन त्यांनीं चटकन् गंगेंत उडी मारली व मला बाहेर काढली. नानांची खोड मोडली नाहीं पण माझी मात्र पुरी खोड मोडली.

माझ्या आत्याबाईंचे पति गोविंदराव खांबेटे. त्यांना सर्वजण मामा म्हणत. आमचे मामा माणसांचे फार भुकेले. गांव अगदीं लहान व घर सदा सर्वांना

---

* नाशकाकडे गोदावरीला गंगा म्हणतात.

उघडें. त्यामुळें तेथें माणसांची सारखी वर्दळ असे. नानांना सोवळें झाल्यानें गोखल्यांच्या घरचें सर्व कांहीं मामांनाच पाहावें लागे. त्यांची शेतीवाडी, देणें घेणें, लग्न मुंजी, वगैरे सर्व भार त्यांनीं आपल्या शिरावर घेतला होता. आम्हा भावंडांना तर आपलें सत्तेचें घरसुद्धां तितकें आवडत नसे.

आम्ही एकंदर पांच भावंडें. तशीं झालीं पुष्कळ, पण जगलीं पांच. वडील बहीण भिकूताई, मग केशव, भागीरथी, विष्णु व शेवटली मी. भिकूताई माझ्यापेक्षां पंधरा सोळा वर्षांनीं वडील होती. तिला नाशकास पेंडशांच्या घरीं दिली होती. नानासाहेब पेंडशांचें आमच्याकडे फार लक्ष असे.

त्याच सुमारास नाशकास टिळकांची कवि म्हणून प्रसिद्धी होऊं लागली होती. पेंडशांचें टिळकांकडेहि लक्ष होतें. त्यांनीं गोविंदरावमामांना माझ्यासाठीं ह्या स्थळाविषयीं लिहिलें. गोविंदरावमामांनीं वामनराव टिळकांशीं पत्रव्यवहार सुरू केला व मुलीला पाहाण्यासाठीं त्यांना बोलाविलें. वामनरावांचें पत्र आलें कीं "मी हुंडा घेऊन आपल्या मुलाला विकणार नाहीं. जें तुम्हांला करतां येईल तें तुम्ही करा. मला जें करतां येईल तें मी करीन. टिप्पण मात्र चांगलें जुळलें पाहिजे. त्याशिवाय मी संमति देणार नाहीं. तसेंच माझ्या घरांत कोणी बायको माणूस नाहीं, तेव्हां मुलगी मोठी होईपर्यंत ती तुम्हांलाच सांभाळावी लागेल. मला पाहाण्याची गरज नाहीं. तेथील सर्व मंडळीला ती पसंत असली म्हणजे झालें. मला पसंतच आहे."

हें पत्र वाचून सर्वांना आनंद झाला. मोठी होईपर्यंत मला सांभाळण्यास मामा अगदीं एका पायावर तयार होते. आतां मला एकदा नाशकास नेऊन दाखवून आणण्याचें तेवढें राहिलें होतें.

मला पाहायला आले, त्याच्या आधींची कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट. मामा तेव्हां नाशकास होते. मीहि अर्थात् त्यांच्याचकडे होतें. मामांच्या शेजारीं जवळच एक नवीन बिऱ्हाड आलें होतें.

ह्या घरीं सखू नांवाची एक मुलगी सासुरवाशीण माहेरपणाला आलेली होती. बारा तेरा वर्षांची व घरांत तीच तेवढी बायको माणूस. पुरुष माणसें

शिताफळीचा एक चांगला फोक काढून आणला व मला मुसळामागून ओढून यथेच्छ चोप दिला, माझा मार पाहून बिचाऱ्या आजीला अतोनात दुःख झालें. घरांतील इतर माणसांची पांचावर धारण बसली. त्यांना भीति पडली कीं आतां जर ही पोरगी नांवें सांगूं लागली तर साऱ्यांना मार बसूनच्या वसून वर संपूर्ण घरदार धुवावें लागणार तें वेगळेंच.

एक दिवस मी गव्हाच्या राशीजवळ निजलें होतें. जवळच माझी एक बाहुली पडली होती. त्या बाहुलीला मीं लुगडें नेसविलें होतें. खेळतां खेळतां मला लागली झोंप. बाहुलीचें लुगडें गव्हाच्या राशीला व मला लागलें होतें. नाना आले. त्यांनीं तें पाहिलें. बाहुलीच्या लुगड्यानें गहू विटाळलेले पाहतांच त्यांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यांनीं मला खसकन् ओढली व चांगला मार देण्यास सुरुवात केली. माझ्या मधल्या वहिणीला आणि भावालाहि कसलासा विटाळ झाला होता; मार देऊन झाल्यावर मला त्यांच्या बरोबर गंगेवर* आंघोळीला पाठवून दिलें.

गंगेवर जातांजातां आम्ही तिघांनीं ठरविलें कीं आज कोणींतरी पाण्यांत बुडून मरायचें. असें कोणी मेलें म्हणजे नानांचे डोळे उघडतील व ते कोणाला त्रास देणार नाहींत. आम्ही तिघे गंगेंत डुंबूं लागलों. सर्वांचा बेत एकच कीं नानांना चांगली दहशत बसवायची. मला तर मारच बसला होता. तेव्हां नानांची खोडकी जिरविण्याचा हा बेत पार पाडण्याचें मीं पक्कंच ठरविलें होतें. पाण्यांत पडल्यावर माझ्या नाकातोंडांत पाणी जाऊं लागलें, मी थकलें. त्याच वेळीं आमच्यासमोर शेजारचे एक गृहस्थ संध्या करीत बसले होते, त्यांचें माझ्याकडे लक्ष जाऊन त्यांनीं चटकन् गंगेंत उडी मारली व मला बाहेर काढली. नानांची खोड मोडली नाहीं पण माझी मात्र पुरी खोड मोडली.

माझ्या आत्याबाईचे पति गोविंदराव खांबेटे. त्यांना सर्वजण मामा म्हणत. आमचे मामा माणसांचे फार भुकेले. गांव अगदीं लहान व घर सदा सर्वांना

---

* नाशकाकडे गोदावरीला गंगा म्हणतात.

उघडें. त्यामुळें तेथें माणसांची सारखी वर्दळ असे. नानांना सोवळें झाल्यानें गोखल्यांच्या घरचें सर्व कांहीं मामांनाच पाहावें लागे. त्यांची शेतीवाडी, देणें घेणें, लग्न मुंजी, वगैरे सर्व भार त्यांनीं आपल्या शिरावर घेतला होता. आम्हा भावंडांना तर आपलें सत्तेचें घरसुद्धां तितकें आवडत नसे.

आम्ही एकंदर पांच भावंडें. तशीं झालीं पुष्कळ, पण जगलीं पांच. वडील बहीण भिकूताई, मग केशव, भागीरथी, विष्णु व शेवटली मी. भिकूताई माझ्यापेक्षां पंधरा सोळा वर्षांनीं वडील होती. तिला नाशकास पेंडशांच्या घरीं दिली होती. नानासाहेब पेंडशांचें आमच्याकडे फार लक्ष असे.

त्याच सुमारास नाशकास टिळकांची कवि म्हणून प्रसिद्धी होऊं लागली होती. पेंडशांचें टिळकांकडेहि लक्ष होतें. त्यांनीं गोविंदरावमामांना माझ्यासाठीं ह्या स्थळाविषयीं लिहिलें. गोविंदरावमामांनीं वामनराव टिळकांशीं पत्रव्यवहार सुरू केला व मुलीला पाहाण्यासाठीं त्यांना बोलाविलें. वामनरावांचें पत्र आलें कीं "मी हुंडा घेऊन आपल्या मुलाला विकणार नाहीं. जें तुम्हांला करतां येईल तें तुम्ही करा. मला जें करतां येईल तें मी करीन. टिप्पण मात्र चांगलें जुळलें पाहिजे. त्याशिवाय मी संमति देणार नाहीं. तसेंच माझ्या घरांत कोणी बायको माणूस नाहीं, तेव्हां मुलगी मोठी होईपर्यंत ती तुम्हांलाच सांभाळावी लागेल. मला पाहाण्याची गरज नाहीं. तेथील सर्व मंडळीला ती पसंत असली म्हणजे झालें. मला पसंतच आहे."

हें पत्र वाचून सर्वांना आनंद झाला. मोठी होईपर्यंत मला सांभाळण्यास मामा अगदीं एका पायावर तयार होते. आतां मला एकदा नाशकास नेऊन दाखवून आणण्याचें तेवढें राहिलें होतें.

मला पाहायला आले, त्याच्या आधींची कांहीं दिवसांपूर्वीची गोष्ट. मामा तेव्हां नाशकास होते. मीहि अर्थात् त्यांच्याचकडे होतें. मामांच्या शेजारीं जवळच एक नवीन बिऱ्हाड आलें होतें.

ह्या घरीं सखू नांवाची एक मुलगी सासुरवाशीण माहेरपणाला आलेली होती. बारा तेरा वर्षांची व घरांत तीच तेवढी बायको माणूस. पुरुष माणसें

म्हणजे तिचे दोन वडील भाऊ. एक इंग्रजी पांचवींत व एक सहावींत शिकत होता.

सखू खेळतां येईल तितकें खेळत असे. मीहि नेहमीं तेथें खेळायला जावयाची. आमच्या खेळण्यानें सखूला चुलीशीं लागावयाला उशीर व्हायचा. तिचीं भावंडें त्रासून रागावून तशींच उपाशी झोपीं जात. तेव्हां वडील भावानें स्वतःच तिच्याशीं खेळण्यास सुरुवात केली. ताई मुली जमवून खेळत बसते आणि मग सगळ्यांनाच उपाशी बसण्याची पाळी येते; त्यापेक्षां आपण स्वतःच खेळूं लागावयाचें व शेजारच्या कार्ट्या आल्या कीं त्यांना हाकलून लावावयाचें. असा त्यानें निश्चयच केला. सोंगट्या, सागरगोटे वगैरे सगळेंच तो खेळे.

त्या घराला दोन जिने होते. मी रोजच्याप्रमाणें खेळण्यास गेलें. तेव्हां सखूच्या भावानें मला पाहातांच काठी घेऊन एक जिना अडवला.

" खबरदार आमच्या घरांत आलीस तर ! तंगडीच मोडीन !"

वरून सखू हाका मारीतच होती. तेव्हां मी दुसऱ्या जिन्यावरून चढूं लागलें. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तेथून पुनः शब्द आला, " पाहा, लंगडी होऊन घरीं जावं लागेल !"

तेव्हांपासून सखूच्या घरीं जावयाचें नाहीं व तिच्या त्या भावाचें तोंड पाहावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला. पुढें सखूचें बिऱ्हाड उमामहेश्वराच्या देवळांत, म्हणजे आमच्या नाशकांतल्या घराच्या अगदींच जवळ आलें, तरी मी कांहीं तिच्या घरांत पाय घातला नाहीं. असो.

जलालपुराहून नाशकास नेऊन मला दाखवायचें. आत्याबाई आतां नाशकास नव्हती तरी माझी वडिल बहिण भिकूताई तेथें होती. पेंडशे नाशिकचे व तेथें त्यांचा वाडा होता. मला भिकूताईकडे आणून पोंचविलें. मला पाहायला आले तेव्हां भिकूताईनें नटवून थटवून मला वर माडीवर नेलें. तेथें मात्र मला मेल्याहून मेल्यासारखें झालें. कारण सखूच्या घरीं पाय न घालण्याचा माझा जो निश्चय तो ढासळण्याचा मजवर प्रसंग आला ! माझी तंगडी मोडण्यास निघालेले गृहस्थच मला पाहायला आलेले! आणि त्यांना मी पसंतहि पडलें! माझ्या आजेसासूबाईच्या परीक्षेंतहि मी उतरलें. त्यांनीं माझ्या डाव्या कानाचा चाप

गच्च दाबून पाहिला व सांगितलें, मुलगी मला पसंत आहे! कान दाबला तरी मीं हुश्श केलें नाहीं कीं इश्श म्हटलें नाहीं. त्यावरून पोरीचा कान धरून आपण तिला कशीहि वांकविली तरी ती वाकेल असा त्यांनीं अंदाज बांधला असावा.

पण मला नवल वाटतें तें मी टिळकांना कशी पसंत पडलें ह्याचें. माझें रूप, रंग अगदीं बेताचेंच होतें. बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदीं जागच्या जागीं होते.

गोविंदरावमामा व आत्याबाई ह्यांच्या जिवाची केवढी धांदल! वामनरावांनीं म्हटलें होतें कीं आपण बारा गाड्या वऱ्हाड आणूं आणि त्यांनीं म्हटल्याप्रमाणें बारा गाड्या वऱ्हाड आणलें. पाव्हण्यारावळ्यांनीं घर अगदीं गच्च भरून गेलें होतें. दाराशीं मोठा मांडव घातला होता. लग्नाला चार दिवस राहिले. वामनरावांनीं सुनेला पाहिलें.

आतां एक दुसरीच अडचण उभी राहिली. गोखले व टिळक ह्या दोघांचीं गोत्रें काश्यप व शांडिल्य! ह्या गोत्रांचें जुळत नाहीं! तेव्हां लग्न होणार कसें? पण शास्त्राधार निघाला. गोविंदरावांच्या मांडीवर मला दत्तक देण्याचें ठरलें. नाहीं तरी माझ्या जन्माच्या आधींपासून मला खांबेट्यांना देऊन टाकण्यांत आलें होतें व जन्मल्यानंतर लग्नाच्या घटकेपर्यंत माझें सारें त्यांनींच केलें होतें. शेवटीं चार दिवस कां होईना, मी गोखल्यांची खांबेटे होणार, असें ठरलें!

पण दत्तविधानाच्या वेळीं दत्तक देण्यास नाना सांपडेनात! ते आपल्या नित्यनियमाप्रमाणें गेले होते रानांत माती आणायला. संध्याकाळ होईपर्यंत ते परत येण्याचा संभवहि नव्हता. ज्यांनीं खुद्द सख्खी आई मृत्युशय्येवर पडली असतांना, व "नाना, नाना" म्हणत असतांना, तिला निरोप पाठविला कीं 'थांब, माझी स्नानसंध्या होईपर्यंत मरूं नको!" ते लेकीच्या दत्तविधानाची थोडीच पर्वा करतात!!

गोविंदरावमामा आतां खूप संतापले. मामा कधींच संतापत नसत, पण आतां त्यांना अगदीं खरें खरें वाईट वाटलें. ते म्हणाले,

" ज्याची मुलगी तोच करील कन्यादान. तेच जर एवढे बेपर्वाईनें वागतात, तर आमचेंच काय अडलें आहे ? मुलगी त्यांची, त्यांना वाटेल तें, ते करोत. " आत्याबाईहि खूप संतापली होती. तिच्या तोंडाचा पट्टा तर एकसारखा चालूंच होता !

माझ्या आईला मात्र मेल्याहून मेल्यासारखें झालें. थोडक्यासाठीं आतां लग्न मोडतें कीं काय, अशी तिला धास्ती वाटूं लागली. वऱ्हाडी मंडळीहि हिरमुसली झाली. जिकडेतिकडे गोंधळ माजला.

इतक्यांत मामांचे चुलते आईच्या मदतीला पुढें सरसावले. त्यांनीं शास्त्राधार काढून दिला, कीं आईलाहि मुलगी दत्तक देण्याचा अधिकार आहे. हा शास्त्राधार म्हणजे उतास जाणाऱ्या दुधावर शिंपडलेले चार थंड पाण्याचे थेंब ! सर्व शांत झालें. आईनें ओल्या डोळ्यांनीं मामांच्या मांडीवर मला दत्तक दिलें.

दोनतीन दिवसांनीं लग्न लागलें. मामांनीं कन्यादान केलें.

लग्नांत माझ्या पतींचें वय १७–१८ वर्षांचें व माझें ११ वर्षांचें होतें.

लग्नतिथीच्या दुसऱ्या दिवशीं एकादशी होती! सोयऱ्यांकडच्या सर्वच माणसांना चटकन् एकादशी करण्याची हुक्की आली. त्यांचें वऱ्हाड बारा गाड्या ! शिवाय ते बारा घरचे बारा जण ! त्यांत कोणाची काय हुक्की लागेल त्याचा काय नियम ? पण फराळाचें पुष्कळ प्रकारचें केलेलें असूनहि तें बाजूला ठेवण्यांत आलें व प्रत्येकाची एकादशी ज्याच्या त्याच्या मर्जीनुरूप साजरी करण्यांत आली.

स्वभावतः टिळकांना कधींच रुसतां येत नसे. ते रागावत वाटेल तितके, पण रुसणेंफुगणें त्यांना मुळींच ठाऊक नव्हतें. तरी त्यांना सांगून ठेवण्यांत आलें होतें, कीं तुम्हांला जेवायला बोलावतील, तेव्हां जेवायला उठूं नका. दोन तोळ्यांची आंगठी पाहिजे म्हणून सांगा व रुसून बसा ! टिळकांना पढवून मथवून मग त्यांची मित्रमंडळी आपल्या जानोसघरीं निघून गेली.

दुपारीं एक वाजतां केशवरावमामा–माझे वडील बंधु–टिळकांना जेवण्यास बोलावण्यास गेले. टिळकांनीं सांगितलें, " मी रुसलों आहें ! आमची मंडळी जेवण्यास येतील तेव्हां मी येईन." आमच्याकडील वऱ्हाड्यांना भुका लागलेल्या.

त्यांनीं गुपचुप फराळ करून घेतला. मग बसले सगळे जांवयाची वाट पाहत. जांवईबुवांनाहि भूक लागूं लागली. त्यांनीं हळूच केशवरावांना एका बाजूला बोलावून म्हटलें, "आपल्याला आतां भूक लागली बुवा." हें ऐकून केशवरावांना आनंद झाला. त्यांनीं पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्यांना जेवण्यास वाढलें आणि मग माझ्या सासरच्या वऱ्हाड्यांकडे निरोप धाडला, कीं "पानें वाढून झालीं. भात गार होऊं लागला. टिळक जेवण्यास बसले." झालें! भराभर सारी वऱ्हाडी मंडळी पानावर येऊन बसली. नंतर कोणीं अंगठीची विचारपूसहि केली नाहीं. सुपाऱ्या खेळणें, गुळण्या टाकणें, घांस घालणें, वगैरे सर्व प्रकार टिळकांच्या इच्छेविरुद्ध, पण पार पडले. आमच्या लग्नांत भांडणें वगैरे कांहीं झालीं नाहींत.

कांहीं नाहीं तरी मामांनीं माझ्या लग्नांत एक हजार रुपये खर्च करण्याचें ठरविलें. माझे वडील नारायणराव गोखले! हे काय करणार तें दिसतच होतें. आईला पुष्कळ वाटे पण ती बिचारी काय करणार? ती दुसऱ्याकरतां जन्मभर खपली व तिच्याकरतां तिसरे खपत. मामांकडे सजल नेत्रांनीं पाहून आपली कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे तिला काय करतां येत होतें? अगदीं लग्नाच्या गडबडींत नाना रानांत जाऊन हातपाय धूत बसले होते! लग्न झालें. मामांनीं कन्यादान केलें.

* * *

मामांचें आपल्या जांवयावर अगदीं बापाप्रमाणें प्रेम होतें. ते म्हणत, "माझें आहे काय? मनी ही माझी एकुलती एक मुलगी. पुढें मागें माझें जें आहे तें सारें मनीचें नि टिळकांचेंच आहे."

पण आत्याबाईचें पाहाणें निराळें असे. जांवयाला नेहमीं कामधंद्यावांचून घरांतच लाडावून ठेवलें, तर ह्यांचें पुढें व्हावयाचें कसें? ह्याच मतभेदामुळें त्या नवराबायकोंत नेहमीं खडाजंगी उडे.

जलालपुराजवळच गंगापूर आहे. दोहोंमध्यें 'गंगा' तेवढी आडवी. गंगापूर जलालपुरापेक्षां मोठें, श्रीमंत व हौशी गांव. तेथें दशावतारी नाटकें होत. त्या

गांवांत टिळकांना मित्रमंडळी व त्यांच्या कवितेचे रसिक श्रोतृगणहि बरेच मिळाले होते. त्यांच्या आग्रहानें व स्वतःच्याहि हौशीनें त्यांनीं ह्या नाटकांत काम करण्यास सुरुवात केली. पण हें सारें अगदीं चोरून! गोविंदरावमामांच्या कानीं ह्यांपैकीं कांहीं जाऊं न देण्याची सर्व मंडळी मोठी खबरदारी घेत, पण एवढ्या खबरदारीच्या कुंपणांतून मामांच्या कानीं ही बातमी हटकून जात असे! एखादा माणूस सहज बोलून जाई —

"काय हो मामा, तुमच्या जांवयानें तर काल मोठी बहार उडवून दिली. दशरथाचें काम इतकें चांगलें केलें कीं सारीं माणसें ढसढसां रडूं लागलीं!" ह्यावर मामा म्हणत कीं, "हें शक्य नाहीं. ते रात्रीं घरांतच होते."

आम्ही निजल्यावर मामा दाराला बाहेरून हळूच कुलूप लावून घेत व त्या कुलुपाच्या जोरावरच लोकांच्या तोंडाला कुलूप लावण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

सर्व सामसूम झाल्यावर गंगापुरास चाललेल्या नाटकाची गडबड जलालपुरास ऐकूं येई. "आतां गणपति आला, डफावर थाप पडली. तें पाहा 'नाच शारदे' गाणें कसें स्पष्ट ऐकूं येतें." असे पडल्या पडल्या टिळकांचे अधीर शब्द अंधारांत उमटायचे, तर इकडे खिडकीखालीं कुजबूज सुरू व्हावयाची. टिळकांची मित्र-मंडळी खिडकीखालीं जमून त्यांना खिडकींतून हळूच उतरवून घेत. घर शेतकऱ्याचें असल्यामुळें दोर कासरे वगैरे जेथें तेथें टाकलेले असत; त्यांचा उपयोगहि अर्थात् होतच असे.

एक दिवस टिळक असेच मध्यरात्रीं गंगापुरला पळून गेले व पहांटे पहांटे त्याच दोरानें खिडकींतून आंत आले. मामांनीं किल्ल्या चांचपून पाहिल्या, त्या जेथल्या तेथें होत्या. जांवई नाटकांत काम करतो, ही खोटी बातमी सांगून आपल्या दोघांत वितुष्ट पाडण्याचा कांहीं लोकांचा बेत असावा असें त्यांना वाटे. त्या दिवशीं पुन्हा रात्रीच्या चांगल्या कामाची बातमी नित्याप्रमाणें मामांच्या कानांवर येतांच ते म्हणाले, "तसें नाहीं; आज रात्रीं मीच येतों नाटक पाहायला. तुमचीं तोंडें तशानें नाहीं बंद होणार." मामा खरोखरच त्या रात्रीं गुपचुप नाटक पाहायला गेले. आपले श्वशुर गर्दींत बसलेले असतील ह्याची

टिळकांना कल्पनाहि नव्हती. राम वनवासाला निघाले आहेत आणि दशरथ शोक करीत आहे असा प्रवेश होता. टिळक स्वतःच्या कविता रचून त्या गाऊं लागले. प्रेक्षक रडूं लागले. टिळकांच्या हयातींत काव्यगायनाची प्रथा पडलेली नव्हती. पण त्यांनीं आपलें काव्यगायन अशा रीतीनें त्या वेळीं सुद्धां केलें. मामांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले व त्यांतच त्यांचा क्रोधाग्नि विझून गेला!

मामांचा क्रोधाग्नि विझला खरा, पण आत्याबाईंची वीज कडकडावयाची होती ती कडाडलीच.

टिळक संध्याच करीत नाहींत, संध्येचें मांडून ठेवलें म्हणजे ताम्हनांत पाणी ओतून ठेवतात व भस्म खाऊन टाकतात असा आत्याबाईंनीं टिळकांच्या-बद्दल गांवांत बोभाटा करावा, तर टिळकांनीं उलट सांगावें कीं सासू फार खाष्ट, सासरा फार चांगला. तो माझ्या अंगावर पांघरूण घालतो व ती बायकोकडून काढून घेते!

ह्या धुसफुशीमुळें शेवटीं टिळकांनीं जलालपूर सोडण्याचें ठरविलें. मला घेऊन ते नाशकास आले. चार दिवस आम्ही नाशकास राहिलों पण चारच दिवसांत नाशिकचा कंटाळा आला. पुन्हां परत जलालपुरास जावेंसें वाटूं लागलें.

आतां प्रश्न आला चार कोस पायीं मला न्यायचें कसें? मग केलें एक घोडें. पण टिळक पायीं व मी घोड्यावर ह्याला मी कबूल होईना! शिवाय मला घोड्यावर बसावयाचें भयहि वाटत होतें. ते म्हणाले, "आपण दोघेहि बसूं घोड्यावर." पण दोघांनीं एकदम घोड्यावर बसायची लाज वाटूं लागली. त्यांनीं माझी समजूत काढली, "बाजारची वेळ गेली आहे टळून; कोणी भेटणारच नाहीं वाटेनें. कोणी भेटलेंच तर सांगूं आपण शेजारी आहों!" माझी समजूत पटली! व आम्ही दोघें घोड्यावर बसून वाट चालूं लागलों. आळंदीजवळ गांवचा न्हावी भेटला. आम्हांला पाहून तो मोठमोठ्यानें हसूं लागला! "अहो जांवईबुवा, ही वरात छान काढलति!" असें त्यानें हसतां हसतां म्हटलें. आम्ही दोघें लाजून खालीं उतरलों. न्हाव्याच्या हातावर आठबारा आणे पडले. कोणाला सांगणार नाहीं असें त्यानें कबूल केलें. घोड्यावर आम्हीं टाकलेली

गोधडीहि त्याला अर्पण केली. कारण ती जलालपुरास न्यायची कशी? घोड्यावर बसून न्हावीबोवांनी आपला नाशकाचा प्रवास सुखानें केला व आम्ही गोविंदराव-मामांच्या दारीं पायीं पायीं येऊन उभीं राहिलों.

आमचें स्वागत स्तब्धपणेंच झालें. दोनचार दिवस घरांत मुक्याचें व्रत होतें. मग हळू हळू आत्याबाईंचा ज्वालामुखी पेट घेणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं व शेवटीं जें व्हावयाचें तें झालेंच. मामाहि आतां आत्याबाईसारखेंच बोलूं लागले. संसारांत टिळकांचें लक्ष नाहीं असें दोघांचें म्हणणें. शेवटीं टिळक रुसले व मला टाकून निघून गेले.

गंगापुरापर्यंत ते अगदीं जोरानें गेले. पुढें गति कमी झाली. वाटेंत भेटले गोपाळभट. हे जलालपुरचे ग्रामजोशी. त्यांच्या अत्याग्रहावरून आपला राग विसरून टिळक जलालपुरला परतले!

ह्या वेळेस माझे वडील बंधु केशवरावमामा ह्यांनीं टिळकांचें स्वागत केलें.

"का? खाल्लांत पुन्हां मुरुड कानोला?"

"छे रे, मी कुठें येत होतों! गोपाळभटानें मला आणलं!"

"अग अग म्हशी मला कां ग नेशी असंच झालं म्हणायचं!"

टिळक हसले. त्यांचे मेव्हणेहि हसले.

पण ह्यानंतर आम्हांला जलालपुरास फार दिवस राहाणें शक्य नव्हतें. जांवयाचें संसारांत लक्ष नाहीं, हें विकत श्राद्ध घेऊन सव्यअपसव्य करीत बसण्याची वेळ आली आहे, वगैरे आत्याबाईंचे शब्द दुसऱ्यांकडून टिळकांच्या कानीं गेले व जलालपूर सोडून नाशकास जाण्याचा पुन्हा विचार ठरला.

विचार अमलांत आणावयास टिळकांना फारसा वेळ लागत नसे. लगेच त्यांनीं नाशिकचा रस्ता धरला व ते नाशिक येथें पंचवटींत उतरले. पुढें कांहीं दिवसांनी त्यांनीं तेथें एक खाजगी इंग्रजी शाळा काढली व आमचा संसार अशा रीतीनें सुरळीत सुरू झाला.

# सासरीं

सासरची कहाणी सांगायची म्हणजे पुन्हा लग्नमंडपापाशींच सुरुवात करायला हवी.

लग्नानंतर तीन महिन्यांनीं चैत्र महिना आला. माझ्या आजेसासूबाईनीं मजकडून हळदीकुंकू करविलें. सखूवन्सं होत्याच. घरांतील दोघांचौघांनीं गौरीची आरास चांगली करून दिली होती.

तो दिवस शुक्रवारचा होता. मामंजी आलेले होते. त्याच दिवशीं कोंकणांतून मामंजींना त्यांच्या थोरल्या जांवयाचें पत्र आलें, कीं सौभाग्यवतीला नवज्वरानें देवाज्ञा झाली ! पत्र दहा दिवसांनंतर आलें असल्यानें सर्वांचीं स्नानानेंच मोकळीक झाली. ह्या वन्सं माझ्या लग्नाला आलेल्या होत्या.

दर शुक्रवारीं मामंजींच्या अंगांत देवी येत असे. अशा वेळीं त्यांच्याजवळ घरच्या सर्व मंडळीनें हजर असलें पाहिजे अशी अपेक्षा असे. जर कोणी चुकलें तर ते फार रागावत. माझा मात्र असला प्रकार पाहण्याचा माझ्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग होता. मी फारच घाबरलें.

त्या वेळीं देवीला पुष्कळ प्रश्न विचारण्यांत येत व देवीहि अगदीं सरळपणें उत्तरें देत असे. सर्व आठवड्यांतील घरांतील कटकटींचीहि शहानिशा देवीपुढें होत असे. त्या दिवशीं देवीनें सांगितलें, कीं आतां जी ही मुलगी सून झाली आहे ती फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळें घरांत सुख व शांति नांदणार नाहीं. हिच्यामुळें दुसऱ्यांचें वाईट होत जाईल. आत्तांच ह्या 'झाडाची' मुलगी वारली ती हिच्याच पायगुणानें.

देवीचे हे प्रलाप ऐकून टिळकांना फार वाईट वाटलें. देवी घुमूं लागली म्हणजे सर्वांनीं तिला हळदीकुंकू, व फुलें वहावीं असा प्रघात होता. त्या दिवशीं सर्वांनीं त्याप्रमाणें केलें, पण टिळकांनीं तसें कांहीं एक केलें नाहीं. ते मामंजींपुढें तसेच गप्प बसून राहिले.

वारें गेल्यावर काय काय झालें म्हणून मामंजींनीं विचारलें. त्यांना काय काय झालें तें कळलें. त्यांतच टिळकांनीं देवीची पूजा केली नाहीं हेंहि त्यांना कळलें. तेव्हां मामंजी अर्थातच त्यांच्यावर रागावले व म्हणूं लागले, " तूं पूजा केली नाहींस, म्हणून देवी तुजवर रागावली आहे. " टिळक म्हणाले, " देवी आतां निघून गेली आहे. तेव्हां देवी मजवर रागावल्याचें तुम्हांला कसें कळलें ? " ह्या उलट बोलण्यानें देवीऐवजीं मामंजीच टिळकांवर खूप कडाडले !

दुसऱ्याच दिवशीं मामंजींनीं माझ्या अंगावरील सर्व दागिने उतरवून घेतले. कुंकूं व मंगळसूत्र तेवढें ठेवलें. कपडेहि परत घेतले. नाहीं म्हणायला पैठणी तेवढी मजजवळ राहिली. टिळकांना आपल्या वडिलांच्या ह्या कृत्याबद्दल कांहीं शुभाशुभ वाटलें नाहीं.

मामंजींना आपल्या घरांत तीन दुष्ट ग्रह उत्पन्न झाले. एक मी, दुसरे टिळक व तिसरे महादेवभाऊजी. टिळक व महादेवभाऊजी ह्यांच्यासंबंधीं त्यांची पहिल्यापासूनच साशंक वृत्ति असे. कारण, ह्या दोघांच्या हस्तरेषा त्यांना हव्या तशा नव्हत्या. त्यांचीं आवडतीं मुलें म्हणजे सखारामभाऊजी व सखूवन्सं.

भुतेंखेतें, जादूटोणा, अंगांत येणें, पायगुण, ग्रह, टिपण, हातापायांच्या बोटांची लांबी, रुंदी ह्या गोष्टींवर त्यांची माणसांविषयींची आवडनिवड अवलंबून असे. त्यांच्या अंगांत येणारी देवी तर त्यांचें फारच आवडतें दैवत. ही देवी नेहमीं आम्हां तिघांबद्दल कांहीं ना कांहीं सांगायची. बहुतकरून एखाद्या आठवड्यांत मामंजींच्या मनाविरुद्ध आमच्यापैकीं कोणाचें वर्तन घडलें, कीं देवी त्या शुक्रवारीं हटकून आमच्याविरुद्ध आकांडतांडव करावयाची.

टिळकांच्या जन्माच्या वेळीं मामंजींचे काम गेलें होतें. माझें लग्न झाल्यावर मोठ्या वन्सं वारल्या. महादेवभाऊजींच्या जन्मानंतर सासूबाई वारल्या, एकूण

आम्ही तिघेंजण त्यांच्या संसारांतील तीन नतद्रष्ट माणसें ठरलों होतों.

सखारामभाउजींच्या जन्माच्या वेळेस मामंजींना नवीन नोकरी लागली. अर्थात् ते चांगल्या पायगुणाचे ठरले. मामंजींनीं त्यामुळें त्यांना आपल्या सख्ख्या मुलाप्रमाणें व टिळकांना व महादेवभाउजींना सावत्र मुलाप्रमाणें वागविलें! घरांत चहा झाला, तर मामंजींनीं सखारामभाउजींना व सखूवन्संना जवळ बसवून तो प्यावा. टिळक व महादेवभाउजींची वास्तपुस्तहि करूं नये.

माझ्या सासूबाईंना मीं कधीं प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. परंतु त्यांच्या चरित्रांतील व टिळकांच्या पूर्वेतिहासांतील ज्या कांहीं कांहीं गोष्टी मीं ऐकलेल्या आहेत, त्या थोडक्यांत येथें दिल्यास तें अस्थानीं होणार नाहीं असें वाटतें.

माझ्या माहेरीं माझ्या आईची जी गत होती, तीच सासरीं सासूबाईंची होती. टिळक व महादेवभाऊजी तर मामंजींचे नावडते होतेच व माझ्या जागीं मी येण्याआधीं सासूबाई नावडत्या होत्या.

सासूबाई नावडत्या असण्याचीं दोन तीन कारणें होतीं. पहिलें म्हणजे त्या कविता करीत. त्यांच्या कविता मामंजी जाळून टाकीत. मामंजींच्या संतापाग्नींतून व खऱ्याखुऱ्या अग्नीच्या जबड्यांतून सासूबाईंच्या कवितेंतील फक्त दोनच ओळी आतांपर्यंत टिकल्या आहेत. त्या दोन ओळी अशा होत्या—

**ही चिंधीची अल्प बाहुली प्रताप हीचा पहा**
**बाळपणापासून मुलींना शिकवी संसार हा §**

टिळकांना कवितेचें बाळकडू येथेंच मिळालें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार

---

§ खिरस्तसेवासंघाचे रे. फादर विन्स्लो ह्यांनीं ह्या दोन ओळीचें असें इंग्रजी भाषांतर केलें आहे —

See what a majesty pervades
This doll of rags and wood
Instructress she of tender maids
In arts of motherhood

नाहीं. आई कविता करते व लिहिते म्हणून दादा तिचा राग करितात. दादा आपलाहि राग करतात ! म्हणूनच प्रतिक्रिया म्हणून टिळकांचें आपल्या आईवर व कवितेवर त्या वेळेपासून सर्वांत अधिक प्रेम असावें. आईच्या कुशींत निजावें, असें त्यांना पाठीवर चार भावंडें झालीं तरी वाटत असे व त्यावरून निजतांना रोज मारामाऱ्या होत.

मायलेकरांतील हें प्रेम मामंजींना सहन होत नसे. हें दुसरें कारण.

आणि तिसरें कारण म्हणजे सासूबाईंच्याकडे कोणी मिशनरी मडमा येत. त्यांनीं त्यांना शिवण, टिपण, कशिदा वगैरे शिकविलें होतें, त्यांनींच बायबल-मधील नीतीचें पुस्तकहि सासूबाईंना दिलें होतें. तें त्या नेहमीं वाचीत. मामंजींनीं एक दिवस तें पुस्तक घेऊन जाळून टाकलें.

त्या वेळेस टिळकांना आपल्या वडिलांचा इतका राग आला, कीं त्यांची कांहींतरी जबर खोडी काढण्यासाठीं ते टपून बसले. मामंजींना तमाखूचें व्यसन होतें. तमाखूंत चुना घालून ती खावयाची, असा त्यांचा प्रघात होता. टिळकांनीं त्यांचा डोळा चुकवून चंचींतून चुन्याची डबी लांबविली व ती दिली विहिरींत फेकून ! बाळपणच तें ! ! मामंजींनीं नीतीचें पुस्तक जाळलें, म्हणून जगांतील साऱ्या नीतीच्या पुस्तकांची राखरांगोळी होणार नव्हती किंवा टिळकांनीं मामंजींची चुन्याची डबी विहिरींत फेकून दिली, म्हणून साऱ्या चुन्याच्या डब्या पटापट विहिरींत जाऊन जीव देणार नव्हत्या. परिणाम मात्र असा झाला, कीं मामंजींचा राग भडकून अनावर झाला. त्यांचा तिकडे थयथयाट चालला होता, तर टिळक आपल्या जागेवरून पडल्या पडल्या त्यांची गंमत पाहात होते. मामंजींनीं सर्वांना हांका मारून प्रत्येकाची जबानी घेतली. कोणी कबूल होईना. शेवटीं ते टिळकांवर कडाडले व एक मोठा फोंक घेऊन त्यांनीं त्यांना चांगलें फोडून काढलें. तिसऱ्या दिवशीं टिळक घरांतून पळून गेले. सहा महिने टिळकांचा पत्ता नाहीं ! मार खाल्ल्याच्या दुसऱ्या दिवशीं टिळक इतके चांगले वागले, कीं त्यांच्या वडिलांनींसुद्धां मनांत वा म्हटलें असेल ! पण तें सारें आईसाठीं होतें.

पळून जाण्याच्या आदल्या दिवशीं आईला पूर्ण सुख द्यावें, असा त्यांचा हेतु होता.

टिळक गेल्यावर बिचाऱ्या सासूबाईंची स्थिति अत्यंत शोचनीय झाली. ह्या देवाला नवस कर, त्या देवाला नवस कर, ह्याला सांग, त्याच्यापुढें तोंड वेंगाड, असें त्यांचें चाललें होतें. कोंकणांत त्यांनीं आपल्या भावाकडेहि निरोप धाडला होता. ते निरोप पोचतांच कल्याणला आले. मामंजी त्या वेळेस कल्याणला होते.

त्याच वेळेस तेथें पुण्याहून एक गृहस्थ आले होते. त्यांनीं सासूबाईंना म्हटलें, 'तुमच्या नानाला मीं पुण्यास नाटकांत काम करतांना पाहिलें.'

ह्या माणसानें खरोखरच टिळकांना पाहिलें, अशी मनाची खात्री झाल्यावर सासूबाईंना फारच आनंद झाला. त्यांनीं ती गोष्ट आपल्या भावाकडून मामंजींच्या कानावर घातली व टिळकांना पुण्याहून कसें तरी परत घरीं आणलें. घरीं परत आल्यावर मामंजी टिळकांना फारच त्रास देऊं लागले. सासूबाईंचा जीव थोडा थोडा होत असे. त्यांना वाटे, टिळक पुन्हा पळून जातात कीं काय? टिळक व सखारामभाऊजी दोघे बरोबर शाळेंत जात. भाऊजी आतां त्यांच्या चहाड्या कमी सांगूं लागले. आपल्यामुळेंच नाना पळून गेला, असें त्यांच्या मनानें घेतलें.

ह्याच सुमारास दोघांच्याहि पायांना नारू झाले. सासूबाई दोघांचेंहि सारखेंच करीत. पण मामंजी मात्र टिळकांना म्हणत, "चांगलें झालें. तूं लंगडा झालास तर मला आनंद वाटेल. तुझी खोडकी मोडलीच पाहिजे." जवळच सखारामभाऊजी पडलेले असत. त्यांना मामंजींनीं म्हणावें, "बाळ उगा अं, आतां बरा होशील." दोघांचेहि नारवाचे दोरे काढायला न्हावी बोलावला होता. दोरे काढतांना मामंजींनीं सखारामभाउजींना मांडीवर घेऊन त्यांच्या पाठीवरून ते हात फिरवीत होते व त्यांची समजूत करीत होते. अर्थात् टिळकांच्या नशिबीं हें नव्हतेंच! उलट दोरे काढल्यावर घरांत जाऊन त्यांनीं सखारामभाउजींना पेढा आणून दिला व टिळक रडत होते त्यांना

मारांचा धाक घातला !

ह्या काल्पनिक गोष्टी नाहींत. सखारामभाउजींच्या तोंडावर टिळकांनीं मला त्या सांगितल्या आहेत.

कर्ज म्हटलें म्हणजे माझ्या सासूबाईंना व मामंजींना त्याचा अतिशय तिटकारा येत असे. त्यांनीं कधीं कोणाचें कर्ज काढिलें नाहीं आणि म्हणूनच सासूबाई शिवणकाम करून मामंजींच्या पिठांत आपलें मीठ घालीत असत. आपलीं मुलें शिकून मोठीं कर्तबगार होतील असें त्यांना फार फार वाटे.

आपल्या अडीअडचणीला थोडा फार हातभार लागावा म्हणून मामंजींच्या न कळत सासूबाईंनीं शंभर रुपये मागें टाकले होते. ह्या पैशांचा खरोखरच अडचणीच्या वेळेस उपयोग झाला पण तो सासूबाईंच्या अपेक्षेप्रमाणें न होतां देवाच्या योजनेप्रमाणें झाला.

टिळक हरवले तेव्हां सासूबाईंनीं मारुतीला नवस केला होता, ‘ हे मारुतीराया, माझें बाळ सांपडूं दे. मी तुला वड्याची माळ घालीन. ’ त्याप्रमाणें एक दिवस त्यांनीं वड्याची माळ करून ती आपल्या मुलांच्या हवालीं केली.

“ ही माळ मारुतीला घालून या ! ”

टिळक म्हणाले, “ आई मारुतीला कशाला ? आम्हालाच दे ना ते वडे ? ”

“ तुम्हांला एक एक वडा ठेवला आहे बरं. जा आतां एवढी माळ घालून या. ”

टिळक तळ्यावर गेले. सखारामभाऊजी बरोबर होते. टिळकांनीं सगळे वडे तेथें बसून खाऊन टाकले, टिळक पुन्हां पळून जातील ह्या भीतीनें भाऊजी कांहींच बोलले नाहींत. घरीं आल्यावर आई वडा देऊं लागली, तो टिळक खाईनात, ते म्हणाले—

“ मला नको. ”

“ तुला हवे होते ना ? ”

“ मीं खाल्ले. ”

“ कुठें ? ”

" तूं दिले होतेस ते ! "

" म्हणजे ? तूं देवाचे वडे खाल्लेस वाटतें ? "

" हो. "

सासूबाईंना फार वाईट वाटलें.

" तूं सांगत होतीस ना देव लांब नाहीं, आपल्या अंतःकरणांतच राहातो तो. "

" अरे, पण असें करायचें नाहीं. माझ्या बोलण्याचा तूं असा अर्थ करशील असें मला वाटलें नाहीं. देव अंतःकरणांत आहे म्हणजे आपल्या मनांतले सगळे वाईट विचार त्याला समजतात. "

सासूबाईंना जितका राग आला तितकेंच टिळकांचें कौतुकहि वाटलें. दुसऱ्या दिवशीं सासूबाईंनीं स्वतः जाऊन मारुतीच्या गळयांत वड्याची माळ घातली.

टिळक आपल्या मातुश्रींना घरकामांत मदत करीत. मामंजींना प्यायचें पाणी देखील दुसऱ्यानें द्यावें असें वाटे. टिळक आईला पाणी भरूं लागत तेव्हां मामंजींनीं म्हणावें, " भर, पाणीच भर. तुझ्या नशिबीं पाणीच भरायचें आहे. हा सखाराम पाहा, तुझ्याहून लहान असून कसा अभ्यास करतो. "

हें ऐकून सासूबाईंच्या डोळ्यापुढें आपल्या मुलाचें पाणक्याचें चित्र उभें राही व त्या रडूं लागत. त्यांचे डोळे पुशीत टिळक म्हणत, " आतां खरंच तूं सांगशील तसा मी वागेन. "

पुढें मामंजींची बदली मोखाड्यास झाली. तिकडे शिक्षणाची सोय नसल्यामुळें त्यांनीं एकटेंच जाण्याचें ठरविलें. बायको, मुलें कल्याणासच ठेवलीं, आणि ते मोखाड्यास आपल्या कामावर रुजू झाले. मामंजी गेल्यावर आतां त्याच घरांत, शान्ति, समाधान व आनंद हीं सर्वजण वावरूं लागलीं. टिळकांच्या खोड्या कमी झाल्या, किंवा त्या जितक्या मामंजींना दिसत तितक्या सासूबाईंना दिसत नव्हत्या, असें म्हटलें तरी चालेल. आतां टिळकांना आपल्या आईबरोबर मनसोक्त बोलावयास वेळ मिळत असे. त्याचें कारण म्हणजे मामंजी असतांना काम फार व ह्या मायलेकांचें बोलणें ऐकून त्यांना राग येत असे. आतां

तसें बिलकूल नव्हतें. आतां फक्त मुलें व आई! मग काय विचारतां ?

सासूबाई ह्या एक आदर्श माता होत्या. त्या आपल्या मुलांची फारच काळजी घेत असत. सार्येच, गरमगरम अन्न मुलांना घालीत असत. त्यांनीं त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावें. त्यांच्या हालचालींकडे लक्ष द्यावें. टिळक तर आईला विचारल्याशिवाय घटकाभरसुद्धां घराबाहेर जात नसत.

टिळक घरांत फार नम्रतेनें वागत. आपल्या धाकट्या भावंडांना ते बिलकुल त्रास देत नसत. सखारामभाउजींना समजून चुकलें कीं, आतां आपले दादा येथें नाहींत, तेव्हां आई व नाना ह्यांच्या आज्ञेप्रमाणें आपल्याला वागलेंच पाहिजे.

टिळक म्हणत, "आई, घरांत दादा नसले म्हणजे बरें वाटतें. ते नेहमीं बाहेर राहिले तर किती छान होईल. मग आपल्याला कांहींच त्रास नाहीं."

"मग तुम्हांला खायला कोण घालील ?"

"खरेंच सांगू का आई, त्यांचें मला फार भय वाटतें. कधीं कधीं तर असें वाटतें, कीं ते अगदींच नसतील तर बरें."

"असें भलतेंच बोलूं नये."

"मींच एवढें त्यांचें कायग घोडें मारलेंय्? तूं सांगतेस तसा नाहीं का मी वागत ? मी काय करतों हें माझें मलाच समजत नाहीं."

"मोठा झालास म्हणजे सर्व कांहीं तुला समजेल."

अशा प्रकारचें बालवयाला साजेसें संभाषण दोघां मायलेकांत होत असे. टिळक म्हणत,

"आई, तुला मी कधीं कधीं सोडून जाणार नाहीं. माझ्यासाठीं तुला फार फार त्रास झाला ना ?"

"बरें असूं दे रे, तूं मात्र असाच चांगला राहा म्हणजे झालें."

मनुष्याचे बेत, विचार आणि पुढील कृति वगैरे सर्व देवाच्या इच्छेवर अवलंबून असतात. अमृताच्या घटांत जहरी सर्पानें गरळ घालावी तसें झालें. एक दिवस मोखाड्याहून मामंजींच्या सहीचें, पण दुसऱ्याच्या हातचें पत्र

आलें. त्यांत खालील मजकूर होता.

" वामनराव अतिशय आजारी आहेत. त्यांची डोळेभेट घेण्यास अवश्य यावें. हयगय करूं नये. "

बायको मनुष्य, तशांत घरची गरिबी, नवऱ्याचें ह्या प्रकारचें पत्र आलेलें, भोंवतीं मुलांचा गराडा, जाण्याची वाट अतिशय अवघड. ह्या सर्व विचारांचें काहूर सासूबाईंच्या मनांत उभें राहिलें व आतां कसें वागावें हेंच त्यांना उमजेना. त्यांच्या पोटांत कालवाकालव सुरू झाली. बिचारी करणार काय ? त्यांना कांहींच मार्ग सुचेना. तरीपण धीर धरून त्या मुलांना म्हणाल्या,

" बाळांनो, तुम्ही येथेंच रहा. मी एकटीच जातें. "

टिळक म्हणाले, " आई, आतां आपण असें करूं, कीं आपण दोघेंजण जाऊं. सखाराम राहील सुभेदारांकडे. मी आल्यानें तुला बरेंच साहाय्य होईल. तूं एकटी काय करशील? दादा आजारी, घरांतलें काम, पाणी लांबचें, तूं मला घेऊन चल. आपण दोघेंहि जाऊं. तूं सांगशील तसाच मी वागेन. "

बुडत्याला काडीचा आधार. टिळकांचें म्हणणें सासूबाईंना पटलें. खरें सांगायचें म्हणजे टिळकांना आपल्या आईला सोडून राहण्यास नको होतें. सखारामभाउजींस कल्याणासच ठेवून त्यांनीं आपली तयारी केली. अडचणीसाठीं ठेविलेले पैसे बरोबर घेतले. पन्नास वर्षांपूर्वीचा मोखाड्याचा रस्ता ज्याला माहीत असेल, त्याच्याच ध्यानांत तें येईल. सासूबाईंच्या पाठीशीं मूल, आणि टिळकांजवळ एक लहान बोचकें. अशा थाटांत तीं दोघें जणें निघालीं. ते दिवस उन्हाळ्याचे होते. खालीं जमीन तापलेली, वरून ऊन प्रखर लागतें आहे, मनांत चिंता, पोटांत भूक, वाटेनें पाण्याचा शुकशुकाट, पायांत पादत्राण नसल्यामुळें कांटे खडे बोचत आहेत, भोंवतालीं गर्द झाडी, हिंस्र पशूंचें मनांत भय, तशांत एक डोंगर उतरून दुसरा चढायचा, एका बाजूला खोल दरी, वाटेंत कोळ्याकातोड्यांचीं लहानलहान खेडीं, मध्येंच वारुळांतून मोठमोठाले साप बाहेर येत आहेत कीं काय असा भास होणें, पाल्यापाचोळ्यांतून आवाज होणें; असल्या बिकट वाटेनें सासूबाई आपल्या आयुष्याची मर्यादा

तुडवून जात होत्या.

“ आई, आतां मी घेतों त्याला. तूं थकली असशील. ”

“ नको बाळ. मी तुझ्याहून मोठी आहें, म्हणून मला शक्ति जास्त आहे. ” अशा प्रकारें एकमेकांशीं बोलत चालत व एकमेकांचे श्रम हलके करीत कसेंबसें त्यांनीं मोखाडें गांठलें. हें गांव टेंकाडावर आहे. सासूबाई म्हणत असत, कीं “ मीं एकदांचें त्यांना सुखी पाहिलें म्हणजे मिळविली. ”

“ ते चांगले आहेत. तूं काळजी करूं नकोस. त्यांना कांहीं झालें नाहीं. ”

“ नसो बाबा, मी हेंच मागणें मागतें आहें. देव करो नि हेंच खरें ठरो. आतां माझें कांहीं मागणें नाहीं. ”

ही मंडळी दरड चढून गेली. हें गांव फार मोठें नाहीं. तेव्हांच तपास लागला; फारसा उशीर लागला नाहीं. हीं घरीं जातात तों बाहेरच मामंजी गप्पा मारीत बसलेले ! हें पाहून सासूबाईंच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. त्यांचा श्रमभार ताबडतोब हलका झाला.

थोड्या वेळानें सासूबाई कामास लागल्या. घरांतला केरकचरा काढून त्या मुलांना बरोबर घेऊन दरड उतरूं लागल्या. त्यांना विहिरीवर अंग धुण्यास जायचें होतें.

“ काय ग आई ! मी काय म्हणालों ? त्यांना कांहीं झालें नाहीं. ”

“ तुझ्या तोंडांत साखर पडो, तुझे शब्द खरे झाले. आतां तूं बोलल्याप्रमाणें रहा म्हणजे मिळविली. ” सासूबाईंच्या डोक्यावर हंडा, टिळकांच्या कडेवर महादेवभाऊजी, अशा रीतीनें ती मंडळी निघाली.

“ मी घेतों तो हांडा. ”

“ नको, तुला तो जड होईल. ”

“ आई, तूं दमली नाहींस ? ”

“ कांहीं इतकी नाहीं. ” डोक्यावर हंडा; खांद्यावर धुणें; आतां जाऊन स्वयंपाक करायचा, असे डोक्यांत विचार. अशा त्या घरीं परत आल्या. मामंजी दारासमोरच बसले होते. त्या दाराशीं आल्या, “ एवढा हंडा उतरायचा

होता." हे शब्द कानीं पडतांच मामंजी वाघासारखे चवताळून त्यांच्या अंगावर आले.

"मी कांहीं तुमचा चाकर नाहीं." असें म्हणून त्यांनीं सासूबाईंची मान धरून त्यांना मागून एक लाथ मारली. त्यासरशीं सासूबाईंनीं रामाला हांक मारून धरणीवर अंग टाकिलें. हें दृश्य पाहिल्याबरोबर दोन्ही मुलें कावरीं-बावरीं झालीं व त्यांनीं रडावयास सुरुवात केली.

टिळकांनीं महादेवभाऊजींस खालीं ठेवून आईच्या जवळ जाऊन विचारिलें, "तुला लागलें का?" आईनें हातानेंच खूण केली, कीं 'नाहीं' व तोंडानें राम राम म्हटलें. टिळकांनीं कोरडें नेसायला दिलें तें कसेंबसें नेसून त्यांनीं अंथरूण धरलें. टिळकांच्या मनांत पुन्हा वडिलांची खोडी काढण्याचें येई पण आईकडे पाहून ते गप्प बसत.

शेजाऱ्यांना हा प्रकार पाहून कांहींच कळेना. मामंजी बाहेरच शांत बसून राहिले होते. मधून मधून ते घरांत ये-जा करीत. सासूबाईंनीं आठ दिवस तोंडांतून "राम" ह्या शब्दांवांचून दुसरा शब्द उच्चारला नाहीं, कीं पाण्या-वांचून तोंडांत कांहीं घेतलें नाहीं. अशा स्थितींत आठव्या दिवशीं मामंजींना विधुरावस्थेंत टाकून व मुलांना जगाच्या हवालीं करून त्यांनीं राम राम म्हणत प्राण सोडला.

टिळकांचें मन तर फारच गांगरून गेलें. त्यांच्या दुःखाला पारावार उरला नाहीं. 'न मातुः परदैवतम्' अशी त्यांची आपल्या आईबद्दल वृत्ति अगदीं पहिल्यापासून होती. आईच्या ऐवजी दादा गेले असते तर किती चांगलें झालें असतें, असें ते अगदीं उघड उघड म्हणत. तिनें शेवटीं रामाचा धांवा केला. आपलें नांवसुद्धां घेतलें नाहीं म्हणूनच रामानें तिला नेलें. आपणहि तसेंच करावें. मग आपणहि तिच्या मागें जाऊं. पण मग माधवाचा कोण संभाळ करील? असे नाना प्रकारचे विचार त्यांच्या डोक्यांत थैमान घालीत होते.

मामंजींनीं टिळकांना त्रास देण्याचें सोडलें व टिळकांनींहि त्यांच्या खोड्या करण्याचें सोडलें. पण टिळक मनांतल्या मनांत एका मोठ्या विचारांत गढून गेले

होते. वडिलांच्या येथून निसटावयाचें व स्वतःचा चरितार्थ स्वतः चालवायचा, असें त्या लहानशा डोक्यानें घेतलें. पण तें त्यांनीं कोणाला बोलून मात्र दाखविलें नाहीं.

आपल्या पत्नीचीं हाडें गंगेंत पडावीं, असें मामंजींना वाटूं लागलें. मोखाड्याहून त्र्यंबकेश्वर हेंच क्षेत्र जवळ आहे तेव्हां त्र्यंबकेश्वराला जाऊन क्रियाकर्मांतर करावें, असा बेत ठरला.

महादेवभाउजींना तेथेंच शेजाऱ्याकडे ठेवून टिळकांना बरोबर नेण्याचें ठरलें. सासूबाईंनीं बरोबर आणलेल्या बोचक्यांतच महादेवभाऊजींचे कपडे होते. मामंजींनीं तें बोचकें सोडलें. त्यांत कपड्यांबरोबर त्यांना एक जडशी गांठोडी लागली. तींत अडीअडचणीसाठीं सासूबाईंनीं बाजूस टाकलेले शंभर रुपये मामंजींना सांपडले! ते पैसे पाहून तर त्यांना फारच दुःख झालें. हर हर! आपल्या उत्तरक्रियेसाठींच हे पैसे तिनें ठेवले होते, असें म्हणून ते ओक्साबोक्शीं रडूं लागले.

टिळक व मामंजी त्र्यंबकेश्वरीं आले. तेथील सर्व विधि आटोपल्यावर मेव्हण्याच्या स्वाधीन मुलेंबाळें करून आपण मोकळें व्हावयाचें, असा मामंजींचा बेत होता व तसें त्यांनीं बेडेकरांना मोखाड्यास बोलावून ठेवलें होतें.

टिळक मनांत म्हणत होते, मामा आले म्हणजे सखाराम व माधव ह्यांची सोय खात्रीनें होणार, तेव्हां आतां आपल्याला कसली काळजी नाहीं. मामांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेलों तर वारंवार आपल्याला आईची आठवण होऊन रडूं येणार. तेव्हां आतां आपण आपली सोय दुसरीकडेच बघावी. त्या वेळीं टिळकांचें वय अकराबारा वर्षांचें असेल. रात्रीं सगळी निजानीज झाल्यावर टिळक हळूच उठले व पळून गेले. मामंजी सकाळीं उठून पाहातात तों ते कोठें जाग्यावर आहेत? पुन्हा हा प्रकार कल्याणसारखाच झाला. मामंजी गडबडून गेले व त्यांना त्यामुळें त्र्यंबक सोडण्यास ठरल्यापेक्षां बराच अधिक उशीर झाला.

टिळक जे रात्रीं निघाले ते एका धर्मशाळेंत झोंपले. पहांटेस रस्ता नेईल तिकडे

ते निघाले. ती वाट नाशिकची होती. त्यांच्याजवळ त्यांच्या अंगावरील कपड्यांखेरीज दुसरें कांहीं नव्हतें. जवळ एक पैसा नाहीं, कीं दमडी नाहीं. आपण कोठें जात आहों ह्याचाहि त्यांना पत्ता नव्हता! सरळ जायचें व आपल्या पायांवर उभें राहायचें एवढेंच त्यांना त्या वेळीं ठाऊक होतें.

मामंजी मोखाड्यास परत गेले. तेथें त्यांचे मेहुणे मुलें नेण्यासाठीं येऊन बसलेच होते. त्यांनीं मुलें नेलीं, तेव्हां मामंजींना फार वाईट वाटलें. त्यांना त्या वेळीं टिळकांबद्दलहि वाईट वाटलें.

टिळकांच्या डोळ्यासमोर आपल्या आईची मूर्ति एकसारखी दिसत होती व कानांत तिचे रामराम हे शब्द गुणगुणत होते.

टिळक दहाच्या सुमारास नाशिक येथें पोहोंचले. त्यांनीं नाशिक गांठलें खरें, पण ह्या गांवाचें नांव मात्र त्यांना माहीत नव्हतें. कारण ते यापूर्वीं नाशिक येथें कधींच आलेले नव्हते. विचारपूस केल्यावर, त्यांना हें नाशिक आहे असें समजलें. गांव नाशिक आहे असें समजल्याबरोबर त्यांनीं गंगेची वाट धरली व ते घाटावर आपलें आसन मांडून बसले, देव कोणालाहि विसरत नाहीं. त्याप्रमाणें तो टिळकांनासुद्धां विसरला नाहीं. टिळकांच्याच वयाचा एक मुलगा स्नानासाठी त्यांच्याजवळ थोड्याशा अंतरावर उतरला होता. त्यानें टिळकांना आपल्या घरीं नेलें. त्या मुलाच्या आईनें टिळकांना आपल्या घरींच ठेवून घेतलें.

जवळ जवळ आठ-नऊ महिन्यांनीं मामंजींना आपला मुलगा नाशकास असल्याचें समजलें व तें ऐकून त्यांना समाधानहि वाटलें. त्यांनीं ताबडतोब आपल्या मेव्हण्याला पत्र लिहून सुचविलें, कीं नाना नाशकास आहे, तेथें विद्याभ्यासाची सोय चांगली आहे, खर्चहि कमी येतो तेव्हां तुमचा मुलगा सखाराम आणि तुमची भावजय ह्यांना नाशकास पाठवून द्या,. तेथें त्यांना बिऱ्हाड करून द्या. तुम्ही दहा रुपये पाठवीत जा, मी दहा पाठवीन.

मामंजींच्या सूचनेप्रमाणें ही सर्व मंडळी नाशकास येऊन दाखल झाली, बरोबर गोविंदरावांची विधवा भावजय होती, त्या घरांतील पाहूं लागल्या.

टिळकांना वडिलांकडून व मामांकडून जी मदत येई ती पुरेशी नव्हती. तेव्हां

तेहि पडेल तें काम करून कांहीं पैसे मिळवीत. त्यांना विद्याहि संपादन करायची होती तेव्हां भटजींच्या मठांत संस्कृत व घरीं इंग्रजी असा अभ्यासक्रम त्यांनीं सुरू केला. इंग्रजी डिक्शनरी पाठ करावी असें कोणीं त्यांना सुचविलें होतें त्याप्रमाणें ते न चुकतां करूं लागले. ही बातमी कर्णोपकर्णीं नाशिक हायस्कूलच्या हेडमास्तरांच्या कानीं जाऊन त्यांनीं टिळकांना बोलावून घेतलें आणि त्यांना आपल्या शाळेंत दाखल करून टाकलें. सखारामभाऊजी ह्याच शाळेंत शिकत होते. टिळक येथें केवळ एक दोन वर्षेंच राहिले. मात्र वक्तृत्व व काव्यलेखन हीं जोरांत चालू होतीं.

पुढें आमचें लग्न झाल्यावर लौकरच सखारामभाऊजी आपलें नाशिकचें शिक्षण आटोपून पुण्यास गेले. कोकणची मंडळी कोकणांत गेली. राहतां राहिलों आम्ही दोघेच, अर्थात् आम्हांला येत असलेली वीस रुपयांची मदत यायची थांबली. तेव्हां आम्ही जलालपुरास गेलों पण तेथें जमेना म्हणून नाशिकास परत येऊन दाखल झालों. येथें पंचवटींत टिळकांनीं शाळा काढली व आतां आमचा संसार सुरळीत चालणार असा रंग दिसूं लागला.

* * *

# सा सु र वा स

एक दिवस मामंजी सखारामभाउजींना घेऊन नाशकास उतरले. आमचा संसार पाहून त्यांना समाधान झाल्यासारखें दिसलें. मामंजींचा पूर्वीचा एक सत्यनारायण करायचा राहिला होता. सत्यनारायणाची पूजा झाल्यानंतर मामंजी व भाऊजी परत गेले. ते परत गेले न गेले तोंच त्यांचें पत्र आलें, कीं सखारामभाउजींचें लग्न ठरलें आहे, तरी तुम्ही उभयतां पुण्यास या. वडिलांच्या आज्ञेप्रमाणें आम्ही दोघें पुण्यास गेलों. जातांना त्यांनीं आपली चिमुकली शाळा तिथल्याच एका गृहस्थाच्या हवालीं केली. आपण स्थापन केलेली शाळा सोडतांना टिळकांना फार वाईट वाटलें. पण टिळकांच्या स्वभावांतील हा एक विशेष होता कीं दृष्टीसमोर असेल तें त्यांना जीव कीं प्राण असे; एकदा का एखादी व्यक्ति किंवा काम दृष्टीआड झालें कीं मग त्याची त्यांना पुष्कळदा आठवणहि राहात नसे. त्यांची ‘ पांखरा येशिल का परतून ’ ही कविता एखाद्यानें त्यांनाच उद्देशून म्हटली असती तर त्यांत कांहीं वावगें झालें नसतें. ते बाहेर गेले म्हणजे “ वाऱ्यावरचा तरंग चंचल जाशिल तूं भडकून ” असें म्हणण्याची आमच्यावर पाळी येत असे. ते असे कोठें गेले म्हणजे मीं रडत बसावें, घरांतल्या वृद्ध मंडळीनें काळजींत पडावें व तरुणांनीं शोध करीत सुटावें. असो.

पुण्याला सर्व वऱ्हाड जमलें. पण कोठें माशी शिंकून भाउजींचें तें लग्न मोडलें. अर्थात् सर्व पांगापांग झाली. टिळकांनाहि तेथून निसटायचें होतें पण जायचें कसें ? नाण्यांचा तोटा होता. मागायचें कोणाजवळ ? बायकोजवळ

सासऱ्यानें तेवढें मणी मंगळसूत्रच ठेवलें होतें. नाहीं म्हणायला पैठणी होती.

टिळकांना तें ठाऊक होतें. त्यांनीं कांहीं निमित्त करून मजजवळून ती पैठणी मागून घेतली. त्या पैठणीचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं. टिळक मात्र गेले मला पुण्यास टाकून. त्या पैठणीवर त्यांना प्रवासापुरते पैसे मिळाले.

एक दिवस मामंजींनीं माझी जबानी घेण्यास सुरुवात केली.

" लक्ष्मीबाई ! पैठणी कुठें आहे ? "

" मला ठाऊक नाहीं. मीं त्या कोनाड्यांत बांधून ठेवली होती. "

" तें मला ठाऊक नाहीं. पैठणी आणून द्या, नाहींतर माझ्याशीं गांठ आहे ! " मामंजी घुश्शांत असले म्हणजे मला अहो जाहो म्हणत.

खरी गोष्ट अशी होती कीं भाऊजींनीं व मामंजींनीं गहाण पडलेली पैठणी सोडवून आणली होती. पुढें मात्र ती पैठणी माझ्या कधींच नजरेस पडली नाहीं म्हटलें तरी चालेल.

मी एकटीच सासरीं – म्हणजे सासऱ्याच्या कचाट्यांत – सांपडलें.

" मामंजी, मला बांगड्या भरायच्या. "

" मग, मला काय सांगतां ? पैठणी आणून द्या मग बांगड्या भरूं ! "

" माझीं लुगडीं फाटलीं —"

" मग मी काय करूं ? पैठणी आणून द्या मग लुगडीं घेऊं ! "

" तुमच्या गळ्याशपथ पैठणी मीं हरवली नाहीं. "

" तें मला कांहीं ठाऊक नाहीं. मोलाचीं दळणीं दळा नि भरा बांगड्या, घ्या लुगडीं —"

वरील तऱ्हेचा संवाद झाल्यावर मी मुळूमुळू रडत बसें. शिकेकाई – तेल कांहीं कांहीं मला ते देत नसत. मागायला गेलें कीं वरील ठराविक सांच्याचें उत्तर यायचें.

एक दिवस दुपारीं मामंजी बाहेरून आले, त्या वेळीं ते माझ्याशीं फार गोड गोड बोलूं लागले,

" लक्ष्मीबाई, तुम्हांला लुगडीं पाहिजेत ना ? "

मला फार आनंद झाला.

" होय, माझ्या साड्या अगदीं फाटून गेल्या आहेत. "

" एक पाहिजे का दोन ? "

" दोन. "

" एक पाहिजे असेल तर चार रुपयांचें घेतों. दोन पाहिजे असतील तर दोन दोन रुपयांचीं दोन मिळतील. "

झालें ! मी काय बोलणार ? मला फार वाईट वाटलें. पुन्हा कोपऱ्यांत जाऊन डोळे पुसून कामाला लागलें. लग्न झाल्यानंतर सासरच्या ह्या पहिल्याच साड्या. मला माझ्या माहेरची व गोविंदरावमामांच्या प्रेमाची आठवण येऊन सारखे उमाळे येत होते. थोड्या वेळानें मला दोन दोन रुपयेवाल्या दोन साड्या मिळाल्या.

असे कांहीं दिवस गेले. पुढें मामंजींची बदली मुरबाडला झाली होती, तेथें मला घेऊन जाण्याचें टिळकांनीं ठरविलें. माझे मामंजी म्हणजे अतिशय टापटिपीचे गृहस्थ होते. सासूबाई वारल्यानंतर त्यांनीं दुसरें लग्न केलें नाहीं कीं इतर कांहीं भानगडी केल्या नाहींत. त्यांचें वर्तन फार शुद्ध असे. परस्त्री ते मातेसमान मानीत. सासूबाईंच्या नंतर घरांतील सर्व व्यवस्था ते स्वतः पाहात, स्वतः हातानें स्वयंपाक करीत व तो इतका बेताचा, कीं जेवण झाल्यावर भाताचें एक शीत उरायचें नाहीं !

मुरबाडास ते रामाच्या देवळांत राहात असत. शेजारींच एक खाणावळ होती. आम्ही मुरबाडास पोंचलों तेव्हां मामंजींचें जेवण झालें होतें. ते बाहेर ओसरीवर बसले होते. अर्थात् घरांत आम्हांला कांहीं खावयास मिळालें नाहीं. मामंजींनीं बाहेर खाणावळींत आमची रवानगी केली. भाताचा बळी, हळदकुंकवाएवढें वरण, भाजलेले कडवे वाल, शेवटीं ताकाळलेलें पाणी, असा जेवणाचा थाट होता ! टिळकांना त्याचें कांहीं वाटलें नाहीं. पण चार पिढ्या देशावर काढलेल्या मला मात्र तें जेवण उपासाहून अधिक त्रासदायक

वाटलें. जेवण होऊन आम्हीं घरीं आल्यावर मामंजींनीं मला आपलें घर दाखविलें.

" लक्षुंबाई, येथें जर तुम्हीं कांहीं अव्यवस्था केली, गबाळेपणा केला तर मला अगदीं खपणार नाहीं. हें सर्व साहित्य, हें सरपण, ती बाहेर विहीर. आतां संध्याकाळचा स्वयंपाक तुम्ही करा."

तांदळाच्या भाकरी करण्याचा तो पहिलाच प्रसंग. तांदळाची भाकरी मीं पूर्वीं कधीं जन्मांत केली नव्हती कीं पाहिली नव्हती. पहिल्या पावसानंतर जमिनीला जशा भेगा पडतात तशा माझ्या भाकरींना भेगा पडल्या होत्या.

मीं स्वयंपाक करण्यास बसलें कीं मामंजी पुढच्या खोलींत बसावयाचे. तेथून त्यांना स्वयंपाकघरांत काय काय चाललें असेल, तें दिसे. पुष्कळ वेळेला एकीकडे त्यांची देवपूजा चाले, तर एकीकडे मला स्वयंपाक शिकविणें चाले. मला स्वयंपाक चांगला येत होता; पण तो देशावरचा. एकदा मामंजींनीं मला सांगितलें,

" आमटीला जिवंत फोडणी दे!"

" जिवंत फोडणी कशी द्यायची?"

" पळी तापवून."

मी पळी तापवून नेहमींप्रमाणें फोडणी देऊं लागलें. मामंजी संतापले.

" तूं दगड झाली असतीस तर तुझा पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता."

" कोणास ठाऊक पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता का देवाच्या मूर्तीला उपयोग झाला असता!" मात्र माझें म्हणणें मनांतल्या मनांत होतें.

मामंजींनीं सांगितलें, " तेलाचा जाळ झाल्यावर फोडणी द्यायची." मी जाळ करण्यासाठीं जळतें लाकूड उचलून पळीवर धरलें! अर्थात् पुढें जाळ चांगलाच झाला व त्याबरोबर मामंजीहि चांगलेच कडाडले!

एक तर कोकणी पदार्थ आमच्या देशावरील पदार्थांहून निराळे; दुसरें त्यांचीं नांवें विलक्षण व तिसरें मामंजींचें उपरोधिक बोलणें. त्यामुळें माझी

फारच त्रेधा उडे.

एकदां मामंजींनीं मला 'आयती' करावयाला सांगितलें. मला वाटलें मी आयती बसून खातें, असें म्हणण्याचा तर कांहीं मामंजींचा हेतु नाहीं? एकदां त्यांनीं सांगितलें, पेजबुड्या भात कर. मीं पाणबुड्या हा शब्द ऐकला होता. पण पेजबुड्या म्हणजे काय हें मला कळेना. शेवटीं मला एक गुरु भेटला. विहिरीजवळ एक बिऱ्हाड होतें. तेथें गंगाबाई नांवाची एक माउली होती. मामंजींनीं कांहीं सांगितलें कीं मी कळशी घेऊन पाणी आणायला पळें व पाणी काढतां काढतां खिडकींतून गंगाबाईंना हळूंच विचारी. गंगाकाकूहि मला सारें समजावून सांगत. "पेजबुड्या भात म्हणजे काय हो काकू?"

"अग, पुष्कळ पाणी भातांत घाल, म्हणजे झाला पेजबुड्या भात!"

मी हसत हसत घरीं आलें व मामंजींना पाहिजे होता तसा पेजबुड्या भात शिजवून त्यांना वाढला. मग त्यांनीं कांहीं तरी विचित्र पदार्थ करायला सांगावें व गंगाकाकूंच्या सांगीप्रमाणें मी सरळपणें – जसे कांहीं मला बाळपणापासून ते ठाऊकच आहेत असे – ते करून टाकावे.

टिळकांनीं येथेंहि एक शाळा काढली. ते आतां ह्या कामांत फार तरबेज झाले होते. इंग्रजी शिकविण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. विद्यार्थी म्हणजे त्यांचे दोस्त, बंधु; त्यांची शाळा म्हणजे पगारी शाळा नसे. त्यांचें आपल्या विद्यार्थ्यांवर मुलांसारखें प्रेम असे व विद्यार्थी त्यांना वडिलांसारखा मान देत. फीहि चांगली मिळे.

माझी स्थिति मात्र चमत्कारिक झाली होती. माझ्या हालचालींवर मामंजींचें एकसारखें लक्ष असायचें.

माझा जन्म जसा कांहीं खाण्यासाठींच झालेला! मला मामंजींच्या बारीकसारीक आज्ञांची आठवण राहात नसे. पुरुषांचीं जेवणीं झालीं कीं मी उष्टींखरकटीं काढून शेणगोळा भांड्यांजवळ ठेवून हात धुई; मग स्वतःचें वाढून घेई. एक दोन घास तोंडांत पडेपर्यंत मामंजी कधीं कांहीं बोलत नसत. पण ते पडले कीं त्यांनीं म्हणावें,

वाटलें. जेवण होऊन आम्हीं घरीं आल्यावर मामंजींनीं मला आपलें घर दाखविलें.

" लक्ष्मुंबाई, येथें जर तुम्हीं कांहीं अव्यवस्था केली, गबाळेपणा केला तर मला अगदीं खपणार नाहीं. हें सर्व साहित्य, हें सरपण, ती बाहेर विहीर. आतां संध्याकाळचा स्वयंपाक तुम्ही करा."

तांदळाच्या भाकरी करण्याचा तो पहिलाच प्रसंग. तांदळाची भाकरी मीं पूर्वीं कधीं जन्मांत केली नव्हती कीं पाहिली नव्हती. पहिल्या पावसानंतर जमिनीला जशा भेगा पडतात तशा माझ्या भाकरींना भेगा पडल्या होत्या.

मीं स्वयंपाक करण्यास बसलें कीं मामंजी पुढच्या खोलींत बसावयाचे. तेथून त्यांना स्वयंपाकघरांत काय काय चाललें असेल, तें दिसे. पुष्कळ वेळेला एकीकडे त्यांची देवपूजा चाले, तर एकीकडे मला स्वयंपाक शिकविणें चाले. मला स्वयंपाक चांगला येत होता; पण तो देशावरचा. एकदा मामंजींनीं मला सांगितलें,

" आमटीला जिवंत फोडणी दे ! "

" जिवंत फोडणी कशी द्यायची ? "

" पळी तापवून. "

मी पळी तापवून नेहमींप्रमाणें फोडणी देऊं लागलें. मामंजी संतापले.

" तूं दगड झाली असतीस तर तुझा पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता. "

" कोणास ठाऊक पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता का देवाच्या मूर्तीला उपयोग झाला असता ! " मात्र माझें म्हणणें मनांतल्या मनांत होतें.

मामंजींनीं सांगितलें, " तेलाचा जाळ झाल्यावर फोडणी द्यायची. " मी जाळ करण्यासाठीं जळतें लाकूड उचलून पळीवर धरलें ! अर्थात् पुढें जाळ चांगलाच झाला व त्याबरोबर मामंजीहि चांगलेच कडाडले !

एक तर कोकणी पदार्थ आमच्या देशावरील पदार्थांहून निराळे; दुसरें त्यांचीं नांवें विलक्षण व तिसरें मामंजींचें उपरोधिक बोलणें. त्यामुळें माझी

फारच त्रेधा उडे.

एकदां मामंजींनीं मला 'आयती' करावयाला सांगितलें. मला वाटलें मी आयती बसून खातें, असें म्हणण्याचा तर कांहीं मामंजींचा हेतु नाहीं? एकदां त्यांनीं सांगितलें, पेजबुड्या भात कर. मीं पाणबुड्या हा शब्द ऐकला होता. पण पेजबुड्या म्हणजे काय हें मला कळेना. शेवटीं मला एक गुरु भेटला. विहिरीजवळ एक बिऱ्हाड होतें. तेथें गंगाबाई नांवाची एक माउली होती. मामंजींनीं कांहीं सांगितलें कीं मी कळशी घेऊन पाणी आणायला पळें व पाणी काढतां काढतां खिडकींतून गंगाबाईंना हळूंच विचारी. गंगाकाकूहि मला सारें समजावून सांगत. "पेजबुड्या भात म्हणजे काय हो काकू?"

"अग, पुष्कळ पाणी भातांत घाल, म्हणजे झाला पेजबुड्या भात!"

मी हसत हसत घरीं आलें व मामंजींना पाहिजे होता तसा पेजबुड्या भात शिजवून त्यांना वाढला. मग त्यांनीं कांहीं तरी विचित्र पदार्थ करायला सांगावें व गंगाकाकूंच्या सांगीप्रमाणें मी सरळपणें—जसे कांहीं मला बाळपणापासून ते ठाऊकच आहेत असे—ते करून टाकावे.

टिळकांनीं येथेंहि एक शाळा काढली. ते आतां ह्या कामांत फार तरबेज झाले होते. इंग्रजी शिकविण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. विद्यार्थी म्हणजे त्यांचे दोस्त, बंधु; त्यांची शाळा म्हणजे पगारी शाळा नसे. त्यांचें आपल्या विद्यार्थ्यांवर मुलांसारखें प्रेम असे व विद्यार्थी त्यांना वडिलांसारखा मान देत. फीहि चांगली मिळे.

माझी स्थिति मात्र चमत्कारिक झाली होती. माझ्या हालचालींवर मामंजींचें एकसारखें लक्ष असायचें.

माझा जन्म जसा कांहीं खाण्यासाठींच झालेला! मला मामंजींच्या बारीकसारीक आज्ञांची आठवण राहात नसे. पुरुषांचीं जेवणीं झालीं कीं मी उष्टींखरकटीं काढून शेणगोळा भांड्यांजवळ ठेवून हात धुई; मग स्वतःचें वाढून घेई. एक दोन घास तोंडांत पडेपर्यंत मामंजी कधीं कांहीं बोलत नसत. पण ते पडले कीं त्यांनीं म्हणावें,

" लक्षुंबाई, शेणगोळा येथें भांड्यांजवळ पडला आहे तेवढा दूर फेकून या पाहूं. " कीं मीं जेवण दूर सारून शेणगोळा टाकून यावें. मामंजींचें नेहमीं सांगणें कीं शेणगोळा भांड्यांजवळ टाकूं नको. पण मी नेमकें तेंच विसरें.

पुन्हां जेवायला बसलें कीं त्यांनीं म्हणावें,

" लक्षुंबाई, तुळशीला पाणी घातलें का ? कीं मीं पुन्हां उठावें. हें काम मी रोज विसरें व रोज मला जेवतांना त्याच्यासाठीं उठावें लागे.

हा दिवसाचा कार्यक्रम. रात्रीचाहि कार्यक्रम होताच. मामंजींनीं सांगावें,

" लक्षुंबाई, तुम्ही जेवायला बसायच्या आधीं माझा बिछाना घालून ठेवा, टिनपाटांत पाणी ओतून ठेवा. विसरूं नका बरं. "

रात्रीचीं जेवणीं फार उशिरां होत. जेवूनच मग करावें बिछान्याचें काम असें वाटे. पण दोन घास तोंडांत पडतांच मामंजींनीं नेमकें म्हणावें,

" लक्षुंबाई, माझा बिछाना घाला पाहूं ! " कीं उठल्याच लक्षुंबाई. ओवळें नेसावें, बिछाना घालावा व सोवळ्यानें जेवायला बसावें !

एकदा मी स्वयंपाक करायला बसलें असतां कांहीं विद्यार्थी आले व म्हणाले,

" अहो वहिनी ! वहिनी ! दादा तिकडे नानांचा नि तुमचा बारावा-तेरावा घालीत आहेत ना ! "

मी आपली तडक उठून काय प्रकार आहे तो पाहाण्यास देवळांत गेलें. तों काय ? माडीवरून मामंजी एक एक उपकरणें खालीं फेंकीत होते. उपकरणें थेट रामाच्या सभामंडपांत येऊन पडे. प्रत्येक फेकीच्या वेळीं त्यांचा मंत्रघोष व्हायचा —

" माझी सून मेली. तिचा आज बारावा आहे. माझा मुलगा मेला. त्याला तिलांजलि देतों. "

झालें होतें काय कीं उपकरण्यांना डाग पडले होते. उपकरणीं होतीं तांब्याचीं, पाणी विहिरीचें, राख लाकडाची व दिवस पावसाचे; ह्यांमुळें मीं तीं कितीहि लख्ख घासलीं तरी त्यांच्यावर ढग येत.

मी माडीवर गेलें. तेथेंच शाळेच्या एका कोपऱ्यांत मामंजींनीं आपले देव

मांडले होते. मीं वर जाऊन सारीं उपकरणीं गोळा केलीं. मामंजी माझ्या मागें आले.

“ तूं हीं भांडीं घासलीं होतींस ? ”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23.845 दि: 2/1/87
क्रमांक 834 नों: दि: 30/5

“ हो ! ”

“ वाहा माझी शपथ ! ”

“ तुमची शपथ मीं घासलीं ! ”

“ मी मेलों तर तुला काय रडूं येणार आहे ? धर मंगळसूत्र हातांत नि वाहा शपथ ! ”

मीं मंगळसूत्र हातांत धरून शपथ वाहिली. कर नाहीं तर मला डर कसली आली ?

“ थांब ! मी बायकांची सभा बोलावितों व तींत हीं भांडीं ठेवून त्यांचीं मतें विचारतों; त्या घालतील चांगलें शेण तोंडांत ! ”

पण माझी खात्री होती कीं बायकांनीं कांहीं माझ्या तोंडांत शेण घातलें नसतें.

“ धर माझे पाय आणि वाहा शपथ; पाहा, जळून भस्म होशील पायांना हात लावलास तर ! ”

मी त्यांच्या पायांवर हात ठेवूं लागलें, तसे ते मागें सरकूं लागले.

“ पाहा, विनाकारण जळून जाशील. ”

“ कांहीं हरकत नाहीं. तुमच्या पायांजवळ मरण आलें तर कांहीं वाईट नाहीं. ”

शेवटीं पालथी पडलें व त्यांचे पाय गच्च धरले. मी कांहीं जळून मेलें नाहीं. मोठी निराशा झाली माझी. एकदाची मरून गेलें असतें तर बरें झालें असतें, असें मलाहि झालें होतें. पण मामंजींची तेवढी तपश्चर्या नव्हती म्हणा किंवा मीं उपकरणीं खरोखरच घासलीं होतीं म्हणा, मी त्या दिवशीं जळालें कांहीं नाहीं !

पण ह्या आगींत टिळकांच्या सहानुभूतीचा ओलावा असल्यानें तेवढेंच दुःखांत सुख होतें.

खालील गोष्ट तर मी, कधीं विसरणार नाहीं.

समोरच्या विहिरीचें पाणी आटलें व रानांत विहीर होती तेथें पाण्याला जावें लागे. तेथें दिवसा अतोनात गर्दी होई मामंजींनीं सांगितलें, रात्रीं जाऊन पाणी आणीत जा. मला अंधाराचें भय वाटे. पण त्यांना त्याचें कधींच कांहीं वाटत नसे. त्यांनीं मला सांगितलें, "तुला जर कोणीं खायला आलें, तर त्याला सांग माझा सासरा देवळांत बसला आहे. त्याला आधीं खाऊन ये नि मग मला खा."

पण टिळकांनीं मला सांगितलें, "भिऊं नको. मी पाणी आणीन." रात्र झाली म्हणजे खरोखरच त्यांनीं पुढल्या दारून फिरायला म्हणून निघावें व मी मागल्या दारून पाण्याला निघावें. नंतर मी घराच्या आसपास थांबावें व त्यांनीं विहिरीवरून भरून आणलेलें पाणी घरांत आणून सांठवावें! मामंजींना वाटावें कीं सून काय पण विश्वासानें पाणी भरीत आहे!

मामंजी मला वर दिल्याप्रमाणें छळीत: पण दोन गोष्टींबद्दल मला त्यांचे गुण घ्यावेसे वाटतात. एक म्हणजे मला त्यांनीं कधीं अपशब्द वापरले नाहींत व कधीं माझ्या अंगाला बोट लावलें नाहीं. तसे ते एखाद्या वेळीं माझी इतरां-जवळ वाखाणणीहि करीत.

मात्र ती एखादे वेळींच. त्यांच्याजवळ कांहीं मागितलें तर त्यांचा फार संताप होई. तेल नि शिकेकाई मला कधीं मिळाली नाहीं. ती मागायला गेलें कीं त्यांनीं म्हणावें, मोलाचीं दळणीं दळ आणि आण तेल शिकेकाई. मी आपली मातीनें डोकें धुई. त्यांतहि एखादे वेळेस न्हायला बसलें कीं माझ्यापुढचें गरम पाणी त्यांनीं उचलून न्यावें व स्वतः आंघोळीस लागावें! उरलेलें न्हाणें मीं गार पाण्यानें करावें.

तेल शिकेकाईच्या नेहमींच्या खटक्यांत मला ते एक गोष्ट सांगत,

"एकदा लाकडें संपलीं होतीं. माझी बायको गर्भारशी होती. तरी मीं तिला लाकडें फोडायला लावलीं. मग तुझी काय कथा? माझी बायको उलटून बोलत नसे. घरांतलें सामान संपलें म्हणजे उरलेलें माझ्यासमोर मुकाट्यानें आणून ठेवी

व त्यावरून मी समजें सामान संपलें! पण आत्तांच्या तुम्ही पोरी फार उद्धट. वडील माणसांशीं कसें वागावें हें तुम्हांला नाहीं यायचें."

टिळकांची कवि म्हणून आतां प्रसिद्धी होऊं लागली होती. मुंबई-पुण्यापर्यंत त्यांचें नांव ऐकूं येऊं लागलें. मला जरी घरांत त्रास होता तरी त्यांच्या दृष्टीनें आतां हे चांगले दिवस आले होते.

त्यांना मुंबईंत कोठेंसें व्याख्यान देण्यासाठीं आमंत्रण आलें. आठ दिवसांनीं येतों म्हणून टिळक मुंबईला गेले, ते तिकडेच रमले! आठ दिवस झाले, दहा झाले, पंधरा झाले, तरी पत्ता नाहीं कीं पत्र नाहीं!

मला फारच काळजी वाटूं लागली. माझ्या डोळ्यांचें पाणी खळेना. त्यांत मामंजींना त्यांनीं सरदारगृहाचा पत्ता दिला होता, त्यानें तर माझी पुरीच पाठ पुरविली. मामंजी म्हणत,

"आज तुझ्या नवऱ्याचें पत्र आलें."

"हं!"

"त्याला सरदारगृहांत धोतरं धुण्याचं काम मिळालं आहे."

"मग मी तीं वाळत टाकीत जाईन."

"तो तेथलीं पानें वाढतो."

"मी उष्टीं काढीन. मला तुम्ही मुंबईला नेऊन पोचवा."

"मजजवळ पैसे नाहींत. तुला पाहिजे तर तूं कशीहि जा, पण मुंबई म्हणजे मुरबाड नाहीं. तेथें एखाद्या खड्याप्रमाणें तुझा पत्ताहि लागणार नाहीं."

एक दिवस मी फार रडलें. मामंजींना माझी दया आली. ते मजजवळ पाट टाकून बसले.

"लक्ष्मी, मला कांहीं फार मुली नाहींत. फक्त एकच आहे. एक मेली. तूं माझी दुसरी मुलगीच आहेस. जशी सखू तशी तूं. रडूं नको. जाऊं दे तो गेला तर. उद्यां हरतालिका आहे. तूं संध्याकाळीं दोन बायका आवरणाला बोलीव. लाडू कर, मी तुला सर्व कांहीं सामान देतों."

असें म्हणून त्यांनीं बाजारांत जाऊन बेसनाच्या लाडवाचें सर्व सामान आणून

दिलें. मीं सर्व तयारी केली. लाडू केले. मामंजींनीं लाडू तयार होतांच तीन लाडू बाहेर काढून ठेवले, डबा उचलून आपल्या पेटींत ठेवला व पेटीला कुलूप लावलें! आलेल्या बायांना तीन लाडवांवर जेवणावळ घातली!

पाहुण्या बायकांजवळ मामंजींनीं माझीं गाऱ्हाणीं करण्यास सुरुवात केली,

"लक्ष्मी चोरून खाते!"

गंगाबाई चांगल्याच उसळल्या.

"काय चोरून खाते हो! तुमचा तर सारा माल कुलपांत असतो. काय चोरून खाते ती? लाकडं? नि घासलेट पिते होय?"

अर्थात हरताळका अशी झाली. आपण लाडू कां उचलून ठेवले हें त्यांना सांगावयाचें होतें. पण त्यांनीं वरील प्रस्तावना करतांच बाजू त्यांच्यावरच उलटली.

एक दिवस मामंजी कोठें बाहेर गेले होते. शेजारचीं पाजारचीं मुलें जमलीं व त्यांनीं मामंजींची दौत उपडी केली. मी शेजारीं बसायला गेलें होतें तेथें तीं धांवत धांवत येऊन सांगूं लागलीं, "वहिनी, वहिनी, दादांची दौत उपडी झाली." मी घाबरून उठलें व जाऊन सांडलेली शाई माझ्या पायांनीं पुसून परत आलें. माझीं पावलें जमिनीवर वठलीं.

मामंजी घरीं येतांच शाई सांडलेली पाहून त्यांचा मोठा संताप झाला. कोणी पोर कबूल होईना. मग त्यांनीं प्रत्येकाचें पाऊल वठलेल्या पावलावर ठेवून पाहिलें व शेवटीं गर्जतच ते स्वैंपाकघरांत आले!

"चल वर!"

मी आज्ञेप्रमाणें वर गेलें.

"ही शाई कोणीं सांडली?"

"मला नाहीं ठाऊक!"

"हें पाऊल कोणाचें? ठेव तेथें पाऊल. सांग शाई सांडलीस कीं नाहीं?"

"मीं नाहीं सांडली."

"तूंच सांडलीस. ही सरकारी शाई होती. तुला ती भरून द्यावी लागेल."

मामंजी तलाठी होते.

" मी कशी भरून देऊं ? "

" दळण दळ मोलाचं ! "

हें पालूपद माझ्या चांगलें परिचयाचें झालें असल्याकारणानें त्याचें मला कांहीं वाटेनासें झालें होतें व तसा प्रसंगहि देवानें मजवर कधीं आणला नाहीं.

मामंजींनीं दोन पत्रें लिहिलीं. एक टिळकांना मुंबईस व दुसरें गोविंदराव-मामांना जलालपुरास.

टिळकांना लिहिलें कीं, " तुझी बायको रात्रीची बाहेर जाते व पहाटे घरीं येते. तूं येऊन तिला घेऊन जा. मजवर कांहीं जबाबदारी नाहीं. नाहीं तर आजच तिला तिलांजलि दे. "

गोविंदरावमामांना लिहिलें. " तुमचा जांवई फार बिघडला आहे. त्याला नाहीं नाहीं तीं व्यसनें जडलीं आहेत. त्यानें आपली बायको टाकून दिली आहे. तो भांग, गांजा, चरस, चंडोल ओढतो. तुम्हांला तुमच्या मुलीची गरज असेल तर तीन दिवसांत तिला घेऊन जा, नाहीं तर मी तिला कोठेंहि सोडून देईन."

टिळकांची माझ्याबद्दल पूर्ण खात्री होती व वडिलांचाहि स्वभाव त्यांना चांगला ठाऊक होता. तेव्हां मामंजींच्या पत्राचा टिळकांवर कांहीं परिणाम झाला नाहीं.

मामा आणि आत्याबाई मात्र त्यांना गेलेल्या पत्रामुळें फार घाबरलीं. आत्याबाई म्हणे, " जांवई भांग गांजा ओढतो हें ठीक झालें, पण चंडोल कसा ओढतो ? तो हातीं कसा लागतो ? तो तर म्हणे आकाशांत उडतो !

त्यावर मामांनीं " चंडोल म्हणजे अफू ओढतो " म्हणून सांगितलें. तेव्हां तर ती फारच घाबरली.

नाना ह्या वेळेस आजारी होते. त्यांचा अगदीं भरंवसा नव्हता. त्यांना तसेंच टाकून मुलीकडे जावें, का त्यांच्याजवळ बसून मुलगी हातची गमवावी अशा पेचांत तीं दोघें पडलीं.

शेवटीं मामांनीं हळूच नानांना विचारलें, " मनीला आणायला जाऊं का ? "

दिलें. मीं सर्व तयारी केली. लाडू केले. मामंजींनीं लाडू तयार होतांच तीन लाडू बाहेर काढून ठेवले, डबा उचलून आपल्या पेटींत ठेवला व पेटीला कुलूप लावलें! आलेल्या बायांना तीन लाडवांवर जेवणावळ घातली!

पाहुण्या बायकांजवळ मामंजींनीं माझीं गाऱ्हाणीं करण्यास सुरुवात केली,

"लक्ष्मी चोरून खाते!"

गंगाबाई चांगल्याच उसळल्या.

"काय चोरून खाते हो! तुमचा तर सारा माल कुलपांत असतो. काय चोरून खाते ती? लाकडं? नि घासलेट पिते होय?"

अर्थात हरताळका अशी झाली. आपण लाडू कां उचलून ठेवले हें त्यांना सांगावयाचें होतें. पण त्यांनीं वरील प्रस्तावना करतांच बाजू त्यांच्यावरच उलटली.

एक दिवस मामंजी कोठें बाहेर गेले होते. शेजारचीं पाजारचीं मुलें जमलीं व त्यांनीं मामंजींची दौत उपडी केली. मी शेजारीं बसायला गेलें होतें तेथें तीं धांवत धांवत येऊन सांगूं लागलीं, "वहिनी, वहिनी, दादांची दौत उपडी झाली." मी घाबरून उठलें व जाऊन सांडलेली शाई माझ्या पायांनीं पुसून परत आलें. माझीं पावलें जमिनीवर वठलीं.

मामंजी घरीं येतांच शाई सांडलेली पाहून त्यांचा मोठा संताप झाला. कोणी पोर कबूल होईना. मग त्यांनीं प्रत्येकाचें पाऊल वठलेल्या पावलावर ठेवून पाहिलें व शेवटीं गर्जतच ते स्वैंपाकघरांत आले!

"चल वर!"

मी आज्ञेप्रमाणें वर गेलें.

"ही शाई कोणीं सांडली?"

"मला नाहीं ठाऊक!"

"हें पाऊल कोणाचें? ठेव तेथें पाऊल. सांग शाई सांडलीस कीं नाहीं?"

"मीं नाहीं सांडली."

"तूंच सांडलीस. ही सरकारी शाई होती. तुला ती भरून द्यावी लागेल."

मामंजी तलाठी होते.

" मी कशी भरून देऊं ? "

" दळण दळ मोलाचं ! "

हें पालूपद माझ्या चांगलें परिचयाचें झालें असल्याकारणानें त्याचें मला कांहीं वाटेनासें झालें होतें व तसा प्रसंगहि देवानें मजवर कधीं आणला नाहीं.

मामंजींनीं दोन पत्रें लिहिलीं. एक टिळकांना मुंबईस व दुसरें गोविंदराव-मामांना जलालपुरास.

टिळकांना लिहिलें कीं, " तुझी बायको रात्रीची बाहेर जाते व पहाटे घरीं येते. तूं येऊन तिला घेऊन जा. मजवर कांहीं जबाबदारी नाहीं. नाहीं तर आजच तिला तिलांजलि दे. "

गोविंदरावमामांना लिहिलें. " तुमचा जांवई फार बिघडला आहे. त्याला नाहीं नाहीं तीं व्यसनें जडलीं आहेत. त्यानें आपली बायको टाकून दिली आहे. तो भांग, गांजा, चरस, चंडोल ओढतो. तुम्हांला तुमच्या मुलीची गरज असेल तर तीन दिवसांत तिला घेऊन जा, नाहीं तर मी तिला कोठेंहि सोडून देईन."

टिळकांची माझ्याबद्दल पूर्ण खात्री होती व वडिलांचाहि स्वभाव त्यांना चांगला ठाऊक होता. तेव्हां मामंजींच्या पत्राचा टिळकांवर कांहीं परिणाम झाला नाहीं.

मामा आणि आत्याबाई मात्र त्यांना गेलेल्या पत्रामुळें फार घाबरलीं. आत्याबाई म्हणे, " जांवई भांग गांजा ओढतो हें ठीक झालें, पण चंडोल कसा ओढतो ? तो हातीं कसा लागतो ? तो तर म्हणे आकाशांत उडतो !

त्यावर मामांनीं " चंडोल म्हणजे अफू ओढतो " म्हणून सांगितलें. तेव्हां तर ती फारच घाबरली.

नाना ह्या वेळेस आजारी होते. त्यांचा अगदीं भरंवसा नव्हता. त्यांना तसेंच टाकून मुलीकडे जावें, का त्यांच्याजवळ बसून मुलगी हातची गमवावी अशा पेचांत तीं दोघें पडलीं.

शेवटीं मामांनीं हळूच नानांना विचारलें, " मनीला आणायला जाऊं का ? "

नानांनीं जा म्हणतांच पडत्या फळाची आज्ञा म्हणून मामा तडक मुरबाडला येण्यास निघाले.

टिळकांना गेलेल्या पत्रावर त्यांचा मुळींच विश्वास बसला नाहीं. परंतु त्यांच्या मनानें असें घेतलें कीं दादांच्या बोलण्यानें कंटाळून मीं जीव दिला असावा व म्हणूनच असें हें पत्र आलें असावें. तेव्हां टिळकहि तातडीनें मुरबाडास येण्यास निघाले.

मुलगा नाहीं तर व्याही ह्यांपैकीं कोणी तरी आतां येऊन ही देशावरची, वाईट पायगुणाची, कोकणी स्वैंपाक येत नसलेली अशिक्षित सून आपल्याजवळून घेऊन जाईल ह्या आनंदांत मामंजी चूर होऊन गेले होते, तर तिकडे ते दोघे काळजीनें हवालदील होऊन मुरबाडचा प्रवास करीत होते.

मुरबाडला मुंबई जवळ असल्यानें टिळकांचा आगगाडीचा प्रवास ताबडतोब संपला. घरीं मामंजी आपल्या मित्रमंडळीसह मोठ्यामोठ्यानें गप्पा मारीत बसले होते. टिळकांनीं घरीं पोचतांच पहिला प्रश्न केला,

" दादा, तुम्हांला कसें वाटतें ? "

" मला काय झालें आहे ? तूं आपल्या बायकोला घेऊन जा. माझ्याजवळ ती नको. ती तुला बऱ्याच चहाड्या सांगेल. तर तिचें तूं ऐकूं नको. ती कधीं माझ्याशीं बोलत नाहीं. " आणखीहि ते बोलतच होते पण पुढें कांहीं ऐकण्यास टिळक तेथें थांबलेच नाहींत. ते तडक आंत स्वैंपाकघरांत आले. मी तेथें रडत बसलें होतें. त्यांनीं माझी समजूत केली व आपल्याला मुंबईस काम लागलें असून उद्यां सकाळीं आपण निघूं असें त्यांनीं मला सांगितलें. माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. मामंजींनाहि आनंद झाला व दुसऱ्याच दिवशीं आम्ही मुंबईला जाण्यास निघालों.

आम्ही मुरबाड सोडलें सकाळीं व त्याच दिवशीं गोविंदरावमामा मुरबाडास पोचले संध्याकाळीं !

मी मुरबाडास नाहीं असें पाहातांच त्यांच्या पोटांत धस्स झालें. मामंजी त्यांच्याशीं धड बोलेनात. तुमची मुलगी तिच्या नवऱ्याबरोबर मुंबईला गेली

एवढें मात्र त्यांनीं मामांना सांगितलें. मुंबईचा आमचा पत्ता विचारला तर मला ठाऊक नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें.

आमच्या मागोमाग मामांनीं मुंबईचा रस्ता धरला. ते मुंबईस पोचले खरे पण मला शोधायचें कोठें? अगदीं वेड्यासारखे तीन दिवस ते रस्त्यानें चाळींकडे पाहात पाहात वणवण करीत हिंडत होते.

आम्हीं आमचा संसार गिरगांवांतील खोलींत थाटला. घरांत सामानसुमान त्यांनीं आणून टाकलें व मीं तें लावण्याचें अंगावर घेतलें. पण मुंबईच्या नव-लाईनें मला इतकें भारून टाकलें होतें कीं जरा कांहीं 'झे मी' करून मीठवाला किंवा 'अरे प्राण्या' म्हणून जरीपुराणेवाला ओरडला कीं मी बाहेर येऊन डोकावून जात असें.

अशीच एकदा बाहेर डोकें काढून रस्ता न्याहाळीत असतां आ वासून वर पाहात चाललेले मामा मला दिसले! मीं मोठ्यानें हाक मारली, "मामा!"

"मने!" म्हणून खालून आश्चर्यचकित मामांनीं साथ दिली.

आम्हांला दोघांना केवढा आनंद झाला म्हणून सांगूं!

थोड्या वेळानें सासऱ्याजांवयांच्या गांठीभेटी झाल्या. मामांना पाहून टिळकांना फार आनंद वाटला. मामांनीं नाना अत्यवस्थ असल्याचें टिळकांना सांगून माझी जलालपुरास जाण्याविषयीं परवानगी विचारली. अर्थात् टिळक नाहीं म्हणणें शक्य नव्हतें. दुसऱ्या दिवशीं पुन्हा मी बोरीबंदरवर दाखल झालें.

मामांनीं मला बायकांच्या डब्यांत बसविलें व प्रत्येक स्टेशनवर येऊन ते माझी चौकशी करूं लागले. मी त्यांना सर्व ठीक आहे म्हणून सांगत होतें पण खरा प्रकार निराळाच होता.

सिंहस्थाचा तो शेवटला महिना होता. डब्यांत साऱ्या भाट्या—गुजराथ्यांच्या बाया बसल्या होत्या. एकेकीचा दंड तुळईसारखा जाड! मला कोणी बसायलाहि जागा देईना. ह्या सगळ्या भाट्यांमध्यें मी एखाद्या लहानशा उंदराप्रमाणें सांपडलें होतें. तरी मी उंदराच्या चिरचिरीप्रमाणें त्यांना मध्येंच म्हणें, "स्टेशन आलें म्हणजे मी स्टेशनमास्तरला सांगेन." पण तेवढ्यानें त्या

थोड्याच दाद देणार ! त्यांचें आपलें कोपरखळी मारण्याचें व मधूनमधून चिमटे घेण्याचें काम चालूच होतें. कल्याण सोडल्यावर हळूच एका बाईचें मूल घेऊन मी खेळवूं लागलें. मला थोडीशी बसायला जागा मिळाली. पण हळूहळू डब्यांतलीं सारींच मुलें माझ्या अंगावर पडलीं ! असो. मुलें खेळवीत का होईना, पण सुखरूपपणें चांगलें बसून नाशिकपर्यंत पोचतां आलें, हें का थोडें झालें !

नाशिकच्या स्टेशनवर उतरल्यावर गांवांत जाण्यास तांगेवाले पांच रुपये स्वारी मागूं लागले. मामांच्याजवळ तितके पैसे नव्हते. ते म्हणाले, ' तूं तांग्यांत जा. ' मी म्हणें ' तुम्ही जा, मी पायीं येतें. ' असें करतां करतां दोघांनींहि पायीं जाण्याचें ठरलें.

आमच्या लोकांत बोलण्याचा पोच नसतो एवढें मात्र खरें. मामा व मी दगदगीनें अतिशय थकलेलों. स्टेशनवरून उन्हातान्हांत सहासात मैल चालून नाशकास आलेलों. पुढें तसें पाहिलें तर नाशकास थोडा मुक्काम करून खाऊन-पिऊन घरची गाडी बोलावून नंतर जलालपुरचा पुढचा सहा मैलांचा प्रवास आम्हांला उरकायचा. पण गांवांत शिरतांच उपाध्याय भेटले. त्यांनीं खालीं दिल्याप्रमाणें प्रताप केला.

" का गोविंदरावमामा, कोठें गेलां होतां ? "

" मनूला आणायला. "

" किती दिवस झाले ? "

" चार. "

" मग, नाना गोखले वारले तेव्हां तुम्ही येथें नव्हतां वाटतें ? "

हें ऐकल्याबरोबर आम्हा दोघांनाहि अतिशय वाईट वाटलें. आतां खाणेंपिणें नि विसावा कसला ? आम्ही तडक पायींच जलालपुरला जाण्याकरितां निघालों.

नानांनीं जरी मला कधीं प्रेमानें कुरवाळलें नसलें, तरी मला त्यांच्या मृत्यूनें अतोनात दुःख झालें. माझी आई मला माझ्या वयाच्या बाराव्या वर्षींच सोडून गेलेली ! तें सारें आठवलें !

* * *

टिळकांना आतां मुंबईचें आकर्षण वाटूं लागलें. तेथें घर वगैरे घेऊन सर्व सोय लागल्यावर कांहीं दिवसांनीं टिळक मला न्यायला आले. जलालपुराहून आमचा लक्ष्मीनारायणाचा जोडा निघाला. आतां खरोखर नवा व सुंदर संसार स्वतंत्र रीतीनें आम्हांला थाटायचा होता. मी माहेराहून माझ्या नव्या संसारासाठीं घेतां येईल तेवढें सामान घेण्याचा प्रयत्न करीत होतें, तर प्रवासांत सामान घेण्याचा टिळकांचा तिटकारा त्याला आडवा येत होता. तरी मीं भाजीपाला व फळफळावळ घेतां येईल तितकी घेतलीच.

जलालपुराहून आम्ही नाशिकला आलों. तेथें टिळकांची अलोट मित्रसंपत्ति होती. त्या संपत्तींत लोळण्यांत टिळकांनीं दोनदा गाडी चुकविली. आतां मात्र तिसऱ्यांदा गाडी चुकूं द्यावयाची नाहीं, असा निश्चय करून आम्ही दुसऱ्या दिवशीं नाशिक गांव सोडून नाशिक रोड स्टेशनवर येऊन पोचलों. अगदीं प्लॅटफॉर्मजवळ आलों; आतां माझ्या जिवांत जीव आला. टिळकांनीं हमालाबरोबर सामान देऊन मला प्लॅटफॉर्मवर पाठवून दिलें व ते तिकीटऑफिसपुढील गर्दींत दिसेनासे झाले. मी सारें सामान व्यवस्थित मांडून गाडी येतांच आंत चटकन शिरण्याच्या तयारीनें उभी राहिलें. गाडी आली. हमालानें सामान आंत ठेवलें. मी आंत जाऊन बसलें. गाडीनें शिटी फुंकली; मीं भराभर सामान बाहेर फेकून देऊन खालीं उडी टाकली; कारण टिळकांचा पत्ता नव्हता!

पाहातां पाहातां समोरून गाडी निघून गेली. गाडी गेल्यावर टिळक कोणाशीं वादविवाद करण्यांत गर्क झालेले दिसले. गाडी सुटेपर्यंत टिळकांना तिकीट घेण्याची आठवण राहिली नाहीं. मी आपली भिटी भिटी पाहात उभी राहिलें.

स्टेशनवरच एक दिवस काढून दुसऱ्या दिवशीं नक्की निघण्याचें ठरलें. सामानसुमानाची नीट बांधाबांधी पुन्हा झाली; टिळक आपले बोलतच होते.

एकदाचे आम्ही निघालों. एकदोन स्टेशनें सुखरूपपणें पोचलों. इतक्यांत टिळकांचें लक्ष भाजीपाल्याकडे वळलें. फळफळावळ त्यांनीं सारी डब्यांतच वांटून टाकली व भाजीपाला खिडकींतून बाहेर एक एक, एक एक, सरळ फेकून दिला! "काय सामानाचा अटाट तुला, मुंबईत आईबापाखेरीज बाकी सारें मिळतें,"

वगैरे तोंडानें चाललेंच होतें. बायकांना माहेरची काडी माडीहून अधिक प्रिय असते. पिशव्यांतून मीं कांहीं डाळ, तांदूळ वगैरे सामान घेतलें होतें त्यान तेवढें बोरीबंदर स्टेशन पाहिलें.

आम्ही नवीन घरीं आलों. सखारामभाऊजी आमची वाट पाहात असलेले तेथें आढळले. सामान गेल्याबद्दल मन खट्टू झालें होतें, तरी घरांत डाळीचें पीठ व तांदूळ सांपडले तेवढ्यावरच मीं आमची नवीन घरांतील पहिली मेजवानी केली.

वाढायला घेतलें, इतक्यांत टिळक म्हणाले, ‘ सखाराम, मुकटा नेस. मी आतां शौचास जाऊन येतों. ’ टिळक गेले. भाऊजी सोवळ्यांत त्यांची वाट पाहात बसले. मीं वाढलेला भात पुन्हा तपेलींत भरला. आठ वाजले, साडेआठ वाजले, टिळकांचा पत्ता नाहीं! भाऊजींनीं इकडे तिकडे शोध केला. शेवटीं ओवळें नेसून गांवांत टिळकांच्या जेथें जेथें ओळखी होत्या तेथें तेथें ते जाऊन आले व शेवटीं घरीं येऊन भुकेनें व्याकूळ होऊन निराशेनें भावाची वाट पाहात बसले.

आम्ही दोघें गुपचूप बसून राहिलों होतों. इतक्यांत खालच्या मजल्यावरील जिन्याजवळच्या खोलींतून टिळक कविता म्हणत आहेत असा भास आम्हांस झाला, सखारामभाऊजी खालीं जाऊन पाहातात तों तिथें काव्यगायनाला पूर आलेला!

* * *

टिळकांचा वाटेल त्या माणसावर विश्वास बसे. अगदीं एखादा अट्टल चोर असला व त्यानें येऊन टिळकांना सांगितलें कीं मी साव आहें कीं ते ताबडतोब तेवढ्यावरच तो साव आहे म्हणून विश्वास ठेवीत व जगाशींहि त्याच्यासंबंधीं हुजत घालण्यास कमी करीत नसत. मनुष्यप्राणी हा जात्या दुष्ट नाहीं, परिस्थिति त्याला दुष्ट बनवीत असते, असें त्यांचें म्हणणें होतें. टिळकांच्या ह्या सद्गुणाला त्यांच्याच सहवासामुळें माझ्या संशयी वृत्तीचा ब्रेक उत्पन्न झाला होता. त्यांचा एखाद्या माणसावर विश्वास बसला कीं माझा हटकून त्याच्यावर अविश्वास ठेवलेला! ह्यावरून आमचे नेहमीं खटके उडायचे.

माझी नथ मोडली. टिळकांनीं ताबडतोब एक सोनार बोलावून आणला व त्याला मोतीं मोजून देऊन नथ गुंफून आणण्यास सांगितलें. मीं म्हटलें, सोन्याची

तार करून आणायला सांगा त्याला. नथ तो आपल्या देखत गुंफील. त्यावरून आमचा चांगलाच खटका उडाला. त्यांनीं माझें न ऐकतां सोनाराला सोळा मोतीं मोजून देऊन वाटेला लावलें. तो गेल्यावर मला वर उपदेशाचे बरेच डोस दिले--नव्हे चांगलाच एक टमरेलभर उपदेश पाजला. पण त्याचा कांहीं उपयोग न होतां दोन तीन दिवस माझ्या डोळ्यांपुढची नथ व तो 'लबाड' सोनार कांहीं हालेनात.

तिसऱ्या दिवशीं सोनार नथ घेऊन आला. त्यानें आणलेल्या नथेंत सोळांच्या ऐवजीं अठरा मोतीं होतीं ! टिळक मला म्हणाले, 'पाहिलेंस ! लोकांवर विश्वास टाकावा. ह्या माणसानें पदरचीं दोन मोतीं घालून तुझी नथ आणून दिली.'

नथेंतले सगळेच मोती खोटे निघाले हें त्यांनीं पुढें पुष्कळ दिवसांनीं कबूल केलें. पण कांहीं दिवस तरी सोनारानें आपल्या पदरचीं आणखी दोन खरीं मोतीं आपल्या बायकोच्या नथेंत घालून दिलीं, असा त्यांचा अगदीं प्रामाणिक समज होता.

टिळक स्वभावानें अतिशय शांत पण अतिशय रागीटहि होते ! तें कसें, हें सांगतां येणार नाहीं. पण तें तसें होतें हें खरें आणि राग येण्यास व जाण्यासहि कारण अगदीं क्षुल्लक लागे. सोंगट्या खेळतांना त्यांना आलेला राग त्यांच्या पुष्कळ मित्रमंडळीच्या माहितीचा आहे.

मला एक दिवस ते म्हणाले, 'चल, सोंगट्या खेळूं !' सोंगट्या खेळतांना मला एक मोठा रोग जडत असे. तो म्हणजे हसणें ! टिळकांच्या अंगावर डाव उलटूं लागला कीं मला हसूं लोटायचें आणि मी हसूं लागलें कीं ते चिडायचे ! त्या दिवशीं खेळतां खेळतां माझी सरशी होऊं लागली. माझा हसण्याचा आजार वाढूं लागला. टिळकांचा रागाचा पारा चढूं लागला, तसा माझाहि आजार बळावूं लागला व त्या दिवशीं त्या 'आजारा' पायीं खरोखरच मृत्यूशीं गांठ पडण्याची वेळ आली होती. थोडक्यांत बचावलें.

सोंगट्या, पट, फांसे थर थर कापूं लागलीं. कांहींनीं खालील गटाराचा आश्रय केला. घातलेले बिछाने सैरावैरा धावूं लागले. सगळ्या सामानानें बंड

पुकारलें. जागच्या जागीं कांहीं राहिलें असेल तर तें फक्त बायको व दिवा! प्रकरण इतकें हातघाईवर आलें कीं शेवटीं दिव्यानेंहि राम म्हटलें. आगपेटी केव्हांच पासोडीचा आसरा करून बिछान्याच्या ढिगाऱ्यांत तोंड लपवून बसली होती. तरी मला वाटत होती गंमत. मी आणखी जोरजोरानें हसूं लागलें.

आतां त्या युद्धकांडांतील शेवटला भाग! जिन्याला नव्हतें दार! टिळकांनीं मला अंधारांत लोटलें.

मी जिन्यांतून 'घालीन लोटांगण वंदीन चरण' करीत खालीं तबकडींत येऊन पडलें. टिळकांचा राग मावळला व माझें हास्य पळालें. टिळक घाबऱ्या घाबऱ्या आगपेटी शोधूं लागले. ती सांपडेना. शेवटीं अंधारांतच चाचपडत ते खालीं आले व मला उठवून वर घेऊन गेले. विद्यानंदाचे वेळीं मला तो सातवा महिना होता.

आपण आतां बाप होणार असें टिळकांच्या ध्यानीं आलें व त्यांनीं मला माहेरीं नेऊन पोचविलें. मला पोचवल्यावर स्वतःहि त्यांनीं मुंबई सोडली व सहा महिनेपावेतों ते कोठें गुप्त झाले न कळे.

आत्याबाईंनीं व मामांनीं माझें करतां येईल तेवढें कौतुक केलें. माझे सारे डोहाळे पुरविले. परंतु मला एकसारखी टिळकांची काळजी वाटे. एक क्षणभरहि मला काळजीवांचून गेला असेल असें वाटत नाहीं.

आमच्या ह्या काळजींतल्या दिवसांत मामांना व आत्याबाईंना अत्यानंददायक गोष्ट घडली. त्यांना नातू झाला.

# पेंडशांकडील आमचे मुक्काम

आमचे मुक्काम माझ्या बहिणीकडे वारंवार होत. भिकूताई मला माझ्या आईच्या ठिकाणीं होती. कारण तिच्या माझ्या वयांत पंधरा सोळा वर्षांचें अंतर होतें. तिची एकुलती एक मुलगी घारुमाई, जवळ जवळ माझ्या बरोबरीची. त्यामुळें मला ती सख्ख्या बहिणीप्रमाणें वाटे. आमचा दोघींचा एकीमेकींकडे फारच ओढा असे.

नानासाहेब ह्या वेळेस करमाळ्याला मामलेदार होते.

आम्ही मुंबईस असतांना घारूमाईचें लग्न निघालें. नानासाहेबांच्या घरचें हें पहिलें व शेवटलें कार्य, त्यांत साऱ्यांना अतिशय हौस व पैसाहि मुबलक, तेव्हां तें कार्य अगदीं थाटांत होणार हें ठरलेलें. नानासाहेबांचे पुतणे बाळासाहेब पेंडसे हे मुंबईस असत. लग्नाला यावें असें पेंडशांचें टिळकांना फार आग्रहाचें पत्र आलें. टिळकांनीं मला सांगितलें, "तूं तयारी कर. संध्याकाळीं वाळा येईल त्याच्याबरोबर तुला करमाळ्याला घारूच्या लग्नाला जायचें आहे." इतकें सांगून टिळक गेले बाहेर! मी तयारी कसली करणार? बहिणीच्या घरचें हें पहिलें कार्य. भाची माझी एवढी आवडती. तिच्या लग्नाला नुसतें हात हालवीत कसें जायचें! मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर. शंकरपार्वतीच्या चरित्रांतील अशाच एका प्रसंगाची आठवण होऊन मला हसूंहि आलें व रडूंहि आलें.

इतक्यांत कापडाचे नमुने घेऊन एक माणूस आला. टिळकांनींच त्याला पाठवून दिलें होतें. कोणतें कोणतें कापड खरेदी करावयाचें हें मी ठरवून बसलें.

पण तें घेणार कसें ? अगदीं संध्याकाळ होईपर्यंत टिळक परत आले नाहींत; कापडवाला मात्र कंटाळून परत गेला.

टिळक आले ते बाळासाहेबांना घेऊनच. बाळासाहेब निघण्याची घाई करूं लागले. त्यांच्यादेखत मला पैशासंबंधीं कांहीं बोलतां येईना. कापड घेतलें नव्हतें तर नव्हतें, पण कांहीं पैसे तरी बरोबर ! शेवटीं नुसतें टिळकांनाच ऐकूं जाईल अशा बेतानें मीं हळूच म्हटलें,

" मला कांहीं ... "

" तूं कांहीं काळजी करूं नको. मीं बाळाला सर्व सांगून ठेवलें आहे तुला जें कांहीं लागेल तें त्याच्याजवळून मागून घे. "

टिळकांनीं माझ्या हळू प्रश्नाला मोठ्यानें उत्तर दिलें. त्यावर बाळासाहेब म्हणाले, " तूं आतां उशीर करून गाडी चुकवूं नको. काय आहे, नाहीं, याची आपण पुढें चौकशी करूं. तूं आटोप लौकर कशी ? "

वऱ्हाड पंधरा दिवसांपासून जमूं लागलें होतें. स्टेशनवर शिपाई व फराळाची व्यवस्था हीं ठेवलेलीं होतीं. गाडी पोंचतांच शिपायानें विचारलें, " मनूताई आल्या कां ? "

नानासाहेबांची बहीण गोदूताई, फराळाजवळ होती;

गोदूताईला वाटलें, कीं पाहा, आपण आलों तेव्हां आपला कोणीं तपास केला नाहीं; पण भिकूताईच्या बहिणीचा तपास केला. खरें पाहिलें, तर गडी गोदूताईच्याच लांबून येणार असलेल्या मनुताई नांवाच्या एका चुलतबहिणीचा तपास करीत होता. ह्या चुलतबहिणीला भेटून नानासाहेबांना बारा वर्षें झालीं होतीं, तेव्हां एकमेकांचीं तोंडें एकदम प्रत्यक्ष न पाहतां मारुतीच्या देवळांत जाऊन, काशाच्या भांड्यांत तेल घालून, मध्यें पडदा धरून, त्या तेलांत प्रथम एकमेकांना बघून मग घरीं जावयाचें असें कांहीं शास्त्र होतें ! म्हणून त्या मनूताईची चौकशी गडी करीत होता.

गोदूताईनें म्हटलें —

" आल्या आहेत. मनूताई आल्या आहेत, फनूताई आल्या आहेत. सगळ्या

आल्या आहेत. ”

मला मात्र गोदूताईच्या बोलण्याचें अतिशय वाईट वाटलें. आपण गरीब, ज्यानें त्यानें आपला अपमान करावा हें ठरलेलेंच, असें मला वाटलें.

करमाळ्यास जाऊन पांचल्यावर पाहातें, तों जें तें आपल्याच कामांत गुंग व आपल्याच विचारांत गर्क. निदान मला तरी तसा भास होत होता. आधीं स्टेशनवरच गोदूताईचे “ मनूताई फनूताई ” शब्द ऐकले होते; त्यांत इतकी लांबून आलेली मी, पण माझी कोणीं वास्तपूसहि केली नाहीं.

सर्व मंडळीबरोबर मी जेवलें व वऱ्हाडणीमध्येंच घारूमाईला पोटाशीं धरून निजलें. “ मी गरीब, म्हणून माझा असा अपमान होतो. बहीणसुद्धां माझ्याशीं बोलायला राजी नाहीं. कारण ती श्रीमंताची बायको ! ती मामलेदारीण, ती कशाला माझ्याशीं बोलेल ! माझ्या अंगावर गोठ व तोडे असते तर सर्वांनीं मला विचारलें असतें. ” हे विचार एकीकडे डोक्यांत घोळवीत व एकीकडे मुळमुळू रडत मी अकरा–बारापर्यंत अंथरुणावर पडलें होतें.

मध्यरात्रींच्या सुमारास हातांत बत्ती घेऊन भिकूताई प्रत्येक वऱ्हाडणीचें तोंड पाहात पाहात मजजवळ आली. तिनें माझ्या अंगावर हात ठेवला व थोडा वेळ ती तशीच बसली; मी जागीच होतें. पण मला झोंप लागली आहे, असें वाटून तिनें हळूहळू मला हांका मारावयास सुरुवात केली.

मीं एकदम तिचा हात झिटकारून टाकला व म्हटलें, “ मी तुझी बहीण नाहीं. तूं कशाला आलीस ? माझ्या अंगावर गोठ–तोडे थोडेच आहेत. ”

भिकूताईला गहिंवरून आलें. ती म्हणाली, “ मने, अग वेडे ! तूं मला गोठ–तोड्यांहून अधिक मोलाची नाहींस का ? नाना-आई वारल्यापासून आज दोन तीन वर्षांत प्रथमच तूं मला भेटते आहेस. मला कसें तुझ्याशीं बोलवेल ? काम टाकून पाहुण्यांसमोर मी तुझ्याबरोबर रडत बसलें, तर तें करणें मला शोभेल का ? मला ते काय म्हणतील ? ”

भिकूताईचें हें बोलणें ऐकून मला जरा बरें वाटलें. दुसऱ्या दिवशीं भिकूताईनें आपल्या अंगावरचे सर्व दागिने काढून माझ्या अंगावर घातले. मला एक

मोठें लुगडें नेसायला दिलें. चार दिवस लग्नसोहळा खूप थाटांत झाला. मीहि नंतर ते चार दिवस आनंदांत काढले. आतां मुलीला पाठीराखी म्हणून मलाच पाठवायचें असें भिकूताईच्या मनांत होतें. तिनें नानासाहेबांजवळ गोष्ट काढली. “मनीला आतां दोन महिने तरी ठेवून घ्या.” पण नानासाहेबांनीं आजच्या आज मला पाठवून देण्याचा आग्रह धरला. “घारूबरोबर दुसरें कोणी जाईल. आज मनीला सोबत आहे. तेव्हां जाऊं द्या तिला.”

भिकूताई म्हणे, “आज तीन वर्षांनीं बहीण भेटलेली. तिच्याशीं धड बोलायलाहि वेळ मिळाला नाहीं. तिला कशी जाऊं द्यावयाची?”

शेवटीं नानासाहेबांनीं काय तें खरें सांगितलें, “ह्या चार दिवसांत टिळकांच्या चार तारा आल्या. अगदीं लग्नांत दोन तारा आल्या, मी त्या वेळीं मुद्दाम कांहीं बोललों नाहीं. आतां मात्र मनूला एक दिवस अधिक ठेवतां येणार नाहीं.”

अर्थात् भिकूताईचें तोंड बंद झालें व त्याच दिवशीं माझी मुंबईस रवानगी झाली.

घरीं येऊन पाहातें तों टिळकांना नुसती सर्दी झालेली! मी खूप संतापलें. टिळकांनीं माझी समजूत केली व शेवटीं मला जलालपुरास माहेरीं नेऊन पोंचविली.

ह्यानंतर कांहीं दिवसांनीं माझा पहिला मुलगा विद्यानंद जन्मला.

ह्या सुमारास नाशिक, नागपूर, मुंबई वगैरे ठिकाणीं वक्तृत्वसमारंभ होत असत. उत्तम वक्त्यांना रोख रुपयांचीं बक्षिसें मिळत. टिळकांना व्याख्यानें देण्याचा फार नाद व असल्या समारंभांत भाग घेऊन ते बहुतेक नेहमींच बक्षिसें मिळवीत. नागपुरास वक्तृत्वसमारंभ होता. नागपुरास जाण्याची गोष्ट टिळकांनीं आपल्या सासऱ्याजवळ काढली. टिळक कांहीं पैसे आणतील, अशा आशेनें मामांनीं भाड्यापुरते पैसे देऊन त्यांना जाऊं दिलें. हे परत तरी येतात, कीं गुंततात तिकडेच, असें मला भय पडलें. पण टिळक तावडतोब परत आले. बक्षिसाच्या सर्व पैशांची विल्हेवाट लावून, येतांना एक मोठें तबक मात्र ते

घेऊन आले होते !

टिळक हात हालवीत परत आलेले पाहून मामांना फार राग आला. ते म्हणाले :

‘ आम्ही आतां तुमच्या बायको–मुलाला संभाळणार नाहीं; तुम्ही तिला वडीं ठेवा, नाहीं तर पिंपळीं ठेवा; मला तिची जरूरी नाहीं. ’ टिळक म्हणाले, ‘ ठीक आहे. मी सर्व पाहून घेईन. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. ’ मामा गेले जलालपुरास निघून. आणि टिळक माझी व्यवस्था पाहाणार ! आमचें बिऱ्हाड कोठूनहि हाललें, कीं तें बिऱ्हाड, म्हणजे आम्ही माणसंच तेवढीं हालत असूं; सामानसुमान तिथल्या तिथें शेजाऱ्यापाजाऱ्यांना अर्पण करण्यांत येत असे. आतां नाशकास आमचा स्वतःचा असा एक फुटका तांब्याहि आमच्याजवळ नव्हता. नानासाहेबांचें घर मोठें होतें. पण ह्याच गडबडींत त्यांची संगमनेरास बदली झाल्याचें कळलें व ती मंडळी संगमनेराची बांधाबांधी करूं लागली.

भिकूताईला माझी मोठी काळजी पडली. शेवटीं तिनें व तिच्या सासूनें मलाहि संगमनेरीं नेण्याचें ठरविलें. नानासाहेबांनीं टिळकांना मोठ्या आग्रहाचें आमंत्रण केलें. अशा रीतीनें टिळकांनीं सहकुटुंब व सहपरिवार संगमनेर मुक्कामीं जाण्याचें नक्की केलें.

नानासाहेब पुढें गेले. बाकी आम्ही सर्व मंडळी बैलगाड्यांनीं नंतर गेलों.

संगमनेरला जाण्याच्या आधीं भिकूताईनें माझ्याकरतां डिंगामेथ्यांचे लाडू वगैरे बाळंतणीला उपयोगी असे बरेच पदार्थ केले होते, त्यांतील दोन डबे भरून तिनें आत्याबाईकडे पाठविले.

आत्याबाईला आमचा सगळ्यांचाच फार राग आला होता. टिळकांवर तर ती नेहमींच रागावलेली असे. पण भिकूताईवर राग असा होता, कीं मला वाढविलें, माझें लग्न करून दिलें, माझें बाळंतपण केलें, सगळें आत्याबाईनीं आणखी बहिणीला आतां आयत्या पिठावर रेघा ओढायला काय होतें ? तिला आतां मनीचा एवढा प्रेमा आला, तो मागेंच कां नाहीं आला ? तिला वाटे कीं मनीला आम्हीं सोडून दिलें, तें खरें खरें थोडेंच सोडून दिलें. ह्या दोघांनीं

आपली थोडी मनधरणी करायची होती, म्हणजे झालें. पण भिकूताई व टिळक ह्यांनीं मात्र मामांचा व आत्याबाईंचा राग खरा वाटून त्यांनीं संगमनेरला आमचें बिऱ्हाड नेण्याचें ठरविलें.

लाडवांचे दोन डबे आत्याबाईकडे गेले, पण त्यांच्यांतील पदार्थांना तिनें हात लावला नाहीं इतकेंच नाहीं, तर गोविंदरावमामांना शपथ घातली, कीं " तुम्ही जर भिकीनें दिलेल्या पदार्थांतून कांहीं खाल तर गाईचें मांस खाल. आत्याबाईनें अशा रीतीनें डिगामेथ्यांच्या लाडवांवर आमचा राग काढून वड्याचें तेल वांग्यावर काढलें. भांडण, संताप ह्यांमध्यें त्या बिचाऱ्या पदार्थांचें मरण ! अखेर उकिरड्याची धन झाली !

नानासाहेब पुढें गेले बाकी आम्ही सारी मंडळी मागून गेलों.

आम्ही सर्व सात माणसें होतों. पहाटे पांचला निघून दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही संगमनेरास पोंचलों. रस्त्यानें कोठें कडुलिंबाचें झाड लागलें, कीं टिळक त्याचा पाला ओरबडून खात. त्या वेळीं आजीबाई सुनेला म्हणत, " भिकूताई, तुझा मेव्हणा योगी आहे ग बाई. तुम्ही त्याला नांवें ठेवा, पण तो सिद्ध पुरुष आहे. "

आम्ही ज्या वाड्यांत उतरणार होतों, त्याची भुताखेतासंबंधीं ख्याति आम्हीं नाशकासच ऐकली होती. तेथें पोंचतांच भिकूताईनें वियानंदाला गरम पाण्यानें न्हाऊं घातलें व मलाहि कढत कढत पाणी घातलें. आमचीं सर्वांचीं जेवणीं झालीं. मुलगा दीड महिन्याचा होता, म्हणून मला खाटशेगडीची व्यवस्था केली होती. आम्ही दोघें खाटेवर निजलों. तेथेंच खालीं जाजमावर घारुमाई, आजीबाई, वगैरे मंडळी एका दंडाळीला निजली. नानासाहेब, भिकूताई व टिळक वर माडीवर निजले.

मला कांहीं केल्या झोंप येईना. नाहीं नाहीं ते विचार डोक्यांत थैमान घालूं लागले. रिकामें डोकें सैतानाचें माहेरघर असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. खोलीला लागूनच घोड्याचा तबेला होता, हें मला ठाऊक नव्हतें. माझ्या उशाला समई मिणमिण जळत होती. उशाकडे धपधप आवाज होत होता. सर्व माणसें

८८३८

गाढ झोंपीं गेलीं होतीं. मी पडल्या पडल्यां, मानसुद्धां न हालवितां डोळे गरगर फिरवून इकडे तिकडे पाहण्याचा प्रयत्न करीत होतें. आज काय होईल तें होवो, हडळ कशी असते तें पाहण्याचें मीं ठरविलें होतें.–छाती धडधडूं लागली. जिन्यांतून जोडव्यांचा आवाज ऐकूं येऊं लागला. कोणी तरी जिना उतरत होतें. माझ्या काळजाचें पाणी झालें! जीभ कोरडी पडली. पण तशीच धैर्यानें पडद्याकडे टक लावून मी पाहात होतें. पुन्हा टप् टप् टप् टप्. जिन्यांतून एक आकृति दिसूं लागली. माझे डोळे आपोआप मिटूं लागले, तों समोरून एक उंच बाई, तांबडें लुगडें नेसलेली, केस मोकळे सोडलेली व कपाळीं मोठें आडवें कुंकूं असलेली वरून उतरतांना दिसली! तिच्या हातांत लामणदिवा होता. वाड्यांतील हडळीचें जें वर्णन ऐकलें होतें तें अगदीं तंतोतंत जुळलें. माझी पांचावर धारण बसली. ती बाई येत येत अगदीं माझ्याजवळ येऊन उभी राहिली. मी मुलाला पोटाखालीं घालून त्याच्यावर निजलें व वर अंगावर पासोडी गुरफटून घेतली. माझ्या अंगावर थरारून कांटा फुटला व दरदरून घाम आला. ती अगदीं अंथरुणाजवळ येऊन उभी राहिली! आतां तिनें पोराला हात लावला! आतां हळू हळू त्याला काढून घेऊं लागली! तूं कोण आहेस तें मीं ओळखलें, असें मला त्या हडळीला म्हणायचें होतें, पण तोंडांतून शब्द उमटेना. मी नुसतें को–को–को करूं लागलें. खालीं निजलेल्या सर्व मंडळींनेंहि एका दिलानें माझ्या सुरांत आपला को–को–को मिळवून दिला. आम्ही पांचसहा माणसें तालासुरावर को–को–को असें ओरडत होतों. ती बाई काय–काय–काय म्हणून आमच्या-बरोबर ओरडत होती. वरून नानासाहेब धावत धावत आले व तेहि को–को–को करूं लागले. टिळक आले ते मात्र हंसूं लागले. त्यांना भय कधीं वाटत नसे व हा प्रकार पाहून तर त्यांना मोठीच गंमत वाटली.

ती बाई म्हणजे भिकूताई. माझें वय लहान. मी अंगाखालीं मूल चेंगरीन अशा भीतीनें ती मधूनच उठून खालीं आली होती व मीं खरोखरच दियानंदाला पोटाखालीं घेतलेलें पाहून त्याला हळूच बाहेर काढण्याचा ती प्रयत्न करूं लागली. घोड्यांच्या टापा, जोडव्यांचा आवाज व बहिणीचा तो अवतार ह्या साऱ्यामुळें

माझ्या मनानें तिलाच हडळ बनविलें. तशांत तिच्या हातांत तो लामणदिवा व त्याच्या ज्योतीमुळें हलणारी भिंतीवरील तिची अगडबंब सावली; मग काय विचारायचें ?

*　*　*　*　*

संगमनेरास एक प्रसिद्ध कीर्तनकार आला होता. त्याच्या कीर्तनास बरीच मंडळी जात असे. कीर्तनांत बाजाच्या पेटीनें नुक्ताच प्रवेश केला होता. त्या कीर्तनकाराचा आवाज उत्तम, कीर्तनांतील गाणीं सुंदर व अनुसंधानहि बहारीचें, तेव्हां कीर्तनास अतोनात गर्दी जमूं लागली. एके दिवशीं पूर्वरंग आटोपून अनुसंधानाला प्रारंभ होणार, तोंच टिळक व नानासाहेब तेथें येऊन बसले. त्यांना बुवांच्या अगदीं समोरच जागा देण्यांत आली. बुवांना माळ घालण्याकरतां आणली, ती त्यांनीं आपल्या हातांत घेऊन टिळकांच्या गळ्यांत घातली व त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें. नंतर अनुसंधानास सुरवात झाली. हा प्रकार पाहून पेंडसे अगदीं आश्चर्यचकित झाले. पण तेथें त्यांना कांहीं बोलतां येईना. कीर्तन संपल्यावर बुवांनीं टिळकांचें कुशल विचारून त्यांची रजा घेतली.

हा काय प्रकार आहे, ह्याची नानासाहेबांना खुमखुम लागली. त्यांनीं घरीं येतांच टिळकांना विचारलें. तेव्हां टिळकांनीं सांगितलें, कीं धामक येथें असतांना ह्या माणसाला तीनचार कीर्तनें लिहून दिलीं व तीं त्याच्याकडून बसवून घेतलीं व तींच तो करीत आहे.

पेंडशांना फार आनंद झाला. टिळक, आतां तुम्ही स्वतःच येथें कीर्तन करा म्हणून ते टिळकांच्या मागें लागले. टिळकांनीं दोनतीन दिवस तयारी करून सुभद्राहरणावर एक सुंदर कीर्तन रचलें. तें कीर्तन एकसारखें तीन दिवस चाललें होतें. कीर्तनाचें मूळपद असें होतें :

**सेवक तव समरधीर चाललों झुजाया**
**रथ माझा रम्य काय**
**ध्वज तुझे सदय पाय**
**अश्व विवेकाद्युपाय**
**लागलों लढाया**

कीर्तनाचें आमंत्रण साऱ्या गांवांत गेलें. पण पेंडशांचा जीव धाकधूक होत होता. अगदीं कीर्तन सुरू होईपर्यंत ते म्हणत होते, ' टिळक, पाहा बुवा, अजून विचार करा. फजिती नाहीं ना होणार ? मी पाहिजे तर सांगतों लोकांना, टिळक आजारी झाले म्हणून. ' पण एकच आख्यान एकसारखें तीन दिवस चालल्यानंतर मात्र पेंडशांचा संशय फिटला. त्यांचा आनंद गगनांत मावेना. पेंडशांचें अगोदरपासूनच टिळकांवर अत्यंत प्रेम होतें. तें ह्या कीर्तनामुळें अधिकच वाढलें. आजीबाई व भिकूताईहि अगदीं खूष झाल्या.

* * *

मला दोनचार गोष्टींचा विशेष नाद होता व थोड्याबहुत प्रमाणांत तो अजूनहि आहे. तो म्हणजे बाहुल्या खेळणें, गाणीं म्हणणें, गोष्टी सांगणें, गोष्टी ऐकणें आणि रांगोळ्या घालणें. माझ्या ह्या नादीपणामुळें आत्याबाईंचीं व भिकूताईंचीं मला खूपच बोलणीं खावीं लागत. मी गोष्टी सांगूं लागलें, कीं त्यांनीं म्हणावें, ह्या गोष्टींच्या पायीं बायका आपलीं घरेंदारें सोडून गेल्या आहेत; तुझ्या गोष्टी कोणत्या थराला जातील त्या जावोत. गाणीं म्हटलीं म्हणजे म्हणावें, साऱ्या संसाराचीं गाणीं केलीं आहेस. बाहुल्या खेळूं लागलें म्हणजे म्हणावें, साऱ्या संसाराचा खेळखंडोबा करून टाकला आहेस. पण ह्या बोलण्याचा माझ्यावर कांहीं परिणाम होत नसे. जित्याची खोड मेल्यावांचून जायची नाहीं.

नानासाहेब कचेरींत गेले, कीं विद्यानंदाला घेऊन भिकूताई व आजीबाई वरच्या अंधाऱ्या खोलींत जाऊन निजायच्या. टिळकहि वरती कांहीं लिहीत-वाचीत बसायचे, नाहीं तर धारूमाईशीं सागरगोटे खेळत बसायचे. राहतां राहिलें मी एकटीच. मला कांहींच उद्योग नसे. लिहितां-वाचतां त्या वेळेस तर अगदींच येत नसे. तेव्हां कांहीं लिहीत वाचीत बसेन तर हें शक्यच नव्हतें. तेव्हां मीं वर सांगितलेल्या गोष्टी करूं नये, तर माझा वेळ कसा घालवायचा !

ह्या सासवासुना निजल्या; कीं मला उजाडे. सर्व चाकर, नोकरांना मी त्यांच्या बाईंचा उजवा हातच वाटत असे व माझ्या हुकुमाची ते वाट पाहात. बारा एक

पासून चारपर्यंत सर्व कांहीं माझ्या हातांत असे. ह्या वेळांत मी बाहुल्यांचें काम करून घेई.

घरांत दोन घोडे, एक म्हैस व विद्यानंदासाठीं घेतलेली एक गाय इतकीं जनावरें होतीं. गडी चारा आणण्यांत पैसे खाई. तेव्हां तें काम मला देण्यांत आलें. दारावरून जाणारे भारे मीं ठरवून घ्यावयाचे. उरलेले पैसे मी भिकूताईला देत नसें. घारूमाईला मात्र मजजवळ किती पैसे सांचले तें ठाऊक होतें. नांव घारूमाईचें सांगावें व तिच्या आईनें तें करण्यास सांगितलें आहे असें म्हणावें. चाऱ्याचे सांचलेले पैसे हातांत असतच; त्याच्यावर माझा बाहुल्यांचा संसार चांगला थाटला होता. एकदां सोनाराकडून पितळेचे दागिने बाहुल्यांसाठीं बनविले. कामट्यांचें मखर केलें. घारूमाईनें म्हणावें, " मावशी, नको गडे, आई रागें भरेल. " मीं तिला म्हणावें, " अग, काय रागावते ? तिला सांग माझं नांव ! "

एक दिवस भिकूताई व आजीबाई रोजच्याप्रमाणें माडीवर जाऊन निजल्या. गड्याला मीं सांगितलें, भिकूताईनें केळीचे सहा खांब आणायला सांगितले आहेत. त्याप्रमाणें त्यानें ते आणले. ते दोन दाराला व चार ओसरीच्या खांबांना बांधले. चार दिवस वाजंत्र्यांना बोलावून ठेवलें. बायांना हळदीकुंकवासाठीं आमंत्रणें दिलीं. भिकूताईच्या नांवाखालीं सगळा थाट उडवून दिला. चांदीचीं भांडीं काढलीं, पानसुपारी, खोबऱ्याची ·खिरापत वगैरे सर्व तयार झालें. आपण बाहुल्या खेळतों आहों, हें माझ्या ध्यानांतच राहात नसे.

बायका जमूं लागल्या. जी ती विचारूं लागली, कीं माईसाहेब कोठें आहेत ? माईसाहेब निजल्या होत्या वर माडीवर; घरांतली गडबड ऐकून त्या जाग्या झाल्या. भिकूताई जागी झाली म्हणजे तिचे डोळे चटकन् उघडत नसत. ती काय प्रकार आहे तो पाहाण्यास डोळ्यांना पाणी लावून ते उघडण्याचा प्रयत्न करूं लागली. मीं खिरापत वांटली. इतक्यांत दारीं चौघडा वाजूं लागला ! आजीबाई खडबडून जाग्या झाल्या. त्या दाराला दोन्ही हात देऊन हा काय प्रकार आहे तें आ करून पाहात उभ्या राहिल्या. विद्यानंद तर खोलींत रडतच होता. माझी बहीण खालीं येऊन आलेल्या बायकांचें हंसतमुखानें स्वागत

करीत होती. आंतल्या आंत मात्र तिचा अगदीं तिळपापड झाला होता, वाजंत्र्यांचा आवाज ऐकतांच टिळक खालीं आले. त्यांनाहि हा काय प्रकार आहे कांहीं कळेना. त्यांनीं घारूमाईला एका बाजूस नेऊन विचारलें. मी नको नको म्हणत असतां मावशीनें हें केलें असें तिनें त्यांना सांगितलें. त्यांनीं मला घारूमाईबरोबर निरोप पाठविला, कीं ह्या पोरीजवळून तरी कांहीं शीक.

संध्याकाळीं नानासाहेब आले. ते मुळींच रागावले नाहींत. बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयांत चौघडा वाजूं लागला. बहिणीनें पंचपक्वान्नाचें ताट मजपुढें वाढून ठेवलें. त्यांत कोणतीं पक्वान्नें नव्हतीं? गालगुरोळ्या होत्या, चापटपोळ्या होत्या, धम्मकलाडू होते, मुष्टिमोदक होते, मुरुडकानोले होते. त्यांतच भर पडली चांदीच्या वाटीची. भिकूताईनें खिरापत वांटतां वांटतां ती वाटी कोठें ठेवली ती गडबडींत हरवली; त्यामुळें गडगडाट झाला. पहिला दिवस असा साजरा झाला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही जेवायला बसलों, तोंच बाहेर वाजंत्र्यांचा आवाज येऊं लागला! त्याच्या पाठोपाठ वाढून आलें! तें जातें तों दुसरें, मग तिसरें! आतां बरीक माझी बहीण फारच लाल झाली. "काटें, तुझा हा खेळ नांव बद्दू करील माझं. लोक म्हणतील, आतां ह्यांची बदली होणार, म्हणून ह्यांनीं ही उकळणी चालविली आहे."

चार दिवस घरोघरचीं वाढणीं येत होतीं. तींहि अगदीं वाजत गाजत! प्रत्येक वाढण्यांत तीन प्रकार असत. निरशनाचे, धान्यफराळाचे व जेवणाचे. निरशनाचें आजीबाईंना जाई, फराळाचें म्हणजे लाडू वगैरे पदार्थ मोठीं माणसें घेत व जेवण आमच्या वांट्याला येई! श्रीमंत जिनसीवाले ह्यांच्या घरचें तर इतकें मोठें वाढून आलें, कीं तें पाहून मीसुद्धां खजील झालें, दहावीस पानांचें व पांची पक्वान्नांचें तें होतें. त्यानें अर्धें माजघर भरून गेलें!

वाढणीं येतां थांबेनात व इकडे बहीणहि रागावतां थांबेना. मी म्हणें, "रागावतेस, मग वाढून आलेले फराळाचे डबे कसे भरून ठेवतेस? आम्हांला फराळाचें कांहीं देत नाहींस." फराळाशिवाय खणा-नारळांचीहि गर्दी उडाली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलप्रत

होती. असें करतां करतां चौथा दिवस उजाडला. एखादी आई किंवा सासू असावी, त्याप्रमाणें माझी स्थिति त्या बाहुलीबद्दल झाली होती. धारू माझ्या हाताशीं. पडद्याआड मी सूत्रधार. विद्यानंद रडला, कीं होतीच भिकूताई व आजीबाई करायला. त्या दोघी करीत त्याचें.

उद्यां पालखी पाहिजे. ती कोण करून देईल? बाहुली तर मिरविलीच पाहिजे. जिनसीवाले पालखीपदस्थ होते. त्यांच्या आत्याबाई आजीबाईंकडे येत जात असत. त्यांना हळूच जाऊन विचारलें. त्यांनीं आपल्या घरांतील खेळांतली पालखी पाठवून दिली. पालखी पाहून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. मला वाटलें, मीच आज पालखीपदस्थ आहें. पालखी आणून खाटेखालीं ठेवली. सकाळींच मिरवणूक निघणार. पण बाहुलीवरून दहींभात उतरून टाकायला सकाळीं भात कोठून मिळणार? आजीबाई धारूमाईला सकाळींच भात करून घालीत असत. तिला हळूच सांगून ठेवलें, कीं एक घासभर भात बाजूला काढून ठेव. मग तो आपण बाहुलीवरून उतरून टाकूं. धारूनें तसा भात काढून ठेवला बाजूला. सर्व आपापल्या कामांत गढून गेले होते. टिळक आपलें रात्रीचें लिखाण पेंडशांना वाचून दाखवीत होते. इतक्यांत वाजंत्रीं वाजूं लागलीं. आतां तो नेहमींचाच प्रकार झाल्यानें तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. भिकूताई विद्यानंदाला घेऊन वर गेली होती. मी व धारूमाई शाली पांघरून हळूच मिरवण्यास निघालों. माराच्या धाकानें जवळूनच मिरवणूक काढून आणण्याचें ठरलें. मागील दारीं येतांच मी आंत शिरलें. कारण भात कालवून तो मिरवणूक पुढल्या दारीं येतांच चटकन् बाहुलीवरून ओवाळून टाकायचा होता. आंत टिळक उभे होते. मी कामाच्या धांदलींत. मला लौकर दहीं हवें होतें. स्वयंपाक-घरांत चुलीजवळ ब्राह्मण कांहींसें करीत होता. दुभत्याची पेटी उघडून मीं दहीं घेण्यास मान आंत घातली, तोंच टिळक मला न कळत माझ्या मागें आले व एखाद्या चोरट्या मांजराची मान धरून त्याला वर उचलावें तसें त्यांनीं मला मान धरून बाहेर काढलें. माझ्या हातांत दहीं होतें, तें मी सोडीना. पुढच्या खोलींत आजीबाई जप करीत बसल्या होत्या. त्यांची नजर आमच्याकडे गेली;

तें पाहतांच टिळकांचा हात ढिला पडला. त्यांच्या हातांतून मी निसटलें व त्यांना मला अधिक समज देतां आली नाहीं. मी कशी तरी कांपत कांपत जाऊन दहींभात उतरून टाकला. मुली माझी वाट पाहात उभ्याच होत्या.

मूल रडत होतें. खाटेजवळ भिकूताई त्याला घेऊन बसली होती, मला पहातांच अगदीं लाल होऊन ती उसळली, ती म्हणाली, "तुझीं भावलीं दुसऱ्यानें संभाळावींत आणि तूं बस चिंध्यांच्या भावल्या खेळत!" आजीबाईहि माझ्यापुढें कमरेवर हात देऊन उभ्या राहिल्या, "बाई मनू, तुला कधीं शहाणपण येणार? घारू दहा वर्षांची होईपर्यंत सकाळीं भात खाते व तूं सोळा वर्षांची झालीस तरी बाहुल्या खेळतेस."

माझ्या खेळाच्या पायीं भिकूताईला मात्र खर्च झाला. दोन खण्याळीं आणलीं व एक जेवणावळ घातली व सर्वजणींच्या खणानारळांनीं ओट्या भरल्या.

ह्याच वेळेस टिळकांनीं 'माझी भार्या' हें काव्य लिहिलें. अर्थात् टिळकांचे उत्तम श्रोते पेंडसे, त्यांना त्यांनीं आपलें काव्य तांबडतोब वाचून दाखविलें. पेंडसे म्हणाले, "आमची मनू आहेच तशी." ह्यावर टिळकांनीं उत्तर दिलें :

'केलें काव्य परंतु ह्यांत मम हो संबंध कांहीं नसे,'

पुढें विद्यानंद वारला, नातवाच्या शोकानें मामाहि वारले. माझी आतां दुसरी खेप होती. माझे दिवस भरत आले. भिकूताईनें मला माहेरीं आणून घातली. माहेरीं आतां आत्याबाईच होती. मामांच्या मागें त्यांच्या इस्टेटीची वाताहात होऊन घर सावकारांनीं जप्त केलें. तेव्हां आम्ही दोघी माझ्या भावाकडे राहाण्यास गेलों. पेंडशांची बदली कळवणास झाली होती. मला मुलगी झाली. मुलीचें नांव नर्मदा ठेवलें. आम्ही तिला माई म्हणत असूं. फार गोड मुलगी होती ती. टिळकांच्या जवळून मी दूर गेलें कीं बहुतेक ते आपल्या नोकरीचें दान व संसाराची दक्षिणा देऊन माझ्या मागोमाग बाहेर पडत. तसेंच ह्याहि वेळेस झालें. बहुतकरून ह्या दानदक्षिणेंत घरांत एखादा फुटका तांब्याहि राहात नसे.

मुलगी तीन महिन्यांची झाली. एके दिवशीं संध्याकाळीं टिळक आले. बरोबर एक बॅग होती. तिच्यांतून लुगड्यांच्या घड्यांसारखें कांहींसें दिसत होतें.

पोरें हिशेब करूं लागलीं. एक भिकूताईला, दोन माझ्या भावजर्यांना, मला एक दोन! अशीं हीं लुगडीं असावीं! टिळक बॅग पुढें घेऊन बसले. पुढें मुलें जमलीं. बॅग उघडली. पण लुगड्यांऐवजीं तींतून मोठमोठ्या कोऱ्या वह्या निघाल्या! हिच्यांतल्या एका कोऱ्या वहींतून त्यांनीं अगदीं कल्पनेनें संपूर्ण सावित्री आख्यान वाचून दाखविलें! जणूं काय लिहिलेलेंच वाचीत आहेत! वाचन झाल्यानंतर वही उघडून पाहिली तर सर्व पानें कोरीं!

भिकूताई गेल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ पेंडशांचें टिळकांना तांतडीचें पत्र आलें कीं सहकुटुंब सहपरिवार कळवणला आमच्या घरीं राहाण्यास यावें. अर्थात् हें आमंत्रण स्वीकारून आम्ही कळवणला पोंचलों.

टिळक बोलतां बोलतां कविता करतात, ते आपणावरहि कविता करतील अशी माईना भीति वाटत असे म्हणून ती त्यांच्यापुढें फारच क्वचित येई. कळवणांत टिळक आल्यावर घारूमाई तेवढी त्यांच्याशीं बोलण्यास रिकामी होती. नानासाहेब कचेरीच्या कामांत, राहातां राहिलों मी व घारूमाई. मी मुलीच्या गडबडींत, तेव्हां घारूमाईची व टिळकांची पूर्वीचीच गट्टी आणखी दृढ झाली.

नबीला भिकूताईनें मनगव्या, हासळी, बिंदली, वगैरे बाळलेणें केलें होतें. एक दिवस घारूमाई टिळकांजवळ हट्ट घेऊन बसली कीं दुसऱ्यांच्या मावश्या आपल्या भाच्यांना दागिने करून देतात, तसे तुम्ही मला दागिने करून द्या. टिळकांनीं कागद व पेन्सिल घेऊन तिला कोणकोणते दागिने पाहिजे होते, त्यांची यादी करून घेतली. मग थोड्या वेळांत दागिने घेऊन जा, असें सांगून तिला त्यांनीं आंत पाठवून दिली. आपले दागिने व तेहि इतक्या झटपट तयार होणारे दागिने कसे काय असतील ह्या उत्सुकतेनें घारूमाई मधून मधून टिळकांच्या खोलींत जातां येतां डोकावीत होती. टिळक मात्र आपल्या लिहिण्यांत गढून गेलेले दिसत होते.

शेवटीं एकदाचे दागिने तयार झाले व घारूमाईला टिळकांनीं हाक मारली. दागिने तिला दिले. तिलाहि फारच आनंद वाटला. दागिने अगदीं सारे तिला

पाहिजे ते एकूण एक होतें. घरचाच कारागीर असल्यावर मग काय पाहायला पाहिजे.

घारूमाईला हे दागिने फार आवडले. तिनें तो दागिन्यांचा करंडा—कागद—उचलून माजघरांत दौड मारली.

घारूमाई आंत आली, तेव्हां मी व भिकूताई नवीच्या बाळलेण्याचें कौतुक करीत बसलों होतों. घारूमाई म्हणाली,

" आई, मलाहि टिळकांनीं किती तरी दागिने करून दिले आहेत पाहा. तुला वाचून दाखवितें. " असें म्हणून तिनें ती सर्व कविता वाचून दाखविली. आपली कविता आपल्या मेहुणीला कशी काय आवडली हें पाहाण्यास टिळक मागें दारांत येऊन उभेच राहिले होते. पण भिकूताईनें त्यांना उभे असलेलें पाहिलें नाहीं. लेकीनें कविता वाचून दाखविल्यावर तिनें एक लांब उसासा टाकला व म्हटलें,

" काय करावें ? इतकें शहाणपण असून काय उपयोग आहे ? इतका शिकला पढला, पण पदरीं एक रुकासुद्धां नाहीं. एखाद्या नडग दरवेशाप्रमाणें बायकोला घेऊन दारोदार फिरतात ! घरांत नेहमीं नकारघंटा वाजत असते. करायचें काय, बांगड्या भरा त्याला. "

टिळकांनीं हें सर्व बोलणें ऐकलें व ते तसेच मागल्या पावलीं जाऊन पासोडी घेऊन गुरफटून ओसरीवर पडले.

त्याच दिवशीं पेंडशांच्या घरीं एक ज्योतिषी आला होता. ज्योतिषीबुवांना घरांतील मंडळींची फारशी माहिती नव्हती. भिकूताईनीं त्यांना घरांतील सर्व मंडळींचे हात दाखविले. घरांतील स्वैंपाकी ' अग्या ' होता. मोठा ऐटबाज पोशाख करावयाचा तो. त्याचा हात दाखविला. बुवांनीं मोठी गंभीर मुद्रा करून विद्या पुष्कळ आहे, नांवलौकिक पुष्कळ मिळेल, वगैरे त्याला सांगितलें.

पलीकडे पासोडींत डोकें खुपसून टिळक पडले होते. त्यांच्याकडे हात करून भिकूताई म्हणाली, "पाहा, त्यांच्या नशिबांत काय आहे तें तरी पाहूं या."

टिळक पुढें आले. " हात दाखीव. " टिळकांनीं त्यांच्यापुढें पालथा हात केला.

बुवा संतापले. "हात असा दाखवितोस का? बाँबा मारायच्या आहेत का? तुम्ही बाँबाच मारणार." टिळकांनीं गुपचिप सोईचा हात दाखविला.

ज्योतिषीबुवांनीं भविष्य वर्तविलें,

"विद्येच्या नांवानें शंख! पैसा मुळींच नाहीं! लग्न होणार नाहीं." माईनीं हळूच विचारलें,

"पोरेंबाळें तरी आहेत का नशिबांत?"

"अहो, बायको नाहीं तेथें पोरेंबाळें काय घेऊन बसलांत?"

इतकें झाल्यावर बुवा गेले गांवांत फेरीला.

संध्याकाळीं पेंडसे आले. ते येतांच टिळक त्यांना म्हणाले,

"नानासाहेब, तुम्ही नेहमीं मला कीर्तन करण्याचा आग्रह करतां; आज मला कीर्तन करण्याची हुक्की आली आहे. तेव्हां आज रात्रीं जेवण झाल्यावर कीर्तन ठरवा माझें."

पेंडशांना फार आनंद झाला. मामलेदार असल्यामुळें त्यांना कीर्तनाची तयारी एका घंट्या दीड घंट्यांत करणें कांहीं अवघड नव्हतें.

जेवणीं झाल्यावर लोक जमूं लागले. कीर्तनाला सुरुवात होणार, इतक्यांत ज्योतिषीबुवा समोर येऊन बसले. पलीकडे स्त्रियांत भिकूताई बसली.

कीर्तनाला सुरुवात झाली. कीर्तनारंभीं पहिलेंच गाणें हें.

**माझे ग्रह फिरले ग्रह फिरले**
**भवबंधन मम तुटलें ॥ ध्रु० ॥**

**मानामाना सुखदुःखाला मन्मन हें अन्तरलें — १**
**मायाराशिस विवेक रवि ये भलतें सलतें रुचलें — २**
**स्वर्गमुक्ति संसार सारखा हरिभजनीं मन रमलें — ३**
**मीपण शनिनें मीपण तूंपण अनुभूतिस्तव हरिलें — ४**
**श्रीनारायण सुरकुळ टिळका नाम तुझें बा जपलें — ५**

पासोंडी पांघरलेला पाणक्या तो हाच व अगदीं आपल्याच राशीस बसूं लागला हें पाहून ज्योतिषीबुवांची पांचावर धारण बसली. भिकूताईला मात्र

ज्योतिषीबुवांची फजिती झालेली पाहून फार आनंद वाटला. त्या ज्योतिषीबुवांकडे टवकारून पाहूं लागल्या. आपल्या मेहुण्याला त्या धन्यवाद देऊं लागल्या. इतक्यांत दुसरें पद सुरू झालें.

**वेडा झालों खरा, गड्यांनो वेडा झालों खरा**
**कोणी म्हणती हा दरवेशी हाकलून द्या घरा**
**गड्यांनो वेडा झालों खरा**
**शिकला पढला रुका न पदरीं ह्यास बांगड्या भरा**
**गड्यांनो वेडा झालों खरा**
**घरांत वाजे नकार घंटा दाद न त्याची जरा**
**गड्यांनो वेडा झालों खरा**

आतां मात्र माईसाहेबांचें सारें हास्य लयाला गेलें ? तिला आपलें दुपारचें बोलणें आठवलें. आपला मेहुणा कधीं तरी आपल्यावर कविता करून आपली फजिती करणार ही तिची भीति खरी ठरली. तिच्या मनाची स्थिति फारच चमत्कारिक झाली. रागारागानें ती उठून जाऊं लागली.

पेंडशांना मात्र ह्या दोन्ही माणसांच्या मनाची कांहींच कल्पना नव्हती.

शेवटीं राग थोडा शांत झाल्यावर ती म्हणाली,

"आहे, एक बहिण आहे म्हणून मेव्हणा मजवर कीर्तन करतो. बहीण मेल्यावर मेव्हणे तोंडहि पाहाण्यास तयार नसतात. सोसलें पाहिजे."

वरील उद्गार ऐकून माझ्या जिवांत जीव आला. मला इकडे आड नि तिकडे विहीर असें झालें होतें.

ह्यानंतर दुसऱ्याच दिवशीं ज्योतिषीबुवांनीं पोबारा केला.

टिळकांनाहि पेंडशांकडे आश्रितासारखें राहाणें प्रशस्त वाटेना.

संगमनेरीं माझ्यावर जिवापलीकडे प्रेम करणारी माझी बहीण व भाची होती. पेंडशांचेंहि टिळकांवर अलोट प्रेम होतें. त्यांचें कौतुकहि पेंडसे पुष्कळ करीत, नोकरी त्यांना नको होती. नोकरीशिवाय दुसरें कांहीं तरी करावें असें त्यांना सारखें वाटे.

# सप्तश्रृंग

मला जलालपुरास ठेऊन टिळकांनीं सप्तश्रृंगीस जाण्याचें ठरविलें. नाशिकच्या उत्तरेस २०-२२ मैलांवर हें एक देवीचें स्थान आहे. गांवाचें नांव वणी.

आतां प्रश्न आला पैशाचा. आतां मामा गेल्यानें सासूजवळ मागणें अशक्यच होतें. मेव्हण्यांजवळ कसे मागायचे ? माझ्याजवळ नवीचें बाळलेणें होतें. पण तें भिकूताईनें केलेलें ! त्याला कसा हात लावायचा ? राहतां राहिलें माझें एक कोरें लुगडें. टिळकांनींच घेतलेलें होतें तें. अजून त्याची घडी मोडली नव्हती. तें त्यांच्याजवळ देऊन मीं म्हटलें, दुकानदाराला हें परत द्या आणि त्याचे पैसे घेऊन वणीला जा. टिळक तें घेईनात. मोठ्या पंचाइतेनें मीं त्यांची समजूत करून तें त्यांच्या हवालीं केलें आणि टिळक गेले.

नाना संत नांवाचे एक अत्यंत सुप्रसिद्ध राजवैद्य होते. त्यांचें बिऱ्हाड वणीस होतें. संतांचा टिळकांवर फार जीव असे. टिळकांनीं त्यांच्याकडून त्यांची विद्या थोडीबहुत हस्तगत करून घेतली. मात्र टिळक आपल्या वैद्यकीवर पैसे मिळवीत नसत. ह्या दोघां गुरुशिष्यांच्या संगनमतानें टिळकांनीं आतां आपलें ठाणें वणीस दिलें. तेथें टिळकांनीं शाळा काढली. ही शाळा टिळकांच्या सर्व शाळांत अधिक उत्तम चालली. चाळीस विद्यार्थी जमले. फी एक रुपया ठेवली होती. ती ते मोठ्या आनंदानें देत. त्या काळांत गुरुजींस शिष्यवर्ग जो मान देत, त्याच्या शतांशानेंहि आतां पाहाण्यास मिळणार नाहीं.

टिळकांचें शिक्षणहि कांहीं निराळें असे. वणींतील किती तरी बालगोपाळ त्या

वेळीं कविता करूं लागले होते. ह्या वर्गांत इंग्रजीहि शिकविण्यांत येत असे.

टिळक वणीस गेल्याबरोबर त्यांनीं आपल्या उपाध्यायांच्या घरीं आपलें बिऱ्हाड ठेवलें व पुढेंहि त्यांच्याच घरांत आम्ही राहूं लागलों व शाळाहि त्यांच्याच माडींत भरे. टिळक गेल्यानंतर एक महिन्यानें मी व नवी वणीस गेलों. तेथें आम्हांला अगदीं घरच्यासारखें वाटूं लागलें. ते जरी आमचे उपाध्ये होते तरी आम्हांला यत्किंचित्सुद्धां परकेपणा त्यांच्या घरीं कधीं वाटला नाहीं.

वणीस असतांना टिळकांनीं 'देवीचा प्रसाद' नांवाचें कवितांचें पुस्तक लिहिलें. तें वणीच्या जहागीरदारांनीं छापून प्रसिद्ध केलें.

संत आमच्या घरीं येऊन बसत. ते म्हणत, जेवण झाल्यावर मला जशी पानसुपारी लागते, तसें तुमचें एकादें भांडण ऐकण्यास बरें वाटतें. मोठीं मौजेचीं भांडणें असतात तुमचीं. आणि आम्ही खरोखरच नेहमीं भांडत बसायचे. आमच्या भांडणाचे विषयहि विविध असत.

वणीस एकदां चोरांचा फार सुळसुळाट झाला होता. टिळकांनीं चोर पकडण्याची युक्ति काढली. ती मला पसंत पडली नाहीं. झालें कडाक्याचें भांडण. त्यांची युक्ति अशी होती कीं, घराच्या दाराजवळ एक मोठा खड्डा खणावा. त्यांत पानसावर टाकावी. वर एक मोठी पत्रावळ—त्या कार्यासाठीं मुद्दाम बनविलेली—टाकावी. मग चोर आला, कीं पडेल आंतमध्यें !

मी म्हणें, चोरच कशावरून पडेल, तुम्ही किंवा मीच कशावरून नाहीं पडणार ? दुसरें असें कीं, खड्डा खणतांना गांवांतील लोकांना दिसणार नाहीं कशावरून ?

'मी सांगतों, तसें कधीं होणार नाहीं.' यानंतर झाली भांडणाला सुरुवात आणि नाना संत बसले येऊन गंमत पाहात. असें नेहमीं चालायचें.

टिळकांना मुलीची फार हौस. देवानें मुलगी दिली. ती बुद्धिमान्, बाळसेदार व अतिशय गोड स्वभावाची दिली. तिचा आवाज मंजूळ होता. तिचे बोबडे बोल सर्वांना वेडे करीत. टिळकांची मनीषा तृप्त झाली. टिळक म्हणत आनंदीबाई जोशीसारखी ही शिकणार. नबी सुंदर होती. माझ्याजवळ आल्यावर ही

माझीच मुलगी असें कोणीं म्हटलेंसुद्धां नसतें. पण आमच्या नबूताईला ताप आला. निमित्त नव्या तांदळाचा मोदक खाल्ल्याचें झालें. ती आम्हांला इतकी चटकन् सोडून जाईल अशी मात्र कोणाला कल्पनाहि नव्हती. टिळक तर आदल्या दिवशीं नाशकास कांहीं कामानिमित्त जाण्यास निघाले होते. थोडेसे गेले नाहींत, तों वाटेंत त्यांना एक फकीर भेटला व त्यानें त्यांना वाटेंतून परतविलें ! घरीं आल्यावर माईनें त्यांना 'देवीचा प्रसाद' काव्यांतील गाणीं म्हणण्यास लावलें. तीं गाणीं तिला फार आवडत. शेवटीं, आमची मुलगी आम्हांला सोडून गेली. आम्ही दोघेंहि दुःखानें अगदीं वेडावून गेलों. टिळकांच्या दुःखाला तर अगदीं सीमा राहिली नाहीं. नबीबद्दल त्यांच्या सगळ्या आशा उमेदी रसातळाला पोंचल्या.

एक दिवस खिन्न मनानें टिळक माडीवर नाना संतांशीं बोलत बसले होते. मी खालून जिन्यांतून वर येत होतें. टिळक म्हणाले, " नानासाहेब, काय हो माझी बायको खरोखरच राक्षसीण आहे. अहो तिनें माझा मुलगा, मुलगी, बाप, भाऊ, बहीण अशीं किती तरी माणसें खाल्लीं ! "

" खरेंच सांगा, राक्षशिणीचें लग्न कोणाबरोबर होतें ? " मीं वर पोंचतांच संतांना प्रश्न केला. " अहो, ह्यांनीं माझा मुलगा, मुलगी, आई, बाप, दत्तक बाप, सासरा, दीर, नणंद अशीं किती तरी माणसें खाल्लीं. मीं ह्यांचीं खाल्लीं त्यापेक्षां कितीतरी अधिक माणसें ह्यांनीं माझीं खाल्लीं आहेत." टिळक गप्प बसले. त्यापुढें त्यांनीं कधीं जन्मांत असले अभद्र शब्द उच्चारले नाहींत, कीं असली अभद्र कल्पना मनांत आणली नाहीं.

वणी गांव म्हणजे एक लहानसें खेडें. तेथल्या गरजा अल्प. त्यामुळें मिळत असलेला पैसा पुष्कळ उरे पण त्या पैशाची विल्हेवाट लावण्याची हातोटी टिळकांना चांगली साधलेली होती. तेथील देवीच्या देवळांत जाऊन तेथें जमलेल्या सगळ्या भिकाऱ्यांना त्यांनीं घरीं गोळा करून आणावें नाहींतर तिकडेच खैरात सुरू करावी.

टिळकांप्रमाणेंच त्यांचे सर्वांत धाकटे बंधु महादेवभाऊजी होते. किंबहुना एक

कांकणभर अधिकच म्हटलें तरी चालेल ! एक दिवस महादेवभाऊजी जलालपुरास गेले. एका धोतराखेरीज त्यांच्या अंगावर दुसरी चिंधीसुद्धां नव्हती. डोक्यावर टोपी नव्हती, पायांत जोडा नव्हता. त्यांनीं हें सगळें कोणाला तरी देऊन टाकलें होतें ! नागपुरास भाऊजी ह्या वेळेस कॉलेजमध्यें शिकत होते; तेथून सुटी झाली म्हणून ते वर्णीस यावयास निघाले होते. वाटेंत आत्याबाईला भेटून जावें म्हणून ते जलालपुरास गेले.

आत्याबाईनीं त्यांना विचारलें, " अरे महादेवा, तूं फक्त नुसत्या नेसूं धोतरानिशीं कसा आलास ? "

भाउजींनीं म्हटलें, " आत्याबाई, मला आगगाडींत झोंप लागली, तेव्हां चोरी झाली. सारें कांहीं चोरीस गेलें. " पण ह्या बोलण्यावर विश्वास कसा बसायचा ? आत्याबाई म्हणाली, " महादेव, अरे तूं जरी झोपेंत असलास, तरी तुझ्या अंगांतलें रे कसें कोण काढील ? "

भाउजींचा हा स्वभावच ! कोणी अडचणींत पाहिला, कीं त्यांनीं जवळ असेल नसेल तें देऊन टाकावें व मग कोणी विचारलें, म्हणजे अशा थापा माराव्या.

नागपुरास ते माझ्या एकदां मागें लागले, कीं, " वहिनी मला रेशीमकांठी धोतराची फार हौस आहे. मला एक रेशीमकांठी धोतर घे. " धोतर घेतल्यानंतर दोनचार दिवसांत तें दिसेनासें झालें ! मीं सारें घर शोधलें, तेहि मजबरोबर शोधूं लागले. दुसऱ्या दिवशीं एक गोंधळी आला, त्याच्या अंगावर तें धोतर ! मीं भाउजींच्या अंगीं लावलें, तेव्हां त्यांनीं कबूल केलें, कीं धोतर आपण त्या गोंधळ्याला दिलें म्हणून !

असो. आत्याबाईनें मामांचे कांहीं कपडे भाउजींना देऊन त्यांची वर्णीस रवानगी केली. आतां तर काय, आमच्या घरांत एकसे दो भले झाले. दोघांनींहि घरांतील जिनसा, कपडे बाहेर कोणाला लागतील त्यांना नेऊन देण्याचा सपाटा लावला !

एक दिवस घरांतला तांब्या नाहींसा झाला. तांब्या काय झाला, तांब्या काय

माझीच मुलगी असें कोणीं म्हटलेंसुद्धां नसतें. पण आमच्या नबूताईला ताप आला. निमित्त नव्या तांदळाचा मोदक खाल्ल्याचें झालें. ती आम्हांला इतकी चटकन् सोडून जाईल अशी मात्र कोणाला कल्पनाहि नव्हती. टिळक तर आदल्या दिवशीं नाशकास कांहीं कामानिमित्त जाण्यास निघाले होते. थोडेसे गेले नाहींत, तों वाटेंत त्यांना एक फकीर भेटला व त्यानें त्यांना वाटेंतून परतविलें! घरीं आल्यावर माईनें त्यांना 'देवीचा प्रसाद' काव्यांतील गाणीं म्हणण्यास लावलें. तीं गाणीं तिला फार आवडत. शेवटीं, आमची मुलगी आम्हांला सोडून गेली. आम्ही दोघेंहि दुःखानें अगदीं वेडावून गेलों. टिळकांच्या दुःखाला तर अगदीं सीमा राहिली नाहीं. नबीबद्दल त्यांच्या सगळ्या आशा उमेदी रसातळाला पोंचल्या.

एक दिवस खिन्न मनानें टिळक माडीवर नाना संतांशीं बोलत बसले होते. मी खालून जिन्यांतून वर येत होतें. टिळक म्हणाले, "नानासाहेब, काय हो माझी बायको खरोखरच राक्षसीण आहे. अहो तिनें माझा मुलगा, मुलगी, बाप, भाऊ, बहीण अशीं किती तरी माणसें खाल्लीं!"

"खरेंच सांगा, राक्षशिणीचें लग्न कोणाबरोबर होतें?" मीं वर पोंचतांच संतांना प्रश्न केला. "अहो, ह्यांनीं माझा मुलगा, मुलगी, आई, बाप, दत्तक बाप, सासरा, दीर, नणंद अशीं किती तरी माणसें खाल्लीं. मीं ह्यांचीं खाल्लीं त्यापेक्षां कितीतरी अधिक माणसें ह्यांनीं माझीं खाल्लीं आहेत." टिळक गप्प बसले. त्यापुढें त्यांनीं कधीं जन्मांत असले अभद्र शब्द उच्चारले नाहींत, कीं असली अभद्र कल्पना मनांत आणली नाहीं.

वणी गांव म्हणजे एक लहानसें खेडें. तेथल्या गरजा अल्प. त्यामुळें मिळत असलेला पैसा पुष्कळ उरे पण त्या पैशाची विल्हेवाट लावण्याची हातोटी टिळकांना चांगली साधलेली होती. तेथील देवीच्या देवळांत जाऊन तेथें जमलेल्या सगळ्या भिकाऱ्यांना त्यांनीं घरीं गोळा करून आणावें नाहींतर तिकडेच खैरात सुरू करावी.

टिळकांप्रमाणेंच त्यांचे सर्वांत धाकटे बंधु महादेवभाऊजी होते. किंबहुना एक

कांकणभर अधिकच म्हटलें तरी चालेल ! एक दिवस महादेवभाऊजी जलालपुरास गेले. एका धोतराखेरीज त्यांच्या अंगावर दुसरी चिंधीसुद्धां नव्हती. डोक्यावर टोपी नव्हती, पायांत जोडा नव्हता. त्यांनीं हें सगळें कोणाला तरी देऊन टाकलें होतें ! नागपुरास भाऊजी ह्या वेळेस कॉलेजमध्यें शिकत होते; तेथून सुटी झाली म्हणून ते वर्धास यावयास निघाले होते. वाटेंत आत्याबाईला भेटून जावें म्हणून ते जलालपुरास गेले.

आत्याबाईनीं त्यांना विचारलें, " अरे महादेवा, तूं फक्त नुसत्या नेसूं धोतरानिशीं कसा आलास ? "

भाउजींनीं म्हटलें, " आत्याबाई, मला आगगाडींत झोंप लागली, तेव्हां चोरी झाली. सारें कांहीं चोरीस गेलें. " पण ह्या बोलण्यावर विश्वास कसा बसायचा ? आत्याबाई म्हणाली, " महादेव, अरे तूं जरी झोपेंत असलास, तरी तुझ्या अंगांतलें रे कसें कोण काढील ? "

भाउजींचा हा स्वभावच ! कोणी अडचणींत पाहिला, कीं त्यांनीं जवळ असेल नसेल तें देऊन टाकावें व मग कोणी विचारलें, म्हणजे अशा थापा माराव्या.

नागपुरास ते माझ्या एकदां मागें लागले, कीं, " वहिनी मला रेशीमकांठी धोतराची फार हौस आहे. मला एक रेशीमकांठी धोतर घे. " धोतर घेतल्यानंतर दोनचार दिवसांत तें दिसेनासें झालें ! मीं सारें घर शोधलें, तेहि मजबरोबर शोधूं लागले. दुसऱ्या दिवशीं एक गोंधळी आला, त्याच्या अंगावर तें धोतर ! मीं भाउजींच्या अंगीं लावलें, तेव्हां त्यांनीं कबूल केलें, कीं धोतर आपण त्या गोंधळ्याला दिलें म्हणून !

असो. आत्याबाईनें मामांचे कांहीं कपडे भाउजींना देऊन त्यांची वर्धास रवानगी केली. आतां तर काय, आमच्या घरांत एकसे दो भले झाले. दोघांनींहि घरांतील जिनसा, कपडे बाहेर कोणाला लागतील त्यांना नेऊन देण्याचा सपाटा लावला !

एक दिवस घरांतला तांब्या नाहींसा झाला. तांब्या काय झाला, तांब्या काय

झाला, म्हणून मीं ओरड केली व टिळकांच्या मागें भुणभुण लावली. तुम्हींच तो कोणाला तरी दिला, असें मी त्यांच्या अंगीं लावण्याचा प्रयत्न करी.

एक दिवस मी दळीत बसलें होतें. तेथें भाऊजी आले व त्यांनीं जात्याचा खुंटा धरला. "वहिनी, तुम्हांला राग येईल का ? तुम्ही नानांना बोलूं नका. तांब्या मीं एका गरिबाला दिला."

खरा प्रकार कळल्यावर मला हंसूं आलें. मी म्हणालें, "भाऊजी, तुम्हीं अगोदर कां नाहीं सांगितलें ?"

"तुम्ही रागवाल म्हणून. वहिनी, तुमची मला फार भीति वाटते."

एक दिवस रात्रीचें गडावर जाण्याचें भाउजींनीं ठरविलें. त्यांच्याबरोबर त्यांचे एक मित्र जाणार होते.

भाऊजी माझ्याकडे येऊन गयावया करूं लागले कीं, "वहिनी, तुमची धाबळी द्या." मीं सांगितलें, मी देणार नाहीं; तुम्ही ती कोणाला तरी देऊन टाकाल. त्यावर त्यांनीं आणखी गयावया केली. कबूल केलें कीं, धाबळी कोणाला देणार नाहीं. अगदीं तुमच्या हातांत आणून देईन. शेवटीं त्यांनीं धाबळी नेली व ती देऊन टाकली ! मला त्यांचा ह्या गुणामुळें फार राग येई व मी रागावतें म्हणून ते मला फार भीत.

राग, प्रेमळपणा, दयाळुत्व व थोडासा विक्षिप्तपणा हीं सारीं ह्या दोघांहि भावांच्या अंगीं होतीं. नागपुरास असतांना एकदां टिळक कोठेंसे गेले होते. घरांत कांहीं सामान नव्हतें. महादेवभाऊजी व मी अशीं आम्ही दोघेंच घरीं. माझ्याजवळ दोन रुपये होते. ते भाउजींच्या हवालीं करून मीं सांगितलें. "भाऊजी, अमूक अमूक सामान आणा." भाऊजी बाजारांत गेले व दोन रुपयांची तूपसाखरच घेऊन आले ! शिवाय बरोबर हजामत करण्यास न्हावी घेऊन आले ! मला त्यांचा इतका संताप आला कीं मीं त्यांना म्हटलें, "न्हावी राहिला बाजूला, आतां मीच तुमची चांगली हजामत करतें ! आतां का नुसती तूपसाखर खाऊन दिवस काढायचे ! जा, मी आतां जीवच देतें."

असें म्हणून मी वर माडीवर जाऊन बसलें. अर्थात् जीव देण्याचा माझा मुळींच हेतु नव्हता. तशी मी फार जीवट स्वभावाची व चिवट शरीराची आहे. भाऊजी खालीं तोंड फुगवून बसले व मी माडीवर जाऊन बसलें. माझी कांहीं गडबड ऐकूं येईना, तेव्हां ते घाबरले व बागेंतल्या विहिरींतून डोकावून पाहूं लागले. मी माडीवरून सारी गंमत पाहात होतें. माझा पत्ता लागेना तेव्हां ते मोठमोठ्यानें गळा काढून रडूं लागले !

" अग वहिनी ! तूं कसा ग जीव दिलास ! आतां नानांना मी काय सांगूं ! कोठें ग तूं जीव दिलास ! "

शेवटीं मला राहावेना व मी खालीं आलें. मला पाहातांच भाउजींनीं मोठ्यानें रडून माझे पाय धरले. ' वहिनी, मी आतां कधीं नाहीं ग असें करायचा. '

मला त्यांचा खरा स्वभाव तेव्हां कळला नव्हता, म्हणून अशा साधु पुरुषाचा मला राग येई. आतां त्यांची खरी किंमत कळते.

असो; भाउजींनीं वचन दिलें, ते रडले, तरी त्यांचें होतें तें होतेंच. नागपूरचीच गोष्ट. मामंजी वारल्याची बातमी आली, तेव्हां भाउजींना बाजारांत पाठविलें. बाराव्या तेराव्याचे ब्राह्मण बोलावले होते. भाऊजी बाजारांत गेले. बाजार आणला. टिळक व भाऊजी ह्या दोघांजवळून मी हिशेब घेत असें; कारण ते काय व कसा खर्च करतील ह्याचा नेमच नसे. भाउजींनीं सारा हिशोब चोख दिला, पण चार आण्यांचा हिशोब त्यांना देतां येईना ! शेवटीं कबूल केलें. कीं दोन आणे एका भिकाऱ्याला दिले व दोन आण्यांची जिलेबी घेऊन खाल्ली.

" भाऊजी ! आज जिलेबी खाल्लीत ? तुम्हांला कांहीं वाटतं का सांगायला ?

" वहिनी, मग मी काय करूं बरं ? मला भूक लागली. "

" पण भाऊजी, अजून सारं व्हायचं राहिलं आहे. ब्राह्मण जेवले नाहींत. आणि तुमचे वडील वारलेले; तुम्हीं गोड हो कसें खाल्लें ? "

" ते दूर वारले वहिनी ! "

मला खरोखर त्यांच्या असल्या कांहीं कृत्यांचा अर्थच कळत नसे.

माझा पहिला मुलगा वारला, तेव्हां भाउजीच आम्हांला आमच्या मुलासारखे

वाटत. त्याच वेळची आणखी एक गोष्ट आठवते. मुलाची मला फार आठवण येत असे व नेहमीं रडायला येत असे. तेव्हां टिळकांनीं मला एक राघूचें पिल्लूं आणून दिलें होतें. त्या पिल्लाचा पुढें मोठा राघू झाला. याला टिळकांनीं संस्कृत शिकविलें होतें. पण ' भो भो महादेव ' एवढेंच तो म्हणत असे. त्यांतील ' महा-देए-व ' असें मोठें आळवून म्हणे.

पोपटाला मीं कसें संभाळलें तें टिळकांनीं कवितेंत लिहून ठेवलें आहे.

पर न रे फुटले तनुला पुरे
दिसतसे तनुचें मृदु मांस रे
मृदुल चोंच तुझी शुकबालका
स्मरण त्या स्थितिचें तुज होय का ?
चंचू तेव्हां रचुनि अपुल्या दोन हस्तांगुलांची
चारा बाळा तुज भरविला ! व्यर्थ माया मनाची
माझ्या जिव्हेवरुनि कितिदां भक्षिलें सांग भक्ष्य
क्रूरा तेव्हां डससि परि मीं त्यास केलें अलक्ष
रात्रीं तूंतें हृदयिं अपुल्या घेउनी मीं निजावें
वेळोवेळीं दचकुनि तुझ्या चिंतनीं मीं उठावें
पोरालाही इतुकि जपलें पोटच्या मी न ऐशी
हा ! हा ! कीरा ! तुजशि जपलें निर्दया साच तैशी
उत्साहानें पाहटेला उठावें
बोलायाला मीं तुला शीकवावें
मध्येमध्ये कामकाजा त्यजावें
घेवोनीया तूजलागी रमावें
किति ममत्व तरी तव लागलें
घडिभरी तुजला न विसंबलें
उपवनीं फिरतां असतां परीं
तुजशि बाळगिलेंच करीं उरीं

देवास नैवेद्य न दाखवीला
प्रियास वा अर्पित नाहिं केला
पदार्थ गेहांत नवीन झाला
आधीं तरी तो तुज चारियेला
उपजतांच किरात धरी तुला
जननिला मुकसी अबला मुला
समजुनी द्रवलें मन हें अती
तुज शुका बघुनी रडलें किती
प्रथम गृष्टिवरी पर पातले
हळुहळू सगळें वपु झांकलें
चिमुकले फुटले तुज पांख रे
जननिचें सुख हो मजला पुरें
हळुहळू उडया बळ ये तुला
मम सुखा मग साच नुरे तुला
रुचिर पूर्णदशागत रूप रे
तव मुला भुलवी मजला पुरे

हा आमचा आवडता राघू पुढें एक दिवस पाहातां पाहातां उडून गेला. आम्हां तिघांना अतिशय दुःख झालें.

मधून मधून तो परत येई व उंच झाडावर बसून म्हणे,

" भो भो महा-देए-व "

तेव्हां आम्हां सगळ्यांना आनंद व्हावा, पण एक दोनदां भाउजींना हांका मारून त्यानें निघून जावें.

नागपुरास असतांना भाउजींना पुष्कळ मुली सांगून आल्या होत्या. पण ते लग्नाला कबूल होत ना. ते म्हणत, वहिनी, तुम्ही उगीच कशाला काळजी लावून घेतां? ह्या त्यांच्या बोलण्यामुळें माझ्या पोटांत धस्स होई. पण व्हायचें तें झालें. त्यांना जणू स्वप्नच पडलें होतें.

एक दिवस भाऊजी नागपुरास परत गेल्यावर वासुदेवराव पटवर्धनांचें पत्र आलें कीं, भाऊजी विषमानें आजारी असून त्यांनीं माझा, आत्याबाईचा व टिळकांचा ध्यास घेतला आहे. आम्हीं सर्वांनीं निघण्याची तयारी केली. पण दुसऱ्याच दिवशीं तार आली कीं, भाऊजी आम्हांला सोडून देवाघरीं चालते झाले. हाहि आमचा पोपट आम्हांला असाच सोडून जाईल अशी आम्हांला कल्पना नव्हती. पण श्री. पटवर्धनांची तार येऊन ती खरी झाली. भाउजींचें लग्न केलें असतें तर केवढा अनर्थ झाला असता हें आतां आम्हांला कळलें. अशीं माणसें देव आपल्याकडे लवकर नेतो म्हणतात तें खोटें नाहीं.

कांहीं काळ आमचा आनंद पार मावळला व नाना संतांना आमचीं भांडणें ऐकायला मिळेनाशीं झालीं. कांहीं दिवस गेले. भाउजींबद्दलचें दुःख ओसरलें. मला माहेरी जाण्याची वेळ आली. मी म्हणें, मी जात नाहीं. मामा वारले; आत्या-बाई दुसऱ्यांकडे—पण त्यांचा आग्रह, कीं जा. मी पैसे पाठवीन. आणि आतां पैसेहि बरे मिळत होते. आमचा हा वाद चालला आहे, तोंच माझ्या भावाचें पत्र आलें, कीं सौभाग्यवती प्रसूत होऊन मुलगा झाला. उभयतां बारशाला यावें.

आतां टिळकांचा फारच आग्रह सुरू झाला. पाहा, तुझ्या भाच्याच्या बारशाला गेली नाहींस तर फार वाईट दिसेल. तशांत, हा तुझ्या भावाचा पहिलाच मुलगा. पुढें जायचें म्हणालीस तर बैलगाडीची दगदग तुला सोसणार नाहीं. हो ना करतां करतां माझी तयारी झाली. मीं घरांत तयार केलेलें सर्व सामान घेतलें. आम्हीं एक गाडी भरली व निघालों.

जलालपुरास पोंचलों तो शनिवार! अमावास्या! तशांत घरांत पांचवी! आत्याबाई म्हणे, घरांत जाऊं नको.

मीं सांगितलें, 'मी जाणार. मला माझ्या भावजयीची पांचवी बाधते? आणि माझ्या वेळेस ती पांचवीला कोठें जाईल?'

मीं आत्याबाईचें मुळींच ऐकलें नाहीं. सरळ भावाच्या घरीं जाऊन राहिलें. टिळक परत गेले. महिना दीड महिन्यांनीं ते पुन्हां जलालपुरास आले. माझ्या

पोटांत धस्स झालें. मला वाटलें, नेहमींच्या रिवाजाप्रमाणें सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून हे वणीहून आले असावे. पण तसें कांहीं नव्हतें. ह्या वेळेस टिळकांचा खिसा चांगलाच गरम होता. संध्याकाळची वेळ होती. घरांत आंब्याच्या आढ्या लावल्या होत्या, त्यामुळें गोड वास चहूंकडे दरवळला होता. संध्याकाळीं गुरें घरीं आलीं, त्यांच्या मागोमाग माझे धाकटे बंधु विष्णुकाका घरीं आले. गुरांना चारा वगैरे सोडून ते टिळकांपुढें येऊन बसले.

" टिळक, माझें दुखतें आहे पोट आज. तुम्ही मोठ्या राजवैद्यापाशीं त्याची कला शिकलांत म्हणून ऐकलें. पाहा पाहूं माझी नाडी. "

टिळकांनीं नाडी पाहून सांगितलें, कीं आज आंब्याचा रस व कांद्याचीं भजीं जरा अधिक झालीं आहेत.

" वा ! वा ! तुम्ही वैद्यलोक मोठे चाणाक्ष असतां. घरांत आंब्यांचा वास येतो आहे, शिवाय, आज कांदेनवमी आहे. तेव्हां खूप बेत जमला. इकडे तिकडे पाहून ठरवायचें. शेजारीं बत्ता पडला असला, कीं रोग्यानें बत्ता खाल्ला म्हणून ठोकून द्यावयाचें. तसें नाहीं. मनीची नाडी पाहून तिची केव्हां सुटका होईल तें बरोबर सांगा. तर म्हणेन खरी. ये ग मने बाहेर, आतां यांची परीक्षा पाहूं. "

" मी सांगतों, पण माझें बरोबर झालें तर तुम्हीं पेढे दिले पाहिजेत. नाहीं तर मी देईन. " ह्या अटीवर माझी नाडी पाहाण्याचें ठरलें. मी बाहेर येऊन बसलें. मला त्या दिवशीं बरें नव्हतें, पण तें मीं कोणाला सांगितलें नव्हतें. टिळकांनीं माझी नाडी पाहून सांगितलें, कीं उद्यां दुपारीं दोन वाजतां ही प्रसूत होईल व मुलगा होईल !

दुसऱ्या दिवशीं दोन वाजतां माझी सुटका झाली व मुलगा झाला ! पहिल्या दोन खेपेला टिळक जवळ नव्हते. पण ह्या खेपेला होते. मी फार आजारी पडलें. ती पहिली आषाढी दशमी होती. मुसळधार पाऊस पडत होता पण तेवढ्या पावसांत टिळक नाशकास गेले व तेथून त्यांनीं मोठ्या फीचा डॉक्टर आणला. शिवाय, त्याच्या टांग्याचें भाडेंहि टिळकांना द्यावें लागलें.

पहिलीं दोन मुलें गेलीं म्हणून हा तिसरा मुलगा, मीं माझ्या भावजयीच्या ओटींत घातला. मुलाला पाहतांच तिला पान्हा फुटला. तिचा मुलगा सहा महिन्यांचा होता. ती आत्याबाईला म्हणे, सासूबाई, त्याला मी आतांच घेतें. ती म्हणे, असें म्हणूं नये. त्याची आई सुखरूप राहो.

हें अगदीं कृष्णासारखें झालें. देवकीचा पुत्र, पण यशोदेनें सांभाळला. भावजयीनें तीन महिने व वणीस आणखी दोघींनीं तीन चार महिने त्याला सांभाळला.

टिळकांनीं दहा दिवस वाजंत्रीं लावलीं. दहा रुपयांचे पेढे वांटले. भावांनीं जेवण दिलें. तेराव्या दिवशीं नांव ठेवलें व टिळक वणीला गेले. पाळण्यांत मुलाचें नांव दत्तात्रय ठेवलें.

रमावहिनीजवळ तो राही. मजजवळ किंवा आत्याबाईजवळ रडे ! हा असें काय करतो म्हणून आत्याबाईंना कसेंसेंच वाटे. एक दिवस तिला स्वप्न पडलें, कीं गोविंदरावमामा जसे तिला म्हणताहेत, कीं टिळकांचा जीव संसारांत नाहीं म्हणून मनूकडे मी आलों आहें. आत्याबाईंच्या मनानें घेतलें, कीं गोविंदरावमामा पोटीं आले. तिनें पुन्हा वाजंत्रीं लावलीं, पेढे वांटले ! बारसें केलें व दत्तूचें नांव गोविंद ठेवलें ! ह्या मुलाला पुढें आणखीहि तीन नांवें मिळालीं !

वणीस काकाजींच्या आईचा नवस फेडतांना अंबादास नांव ठेवलें. पुढें मुलगा दोन अडीच वर्षांचा झाल्यानंतर आम्हीं राजनांदगांवला गेलों. तेथें टिळकांच्या एका बंगाली डॉक्टर मित्रांच्या आग्रहावरून आम्ही दत्तूला शरश्चंद्र म्हणूं लागलों. आणि पुढें हीं सारींच नांवें मागें पडून, देवानेंच दिलेला म्हणून देवदत्त असें बाप्तिस्म्याच्या वेळीं त्याचें पांचव्यान्दां नांव बदलण्यांत आलें. मात्र नेहमीं आम्ही त्याला दत्तूच म्हणूं लागलों.

तीन महिने पुरे झाल्यावर, मला नेण्यासाठीं टिळकांनीं वणीहून गाडी पाठविली. बरोबर माझ्या भावजयीच्या मुलासाठीं व दत्तूसाठीं अंगडीं, टोपडीं, खण; आत्याबाईला लुगडें वगैरे सामान पाठविलें. पण गाडी पाहातांच आत्याबाई रागावली. ' आज कोजागिरी पौर्णिमा आहे. आज मी मनीला पाठवीत नाहीं. मुलगा पांच महिन्यांचा झाला म्हणजे घेऊन जा म्हणावें, ' असा निरोप देऊन

गाडी परत पाठवून दिली. गाडी गेली. ताबडतोब टिळकांचें रागारागाचें पत्र आलें, कीं पत्र पाहातांच निघून ये, न आलीस तर मी आपलें तोंड तुला दाखवणार नाहीं. मी घाबरून गेलें. पण भावानें गाडी करून दिली. मी एकटीच दत्तूला घेऊन गेलें. पण वणीस मी पोंचतें, तों टिळक सखारामभाउजींकडे गेल्याचें कळलें! पंधरा दिवसांनीं ते परत आले!

मुलगी वारली तेव्हां काकाजींच्या आईनें नवस केला होता, कीं आतां जर मनुताईला मुलगा झाला तर त्याचा पाळणा गडावर घालून त्याचें नांव अंबादास ठेवूं; त्याचें वजन करून त्याच्या भारंभार गूळ वांटूं, व पांचव्या वर्षीं त्याचें जावळ गडावर काढूं. त्याचें नांव ठेवण्यासाठीं आत्याबाई जलालपुराहून आली. आम्ही दहावीस माणसें गडावर गेलों, त्यांत संतहि होते. ज्या दिवशीं आम्ही गडावर गेलों, त्याच रात्रीं मला तेथें ताप भरला. दुसऱ्या दिवशीं तेथें जेवणावळ करावयाची असें ठरलें होतें. नाना संतांनीं माझी नाडी पाहून सांगितलें, जेवणावळीच्या भानगडींत पडूं नका. ताबडतोब हिला घेऊन खालीं चला. ताप दोषी आहे. मला ताप आला तो चढण्याच्या श्रमानें. जातांना मी सबंध गड चढून गेलें होतें. कसें तरी नांव ठेवलें व डोली करून मला खालीं आणलें. डोलीबरोबर टिळक धावतच होते. सर्व मंडळी मागें राहिली. दत्तू आत्याबाईजवळ मागेंच होता. तो सारखा रडत होता. घरीं आल्यावर रात्रींहि मधून मधून ओरडत उठे. टिळक मजजवळ बसून होते. पोरानें तिकडे रडून रडून आकान्त मांडला. आत्याबाई त्याला अंगारेधुपारे करूं लागली, पण त्याचें रडें संपेना. दुसऱ्या दिवशीं काकाजींच्या मुलीनें त्याला आपल्या पायांवर घेऊन डोलवायला सुरुवात केली. तिचा हात त्याच्या टोपड्यास लागला, कीं तो अधिक किंचाळे. शेवटीं तिनें कुंचडें चांचपून पाहिलें, तों तिच्या हाताला सुई लागली. मी कशीदा काढायला घेतला होता व सुई कुंचड्याला टोंचून ठेवली होती. त्याच्या डोक्याला सुई पुष्कळच बोंचली होती.

आत्याबाईचा अंगारा बंद झाला. दत्तू चांगला हसूं खेळूं लागला. माझा ताप हटेना. दत्तूच्या खाण्याचे हाल होऊं लागले. पण सौ. भागीरथीबाई मुळे

व सौ. पार्वतीबाई देशपांडे ह्यांनीं ह्या संकटकाळीं त्याला कांहीं अंगावरचे तर कांहीं गाईचें दूध पाजून वांचविलें. तो बहुतेक दिवसभर बापूसाहेब जहागिरदारांच्या घरीं असे. रात्रीं त्याला आत्याबाईच्या स्वाधीन करीत. टिळक आत्याबाईला म्हणत, त्याला जहागिदारांच्या घरांत राहूं द्या. पण तें बोलणें ऐकलें, म्हणजे म्हातारी फार संतापे. ती म्हणे, मला दिवसां काम असतें म्हणून मी त्याला दूर करतें. मी त्याला रात्रीं दूर करणार नाहीं. त्याची आई जगलीच तर बरें. नच जगली तर मी त्याला पाठीशीं बांधून मोलमजुरी करीन व त्याला सांभाळीन. तुम्हीं मला पैसे न दिले तरी चालतील.

मला पुढें पुढें मुळींच कशाची शुद्ध राहिली नाहीं. टिळक एकसारखे माझ्या बिछान्याजवळ बसून होते. नाना संतहि जाऊन येऊन होतेच. एक दिवस त्यांनीं टिळकांना सांगितलें, आतां उद्यांपर्यंत ही टिकाव धरणार नाहीं. आजची रात्र ही जेमतेम काढील. गांव लहान असल्यानें मंडळी भरभर जमा झाली. पुष्कळ विद्यार्थी निजावयाला आले होते. टिळकांनीं नाना संतांना विचारलें, ही आज रात्रीं अगदीं खात्रीनें मरणार ना? हो म्हटल्यावर टिळकांनीं विचारलें, इच्छाभेदी देऊं का हिला? संत म्हणाले, नको. तुम्ही तिचें मरण दोन तास अलीकडे आणाल.

'मरणार हें खरें ना? मग दोन तास अगोदर आलें तर कांहीं हरकत नाहीं', असें कांहीं त्यांच्याशीं, कांहीं स्वतःशीं बोलून टिळकांनीं मला इच्छाभेदीची गोळी दिली. नाना संतांनीं तेथून पाय काढला. ते म्हणाले, 'तुम्ही वाटेल तें करा, मी जातों. मला उगीच असें वाटायला नको, कीं ती माझ्यामुळें मेली.'

टिळक माझी नाडी धरून बसले होते. पहांटे मला कल पडला. सकाळीं संत येऊन त्यांनीं मी जगल्याचें सर्टिफिकीट दिलें! टिळकांच्या धैर्याचें त्यांनीं कौतुक केलें. पुढें हळू हळू मला बरें वाटूं लागलें. माझ्या आजारांत आत्याबाईनें पुष्कळसे नवस केले होते. ते पुढें सर्व फेडले. कांहीं दिवसांनीं टिळकांनीं मला व दत्तूला श्री. देशपांडे ह्यांच्या घरीं ठेवून पुण्यास प्रयाण केलें.

टिळक गेले ते तिकडेच! महिना दीड महिना झाला, त्यांचा पत्ता नाहीं.

पत्र नाहीं हें माझ्या भावाला कळल्यावर त्यानें येऊन मला व दत्तूला जलालपुरास नेलें.

दत्तू आठ नऊ महिन्यांचा झाला. मी माहेरींच होतें, एक दिवस माझी भावजय म्हणाली, 'काय हो वन्सं ? भुतं खरंच असतात का हो ?' मी म्हणालें,

" नाहीं ग, ही उगीच कांहीं कल्पना आहे. "

" मग आपल्या घरीं देवांत आजोबा कसे ? "

माझ्या माहेरीं आजोबांच्या नांवाचा टाक करून बसविला आहे. त्यावर सर्वांचा भाव आहे. बाहेर जातां, घरांत येतां, लग्नकार्यांत, अडीअडचणींत जें कांहीं करायचें तें आजोबांचें नांव घेऊन करतात. आमचें त्या टाकावरून पुढें पुष्कळ बोलणें झालें व बोलतां बोलतां आम्हीं झोंपीं गेलों.

आम्हीं नेहमीं एका दंडाळीला निजत असूं. उन्हाळ्याला सुरुवात झाली होती, म्हणून त्याच दिवशीं आम्ही माजघरांत न निजतां ओसरीवर निजलों होतों. पहाटे पहाटे मला स्वप्न पडलें, कीं आजोबा आले. मी जागी झालें. बाहेर चांदणें पिठासारखें पडलें होतें, त्यामुळें ओसरीवर अधिक काळोख वाटत होता. अंगणांत चार भील निजले होते. विष्णुकाका ओसरीवरच्या खोलींत आंतून कडी घालून निजले होते. ही खोली फळ्यांची होती. कामदारीण शेजारीं दळायला गेली. तिनें वाड्याला बाहेरून कडी लावून घेतली.

म्हैस नुकतीच व्याली होती. तिची चार दिवसांची पारडी ओसरीवर वहिनीच्या पायांशींच बांधली होती. तिनें वहिनीचा पाय चाटला आणि वहिनीनें मोठा सूर काढला. ती उठतांच आत्याबाई उठली व तिनें तिचें मूल आपल्या मांडीवर घेतलें. तिला ती जागी करूं लागली, पण तिचाहि शब्द उमटेना. तीहि ओय ओयच करीत होती. दोघींच्या आवाजांत कांहींच फरक नव्हता. मी चांगली जागी होतें, पण मलाहि दुसरा आवाज काढतां येईना. मींहि त्या दोघींमध्यें आपला सूर मिळवून दिला. बरें झालें जवळ कुंभाराचें घर नव्हतें. भाऊ शेजारच्या खोलींत फळ्यांवर लाथा बुक्क्या मारूं लागला. 'अरे मला दार उघडा, म्हणजे मी एकेकाचें पाहाणें पाहातों,' असें तो ओरडत होता.

कामदारणीच्यां कानीं हा आवाज जातांच ती घावऱ्या घावऱ्या धावत आली आणि बाहेरून दाराला धक्के देऊं लागली ! आपणच बाहेरून कडी घातली आहे हें ती विसरून गेली होती ! अंगणांत निजलेले गडी हातांत कुऱ्हाडी व काठ्या घेऊन नाचूं लागले. ‘ बाम्हननी जिव मेल्या, बाम्हननी जिव मेल्या ’ हें त्यांचें पालुपद होतें. पण आम्हीं आंत आहों असें त्यांना वाटत होतें, असा सारा गोंधळ चालला होता. इतक्यांत मीं वहिनीच्या गळ्यांत हात टाकला. तो पलीकडे आत्याबाई होती तिला लागला. त्यावरोबर ती ओरडली, ‘ अये पाहातां काय ? हाच च्योय ! ’ तसे बाहेरचे चाऱ्ही गडी माझ्या अंगावर धावले. मी दत्तूला उभ्या उभ्याच गादीवर टाकून अंगणांत पळालें व ‘ अरे मी मनी, मी मनी, ’ म्हणून सांगूं लागलें व पुढें सर्व उलगडा झाल्यावर पहाटेपर्यंत एकसारखा हशा पिकला. पुढें कित्येक महिने ही गंमत आठवून आम्ही हसत होतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३७९५ वि: ..................
क्रमांक .. ९३० ..... नों: दि: ३०।७।५८

# बुटींच्या बागेंत

वणीस आमचें बस्तान फारच चांगलें बसलें होतें. समाजसेवा, शाळा व धर्माचा अभ्यास हीं सारीं करायला टिळकांना येथें भरपूर संधी व वेळ मिळे पण आम्हीं वणी सोडण्याची वेळ आतां आली होती.

नागपूरहून श्रीमंत आप्पासाहेब बुटींचें टिळकांना पत्र आलें कीं कांहींतरी जनसेवा हातून घडावी ह्या हेतूनें वेदाचें भाषांतर करण्याचें योजिलें आहे तरी त्या कामीं मला तुमची मदत पाहिजे.

नागपूरला जाण्याचें आमचें ठरलें. तेथें टिळकांनीं 'ऋषि' नांवाचें वेदाभ्यासाचें मासिक काढलें व आप्पासाहेबांचे धाकटे चिरंजीव गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब ह्यांना शिकविण्याचें काम अंगावर घेतलें.

एक दिवस आप्पासाहेब टिळकांना म्हणाले, "टिळक, बापूसाहेबांना तुमच्याच घरीं ठेवावें असें मला वाटतें."

टिळकांनीं आप्पासाहेबांचें म्हणणें ताबडतोब कबूल केलें, परंतु मुलाच्या खाण्याराहण्याबद्दल ते देत असलेले पैसे मात्र त्यांनीं नाकारले. त्यांचें म्हणणें कीं, गुरुगृहीं राहायचें म्हणजे कांहीं खाणावळींत राहायचें नाहीं.

गोपाळराव स्वभावानें अत्यंत गरीब, नम्र व विनोदी होते. त्यांच्या एकट्याच्या वरकड खर्चाला शंभर रुपये त्यांना मिळत, त्यांचें काम करण्यास दोन हुजरे होते. पण बापूसाहेब आमच्या घरीं आले ते एकाद्या गरीब विद्यार्थ्याप्रमाणें आले. त्यांना आपल्या मोठेपणाची घमेंड असल्याचें त्यांनीं एकदांसुद्धां भासूं दिलें नाहीं.

घरांत मी त्याला अरेतुरे म्हणें व तोहि घरांतील कामें निमुटपणें हंसत हंसत करी. त्याच्या घरीं नुसता खर्च मांडण्यास किती तरी कारकून होते. परंतु त्याच्या घरची परिस्थिति कधीं आमच्याहि ध्यानांत येत नसे व त्याच्याहि ध्यानांत येत नसे.

आमच्या घरीं खर्च पुष्कळच होता. जमा मात्र बेताचीच असावयाची. आमच्या घरांतील मालक आम्हीच व हुजरे आम्हीच! धनी आम्ही व कारकूनहि आम्हीच! गोपाळ टिळकांना गुरुजी म्हणे व मला बाई म्हणे. म्हणून दत्तू मला ख्रिस्ती होईपर्यंत बाई म्हणत असे. माधवभाऊजी आमच्याच घरीं होते. त्यांची व गोपाळरावांची गट्टी जमली.

बागेंतील वाळलेला पाचोळा गोळा करून दोघांनीं रोज आपलें स्नानाचें पाणी तापवून घ्यावें व टिळकांचें पाणी तापवून ठेवावें. रात्रीचा शिळा भात ऊन करून ताकाबरोबर खाऊन बाहेर जावें. कधीं कोणीं त्यांना विचारलें, कीं " बापूसाहेब, आज काय होतें जेवायला ? " तर त्यांनीं मोठमोठ्या पक्वान्नांचीं नांवें सांगावीं. त्याला घरांत बापावांचून व भावावांचून कोणी मायेचें नव्हतें. बायको सात वर्षांची व भावजय नऊ वर्षांची होती.

आमचें घर त्याला स्वतःच्या घराप्रमाणें वाटे. तो म्हणे, मला साहेब म्हणायला फार लोक आहेत. पण अरेतुरे म्हणणारें कोणी नाहीं. मीं स्वैंपाक केला कीं त्यानें पानें मांडावीं; नंतर सर्व आवराआवर व झांकपाकहि तोच करी. आमचें दोघांचें त्याच्यावर मनापासून प्रेम होतें.

एक दिवस टिळक बाहेर गेले होते. भाऊजींचा व गोपाळचा एक मित्र त्यांना भेटायला आला होता. तिघां मुलांचीं जेवणीं झालीं. दररोजप्रमाणें त्यांनीं आपलीं सर्व कामें आटोपलीं, आपले बिछाने घातले व मला म्हटलें, " बाई तुमचें आवरून बाहेर या; मग आपण अंगणांत गप्पा मारीत बसूं."

माझें जेवणखाण आटोपून मी बाहेर आलें. तिघेचे तिघे झोंपीं गेले होते. मीं त्यांना हालवून जागें केलें. दोघेजण जागे झाले, पण गोपाळची कांहीं हालचाल दिसेना. मी घाबरून गेलें. ते दोघेहि घाबरून गेले. गोपाळचें अंग गार-थंड

लागूं लागलें. एवढा गोंधळ होत आहे, तों मध्यरात्रींचा सुमार झाला, मी रडूं लागलें, ते दोघे भिटीभिटी पाहूं लागले.

'बाबांनो तुम्ही वाड्यांत जा व ही सर्व हकीकत महाराजांच्या कानांवर घाला.' असें मीं म्हटलें कीं, ते म्हणत 'आम्हांला भीति वाटते.'

माझ्या मनांत एक एक कल्पना येऊं लागल्या! जवळच स्मशान होतें. भुताखेतांचा तर प्रकार नाहीं? मी पुन्हा पुन्हा बापूसाहेबास चांचपून पाहीं, तर तो अ.पला गार लागे!

"अरे मी जातें. तुमच्यापैकीं एकजण इथें बसा व एकजण माझ्याबरोबर चला."

पण त्यालाहि ते कबूल होईनात.

"फाटकाला कुलूप आहे; तुम्ही जाणार कशा?"

"मी जातें. त्याला का असेंच मरूं द्यायचें?"

"तुम्ही गेलां, तर आम्ही दोघांनीं येथें कसा दम धरायचा?"

"तुम्ही दम धरा, नाहीं तर सोडा. मी आतां चाललें."

असें त्यांना निक्षून सांगून मी निघालें. बंगल्यापासून बागेचें फाटक बरेंच दूर होतें. चांदणें टिप्पोर पडलें होतें. मी ओचे–पदर बांधून फाटकावर चढूं लागलें. मनांत नाना विकल्प येत होते. मी वाड्यांत कशी शिरूं? मला चोर म्हणून धरून महाराजांपुढें तर नाहीं ना उभें करणार? तेथें तर संगिनींचा खडा पहारा! मला जर ओळखलें नाहीं, तर माझी काय स्थिति होईल? अशा विचारांनीं डोक्यांत काहूर उठविलें होतें. फाटकावर चढून पलीकडे जाणार, तों बागेंतून कोणीं माझा पाय ओढला. खालीं पाहातें, तों बापूसाहेबांसारखें कांहीं दिसलें! बापूसाहेबांचें भूतच तें! माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. बोबडी वळली! मी मोठ्यानें ओरडलें, 'कोण रे तूं?'

दोघांनीं मला एका झाडाला टेकून बसविलें व एकानें धावत जाऊन पाणी आणलें. मी सावधच होतें, पण माझी बोबडी वळली होती.

बापूसाहेबांनीं माझे पाय घट्ट धरले. "बाई, तुम्ही हें गुरुजींना सांगूं नका.

माझी चूक झाली. तुमची आम्हीं ही थट्टा केली. पुन्हा कध्धीं कध्धीं असें करणार नाहीं."

मी फारच रागावलें होतें.

"हंसा पाहूं बाई! हंसा. त्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाहीं."

मला रडायला आलें व हंसायलाहि आलें. माधवभाऊजी गंभीरपणें म्हणाले,

"माझेंहि मत आहे, कीं तूं नानांजवळ ह्यांपैकीं कांहीं सांगूं नयेस."

"मग तुम्ही मला असाच त्रास देणार का?"

"नाहीं, नाहीं. तुला आतांपासून आम्ही कधींच त्रास देणार नाहीं."

अशा प्रकारें ती गंमत झाली. त्या तिघांचा अगोदरपासून बेत ठरलेला होता. महादेवभाऊजी त्या बेताच्या विरुद्ध होते, पण त्या दोघांपुढें त्यांचें कांहीं चालेना. मात्र त्याचा परिणाम असा होईल अशी आधीं कोणालाच कल्पना नव्हती.

एक दिवस महादेवभाऊजी सांगूं लागले, 'नानांना कनी आज एक चांगलें बक्षीस मिळालें, तें त्यांनीं कोणाला देऊन टाकलें. तूं त्यांना सांगूं नको, मीं हें तुला सांगितलें म्हणून.'

रात्रीं टिळक घरीं आले. मी अंथरुणावर पडलें होतें. भाऊजी अभ्यास करीत होते. मीं मुद्दामच झोंपेचें सोंग घेतलें. मग मी सोंगांतल्या झोंपेंत बरळूं लागलें.

"पैसे दिले म्हणून काय झालें! इकडून आले तिकडून गेले. वळवाचा पाऊस तो! त्याचें पाणी थोडेंच राहात असतें?"

टिळक मला हलवूं लागले.

"अग ऊठ! काय बडबडते आहेस? स्वप्न का पडतें आहे तुला?"

भाऊजी, गोपाळ जवळच बसले होते. खालीं पाहून ते हंसत होते. मग मी खोटी खोटी जागी झालें.

"स्वप्न पडत होतें का तुला?"

"हो. तुम्हांला जसे कांहीं पैसे मिळाले नि ते तुम्हीं दुसऱ्याला देऊन टाकले."

"मोठें नवल आहे बोवा. खरोखरच मीं एकाला पैसे दिले आज."

एक दिवस बापूसाहेब म्हणाले, 'बाई, आज कांहीं तरी खाऊ पाहिजे.'

टिळक जवळच बसले होते. मीं त्याला चार आणे दिले व त्यानें बाजारांत जाऊन दोन खरबुजें आणलीं.

खरबुजें पाहून मीं म्हटलें, ‘खरेंच आपल्याला हळदीकुंकूं करायला पाहिजे.’

टिळक म्हणाले, “काय मूर्ख आहेस! हळदीकुंकूं करणें म्हणजे निव्वळ प्रदर्शन आहे. आपली कला दाखवायला तुजपाशीं काय आहे? आहे का कांहीं?”

“नसलें म्हणून काय झालें? गोरी असेल तरच काजळ घालावयाचें कीं काय?”

मध्येंच गोपाळ म्हणाला,

“बाई, आज मला वाड्यांत जेवायला जायचें आहे.”

आमचें हळदीकुंकवाचें बोलणें तेवढ्यावरच राहिलें. गोपाळ त्या दिवशीं जो वाड्यांत गेला, तो दिवसभर तिकडेच राहिला. रात्रीं निजायला घरीं आला.

दुसऱ्या दिवशीं नियमाप्रमाणें जो तो आपापल्या उद्योगाला लागला. टिळक एक बाजूला जाऊन लिहीत बसले, मला चुलत सासूचा धाक होता; मी तिचें डोकें धरून बसलें. इतक्यांत दारापुढें दोन तीन गाड्या आल्या. मला वाटलें, बंगल्यांत आणखी कोणी राहाण्यास आलें. गाडींतलीं मोठमोठालीं भांडीं स्वैंपाकघरांत येऊन पडूं लागलीं. सामानसुमान व लाकडें ह्यांचा पडवींत ढीग पडला, मी तर आश्चर्यचकित झालें. आचारी, पाणके ह्यांची सारखी धावपळ चालू झाली. बंगल्यांत ठाक–ठोक असा आवाज येऊं लागला. इकडे टिळक, महादेवभाऊजी, गोपाळ ही मंडळी आपापल्या कामांत चूर होती.

मी स्वयंपाकघरांतून बंगल्यांत व बंगल्यांतून स्वैंपाकघरांत करीत होतें. मीं म्हटलें ‘आपण उगीचच येथें राहायला आलों. घराचें आपण भाडें देत नाहीं. महाराज त्याचे मालक ते वाटेल तें करणार! आम्हांला काय वाटेल ह्याची त्यांना थोडीच पर्वा असणार? हें वनभोजन आहे कीं काय? स्वैंपाक तरी कसा करायचा ह्या गोंधळांत? आतां जेवायला मंडळी आली-म्हणजे त्यांना वाढायचें तरी काय व कसें!’ मी इकडे जेवणाच्या काळजींत चूर, तर तिकडे दहाबारा पानांचा स्वैंपाक तयारहि झाला! वाढप्यानें पानें वाढलीं; जेवणाची तयारी

झाली. मी अगदीं चकित झालें. जेवण्याला माणसें जमलीं. मलाहि जेवायला बोलाविलें! मी म्हणालें, ' मी येत नाहीं, माझीं माणसें अजून जेवलीं नाहींत नि मी कशी जेवायला बसूं? ' मला अन्नाला नाहीं म्हणणें पाप वाटे; पण माझी मोठी चमत्कारिक स्थिति झाली. त्यांना मीं म्हटलें, ' माझ्या स्वैंपाकघरांत तुम्हीं सारा गोंधळ घातलांत. बापूसाहेब वाड्यांत गेले कीं काय आज? '

त्यावर ते म्हणाले, ' बाईसाहेब, बापूसाहेबच जेवायला बोलावीत आहेत! मग मात्र मी खरोखरच रागावलें, त्यांतल्या त्यांत मला टिळकांचा अधिक राग आला. मीं त्यांना चक्क सांगितलें, " मी जेवायला येत नाहीं असें सांगा त्यांना."

पण गोपाळ स्वतःच आला, त्यानें माझा हात धरला. मीं तो हिसकावून टाकला.

" बाई, माझें ऐका तर खरें. मग माझ्यावर खुशाल रागवा."

असें म्हणून त्यानें मला बंगल्यांत नेलें. आंत जाऊन पाहतें, तों अर्धा अधिक गौर मांडलेली! ती गौरीची आरास पाहून मी अगदीं थक्कच झालें! माझे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. मला बापूसाहेबांशीं कांहींच बोलवेना. माझा त्यांच्यावरील सर्व राग लयास गेला!

टिळक जेवायला आले. त्यांना वाटलें, कीं आज वाड्यांतील कोणी पाहुणे मंडळी वनभोजनास येणार असावी. म्हणजे कोणासच कशाचा पत्ता नव्हता. जेवण झाल्यावर टिळक बंगल्याच्या दिवाणखान्यांत जातात, तों तेथें गौर मांडलेली!

झालें. टिळक संतापले माझ्यावर!

" तुझाच अट्टाहास हा. तूं फार अविचारी आहेस. हा जबाबदारीचा माल आपल्याला कशाला पाहिजे? हें सोनें, रुपें, हिरे, माणकें—हरवलें तर त्याबद्दल कोण जबाबदार राहणार? "

" कोण म्हणजे? ज्यानें आणलें तो! "

" पहा बुवा, मला तरी हें बिलकूल पसंत नाहीं. "

असें म्हणून टिळक पुन्हा कोठें निघून गेले.

गौरीची आरास इतकी सुंदर होती, कीं मीं उभ्या जन्मांत अशी आरास

पाहिली नव्हती व पुढेंहि कधीं पाहीन असें वाटत नाहीं. दुपारीं दोनच्या सुमारास बापूसाहेबांची भावजय, बायको व एक दासी गाडींतून उतरल्या. दालनाभोंवतीं वाळ्याच्या झडपा घालून त्यांवर पाणी सोडण्याची व्यवस्था केली होती. गौरीपुढें चांदीच्या समया, पुढें मोठमोठीं चांदीचीं ताटें, ताटांत फराळाचें सामान भरलेलें, एका बाजूला हळदीकुंकवाची सर्व तयारी केलेली, अत्तर-गुलाब, पान-सुपारी, खिरापत वगैरे सर्व व्यवस्था न सांगतां लागलेली. मुली आल्या त्या ह्याच तयारीनें आल्या होत्या. त्यांनीं हळदकुंकूं दिलें. मीं खिरापत वांटली. त्या दोघी अगदीं सुनांप्रमाणें वागत होत्या.

हळदीकुंकवाचा समारंभ झाला. मी घरांत जातें, तों पुन्हा पानें मांडलेलीं! हळुहळू टिळकांची स्नेही मंडळी जमूं लागली. महाराज आले. जेवणाचा थाट अगदीं श्रीमंती होता. चटण्या, कोशिंबिरी, चार भाज्या, श्रीखंड-पुरी वगैरे चाऱ्ही ठाव बेत होता. महाराज म्हणाले, " टिळक, आज तुमच्या घरीं तुमच्या पंक्तीचा लाभ झाला म्हणून आनंद वाटतो. "

टिळक नुसते हंसले.

गोपाळ बुटीला आमचें घर अगदीं आपल्या घराहूनहि अधिक वाटे. घरांत महादेवभाऊजी व बापूसाहेब जेवायला बसले आणि तितक्यांत बाहेर कोणी ओळखीचें आलें म्हणजे त्यांनीं मला मोठमोठ्या पक्वान्नांचीं नांवें घेऊन वाढण्यास सांगावें. श्रीखंड म्हणजे बेसन, बासुंदी म्हणजे आंबट वरण, पुऱ्या म्हणजे पोळया, साखरभात म्हणजे फोडणीचा भात, अशी आमची सांकेतिक भाषा ठरली होती. कोणी आलें, कीं त्यानें म्हणावें, " बाई, एकच भाजी चार ठिकाणीं वाढा. माझ्या मित्रमंडळीला तुम्ही जेवणाचा आग्रह करा व मी म्हणेन, वाड्यांत महाराज वाट पहात असतील, ते रागावतील. " अशा रीतीनें तो ह्या मित्र-मंडळीची बोळवण करी व आपल्या घरांतील राहाणीबद्दल चांगली कल्पना करून ती मंडळी जात.

हळदीकुंकवाच्या दिवशीं महाराजांच्या हें लक्षांत आलें, शिवाय टिळकांची दानप्रवृत्ति त्यांना ऐकून ठाऊक होती. टिळकांनीं आपल्याकडे रोजच्या रोज

यावें असें त्यांना वाटे. तेव्हां त्यांनीं पगार घरीं हातांत पडून टिळकांच्याहि हातांत पैसा राहावा व त्यांनीं रोजच्या रोज आपल्याला भेटावें म्हणून एक युक्ति योजली. ते म्हणाले, टिळक, तुम्ही माझ्याकडे येऊन रोज दोन रुपये घेऊन जात जा. मात्र ते मी दुसऱ्या कोणाला देणार नाहीं; तुम्ही स्वतःच आलें पाहिजे.''

टिळकांनीं तें नाकारलें व ते नेहमींप्रमाणें राहूं लागले.

* * *

तशा नागपूर राजनांदगांवच्या आम्हीं दोनदां वाऱ्या केल्या होत्या. एकदां टिळकांनीं संगमनेर सोडतांच व्यापार करण्याचें ठरवून नागपुरास फटाकड्यांचें दुकान मांडून सर्व फटाकडे बालमित्रांबरोबर उडवून टाकले तेव्हां, व नंतर वणीचा संसार गुंडाळून श्रीमंत आप्पासाहेब बुटींचें निमंत्रण स्वीकारून वेद-सेवा करण्यास आलों तेव्हां.

ह्या पहिल्या वारींतील कांहीं प्रसंग येथें दिले आहेत. कांहीं दिवस नागपुरास काढून आम्ही राजनांदगांवला गेलों होतों.

राजनांदगांवीं टिळकांच्या मनानें घेतलें कीं आपल्या पत्नीला लिहायला वाचायला शिकवायचें. टिळकांना लहान मुलांना चांगलें शिकवितां येत असलें, तरी माझ्या बाबतींत तें अगदीं निराळेंच ठरलें. एक तर मी लहान नव्हतें. दुसरें मी बायको होतें. तिसरें मला हसूं फार येत असे. त्या हसण्यानें माझ्या शिक्षणांतहि दगा दिला.

मला शिकण्याचें ठरविल्यावर टिळकांनीं पहिलीपासून सहावीपर्यंतचीं पुस्तकें—जवळ होते नव्हते तितके सर्व पैसे खर्च करून—एक दिवस खरेदी करून आणलीं! एका बाजूला टिळक बसले. पलीकडे मी बसलें. मध्यें पुस्तकांचा ढीग घातला व आमच्या अभ्यासाला सुरुवात झाली.

व्याकरणापासून सुरुवात.

टिळक म्हणाले, 'शब्द म्हणजे काय?'

मला सपाटून हसूं लोटलें. हा कसला बाई चमत्कारिक प्रश्न? शब्द म्हणजे शब्द!

“ शब्द म्हणजे शब्द. ” मीं उत्तर केलें.

“ पण शब्द म्हणजे काय ? ”

“ शब्द म्हणजे शब्द ! ”

“ पण शब्द म्हणजे काय ? ”

पुन्हा माझें आपलें ‘ शब्द म्हणजे शब्द ’ ठरलेलेंच. झालें! टिळक खूप संतापले. ते संतापत तसतशी मी हसूं लागें. तसतसे ते आणखी संतापत.

शेवटीं संतापाग्नीनें व माझ्या हास्याच्या वायूनें मोठा भडका उडाला. तो भडका होतांच पुस्तकांचा भडका उडाला ! टिळकांनीं सारीं पुस्तकें टराटर फाडून टाकलीं व त्या चिंध्यांच्या ढिगाऱ्याला काडी पेटवून लावून दिली !

हा आमचा पहिल्या दिवसाचा ‘ अभ्यास. ’ एका आठ दिवसांच्या आंत आपल्या बायकोनें आपल्यासारखें व्हावें असें टिळकांना वाटे व मी पडलें मठ्ठांतली मठ्ठ. तेव्हां तें व्हावयाचें कसें !

पण हळू हळू त्यांना आपली चूक कळून आली व त्यांनीं मला अ पासून ज्ञ पर्यंत अक्षरें वळविण्यास दिलीं. तीं झाल्यावर क ची बाराखडी करून घेतली. पण हें शिक्षण देत बसण्यांत त्यांना कांहींच गंमत वाटेना व माझें शिक्षण तेथेंच आटोपलें ! मात्र ह्यापुढें माझें वाचन पुष्कळ वाढलें व त्या वाचनांतच बाकीच्या बाराखड्या व जोडाक्षरें मला आपोआप आलीं. पण क्ष, ज्ञ, कै, खै वगैरे मंडळी अजून माझी एखाद वेळेस फजिती करतात.

* * *

त्याच वारींतील आणखी एक दोन गोष्टी आठवतात.

एक दिवस जलालपुराहून पत्र आलें कीं गोविंदरावमामांना देवाज्ञा झाली !

पत्र वाचून आम्हां दोघांना फारच वाईट वाटलें. आम्हीं ताबडतोब राजनांदगांव सोडलें. जलालपुरास मला आणून पोचविल्यावर टिळक परत राजनांदगांवीं गेले.

पण राजनांदगांवीं दोनतीन महिने त्यांनीं कसेबसे काढले व नंतर राजनांदगांव सोडून ते नागपुरास आले.

जलालपुरांत तीन चार महिन्यांनीं टिळकांची तार आली, " मी फार आजारी आहें, ताबडतोब निघून यावें. "

आत्याबाई फार घाबरून गेली. ती आधींच दुःखानें पोळलेली होती. घरांत पैसा अडका कांहीं नव्हता. पुरुष माणूस कोणी नाहीं. नागपूर किती तरी दूर. तिनें शेतसाऱ्यासाठीं पन्नास रुपये भिंतींत पुरून ठेवले होते तेच घेऊन जाण्या-शिवाय आतां गत्यंतर नव्हतें. सकाळपासून साऱ्याचे पैसे वसूल करण्यास कुलकर्णी येऊन बसले होते व तारहि त्यांनींच वाचून आणविली होती. पैसे तर तेवढेच होते. शेवटीं आत्याबाई कुळकर्ण्यांशीं बोलत बसली व मला हळूच तिनें भिंतींत पुरून ठेवलेली रुपयांची डबी काढून बाजूस ठेवण्यास सांगितलें. मी घाबरलें होतें; गुपचुप काढायला सांगितलेल्या पैशांचा गाजावाजा झालाच. डबीचें झांकण निघालें. सगळे रुपये खणाखणा खालीं पडले. कुळकर्ण्यांना हें सगळें दिसत होतें व ऐकूंहि येत होतें; पण जणूं कांहीं कांहींच घडलें नाहीं अशा रीतीनें ते बसून राहिले. गंगेला पाणी चढत होतें तरी त्याच कुळकर्ण्यांनीं आम्हांला व आमच्या रुपयांना सुरक्षितपणें गंगापूरला नेऊन पोचविलें व तेथून आम्हीं बैलगाडी करून स्टेशन गांठलें.

जलालपुरास माझ्या लहानपणीं पाटील-कुळकर्णी हे पैसे उकळणारे सरकारी पठाण कोणाला वाटत नसत. सगळे एकमेकांच्या गरजेला जागत. कोणाचें वेगळें असें कांहीं गुपित नसे. सर्वांच्या अडचणी सर्वांपुढें असत व सर्वजण दुसऱ्याच्या साह्याला धावून जात.

शहरांतील लोकांची दृष्टि अधिक व्यापक बनते असें म्हणतात. पण माझें मत थोडें निराळें आहे. खेड्याची राहणी फारच मजेची. सर्व गांव एक मोठें कुटुंबच बनतें. प्रत्येक माणसाला गांवांतील प्रत्येकाबद्दल कुतूहल व काळजी-कळकळ वाटते. एकमेकांबद्दल आत्यंतिक सहानुभूति वाटत असल्यानें जातिभेद तेथें भासमान होत नाहीं. वरिष्ठ जातींच्या सोंवळ्या-ओंवळ्यामुळें कनिष्ठ जातींचा अपमान होत नाहीं कीं कनिष्ठ जातींबद्दल वरिष्ठ जातीच्यांना तुच्छपणा वाटत नाहीं. जातिभेदामुळें ह्या ग्रामकुटुंबांत कधींच आदळ-आपट होतांना

दिसत नाहीं. अडी-अडचणी, रोग-संकटें व एकमेकांचीं सुख-दुःखे ह्यांत ते एकमेकांचे वाटाडी बनतात. निदान माझा तरी तसा अनुभव आहे. आज तशी स्थिति नसेल कदाचित्. मी हें तीस-पस्तीस वर्षांपूर्वीचें लिहीत आहें. आज खेडीं हीं आगगाड्या-मोटारींनीं शहरांचीं अंगणें ओसऱ्या बनविलीं आहेत.

नागपुरास गेल्यावर टिळकांचें बिऱ्हाड कसें सांपडेल, आपल्याला कोण पोचवील, वगैरे काळजी नाशिक सोडल्यापासून मला लागली होती. पण नागपुरास पोचतांच तेथें टिळकांची स्नेही मंडळी आम्हांला उतरून घेण्याकरतां आली होती. त्यांना परस्पर कोणीं तार पाठविली होती.

आम्हांला घरीं पोचविलें, परंतु टिळकांचा पत्ता नव्हता! ते बरे असून व्याख्यानें देत आहेत व चळवळींत भाग घेत आहेत वगैरे ऐकून आम्हांला आनंद वाटला. विशेषतः त्यांना तापबीप कांहींच आला नव्हता, हें ऐकून आम्हांला फार संतोष झाला. रागहि आला, पण तो तेवढ्यापुरताच.

त्या दिवशीं श्रावणी सोमवार होता. टिळकांची मित्रमंडळी त्यांना भेटली. आज एका म्हाताऱ्या बाईला ब्राह्मण पाहिजे, तुम्ही जातां का, असें त्यांना त्यांच्या मित्रमंडळीनें विचारलें. टिळक कबूल झाले.

दिवेलावणीच्या वेळीं टिळकांना घेऊन त्यांची मित्रमंडळी आली. टिळकांना म्हातारी दिसली व ते चमकले. ही तर आपली सासू!

"तुम्ही आलां? हें घर कोणाचें?"

आत्याबाईनें टिळकांच्या मित्रमंडळीकडे बोट दाखविलें. मित्रमंडळी खो खो करून हसूं लागली!

टिळक म्हणाले, 'थँक यू!'

टिळकांच्या मित्रमंडळीनें त्यांची ही गंमत केली होती. घर घेऊन, सर्व संसार मांडून व धान्यधून्य भरून, आम्हांला बोलावून मग त्यांनीं टिळकांना अशा रीतीनें चकित केलें होतें.

दोन चार दिवसांनीं मामंजी तेथें आले. आतां मात्र आमच्या संसारांत पुष्कळच जिवंतपणा आला. मामंजी तशा स्वभावाचे व आत्याबाई अशा स्वभावाची.

आत्याबाई मोठी सुग्रण होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या स्वैंपाकाला कोणीं नांवें ठेवलेलीं तिला कधीं खपत नसत. मामंजींनाहि आपल्या स्वैंपाकाचा मोठा अभिमान. विशेषतः देशावरचा स्वैंपाक व कोकणी स्वैंपाक ह्यांची ते नेहमीं तुलना करीत. वाढावयाचें काम माझें. बाहेर येऊन वाढून गेलें कीं माझ्या व आत्याबाईंच्या कानांवर पडेल अशा तऱ्हेनें त्यांनीं कांहीं टीका करावी. तिकडे आंत गेलें कीं आत्याबाईंनीं तुझा सासरा माझ्या स्वैंपाकाला नांवें कां ठेवतो म्हणून रागवावें. माझी मात्र मृदंगासारखी स्थिति झाली होती! एक थप्पड मामंजींची कीं लगेच दुसऱ्या बाजूनें दुसरी थप्पड आत्याबाईंची.

असो. कांहीं दिवसांनीं हीं दोघेंहि आपापल्या गांवीं निघून गेलीं.

* * *

टिळकांचें दातृत्व कमालीचें होतें! शिवाय पैशाची त्यांना कधींच किंमत वाटली नाहीं. पैसा असला तर त्यांना जेवढा आनंद वाटायला पाहिजे तेवढाच नसला तरीहि वाटत असे. मी तर त्यांना उलट असें म्हणायची कीं 'तुम्ही पैसा असला म्हणजे तो जाईल कसा ह्याच्या काळजींत असतां.' तो राहील कसा ह्या काळजींत मी असायची. पैसा घालविणें सोपें असल्यामुळें ह्या लढाईंत नेहमीं त्यांचाच विजय होत असे. शिवाय त्यांना कर्जहि देण्यास लोक नेहमीं तयार असत! तेव्हां मजजवळ पैसा ठरणें शक्यच नसे. कारण कर्ज करावें त्यांनीं व फेडावें मीं हेंहि चाललेलेंच असे.

असो. नागपूरचीच गोष्ट. एक दिवस घरांत कांहीं नव्हतें. मजजवळ एकुलता एक रुपया राहिला होता.

"बाजारांत जातां का?"

"हो जातों. तुझे पैसे, आम्हांला काय नोकर माणसांना!"

ह्यावर थोडासा प्रेमाचा वादविवाद होऊन शेवटीं मीं तांदूळ आणण्यास सांगून त्यांची रवानगी केली. ते गेल्यावर मी वाट पाहात बसलें. पण नेहमीं-प्रमाणें उशीर न करतां ते ताबडतोब परत आले. हसत हसतच आले. पण हातांत तांदळाचें गांठोडें दिसत नव्हतें.

मला फार राग आला. पण असें नेहमींच होत असे. मी रागावलें म्हणजे ते मला जिजाई म्हणत व स्वतःला तुकारामबुवा म्हणत. त्यांनीं खिशांतून एक सुंदरशी काचेची दौत काढून मजपुढें ठेवली.

"पाहिलीस! किती सुंदर दौत आहे ती!"

"आतां काय ही दौत शिजत घालूं? काय करावं आतां?"

टिळकांनीं दौत उचलून सरळ माडीचा रस्ता धरला व वरच्या खिडकींतून ती नीट रस्त्यांत फेकून दिली व वरून ओरडून मला सांगितलें, "तुला मानसशास्त्र समजत नाहीं."

खरोखरच मला मानसशास्त्र समजत नव्हतें व अजूनहि कळत नाहीं. मला वाटतें, जिजाबाईलाहि तें कळलें नसेल व सॉक्रेटीसच्या बायकोलाहि कळलें नसेल. पण त्या जर आपल्या आयुष्याच्या गोष्टी लिहून ठेवल्या तर त्यांच्या संसारांतील अडचणी लोकांच्या ध्यानांत आल्या असत्या. त्यांना दुसऱ्यांच्या मनाविषयीं कांहीं कळत नसलें तरी आपल्या स्वतःच्या मनांत काय काय चलबिचल होत आहे, हें त्यांना चांगलें कळत असलें पाहिजे.

टिळकांना वाटे, ही एवढी संसारांत लक्ष कां घालते? मला वाटे, टिळक संसारांत लक्ष घालीत नाहींत म्हणून मला घालणें भाग आहे. दोघेंच्या दोघें विरक्त बनलों, तर दोघांनाहि उपास घडायचे! भाजीपाल्याची नेहमीं अडचण पडे. ब्राह्मणांच्या बायका त्या वेळीं स्वतः बाजारांत जात नसत. तेव्हां मी वडे पापड, लोणचीं वगैरे नेहमीं करून ठेवीं. एकदां बोरकूट करून ठेवण्यासाठीं बोरें आणविलीं व तीं वर गच्चीवर वाळत टाकलीं.

"हें काय केलेंस?"

"बोरकूट करण्यासाठीं बोरें वाळत घातलीं." मी एवढी संसारांत गुरफटून जातें, म्हणून टिळकांना माझा फार राग आला व त्यांनीं गच्चीवरून बोरें फेकण्यास सुरवात केली. खालीं मुलें मजेंत बोरें वेंचून खात होतीं. मला रडायला येत होतें व हंसायलाहि येत होतें. त्याच सुमाराला मी आजारी पडलें. त्या वेळीं टिळकांनीं माझी आईप्रमाणें शुश्रूषा केली. एक महिनाभर मला

नुसत्या संत्र्यांवर ठेवलें होतें. एक दिवस ते म्हणाले, “ मी तुला सांजा करून देतों. ” मी म्हटलें, “ तुम्हांला सांजा करतां येणार नाहीं. मला सांजा नको. ” रागावले टिळक. “ कां म्हणून सांजा करतां येणार नाहीं ? मी का माणूस नाहीं ? का मला अक्कल नाहीं ? ” मी म्हणालें. “ अक्कल पुष्कळ आहे हो, पण सांजा करतां येणार नाहीं. ”

पण त्यांनीं हट्टानें सांजा तयार करण्यास घेतला. चूल पेटली. सांजा करण्यास आरंभ झाला. पण सांजा कांहीं शिजेना. साखर घातली, जाळ कमी केला, पण कांहीं उपयोग होईना. शेवटीं ते हळूच मजकडे आले व म्हणाले, “ काय बुवा, सांजा कांहीं होत नाहीं. ” आम्ही दोघेंहि हसलों व मीं म्हटलें, “ ज्याचें काम त्यानेंच करावें. ”

* * *

नागपुरास आम्ही पुन्हा बुटींच्या बागेंत राहूं लागलों. तेव्हां टिळकांनीं एका मोठ्या कादंबरीलेखनाला आरंभ केला. ती कधीं पुरी झाली नाहीं ! जसजशी ते ती लिहीत, तसतशी ती छापूनहि आणीत ! तिचें नांव आठवत नाहीं. मात्र बऱ्याचशा छापील कागदांनीं आमची एक खोली कित्येक वर्षें अडवून ठेवली होती, त्यावरून ती कादंबरी माझ्या चांगली ध्यानांत राहिली आहे.

ह्याच सुमारास वीरकन्या नांवाची एक लहानशी कादंबरी, तीन विधवा नांवाची आणखी एक कादंबरी, एका फुलाचा इतिहास ( वनवासी फूल ) व काव्यकुसुमांजलि हीं छापलीं.

अप्पासाहेब बुटींच्या घरीं एक साधु आले होते. टिळकांचा पुष्कळ वेळ ह्या साधूंच्या सांनिध्यांत जाऊं लागला व त्यांच्यावर त्यांनीं कांहीं कविताहि केल्या होत्या.

आधींच उल्हास अशी स्थिति झाली. संसाराकडे त्यांचें लक्ष अगदीं पहिल्या-पासून जेमतेमच. त्यांत आतां अभ्यास, वाचन, वादविवाद ह्यांना पूरच आलेला, व भोंवतालीं माणसेंहि पुष्कळ. तेव्हां त्यांना घराची आठवण राहूं नये

ह्यांत नवल नाहीं.

अप्पासाहेबांच्या वाड्यांत धार्मिक चर्चा चालत व पुष्कळ पुस्तकेंहि होतीं. नवीन कांहीं लागलीं, कीं अप्पासाहेब तीं चटकन् मागवून देत. अशा रीतीनें टिळकांचे दिवसाचे चोवीस तास वाचन-विचारांत जाऊं लागले.

टिळकांना भय असें कोणाचेंच कधीं वाटत नसे. जर कांहीं भय त्यांच्या हृदयांत असेल, तर तें देवाचें व त्याच्या खालोखाल माझें !

एकदां त्यांच्यावर स्वैंपाक करण्याची पाळी आली. दत्तू तेव्हां नुकताच भात खाऊं लागला होता. टिळकांनीं स्नान वगैरे उरकून चुलीवर डाळ शिजत टाकली व कपडे चढविले.

'डाळ शिजेपर्यंत आतां मी जाऊन येतों.' असें सांगून ते बाहेर पडले. मी म्हणत होतें, 'जेवणीं झाल्यावर बाहेर जा;' पण त्यांनीं ऐकलें नाहीं.

इकडे डाळ शिजली, जळाली व शेवटीं तिचे कोळसे झाले ! पण टिळकांचा पत्ता नाहीं. दत्तू भुकेनें अगदीं व्याकुळ झाला. गांव बराच दूर. जवळ एक पैसा नाहीं. बारा वाजून गेले. दत्तूला संभाळायला एक तेल्याचा मुलगा ठेवला होता. त्याच्याकडून तीन दगड मांडून मीं भात करवून घेतला व त्याच्याकडून दत्तूला जेवूं घातलें.

मी उपाशीच होतें. डोळ्यांतून पाणी गाळणें हेंच माझें समाधान होतें व तेंच माझ्या हातीं होतें. चार वाजून गेले तरी टिळक आले नाहींत. बागेंत प्रेमा नांवाची एक महारीण होती. तिला हें कळलें, तेव्हां तिनें बागेंतून कांहीं फळें आणून तीं मला आग्रह करून खाऊं घातलीं. "काय करूं बाई ! तुम्हांला आमच्या हातचें चालत नाहीं. नाहीं तर मुलाला मीं जेवूं घातलें असतें." किती प्रेमळपणा हा. पण आम्हांला खरोखरच तिच्या हातचें चालत नव्हतें !

रात्र झाली. त्या मुलानें पुन्हा भात करून दत्तूला जेवूं घालून निजविलें.

रात्रीं नवाच्या सुमारास भिकाजीपंत शिष्टाई करायला आले. येतांना बरोबर बेसनाचे लाडू व चिवडा त्यांनीं आणला होता. घरांत दिवा मिणमिण जळत होता. एका कोपऱ्याला मी निजलें होतें व दुसऱ्या कोपऱ्याला दत्तू

नुसत्या संत्र्यांवर ठेवलें होतें. एक दिवस ते म्हणाले, " मी तुला सांजा करून देतों." मी म्हटलें, " तुम्हांला सांजा करतां येणार नाहीं. मला सांजा नको." रागावले टिळक. " कां म्हणून सांजा करतां येणार नाहीं ? मी का माणूस नाहीं ? का मला अक्कल नाहीं ?" मी म्हणालें. " अक्कल पुष्कळ आहे हो, पण सांजा करतां येणार नाहीं."

पण त्यांनीं हट्टानें सांजा तयार करण्यास घेतला. चूल पेटली. सांजा करण्यास आरंभ झाला. पण सांजा कांहीं शिजेना. साखर घातली, जाळ कमी केला, पण कांहीं उपयोग होईना. शेवटीं ते हळूच मजकडे आले व म्हणाले, " काय बुवा, सांजा कांहीं होत नाहीं." आम्ही दोघेंहि हसलों व मीं म्हटलें, " ज्याचें काम त्यानेंच करावें."

*　　*　　*

नागपुरास आम्ही पुन्हा बुटींच्या बागेंत राहूं लागलों. तेव्हां टिळकांनीं एका मोठ्या कादंबरीलेखनाला आरंभ केला. ती कधीं पुरी झाली नाहीं! जसजशी ते ती लिहीत, तसतशी ती छापूनहि आणीत! तिचें नांव आठवत नाहीं. मात्र बऱ्याचशा छापलि कागदांनीं आमची एक खोली कित्येक वर्षें अडवून ठेवली होती, त्यावरून ती कादंबरी माझ्या चांगली ध्यानांत राहिली आहे.

ह्याच सुमारास वीरकन्या नांवाची एक लहानशी कादंबरी, तीन विधवा नांवाची आणखी एक कादंबरी, एका फुलाचा इतिहास (वनवासी फूल) व काव्यकुसुमांजलि हीं छापलीं.

अप्पासाहेब बुटींच्या घरीं एक साधु आले होते. टिळकांचा पुष्कळ वेळ ह्या साधूंच्या सांनिध्यांत जाऊं लागला व त्यांच्यावर त्यांनीं कांहीं कविताहि केल्या होत्या.

आधींच उल्हास अशी स्थिति झाली. संसाराकडे त्यांचें लक्ष अगदीं पहिल्या-पासून जेमतेमच. त्यांत आतां अभ्यास, वाचन, वादविवाद ह्यांना पूरच आलेला, व भोंवतालीं माणसेंहि पुष्कळ. तेव्हां त्यांना घराची आठवण राहूं नये

ह्यांत नवल नाहीं.

अप्पासाहेबांच्या वाड्यांत धार्मिक चर्चा चालत व पुष्कळ पुस्तकेंहि होतीं. नवीन कांहीं लागलीं, कीं अप्पासाहेब तीं चटकन् मागवून देत. अशा रीतीनें टिळकांचे दिवसाचे चोवीस तास वाचन-विचारांत जाऊं लागले.

टिळकांना भय असें कोणाचेंच कधीं वाटत नसे. जर कांहीं भय त्यांच्या हृदयांत असेल, तर तें देवाचें व त्याच्या खालोखाल माझें !

एकदां त्यांच्यावर स्वैंपाक करण्याची पाळी आली. दत्तू तेव्हां नुकताच भात खाऊं लागला होता. टिळकांनीं स्नान वगैरे उरकून चुलीवर डाळ शिजत टाकली व कपडे चढविले.

'डाळ शिजेपर्यंत आतां मी जाऊन येतों.' असें सांगून ते बाहेर पडले. मी म्हणत होतें, 'जेवणीं झाल्यावर बाहेर जा;' पण त्यांनीं ऐकलें नाहीं.

इकडे डाळ शिजली, जळाली व शेवटीं तिचे कोळसे झाले ! पण टिळकांचा पत्ता नाहीं. दत्तू भुकेनें अगदीं व्याकुळ झाला. गांव बराच दूर. जवळ एक पैसा नाहीं. बारा वाजून गेले. दत्तूला संभाळायला एक तेल्याचा मुलगा ठेवला होता. त्याच्याकडून तीन दगड मांडून मीं भात करवून घेतला व त्याच्याकडून दत्तूला जेवूं घातलें.

मी उपाशीच होतें. डोळ्यांतून पाणी गाळणें हेंच माझें समाधान होतें व तेंच माझ्या हातीं होतें. चार वाजून गेले तरी टिळक आले नाहींत. बागेंत प्रेमा नांवाची एक महारीण होती. तिला हें कळलें, तेव्हां तिनें बागेंतून कांहीं फळें आणून तीं मला आग्रह करून खाऊं घातलीं. "काय करूं बाई ! तुम्हांला आमच्या हातचें चालत नाहीं. नाहीं तर मुलाला मीं जेवूं घातलें असतें." किती प्रेमळपणा हा. पण आम्हांला खरोखरच तिच्या हातचें चालत नव्हतें !

रात्र झाली. त्या मुलानें पुन्हा भात करून दत्तूला जेवूं घालून निजविलें.

रात्रीं नवाच्या सुमारास भिकाजीपंत शिष्टाई करायला आले. येतांना बरोबर बेसनाचे लाडू व चिवडा त्यांनीं आणला होता. घरांत दिवा मिणमिण जळत होता. एका कोपऱ्याला मी निजलें होतें व दुसऱ्या कोपऱ्याला दत्तू

निजला होता. भिकाजीपंतांनीं दार उघडलें, तेव्हां मी फारच संतापलें.

"एवढ्या रात्रीं कां आलां ?"

"खरेंच सांगूं का वहिनी ? नाना आले आहेत हंसापुरींत. त्यांना मला सांगितलें, कीं दत्तू नि तुम्ही भुकेले असाल. म्हणून मला हे खाण्याचे पदार्थ घेऊन त्यांनीं पाठविलें आहे. ते मागून जेवून येतील. त्यांना तुमचें भय वाटतें !"

ह्यानंतर पुष्कळ उशिरां टिळक घरीं आले. कांहीं दिवसांनीं धार्मिक मतांवरून किंवा दुसऱ्या कांहीं कारणांवरून टिळकांचें व आप्पासाहेबांचें बिनसलें असावें. निदान धार्मिक बाबतींत त्यांचें मन येथूनच अस्वस्थ होऊं लागलें होतें असें वाटतें. ह्याच वेळीं बापूसाहेब रामटेकला हवा बदलण्यास गेले. टिळकांनींहि त्यांच्याबरोबर जावें अशी त्यांची इच्छा होती. परंतु तें टिळकांना नको होतें. ते गेले नाहींत. नंतर जवळजवळ एक महिना टिळक कोठें नाहींसे झाले. मजजवळ एक पैसा नव्हता. जवळ एक कामदार, एक माकड, मी, मुलगा एवढा संसार मला चालवावयाचा. खायला घरांत दाणे नाहींत, जवळपास शेजारपाजार नाहीं, बागेंत काड्याकुड्या गोळा करून त्यांचें सर्पण वापरावें. कामाला ठेवलेला मुलगा गांवांत जाऊन मजुरी करी व तीवर आपलें व माकडाचें चालवी.

अशा स्थितींत दिवस कंठीत असतां, घरांत आड बाजूला पडलेली दोन शेर ज्वारी एक दिवस मला सांपडली. ही ज्वारी पाहून मला इतका कांहीं आनंद झाला, कीं मला वाटतें तसा आनंद फारच थोड्या लोकांना झाला असेल. त्या ज्वारीच्या कण्या भरडून मी त्या ताकाबरोबर खाऊं लागलें. बागेंतील मिरच्यांची खमंग भाजी तोंडीं लावायला होई. दोन शेर दुधाचा रतीब होता. पैशाच्या साळीच्या लाह्या आणून ठेवायच्या व त्या थोडथोड्या दुधांत भिजवून दत्तूला खाऊं घालायच्या, असा आमचा संसार सुरू झाला.

माझा असा बाणा होता, कीं कांहीं झालें, कितीहि हाल सोसावे लागले, तरी माहेरीं म्हणून जायचें नाहीं. त्याप्रमाणें मीं नागपूर सोडलें नाहीं; कीं

माहेरीं कळविलें नाहीं.

एक दिवस दत्तूनें भातासाठीं हट्ट घेतला. पण भात देणार कसा? घरांत तांदळाचा एक कणहि नव्हता. त्याच दिवशीं दुसऱ्या बाजूला बागेंत वाड्यांतील मंडळीं वनभोजनाला आलेली होती. त्यांच्याकडून थोडा भात आणून दत्तूला द्यावा असें माझ्या मनांत येऊन मी चटकन् तिकडे गेलें. तेथें त्या वेळीं शंभर पानांचा स्वैंपाक होत होता. तेथें एका वृद्ध बाईकडे सारी व्यवस्था होती, तिच्याकडे जाऊन मीं म्हटलें, "आजीबाई, मला तुपाच्या वाटीभर भात दत्तूसाठीं द्या, मला आला आहे कंटाळा चूल पेटवण्याचा."

ती वेळ संध्याकाळची होती. बाई माझ्या अंगावर वसकन् येऊन म्हणाली, "हें काय हो भलत्याच वेळीं मागतां? अजून आमचीं जेवणींसुद्धां झालीं नाहींत."

वरील वाक्यें ऐकून मी आल्यापायीं मागें परतलें. मला ब्रह्मांड आठवलें. "ह्या अडाणी बाईनें मला असें बोलावें!" मला माझें माहेर आठवलें. "किती तरी माणसें तेथें जेवून तृप्त होऊन जातात. माहेरीं भात पिकतो. बहिणीकडे रोज दोनतीन शेरांचा भात शिजतो आणि मी आज एका तुपाच्या वाटीभर भाताला महाग झालें ना?"

त्या दिवसाइतकें पूर्वीं मला कधींच वाईट वाटलें नव्हतें. दत्तूची मी कशी तरी समजूत करून त्याला निजविलें. जवळच मीहि पडलें होतें; मला झोंप येईना. सारखें विचारांचें काहूर उठलें होतें. मी म्हणें, आतां नाहीं तर नाहीं. माझा मुलगा मोठा झाल्यावर चार माणसांना भात घालील. इतक्यांत दारावर कोणीं थाप मारली. मीं दार उघडतांच ती बाई आंत आली. तिच्या मागोमाग ताट वाढून आणलेला ब्राह्मण आंत आला.

"बाई, मला फार वाईट वाटतें. मघां मी तुम्हांला टाकून बोललें, राग मानूं नका. मीं दत्तूला वाढून आणलें आहे."

"पण तो आतां निजला. आणखी तो काय एवढें खातो?"

पण अन्नाला पाठ दाखवायची नाहीं, असा माझा नियम असल्यानें मीं तें

अन्न परत केलें नाहीं. व्यंकटेशस्तोत्रांतील एक कडवें मला आठवलें, "अन्नासाठीं दाही दिशा। आम्हां फिरविशी जगदीशा।" बाईनें बरोबर तांदूळ आणले होते. मीं विचारलें, "हे कशाला? मजजवळ तांदूळ आहेत; पण ते शिजविण्याचा मला कंटाळा आला होता एवढेंच."

"तुम्ही आळशी आहांत म्हणूनच हे आणले आहेत. आतां माझा राग मानूं नका. जसा दत्तू आहे तशीच मीहि समजा."

"तसें कसें म्हणतां? मी तर तुम्हांला आजीबाई म्हणतें."

"कांहींहि म्हणा, पण तुम्हीं माझें ऐकलें पाहिजे."

असें सांगून ती बाई निघून गेली. तें अन्न मीं व गड्यानें दोन दिवस खाल्लें. आणि लाडू तर आणखी कांहीं दिवस पुरले.

त्या बाईला कांहीं तरी माणसाचें मन होतें. नाहीं तर माणसें अशीं सांपडतात, कीं दुसऱ्यांना त्रास देऊन वर स्वतः साळसूद म्हणून मिरवतात!

असो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दूधवाली आली. दूध घातल्यावर ती पैसे मागूं लागली; त्या वेळेस मात्र मला त्रिभुवन आठवलें. पुष्कळ वेळ माझ्या तोंडांतून शब्द फुटेना. मी म्हणें, आतां जर ह्या बाईनें दूध बंद केलें, तर उद्यां मी मुलाला काय घालूं? मला मोठा हुंदका आला. दूधवालीनें 'बाई, काय झालें?' म्हणून विचारल्यावर तर मला रडें थांबवितांच येईना. मीं तिला सर्व हकीकत सांगितली व म्हटलें,

"मी त्यांचा तपास करीत आहें. नाहींतर माहेरीं जाऊन मी पैसे पाठवीन. तूं आपला पत्ता मला देऊन ठेव. पण मी जोंपर्यंत येथें आहें तोंपर्यंत मुलाचें दूध बंद करूं नको."

बाई म्हणाली, "दत्तूला माझ्याबरोबर धंतोलीला पाठवा. मी त्याला चांगला जीव लावीन."

"तूं जीव लावशील, पण माझा जीव कोठें राहील?"

"बरें, नका धाडूं; पण जोंपर्यंत तुम्ही येथें आहां, तोंवर ह्या मुलाचें दूध मी सोडणार नाहीं; मला पैसे मिळोत न मिळोत, मी दूध घालीन. पैसे

मिळतील, पण माणसें मिळणार नाहींत." असें म्हणून तिनें मजपुढें तिला आलेले एका रतिबाचे दोन रुपये टाकले.

"हे घ्या तुम्हांला खर्चायला. आजच मला मिळाले आहेत."

मला धन्य वाटलें. परमेश्वरी लीला अगाध आहे. एका अगदीं खेडवळ बाईचें अंतःकरण केवढें उदार हें !

बाई जाते न जाते, तोंच भिकाजीपंत आले. "कां वहिनी, आतांशा नाना आमच्याकडे येत नाहींत? ते कुठं गांवाला गेले कीं काय?"

"हो."

"कुठं?"

"माहीत नाहीं!"

"किती दिवस झाले?"

"एक महिना."

"मग घरांत सामानसुमान तरी आहे का? का देऊं आणून?"

"सर्व आहे; आतां तुम्ही आलांच आहां, तर त्यांना तार करा."

"पण कुठें करूं? आणि काय करूं?"

"राजनांदगांवाला गणपतराव खऱ्यांकडे ते असतील. मी फार आजारी आहे व दत्तूला सांभाळण्यास कोणी नाहीं, अशी तार करा." ते नको नको म्हणत असतां मीं दूधवालीनें दिलेल्या दोन रुपयांपैकीं एक रुपया त्यांच्या हातावर टाकला व भिकाजीपंतांनीं तार केली.

तार केल्याच्या दुसऱ्याच दिवशीं टिळक आले. आले तेव्हां मी दारीं सडा घालीत होतें. टिळक म्हणाले, "किती मूर्ख आहेस तूं! अशानें तुजवर कोण विश्वास ठेवील? त्या धनगराच्या गोष्टीसारखें होईल. तुला असा कोणता आजार झाला होता?"

"पाय मुरगळला होता."

टिळकांचें स्नान झालें. नंतर ते जेवायला बसले. त्यांच्यापुढें मी ताक, कण्या, मीठ व बागेंतल्या मिरच्या ठेवल्या.

“ हें काय ? ”

“ तुम्ही गेल्यापासून मी जें खात होतें तें ! ”

टिळकांना फार वाईट वाटलें. पण तें तेवढेंच ! ते म्हणाले,

“ आपल्याला राजनांदगांवीं जायचें. ”

“ कां ? येथें काय वाईट आहे ? ”

“ तें कांहीं नाहीं. मी सांगतों आहें तें ऐक, नाहींतर जा जलालपुराला. ” माझी माहेरीं जाण्याची वेळ झालीच होती.

# रा ज नां द गां व

आम्ही राजनांदगांवाला आलों. राजनांदगांवीं सुमारें दोन वर्षे आम्ही होतों. हा दोन वर्षांचा काळ टिळकांच्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा काळ होता. राजनांदगांव सोडल्यावर पुढें ताबडतोब मुंबईस जाऊन त्यांनीं बाप्तिस्मा घेतला. राजनांदगांवांस गेल्याबरोबर त्यांनीं पांचसहा महिने लिहिलेल्या त्यांच्या कांहीं लिखाणाचा मीं माझ्या स्मृतिचित्रांच्या या भागांत उपयोग केला असल्यानें त्या वेळेस टिळकांना मजबद्दल काय वाटत असे हेंहि ह्या दोनतीन प्रकरणांत त्यांच्याच शब्दांत दिसून येईल.

१८९४ सालीं म्हणजे राजनांदगांवास पोंचल्यावर त्यांना डायरी लिहिण्याचा नाद लागला. पूर्वी ते डायरी ठेवीत असत; पण तींत रोजच्या रोज लिहीत नसत. कधीं वर्ष सहा महिन्यांनीं लिहीत. १८९४ सालीं राजनांदगांवाची जी डायरी त्यांनीं लिहिलेली आहे, ती मात्र पाहाण्यासारखी आहे. अगदीं आरंभीं ' ह्या सालचे हेतु ' म्हणून पान आहे. वरती ' सिद्धीस नेणार परमेश्वर आहे ' असें वाक्य आहे. खालील मजकूर असा आहे—

" १ सुटली बिचारी खाटकाच्या हातून, २ यशवंतरावांचें चरित्र, ३ येशू ख्रिस्ताचें चरित्र, ४ मेघदूत नाटक, ५ ' लहान मुलांकरितां १०० गोष्टी ' हीं पुस्तकें लिहावीं."

२ एन्ट्रन्सच्या परीक्षेला जावें.

३ येथील छापखाना आपल्या ताब्यांत घ्यावा.

४ फाल्गुनांत वणी कोंकणांत जाऊन यावें.

५ निदान ५०० रुपये शिल्लक टाकावे.

६ प्रथमतः औषधाची चांगली योजना करावी.

फेब्रुवारी रविवार

७ येथें बिगाऱ्यांवर जुलूम होत आहे, त्याची दाद सरकारांत लावणें. जानेवारी १ च्या पानावर त्या दिवसाचें टिपण खालीं दिल्याप्रमाणें आहे—

**मित्राचा उदय सती सुशीघ्र होतो । सृष्टीला अरुण कधीं सहर्ष हो तो !**
**निद्रेनें तंव अपुला हळूच पाश । काढीला मग उठलों विनावकाश ।**
**झालों शुचिर्भूत बघून लक्ष्मी । सुश्रांत निद्रावश, चुल्लिला मीं ।**
**संमार्जुनी अग्निहि दीप्त केला । स्नानार्थ होतों बहु मी भुकेला ।**
**नवकथा लिहिण्यास्तव घेतली । चपल दूर जरी मति धावली ।**
**तरि तिला धरुनी परताविली । अपुरती तिज ह्यांतचि लाविली ।**
**परि घरीं बघुनी जल तापलें । गृहिणिनें मज लौकर बाहिलें ।**
**करूनि दूर घडीभरि लेखिनी । सहज मी रमलों अवगाहनीं ।**

उपाहास—

येथपर्यंतच मजकूर अगदीं पानाच्या शेवटपर्यंत आहे. दुसऱ्या दिवसापासून अगदीं बारीक अक्षरांनीं डायरी लिहिली आहे. 'पहांटे पांच वाजतां उठलों,' वगैरेपासून सुरुवात करून रोज काय काय घडलें, अगदीं इत्थंभूत लिहिलेलें आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं तर अक्षर इतकें बारीक आहे, कीं मॅग्निफाइंग ग्लासनें वाचावें लागतें. जानेवारी व फेब्रुवारी व पुढें जुलै, ऑगस्ट ह्या तीन–साडेतीन महिन्यांचीच डायरी ठेवलेली आहे; परंतु ती ऐकल्यानंतर कित्येक गोष्टींची मला जी सुसंगति लावतां येत नसे, ती आतां लावतां आली आहे.

राजनांदगांवीं जाण्याचा हा दुसरा प्रसंग होता. पहिल्या वेळेस बळराम प्रेसमध्यें काम होतें व आतां मास्तरचें होतें. ता. १ मे १८९४ च्या डायरींत कामाविषयीं असा मजकूर आढळतो, "क्लार्क ऑफ कोर्ट व हेडक्लार्क; इतकेंच नाहीं, तर सर्व कचेऱ्यांचा इंग्लिश क्लार्क मी एकटा बनलों आहें." पुढें

१८९८ सालीं प्रसिद्ध केलेल्या ‘ एका विद्यार्थ्याची साक्ष ’ ह्या पुस्तकांत ( पान १९ ) टिळक म्हणतात, ‘ राजनांदगांवास मीं शिक्षकाचें व सरकारकुनाचें अशीं कामें केलीं. शेवटल्या हुद्द्यांत नाझरच्याहि कामांचा समावेश झाला होता. ’

हीं कामें असलीं तरी शाळेचा त्यांचा शेवटपर्यंत कांहीं तरी संबंध असावा असें त्यांच्या डायरीवरून दिसतें. एकदां तर कोणत्याशा इन्स्पेक्टरनें शाळा तपासून व्हिजिटर्स बुकांत लिहिलेल्या इंग्रजी शेऱ्यांत खूप चुका केल्या होत्या. त्या टिळकांनीं इन्स्पेक्टरसाहेबांस दाखवून त्यांच्याशा तंटा केला. * ता. ५ फेब्रुवारीच्या पानावर अशी माहिती सांपडते. “ ३॥।–५ शाळा, अयोध्यानाथ हेडमास्तर ह्यांच्याशीं बोलत होतों. ५ च्या सुमारास शाळेचा चपराशी नोहर आला. हेडमास्तरानें त्याची बायको काल रात्रींपासून या वेळपर्यंत प्रसववेदनांनीं व्याकुळ होऊन पडली आहे, सुटका होत नाहीं वगैरे हकीकत सांगितली. नोहरची प्राप्ति दरमहा ५ रुपये ! ह्याची दया कोणाला येणार नाहीं ? मला कचेरीचें विस्मरण झालें. मिल्टनच्या घरीं गेलों. तो घरीं नव्हता. बाहेर एक पोलीस होता. त्यास मिल्टनच्या बायकोशीं बोलण्याची इच्छा आहे असा निरोप सांगितला. ही बाई मिडवाईफ आहे. हिला फी देण्यास मी तयार झालों. ती फुकट येण्यास तयार झाली. शारंगपाणी यांनीं तांगा दिला. सारांश, हिच्या परोपकारी व दयाळूपणानें व ईश्वराच्या कृपेनें नोहरची बायको सुखरूप प्रसूत झाली व मी ७॥ वाजतां घरीं आलों. ”

वरील वर्णनावरून, व त्याच डायरींत, जागजागीं शाळेचा उल्लेख येत असल्यानें असें वाटतें, कीं राजेसाहेबांकडे टिळकांना जरी काम असलें, तरी शाळेचेंहि काम असावें.

नागपूर सोडतांना मीं माहेरीं जावें अशी टिळकांनीं सूचना आणली होती, पण तिला बहुमत न मिळाल्यानें ती नापास होऊन मी राजनांदगांवाला

---

* “* * * आला. त्यास स्पष्ट सांगितलें कीं इन्स्पेक्टरच्या नात्यानें तूं लिहिलेल्या इंग्रजी अभिप्रायांत शेकडो चुक्या आहेत. अभ्यास कर ” डायरी ( ७–१–९४ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

त्यांच्याबरोबर गेलें. माझीं पहिलीं तीन बाळंतपणें जलालपुरास झालीं! दोन आत्याबाईंकडे व दत्तूच्या वेळचें भावाकडें. आतां मात्र हें बाळंतपण सासरीं होण्याचा योग आला. माझ्या सासूबाई मीं पाहिल्या नव्हत्या व त्या जिवंत असत्या तर मला सासुरवास झाला नसता; पण राजनांदगांवला मला एक सासू उभी राहिली व तिनें सासुरवासहि खूप केला.

राजनांदगांवला आम्ही ज्या घरांत राहूं लागलों, ह्याच घरांत आणखी एक बिऱ्हाड होतें. त्या बिऱ्हाडकरूची म्हातारी आई होती. तिला टिळक आई म्हणत व तितकाच मानहि देत. घरांत घरवाल्याचें बंधु गोविंदराव व त्यांची बायको आनंदीबाई हेहि राहात असत. घरमालक राजनांदगांवला नसत.

गोविंदरावांनीं व टिळकांच्या मानलेल्या आईनें एक बाई कामाला ठेवली होती. ही बाई दोघांचें काम करी. निदान तसें भासवी तरी. कारण, सारा वेळ ती म्हातारीच्या तैनातींत असे. पगार मात्र दोघां मिळून द्यायचा! टिळकांच्या मागें लागून तिनें हीच बाई चार रुपये पगारावर दत्तूला संभाळण्यासाठींहि ठेविली! म्हणजे आमच्या तिघांच्या पगारावर बाईला राबविण्यास म्हातारीला फावलें. म्हातारी व गोविंदराव ह्यांच्याकडून मिळणारे तीन रुपये व आमच्याकडून मिळणारे चार रुपये असा सात रुपये पगारहि तिला पडूं लागला व तो म्हातारीच्या कृपेनें; तेव्हां तीहि तिच्या उपकाराच्या ओझ्याखालीं वांकलेली होती. गोविंदरावांची बायको आनंदीबाई हिला ह्या काकू सुनेप्रमाणें वागवीत! तसेंच त्या मलाहि वागवूं लागल्या. पण मी आनंदीबाईप्रमाणें गरीब नसल्यानें काकूंचें कांहीं चालूं देईना. तेव्हां काकूंनीं टिळकांच्या कानीं लागून त्यांच्या माझ्यांत वितुष्ट पाडण्यास सुरवात केली.

आम्ही येथें आलों, तेव्हां माडीवर एक खोली व अंगणांत झोपडीवजा दुसरी खोली एवढीच जागा आमच्या ताब्यांत देण्यांत आली. पण त्याच वेळेस टिळकांनीं बोली सोडवून घेतली होती, कीं म्हातारीच्या ताब्यांतील कांहीं जागा पुढें आम्हांला लागेल तेव्हां द्यायची व तें त्या वेळेस तिनें कबूलहि केलें होतें. अंगणांत बिनरहाटाची विहीर होती. हिचें पाणी आम्ही सगळे वापरीत होतों.

२०३४

ही विहीर जमिनीसरशी होती.

म्हातारीनें कांहीं दिवस झोंपडी घ्यावी व तिचें घर आम्हांस द्यावें अशी मूळ समजूत. माझे बाळंतपणाचे दिवस अगदी जवळ आले. म्हातारी कांहीं झोंपडींत जाईना. ती म्हणे बाळंतपणाला अवकाश आहे.

भाद्रपदाचा महिना. झोपडींत ओल फार येऊं लागली. शेवटीं सर्व मंडळी एकत्र जमलों असतां, मीं गोविंदरावांना म्हटलें, " काका, मला जागा पाहिजे."

माझा आशय समजून टिळक म्हणाले, " तूं माहेरीं जा. "

" मला माहेरीं जायचें नाहीं. "

" तूं फारच हट्टी बायको आहेस. नाहीं तर मर येथेंच ! "

" हो येथेंच मरेन; पण माहेरीं जाणार नाहीं. मला ती जागा द्या. "

ह्यावर टिळकांनीं आपल्या आईकडे वळून म्हटलें, " काकू, द्या हो तिला जागा. "

" पण तें घर स्वच्छ नसेल. मला त्याची जमीन भिंती सारवून पाहिजेत. " काकू म्हणाल्या.

मी म्हणालें, " एखादी बाई लावा अन् जमीन व भिंती सारवून घ्या. "

" मला नाहीं बाईच्या हातचें आवडणार. "

त्यावर आनंदीबाई म्हणाल्या,

" मी देतें भिंती व जमीन सारवून. "

" पण इतक्यांत कशाला ? मला सर्व कांहीं समजतें. मी तुम्हां सर्वांपेक्षां मोठी आहें. "

" तुम्ही मोठ्या असा किंवा लहान असा. मला आजच्या आज जागा पाहिजे."

" थोडें फार तरी वडील माणसांचें ऐकावें " असा टिळकांनीं मला टोला दिला.

मी म्हणालें, " मी कोणाचें ऐकणार नाहीं. आनंदीबाई, तुम्ही जा माझ्या झोंपडींत आणि तुमचें घर द्या मला राहायला; तुमच्याच नवऱ्यानें आम्हांला जागा देण्याचें कबूल केलें आहे. " मग मात्र गोविंदरावांनीं हुकूम करण्याच्या

स्वरानें म्हातारीला सांगितलें कीं, तुम्ही आजच्या आज झोंपडींत राहायला जाऊन टिळकांना तुमची जागा द्या.

आनंदीबाईनीं झोंपडींतील सर्व जागा उभी आडवी सारवून दिली. त्यांनीं कामदारणीच्या मदतीनें दोन्ही घरांच्या सामानांची ने-आण केली. मींहि करवेल तेवढी धावपळ केली. म्हातारी मात्र टिवल्याबावल्या करीत बसली होती. म्हातारीच्या घरांत उंदीर–घुशींनीं पुष्कळ बिळें पाडून ठेविलीं होतीं. तीं सर्व आम्हांला बुजवून घ्यावीं लागलीं.

टिळक कामाला गेले. ते गेल्यावर म्हातारी मोलकरणीला आमच्या कामाला हात लावूं देईना. तेव्हां आनंदीबाई व मी–आम्हीं दोघींनींच बहुतेक काम केलें. आनंदीबाई मला साह्य करीत होत्या, हेंसुद्धां म्हातारीला खपेना. हिच्यामुळें आनंदी बिघडली, अशी तिची सारखी बडबड चालली होती. संध्याकाळीं गोविंदराव व टिळक घरीं आल्यावर त्यांच्याजवळ आम्हां दोघीं-बद्दल म्हातारीनें पुष्कळच कागाळ्या केल्या.

टिळकांनीं एक नाटक लिहिलें होतें तें बसविण्यास ते शाळेंत का वाड्यांत गेले होते. दत्तूला पुष्कळ ताप आला होता. तो आनंदीबाईजवळच त्या रात्रीं निजला. पहांटे तीन–चारच्या सुमारास आनंदीबाईनीं त्याला तापांतच कडेवर मजकडे आणलें व त्याचा भाऊ त्याला दाखविला. दत्तू मात्र बाई बाई करून रडूं लागला.

गोविंदरावांनीं दत्तूला घेतलें. तेथें भंग्यांच्या सुइणी असत. मीं म्हटलें, "मला तसली सुईण नको;" तेव्हां बाळंतपण काकूंनींच केलें. मग आनंदी-बाई आल्या.

मी आधींपासूनच म्हणत होतें, कीं हें आणा, तें आणा, पण काकू म्हणत, अजून पुष्कळ अवकाश आहे व त्यांचें ऐकून टिळकहि माझ्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करीत. त्यामुळें त्या रात्रीं घरांत दिव्याचें तेलसुद्धां नव्हतें व माझ्या काळजीच्या तेवढ्या त्या काकूच घरांत होत्या !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं टिळक नाटकाहून आले. दुसरा मुलगा पाहून

त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं जलालपुरास तार करून आत्याबाईंना मुलगा झाल्याचें कळविलें. तिकडे बाळंतिणीला तीन दिवस कांहीं खायला देत नाहींत. आणि मुलाच्या पोटावर शंभर चोंचे मारतात. पण ह्या चालीविरुद्ध मीं बंड पुकारलें. आनंदीबाईजवळून दोन पोळ्या घेऊन मीं गुपचुप त्या खाल्ल्या. झालें! पोळ्यांचा ताकभात होऊन, मीं ताकभात खाल्ला अशी बातमी टिळकांच्या कानीं गेली! टिळक माझ्यावर खूप संतापले. मीहि कांहीं कमी नव्हतें. मी खाटेवर बसून त्यांच्याशीं खूप भांडलें. ताबडतोब मजवर एक काव्य तयार झालें. तें अर्थात् मला आवडलें नाहीं, पण काव्यदृष्टीनें चांगलें झालें होतें. तें टिळकांनीं फाडून टाकलें असावें. तिसऱ्या दिवशीं लक्ष्मीबाई खरे आल्या व त्यांनीं मला फारच साह्य केलें.

दत्तूचा ताप आतां गेला होता. तो हिंडूं खेळूं लागला. एक दिवस टिळक माडीवर लिहीत बसले होते. आमच्या तोंडमानल्या सासूबाई–टिळकांच्या आई–काकू विहिरीजवळ उभ्या होत्या. पण दत्तू खेळतां खेळतां विहिरीकडे चालला, तरी त्या कांहीं बोलल्या नाहींत, कीं त्याला त्यांनीं उचलून बाजूला केलें नाहीं. गोविंदरावांनीं हें पाहून धांवत येऊन त्याला उचललें. त्या दिवसापासून टिळकांचा आपल्या मानलेल्या आईवरील विश्वास उडाला. ही आई मोलकरणीसाठीं आपल्याकडून दत्तूला सांभाळण्याकरतां म्हणून चार रुपये उपटते व मोलकरणीचा कांहीं उपयोग होत नाहीं हें आतां प्रथमच त्यांच्या ध्यानांत आलें.

लौकरच आत्याबाई आल्या. आत्याबाईंचें व टिळकांचें नेहमींचेंच खडाष्टक. ती आल्यानंतर टिळकांचा घरांत पाय ठरेनासा झाला. माझी मात्र अडकित्त्यांत सांपडलेल्या सुपारीसारखी स्थिति झाली. आत्याबाईंची घरांत सारखी कुरबूर चालावयाची. टिळकांना कांहीं आणण्यास तिनें सांगितलें, कीं टिळक बाहेर जात व तिकडेच जेवून येत! घरीं आल्यावर आत्याबाई हटकून त्यांना कांहीं तरी बोले! ती बोलली, कीं त्यांनीं माडीवर एखादें सुंदरसें काव्य तिच्यावर रचून, तें मोठमोठ्यानें म्हणण्यास सुरुवात करावी!

दोघेंहि एकमेकांना अगदीं कंटाळलीं. इतकीं, कीं एक दिवस टिळक संन्यास घेण्यास निघून गेले. आम्हांस त्यांनीं तसें कांहीं सांगितलें नाहीं. पण भिकूताईला मात्र त्यांनीं आपण संन्यास घेण्यास जात असल्याचें पत्र लिहून कळविलें.

माझ्या माहेरीं प्रत्येकजण घाबरून गेलें. जो तो नवस करूं लागला. कोणी सत्यनारायण, तर कोणी सोळा सोमवार. कोणी म्हणत ज्ञानदेव, सोपानदेव वगैरेच्या बापासारखे हे परत येतील; पण मग ह्यांना झालेल्या मुलांची काय व्यवस्था करायची ?

माहेरीं उडालेल्या गोंधळाची आम्हांला कांहींच दाद नव्हती. तिकडून जेव्हां पत्रें येऊं लागलीं, तेव्हां ही भानगड आमच्या ध्यानांत आली. आठ दिवस झाले, टिळक परत आले; त्यांच्या गैरहजेरींत आलेलीं पत्रें मीं त्यांच्या पुढें टाकलीं.

" हें खरें का ? "

" हो खरें, पण तुझ्या परवानगीवांचून मला संन्यास देत नाहींत, म्हणून मी परत आलों. "

टिळक आल्यानंतर दोन दिवसांनीं धाकट्याला आंकडीचा रोग झाला. खोली कोंदट, हवा खेळती नाहीं, जमीन ओलसर, तेव्हां हें घर बदला असें डॉक्टरांनीं सांगितलें. आम्हीं बिऱ्हाड बदललें. पण येथें आल्यावर दुसऱ्याच दिवशीं मुलगा वारला.

माझ्या मांडीवरच त्याला मृत्यु आला. मी चटकन बाजूला झालें व नंतर आत्याबाईला हाका मारल्या व म्हटलें, बाळ कसेंतरी करतो आहे. आत्याबाईंनीं धावाधाव केली. पण तिचा उपयोग अर्थात् कांहीं झाला नाहीं; कारण तो गेल्यावरच मीं तिला धावाधाव करण्याला लावलें. नाहीं तर तिनें सगळ्या विटाळाचंडाळाच्या भानगडी उपस्थित केल्या असत्या व टिळकांचें व तिचें त्यावरून पुन्हा कडाक्याचें भांडण झालें असतें. तें सारें टाळण्यासाठीं मी दूर बसून तो जिवंत असल्याचा बहाणा थोडा वेळ केला. मुलाचें नांव महादेव ठेवलें होतें. महादेवभाऊजी पोटीं आले अशा समजुतीनें हें नांव ठेवलें होतें.

निदान तो दिसण्यांत तरी भाउजींसारखा होता. महादेवाच्या मृत्यूनंतर तर टिळकांची व आत्याबाईंची अधिकच कुरबूर सुरू झाली. ती टिळकांना म्हणे, 'तुमच्या नाचरेपणामुळें सोन्यासारखें मूल गेलें' त्यावर ते म्हणत, 'तुमच्या मूर्खपणाच्या गांवढळ समजुतीमुळें मूल गेलें.'

अशाच एका भांडणानंतर रागाच्या सपाट्यांत आत्याबाईनें जलालपुरास जाण्याचें ठरविलें. आम्ही दोघें तिला पोंचविण्यास स्टेशनवर गेलों होतों. सकाळपासून तिनें कांहीं खाल्लें नव्हतें. गाडींत बसल्यावर टिळकांनीं खजूर व पेढे आणून तिच्या हातांत दिले; पण गाडी सुरू होतांच तिनें ते खाण्याचे पदार्थ गाडींतून आमच्याकडे फेंकून दिले! तिचा संताप झाला होता व दत्तूला सोडून जायचें म्हणून फार वाईटहि वाटलें होतें.

आत्याबाई गेल्यानंतर घरांत शांतता मात्र झाली. टिळक आपल्या डायरींत लिहितात, "काकू (लुच्चांची राणी) चा शेजार सुटला, सासूबाई गेल्या, तेव्हांपासून घरांत चांगली शांति दिसते." 'काकू' म्हणजेच माझ्या मावस सासूबाई. (२ जा. १८९४) सासूबाई म्हणजे आत्याबाई. त्या गेल्यावर बाह्यात्कारी शांति दिसली तरी टिळकांच्या मनांत मात्र शांति नसली पाहिजे. आप्पासाहेबांकडे संस्कृतवाचन, विचार व वादविवाद ह्यांना पुष्कळ वाव होता. पण येथें आल्यापासून तें नाहींसें झालें. भोंवतालची मंडळी बहुतेक स्थानिक राजकारणांत व उलाढालींत गुंतलेली, तर आपण कांहीं तरी देशसेवा करावी अशी टिळकांना तळमळ लागलेली होती. ता. ३ जानेवारीच्या डायरींत ते लिहितात, "येथें सर्व बाजार पांचसात वर्षांत करून टाकून देशसेवेस मोकळें होणें आहे!" राजनांदगांवास मजुरांवर होणारा जुलूम नाहींसा करण्यासाठीं टिळकांनीं जिवापाड मेहनत केली. त्या वेळीं वरिष्ठांची खप्पा मर्जी होण्याचाहि संभव होता; पण त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. उच्च वातावरणांत वावरत नसलेल्या व्यवहारी माणसांनीं त्यांना वेड्यांतहि काढलें. त्यांच्याबद्दल टिळक ६ जा. च्या डायरींत म्हणतात, "डॉक्टर म्हणत होते, 'तुम्हांला येथील लोक पागल म्हणतात!' बरोबर आहे, जेथें हलकट, पाजी, बदमाष लोक जमले

आहेत, तेथें मी पागलच ठरलों पाहिजे, आजपर्यंतच्या माझ्या अनुभवावरून कोठेंहि हांजीहांजी, तोंडपुजेपणा, लांचखाऊपणा ह्या गुणांस जो मान आहे, तो दुसऱ्या कशास नाहीं. अन्नगंधाला लुब्ध होऊन खेटरें खाणारें कुत्रें व आम्ही सारखे आहों. प्राप्ति असो वा नसो, नुसत्या द्रव्याच्या वासालाच जिभा काढून लाथा खात बसलेले हजारों लोक आहेत."

वर दर्शविलेल्या विचारांवरून टिळकांची मनःस्थिति त्या वेळीं कशी होती हें दिसून येतें. त्यांचें वाचनहि सपाटून चाललें होतें व पुष्कळ पुस्तकें पाठ करण्याचाहि त्यांनीं सपाटा लावला होता. लेटररायटर पाठ करीत आहे, सिसरो पाठ करीत आहे वगैरे वाक्यें मधूनमधून त्यांच्या डायरींत आढळून येतात. बायबल व बाबा पदमनजी ह्या ख्रिस्ती पंडितानें लिहिलेलीं पुस्तकें टिळकांच्या वाचनांत ह्या वेळीं पुष्कळ आलीं. शिवाय मनाला पटेल तें करावयाचें, हा एक त्यांचा पहिल्यापासून मोठा बाणा असल्यामुळें त्या काळांत अगदींच विलक्षण दिसणाऱ्या गोष्टी ते करीत.

एक दिवस सासूबाईंचें श्राद्ध होतें. मी एकसारखी मागें लागलें होतें, कीं श्राद्ध आहे, ब्राह्मण सवाष्ण बोलवायला पाहिजे.

"मला श्राद्ध करावयाचें नाहीं."

"कां नाहीं?"

"मी ज्यांना जेवायला सांगेन, त्यांना जर तूं वाढशील तर मी श्राद्ध करतों; नाहीं तर करणार नाहीं."

"म्हणजे, कोणाला सांगतां?"

"आंधळे, पांगळे, कोणत्याहि जातीचे, कोणत्याहि धर्माचे!"

"श्राद्ध म्हणजे त्या दिवशीं आई येणार आणि हें भलतेंच काय?"

"माझ्या आईला दया आवडत असे. ती कर्मठ नव्हती."

"म्हणून काय झालें, आधीं ब्राह्मण जेवतील, मग तुमचे सारे आंधळेपांगळे बोलवा, मी नाहीं म्हणत नाहीं."

"मला त्या आंधळ्यापांगळ्यांना ब्राह्मणांच्याच जागीं बसवावयाचें आहे.

ब्राह्मणांना बोलवावयाचेंच नाहीं."

शेवटीं हो ना करतां करतां मी टिळकांच्या म्हणण्याला कबूल झालें व गुपचूप स्वतःच जाऊन एक द्राविडी ब्राह्मण व सवाष्ण सांगून आलें.

टिळकांचे आंधळेपांगळे आले. माझी ब्राह्मण-सवाष्ण आलीं. त्यांची पंगत बाहेर बसविली, माझी आंत बसली. टिळकांनीं आंधळ्या-पांगळ्यांना धोतर-जोडे दिले. माझे ब्राह्मण कुरकूर करूं लागले. 'तुम्ही दुसरे ब्राह्मण कां बोलाविले नाहीं व बाहेर हीं माणसें कोण आहेत?' मीं त्यांना सर्व कांहीं समजावून सांगितलें व नंतर म्हटलें, 'तुम्हांला कोणीं विचारलें तर तुम्ही सांगा, कीं मला बोलाविलें, मी गेलों. मला काय ठाऊक, कोणकोण येणार तें? आणि एकदां पानावर बसल्यावर पानावरून उठतां थोडेंच येतें?'

ह्यासंबंधीं टिळकांच्या डायरींत ८ जानेवारी, १५ फेब्रुवारी व २५ फेब्रुवारींत उल्लेख आहेत. ते धनुर्मास, कुळधर्म व श्राद्ध ह्या प्रसंगीं आमचे जे खटके उडाले यांसंबंधीं आहेत.

"लक्ष्मीकडून १० अभंग वाचून घेतले. हिचें लक्ष वाचनांत नाहीं. तिच्या आत्याबाईनें तिच्या डोक्यांत जें एक महातत्त्व भरून दिलें आहे, कीं आपली जी स्थिति, ज्या समजुती पूर्वापार चालत आल्या आहेत, त्या तशा थेट पुढें चालविणें हेंच नरदेहाचें साफल्य होय. त्या तत्त्वानें एखादी रीतीची गोष्ट नुसती सांगूं लागलें, कीं तिच्या अंगांत भूतसंचार होत आहे. धनुर्मास म्हणजे खिचडीचा समारंभ केला नाहीं. यावरून मीं इतकेंच म्हटलें, कीं मनाचा अत्यंत नीच, कृपण, वृथाभिमानी, मूर्ख व धष्टपुष्ट भट्ट बोलावण्यापेक्षां ज्यांस असलें अन्न कधींहि मिळत नाहीं असल्या चार गरिबांस बोलवावें. झाला संताप."

ह्यानंतर चोवीस ओळींची एक वर्णनात्मक कविता आहे. "कुलदैवतें जेवायला येणार म्हणून माझ्या जीवाची कोण धांदल उडाली आहे. कालपासून दळण, कांडण, पाखडणें ह्यांतच माझा सारा वेळ चालला आहे. दत्तूशींहि बोलायला मला फुरसद नाहीं. बिचारा. आतां आपल्याला गोड अपूप आणि वडे मिळणार ह्याची त्याला कल्पनाहि दिसत नाहीं. आपली प्रेमळ माय आपल्याला

विसरली आहे एवढेंच त्याला दिसतें आहे व तो रडतो आहे.

कोठें तें कोंकण व कोठें आपण! मधें केवढाले पर्वत व वनराजी आहे. पण तेथून आपले वडे घारगे खायला आपलीं कुलदैवतें येणार! खरीं खरीं दयाळू आहेत 'आमची' हीं कुलदैवतें. एक ब्राह्मण आणून त्यालाच आमच्या कुलदैवताचा प्रतिनिधी ती मानते आहे. मनांत ती म्हणते आहे, देवा आतां वडे अपूप खा आणि आमच्यावरचीं संकटें टाळा. आम्हांला सुख दाखवा.

इकडे हे ब्राह्मण भांडून तंडून वडे अपूपासाठीं दुःख देत आहेत. असा छळवाद करणारे हे का देव?"

हें झालें कुलदैवतासंबंधीं. पुढें तितकीच मोठी कविता आईच्या श्राद्धासंबंधीं आहे.

"आज अठरा वर्षें हे प्रिय माते तुला जाऊन झालीं. लोक म्हणतात तुझी मूर्ति स्वर्गांत जाऊन राहिली आहे. कांहीं म्हणतात पंचत्त्वांत तुझी पांची तत्त्वें विलीन झालीं आहेत. तर कांहीं म्हणतात तुला दुसरी योनी प्राप्त झाली आहे; पण हें सारें खोटें आहे. आज इतकीं वर्षें तूं माझ्या हृदयांत वास करून आहेस.

कुठें ती अति विमल अशी माझी आई आणि हे दक्षिणेच्या आशेनें जमा झालेले भट्ट कोठें! हे तुझे प्रतिनिधी म्हणून त्यांची पूजा करूं तरी कशी? दीप पाहायला प्रतिदीप असावा किंवा श्रद्धेस श्राद्धविधि असावा. हे रूढी धन्य आहे तुझी. तुला मी हात जोडतों."

ह्यानंतर आणखी एक बावीस ओळींची सुंदर कविता आहे. श्राद्धाच्या जेवणास जो भिकारी त्यांनीं बोलाविला होता त्याच्या मनःस्थितीचें वर्णन त्यांत आहे.

पुणें, मुंबई, नाशिक ते नागपूरपर्यंत वक्तृत्वसमारंभ होत असत व त्या प्रत्येक गांवीं टिळक जाऊन बक्षिसें मिळवीत. तें लोण राजनांदगांवास पोचविण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. अर्थात् येथें मराठींत वक्तृत्व कोण करणार? तेव्हां हिंदी वक्तृत्वसमारंभ ठरला. मला वाटतें, बहुतकरून रायपुराहून

रा. वामन दाजी ओक ह्यांचें टिळकांना ह्या बाबतींत प्रोत्साहन असावें. कारण राजनांदगांवाहून रायपूर व रायपुरराहून राजनांदगांव अशा त्यांच्या पुष्कळ फेऱ्या होत व रा. ओकांचा उल्लेख त्यांच्या डायरींत ठिकठिकाणीं आढळतो. त्या वेळीं रा. ओक एखादें मासिक काढीत असावेत. टिळक म्हणतात, "ओकांचा विचार फिरला व कविता ज्ञानसंग्रहाच्या ऐवजीं विविधज्ञान-विस्तारास पाठविण्याचें ठरलें. कवितेच्या खालीं माझें नांव होतें तें देणेंहि अयोग्य ठरवून त्यांनीं तें रवरानें काढून टाकलें. मी क्षुद्र असून माझ्या नांवामुळें कविताहि क्षुद्र ठरेल, हा ओकांचा आशय."

जानेवारी महिन्यांत आपण रायपूरला किती वेळां गेलों, ह्याची टिळकांनीं एक जंत्रीच लिहून ठेवली आहे. तीवरून दर चार सहा दिवसांआड ते रायपुरला जाऊन येत, असें दिसतें. हिशोबाच्या शेवटीं जमा व खर्च आहे, त्यांत राजनांदगांवीं मुक्काम दि. २०–१४ तास व रायपुरास मुक्काम दि. १०–१० तास एकूण ३१ दिवस असा आहे!

टिळकांना पैशाची पर्वा किती असे, हें माझीं स्मृतिचित्रें वाचणारांना सांगायला नकोच. वक्तृत्वसमारंभाला चहूंकडे निमंत्रणपत्रिका गेल्या. राज-नांदगांवांत तो एक अपूर्व प्रकार होता. जिकडे तिकडे गडबड सुरू होती. आमचें घर तर लग्नघरच होतें. टिळकांनीं आपला अर्धा पगार वर्गणी म्हणून देऊन टाकला! सामानसुमानाची पाहुणेमंडळीकरितां जय्यत तयारी ठेवली. मीं मीठमसाला वगैरे सर्व तयार करून ठेवलें. त्याच वेळीं भाऊजी व रखमाई आमच्याकडे आलेलीं होतीं.

पाहुणेमंडळीची स्वैंपाकाची वेगळी व्यवस्था करण्याचें ठरलें होतें. परंतु आचारी फारच पैसे मागूं लागला. जमलेली वर्गणी बक्षिसें व इतर खर्च ह्यांना पुरेल इतकीच होती.

टिळक मला विचारूं लागले,

"तूं काय वर्गणी देतेस? बोल."

"मी काय देऊं? तुम्हीं दिली तीच मीं दिली."

विसरली आहे एवढेंच त्याला दिसतें आहे व तो रडतो आहे.

कोठें तें कोंकण व कोठें आपण! मधें केवढाले पर्वत व वनराजी आहे. पण तेथून आपले वडे घारगे खायला आपलीं कुलदैवतें येणार! खरीं खरीं दयाळू आहेत 'आमची' हीं कुलदैवतें. एक ब्राह्मण आणून त्यालाच आमच्या कुलदैवताचा प्रतिनिधी ती मानते आहे. मनांत ती म्हणते आहे, देवा आतां वडे अपूप खा आणि आमच्यावरचीं संकटें टाळा. आम्हांला सुख दाखवा.

इकडे हे ब्राह्मण भांडूण तंडून वडे अपूपासाठीं दुःख देत आहेत. असा छळवाद करणारे हे का देव?"

हें झालें कुलदैवतासंबंधीं. पुढें तितकीच मोठी कविता आईच्या श्राद्धासंबंधीं आहे.

"आज अठरा वर्षें हे प्रिय माते तुला जाऊन झालीं. लोक म्हणतात तुझी मूर्ति स्वर्गांत जाऊन राहिली आहे. कांहीं म्हणतात पंचत्त्वांत तुझी पांची तत्त्वें विलीन झालीं आहेत. तर कांहीं म्हणतात तुला दुसरी योनी प्राप्त झाली आहे; पण हें सारें खोटें आहे. आज इतकीं वर्षें तूं माझ्या हृदयांत वास करून आहेस.

कुठें ती अति विमल अशी माझी आई आणि हे दक्षिणेच्या आशेनें जमा झालेले भट्ट कोठें! हे तुझे प्रतिनिधी म्हणून त्यांची पूजा करूं तरी कशी? दीप पाहायला प्रतिदीप असावा किंवा श्रद्धेस श्राद्धविधि असावा. हे रूढी धन्य आहे तुझी. तुला मी हात जोडतों."

ह्यानंतर आणखी एक बावीस ओळींची सुंदर कविता आहे. श्राद्धाच्या जेवणास जो भिकारी त्यांनीं बोलाविला होता त्याच्या मनःस्थितीचें वर्णन त्यांत आहे.

पुणें, मुंबई, नाशिक ते नागपूरपर्यंत वक्तृत्वसमारंभ होत असत व त्या प्रत्येक गांवीं टिळक जाऊन बक्षिसें मिळवीत. तें लोण राजनांदगांवास पोचविण्याचें त्यांच्या मनानें घेतलें. अर्थात् येथें मराठींत वक्तृत्व कोण करणार? तेव्हां हिंदी वक्तृत्वसमारंभ ठरला. मला वाटतें, बहुतकरून रायपुराहून

रा. वामन दाजी ओक ह्यांचें टिळकांना ह्या बाबतींत प्रोत्साहन असावें. कारण राजनांदगांवाहून रायपूर व रायपुरराहून राजनांदगांव अशा त्यांच्या पुष्कळ फेऱ्या होत व रा. ओकांचा उल्लेख त्यांच्या डायरींत ठिकठिकाणीं आढळतो. त्या वेळीं रा. ओक एखादें मासिक काढीत असावेत. टिळक म्हणतात, "ओकांचा विचार फिरला व कविता ज्ञानसंग्रहाच्या ऐवजीं विविधज्ञान-विस्तारास पाठविण्याचें ठरलें. कवितेच्या खालीं माझें नांव होतें तें देणेंहि अयोग्य ठरवून त्यांनीं तें रबरानें काढून टाकलें. मी क्षुद्र असून माझ्या नांवामुळें कविताहि क्षुद्र ठरेल, हा ओकांचा आशय."

जानेवारी महिन्यांत आपण रायपूरला किती वेळां गेलों, ह्याची टिळकांनीं एक जंत्रीच लिहून ठेवली आहे. तीवरून दर चार सहा दिवसांआड ते रायपुरला जाऊन येत, असें दिसतें. हिशोबाच्या शेवटीं जमा व खर्च आहे, त्यांत राजनांदगांवीं मुक्काम दि. २०–१४ तास व रायपुरास मुक्काम दि. १०–१० तास एकूण ३१ दिवस असा आहे!

टिळकांना पैशाची पर्वा किती असे, हें माझीं स्मृतिचित्रें वाचणारांना सांगायला नकोच. वक्तृत्वसमारंभाला चहूंकडे निमंत्रणपत्रिका गेल्या. राज-नांदगांवांत तो एक अपूर्व प्रकार होता. जिकडे तिकडे गडबड सुरू होती. आमचें घर तर लग्नघरच होतें. टिळकांनीं आपला अर्धा पगार वर्गणी म्हणून देऊन टाकला! सामानसुमानाची पाहुणेमंडळीकरितां जय्यत तयारी ठेवली. मीं मीठमसाला वगैरे सर्व तयार करून ठेवलें. त्याच वेळीं भाऊजी व रखमाई आमच्याकडे आलेलीं होतीं.

पाहुणेमंडळीची स्वैंपाकाची वेगळी व्यवस्था करण्याचें ठरलें होतें. परंतु आचारी फारच पैसे मागूं लागला. जमलेली वर्गणी बक्षिसें व इतर खर्च ह्यांना पुरेल इतकीच होती.

टिळक मला विचारूं लागले,

"तूं काय वर्गणी देतेस? बोल."

"मी काय देऊं? तुम्हीं दिली तीच मीं दिली."

"असें कसें? मी जेवलों, कीं तुला जेवायला लागत नाहीं का?"

"तसें कसें होईल?"

"मग तसेंच माझी वर्गणी म्हणजे तुझी वर्गणी नाहीं."

"पण मजजवळ पैसे कुठें आहेत?"

"एक युक्ति आहे. आम्हांला आचारी मिळत नाहीं. पैसे फार मागतो."

"मी करतें स्वैंपाक. मग पैसे द्यावे लागणार नाहींत ना?"

आणि अशा रीतीनें माझी वर्गणी मीं भरली. दोनतीन दिवस मीं स्वैंपाक केला. टिळकांना आनंद झाला व समारंभ पार पडला.

समारंभासंबंधीं टिळकांच्या डायरींत खालील उल्लेख आढळतात.

(२० मे १८९४)

"सभेची जमवाजमव; आज दिवाणसाहेबांस बोलाविलें, पण हे उदरंभरि पुढें पाहूं म्हणून आले नाहींत. मिल्टनला काम होतें म्हणून तो आला नाहीं. XXX XXX हे गांवांत नाहींत. आपण वक्तृत्वसमारंभार्थ एक पगार कबूल केला असून आज तो द्यावा लागेल म्हणून हेडमास्तर आज आला नाहीं असें ऐकतों. असो. प्रेसिडेंटचें स्थान व्ही. सारंगपाणी यांस मिळाल्यावर सभेच्या कामास सुरुवात होते. वक्तृत्वसमारंभासंबंधानें थोडी प्रस्तावना झाल्यावर, तत्संबंधानें विचार सुरू झाला. १३ मनुष्यांची व्यवस्थापक मंडळी स्थापित झाली. ह्या मंडळीचे अध्यक्ष सारंगपाणी, मंत्री मी ह्याप्रमाणें ठरलें. साधारण खर्चाचा अंदाज पाहातां २०० रुपये लागतील असें दिसूं लागलें. येथवर सभेंतील मंडळी हलकेच उठून गेली, व २५ मनुष्यांपैकीं १२ उरले! अस्तु. खर्च बराच होत असून वर्गणी इतकी होणार नाहीं व आपण रोख शेंपन्नास रु. देण्यास समर्थ नाहीं, एवढ्याकरितां समारंभार्थ येणाऱ्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था मी ठेवीन म्हणून मीं म्हटलें. प्रथमतः माझ्या गरिबीकडे पाहून मंडळी विरुद्ध होती, पण माझा आग्रह पाहून मंडळी कबूल झाली तरी XX–XX ही मंडळी, मजवर तुटून पडते. यांच्या गप्पा मात्र मीं पुष्कळ ऐकल्या आहेत, पण स्वदेशाप्रीत्यर्थ रतिमात्र मेहनत घेतांना पाहिलें नाहीं, व

... स्थळप्रत.
अनुक्रमांक ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...


विशेषतः नीच द्वेषबुद्धीनें केवळ मला दुखवावें हा यांचा हेतु पाहून माझें चित्त खवळलें व विलक्षण तंटा झाला. लोक म्हणतात, ही माझीच चूक आहे! बरोबर आहे. कारण ते माझ्या अंगीं शांतीची आशा करितात. आज वर्गणी १३५ जमली."

( २१ मे )

"भगवानदत्ताचें कालच्या तंट्याबद्दल भाषण व माझा निश्चय—आजपासून पुढें संतापाच्या स्वाधीन होऊन लोककार्यांत जर अंतराय झाला, तर त्याच क्षणीं हा देह ठेवायचा नाहीं."

( १२ जुलै )

"आज येथील प्रथम हिंदी वक्तृत्वसमारंभ सुरू झाला. समारंभास नागपुराहून १२ गृहस्थ आले आहेत. रायपुराहून ८, कामठीहून ३ व इतर ४ ठिकाणचे १० मास्तर, डे. इ. वगैरे आले आहेत. सभा दुपारीं २ वाजतां सुरू होऊन ६ वाजतां बंद झाली."

"××× च्या सांगण्यावरून राजा व दिवाण बिथरले आहेत. असल्या महामूर्खशिरोमणीला हा चांडाळ कसा लुटीत आहे, हें ह्याच्या ह्या भित्रेपणा-वरून सहज समजतें. आज सखाराम सहकुटुंब येतो."

( १३ जुलै )

"बालोद येथील हेडमास्तर व इतर मास्तर लोक केवळ तल्लीन झाले आहेत. पहिल्या विषयावर ९ वक्ते बोलले; दुसऱ्यावर ९ व तिसऱ्यावर ९ च आहेत. राजाकडचे पैसे कबूल केलेले १०० रुपये मिळतात कीं नाहीं शंका आहे."

( १४ जुलै )

"आजचा सर्व दिवस राजाकडील रुपये मिळविण्यांत गेला. १८६ बद्दल मोठ्या मुष्कीलीनें १०० रुपये मिळाले!"

१५ जुलैच्या डायरींत कोणाला काय बक्षिसें मिळालीं तें लिहून शेवटीं टिळक म्हणतात. "सेक्रेटरी या नात्यानें दोघां मैथली ब्राह्मणांकडून आम्हांस

"असें कसें? मी जेवलों, कीं तुला जेवायला लागत नाहीं का?"

"तसें कसें होईल?"

"मग तसेंच माझी वर्गणी म्हणजे तुझी वर्गणी नाहीं."

"पण मजजवळ पैसे कुठें आहेत?"

"एक युक्ति आहे. आम्हांला आचारी मिळत नाहीं. पैसे फार मागतो."

"मी करतें स्वैंपाक. मग पैसे द्यावे लागणार नाहींत ना?"

आणि अशा रीतीनें माझी वर्गणी मीं भरली. दोनतीन दिवस मीं स्वैंपाक केला. टिळकांना आनंद झाला व समारंभ पार पडला.

समारंभासंबंधीं टिळकांच्या डायरींत खालील उल्लेख आढळतात.

(२० मे १८९४)

"सभेची जमवाजमव; आज दिवाणसाहेबांस बोलाविलें, पण हे उदरंभरि पुढें पाहूं म्हणून आले नाहींत. मिल्टनला काम होतें म्हणून तो आला नाहीं. XXX XXX हे गांवांत नाहींत. आपण वक्तृत्वसमारंभार्थ एक पगार कबूल केला असून आज तो द्यावा लागेल म्हणून हेडमास्तर आज आला नाहीं असें ऐकतों. असो. प्रेसिडेंटचें स्थान व्ही. सारंगपाणी यांस मिळाल्यावर सभेच्या कामास सुरवात होते. वक्तृत्वसमारंभासंबंधानें थोडी प्रस्तावना झाल्यावर, तत्संबंधानें विचार सुरू झाला. १३ मनुष्यांची व्यवस्थापक मंडळी स्थापित झाली. ह्या मंडळीचे अध्यक्ष सारंगपाणी, मंत्री मी ह्याप्रमाणें ठरलें. साधारण खर्चाचा अंदाज पाहातां २०० रुपये लागतील असें दिसूं लागलें. येथवर सभेंतील मंडळी हलकेच उठून गेली, व २५ मनुष्यांपैकीं १२ उरले! अस्तु. खर्च बराच होत असून वर्गणी इतकी होणार नाहीं व आपण रोख शेंपन्नास रु. देण्यास समर्थ नाहीं, एवढ्याकरितां समारंभार्थ येणाऱ्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था मी ठेवीन म्हणून मीं म्हटलें. प्रथमतः माझ्या गरिबीकडे पाहून मंडळी विरुद्ध होती, पण माझा आग्रह पाहून मंडळी कबूल झाली तरी XX–XX ही मंडळी, मजवर तुटून पडते. यांच्या गप्पा मात्र मीं पुष्कळ ऐकल्या आहेत, पण स्वदेशाप्रीत्यर्थ रतिमात्र मेहनत घेतांना पाहिलें नाहीं, व

स्थळप्रत.
अनुक्रमांक २३४७६ दि: २०/१२/६७
क्रमांक ८३० नों: दि: ३०/७/६७



विशेषतः नीच द्वेषबुद्धीनें केवळ मला दुखवावें हा यांचा हेतु पाहून माझें चित्त खवळलें व विलक्षण तंटा झाला. लोक म्हणतात, ही माझीच चूक आहे! बरोबर आहे. कारण ते माझ्या अंगीं शांतीची आशा करितात. आज वर्गणी १३५ जमली."

(२१ मे)

"भगवानदत्ताचें कालच्या तंट्याबद्दल भाषण व माझा निश्चय—आजपासून पुढें संतापाच्या स्वाधीन होऊन लोककार्यांत जर अंतराय झाला, तर त्याच क्षणीं हा देह ठेवायचा नाहीं."

(१२ जुलै)

"आज येथील प्रथम हिंदी वक्तृत्वसमारंभ सुरू झाला. समारंभास नागपुराहून १२ गृहस्थ आले आहेत. रायपुराहून ८, कामठीहून ३ व इतर ४ ठिकाणचे १० मास्तर, डे. इ. वगैरे आले आहेत. सभा दुपारीं २ वाजतां सुरू होऊन ६ वाजतां बंद झाली."

"××× च्या सांगण्यावरून राजा व दिवाण बिथरले आहेत. असल्या महामूर्खशिरोमणीला हा चांडाळ कसा लुटीत आहे, हें ह्याच्या ह्या भित्रेपणा-वरून सहज समजतें. आज सखाराम सहकुटुंब येतो."

(१३ जुलै)

"बालोद येथील हेडमास्तर व इतर मास्तर लोक केवळ तल्लीन झाले आहेत. पहिल्या विषयावर ९ वक्ते बोलले; दुसऱ्यावर ९ व तिसऱ्यावर ९ च आहेत. राजाकडचे पैसे कबूल केलेले १०० रुपये मिळतात कीं नाहीं शंका आहे."

(१४ जुलै)

"आजचा सर्व दिवस राजाकडील रुपये मिळविण्यांत गेला. १८६ बद्दल मोठ्या मुष्कीलीनें १०० रुपये मिळाले!"

१५ जुलैच्या डायरींत कोणाला काय बक्षिसें मिळालीं तें लिहून शेवटीं टिळक म्हणतात. "सेक्रेटरी या नात्यानें दोघां मैथली ब्राह्मणांकडून आम्हांस

" असें कसें ? मी जेवलों, कीं तुला जेवायला लागत नाहीं का ? "

" तसें कसें होईल ? "

" मग तसेंच माझी वर्गणी म्हणजे तुझी वर्गणी नाहीं. "

" पण मजजवळ पैसे कुठें आहेत ? "

" एक युक्ति आहे. आम्हांला आचारी मिळत नाहीं. पैसे फार मागतो. "

" मी करतें स्वैंपाक. मग पैसे द्यावे लागणार नाहींत ना ? "

आणि अशा रीतीनें माझी वर्गणी मीं भरली. दोनतीन दिवस मीं स्वैंपाक केला. टिळकांना आनंद झाला व समारंभ पार पडला.

समारंभासंबंधीं टिळकांच्या डायरींत खालील उल्लेख आढळतात.

( २० मे १८९४ )

" सभेची जमवाजमव; आज दिवाणसाहेबांस बोलाविलें, पण हे उदरंभरि पुढें पाहूं म्हणून आले नाहींत. मिल्टनला काम होतें म्हणून तो आला नाहीं. XXX XXX हे गांवांत नाहींत. आपण वक्तृत्वसमारंभार्थ एक पगार कबूल केला असून आज तो द्यावा लागेल म्हणून हेडमास्तर आज आला नाहीं असें ऐकतों. असो. प्रेसिडेंटचें स्थान व्ही. सारंगपाणी यांस मिळाल्यावर सभेच्या कामास सुरवात होते. वक्तृत्वसमारंभासंबंधानें थोडी प्रस्तावना झाल्यावर, तत्संबंधानें विचार सुरू झाला. १३ मनुष्यांची व्यवस्थापक मंडळी स्थापित झाली. ह्या मंडळीचे अध्यक्ष सारंगपाणी, मंत्री मी ह्याप्रमाणें ठरलें. साधारण खर्चाचा अंदाज पाहातां २०० रुपये लागतील असें दिसूं लागलें. येथवर सभेंतील मंडळी हलकेच उठून गेली, व २५ मनुष्यांपैकीं १२ उरले ! अस्तु. खर्च बराच होत असून वर्गणी इतकी होणार नाहीं व आपण रोख शेंपन्नास रु. देण्यास समर्थ नाहीं, एवढ्याकरितां समारंभार्थ येणाऱ्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था मी ठेवीन म्हणून मीं म्हटलें. प्रथमतः माझ्या गरिबीकडे पाहून मंडळी विरुद्ध होती, पण माझा आग्रह पाहून मंडळी कबूल झाली तरी XX-XX ही मंडळी, मजवर तुटून पडते. यांच्या गप्पा मात्र मीं पुष्कळ ऐकल्या आहेत, पण स्वदेशाप्रीत्यर्थ रतिमात्र मेहनत घेतांना पाहिलें नाहीं, व

... ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...


विशेषतः नीच द्वेषबुद्धीनें केवळ मला दुखवावें हा यांचा हेतु पाहून माझें चित्त खवळलें व विलक्षण तंटा झाला. लोक म्हणतात, ही माझीच चूक आहे! बरोबर आहे. कारण ते माझ्या अंगीं शांतीची आशा करितात. आज वर्गणी १३५ जमली."

( २१ मे )

"भगवानदत्ताचें कालच्या तंट्याबद्दल भाषण व माझा निश्चय—आजपासून पुढें संतापाच्या स्वाधीन होऊन लोककार्यांत जर अंतराय झाला, तर त्याच क्षणीं हा देह ठेवायचा नाहीं."

( १२ जुलै )

"आज येथील प्रथम हिंदी वक्तृत्वसमारंभ सुरू झाला. समारंभास नागपुराहून १२ गृहस्थ आले आहेत. रायपुराहून ८, कामठीहून ३ व इतर ४ ठिकाणचे १० मास्तर, डे. इ. वगैरे आले आहेत. सभा दुपारीं २ वाजतां सुरू होऊन ६ वाजतां बंद झाली."

"××× च्या सांगण्यावरून राजा व दिवाण बिथरले आहेत. असल्या महामूर्खशिरोमणीला हा चांडाळ कसा लुटीत आहे, हें ह्याच्या ह्या भित्रेपणावरून सहज समजतें. आज सखाराम सहकुटुंब येतो."

( १३ जुलै )

"बालोद येथील हेडमास्तर व इतर मास्तर लोक केवळ तल्लीन झाले आहेत. पहिल्या विषयावर ९ वक्ते बोलले; दुसऱ्यावर ९ व तिसऱ्यावर ९ च आहेत. राजाकडचे पैसे कबूल केलेले १०० रुपये मिळतात कीं नाहीं शंका आहे."

( १४ जुलै )

"आजचा सर्व दिवस राजाकडील रुपये मिळविण्यांत गेला. १८६ बद्दल मोठ्या मुष्कीलीनें १०० रुपये मिळाले!"

१५ जुलैच्या डायरींत कोणाला काय बक्षिसें मिळालीं तें लिहून शेवटीं टिळक म्हणतात. "सेक्रेटरी या नात्यानें दोघां मैथली ब्राह्मणांकडून आम्हांस

शिव्या मिळाल्या.''

वक्तृत्वसमारंभाच्या गडबडींत सखारामभाऊजी रखमाईसह आले होते. रखमाईस नववा महिना होता. भाऊजी तिला ठेवून गेले. नंतर तिला पाठवून देण्याविषयीं पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. शेवटीं भाऊजी तिला घेऊन जाण्यासाठीं पुन्हा आले. ते आल्यानंतर चारसहा दिवसांत रखमाईस घेऊन गेले. रखमाईचे दिवस भरत आल्यानें तिच्याबरोबर मलाहि जावें लागलें. त्यांच्याबद्दल टिळक आपल्या डायरींत लिहितात —

अस्तु. हे गृहस्थ ६०० मैलांवरून कांहीं कारण नसतां आले आहेत. हे आपल्या कुटुंबास घेऊन जाण्याविषयीं विचार करीत अहित. हिचे ९ महिने भरत आले आहेत, शिवाय पोरगी आजारी, पाऊस म्हणतो मी! धन्य आहेस बाबा!

भाउजींच्या बरोबर रखमाईच्या बाळंतपणासाठीं मी पंढरपुरास गेलें. पण रखमाई ज्या दिवशीं बाळंत व्हावयाची त्याच दिवशीं राजनांदगांवाहून टिळकांची तार आली, कीं 'मी आजारी आहें तरी सौभाग्यवतीस लौकर पाठवून द्यावें.' पत्रापेक्षां टिळकांना तारा करणेंच अधिक आवडे. तार तितकी लौकर जाते. मात्र खिशांत पैसे पाहिजेत. पैसे असले म्हणजे ते वाटेल तेव्हां तारा करीत.

तार पाहातांच कोवळ्या मनाचे भाऊजी घाबरून गेले. त्यांनीं ताबडतोब माझी तयारी केली. त्या वेळीं भाउजींच्या घरांत फार अडचण होती. पण त्यांनीं आपल्या अडचणीकडे मुळींच पाहिलें नाहीं. कसकसें जायचें, तें त्यांनीं मला अगदीं नीट समजावून लिहून दिलें. मीहि मग दत्तूला घेऊन एकटी जाण्यास निघालें.

पंढरपूरला एक ओव्हरसियर राहात होते. त्यांची बायको भिकूताईंची मैत्रीण होती. निघतांना मी त्यांचा निरोप घेण्यास गेलें. तिला मीं म्हटलें, , आज मी चाललें.'

"तुमच्याबरोबर कोण आहे?"

"कोणी नाहीं, मी एकटीच जाणार आहें."

"भिकूताई मला काय म्हणेल? मी तुम्हांला एक बाई पाहून देतें. हे पैसे घ्या." असें म्हणून तिनें माझ्या हातावर वीस रुपये ठेविले.

मी माझ्या सोबतिणीला घेऊन निघालें. ती विधवा होती. तारेमुळें मी फार घाबरलें होतें. त्यामुळें बरोबर खाण्यापिण्यास कांहीं घेतलें नव्हतें. आम्ही दोघी आपल्या उपाशींच प्रवास करीत होतों. दत्तूला काहींतरी घेऊन देत होतों. असें करतां करतां भुसावळ आलें.

भुसावळला रखमाईचे वडील राहात असत. ते मला स्टेशनवर भेटायला आले होते. भाउजींनीं त्यांना तार केली असावी. त्यांनीं बरोबर पुष्कळ फराळाचें आणलें होतें. ते आग्रह करूं लागले, कीं आजच्या दिवस येथें राहून जा.

"काका, मला राहातां येत नाहीं. तार आली आहे. मला लौकर घरीं गेलेंच पाहिजे."

म्हातारा फार फटकळ होता. प्रेमळ फार, पण अभद्रहि फार बोलायचा. त्यांनीं माझी समजूत केली, "हें पाहा मी सांगतों तुला, टिळक कांहीं मरत नाहीं तूं एक दिवस इथें राहिलीस तर."

"हें हो काय काका असें अभद्र बोलतां!"

मला रडायलासुद्धां आलें. गाडी चालूं लागली, रात्रीं आठाच्या सुमाराला ती नागपुरास येऊन उभी राहिली.

मी माझ्या सोबतिणीला घेऊन नागपुरास उतरलें व तपास करीत भिकाजी-पंतांच्या दाराशीं येऊन उभी राहिलें. दार बंद होतें. आमचा दोघींचा जीव भुकेनें अगदीं व्याकुळ झाला होता. दत्तूची किरकिर चालूच होती व मनांत टिळकांबद्दल हुरहुर लागून राहिली होती.

दाराला धक्के दिल्यावर कितीतरी वेळानें दार उघडलें गेलें. दार उघडतांच व मी नजरेस पडतांच पहिले शब्द कानीं पडले.

"वहिनी, माझें जातें कुठें आहे?"

“जळो तुमचें जातें; माझा भुकेनें प्राण चालला आहे. आधीं जेवायला वाढा.”

“चला. भाऊंचें पान वाढून ठेवलें आहे. ते गेले आहेत बाहेर. तुम्हा बसा आधीं.” मी जेवलें. बरोबरच्या बाईनें फराळ केला.

पांच सहा वर्षांपूर्वी आम्ही पहिल्यांदा नागपुरास होतों तेव्हां बुटींच्या चाळींत मीं ह्यांचें जातें आणलें होतें. त्यानंतर आम्हीं आमचे तीन चार संसार सोडले होते. टिळकांनीं हें जातें कोणाला तरी देऊन टाकलें होतें.

भिकाजीपंत आल्यानंतर राहाण्यासाठीं आग्रह करूं लागले. पण मला तार आलेली होती, तेव्हां मी राहाणें शक्यच नव्हतें. आम्ही सकाळीं साताच्या गाडीनें बसून अकराला राजनांदगांवीं पोंचलों. स्टेशनवर हमाल मिळेना. तेव्हां मीं घेतलें बोचकें, बाईनें घेतलें दत्तूला व आम्ही चालत चालत घरीं आलों. घरीं आलों तों दाराला कुलूप! माझ्या पोटांत धस्स झालें. घरवाली घरांत नव्हती, तेव्हां मी खऱ्यांच्या घरीं गेलें. तेथें जाऊन तपास केला तेव्हां समजलें, कीं टिळकांची प्रकृति खडखडीत आहे! मग आम्ही खऱ्यांच्या घरीं जेवलों व परत येऊन चार वाजेपर्यंत आंगणांत टिळकांची वाट पाहात बसलों.

चार वाजतां टिळक आले मीं विचारलें,

“हें काय? तार कशाला केलीत?”

“तूं कामानें दमून जाशील म्हणून.”

“इतकें दिवस राहिलें, आणखी दहा दिवसांनींच दमणार होतें का? त्याची केवढी बरें अडचण झाली.”

“घेतील करून ते.”

असो. नेहमींप्रमाणें थोडासा गोंधळ, आदळआपट होऊन मग आम्ही गुण्यागोविंदानें राहूं लागलों.

# ख्रिस्ती धर्माकडे वाटचाल

राजनांदगांवला आल्यावर टिळकांनीं वाचनाचा व अभ्यासाचा खूप सपाटा लावला होता. उर्दू शिकवण्यास एक मुनशी ठेवून त्याच्यापासून ते उर्दूचे पाठ घेत. इंग्रजी पुस्तकेंहि पुष्कळ वाचीत व त्यांतील कांहीं पाठहि करीत. त्यांच्या डायरीवरून दिसून येतें, कीं त्यांतल्या त्यांत त्यांनीं सिसरो व लेटर रायटर तोंडपाठ करण्याचा सपाटा लावला होता. बायबलचाहि अभ्यास फार जोरानें सुरू होता. प्रसिद्ध ख्रिस्ती लेखक रेवरेंड बाबा पदमनजी ह्यांच्याशीं त्यांचा जोराचा पत्रव्यवहार चालू होता. हेंहि त्यांच्या डायरीवरून दिसून येतें. त्यांच्याच सूचनेवरून बहुतेक इतर ख्रिस्तभक्तांचीं चरित्रेंहि त्यांनीं त्या वेळेस वाचलीं असावीं.

टिळक. अलीकडे पुष्कळ पत्रव्यवहार करतात, लोक येऊन त्यांच्याशीं वाद करीत बसतात, वगैरे कांहीं निराळेंच असें वातावरण मला भासूं लागलें. मी अडाणी लिहिण्यावाचण्याचा मी माझ्याकडून प्रयत्न करी, तरी हें काय गौडबंगाल आहे तें मला उकलत नसे.

माझें लिहिणें तर अगाधच असें. पेन्सिल, टाक, लेखणी, आणि शेवटीं आगपेटीची काडी देखील मला चालते. टिळक डायरींत म्हणतात, ( ७. फे. १८९४ ) " दत्तू गृहस्थ गात आहेत. पुढील श्लोक शिकवितों. " देवा मला दे बळ खेळण्याला ॥ जगांतील मौज पहावयाला ॥ बाईस नानास सुखांत ठेवी ॥ प्रभो विनंती मम आयकावी ॥ " लक्ष्मी काडीनें हा श्लोक लिहून घेत आहे. शंभर वेळां एक एक चरण सांगितला तरी पत्ता नाहीं. चुक्या तर कितीतरी !!

हा रखमाबाई खांबेटीचा अवतार ! ढोरासारखें काम करील ! तोंडाळपणामुळें सर्वांस अप्रिय होईल. ''

ह्या वेळेस बायबल वाचनाचा तडाखा चालला होता. त्यावरून तेथील मंडळींशीं त्यांचे कडाक्याचे वाद होत. डायरींत टिळक लिहितात, '' विष्णुपंत गोरे घरीं आले. त्यांनीं रे. बाबांचें चरित्र वाचून परत दिलें व बायबलला वाईट शिव्या दिल्या. त्यावरून त्यांचें व माझें झालें संभाषण. लक्ष्मीचें पित्त खवळलें व ती मूर्खासारखें चटकन् तोडून बोलली. त्यावरून तिचें व माझें लहानसें भांडण.'' बायबल-वाचनाचा–व विशेषतः डोंगरावरील उपदेशाचा परिणाम मात्र त्यांच्यावर होऊं लागला होता. वर उल्लेखिलेल्या लहानशा भांडणाबद्दल त्यांना फार वाईटहि वाटलें होतें 'माझ्या अंगीं क्षमा नाहीं, शांति नाहीं, कांहीं नाहीं. शिव ! शिव ! माझी विद्या, विचार व्यर्थ होत'' असें ते पुढें म्हणतात, ख्रिस्ती धर्माविषयीं ( डायरी १८–२–९४ ) ते म्हणतात, ''ख्रिस्ती धर्माकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होत आहे. मनुष्याच्या मनास शांति, भक्ति, नीति, धृति, मुक्ति देणारा हा धर्म दिसतो ! कांटे, झाडें, खोल दऱ्या, भयंकर पर्वत, भयाण वाळवंटें व मनोरम आंबराई यांनीं गजबजलेल्या अमर्याद हिंदु-धर्मापेक्षां ह्या लहानशा ख्रिस्तीधर्मरूप सदा प्रफुल्ल व सुफलित बगीच्यांत राहाणें बरें असें वाटत आहे ! पण आज तर असे उद्गार मुखावाहेर काढण्यासहि मला धीर नाहीं ! लक्ष्मी तर वाचण्याचासुद्धां कंटाळा करते ! केवळ हिच्या धाकानें व मायेनें मी अडलों आहे. परमेश्वरा, मला व तिला सुबुद्धि दे.''

टिळक आतांशीं रोज रात्रीं कोठें तरी जातात. पण कोठें हें कसें कळावें ? त्यांच्या ह्या वर्तनाचा शोध कोण लावणार ? घरवालीच्या मुलाला सांगावें तर तो मुलगा लहान. त्यालाहि टिळक रागाच्या भरांत मारायचे. तेव्हां एक दिवस मीं विचार केला, कीं स्वतःच ह्याचा शोध लावायचा. एक दिवस दत्तूला खायला घालून निजवला होता. आमचें दोघांचें कशावरून तरी भांडण झाल्यानें चुलीवर थालिपीठ चढलें होतें. रात्रीं नऊच्या सुमारास टिळक बाहेर निघाले. जातांना मला म्हणाले, '' मी खऱ्यांच्या घरीं जाऊन येतों. '' मीं दार लावून

घेतलें व दाराच्या फटींतून पाहूं लागलें. टिळक बुटाचा कर्र कर्र आवाज करीत खऱ्यांच्या घराच्या बाजूला वळले. दहापंधरा पावलें गेल्यावर ते हळूच मागें परतले व पाऊल न वाजवितां विरुद्ध दिशेला चोरट्या पावलांनीं चालूं लागले. चांदणें स्वच्छ पडलें होतें. थालिपिठाचें पातेलें तसेंच चुलीवर टाकून मीं घराचें दार सताड उघडलें व कांहीं अंतरावरून झपझप पावलें टाकीत टिळकांच्या मागें चालूं लागलें. पण पुढें डोक्यांत आलें, कीं लोकांच्या घरीं शोभा होण्यापेक्षां व दत्तू उठण्याच्या आंत घरीं गेलेलें बरें. तेव्हां त्यांना ऐकूं जाईल अशा बेतानें मीं म्हणालें, " खऱ्यांचें घर मागेंच राहिलें. ही वाट त्यांच्या घराची नाहीं." हे शब्द कानीं पडतांच टिळक मागें वळले. मींहि मुरुडकानोला खाल्ला. आतां आमची शर्यत सुरू झाली. मला पुढचा रस्ता दिसेनासा झाला. जमीन दुभंग होऊन मी आंत गडप होऊन जाईन तरी किती किती चांगलें होईल, असें मला झालें. मी घरीं पोंचलें व सैंपाकघरांत जाऊन आंतून कडी लावून घेतली.

टिळक येऊन दारांवर धक्के देऊं लागले. मी दार उघडीना. शेवटीं दार मोडायच्या बेतांत आलें तेव्हां मीं तें उघडलें. दार उघडतांच टिळकांनीं मला यथास्थित चोप दिला. तिकडे थालिपीठ रामरक्षा म्हणतच होतें. शेवटीं राग शांत झाल्यावर दोघांनींहि थंडा फराळ केला.

दुसऱ्या दिवशीं माझी सुजलेली पाठ पाहून मात्र टिळकांचें मन अतिशय दुःखी झालें.

त्या दिवशीं ते मिल्टन नांवाच्या एका युरोपियन माणसाकडे चालले होते. तेथें ते नेहमीं जात. बायबल वाचीत. ख्रिस्ती धर्मासंबंधीं वादविवाद करीत व खातहि.

" मिल्टनच्या बरोबर त्यांच्या घरीं मिसेस मिल्टनशीं परिचय. क्रिश्चियानिटी-संबंधीं माझी समजूत व तत्संबंधीं मिल्टनशीं भाषण. डायरींतील कित्येक कविता त्यांना वाचून दाखविणें, वगैरे. मनुष्यास इहपर सुखदायक, पूर्णपणें सुसाध्य व आनंददायक धर्म म्हणजे क्रिश्चियानिटी असा माझा विश्वास बनत आहे! जीझस् यास परमेश्वराचा पुत्र मी मानीत नाहीं, पण अत्यंत उदार महात्मा मानतों! हें मी प्रांजलपणें कबूल करतों." (१३-२-९४)

टिळक मिल्टनच्या घरीं जेवीत असतांना काय घडलें याबद्दल ते लिहितात, –" हें अद्‌भुत कृत्य पाहावें ह्या हेतूनें येथील कान्स्टेबल यशवंतराव हा कांहीं तरी काम काढून चारदां आंत आला. इतक्यांत मिल्टनची मुलगी सारा भात व रोटी घेऊन आंत आली. तर मग ह्या गृहस्थाची पक्कीच खात्री झाली ! जातिभेदामुळें परज्ञातीय मित्राच्या येथें जेवणें हें सुद्धां या लोकांना ब्रह्महत्येसारखें वाटत आहे ! पण माझें मन सुद्धां यशवंतरावास पाहून कचरलेंच ! धैर्यावांचून विचार कसे लंगडे आहेत पाहा."

(१९–२–९४)

छत्तिसगडांत मिशनचें काम करूं इच्छिणारे दोघे अमेरिकन मिशनरी किल्ल्यांत आले होते. एक वयोवृद्ध व दुसरा केवळ १८ वर्षांचा होता. त्यांच्याबरोबर मिल्टनकडे टिळकांनीं बायबलवाचन व प्रार्थना केली. त्याच्यावर टिळकांनीं एक कविताहि रचली आहे. प्रार्थना ही स्वभाषेंत आपण परमेश्वराशीं बोलतों आहों अशा बुद्धीनें करायला हवी.

**महिमा संस्कृत वाणीचा । थोर न संशय मज याचा ॥**
**परि जरि बोध न शब्दांचा । तरि तो काय कळे साचा ॥**
**तेंच तेंच हो संध्यावंदन नित्य एकसरसें । प्रेमा दे हृदया कैसें ॥**

ह्या मिशनरींनीं केलेल्या प्रार्थनेचा परिणाम टिळकांवर फार झाला.

टिळकांचा पत्रव्यवहार अलीकडे फार वाढला होता. पण ते कोणाला पत्रें लिहीत व त्यांना कोण पत्रें लिहीत हें मला कळत नसे. गांवांतले लोक मला सांगत, कीं त्यांच्या पत्रव्यवहारावर मीं नजर ठेवावी व तीं चोरून त्यांना द्यावीं. पण मी असल्या कृत्याला कधीं कबूल झालें नाहीं. एकदां मला टेबलावरचें बायबल घेऊन जाळून टाकण्याविषयीं उपदेश देण्यांत आला. मीं उत्तर केलें, बायबल काय हें मला ठाऊक नाहीं. पण मीं हें जाळलें तर त्यांना आणखी तें मिळणें अशक्य आहे का ? जगांतील सारीं तीं पुस्तकें जळून जातील का ? तर मग मी तें जाळीत नाहीं.

डायरीवरून आतां कळतें, कीं त्यांचा पत्रव्यवहार मुंबईच्या ख्रिस्ती पुढाऱ्यां-

बरोबर व विशेषतः रे. बाबा पदमनजी ह्यांच्याबरोबर होता. १८९५ सालीं रे. बाबांनीं आपला अनुभवसंग्रह प्रसिद्ध केला त्यांत (पान २६९-७०) टिळकांच्या पत्रव्यवहारासंबंधीं खालील उल्लेख सांपडतो :

"कांहीं दिवसांमागें एका अनोळखी विद्वान् पंडितांकडून मला पत्र आलें; त्यांत असें लिहिलें आहे, कीं यानें माझें अरुणोदय पुस्तक व दुसरीं पुस्तकें वाचलीं. त्यांविषयीं त्यानें असें दर्शविलें आहे, कीं 'ह्या पुस्तकांत शब्द-लालित्य किंवा शास्त्रदृष्ट्या कोणताहि गुण नसून मला तीं शेंकडों वेळां पुनः पुनः वाचावीं असें वाटतें. त्यांत खरा कळवळा, खरी भक्ति, साधेपणा व निरिच्छता आहे. आपलें आत्मचरित्र मी सध्यां सहाव्या खेपेस वाचीत आहें.' ह्या गृहस्थास कोणी ख्रिस्ती गृहस्थ भेटले होते. त्यांचें संभाषण झालें. त्यांचा सारांश सदरील पत्रांत दिला आहे तो येणेंप्रमाणें :

"त्या ख्रिस्ती मनुष्यानें मला बायबल वाचलें आहे काय, म्हणून विचारलें, मीं उत्तर दिलें, कीं मी वेद–वेदांगें, पुराणें वगैरे वाचून बसलों आहे. एकंदर धर्मशास्त्रें मनुष्यकृत आहेत; आतां माझें बायबल हें आकाश, ही पृथ्वी, हीं वनें, सारांश, आतां ह्या सृष्टींतच मी ईश्वराचें चरित्र वाचीत आहें. हें ऐकून तो गृहस्थ इंग्रजींत म्हणाला, कीं आपणापाशीं वादविवाद करण्याचें सामर्थ्य मला नाहीं. पण हें बायबल घ्या व हें निदान तीन वेळ वाचा. मीं त्यास होय म्हटलें, व वचनाप्रमाणें पण मोठ्या नाखुशीनें वाचावयास आरंभ केला. जों जों मी वाचीत गेलों तों तों मला भासूं लागलें, कीं हें वर लिहिल्याप्रमाणें भयाण जंगल नसून फार मनोहर असा छोटेखानी बगीचा आहे."

पुढें पुढें त्यांनीं बायबलचा अगदींच बारकाईनें अभ्यास चालविला असला पाहिजे, असें त्यांच्या १३ सप्टेंबरच्या डायरीवरून दिसतें. नेहमींच्या सरावा-प्रमाणें "सकाळीं उठलों" पासून सुरुवात नसून एखाद्या विद्यार्थ्यानें परीक्षेच्या पुस्तकासंबंधीं टीपा लिहाव्या तशा टीपा त्या पानावर आहेत.

* * *

टिळकांची प्रकृति ह्या वेळेस फारच ढासळूं लागली होती. त्यांत आपण फार

आजारी आहों—कधीं क्षय झाला, तर कधीं दमा लागला, तर कधीं तिसरेंच, असा टिळकांना संशय येई. त्यामुळें आतां आमच्या घरांत पुस्तकांच्या व्ही. प्यां. बरोबरच औषधांच्याहि व्ही. प्यां. चा सुळसुळाट झाला होता. रायपुरास त्यांनीं आपली छाती तपासून घेतली. तेथील एका डॉक्टरनें त्यांना सांगितलें, कीं डिस्पेप्शिया झाला असून लिव्हरजवळच्या दोन लंग्स् खराब झाल्या ! असें सांगणाऱ्या ह्या डॉक्टरसाहेबांनीं टिळकांची चेष्टा केली, कीं पैसे उकळण्यासाठीं कांहीं तरी सांगितलें कळत नाहीं. टिळक त्याच स्थितींत राहिले असते, तर त्यांचा मृत्यु मात्र खात्रीनें पंचवीस वर्षें आधीं नमूद करावा लागला असता.

ख्रिस्ती धर्माकडे त्यांचा उघड उघड कल दिसूं लागला व ज्ञानोदयांत तशा अर्थाचें त्यांचें कांहीं लिखाणहि प्रसिद्ध झालें.

एक दिवस टिळक नियमाप्रमाणें बाहेर गेले. मी मुलाला निजवून सचिंत मनानें बसलें होतें. सुखदुःख सांगायला तरी कोणी हवें ना ? तसें माझें कोण होतें ? एक मुलगा, पण त्याला खाण्याखेळण्यावांचून कांहींच माहीत नाहीं. तेथें टिळकांच्याविरुद्ध कांहीं माणसें होतीं. तेव्हां बाहेर कोणाशीं बोलण्याचें भय वाटे. त्यांतून भाषा निराळी. टिळक ख्रिस्ती होणार म्हणून चहूंकडे बभ्रा झालेला. ते घरीं आल्यावर मीं विचारलें,

"खरंच का हो तुम्ही ख्रिस्ती होणार ?"

"तुला कोण सांगतो ?"

"लोक !"

"तूं लोकांशीं लग्न केलेंस का माझ्याशीं ?"

"तुमच्याशीं !"

"मग मी सांगतों तें खरें, का लोक सांगतात तें खरें ?"

"तुम्हीं सांगतां तें."

"मग मी तुला सांगतों, मी ख्रिस्ती होत नाहीं."

इतकें भाषण झाल्यावर टिळक बाहेर गेले. मीं दाराला आंतून कडी लावून घेतली व अगदीं हंबरडा फोडून मनमुक्त रडलें. त्या रडण्यानें मला हलकें वाटलें.

अगदीं संथ पाण्यावर लहानशा वाऱ्याच्या झुळकीनें लहरी उठतात. माझें मन तर भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही ठिकाणच्या वादळानें उचंबळून आलें होतें. त्या दिवशीं मीं माझी पहिली कविता लिहिली. ती कविता मला अजून आठवते.

**म्हणे जातो सोडून नाथ माझा**
**अतां कवणाला बाहुं देव राजा**
**सर्वव्यापी सर्वज्ञ तूंच आहे**
**सांग कोणाचे धरूं तरी पाये**

कवितेची शेवटची ओळ लिहून होतांच दाराला धक्का बसला. कवितेच्या कागदाचा चोळामोळा करून मीं तो रद्दीच्या टोपलींत फेंकून दिला. दाराला धक्के बसतच होते. दार उघडण्याला उशीर झाला म्हणून टिळकांना राग आला. ते म्हणाले, ' तूं कधीं दाराला कडी लावीत नाहीस, नि आजच कशी लावली ? ' त्यांना माझा कांहीं संशय आला.

" तूं काय करीत होतीस ? "

" निजलें होतें. "

" दार कां नाहीं लौकर उघडलेंस ? "

" उठायला वेळ नको का ? मी काय यंत्र आहे वाटतं ? "

" चल, जेवायला वाढ. "

मी आंत गेलें. मी गेल्यावर टिळक चहूंकडे पाहूं लागले. त्यांना वाटलें, मीं कोणाला पत्र लिहिलें असावें. त्यांना कांहींच समजलें नाहीं.

शेवटीं त्यांनीं रद्दीची टोपली पालथी केली. ती शोधतां शोधतां माझा कवितेचा कागद त्यांना सांपडला. माझी कविता पाहून टिळकांना अत्यानंद झाला. त्यांनीं ती उचलून कपाटांत बंद करून ठेवली. अलीकडे टिळक आपले कागदपत्र कुलपांत ठेवीत. ते बाहेर गेल्यावर लोक येऊन मजजवळ त्यांचे कागदपत्र पाहाण्यास मागत. मी त्यांना म्हणें, ' मीं कधींच दाखविणार नाहीं. तुम्ही जरी माझ्या हिताचें सांगत असाल तरी मला ते दाखवितां येणार

आजारी आहों—कधीं क्षय झाला, तर कधीं दमा लागला, तर कधीं तिसरेंच, असा टिळकांना संशय येई. त्यामुळें आतां आमच्या घरांत पुस्तकांच्या व्ही. प्यां. बरोबरच औषधांच्याहि व्ही. प्यां. चा सुळसुळाट झाला होता. रायपुरास त्यांनीं आपली छाती तपासून घेतली. तेथील एका डॉक्टरनें त्यांना सांगितलें, कीं डिस्पेप्शिया झाला असून लिव्हरजवळच्या दोन लंग्स् खराब झाल्या! असें सांगणाऱ्या ह्या डॉक्टरसाहेबांनीं टिळकांची चेष्टा केली, कीं पैसे उकळण्यासाठीं कांहीं तरी सांगितलें कळत नाहीं. टिळक त्याच स्थितींत राहिले असते, तर त्यांचा मृत्यु मात्र खात्रीनें पंचवीस वर्षें आधीं नमूद करावा लागला असता.

ख्रिस्ती धर्माकडे त्यांचा उघड उघड कल दिसूं लागला व ज्ञानोदयांत तशा अर्थाचें त्यांचें कांहीं लिखाणहि प्रसिद्ध झालें.

एक दिवस टिळक नियमाप्रमाणें बाहेर गेले. मी मुलाला निजवून सचिंत मनानें बसलें होतें. सुखदुःख सांगायला तरी कोणी हवें ना? तसें माझें कोण होतें? एक मुलगा, पण त्याला खाण्याखेळण्यावांचून कांहींच माहीत नाहीं. तेथें टिळकांच्याविरुद्ध कांहीं माणसें होतीं. तेव्हां बाहेर कोणाशीं बोलण्याचें भय वाटे. त्यांतून भाषा निराळी. टिळक ख्रिस्ती होणार म्हणून चहूंकडे बभ्रा झालेला. ते घरीं आल्यावर मीं विचारलें,

"खरंच का हो तुम्ही ख्रिस्ती होणार?"

"तुला कोण सांगतो?"

"लोक!"

"तूं लोकांशीं लग्न केलेंस का माझ्याशीं?"

"तुमच्याशीं!"

"मग मी सांगतों तें खरें, का लोक सांगतात तें खरें?"

"तुम्ही सांगतां तें."

"मग मी तुला सांगतों, मी ख्रिस्ती होत नाहीं."

इतकें भाषण झाल्यावर टिळक बाहेर गेले. मीं दाराला आंतून कडी लावून घेतली व अगदीं हंबरडा फोडून मनमुक्त रडलें. त्या रडण्यानें मला हलकें वाटलें.

अगदीं संथ पाण्यावर लहानशा वाऱ्याच्या झुळकीनें लहरी उठतात. माझें मन तर भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही ठिकाणच्या वादळानें उचंबळून आलें होतें. त्या दिवशीं मीं माझी पहिली कविता लिहिली. ती कविता मला अजून आठवते.

**म्हणे जातो सोडून नाथ माझा**
**अतां कवणाला बाहुं देव राजा**
**सर्वव्यापी सर्वज्ञ तूंच आहे**
**सांग कोणाचे धरूं तरी पाये**

कवितेची शेवटची ओळ लिहून होतांच दाराला धक्का बसला. कवितेच्या कागदाचा चोळामोळा करून मीं तो रद्दीच्या टोपलींत फेंकून दिला. दाराला धक्के बसतच होते. दार उघडण्याला उशीर झाला म्हणून टिळकांना राग आला. ते म्हणाले, ‘ तूं कधीं दाराला कडी लावीत नाहींस, नि आजच कशी लावली ? ’ त्यांना माझा कांहीं संशय आला.

“ तूं काय करीत होतीस ? ”

“ निजलें होतें. ”

“ दार कां नाहीं लौकर उघडलेंस ? ”

“ उठायला वेळ नको का ? मी काय यंत्र आहे वाटतं ? ”

“ चल, जेवायला वाढ. ”

मी आंत गेलें. मी गेल्यावर टिळक चहूंकडे पाहूं लागले. त्यांना वाटलें, मीं कोणाला पत्र लिहिलें असावें. त्यांना कांहींच समजलें नाहीं.

शेवटीं त्यांनीं रद्दीची टोपली पालथी केली. ती शोधतां शोधतां माझा कवितेचा कागद त्यांना सांपडला. माझी कविता पाहून टिळकांना अत्यानंद झाला. त्यांनीं ती उचलून कपाटांत बंद करून ठेवली. अलीकडे टिळक आपले कागदपत्र कुलपांत ठेवीत. ते बाहेर गेल्यावर लोक येऊन मजजवळ त्यांचे कागदपत्र पाहाण्यास मागत. मी त्यांना म्हणें, ‘ मीं कधींच दाखविणार नाहीं. तुम्ही जरी माझ्या हिताचें सांगत असाल तरी मला ते दाखवितां येणार

नाहींत. ’ ते म्हणत, ‘ निदान त्यांच्या टेबलावरची बायबलची प्रत तरी जाळून टाका. ’ मी म्हणें, ‘ बायबलची ही प्रत जाळली, तर साऱ्या जगांतल्या प्रती नाहींशा होतील का ? सांगा. मग मी ती प्रत जाळतें. ’ माझ्या ह्या उत्तरानें तीं माणसें जात.

माझें कागद न दाखविण्याचें कारण मात्र निराळेंच होतें. आम्ही एका लहानशा संस्थानांत होतों. ह्या संस्थानांत त्या वेळीं दक्षिणी ब्राह्मणांवर डोळा होता असा माझा समज झाला होता; कारण कांहीं ब्राह्मण कांहींना कांहीं कारणांनीं तुरुंगांत पडले होते. तेव्हां टिळकांच्या कागदांत राजाविरुद्ध कांहीं असलें तर काय करायचें ! तशांत संस्थानांत बिगाऱ्यांवर कांहीं जुलूम होत असे. त्या बाबतींत टिळकांनीं बरीच खटपट चालविली होती.

ता. ४ जानेवारीच्या डायरींत टिळक ह्यासंबंधानें लिहितात,

‘ किल्ल्यांतून सुमारें १०० बिगारी घेऊन पांचसहा शिपाई खऱ्याकडील लोखंडी पिंजरा [ वाघाचा ] उचलून नेण्याकरितां जात आहेत ! काल सकाळीं १०० बिगारी फुकट उपाशीं ३ वाजेपर्यंत सकाळपासून ठेवून पुरता २० हात पिंजरा गेला नाहीं. डोक्यावर पिंजरा ! त्यामुळें दमदेखील टाकवत नाहीं, अशा स्थितींत एका बिगाऱ्याच्या पायाला लागून जखम झाली, त्यामुळें सहजच त्या वेदनांनीं तो व्याकुळ होऊन त्याच्याच्यानें नेट देववेना ! म्हणून एका चपराशानें त्यास गुरासारखे चाबूक हाणले ! कोण जुलूम ! केवढी निर्दयता ! ! आणि केवढी ही छत्तीसगडी गाढवांची भीरुता ! सहनशीलता ! पाश्चात्य देशांत १०० माणसांच्या समुदायावर २ शिपुर्डे असा जुलूम करितील काय ? आमचे राजेसाहेब डोळ्यांनीं ह्या बिगाऱ्यांची ही दुर्दशा पाहातील तर बरें होईल. राजेसाहेबांस ह्या बाबतींत आधीं अर्ज करावयाचा. ४-५ बिगाऱ्यांच्या बाबतींत हिंदींत अर्ज लिहून शारंगपाणी व सदाशिवराव यांच्याजवळ राजेसाहेबांजवळ देण्याकारितां दिला. असें ठरलें आहे, कीं हे दोघे असतील तेव्हां राजेसाहेबाजवळ मीं जाऊन ह्या अर्जासंबंधानें बोलणें करावें. कित्येक मंडळीस या कृत्याबद्दल मी पागल वाटत आहे ! आमचे शिरस्तेदारांस हें फाजीलपणाचें दिसत आहे.

ईश्वरा, तूं या गरिबांवर दया करून मला धैर्य व राजास दयाबुद्धि दे. मी तर कांहीं होवो, तुझ्यावर भाव ठेवून प्रयत्न करणारच करणार ! ' आणखी एक ठिकाणीं ते म्हणतात, ' राजाचे डोळे उघडतील असें एखादें पुस्तक लिहिण्याचा विचार आहे. '

ह्या प्रकरणावरून किंवा ख्रिस्ती होणार म्हणून ह्या प्रकरणाचा उपयोग करून टिळकांना गोत्यांत आणण्यासाठीं त्यांचे कागदपत्र कित्येक मंडळी पाहण्यास मागत असावी अशी माझी समजून झाल्यानें मी त्या बाबतींत फार जपूं लागलें. ते पडलें संस्थान, टिळक काय, कांहीं आडपडदा न ठेवतां वाटेल तें लिहून टाकायचे. कोणी ' ध ' चा ' मा ' करून त्यांना गोत्यांत आणलें तर काय करायचें ? मी त्यांच्या प्रत्येक चिठोऱ्याला जपूं लागलें.

आतां आमच्या येथें पाहुण्यांची गर्दी जमूं लागली. नित्य नवे व पुष्कळ पाहुणे येऊं लागले. टिळकांची त्यांच्याशीं बोलण्याची व वादविवाद करण्याची धांदल. हे लोक आहेत तरी कोण व कां येतात असें मीं टिळकांना एक दिवस विचारलें. त्यांनीं सांगितलें, ' हे सगळे माझें मन वळविण्यास येतात. ' एकजण म्हणाला, ' पाहा टिळक, मला कोणी नाहीं. माझी इस्टेट बरीच आहे; मी तुम्हांला ती सर्व बक्षीसपत्र करून देतों.' एकजण त्यांना दत्तक घेण्यास तयार झाला. टिळकांनीं त्यांना सांगितलें कीं ' मी ख्रिस्ती होत नाहीं. आणि झालोंच तर पैशासाठीं होणार नाहीं. ' आप्पासाहेब बुटींनीं बापूसाहेबांना मुद्दाम राजनांदगांवास पाठवून कळविलें, कीं मी तुम्हांस शंभर रुपये तुमच्या हयातीपर्यंत देतों. घर देतों व दत्तूची विद्या करतो ! पण तुम्ही ख्रिस्ती होऊं नका. टिळकांनीं बापूसाहेबांची समजूत करून त्यांना परत लावून दिलें.

टिळक ख्रिस्ती होणार अशी बातमी नाशकास पेंडशांना कळली, तेव्हां त्यांचें पत्र आलें, कीं तुम्ही मजजवळ येऊन राहा. मी तुम्हांला जन्मभर पोशीन व दत्तूची विद्या करीन. तुम्ही माझ्या येथें मांसमच्छर खा. वाटेल तें प्या. मी तुम्हांला मुळींच मना करणार नाहीं; पण तुम्ही ख्रिस्ती होऊं नका.

श्रीमंत आप्पासाहेब बुटींच्या ठिकठिकाणीं पेढ्या होत्या. त्या प्रत्येक ठिकाणीं

टिळकांच्या हालचालीवर नजर ठेवण्याविषयीं आप्पासाहेबांचे निरोप गेले. बापूसाहेबांनीं जातांना मला हें सर्व सांगितलें व पैसेहि दिले. जर कांहीं कम-जास्त वाटलें तर आम्हांला ताबडतोब तार करा. आम्ही कांहीं तरी करून त्यांना अटकावून ठेवूं. त्यांच्यावर कर्ज दाखवून शेवटीं तुरुंगांत ठेवूं, पण ख्रिस्ती होऊं देणार नाहीं. तुम्ही कांहीं काळजी करूं नका.

मिल्टनकडे टिळकांना दोन मिशनरी भेटले होते, त्यांच्यासंबंधीं टिळक मला सांगत होते.

"आज मला दोन मिशनरी भेटले. त्यांनीं इंग्रजींत प्रार्थना केली. अशी सुंदर प्रार्थना मीं कधींच जन्मांत ऐकली नव्हती. मला ती फार आवडली."

टिळक सांगत होते, पण माझें त्यांच्याकडे लक्षच नव्हतें. पुढें काय होतें इकडे माझें लक्ष होतें.

थोड्याच दिवसांनीं टिळक मुंबईस जाण्यास निघाले. मीं म्हटलें, 'मुंबईला कशाला चाललां?' ते म्हणाले, 'मला राजेसाहेबांकरतां घोडे खरेदी करावयाचे आहेत.'

खरें खोटें त्यांचें त्यांनाच माहीत. शेजारीपाजारी म्हणत, त्यांना जाऊं देऊं नका. ते ख्रिस्ती होण्यास जात आहेत. मला कांहीं सुचेना. त्यांना जर विचारलें तर ते म्हणायचे, तूं माझ्याबरोबर लग्न केलेंस कां लोकांबरोबर? दुसरें, ज्यांनीं मला असें सांगितलें त्यांच्याशीं ह्यांचें फुकट भांडण. तेव्हां मी आणखी कांहीं बोललें नाहीं. विचारांत मात्र खूप चूर झालें.

शेवटीं एक रामबाण युक्ति सुचली. मीं टिळकांना म्हटलें,

"तुम्ही दत्तूला बरोबर घेऊन जा."

"कां? त्याला कशाला?"

"उगीच."

माझा खरा हेतु असा होता, कीं मुलगा बरोबर असल्यावर ते कसे ख्रिस्ती होतील? हो ना करतां करतां दत्तूला बरोबर नेण्याचें ठरलें व मी निर्धास्त झालें.

टिळकांनीं वाटेंतच नाशकास उतरून दत्तूला पेंडशांच्या घरीं नेऊन ठेवला व स्वतः ते पुढें मुंबईला निघून गेले. दत्तूचें वय अवघें दोन वर्षांचें होतें. तो आईबापांपासून दूर कधींच राहिलेला नव्हता. तो पेंडशांच्या येथें फार रडे; तेव्हां त्यांनीं त्याला जलालपुरास माझ्या भावांच्या घरीं पाठविला. संकटें दारांतून येऊं लागलीं म्हणजे रोगहि खिडकीवाटे डोकावूं लागतो. जलालपुरास दत्तू गोवरानें आजारी पडला. सर्वांना काळजी वाटूं लागली. पण इकडे त्याच्या आजाराची खबर त्याच्या आईलाहि नव्हती व बापालाहि नव्हती.

मी नेहमींप्रमाणें लंकेची पार्वती बनून राजनांदगांवास एकटी बसलें होतें. बापूसाहेब बुटींनीं तारेसाठीं देऊन ठेवलेल्या पांच रुपयांपैकीं दोन रुपये जवळ शिल्लक होतें. बाकीचे तीन रुपये घरांत खर्च झाले होते.

टिळक गेल्यानंतर शेजारीपाजारी मजभोंवतीं जमा झाले. ते म्हणूं लागले, "हें काय केलेंत तुम्हीं! टिळकांबरोबर मुलाला कशाला धाडलात? तो मोठा थोडाच आहे? त्याला कांहीं समजेल का? टिळकांना आपल्या मुलासुद्धां नाहीं का ख्रिस्ती होतां येणार?"

खरेंच कीं, माझ्या हें कसें लक्षांत आलें नाहीं? माझ्या उरांत आतां दोन सुऱ्या खुपसल्या; पण वरून मी शेजाऱ्यांची समजूत करी कीं, एखादे वेळेस दत्तुमुळें त्यांचें मन फिरेल.

मन मात्र फारच उदास झालें होतें. नातलगांपासून पांचशें मैलांवर दूर मी एकटीच पतिविरहानें व पुत्रविरहानें तळमळत रात्रीच्या रात्री रडण्यांत घालवूं लागलें.

टिळकांना जाऊन तीन आठवडे झाले. मुलगा कोठें? टिळक कोठें? वगैरे मला कांहींच पत्ता लागेना. मी स्वतःला दोष देऊं लागलें. मीं होऊनच दत्तूला पाठविलें. मन चिंती तें वैरी नाहीं चिंतीत. स्टेशन जवळच होतें. रोज दोन वेळेस मी स्टेशनवर जाऊन, निराश होऊन हिरमुसलें तोंड करून परत यावें.

राजनांदगांवचे एक जेलर टिळकांचे मित्र होते. त्यांच्याकडे टिळकांचें बरेंच जाणें येणें असे. तेव्हां त्यांना कांहीं माहिती असण्याचा संभव होता म्हणून मीं

त्यांच्याकडे जाण्याचें ठरविलें. पण पुन्हा शंका आली, कीं मी त्यांच्याकडे गेलें तर लोक काय म्हणतील? तरी तशीच मी त्यांच्याकडे गेलें. ते बाहेर गेल्याचें चौकीवर कळलें. तेव्हां घरीं त्यांना बोलावलें आहे म्हणून निरोप सांगून मी घाबऱ्या घाबऱ्या आपल्या घरीं आलें.

गांवांत सगळे म्हणूं लागले, कीं आतां टिळकांचें काम खात्रीनें जाणार. एक हितचिंतक येऊन मला म्हणूं लागले, 'बाई, तुम्ही जाऊन दिवाणांचे पाय धरा म्हणजे तुमच्या नवऱ्याचें काम राहील. नाहींतर काम खात्रीनें जाणार.' माझा खरा सल्लागार देव होता. दिवाणांचे पाय धरण्याला माझें मन कांहीं घेईना. तरी पण लोकाग्रहास्तव मी दिवाणांच्या घरीं जाण्यास निघालें. अगदीं घराजवळ पोंचलें. येथें मनांत विचार आला, मीं दिवाणांचे पाय धरले आणि त्यानें टिळकांचें काम टिकवलें, तर लोक म्हणतील, बायको-मुळें टिळकांचें काम टिकलें. हरकत नाहीं काम गेलें तरी; पण लोकांनीं टिळकांना असें कांहीं म्हणतां उपयोगी नाहीं. काम गेलें तर भीक मागण्याचा तर प्रसंग येणार नाहीं. आणि आलाच तर ते भीक मागतील व त्यांच्यामागें मी पदर पसरीन. हे विचार येतांच मी अगदीं दिवाणांच्या उंबऱ्यावरून परत फिरलें.

चार वाजतां जेलर आले. मीं विचारलें,

"टिळक कोठें गेले?"

"मला कांहीच माहीत नाहीं."

"खरंच अगदीं?"

"अगदीं खरं."

"मला वाटलं, तुम्हांला तरी ठाऊक असेल."

"खरंच नाहीं."

"मग एक तार करा."

"कोणाला?"

"नारायण कृष्ण पेंडसे यांना नाशिकला तार करा."

" काय लिहूं ? "

" टिळक तिकडे आले आहेत का ? "

मीं जवळ असलेला रुपया त्यांना दिला व त्यांनीं माझ्या सांगण्याप्रमाणें तार केली.

माझी तार नाशकास पोंचली, त्याच दिवशीं मुंबईहून टिळकहि नाशकास येऊन पोंचले. त्यांना पाहतांच भिकूताईनें त्यांच्याजवळ पन्नास रुपये देऊन सांगितलें, कीं आत्तांच्या आत्तां राजनांदगांवाला जाऊन मनीला घेऊन या. तिला भेटून दोन वर्षें झालीं. आजच सकाळीं तिची तार आली आहे आणि आमचीहि बदली कोठें लांब होण्याचा संभव आहे. हें ऐकतांच टिळक निघाले ते राजनांदगांवाला येऊन पोंचले. मी माझ्या नित्यनियमाप्रमाणें स्टेशनवर हजर होतेंच. टिळकांना पाहून मला फार आनंद झाला. पण दत्तू कोठें दिसेना ! तेव्हां मी कावरीबावरी झालें.

" दत्तू कोठें आहे ? "

" मामाच्या घरीं. "

" कां ? "

" आपल्याला आतां तिकडे जायचें आहे. "

" मी येत नाहीं. "

" तुझ्या मेव्हण्याची बदली दूर होणार आहे. भिकूताईची लौकर भेट होणार नाहीं म्हणून तिनें तुला बोलावलें आहे. तिनें मजजवळ भाड्यालासुद्धां पैसे दिले आहेत. "

" दिले असतील— पण मला यायचें नाहीं. "

" तूं किती हट्टी आहेस ! तुला तुझ्या बहिणीलादेखील भेटावेसें वाटत नाहीं का ! किती निर्दय आहेस तूं ! "

" मला तुम्ही वाटेल तें म्हणा, पण मी येणार नाहीं. "

" मग काय करणार ? "

" काय म्हणजे ? मी येथें राहीन ! "

"पण मी येतों ना तुझ्याबरोबर."

"आणि कामाचें काय करणार?"

"राजीनामा देणार."

"बरं, सामानाची काय व्यवस्था?"

"सामानाकरतां पुन्हा येऊं."

धरलें तर डसतें, सोडलें तर पळतें अशी माझी स्थिति झाली. कोठेंहि जाण्याचें झालें, कीं सारें सामान आवरून, पेट्यांत भरून त्यावर माझ्या नांवाचें सील करून मी ठेवीत असें; कारण नाहींतर टिळक सर्व सामान वांटून टाकीत. अर्थात् सीलबंद सामान त्यांच्या तडाख्यांतून वांचे असें नाहीं. वहुतकरून एखादें गांव सोडलें म्हणजे माझी व त्या सामानाची पुन्हा कधीं गांठ पडत नसे. त्या गांवचीसुद्धां भेट होत नसे, मग सामानाचें कसचें काय! किल्ल्यांची मात्र मी नेहमीं धनीण असे व अशा किल्ल्या टिळकांच्या मृत्यूपर्यंत शेर दोन शेर वजनाच्या घरांत सांचून राहिल्या होत्या.

टिळक म्हणाले, 'आपण लौकरच परत येऊं, तेव्हां फार सामान बरोबर घेऊं नको' तरी मीं त्यांच्या ब्यागमध्यें दोन कोरीं लुगडीं, एक फाटकी पासोडी, एक फुटका तांब्या, इतकें सामान निघतां निघतां कोंबलेंच. आम्हीं दोघांनीं राजनांदगांवाला रामराम ठोकला व आमची गाडी पुढें चालू झाली.

नागपूरपर्यंत टिळक मजबरोबर होते. पण नागपूरचें स्टेशन येतांच त्यांना तेथल्या एका जरूरीच्या कामाची आठवण झाली. ते मला म्हणाले, 'तूं जा पुढें; मी येतों मागून. मला नागपुरास फार जरूरीचें काम आहे.' टिळकांचीं नेहमींच जरूरीचीं कामें निघत, तीं पुष्कळ वेळेला मला कळत नसत. मी तरी कुठें वाद घालीत बसणार. त्यांच्याशीं वाद घालणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणें होतें.

मला एकटीला घेऊन गाडीनें नागपूर सोडलें. जवळ पैसा नाहीं, नाकांतल्या मुंकल्याशिवाय दागिना नाहीं, दत्तूची बिंदली मोडून टिळकांना दोन तोळ्यांची अंगठी केली होती. तीहि त्यांनीं कोणाला देऊन टाकली

होती व मला हरवली म्हणून सांगितलें होतें. जवळ तांग्यालासुद्धां पैसे नव्हते.

नाशिक स्टेशनवर दुपारीं तीन वाजतां गाडी आली. नांव लक्ष्मीबाई, अवतार लंकेच्या पार्वतीचा. फाटकें लुगडें, नाकांत बारीकसें सुंकलें. हातांत टिळकांचें नांव मोठ्या अक्षरांत लिहिलेली बॅग अशा अवतारानें मीं स्टेशनवर उतरलें. दोन माणसें माझ्याकडे धांवत आलीं! मी घाबऱ्या घाबऱ्या त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलें. हीं अनोळखी माणसें असें काय करतात, मला कळेना. ते मला म्हणाले, "मावशी, तुम्हीं आम्हांला ओळखलें नाहीं? आम्हीं तुम्हांला पेंडशांकडून नेण्यासाठीं तांगा घेऊन आलों आहों."

भिकूताई दारांतच माझी आतुरतेनें वाट पाहात उभी होती. तांगा येतांच तिनें मला उतरून घेतलें. माझा तो अवतार पाहून तिला फार वाईट वाटलें. तिनें गहिंरून मला पोटाशीं घट्ट आवळून धरलें, "मने, काय ग बाई तुझी ही दशा झाली आहे!"

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी झाल्यावर माझें अंग धुणें वगैरे होऊन मी जेवायला बसलें. जेवून बाहेर येतें, तों भाऊ गाडी घेऊन आला. "मनू, दत्तूला फार खोकला येतो, तूं चल जलालपुराला." भिकूताई म्हणाली. "ने बाबा तिला. सीता निघाली वनवासा। पाठी लागती अवदसा। आईची व मुलाची जवळ जवळ सव्वा महिना ताटातूट झाली आहे."

जलालपुरास गेल्यावर दत्तूकडे पाहून मला अतिशय रडूं कोसळलें. तिसऱ्या दिवशीं भिकूताईकडून जलालपुरास आम्हांला नेण्यासाठीं तांगा आला व आम्हीं दोघें नाशिकला आलों, आतां सर्वांना फक्त टिळकांचीच काळजी राहिली होती.

सात आठ दिवसांनीं टिळक आले. मग मात्र आम्हीं सर्व निश्चिंत झालों. सर्व आनंदांत होतों. पण मला आपली काळजी वाटेच. पुढें काय करायचें याबद्दल प्रत्येकजण आपापल्यापरी टिळकांना सल्ला देऊं लागले. घारूमाई म्हणे,

‘ टिळक, तुम्हीं कीर्तन करीत हिंडा. मावशी न् दत्तू राहातील आमच्याकडे. तुम्हीं येऊन जाऊन राहात जा.’ पेंडसे म्हणत, ‘ तुम्ही आतां कोठेंच जाऊं नका, मी जिवंत आहें तोंवर तुम्ही सगळे माझ्याजवळ राहा. जेवणखाण माझ्याकडेच होत जाईल. शिवाय खर्चाला मी तुम्हांला दरमहा २५ रुपये देत जाईन.’

टिळक म्हणाले, ‘ मला कोणाचीच ताबेदारी नको. घारूमाईच्या सल्ल्या-प्रमाणें मी कीर्तनकार बनतो, पण कीर्तनासाठीं लागणारें सामान लागेल तें आणायला मला मुंबईला गेलेंच पाहिजे.’ पेंडसे म्हणाले, ‘ एवढ्यासाठीं मुंबईला कशाला जायाला पाहिजे ? मी बाळाला पत्र टाकतों, कीं तावड-तोब तुम्हांला पाहिजे तें सर्व सामान पाठवून देईल.’ पण टिळकांना ती कल्पना पसंत नव्हती. ते म्हणाले, ‘ तसें कसें ? हें सामान ज्याचें त्यानें आपल्या पसंतीनें खरेदी केलें पाहिजे.’ ह्यावर नानासाहेब काय बोलणार ? ते बिचारे गप्प बसले.

चांदोरीचे जहागिरदार त्या वेळीं नानासाहेबांच्या घरीं उतरले होते. त्यांना एका बाजूला घेऊन नानासाहेबांनीं सर्व हकीगत सांगितली व टिळकांना बरोबर नेऊन त्यांचें सर्व लक्ष दुसरीकडे लागेल असें करा अशी त्यांना विनंति केली. जहागीरदारांनीं पेंडशांची विनंति मान्य केली.

टिळक थोड्या वेळानें पेंडशांना म्हणाले, “ जहागीरदार मला चांदोरीस आपल्याबरोबर चला म्हणतात.” पेंडसे म्हणाले, “ बरें आहे, जा त्यांच्या-बरोबर कांहीं दिवस.”

जातांना टिळकांनीं घरच्या प्रत्येक माणसाचा निरोप घेतला. दत्तूला मांडीवर घेऊन त्याचे मुके घेतले, तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून खळखळा अश्रु-धारा वाहूं लागल्या. सर्वांना वाटलें, टिळकांना आतां पश्चात्ताप झाला. आतां ते संसारांत लक्ष घालतील.

दहाबारा दिवसांत चांदोरीहून टिळक परस्पर मुंबईस निघून गेले. म्हणजे टिळकांचा पेंडशांच्या घरचा तो शेवटला दिवस ठरला.

दोन चार दिवसांनीं टिळक खिस्ती झाल्याची बातमी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली.

टिळकांच्या बाप्तिस्म्यानंतर काय काय झालें तें पुढें सांगेन, येथें खुद्द टिळकांनीं ' एका विद्यार्थ्यांची साक्ष ' या नांवानें आपल्या खिस्ती होण्यासंबंधीं जो मजकूर एका पुस्तिकेंत प्रसिद्ध केला आहे त्यांतील कांहीं उतारे देते. चमत्कारांना लोक हसतात पण आपलें धर्मान्तर हाच चमत्कार आहे असें सांगून टिळक पुढें म्हणतात :

" सुमारें दोन सव्वा दोन वर्षांपूर्वींच मी ह्या खिस्ताचा व त्याच्या अनुयायी जनांचा हाडवैरी नव्हतों का ? आज खिस्तसेवेस्तव सदा उत्सुक अशा ह्याच हातानें त्याच खिस्ताच्या निंदेच्या भरांत किती कागद भरकांडिले आहेत ! आज जी जिव्हा खिस्ताच्या एका कृपेची साक्ष द्यावयास सदा तयार आहे, तिनेंच त्या पवित्र नामाची एका कालीं नाहीं नाहीं ती अवहेलना केली आहे ना ? त्या वेळेस हा खिस्ती होईल असें कोणाला स्वप्नांत तरी वाटलें होतें का ? हिंदुधर्माचा इतका अभिमान बाळगणारा हा गृहस्थ, त्या धर्माला त्याज्य मानून, बायबलवर्णित देवाच्या इच्छेस सादर होईल अशी त्या वेळेस कोणीं कल्पना तरी केली असेल काय ? तथापि माझा तो अभिमान गळाला व आज मी देवापुढें खिस्ताचा हात धरून लहान बाळाप्रमाणें उभा आहें, ह्याचें माझें मलाच आश्चर्य वाटत आहे. यापेक्षां आणखी चमत्कार कोणता पाहिजे ? ह्या चमत्काराच्या खरेपणाला प्रमाणें नकोत. हा चमत्कार आहे, कीं ही सर्व देवाची दया होय, यावांचून अन्य शब्दांनीं याचें स्पष्टीकरण व्हावयाचें नाहीं. खिस्ती होणारा मी नव्हें; तर त्या ममताळू मेंढपाळानेंच मजकरितां आपलीं नव्याण्णव कोंकरें सोडून, मला भयंकर पहाडांतून धुंडाळून आणिलें आहे. माझ्या अंगांत किती अभिमान आणि ताठा भरून उरलेला ! माझी तयारी नवीन धर्मसंस्थापना करण्याची होती— तोंच मी आतां येशूचा शिष्य बनलों आहे !

हिंदुस्थानासाठीं एक नवीन धर्म स्थापण्याचा मी प्रयत्न करीत होतों खराच, इतकेंच नाहीं, तर ज्याच्या योगानें जगांतील सर्व राष्ट्रं एका बंधुत्वाच्या अनु-

बंधनानें एकजीव होतील असल्या धर्माच्या मागें मी लागलों होतों. ह्या कल्पनेंत कित्येक वर्षें मी गुंतून गेलों होतों. ही कल्पना म्हणजे पुढें खिस्तीपणाचें महा-मंदिर रचण्याकरितां, परमेश्वराच्या सदय करानें, माझ्या अंतःकरणांत आधार-शिलेसारखी बसविण्यांत आली होती. ”

आपल्याला खिस्ताकडे आणण्यास आपली आई ‘ परोक्षापरोक्ष कारण परंपरेंतील ’ मूळ कारण आहे असें त्यांना वाटतें. त्या कारणपरंपरेंतील कांहीं कारणें त्यांनीं अशा प्रकारें दिलीं आहेत.

“ माझी आई फार भाविक व प्रेमळ होती. तिची ही वृत्ति कशानें बनली तें मला माहीत नाहीं. तिनें खिस्ताचें नांव कधीं काढल्याचें मला आठवत नाहीं; पण “ देवाला भिऊन वागा, ” “ सर्वांचें बरें करा, ” हा उपदेश ती आम्हांला नेहमीं करीत असे. मातृपणाच्या पवित्र कर्तव्यासंबंधानें माझ्या आईसारखी परि-पूर्ण बाई माझ्या पाहाण्यांत दुसरी आली नाहीं. तीं मूर्तिपूजक असून असें कसें होईल, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं; कारण ईश्वर आपल्या विशिष्ट कार्यार्थ, मूर्तिपूजकांसहि सद्गुण देऊन साधनीभूत करून घेतो, हें आपणांस ठाऊक आहे. याशिवाय फार लहानपणीं मला एक शिक्षक मिळाला होता; ह्या गृहस्थाला स्वदेशाच्या उपयोगी कसें पडावें हें जरी कधींच समजलें नाहीं, तरी स्वदेश-प्रीतीला मात्र त्याच्या अंतःकरणांत सदैव पूर आलेला होता. त्यानें आपल्या हाताखालचीं लहान लहान डोकीं, तशींच आपल्याप्रमाणें स्वदेशभक्तीनें वेडीं करून टाकिलीं. ह्या व अशाच इतर परिस्थितीमुळें माझ्या मनाला कांहीं चमत्कारिक वळण मिळालें. मला चांगलें आठवतें, कीं अगदीं बाळपणीं वर्गांत भूगोलाचा धडा चालला असतां, तेथें माझें शरीर मात्र असें; पण मन दूर प्रवास करायला जाई. कारण, इकडे धडा चाललेला व तिकडे माझें डोकें पुढें हिंदुस्थानचें काय होणार ह्या गहन विचारांत गढून गेलेलें ! इतक्या लहानपणींसुद्धां माझ्या देशांतला जातिभेद पाहून माझें पित्त खवळे. मी केवळ चवदा पंधरा वर्षांचा असतां एकदां मुलांच्या सभेंत, “ एकंदर दानधर्माचा मक्ता ब्राह्मणांकडेच कां ? ” या विषयावर बोललों होतों. त्या वेळेस माझ्या बापानें कांहीं मौजेनें व कांहीं

रागानें " हा पुढें एक दिवस बाटणार " म्हणून जे उद्गार काढले होते, ते आतां मला आठवतात. एखाद्या जुन्या चालीस चिकटून राहणाऱ्या शिक्षकाच्या हाताखालीं मी कधीं होतों असें मला आठवत नाहीं. बहुधा माझी गांठ सुधारक शिक्षकांशींच पडलेली असे; येणेंकरून कोणत्याहि विषयावर प्रांजलपणें विचार करण्याची मला संवय लागली.

" हिंदुस्थानला ऊर्जितकाळ आला, तर तो धर्माच्या महाद्वारानेंच येईल अशी माझी पक्की समजूत झाली होती. त्यामुळें माझ्या शक्तीप्रमाणें धर्म व तत्त्वज्ञान ह्या विषयांच्या अभ्यासांत मी गढून गेलेला असें. शेवटीं नागपुरास मला एक खरा आश्रयदाता मिळाला. आजपर्यंत मी ह्या सन्मान्य गृहस्थाला आपल्या बापाप्रमाणें मानीत आहें. चारपांच वर्षांपूर्वीं मी ह्या गृहस्थाचें काम पत्करिलें. काम म्हणजे नुसतें लेखनवाचन. हिंदुधर्मासंबंधीं, विशेषतः वैदिक व अध्यात्मवाङ्मय जितकें उपलब्ध होतें तितकें मिळविण्यांत त्यांनीं हजारों रुपये खर्च केले. त्या अध्यात्मज्ञानांत व कल्पनासागरांत एकसारखा तीन वर्षें मी पोहत होतों. मला अभ्यासाची हौस होती व ती ह्या सन्मित्रानें पुरविली. शेवटीं माझ्या नवीन धर्माचीं मूलतत्त्वें मीं तयार केलीं तीं हीं :

१. जगाचा कर्ता कोणीतरी अन्तःकरणविशिष्ट व्यक्ति आहे, व त्याला सर्व मनुष्यजाती लेंकरांसारखी आहे.

२. सर्व धर्मशास्त्रें मनुष्यकृत असून, ईश्वराचें ज्ञान करून देणारा एकच ग्रंथ आहे. तो ग्रंथ हें जग होय.

३. पूर्वजन्म व पुनर्जन्म हें मुळींच नाहींत. मनुष्याचें सुखदुःख व्यक्तीच्या आनुवंशिक, आत्मविशिष्ट व सामाजिक कर्तव्यपराङ्मुखतेवर अवलंबून आहे.

४. देवाचे ठिकाणीं भाव व इहपरलोकीं बंधूता हेंच सर्व धर्माचें बनलेलें सार होय.

५. मूर्तिपूजेसारखें पाप दुसरें नाहीं.

ह्या मतांची संस्थापना करावयाची म्हणजे मला एक अवलियाच बनलें पाहिजे होतें; नंतर मी निरनिराळ्या धर्मसंस्थापकांच्या चरित्रांचा अभ्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

करूं लागलों. त्यांपैकीं पुष्कळांचें व माझें जमलें नाहीं. तथापि गौतमबुद्धाची व माझी गट्टी जमली. आश्चर्य वाटतें, कीं बायबल किंवा ख्रिस्त ह्या गोष्टी माझ्या स्वप्नींहि आल्या नाहींत. याचें पहिलें कारण बायबलची अत्यंत सोपी भाषा होय. आपणांस सर्वथा दुर्गम किंवा ज्याच्या मेंदूला बरीच कसरत पडेल अशा विषयांत ब्राह्मणाचें लक्ष लागावयाचें हा त्यांचा जणू काय जन्मस्वभावच बनून गेला आहे. जर हिंदुधर्मावरील संस्कृत ग्रंथांचीं प्राकृत भाषान्तरें करून तीं ब्राह्मणांच्या हातांत दिलीं, तर माझी खातरी आहे, कीं ते तीं केराकचऱ्या-सारखीं समजून दूर फेंकून देतील."

आपल्या नवीन धर्माचा आराखडा तयार झाल्यावर टिळकांना ख्रिस्ती धर्माची माहिती झाली. आपण आखीत असलेला धर्म पूर्णावस्थेंत असलेला दिसून येतांच त्यांनीं अत्यंत नम्रपणें व धर्मसंस्थापकाचा मिळणार असलेला मान झुगारून देऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. ह्या धर्माकडे कोणकोणत्या परिस्थितीनें त्यांना ओढून आणलें तें सांगतांना ह्या लेखांत टिळक म्हणतात :

"सन १८९३ मध्यें माझ्या आश्रयदात्याच्या इच्छेस अनुसरून धर्म व तत्त्वज्ञान ह्या विषयांवर एक नवीन मासिक पुस्तक काढण्याचें मीं पतकरिलें; म्हणजे याचें संपादकत्व मात्र मीं आपल्याकडे घेतलें. दोन अंक निघाले व पुढें माझ्या नवीन मतांमुळें मला तें काम सोडून द्यावें लागलें. याच वेळेस सुमारें ८५ कोसांवर राजनांदगांव नांवाचें एक संस्थान आहे, तेथील राजे-साहेबांनीं मला काम दिलें. तेथें जाण्याकरितां मीं आगगाडीवर आलों. बंगाल–नागपूर रेल्वेवर तिसरा व दुसरा वर्ग यांच्या दरम्यान एका वर्गाचा डबा असतो. त्याला "इंटर्मिडिएट" वर्ग म्हणतात. या वर्गाचें मीं तिकीट काढिलें होतें. डब्याजवळ येऊन पाहातों, तर आंत एक साहेब बसले आहेत. नेहमींच्या अनुभवानें त्यांनीं धुडकावून द्यावयाचें, पण तसें कांहीं न करतां उलट त्यांनीं थोडेंसें हसून मला जागा दिली. या ठिकाणीं मीं आपल्या पर-वानगीनें एक गोष्ट आपणां श्रोत्यांस सुचवितों; ती ही, कीं आगगाडीकडले कित्येक गोरे नोकर व गोरे प्रवासी आपल्या वर्तनानें ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या

वाटेंत डोंगरासारखें आड येत आहेत. हिंदु लोकांत ख्रिस्ती धर्मासंबंधानें हसूं येण्यासारखें अज्ञान आहे. तरी त्यांस ख्रिस्ती म्हणविणारांनीं कसें वागावें याची बरीच कल्पना करितां येत आहे. तशांत ते, जितके गोरे तितके सारे ख्रिस्ती असें समजत असल्यावरून कित्येक साहेबांच्या दुर्वर्तनामुळें त्यांच्या दृष्टीनें ख्रिस्तीपणाला काळिमा लागत आहे. लोकांशीं अरेरावीचें वर्तन करून ख्रिस्ताच्या राज्यास धक्का पोंचविणारे हे लोक रेल्वेकडे कितीतरी भरले आहेत. असें कां, याचें मला वारंवार सखेदाश्चर्य वाटतें. प्रीति म्हणजे काय, तें ह्या रेल्वेवरील लोकांस शिकवावयास देव आपले कांहीं सेवक पाठवो. असो. आमच्या डब्यांतले सोबती फार सभ्य व नम्र होते. इतके, कीं त्यांस पाहून कोणाचेंहि मन प्रसन्न झालें असतें. या वेळेस वाचण्यासाठीं मीं आपल्याबरोबर एकच पुस्तक म्हणजे माझें आवडतें भवभूतीचें उत्तररामचरित घेतलें होतें. संस्कृत कवितेंत या कवीची उदात्त कविता मला फार आवडते आमचे दोघांचे कवि व कविता यात्रिषयीं बरेंच बोलणें झालें. या गृहस्थाच्या संभाषणानें माझें फार रंजन केलें; मला लवकरच आढळून आलें कीं साहेबांस थोडेसें संस्कृत येत असून, संस्कृत वाङ्मयाची चांगलीच माहिती आहे, हळूहळू त्यांनीं विषय बदलिला व ख्रिस्तीधर्मासंबंधानें माझीं मतें कशीं काय आहेत वगैरे विचारपूस चालविलीं. मीं त्यांना आपल्या नवीन धर्माची कल्पना सांगितली. ती ऐकून ते मोठ्या गंभीरतेनें म्हणाले, " मला वाटतें, आजपासून दोन वर्षांच्या आंतच तुम्ही ख्रिस्ती व्हाल. " हें ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें. त्याचें तें भविष्य वेडेपणाचें होय, असेंच मला भासलें. त्यानंतर आम्ही पुष्कळ वेळ बोलत होतों. साहेब मला म्हणाले, " तरुण गृहस्था, देव तुला ओढून घेत आहे. बायबलाचा अभ्यास कर. ख्रिस्तचरित्राचें चांगलें परिशीलन कर म्हणजे खरोखर ख्रिस्ती होशील. " हें बोलणें मला फार अविचाराचें वाटून मीं मनांत त्यांची कांहींशीं निर्भत्सना केली. शेवटीं त्यांनीं प्रार्थना केली व मला एक नव्या कराराची प्रत काढून दिली. मला सकृद्दर्शनीं तें पुस्तक न आवडलें तरी तें वाचीन असें मीं त्यांस वचन दिलें. त्या पुस्तकांत

कांहीं अर्थ आहे असें समजून मीं हें वचन दिलें नाहीं, तर केवळ त्या सुशील गृहस्थाच्या भिडेस्तव मला तें द्यावेंसें वाटलें. माझें स्टेशन आल्यावर आमचा दोघांचा प्रेमपुरःसर सलाम होऊन मीं खालीं उतरलों. आश्चर्य, कीं आम्हीं शेवटपर्यंत एकमेकांचें नांव गांव विचारून घेतलें नाहीं."

"एकादा वरिष्ठ जातीचा हिंदु ख्रिस्ती होतो असें त्याच्या जातिबांधवांस समजलें म्हणजे त्याचे जे सुखसोहळे होत असतात, ते इतरांस समजणें कठीण आहे. इतर प्रसंगीं दूर राहिली, तरी दुखण्यावाहण्यांत जशी आई रात्रं-दिवस आपल्या मुलाजवळ राहाते, तसा देव या वेळेस मजजवळ होता. नाना प्रकारच्या संकटांतून त्यानें मला वांचविलें. मी दुष्टानें मनुष्याचा धाक वाटून कित्येक वेळां, कित्येक जणांशीं लपंडाव केला असेल, पण असल्या पाप्याला देवानें सोडलें नाहीं. माझी नोकरी गेली, मला 'अठराविश्वें' दारिद्र्य आलें, मला आपल्या एकुलत्या एक लेकरास सोडावें लागलें, आजपर्यंत वस्तुच्छायेप्रमाणें दोघें राहिलों असून, माझी पत्नी हो नाहीं करीत करीत शेवटीं माहेरालाच लुब्ध झाली, पण देवानें मला आपल्यापासून दूर केलें नाहीं. शेवटीं १८९४ च्या नोव्हेंबर महिन्यांत लागोपाठ तीन रात्रीं मला स्वप्नांत कोणीं येऊन म्हणावें, कीं "त्यांच्या मागें जा; भिऊं नको." मग मात्र मला राहावेना. जरी बाप्तिस्मा घ्यावयास मला पुष्कळ अडचणी होत्या; तरी आपण ख्रिस्ती आहों असें आतांच्या आतां जगांत प्रसिद्ध करावें असा माझा निश्चय झाला व तदनुसार मी अमेरिकन बोर्ड मिशनचे रे. जे. ई. आबटसाहेब यांस मी ख्रिस्ती आहे असें प्रसिद्ध करण्याविषयीं विनंति केली. त्यांनीं ज्ञानोदयांत तें प्रसिद्ध केलें व माझा जीव खालीं पडला. मग तर पुसूंच नका! मला माझ्या देशबांधवांची प्रीति जर नसती, तर मी खुशाल पुढें कोण कोणते प्रकार झाले ते जगापुढें मांडले असते, पण नको. असल्या गोष्टी विसरून जावें हेंच बरें. देवाचें गौरव असो, कीं पुढें लवकरच ता. १० फेब्रुवारी १८९५ रोजीं मुंबईस, अमेरिकन मिशनाच्या भजनालयांत माझा बाप्तिस्मा झाला. दोन वर्षांपूर्वी केलेलें आगगाडींतल्या साहेबांचें भविष्य पुरें झालें.

देवानें मला आपणांजवळ ओढून घेतलें आजपर्यंत तोच असल्या अशक्त मुलाचें अतर्क्य वात्सल्यानें परिवर्तन करीत आहे. ”

तुम्ही ख्रिस्ती झाला असतां तुमची आजची उत्कट स्वदेशभक्ति कायम राहील काय? तुमचें आमच्यावर प्रेम राहील काय? अशा प्रकारचा प्रश्न एका मित्रानें केल्यावरून त्यास टिळकांनीं दिलेलें उत्तर प्रसिद्ध झालें आहे. त्यांत ते म्हणतात,

**वैराग्नीवर मी प्रेमाचा पाऊस पाडिन जाण।**
**स्वदेशबांधव मम हो वाहिन तुमच्या कार्या प्राण॥**
**रडेन मी बा झुरेन मित्रा श्रमेन राहिन लोकीं।**
**मरेन अपुल्या देशासाठीं ख्रिस्ती जरि झालों कीं॥**
**असें करीन मी तरीच शोभा होउनिया ख्रिस्ताचा।**
**दास! नातरी ख्रिस्ती केवळ ढोंगी उपनांवाचा॥**

# बहिणीच्या घरट्यांत

टिळकांनीं चांदोरीच्या जहागीरदारांचा वाडा सोडला तो रेव्हरंड, डॉक्टर जस्टिन ॲबट ह्यांच्या बंगल्याची पायरी चढण्यासाठीं. भायखळ्याला उतरून शोध करीत करीत ते तेथील अमेरिकन मिशन हायस्कूल-मध्यें शिरले. टिळकांना ह्या मंडळीनें ठेवून घेतलें व त्यांचा ख्रिस्ती धर्माचा अभ्यास झाल्यावर चार महिन्यांनीं त्यांना मुंबईतील भेंडीबाजारांत अमेरिकन मिशनचें चर्च होतें त्यांत बाप्तिस्मा दिला.

बाप्तिस्म्याच्या वेळेपासून ख्रिस्ती लोकांत एक प्रकारच्या निराळ्याच विचारांचा ओघ टिळकांनीं सुरू केला असें म्हणतां येईल. डॉ. ॲबट हे त्या वेळीं टिळकांचे धर्मगुरू होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्यांच्या किंवा दुसऱ्या कोणाहि परदेशीय मिशनरीच्या हातून बाप्तिस्मा न घेतां हिंदीच माणसाच्या हातून तो घेण्याचा निश्चय त्यांनीं जाहीर केल्यामुळें रेव्हरंड तुकारामजी नथोजी ह्यांच्या हातून त्यांचा बाप्तिस्मा झाला. हे गृहस्थ त्या वेळीं ज्ञानोदयाचे संपादक होते. बाप्तिस्मा झाल्यावर टिळक वसईस राहाण्यास गेले.

टिळक ख्रिस्ती झाल्याचें वृत्त हां हां म्हणतां जिकडे तिकडे अग्नीप्रमाणें पसरलें. नाशकालाहि ही खबर ताबडतोब आली. पेंडशांच्या घरीं त्यांचे नातेवाईक व इष्टमित्र एकसारखे खेपा घालूं लागले. पण नानासाहेबांनीं अशी व्यवस्था ठेवली होती, कीं घरांत कोणीच कांहीं बोलत नसत, मंडळी आली कीं गुपचिप बसत. कांहीं कांहीं माझ्याकडे व दत्तूकडे पाहून गुंजडासारखें तोंड करून डोळे पुशीत. हा सारा प्रकार पाहून माझी स्थिति फारच चमत्कारिक झाली. मला

वाटे कांहीं अपघात होऊन टिळक वारले कीं काय ? ' मन चिंती तें वैरी न चिंती ' असें माझें झालें होतें. नानासाहेब एकसारखे खिडकीच्या बाहेर तोंड काढून दोन्ही हातांनीं आपलें डोकें गच्च दाबून धरून बसलेले होते. दत्तूचीहि स्थिति फार विलक्षण झाली होती. लोक त्याला एकसारखे उचलून घेत, खायला देत, पण बोलत कोणी नसे. हें सारें पाहून माझे हातपाय अगदीं गळून गेले.

एक दिवस नानासाहेबांनीं दोन तीन बैलगाड्या करून घरांतील सारीं माणसें पांडवलेण्यीं पाहाण्यास रवाना केलीं. घरीं भिकूताई व नानासाहेब एवढींच राहिलीं. नतर त्यांनीं जलालपुरास टांगा पाठवून केशवरावमामांना बोलावून आणलें. हेतु हा कीं माझ्या कानांवर कांहीं न जातां भिकूताईस व त्या दोघां मेहुण्यांस काय बोलायचें, काय करायचें, तें मनमोकळेपणें बोलतां करतां यावें. केशवराव टांगा पोचतांच नाशकास आले. नानासाहेब म्हणाले, ' काय रे बाबा, झाली गोष्ट ती झाली. आतां पुढें काय करायचें ? '

मामा म्हणाले, ' आम्ही दोघे भाऊ आहों. तिलाहि आम्ही आमचा तिसरा लंगडा लुळा भाऊच समजूं. '

पेंडसे म्हणाले, ' तें राहूं दे. तिचें काय करायचें तें आपण पुढें पाहूं. टिळकांची खरी खबर आपल्याला प्रथम लागली पाहिजे. मला वाटतें तूं मुंबईस बाळाकडे जा व तुम्ही दोघे टिळकांचा तपास करा. त्यांनीं जर धर्मान्तर खरेंच केलें असलें तर मग प्रश्नच नाहीं. नाहींतर ही अंगठी घेऊन जा व त्यांच्या खिशांत किंवा कशांत तरी टाकून दे व पोलीसकडे वर्दी दे. खटला येथेंच येईल; मग पाहूं काय करायचें तें. हे पंचवीस रुपये घेऊन जा. '

केशवराव ताबडतोब निघाले. बाळासाहेब हे नानासाहेबांच्या वडील बंधूंचे चिरंजीव. ह्या दोघांनीं मुंबईतील सर्व मिशनांत तपास केला. शेवटीं टिळक वसईस असल्याची बातमी लागल्यावरून ते वसईला गेले.

तेथें टिळकांची व ह्या दोघांची गांठ पडली. टिळकांनीं त्यांना विचारलें, ' तुम्ही कां आलां ? '

त्यावर केशवरावमामा म्हणाले ' आम्ही तुमचा तपास करायला आलों

आहों.' टिळक म्हणाले, 'मी ख्रिस्ती झालों आहें. तुम्ही आपल्या बहिणीला संभाळा. नाशकास नि जलालपुरास गंगा आहे. ती जीव बीव देईल तेव्हां तिच्याकडे लक्ष ठेवा."

केशवरावमामा म्हणाले, 'जीव दिला, नाहींतर जिवंत राहिली, आतां तुमचा तिचा कांहीं संबंध राहिला नाहीं.'

असें म्हणून ते दोघे वसईहून जड अंतःकरणानें परत फिरले. निघतांना टिळकांच्या शेंडीकडे पाहून तर केशवरावांना हुंदकाच आला. रागाचा कितीहि आव आणला तरी आरंभापासूनच त्यांचे डोळे पाण्यानें भरले होते ते निघतांना पूर्णपणें निथळले.

केशवराव माझे बंधु. माझी भाची घारूमाई ह्यांना मामा म्हणे, त्यामुळें त्यांना सारींच माणसें मामा म्हणूं लागलीं होतीं व मलाहि तिच्याचमुळें सारीं मावशी म्हणत.

केशवरावमामा आले ते एकदम माडीवर भिकूताई अंथरुण धरून पडली होती तिच्याजवळ जाऊन बसले. त्यांनीं तिला सारी हकीकत सांगितली. भिकूताईचा कंठ दाटून आला. ती म्हणाली, 'आतां तूंच मनीला काय सांगायचें तें सांग. मला कांहीं सांगवणार नाहीं.'

मला वर बोलाविण्यांत आलें. धसक्यानें माझी स्थिति इतकी वाईट झाली होती कीं मला जिना चढवत नव्हता! लहान मुलासारखी मी हात टेकीत टेकीत भावावहिणींपुढें येऊन बसलें.

भावानें मला उपदेश करण्यास सुरुवात केली. 'सीता, सावित्री, तारा, द्रौपदी अशा किती तरी पतिव्रता होऊन गेल्या, कीं ज्यांची कीर्ति दिगंती गाजते आहे—'

मी म्हणालें,

"सारें पुराण माहीत आहे मला. तुम्ही मला उपदेश करण्यासाठीं वर बोलावलें का? तुम्ही मुंबईला गेलां होतां त्यांची खबर काढण्यासाठीं; ते जिवंत आहेत ना? तें मला आधीं सांगा."

"हो! जिवंत आहेत! खुशाल आहेत! आनंदांत आहेत! तेथें

मास्तरचें काम लागलें आहे. पण...पण..."

"मग पण काय ?"

"ते ख्रिस्ती झालेत."

"होऊं द्या झाले तर. कुठेंहि असले नि सुखरूप असले म्हणजे झालें. ते गेले तर काय माझ्या कपाळाचें कातडें थोडेंच काढून नेलें आहे त्यांनीं."

असें म्हणून मी ताडकन उठलें व झराझरा जिन्याच्या पायऱ्या उतरून खालीं आलें. पण खालीं पोंचतांच माझ्या अंगांतील सर्व शक्ति नाहींशीं झाली. दारांत घरांतील इतर स्त्रिया उत्सुकतेनें उभ्या होत्या. त्यांनीं मला धरून खालीं बसविलें. सर्वांना ही बातमी माझ्या आधींच कळली होती. त्या माझी समजूत करूं लागल्या.

"जाऊं दे गेला तर! देवानें तुला सोन्यासारखा मुलगा दिला आहे! एक लाल नि पृथ्वीचें मोल! तो उद्यां तुझें पांग फेडील! जितके तूं कष्ट सोसलेस तितकें पुढें सुख भोगशील."

पण तो सारा बोध पालथ्या घागरीवर पाण्यासारखा होता. मी एखाद्या दगडासारखी झालें होतें. माझ्या डोळ्यांना अश्रूंचा टिपूस येईना, माझी भयंकर कोरड वळली होती.

रात्रीं आमचें बहुतेक नातलग पेंडशांच्या घरीं निजायला आले होते. जेवलें कोणीच नाहीं. बोलतहि कोणी नव्हते. ज्यानें त्यानें यावें, जें सांपडेल तें अंथरावें व कोठेंहि पडावें. कोणीहि कोणाला या, बसा, खा, प्या, वगैरे कांहींच म्हणत नव्हतें. बंगल्यांत बरीच मंडळी निजली होती. मी मध्यें निजलें होतें. माझ्या एका बाजूला केशवरावमामा व दुसऱ्या बाजूला भिकू-ताई निजली होती. दोघांनीं माझ्या अंगावर हात टाकले होते. एक दोनच्या सुमाराला निद्रेनें आपलें जाळें विणण्यास सुरुवात केली. त्यांत माझ्या खेरीज सर्वजण सांपडलीं. मीं दोन्ही बाजूंनीं दोघांचे हात माझ्या अंगावरून हात काढून हळूच बाजूला ठेवले. ओंचा पदर कसून बांधला. दत्तूला शोधलें, पण तो कोठेंच दिसेना. मग मीं आपला मार्ग सुधरला.

पुढल्या दाराशीं येऊन मी दाराचा अडसर काढूं लागलें. इतक्यांत तेथेंच राउंडची अलबेल कानांवर पडली. ती ऐकतांच माझ्या डोक्यांत विचार-मालिका सुरू झाली. ‘जर मला ह्या लोकांनीं पकडून चौकीवर नेऊन बसविली आणि उद्यां चौकशी सुरू झाली, तर ही अमक्या अमक्याची मेहुणी म्हणून बाहेर जग बडबडणार व बिचाऱ्या नानासाहेबांना खालीं पहावें लागणार!’ सुंदरनारायणाच्या डोहांत जाऊन उडी टाकण्याचा माझा बेत होता. पण तो वरील विचारांनीं बदलला व मी घरांतील आडाजवळ येऊन उभी राहिलें. हा आड फारच अरुंद आहे. पुन्हा विचार आला, ‘ह्यांत मी जीव दिला तर मला बाहेर काढणार कसें? शिवाय उद्यां पंच-नाम्याच्या वेळीं नानासाहेबांना माझ्यासाठीं खालीं पाहण्याचा प्रसंग येणारच!’ माझें डोकें भणाणून गेलें. मला कांहीं मार्ग दिसेना. मी आपल्या जागीं येऊन निजलें. थोड्या वेळानें मीं केशवरावमामांचा हात इतका जोरानें दाबला कीं ते खडबडून जागे झाले. त्यांनीं भिकूताईला उठविलें. ‘भिकूताई, ही पहा मनी कशी करते आहे!’ सारीं माणसें उठून बसलीं. काय झालें, काय झालें म्हणून जें तें विचारूं लागलें. मामांनीं माझा हात कसा तरी सोडविला. त्यासरशीं माझ्या हातापायांची सर्व शक्ति गेल्यासारखें झालें; मी चांगली शुद्धींत होतें, भोंवतालीं काय काय चाललें आहे तें मला कळत होतें पण माझी यत्किंचित्‌हि हालचाल होत नव्हती. जें तें आपापल्यापरी उपाय योजना सुचवीत होतें. माझी दांतखीळ बसली. कोणी म्हणत हिला संतापवायु झाला. कोणी म्हणत हिनें विष खाल्लें. भिकूताई म्हणाली, ‘तिजजवळ एक दिडकीहि नाहीं. ती विष कोठून आणणार?’ तर कोणी कल्पना काढली कीं तिनें काचा कुटून खाल्या असतील. त्या वेळेस नुकतेंच केरवे निघाले होते. बहिणीनें मला व घारूमाईला नऊ नऊ केरवे भरले होते. ते तिनें चटकन मोजून पाहिले.

वैद्याला आणलें. नाडीचा त्याला पत्ता लागेना. त्यानेंहि अभिप्राय दिला कीं मीं विष खाल्लें. माझी दांतखीळ उघडून थोडा मोरावळा, कांहीं मात्रा, दूध

वगैरे भरविण्याचा सपाटा सुरू झाला. मला सगळें कळत होतें पण एखाद्या लाकडाच्या ओंडक्याप्रमाणें मी झालें होतें. माझी जीभ आंत ओढल्यासारखी होऊन तिजवर कांटे आले होते. ते पुढें महिनाभर गेले नाहींत. भिकूताईच्या आजार पळाला. तिनें बिछाना गुंडाळला. मजजवळ उभीच्या उभी राहून ती रात्रंदिवस काढूं लागली. तिला माझें सारेंच करावें लागे. मी नुसती पडून होतें. माझे दांत सुद्धां तिला घासावे लागत. वरचेवर मला दूध ताक पाजावें लागे.

बऱ्याच दिवसांनीं माझ्या अंगांत थोडीशी शक्ति आली. मी अंथरुणांतल्या अंथरुणांत उठून बसूं लागलें. आतां माझ्या डोळ्यांना पाझर फुटले. एकसारखें मला रडूं येत असे. डोळ्यांचें पाणी म्हणून खळेना; झोपेंत काय तें थांबत असेल तेवढेंच. मी कोणाशींच कांहीं बोलत नसे.

एक दिवस मी त्याच वाड्यांत एक बिऱ्हाड होतें त्यांच्या घरीं जाऊन रडत बसलें. दत्तू आपला बहुतेक वेळ मावशीजवळ घालवीत असे. पण त्या वेळीं मला दुसरीकडे बसलेली पाहून तो मजजवळ आला व त्यानें माझा हात धरून मला तेथून उठवून देवघरांत नेऊन बसविलें. तेथें नेऊन बसविल्यानंतर तो मला म्हणाला, "बाई! तूं आपल्या मामा मावशीच्या घरांत रड. लोकांच्या घरांत रडूं नको. तुला काय हवें सांग. घारूमाईसारखे पुष्कळ दागिने पाहिजेत का? का मावशीसारख्या सरी वाकी पाहिजेत? का मोठ्या कांठाचीं लुगडीं पाहिजेत? सांग. पण अशी उगीच रडूं नको."

भिकूताई जवळच होती. तिनें दत्तूला ओढून पोटाशीं धरलें व रडत रडत मला म्हटलें, "घे त्याची तरी अक्कल थोडीशी." मला मात्र दत्तूचे हे सुखाचे शब्द ऐकून अधिकच दुःखाचे उम्हाळे आले.

त्याच उन्हाळ्यांत टिळक प्रथम महाबळेश्वरास गेले. महाबळेश्वरास टिळकांनीं प्रथमच फुलामुलांवरील आपल्या प्रसिद्ध कविता लिहिण्यास सुरुवात केली. अहमदनगरचे रेव्हरेंड डॉक्टर ह्यूम ह्यांनीं त्यांना जवळजवळ आपल्या घरीं ठेवून घेतलें होतें. तेथें. डॉ. ह्यूमचीं मुलें, त्यांच्या मेहुण्याचीं मुलें व महाबळेश्वरांतील

पुढल्या दाराशीं येऊन मी दाराचा अडसर काढूं लागलें. इतक्यांत तेथेंच राउंडची अलबेल कानांवर पडली. ती ऐकतांच माझ्या डोक्यांत विचार-मालिका सुरू झाली. ‘जर मला ह्या लोकांनीं पकडून चौकीवर नेऊन बसविली आणि उद्यां चौकशी सुरू झाली, तर ही अमक्या अमक्याची मेहुणी म्हणून बाहेर जग बडबडणार व बिचाऱ्या नानासाहेबांना खालीं पहावें लागणार!’ सुंदरनारायणाच्या डोहांत जाऊन उडी टाकण्याचा माझा बेत होता. पण तो वरील विचारांनीं बदलला व मी घरांतील आडाजवळ येऊन उभी राहिलें. हा आड फारच अरुंद आहे. पुन्हा विचार आला, ‘ह्यांत मी जीव दिला तर मला बाहेर काढणार कसें? शिवाय उद्यां पंच-नाम्याच्या वेळीं नानासाहेबांना माझ्यासाठीं खालीं पाहण्याचा प्रसंग येणारच!’ माझें डोकें भणाणून गेलें. मला कांहीं मार्ग दिसेना. मी आपल्या जागीं येऊन निजलें. थोड्या वेळानें मीं केशवरावमामांचा हात इतका जोरानें दाबला कीं ते खडबडून जागे झाले. त्यांनीं भिकूताईला उठविलें. ‘भिकूताई, ही पहा मनी कशी करते आहे!’ सारीं माणसें उठून बसलीं. काय झालें, काय झालें म्हणून जें तें विचारूं लागलें. मामांनीं माझा हात कसा तरी सोडविला. त्यासरशीं माझ्या हातापायांची सर्व शक्ति गेल्यासारखें झालें; मी चांगली शुद्धींत होतें, भोंवतालीं काय काय चाललें आहे तें मला कळत होतें पण माझी यत्किंचित्‌हि हालचाल होत नव्हती. जें तें आपापल्यापरी उपाय योजना सुचवीत होतें. माझी दांतखीळ बसली. कोणी म्हणत हिला संतापवायु झाला. कोणी म्हणत हिनें विष खाल्लें. भिकूताई म्हणाली, ‘तिजजवळ एक दिडकीहि नाहीं. ती विष कोठून आणणार?’ तर कोणी कल्पना काढली कीं तिनें काचा कुटून खाल्या असतील. त्या वेळेस नुकतेंच केरवे निघाले होते. बहिणीनें मला व घारूमाईला नऊ नऊ केरवे भरले होते. ते तिनें चटकन मोजून पाहिले.

वैद्याला आणलें. नाडीचा त्याला पत्ता लागेना. त्यानेंहि अभिप्राय दिला कीं मीं विष खाल्लें. माझी दांतखीळ उघडून थोडा मोरावळा, कांहीं मात्रा, दूध

वगैरे भरविण्याचा सपाटा सुरू झाला. मला सगळें कळत होतें पण एखाद्या लाकडाच्या ओंडख्याप्रमाणें मी झालें होतें. माझी जीभ आंत ओढल्यासारखी होऊन तिजवर कांटे आले होते. ते पुढें महिनाभर गेले नाहींत. भिकूताईच्या आजार पळाला. तिनें बिछाना गुंडाळला. मजजवळ उभीच्या उभी राहून ती रात्रंदिवस काढूं लागली. तिला माझें सारेंच करावें लागे. मी नुसती पडून होतें. माझे दांत सुद्धां तिला घासावे लागत. वरचेवर मला दूध ताक पाजावें लागे.

बऱ्याच दिवसांनीं माझ्या अंगांत थोडीशी शक्ति आली. मी अंथरुणांतल्या अंथरुणांत उठून बसूं लागलें. आतां माझ्या डोळ्यांना पाझर फुटले. एकसारखें मला रडूं येत असे. डोळ्यांचें पाणी म्हणून खळेना; झोपेंत काय तें थांबत असेल तेवढेंच. मी कोणाशींच कांहीं बोलत नसे.

एक दिवस मी त्याच वाड्यांत एक बिऱ्हाड होतें त्यांच्या घरीं जाऊन रडत बसलें. दत्तू आपला बहुतेक वेळ मावशीजवळ घालवीत असे. पण त्या वेळीं मला दुसरीकडे बसलेली पाहून तो मजजवळ आला व त्यानें माझा हात धरून मला तेथून उठवून देवघरांत नेऊन बसविलें. तेथें नेऊन बसविल्यानंतर तो मला म्हणाला, "बाई! तूं आपल्या मामा मावशीच्या घरांत रड. लोकांच्या घरांत रडूं नको. तुला काय हवें सांग. घारूमाईसारखे पुष्कळ दागिने पाहिजेत का? का मावशीसारख्या सरी वाकी पाहिजेत? का मोठ्या कांठाचीं लुगडीं पाहिजेत? सांग. पण अशी उगीच रडूं नको."

भिकूताई जवळच होती. तिनें दत्तूला ओढून पोटाशीं धरलें व रडत रडत मला म्हटलें, "घे त्याची तरी अक्कल थोडीशी." मला मात्र दत्तूचे हे सुखाचे शब्द ऐकून अधिकच दुःखाचे उम्हाळे आले.

त्याच उन्हाळ्यांत टिळक प्रथम महाबळेश्वरास गेले. महाबळेश्वरास टिळकांनी प्रथमच फुलामुलांवरील आपल्या प्रसिद्ध कविता लिहिण्यास सुरुवात केली. अहमदनगरचे रेव्हरेंड डॉक्टर ह्यूम ह्यांनीं त्यांना जवळजवळ आपल्या घरीं ठेवून घेतलें होतें. तेथें. डॉ. ह्यूमचीं मुलें, त्यांच्या मेहुण्याचीं मुलें व महाबळेश्वरांतील

जेथें तेथें उगवणारीं रानफुलें ! टिळकांची वृत्तीहि त्या तऱ्हेचीं काव्यें लिहिण्यास फार अनुकूल होती. ह्या एकंदर सर्व तऱ्हेच्या आनंदी वातावरणांत त्यांचा ‘ क्षय ’ हां हां म्हणतां पळाला. महाबळेश्वर सोडल्यानंतर टिळक नगरास ह्याच डॉ. ह्यूमच्या हाताखालीं नगरच्या ईश्वरविद्येच्या शाळेंत शिकूं लागले व एकीकडे तेथल्या विद्यार्थ्यांना कांहीं कांहीं विषय शिकवूंहि लागले.

पेंडशांची बदली पंढरपुरास झाली. तेथेंच सखारामभाऊजी होते. पेंडशां-बरोबर मीहि पंढरपुरास गेलें. पण माझें होतें तेंच होतें. म्हणजे डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं व तोंडाला वाचा फुटली नाहीं. माझें सारें भिकूताईला व तिच्या जावेला करावे लागे. भिकूताईची ही जाऊ बालविधवा होती. दत्तूला तिचा लळा फार होता. तिच्या लुगड्यावरून तो तिला लालमावशी म्हणत असे. त्यानें आपल्या प्रत्येक मावशीला अशींच नांवें दिलीं होतीं. ठेंगणी मावशी, लुगडी मावशी, लालमावशी अशीं त्यांचीं नांवें असत व प्रत्येकीला आपापलें नांव पाहून दत्तूचें कौतुक वाटे.

पंढरपुरास जातांच दत्तूकरतां भिकूताईनें एक मास्तर ठेवला. हा मुलगा शिकून शहाणा झाला, कीं आपण मिळविली. मग आपल्याला बहिणीची कांहीं काळजी नाहीं असें तिला वाटे. अभ्यासाकरतां ती एकसारखी त्याच्या मागें लागे. नानासाहेब म्हणत, ‘ कां त्याच्या मागें लागतेस ? खेळूं दे त्याला. त्याचें का वय गेलें आहे ? शिकेल तो हळू हळू ! ’ पण भिकुताईनें आपला हेका कधीं सोडला नाहीं.

पेंडसे दत्तूचे फार लाड करीत. त्याला सोडून ते कधीं कांहीं खात नसत. पण नानासाहेबांच्या फराळाच्या वेळेस दत्तूनें तेथें असूं नये असें भिकूताईला वाटे. फराळाची वेळ झाली कीं तिनें म्हणावें, ‘ दत्तू, फराळाची वेळ झाली, ’ कीं दत्तूनें म्हणावें, ‘ मावशी मी बाहेर खेळतों. ’ पण ही सूचना करतांना व त्याचें उत्तर ऐकून तिला फार वाईट वाटे. तिला वाटे दत्तूनें नानासाहेबांना कांहीं त्रास दिला तर ? त्यापेक्षां नानासाहेबांनींच त्याला हाक मारलेली बरी. पण नानासाहेबांनीं मात्र एक दिवस दत्तूखेरीज फराळ केला नाहीं. ते त्याला

टिळक म्हणत. कामावरून येतांच त्यांनीं त्याचा शोध करावा. 'टिळक कुठें आहे? त्याला बोलवा फराळाला. टिळक, अरे टिळक, हा घे लाडू.' आणि मग टिळक आल्यावर दोघांनीं फराळ करायचा. हा रोजचा क्रम ठरलेला होता. रोज फराळाचें काय करायचें याबद्दल लालमावशीनें आधीं दत्तूचा विचार घ्यावयाचा व त्याच्या विचारानेंच फराळाचें तयार व्हावयाचें.

मी मात्र अंथरुणावर पडलेली असें. जेवणसुद्धां मला बळें बळें घालीत. पुढें पुढें मी लुगडीं फाडूं लागलें. भिकूताईला वाटलें ही आतां खात्रीनें वेडी होणार. ही त्यापेक्षां मेली तर बरें. माझ्यामागें वेडीला कोण संभाळील? माझी ही स्थिति टिळकांच्या कानांवर गेली. त्यांची तार आली. आतांपर्यंत त्यांच्याकडून एखादें पत्रहि आलेलें नव्हतें. तारेमागून पत्र आलें व त्यांत आपल्या पत्त्याचीं पाकिटेंहि त्यांनीं पाठविलीं होतीं. मीं मोठ्या चोरीनें त्यांना पत्र पाठविलें. मला पत्र पाठविण्याची परवानगी नव्हती. माझ्या पत्रांत कवितेवांचून कांहीं नसे. ह्या पत्रांत जी कविता पाठविली तिच्या तीन ओळी मला आठवतात.

**सखि रात्रंदिन छळित मला सवत कल्पना**
**आशा ही बहिण खरी रंजवी मना**
**चिंता परि दासि तिची करित वल्गना**

कविता करणाऱ्या माझ्या ह्या नव्या उद्योगानें मला जरा बरें वाटूं लागलें. पण कविता मीच करतें का दुसरें कोणी मला त्या करून देतें ह्याबद्दल टिळकांना शंका वाटे.

सखारामभाऊजी पंढरपुरासच होते. ते रोज मला भेटायला येत. अशी एक गप्प उठली होती कीं भाऊजी टिळकांना दरमहा शंभर रुपये खर्चाला पाठवितात. टिळक जरी ख्रिस्ती झाले होते आणि भिकूताईचा त्यांच्यावर राग होता तरी तिला त्यांच्याबद्दल अभिमान वाटे. ही गप्प तिच्या कानांवर गेल्यापासून ती भाउजींवर फार संतापली होती. एक दिवस भाऊजी आले तेव्हां नानासाहेब जेवीत होते; तेथेंच भाउजींना पाट टाकून दिला;

भिकूताई त्यांच्यापुढें येऊन उभी राहिली व म्हणाली,

" का हो ! तुमच्या भावानें घोपटी कधींपासून घेतली ? "

भाउर्जांना भिकूताईच्या बोलण्याचा व एकंदर आविर्भावाचा कांहींच अर्थ कळेना. ते म्हणाले.

" तुम्ही काय म्हणतां तें मला कळत नाहीं. "

" कशाला कळेल ? तिकडे भावाला शंभर रुपये दरमहा पाठवितां नि इकडे भावजयीचीं लुगडीं फाटलीं तीं तुम्हांला दिसत नाहींत ! "

भाऊजी भिकूताईचें सर्व बोलणें मुकाट्यानें खालीं मान घालून ऐकून घेत होते. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं माझ्याकरतां एक लुगडें व दत्तूकरतां दोन कुडतीं पाठविलीं.

एक दिवस सखारामभाऊजी मजजवळ येऊन बसले. इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्यावर त्यांनीं हळूच टिळकांचा विषय काढला. मी निजूनच हं हं करीत होतें. भाऊजी म्हणाले, " वहिनी, तुम्ही आजारी आहां. किती तरी माणसें तुमचें करीत आहेत. तसें तिकडे नानाचें कोणी करीत असेल का ? सांगा ! तुम्ही त्यांना सूटपत्र द्या म्हणजे ते मोकळे होतील. तुमचीं काळजी घेणारीं माणसें आहेत ! "

हें बोलणें ऐकतांच " नि त्यांना नव्हती का काळजी घेणारी ? " असें म्हणून मी तटकन् उठून बसलें. " आतां कुठें ते बांधलेले आहेत ? सूटपत्र कशाचें देऊं ? मी का पळून गेलें ? का निघून गेलें ? जसें त्यांचें कोणी नाहीं तसें माझें कोणी नाहीं. मला पैसा नाहीं, विद्या नाहीं, मूल लहान, मी काय करणार ? तुमचीं सगळ्यांचीं भांडींच घासणार कीं नाहीं ? तुमची ही शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावें आधीं येऊन बायकोचें लग्न नीटनेटकें लावून द्या आणि मग स्वतःचें लग्न करा. तुम्हांला कांहीं वाटत नाहीं आपण कोणाशीं बोलतां तें ? "

मी बोलतां बोलतां उभी राहिलें. भाऊजी मुकाट्यानें खालीं मान घालून सर्व ऐकून घेत होते.

टिळकांचीं मला रोजच्या रोज पत्रें येत. कधीं कधीं तीन तीन पत्रें येत. मी एखादें लिही त्यांत कविता असे. मला कांहीं त्यांच्याजवळ मागायचें नव्हतें कीं त्यांना कांहीं सांगायचें नव्हतें. एक दिवस 'भेटायला येतों' अशी टिळकांची पेंडशांना तार आली. 'माझ्या घरीं येऊं नका' अशी पेंडशांनीं उलट तार केली.

त्या दिवशीं थेट नाशकासारखी स्थिति झाली. कोणाच्या पोटांत अन्न नाहीं कीं डोळ्यांना झोंप नाहीं. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें. मला हें कांहींच ठाऊक नव्हतें.

सकाळीं आठ वाजतां टिळक पंढरपुरास आले. दुपारीं दोनाचा सुमार झाला तरी पेंडशांचें उत्तर नाहीं. आपण इतकीं पत्रें पाठविलीं तरी त्यांचें उत्तर नाहीं हें पाहून टिळकांना फार राग आला. त्यांनीं शेवटचें पत्र पाठविलें. 'माझ्या बायकोला बरें नाहीं असें कळल्यावरून मी मुद्दाम तिला भेटायला आलों. आल्यापासून तीन चार सामोपचाराचीं पत्रें मीं येथून पाठविलीं, आपणांकडून त्यांचा जबाब नाहीं. वाईट वाटतें. मी मात्र तिची भेट घेतल्यावांचून जाणार नाहीं. आपल्या इच्छेविरुद्ध जाण्याचा माझा बेत नाहीं तरी पण मी उद्यां कोर्टांत तिची भेट घेईन.'

पत्र येऊन पोहोंचलें. ह्यांतून कसा मार्ग काढावा ह्यांविषयीं नानासाहेबांनीं भिकूताईला बोलावून तिचा विचार घेतला. ती म्हणाली, "जें बरें असेल व बरें दिसेल तें करावें. मला काय कायदे माहीत? परंतु मला वाटतें कीं उद्यां जे धिंडवडे निघणार त्यापेक्षां आजच मनूला मुकाट्यानें त्यांना भेटवून आणा. मग टिळक जातील."

"तूं मनूची बिलकूल काळजी करूं नको. मी तिला कधींच जाऊं देणार नाहीं. तिला त्यांच्या भेटीला पाठवूं. तिच्याबरोबर वहिनी जातील. शिवाय मी दोन शिपाई बरोबर देतों."

नानासाहेबांनीं टिळकांना पत्र लिहिलें कीं, 'रात्रीं नवाच्या पुढें मनुताईला तुमच्या भेटीस पाठवितों. आपणांस सवड असली तर थांबा, नाहींतर माझा

नाइलाज आहे.’

टिळक पंढरपुरास आले आहेत इतकेंच मला माहीत होतें. मधली ही भानगड मला कांहीं ठाऊक नव्हती. नानासाहेब व भिकूताई बाहेर बैठकीच्या खोलींत बोलत बसलीं होतीं व मी अलीकडच्या माझ्या कार्यक्रमाप्रमाणें बिछान्यावर लोळत होतें. इतक्यांत आठ नऊ वर्षांची पेंडशाची नात आली व बाहेर नानासाहेब बोलावीत असल्याचा तिनें येऊन निरोप सांगितला. त्यासरशी मी बाहेर जाऊन त्या दोघांपुढें बसलें. पेंडसे म्हणाले, ‘ मावशी, तुला टिळकांना भेटावयाचें आहे का ? ’ मी ‘ हो ’ म्हणतांच ते म्हणाले, ‘ तर मग माझ्या पायांवर हात ठेव आणि शपथ वहा कीं मी त्यांच्याबरोबर जाणार नाहीं. ’ मीं त्यांच्या पायांवर हात ठेवून सांगितलें, ‘ मी टिळकांच्या बरोबर जाणार नाहीं.’ मी तडक आंत गेलें. भिकूताई माझ्या मागोमाग आली. तोंडानें तिची बडबड चालली होती कीं काय बाई मोठ्या कौतुकानें बहिणीला भेटायला बोलावली व पुढें हे सरकारदरबारचे प्रसंग आले ! हें ऐकून माझ्या मनाची फारच चमत्कारिक स्थिति झाली. मी काय करीत होतें तें माझें मलाच समजत नव्हतें. पण आज मला चालायची हुक्की आली. माडींतून माजघर, माजघरांतून माळवद, माळवदावरून अंथरूण, पुन्हा माडी असें माझें सारखें सुरू झालें. भिकूताईला तें पाहून फार वाईट वाटलें. ती म्हणाली, ‘ हें ग काय असं वेड्यासारखं करतेस ? हो वेडी आणि त्या सोन्यासारख्या मुलाचा कर पुरताच उन्हाळा. नवऱ्यानें लावले दिवे आणि तूं पाजळ टेंबे म्हणजे झालें.’

मला तिचें सारें बोलणें ऐकूं आलें व सारें समजलेंहि. पण माझें जें काय होतें तें संध्याकाळपर्यंत तसेंच चालू होतें. मी असें कां करीत होतें हें माझें मलाच समजत नाहीं संध्याकाळ झाली. साऱ्यांची जेवणाची वेळ झाली. मला भेटायला पाठवितात कीं नाहीं ह्याची मला वरचेवर शंका येत होती. तांगा, घोडीं, नोकर ह्यांच्याकडे माझें सारखें लक्ष होतें. मला कोणाशीं बोलतां येत नव्हतें; कारण सर्वांचाच मजवर पहारा होता. शिपाई, गडी, मोलकरीण, पाणक्या, आचारी, माई, बाई, येसू, पेंडसे अशा नवग्रहांनीं मला वेढलें होतें. ह्यांच्या सक्त

पहाऱ्यांतून मला इतकें सुद्धां कांहीं इकडचें तिकडे करतां येत नव्हतें, काय करतां काय खातां, कुठें जातां, काय लिहितां असे ज्याच्या त्याच्या तोंडचे शब्द सारखे माझ्यामागें लागले होते. मागील दारीं जायचें झालें तरी सुद्धां कोणीतरी मजबरोबर असायचेंच.

नवाचे ठोके पडले तसे माझ्या हृदयांतील ठोके अधिकाधिक जोरानें पडूं लागले. टिळकांची भेट होते कीं नाहीं अशी मला शंका वाटूं लागली व वाढूं लागली. माझी सारी नजर खालीं अंगणांत खिळून राहिली होती. इतक्यांत तांगा जुंपलेला दिसला. बाईनीं शाल अंगावर घेतली व ‘ मावशी ’ अशी हाक माझ्या कानांवर पडली. हाक कानीं पडतांच मी चटकन् बाहेर पडलें. मला पाहतांच पेंडसे म्हणाले, ‘ मनू, मी काय सांगितलें तें ध्यानांत आहे ना ? बघ, नाहीं तर मी तुमच्या दोघांच्या मागें पोलीस लावीन. मी कोण आहें हें ठाऊक आहे ना ? ’ मी नुसतें मानेनेंच ‘ हो ’ म्हटलें. नानासाहेबांचें झाल्यावर भिकूताई पुढें आली. तिचा मारा निराळ्या बुरुजावर होता. ती म्हणाली, ‘ मने, ह्या पोराची तरी कीव येऊं दे. ’ तिलाहि मीं मानेनेंच उत्तर दिलें. पुढें काय वाढून ठेवलें आहे ह्याबद्दल मन साशंक व जीव धाकधूक होत होता. हातपाय लटलट कांपत होते. जिभेला कोरड पडली होती. पाणीदारपणा काय तो डोळ्यांतच उरला होता व त्याचा प्रभाव मधून मधून पदराला कळत होता. दादर उतरून मी कशीबशी खालीं आलें. पुढें मला उचलून तांग्यांत बसविली. दोन शिपाई, तांगेवाला, मी व बाई इतकीं पांच माणसें आम्ही पांचामुखीं परमेश्वराचा धावा करीत चाललों. टिळक आपलें घड्याळ पाहत धर्मशाळेच्या दारांत उभे होते. तांगा पाहतांच ते आंत गेले. मला दोन माणसांनीं उचलून आंत त्यांच्यापुढें नेऊन ठेवली. ते उभेच होते. त्यांना पाहतांच मीं त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें.

“ माझ्याकडून तुमचा असा कोणता अपराध घडला म्हणून तुम्ही असें भलतेंसलतें करून बसलां, तें मला सांगा. मग मी पाय सोडीन. ”

“ तूं माझा कधींच कांहीं अपराध केला नाहींस. ” असें म्हणून त्यांनीं

आपले पाय सोडवून घेतले.

झालें, आमचें एवढेंच बोलणें झालें. टिळक खांबाला टेकून उभे होते. आम्हा दोघांना पुढें कांहींच बोलवेना. इतक्यांत बाई म्हणाल्या, ‘ मनू चल आतां; दत्तू वाट पाहत असेल. बराच उशीर झाला आहे. ’ मी ताबडतोब निघालें. गड्यांनीं मला उचलून पुन्हा टांग्यांत बसविलें. टिळक बाहेर उभे राहून तांगा दिसेनासा होईपर्यंत पाहत होते.

इकडे नानासाहेब व भिकुताई ह्यांचा जीव धाकधूक होत होता. तांगा घरीं पोचतांच नानासाहेब धावतच टांग्याजवळ आले व काय झालें म्हणून विचारूं लागले. बाईंनीं घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली, तेव्हां त्यांना फार आनंद वाटला. दत्तू निजला होता, तेथें बसून त्याच्या अंगावरून हात फिरवीत भिकूताई म्हणाली, ‘ बाबा, आतां तुझ्या आईला देव चांगली बुद्धि देवो. ’

त्या रात्रीं सर्व मंडळी शांतपणें निजली. टिळकांनीं मात्र माझी ती अवस्था पाहून सारी रात्र तळमळत काढली. टिळक परत जाणार म्हणून दुसऱ्या दिवशीं भाऊजी त्यांना भेटायला गेले, तेव्हां टिळकांनीं सांगितलें, ‘ मी आत्तांच जात नाहीं. तिला बरें वाटलें म्हणजे जाईन. ’ भाऊजींनीं ता बातमी नानासाहेबांना सांगितली. ते म्हणाले, ‘ मी नानाला जेवण पाठवीन पण तुमचा माणूस तें पोचतें करायला द्या. ’ पेंडसे म्हणाले, ‘ तसें नको, आम्हींच जेवण पाठवूं. ’

दुपारीं टिळकांसाठीं डबा भरतांना भिकूताईच्या डोळ्यांतून गंगा–यमुना वाहूं लागल्या. ज्यांना आपल्या हातांनीं आपल्या घरांत प्रेमानें जेवायला वाढलें त्यांना आतां दुसऱ्याच्या हातीं जेवण पाठवायचें व तेंहि धर्मशाळेंत ह्याचें तिला वाईट वाटत होतें. त्यापेक्षां आपल्याला बहीणच नसती तर बरें होतें ! टिळकांना आधीं जेवण पाठवून मग घरांतील मंडळी बसली. तीं सारी बरोबर बसत असत व आचारी वाढीत असे. नानासाहेबांना जेवण जाईना. ते म्हणाले, ‘ मला कसेंसेंच वाटतें. ’ त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. ते म्हणाले,

“ मुसलमान शिपाई आपल्या घरांत चालतो. तो आपल्या घरीं जेवतो. ते लोक पाहिजे तें खातात. मग टिळकांनींच कां धर्मशाळेंत जेवावें ? ”

" पण लोक काय म्हणतील ? "

" लोक काय म्हणतात ? मला कोणाला माझी मुलगी द्यायची नाहीं, कोणाची मुलगी करायची नाहीं. एक मुलगी, ती देऊन टाकली आहे. मी त्यांना घरीं आणणार ! मग मला जग हवें तें बोलो, मला त्याचें कांहीं नाहीं. "

जेवणीं झालीं. नंतर नानासाहेबांनीं तांगा जुंपून कालच्या जागीं जाऊन तेथल्या पाहुण्यांना घेऊन ये असें शिपायाला सांगितलें. तांगा गेल्यावर नानासाहेब सारखे वाटेकडे डोळे लावून बसले होते. कधीं टिळकांना पाहीन असें त्यांना झालें होतें.

तांगा आला. घरांतील सर्व माणसें दाराशीं गोळा झालीं. टिळकांनीं दत्तूला उचलून घेतलें. पण दत्तूनें टिळकांना ओळखलें नाहीं. त्यांच्या प्रकृतींत फारच फरक झाला होता. त्यानें नानासाहेबांकडे जाऊन शेवटीं आपल्या लालमावशीचा आश्रय केला. नानासाहेब त्याला म्हणाले, ' अरे टिळक, आपल्याला चहा करायला सांग पाहूं. ' दोन कप चहा आला. टिळक व नानासाहेब चहा घेऊं लागले. त्यांच्यासमोर भिकूताई येऊन बसली.

' टिळक, मी आतां तुम्हांला पहिल्यासारखी भिणार नाहीं. आतां तुम्ही मजवर हव्या तितक्या कविता लिहा व छापा. मी आतां तुमच्याशीं भांडणार आहे. "

पेंडसे म्हणाले, " हें काय ? आज तेच आपल्याला कोर्ट दाखविणार होते. आपणच त्यांच्याशीं भांडायचें ? "

" तें कांहीं मला ठाऊक नाहीं. कोर्टांतील भांडणें तुम्हां पुरुष माणसांचीं. का हो टिळक ? माझा काय असा गुन्हा होता कीं मीं तुमच्या बायकोला भेटायला आणलें आणि तुम्ही हें असें करून बसलांत ? "

टिळक म्हणाले, " भिकूताई, तुम्ही मला हवें तितकें बोला. मी कांहीं तुमच्यावर कविता लिहीत नाहीं नि छापीतहि नाहीं. "

" मने, येतेस ना टिळकांना कोर्टांत भेटायला ? "

मी सारें दाराच्या मागें उभी राहून ऐकत होतें. टिळक आल्यापासून माझ्या

प्रकृतींत पुष्कळ फरक पडला, तरी माझ्या डोळ्याचें पाणी मात्र खळलें नाहीं.

नानासाहेब तेथेंच मामलेदार होते. त्यांच्याकडे पुष्कळ माणसें येत व साऱ्यांच्या गप्पा रात्रीं दहा दहा वाजेपर्यंत चालत. त्यांच्यांतच शाळेचे एक हेडमास्तर होते. नानासाहेबांनीं त्या सर्वांची टिळकांशीं ओळख करून दिली. माझीं पत्रें टिळकांनीं बरोबर आणलीं होतीं. त्यांतील कविता कोण करून देतें म्हणून त्यांनीं कसून चौकशी केली. शेवटीं त्या मींच केल्या अशी खात्री झाल्यावर त्यांना फार आनंद वाटला. त्यांतील कित्येक सुधारून त्यांनीं छापण्यासाठीं पाठवून दिल्या.

टिळक बाहेर जेवायला बसत. बाकी मंडळी आंत बसे. सखारामभाऊजी बहुतेक रोज ह्या वेळीं येत. एक दिवस भिकूताई म्हणाली, का हो ' सखारामपंत, तुमच्या भावाला जातींत नाहीं कां घेतां येणार ?

पेंडसे म्हणाले, ' हो ! काय झालें न घ्यायला ? प्रयत्न व पैसा असला म्हणजे झालें. '

" मग मी माझे सगळे दागिने देतें. मला जर चार बहिणी असत्या तर नसते का त्यांच्या लग्नाला मीं खर्च केले ? मी आपली असेंच समजेन कीं मीं माझ्या चार बहिणी उजविल्या. बोला सखारामपंत तुम्ही किती द्याल तें. "

" मी एक हजार रुपये देईन. "

" बाकी लागेल तें मी देईन. " पेंडसे म्हणाले.

इतक्यांत बाहेर टिळकांशीं कोणी तरी मोठमोठ्यानें बोलत असल्याचें आमच्या ध्यानांत आलें. पेंडसे म्हणाले, ' जा हो पंत, बाहेर कोण बोलतें तें पाहून या. ' भाऊजी पाहून आले. बाहेर हेडमास्तर आले होते व त्यांचा टिळकांशीं वादविवाद चालला होता.

" अहो मास्तर ! वा, बरें झालें. बाहेर काय आहे ? आंत या कीं ? का त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार आहे ?"

मास्तर आंत आल्यावर नुकत्याच झालेल्या बेतावर त्यांचा विचार घेण्यांत आला. ते म्हणाले, ' टिळकांना ह्यांपैकीं कांहीं कळवूं नका. उद्यां

आधीं आपण सभा भरवूं. मग ह्या विषयाचा आपल्या सभेंत ऊहापोह झाल्यावर पुढें काय करायचें तें ठरवूं.'

त्या रात्रीं मास्तरांना झोंप आली नाहीं. कोण कोण बोलायचे, विषय कसा मांडायचा, लोक काय म्हणतील वगैरे वगैरे असंख्य विचारांनीं त्यांच्या डोक्यांत काहूर माजविलें होतें. भिकूताईलाहि आनंदामुळें त्या रात्रीं झोंप आली नाहीं. एकदां ही मनी आपल्या घरींदारीं चांगल्या रीतीनें गेली कीं मिळवलें. दागिन्यांच्या सावलींत थोडेंच बसायचें आहे! आणि जणूं काय सर्व गोष्टी तिच्या मनाप्रमाणें घडतच आहेत अशीं सुखस्वप्नें तिनें अगदीं उघड्या डोळ्यांनीं सारी रात्रभर त्या दिवशीं पाहिलीं.

दत्तू व टिळक मात्र फारच गाढ निजले होते. दत्तू आतां आपल्या नानांजवळ निजत असे. त्यांनीं त्याला कितीतरी गोष्टी सांगाव्या व गोष्टी सांगतां सांगतां व ऐकतां ऐकतां दोघांनीं झोंपीं जावें.

दुसऱ्या दिवशीं मास्तर भाउजींना घेऊन नानासाहेबांकडे आले. संध्याकाळीं गांवांतील कांहीं प्रमुख मंडळींची सभा बोलावून तींत मास्तरांचें धर्मान्तरावर व्याख्यान ठरलें होतें. नानासाहेबांनीं सांगितलें, 'माझी तुम्हांला पूर्ण सहानुभूति आहे. मात्र ह्यांत माझें अंग आहे असें कोणाला कळवूं नका.' ठरल्याप्रमाणें त्या दिवशीं सभा भरली. मास्तरांचें मोठें परिणामकारी व्याख्यान झालें. त्यांची भाषाशैली व विषयाबद्दलची तळमळ ह्यांमुळें बहुतेक मंडळी त्यांनीं आपल्या बाजूस वळवून घेतली. भाषण झाल्यावर त्यांनीं बहुतेक मंडळींच्या सह्या घेऊन दुसऱ्या दिवशीं आपल्या मित्रमंडळीसह येण्यास सांगून सभा विसर्जन केली. नंतर ते नानासाहेबांकडे आले. तीन दिवस अशा रीतीनें भाषणें व सह्या मिळविण्याचें त्यांचें काम चाललें होतें. पुढें तें काम गांवकऱ्यांनीं व गांवांतील पुढाऱ्यांनीं आपल्या अंगावर घेतलें. आठ दिवस त्यांच्या बैठकी होत होत्या. प्रत्येक सभेंत मास्तर हजर राहत व सभेचा सार्यंत वृत्तान्त आमच्या घरीं येत असे. सर्वांना धीर वाटूं लागला. पण त्यांना पाहिजेत तसे शास्त्राधार सांपडेना. इकडे नानासाहेब व त्यांच्याबरोबर

भिकूताई हळू हळू टिळकांचें मन चाचपून पाहत होती. टिळक म्हणाले, " माईसाहेब, कशाला हा खर्च करतां? समजा, तुम्ही खर्च केलांत व मी पुन्हा गेलों तर?"

"तर काय! आम्ही खर्च भरून घेऊं."

पण टिळक पुढें कांहीं बोलले नाहींत. मला आत्तांच कुठें बरें वाटून मी बोलूं चालूं लागलें होतें. माझ्या दुखण्यांत आणखी भर नको पडायला असें त्यांना वाटलें असावें. तें पुढें गप्पच बसले.

शास्त्राधार सांपडेना तेव्हां नानासाहेब टिळकांच्या मागें लागले कीं तुम्ही योग्य तो शास्त्राधार काढून द्या व टिळकांनींहि तो काढून दिला. शास्त्राधाराचें घोडें पेंड खाऊं लागलें तों आणखी एक अडचण उभी राहिली. ब्रह्मवृन्दानें सांगितलें कीं आतां टिळकांनीं येऊन आपली चूक कबूल करून आमच्या पायां पडावें. टिळक कांहीं ह्या गोष्टीला कबूल होईनात. मास्तरांनीं अगदीं गयावया केली, पण टिळकांचा निश्चय ढळला नाहीं. शेवटीं मास्तरांनीं जाऊन टिळकांच्या वतीनें सर्वांची माफी मागून त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घातला. आतां तो कागद आणखी दोन क्षेत्रांत जाऊन शेवटीं जगद्गुरु शंकराचार्यांकडे जायचा व नंतर टिळकांचें शुद्धीकरण होणार असें ठरलें. इतक्यांत पंढरपूरचा मिरासदार कॉलरा, आपल्या बागेची साफसफाई करण्यास आला व वृद्ध तरुण, बाळें अशीं निरनिराळ्या प्रकारचीं रोपटीं भराभर जागचीं हालवूं लागला.

नानासाहेब राहत होते तेथेंच एक केस होऊन एक तरुण यात्रेकरूं पाहातां पाहातां मृत्युमुखीं पडला.

टिळकांना ही पाऊलवाट मिळाली. नानासाहेब भोळे. त्यांना टिळक सांगूं लागले, 'ह्या पोरासारखी माझी गत झाली तर तुम्ही काय करणार! लोक तुम्हांला किती त्रास देतील? त्यापेक्षां मला आतां जाऊं द्या. शंकराचार्यांकडून उत्तर येण्यास अजून अवकाश आहे तोंपर्यंत येथला कॉलरा कांहीं कमी होईल आणि मग पाहूं काय करायचें तें.'

पेंडशांनीं त्यांना परवानगी दिली भाडें दिलें व त्यांची मुंबईस रवानगी केली.

टिळक गेले तेव्हां ह्या खेपेला कोणाला फारसें वाईट वाटलें नाहीं. आतां ते खात्रीनें परत येतील असेंच ज्याला त्याला वाटत होतें. मीहि आतां चांगली बरी झालें होतें.

टिळक गेल्यानंतर दत्तू फार आजारी पडला. वणीस असतांना टिळकांच्या उपाध्यायांच्या आईनें नवस केला होता कीं पांचव्या वर्षीं सप्तश्रृंगीस गडावर जाऊन त्याचें जावळ काढायचें. तो नवस तेथें जाऊन फेडण्याचें भिकूताईनें ठरविलें. तिनें जलालपुरास आमच्या भावांस पत्र टाकलें, कीं पंचवीस पानांचा शिधा घेऊन वणीस या. तुमचा शिधा व माझे पैसे मिळून आपण हा नवस फेडूं. मी कांहीं वणीस गेलें नाहीं. ह्यांच्यामागें पंढरपुरास एक दिवस वकिलामार्फत मला नोटीस आली कीं मुलावर माझा हक्क आहे, तो कोणी नाहीं म्हणणार नाहीं, अमूकअमूक दिवसांच्या आंत मुलगा माझ्या ताब्यांत आणून दिला नाहीं तर मला तो कोर्टांत फिर्याद करून घ्यावा लागेल. आतां टिळकांनीं शस्त्र उगारलें. रोज मला पत्रें येत. मुलाला पाठवून दे नाहींतर त्याला घेऊन माझ्याकडे ये. सर्व मला सल्ला देत कीं तूं उत्तरच धाडूं नको. कोणी म्हणत, तूं पत्र घेऊंच नको कीं तें वाचूं नको. नाशकास असतांना माझ्या दूरच्या कांहीं नातेवाईकांनीं मला सांगितलें होतें कीं मी जर टिळकांकडे गेलें, तर माझें दुसऱ्याबरोबर लग्न करून देतील आणि मला भंग्याचें काम करायला लावतील. मांसाचा स्वयंपाकहि करायला लावतील. ही भीति घातलेली आणि टिळकांचा पूर्वीचा अनुभव ! त्यांच्याकडे गेलें आणि ते मुसलमान झाले तर ? आतां नातलग तरी विचारतात, मग तर तेहि विचारणार नाहींत. दुसऱ्यांचे नवरे मरतात त्या म्हणतात, आमचे नवरे जिवंत असते, तर आम्ही कुठेंहि त्यांना डोळे भरून पाहिलें तर असतें, आणि मी त्यांना नुसतें पत्राचें उत्तरहि पाठवूं नये ! पुन्हा माझ्या मनाला भरती आली. मी विठोबाच्या देवळांत घंटा घंटा जाऊन रडत बसूं लागलें. मी तेथें सगळ्यांच्या ओळखीची झालें होतें. कोणी कोणी बाया सल्ला देत, कशाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

रडतेस, खुशाल खावें प्यावें. आणि भावाबहिणीजवळ अशी किती दिवस राहणार? मोलाचीं दळणीं दळावीं नाहींतर खाणावळ काढावी, पण स्वतंत्रपणें राहावें. मी सारें निमूटपणें ऐकून घेत असें. एक दोघींना मीं म्हटलें, ' मी मोलाचीं दळणीं दळण्यापेक्षां माझ्या आप्तांजवळ राहून त्यांचीं दळणीं मोजून देण्यांतच मला आनंद वाटतो. बाहेरच्या लोकांचीं उष्टींखरकटीं काढीत बसण्यापेक्षां माझ्या प्रेमळ भावाबहिणींचीं उष्टींखरकटीं मी मोठ्या आनंदानें काढीन. त्यांची हांजी हांजी करण्यापेक्षां माझे तीन मालक–भाऊ, वहीण व दीर–ह्यांचीच हांजी हांजी मी करीन. त्यांचें नाहीं पटलें तर माझ्या चौथ्या मालकाकडे निघून जाईन. ' माझ्या ह्या उत्तरानें पुढें मला कोणीं असला उपदेश केला नाहीं.

भिकूताई वर्णीहून दत्तूला घेऊन पंढरपुरास परत आल्यावर तिला ही हकीकत समजली. तिला फारच वाईट वाटलें. काय हा सापासारखा उलटला वगैरे ती बोलूं लागली. इकडे रोजच्या रोज टिळकांचीं पत्रें येतच होतीं. तीं पत्रें रागाचीं असत, प्रेमाचीं असत, त्रासाचीं असत, एखाद वेळेस ते म्हणत, ताबडतोब निघून ये. एखाद वेळेस म्हणत, तुला माझी पर्वा नाहीं. एखाद वेळेस म्हणत, मी दुसरें लग्न करतों, मला सूटपत्र दे. मीं माझ्या नातेवाईकांचा त्याग करून ताबडतोब त्यांच्याकडे जावें असें त्यांना वाटे. शेवटीं डॉ. ॲबट व टिळक ह्यांचें बरेंच बोलणें झालें. त्या वेळीं टिळक मुंबई मिशन हायस्कूलमध्यें मास्तर होते व ॲबटसाहेबहि तेथेंच मुंबईस होते. ॲबटसाहेब त्यांना म्हणाले, ' हें पहा टिळक, मला एकंदर परिस्थितीवरून लक्ष्मीबाईंचें तुमच्यावर अतिशय प्रेम आहे असें स्पष्ट दिसतें. तुम्ही त्यांना रागारागाचीं पत्रें न धाडतां त्यांचें सौम्य रीतीनें मन वळवा. चला मीहि तुमच्याबरोबर येतो. ' त्याप्रमाणें टिळकांनीं करण्याचें ठरविलें. त्यांचा प्रार्थनेवर फार विश्वास होता व प्रार्थना करून ह्या बाबतींत त्यांनीं परमेश्वराचें साह्य घेण्याचें ठरविलें.

टिळकांच्या १८९८ च्या डायरींतील जानेवारी, एप्रिल व मेचीं कांहीं पानें अस्तित्वांत आहेत. त्यांत साऱ्या कविताच आहेत. कवितांवरून त्या वेळीं त्यांची मनःस्थिति कशी होती हें दिसून येतें.

पंढरपुरास नंतर लौकरच तार आली कीं टिळक येत आहेत.

मास्तरांची खटपट टिळकांनीं फुकट घालविल्यानें ह्या वेळेस टिळकांना पेंडशांकडे उतरणें शक्य नव्हतें. भाऊजी राहात होते राममंदिरांत. तेथें त्यांना कोण येऊं देतें ? डॉ. काशीबाई झणकर नांवाच्या एक डॉक्टरीणबाई तेथें होत्या. त्यांच्याकडे टिळक जाऊन उतरले व सकाळींच नानासाहेबांच्या घरीं आले. जिन्याच्या एक दोन पायऱ्या चढतात तोंच, वर भिकूताई दाराला आडवे हात लावून उभी राहिली व म्हणाली, 'खबरदार एक पायरी चढाल तर. तुम्हांला कोर्टें मोकळीं आहेत. तुम्ही आपले तिकडे जा.' टिळक मागें फिरले. दत्तूला पुन्हा गोवर आला होता. त्याला भयंकर ताप आला होता. तशांत हा दुसरा ताप माझ्यामागें लागला होता. माझा जीव दोन्हीकडे लागला होता. रात्रीं डॉक्टरीणबाईच्या आई घाईघाईनें मजकडे आल्या व म्हणूं लागल्या, "मावशी, चला चला; काशीला विंचू चावला आहे तो उतरा." मी विंचू उतरतें. टिळक उतरीत व त्यांचें पाहूनच मी शिकलें होतें. टिळक तेथें उतरल्याचें आम्हांला माहीत नसल्यानें भिकूताईनें मला त्यांच्याबरोबर पाठविलें. तेथें जाऊन पाहतें तों टिळक माझी वाट पाहत बसलेले !

"तुला कसें वाटतें ?"

"पहिल्यासारखेंच !"

"दत्तू कसा आहे ?"

"त्याला ताप आला आहे."

"बरें तर जा."

एवढेंच आमचें बोलणें झालें. पण माझी प्रकृति सुधारलेली पाहून टिळकांना फार आनंद झाला. मी आलें ती तडक अंथरुणावर जाऊन पडलें. घर जवळच होतें. दत्तूला भिकूताईनें घेतला होता. नानासाहेबांना मी डॉक्टरणीकडे गेलें वगैरे तिनें सांगितलें. त्यांनीं गडी पाठवून डॉक्टरणीला बोलावून आणलें. तिनें जें जें झालें तें सर्व त्यांना सांगितलें. तें ऐकून नानासाहेब म्हणाले,

"तुम्हांला तिचा काय विचार दिसतो ?"

" जाण्याचा. "

" कशावरून ? "

" तिनें मजजवळ एकदां विष मागितलें होतें. ती म्हणाली, ' माझ्याजवळ तुम्हांला द्यायला कांहीं नाहीं; पण पायांतलीं जोडवीं आहेत तीं देतें. मला असें विष द्या कीं मी झिजून झिजून मरेन. कारण माझी पुढें चौकशी व्हायला नको व कोणावर माझ्यामुळें दोष यायला नको. ' "

" तुम्हीं तिला काय सांगितलें ? "

" मीं तिची समजूत करून तिला परत लावून दिलें. "

" बरें पुन्हा आतां ह्या असल्या भानगडींत पडूं नका " असें म्हणून पेंडशांनीं शिपाई देऊन त्यांची रवानगी केली.

हा जो प्रकार झाला तो मला मुळींच माहीत नव्हता. अलीकडे मला फार झोपा येऊं लागल्या होत्या. मी जी आलें ती निजलें व सकाळीं जागी झालें. जागी झालें तों एका पाटावर दोन लुगडीं, दोन चोळया, मुलाचें थोडें बाळलेणें, कुंची अशा जिनसा माझ्या उशाकडे ठेवलेल्या. मी उशाजवळ काय आहे तें पाहूं लागलें. टिळक आल्यापासून घरांत माझ्याशीं कोणी फारसें बोलत नव्हतें. नानासाहेबांची भाची आली होती ती तेथेंच होती. कुंचीचे गोंडे पाहून मीं तिला म्हटलें, ' काय ग सई, हा बाळंतविडा कोणाकरतां आणला ? ' तिनें म्हटलें, ' तुझ्याचकरतां. ' मी तें ऐकून गप्पच बसलें. इतक्यांत भिकूताई व बाई तेथें आल्या. भिकूताई म्हणाली, ' मने, तुला जायचें असेल तिकडे जा. मीं तुझें सामान, तुझ्या मुलाची कुंची, त्याचें बाळलेणें सगळें तिथें ठेवलें आहे ! मला हा घोटाळा व गोंधळ कांहींच कळेना. जा म्हणतात तर जावें व वणीच्या डोंगरांत योगिनी बनून राहावें असें ठरवून मी ताबडतोब एक लुगडें व कुंकवाचा करंडा घेऊन निघालें. मीं म्हटलें, ' आपल्याला कोणीच नको. नांवाला तरी कोठवर भ्यायचें आणि वाऱ्याला तरी कोठवर पाठ द्यायची ? ' देवाला, भिकूताईला व तिच्या जावेला नमस्कार करून मी निघालें. सईनें विचारलें,

" मावशी, तूं कुठें चाललीस ? "

"देव नेईल तिकडे."

"तुला शक्ति नाहीं. तुजजवळ पैसा नाहीं."

"पैसा नको आणि कांहीं नको. देवाकडून आलें तेव्हां कुठें होता पैसा तर आतां त्याच्याकडे जातांना तो मला लागणार आहे."

"अग सई, त्यांचें रात्रींच ठरलें असेल. त्याशिवाय कशी अशी तडक उठून ती जायला निघेल!" भिकूताई म्हणाली.

मी बाहेरच्या दालनांत आलें. मला पाहून नानासाहेब म्हणाले, "कुठें जातेस?"

"जिकडे देव नेईल तिकडे. माणसांनीं सोडलें म्हणून तो थोडाच सोडणार आहे."

"खरेंच सांग. अशी वेड्यासारखी कां करतेस? घरांत जा पाहूं. जा घरांत आणि नीज."

सोडमुंजींत मुंजा आपल्या मामाच्या आग्रहानें काशीयात्रेचा बेत रहित करतो तसेंच माझें झालें. मी आंत जाऊन निजलें.

शरीराचा त्याग करण्याचे प्रसंग मजवर कितीतरी वेळेस आले असतील. पण तो मीं कधींच केला नाहीं व मला वाटतें, तो कधीं होणें शक्यहि नव्हतें. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे कीं सर्व निराशामय अंधःकारांतून चाचपडत धडपडत कां होईना, पण आपला मार्ग आक्रमायचा. मधेंच पडून प्राण सोडायचा नाहीं. थोडक्यांत म्हणजे रबरी चेंडूप्रमाणें आहे माझें. असो.

टिळक डॉ. काशीबाईकडून निघाले ते कुठें गोपाळपुऱ्यांत डॉ. ॲबट उतरले होते तिकडे गेले. डॉ. ॲबटनीं त्यांना विचारलें, "झाली तुमची भेट? तुम्हांला काय वाटतें?"

"माझा समज चुकीचा होता. तिचें जें प्रेम होतें तें कांहींच कमी झालें नाहीं."

"मग आतां तुम्ही काय विचार करतां? तुम्हांला उगीच लोक भर देतात." असें म्हणून डॉ. ॲबट ह्यांनीं ख्रिस्ती शास्त्राप्रमाणें पतिपत्नींचे संबंध कसे असावे हें त्यांना बायबलमधून काढून वाचून दाखविलें. नंतर त्या दोघांनीं प्रार्थना केली

व टिळकांनीं वचन दिलें कीं मी आपल्या बायकोसाठीं ती येईपर्यंत वाट पाहीन.

टिळक परत गेले. गेल्यावर त्यांचें फार चांगलें पत्र आलें. “ तूं प्रकृतीला जप. दत्तूची काळजी घे. मी तुला मुळींच त्रास देणार नाहीं. परमेश्वर तुला बुद्धि देईल तेव्हां मुलाला घेऊन ये. मी मात्र तुझी नेहमीं वाट पाहीन. तुम्हांला त्रास होईल असें मी येथून पुढें कांहीं करणार नाहीं. मी एकपत्नीव्रतानें राहीन. त्याची मुळींच काळजी करूं नको. ” वगैरे मजकूर त्या पत्रांत होता.

भिकूताईला मात्र वाटे मी एखादे वेळेस चटकन् टिळकांकडे निघून जाईन. ती माझ्यावर एक गाणें म्हणत असे. ‘ मैना तुझा ग पिंजरा मायेचा ’ वगैरे. गाण्याचा अर्थ असा होता कीं ‘ मैने, तुला कोंडून ठेवलें आहे तरी हा पिंजरा म्हणजे कैदखाना नाहीं. आम्हांला मायेनेंच तुला कोंडावें लागतें. नाहींतर तूं केव्हांच भुरकन् उडून जाशील. ’

# भाऊ--भावजयांचा आसरा

भिकूताई व नानासाहेब आतां माझ्याशीं चांगलीं वागूं लागलीं. म्हणजे त्यांचें वागणें तसें कधीं वाईट होतें असें नाहीं. पण मध्यंतरीं मी टिळकांबरोबर जातें कीं काय अशी त्यांना शंका आली होती एवढेंच. भिकूताईनें मला पाटल्या, बिलवर वगैरे दागिने केले. पण जेव्हां जेव्हां टिळकांच्याकडून कांहीं काळजी उत्पन्न करण्यासारखीं पत्रें येत तेव्हां तेव्हां भिकूताईला माझा राग येई. त्यांच्या घरीं दत्तूची व माझी नीटनेटकी व्यवस्था होती.

एक दिवस नानासाहेबांची नगरास बदली झाल्याचा हुकूम आला! आतां साऱ्यांना मोठा विचार पडला. खुद्द टिळक जरी नगरास नसले तरी ख्रिस्ती लोक तेथें पुष्कळ! मनूला तेथें कसें न्यायचें! ह्या विचारांत ते आहेत तोंच टिळकांचें पत्र व पत्त्याचीं पाकिटें आलीं. टिळकांनाही नगरास काम लागलें व ते लौकरच नगरास जाणार असें त्या पत्रांत होतें! आतां तर मला भिकूताईबरोबर जाणें अशक्यच झालें. नानासाहेबांनीं भिकूताईच्या संमतीनें माझ्या भावांना पत्र टाकलें कीं, 'माझी बदली नगरास झाली आहे. तेथें मनूला नेणें इष्ट नाहीं. तेव्हां तिला जलालपुरास पाठवितों. खर्चाची व दोघांच्या कपड्यालत्त्यांची व्यवस्था आमच्याकडेच राहील. तुम्ही एक गोष्ट मात्र करायची. ती म्हणजे तिच्या मनाला व शरीराला जपायचें.' हें पत्र हातीं पडतांच माझ्या दोघां भावांनीं आपल्या बायकांना सांगितलें, 'आज तीन वर्षें आमची बहीण सोयऱ्यांच्या घरीं आहे. तिला आतां आपल्याकडे आणली पाहिजे. आम्ही लोकांचे तमाशे पाहतों तसे लोक आमचे तमाशे पाहतील. तरी तुम्ही तिला एक

पाहुणा किंवा आमचा एक आंधळा भाऊ समजून वागवणार असाल तर आम्ही तिला आणूं. तिनें जरी आमची कांहीं नुकसानी केली तरी त्याची जबाबदारी आमच्यावर आहे. तुम्ही तिच्या मनाला लागेल असें कांहीं करायचें नाहीं.' माझ्या दोघी भावजयांनीं म्हटलें कीं, 'तुम्ही त्यांना खुशाल आणा; आम्ही एका शब्दानें त्यांना दुखविणार नाहीं.'

नानासाहेबांना ठरल्या तारखेला नगरास हजर रहावयाचें असल्यानें ते पुढें गेले व भिकूताई, बाई, मी, दत्तू व येसू इतकीं माणसें आम्ही जलालपुरास पोंचलों.

भिकूताईनें आपल्या भावाभावजयांना जवळ बोलावून माझें सर्व सामान एक एक एक एक त्यांना ट्रंक उघडून दाखविलें. सोनेंनाणें, डागदागिने, खणलुगडीं, वगैरे सामानानें माझी एक मोठी ट्रंक गच्च भरली होती. भिकूताई म्हणाली, 'हिचें नशीब आधींच हिच्या मागें हात धुऊन लागलेलें आहे. उद्यां तुमच्या बायकांनीं असें म्हणूं नये कीं हिच्या पेटीला कुलूप आहे, किंवा हिनें आमची एकादी जिन्नस घेतली. तेवढ्याकरतां मी तुम्हांला हें सर्व दाखवून ठेवतें आहे. आधीं कडू मग गोड असलेलें बरें.' ती एक दिवस राहून मग गेली. जातांना तिला फारच वाईट वाटलें. तिच्या डोळ्यांना पाणी आलें. अगदीं जातां जातां तिनें भावांना सांगितलें कीं, 'दत्तूचें दूध बंद करूं नका.'

पांच सहा दिवस मला फारच जड गेले. तीन चार दिवसांनीं टिळकांकडून पत्र व पाकिटें आलीं. जलालपुरास मी गेलें हें टिळकांना कसें कळलें कोणास ठाऊक!

जलालपुरास माझ्या भावजयांनीं मला काम अगदीं पडूं दिलें नाहीं. दोघींनीं माझें काम वांटून घेतलें. थोरली मुलाचें सर्व पाहत असे व धाकटी माझें पाही; मला माझें लुगडेंसुद्धां तिनें धुऊं दिलें नाहीं. मी अलीकडे फार देव देव करूं लागलें होतें. माझें अंग धुण्याचें पाणी काढून देणें, लुगड्याच्या निऱ्या करून ठेवणें, पूजेचें करणें, हें सारें ती करी. मी म्हणे, 'वहिनी, तूं किती ग श्रम घेतेस?' तेव्हां तिनें म्हणावें, 'वन्सं, तुमचें मी कांहीं केलें तर त्यांत

देव मला आशीर्वाद देईल. तसें भिकूताईचें केल्यास देणार नाहीं. त्यांचें केलें तर देव व माणसें म्हणतील हें स्वार्थासाठीं ही करते आहे आणि तुमचें मी निःस्वार्थी बुद्धीनें करतें आहे.' ह्याच भावजयीनें दत्तूला बाळपणीं संभाळलें होतें.

जलालपुरास आल्यापासून माझी लोळगफुगडी थांबली होती. मला आतां देवाचा नाद लागला होता. दुसरा कांहींच व्याप माझ्यामागें नव्हता. सकाळीं उठल्यावर वेणीफणी, अंगधुणें करून नियमानें गुरुचरित्र, शिवलीलामृत, देवपूजा, तुळशीची माळ व नंतर जप हा माझा नित्यक्रम असे. मी एक वेळ जेवीं. मला उपासहि बरेच असत. शिवाय चार शुक्रवार, चार शनिवार, चार मंगळवार ह्या दिवशीं शुक्रवारीं रात्रीं फक्त दूधभात खायचा, तर शनिवारीं फक्त वडेच खायचे व मंगळवारीं रात्रीं नऊ मुठींचे कानवले करून त्यांतील सहा मुठींचे गायीला घालून तीन मुठींचे मीं खायचे. एकादशा वगैरे असतच. हें सारे टिळकांनीं प्रायश्चित्त घेऊन परत जातींत यावें म्हणून मी करीं. ज्या दिवशीं उपास नसे त्या दिवशीं माझी वडील भावजय आपलें सर्व कामधाम आटोपल्यावर मी पडलेली असेन तेथें एवढे दूधपोहे घेऊन यायची व मला आई बाई करून ती बळें बळें खायला घालायची. एकीकडे तिचा उपदेश चालायचा. ती म्हणे, 'वन्स, सर्व संपत्तीपेक्षां आधीं शरीरसंपत्ति पाहिजे. ती जर तुम्ही घालवून बसलां तर तुम्हांला कोण विचारील ? चालतील बाह्या तर विचारतील आयाबाया ?' टिळकांनीं परत यावें म्हणून मी नुसते उपास-तापास करूनच राहिलें नाहीं. आणखी जें जें सुचेल तें तें मी करीं. पण ह्या दोघीजणी मला कांहीं बोलत नसत. त्या म्हणत, ह्या कोणाचें कांहीं वाईट करीत नाहींत, कांहीं नुकसान करीत नाहींत, मग ह्यांना कशाला दुखवा ?

जलालपुरास एक भला मोठा मारुती आहे. त्याच्या हातांत मी काठी देत असे. हेतु हा कीं त्यानें टिळकांच्या मागें लागून त्यांना परत आणावें. पण हें कोण करतो, हें गावकऱ्यांना कळत नसे. कधीं कधीं मी मारुतीच्या डोक्यावर दगड ठेवायची. हेतु हा कीं दगड दिला म्हणजे त्याला माझें काम करावेंच

लागेल. म्हण आहे ना कीं 'तुझ्या डोक्यावर कुणीं दगड का दिला होता ?' म्हणजे अमूक एक गोष्ट करण्याची तुजवर बळजबरी का कोणी केली होती ? मग मी रामनामाच्या चिठ्या लिहून मारुतीच्या डोक्यापासून पायांपर्यंत चिटकवूं लागलें. हें काम अगदीं पहाटे उठून अंग धुऊन, कोणी जागें होण्याच्या आधीं करावें लागे. रामाच्या नांवाच्या चिठ्ठीचा पायांना स्पर्श होण्याच्या आंत मारुती स्वतःवरचें तें संकट टळण्यासाठीं माझ्यावरचें संकट निवारील अशी कल्पना ह्यांत होती.

मारुतीच्या हातांत काठी, डोक्यावर दगड, अंगभर चिठ्ठ्या हा काय प्रकार आहे ह्याचें गांवभर कुतूहल उत्पन्न झालें. हें चेटूक कोण करतो तें पाहिलें पाहिजे व त्या चेटकिणीला चांगला ठोक दिला पाहिजे, असें गांवांतील प्रमुख मंडळीनें ठरविलें. एक दिवस ही मंडळी तेथेंच लपून बसली. मी अंग धुऊन ओलेत्यानें तेथें गेलें व एक चिठ्ठी लावून उजवी घेत आहे इतक्यांत दोघें चौघे हातांत काठ्या घेऊन माझ्या अंगावर धावले. थोडें थोडें दिसायला लागले होतें. जवळ येतांच मंडळीनें मला ओळखलें. दादा कुलकर्णी म्हणाले, 'ताई, तूं असशील अशी आम्हांला कल्पना नव्हती. बरें तर बरें आज त्या पोराची आई नाहक प्राणांस मुकली असती. आम्हांला वाटलें कोणी चेटकीण हें चेटूक करीत असावी. म्हणून आज आम्ही मुद्दाम टपून बसलों होतों. चालूं दे तुझें उपाय, तुला ह्यांत यश मिळून टिळक येवोत म्हणजे झालें.'

गंगेपासून घरापर्यंत मी पावलें काढीत असें. तसेंच देवीला रोज तांबडें फूल वाहण्याचा मीं नियम केला होता. फूल मिळालें नाहीं म्हणजे त्या दिवशीं मी उपास करायची. मला उपास पडूं नये म्हणून माझ्या भावजया मला कोठून तरी तांबडें फूल आणून देत.

माझें एक काम देव देव हें होतें व दुसरें मुलांना शिकवायचें होतें. दत्तूची पहिली मास्तरीण मीच होतें. पुढें दत्तूच्या मुलांचीहि पहिली मास्तरीण मीच झालें ! रोज वेळ मिळेल तेव्हां दत्तू व भावांचीं मुलें ह्यांना घेऊन मीं त्यांना लिहायला शिकवीत असें.

एक दिवस अशीच मुलांना शिकवीत असतां माझे दोन्ही भाऊ संध्याकाळचे घरीं येऊन तेथेंच आमच्या जवळ बसले. त्यांचीं पिकासंबंधीं बोलणीं चाललीं होतीं. मुलांनीं आपल्या पाट्या पेन्सिली तशाच हातांत ठेवल्या व हळू हळू आम्ही सगळींच बोलूं लागलों. मुलें दत्तूला म्हणूं लागलीं, 'दत्तू, बघ आमचीं शेतें कशीं आहेत. आमचे बैल, नांगर कसे आहेत.' त्यांचें हें बोलणें ऐकून केशवरावमामा म्हणाले, 'अरे भाऊ-बापू, बैल, नांगर तुमचेच आहेत असें नाहीं. दत्तूचेहि आहेत. तो तुमचा भाऊ नाहीं का?' मुलें तें कबूल करीनात. 'तो आमचा भाऊ कसा? तो तर टिळक आहे. आम्ही गोखले आहों.' दत्तूनें आपली पाटी त्यांच्यापुढें करून म्हटलें, 'हें पहा माझें शेत. ही पेन्सिल हा माझा नांगर आणि हीं बोटें माझे बैल आहेत.' 'पण तुझ्या ह्या शेतांत दाणे कांहीं उत्पन्न होत नाहींत,' असें त्यांनीं म्हटल्यावर दत्तू म्हणाला, 'हीं अक्षरें माझे दाणे आहेत.' दत्तूचें हें बोलणें ऐकून माझ्या दोन्ही भावांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. केशवरावमामांनीं त्याला आपल्या पोटाशीं धरलें. त्या वेळीं मला काय वाटलें असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी.

जलालपुरास आल्यावरहि टिळकांचीं पत्रें रोजच्या रोज येत. तीं कधीं कधीं फार रागाचीं असत. एखादें वेळीं रागानें कोरे कागदच ते पाठवून देत. कोऱ्या कागदाचें पत्र आलें म्हणजे मला रडायला येई. कां रडतेस असें कोणी विचारलें म्हणजे मी तें कोरें पत्र दाखवी. पण लोक म्हणत, 'पत्र कोरें नाहीं कांहीं. ह्यांत कांहीं तरी युक्ति आहे. कोरें पत्र कां कधीं कोणी पाठवितें? मनूभावशीला हें कसें वाचायचें याची युक्ति ठाऊक असली पाहिजे.' तसें मी अधिक रडावें.

जलालपुरास टिळक मला भेटायला तीनदां आले. त्यांची प्रकृति आतां फारच चांगली झाली होती. ते पहिल्यानदा आले तेव्हां माझ्या धाकट्या भावानें त्यांना मार देण्याचें ठरविलें. तो कुऱ्हाड घेऊन इकडे तिकडे हिंडूं लागला. मी म्हणें, 'तुम्ही त्यांना वाटेल तितकें बोला, त्यांच्याशीं भांडा, पण

मारूं बिरूं नका,' दत्तू म्हणे, 'कोण माझ्या नानाला मारतो तें पाहतों. मीं त्याला मारीनं.'

टिळक आले. त्यांच्या मागें गंगापुरांतून मोठीं माणसें व पोरें गोळा होऊन आलीं. जलालपूरचींहि माणसें अर्थात् जमा झालींच. खेडेगांवांत साधारण कोणी बाहेरचा पाहुणा आला कीं, भोंवतीं माणसांचें कडें जमा होतेंच. त्यांत टिळक ओळखीचे व त्यांच्यांत एवढा फरक पडलेला. पण तें घरीं आलें तेव्हां माझा धाकटा भाऊ बाहेर आलाच नाहीं. थोरला भाऊ घरींच नव्हता. ते आले तसे दारापुढें रस्त्यावर उभे राहून गर्दीतूनच माझ्याशीं दोन शब्द बोलून परतले. दुसऱ्या खेपेला ते आले तेव्हां केशवरावमामा घरीं होते. त्यांनीं टिळकांना घरांत बोलाविलें. त्यांना बैठकीवर बसविलें. भांडण किंवा मारामारी कांहीं झालीं नाहींत. पुन्हा चार सहा महिन्यांनीं टिळक आले. ह्या वेळेस माझे दोघेहि भाऊ घरीं नव्हते. मी न्हालें होतें. केस मोकळेच होते. शिवाय गांवांतल्या आखाडसास्वांच्या बडबडींना उत्तर म्हणून मी कपाळीं चांगलें कपाळ भरून कुंकू लावीत असें. ते केस सोडलेले व तें कपाळाभर कुंकू ह्या महामायेच्या अवतारांत मी टिळकांच्या पुढें येऊन कमरेवर हात देऊन उभी राहिलें. त्यांच्याबरोबर ह्या वेळेस एक युरोपियन बाई होतीं ती दोघें अंगणांत उभीं होतीं.

ती युरोपियन बाई मला म्हणाली, 'बाई, पहा तुमचा नवरा किती चांगला त्यानें दुसरें लग्न केलें नाहीं."

ते ऐकतांच मी तिच्यावर उसळलें. टिळकांकडे बोट करून मी म्हणालें, "ह्यांनीं तुम्हांला वकील म्हणून बरोबर आणलें आहे एकुण. काय हो,. हे चांगले आहेत आणि मी कोणती वाईट आहे? मी देखील अजून लग्न केलें नाहीं. माझें त्यांचेंच केवळ लग्न झालें आहे. तुम्हांला मध्यें शिष्टाई करण्याचें कारण नाहीं. ते माझ्याशीं बोलतील काय बोलायचें तें." ह्यावर ती गप्प बसली.

माझ्या मागें घरांतील मुलें, त्यांच्या मागें माझ्या भावजया, समोर टिळक

व ती मडम, त्यांच्या मागें जलालपूर-गंगापुरांतील लोक व पोरें असा तो 'सीन' होता.

टिळकांनीं विचारलें, "चांगलें चाललें आहे ना?"

मी म्हणालें, "जशी तुम्हीं व्यवस्था करून ठेवली आहे तसें सर्व ठीक चाललें आहे. आतां कोणतीच काळजी करण्याचें कारण नाहीं."

इतकें बोलून झाल्यावर टिळक, ती मडम व गांवकरी परतले.

मीं मोठें कुंकू लावण्याचें कारण गांवांत माझी सवाष्णींत गणना होत नसे. तें एक दिवस माझ्या भावजयीच्या लक्षांत आलें. एकदां मला ग्राम-जोश्याकडे सवाष्ण सांगितली. तें आमंत्रण माझ्या भावजयीनें माझ्या परोक्ष घेतलें होतें. नंतर ती गंगेवर गेली. तेथें गंगेच्या घाटावर बायकांचीं बोलणीं चाललीं होतीं. त्यांत माझ्या नांवाचा उल्लेख ऐकून ती थबकली.

"अहो काकू, हें हो काय? त्या मनूचा नवरा धादान्त बाटला आणि तुम्हीं तिला देवीची सवाष्ण सांगितलीत."

"अगबाई खरंच. माझ्या हें ध्यानांतच आलं नाहीं. आतां कसं काय करावं?"

"आतां काय! तिला जेवायला येऊं द्या व देवीची सवाक्ष्ण दुसरी सांगा. म्हणजे झालं."

हें गंगेवरचें भाषण माझ्या भावजयीनें ऐकतांच ती पुढें झाली व म्हणाली, "काकू, आमच्या वन्सनीं परान्नाचा नेम धरला आहे. मला कांहीं तें ठाऊक नव्हतं. तरी त्या कांहीं तुमच्या घरीं जेवायला येणार नाहींत. तुम्ही दुसरी एखादी सवाष्ण सांगा."

त्या बाईलाहि तेंच पाहिजे होतें. रमावहिनीनें नंतर हा सगळा प्रकार मला व माझ्या थोरल्या भावजयीला सांगितला व मला म्हटलें, 'वन्सं, तुम्ही पण परान्नाचा नेम धरा.' मी कधीं माझ्या भावजयांच्या विरुद्ध वागत नसें. मीं परान्नाचा नियम धरला, व जलालपुरास असेपर्यंत माझ्या भावजयाहि कधीं कोणाच्या घरीं जेवायला गेल्या नाहींत. त्यांना माझ्याबद्दल कोणीं कांहीं म्हटलें

तर अगदीं खपत नसे. अशा भावजया मिळणें म्हणजे परमेश्वराची मोठी कृपाच.

टिळक ज्या मडमेबरोबर जलालपुरास आले होते तिनें त्यांना ताबडतोब सांगितलें कीं, ‘ तुमची बायको तुमच्याकडे येणार नि ती लवकरच येणार असें मला खात्रीनें वाटतें. ’ त्यानंतर कांहीं दिवसांनीं ह्या मडमेचें मला पत्र आलें. त्यांन तिनें लिहिलें होतें कीं, ‘ तूं आपल्या नवऱ्याकडे ये. मी तुला दरमहा दहा रुपये देत जाईन. ’ मीं तिला उत्तर दिलें कीं, ‘ मला पैशांसाठीं माझ्या नवऱ्याकडे जायचें नाहीं. ’ ही मडम म्हणजे नाशिक येथील झनाना मिशनची सुप्रसिद्ध ‘ आई ’ ऊर्फ मिस हार्वे होय. पुढें तीस वर्षांनीं आम्ही नाशकास आलों तेव्हां ह्यांचा प्रेमळपणा आमच्या अनुभवास आला. अगदीं प्राण सोडायच्या आधीं तिनें तीन-चारदां ‘ लक्ष्मीबाई, लक्ष्मीबाई ’ म्हणून मला हांका मारल्या ! पण तिचें स्वागत मीं प्रथम केलें तें हें असें होतें !

माझ्या दोन्ही भावांच्या मुलांना आतां सातवें वर्ष लागलें होतें. दत्तूला सहावें वर्ष लागलें होतें. ह्या तिन्ही मुलांच्या मुंजी कराव्या असा आतां घरांत विचार सुरू झाला. तिन्ही मुलांच्या मुंजी बरोबरच लावावयाचें ठरलें होतें. पण कित्येक म्हणूं लागले, ‘ दत्तूची मुंज आतांच करूं नका. जर त्याच्या बापानें त्याला नेलें तर मुंजीचा खर्च फुकट जाईल. ’ केशवरावमामा म्हणाले, ‘ कांहीं हरकत नाहीं. जानव्याचा दोरा गळ्यांतून काढून टाकायला कांहीं खर्च लागत नाहीं. त्याचीच मी आधीं मुंज करीन नि मग आमच्या मुलांच्या करीन. ’ मामा नाशकास जाऊन ह्या वर्षीं मुलांना मुंजी लाभतात कीं नाहीं पाहून आले होते. तिघांना मुंजी लाभत होत्या.

नाशिकहून येतांना मामांनीं एक बातमी आणली कीं आतां काय नाशिकची मुंबई होणार व जलालपूर गंगापूरचें नाशिक होणार ! आतां एवढ्याशा खेड्याचें नाशिकसारखें शहर होणार म्हणून ज्याला-त्याला आनंद झाला. मुंजींच्या गडबडींत मामांच्या नाशकास बऱ्याच खेपा होत. अशाच एका खेपेंत त्यांनीं आणखी एक बातमी आणली कीं एक निराळाच आजार उत्पन्न

झाला आहे. पाहतां-पाहतां माणसाच्या शरीरावर व विशेषतः काखेंत एक-दोन गोळे येतात व माणूस चटकन् मरतो. ह्या बातमीनें गांवांतील सगळे लोक हवालदिल झाले.

मुंजींची तयारी कडेकोट झाली. माझ्या भावजयीनें भावाला सांगितलें, 'आमच्या मुलांच्या मुंजींत पाहिजे तर बारकाई करा, पण दत्तूची मुंज चांगली झाली पाहिजे. वन्संना वाईट वाटेल असं कांहीं करूं नका. त्यांचं हें एकच कार्य आहे.' मामा म्हणाले, 'सर्वांत जास्त खर्च मी त्याच्या मुंजींत करीन. तूं कांहीं काळजी करूं नको.'

पण मुलाची मुंज मामाच्या घरीं किंवा मामाच्या मांडीवर लागत नाहीं. आतां काय करायचें हा प्रश्न आला. सखारामभाउजींना मामांनीं पत्र टाकलें कीं तुम्ही मुंज लावण्यास या. त्यांचें उत्तर आलें, 'तुम्हीच दत्तूला व तुमच्याहि मुलांना घेऊन पंढरपुरला या म्हणजे मी सर्वांच्याच मुंजी माझ्या खर्चानें लावतों.' हें उत्तर वाचून माझ्या भावांना फार वाईट वाटलें. त्यांनीं लिहिलें कोणत्या अर्थानें व त्याचें उत्तर भाउजींनीं कोणत्या अर्थानें पाठविलें. मात्र तिन्ही मुलांच्या मुंजी लावण्यास तयार झालेल्या भाऊजींना दत्तूच्या मुंजीला एक पैही पाठवितां आली नाहीं ह्याबद्दल चार दिवस सगळ्यांनाच कुतूहल वाटत होतें.

मग मामांनीं पेंडशांना लिहिलें कीं तुम्ही तरी येऊन मुंज लावा. पेंडशांचें उत्तर आलें, 'मीं कांहीं असा नवस केला नव्हता कीं टिळकांनीं जावें आणि त्यांच्या मुलाची मुंज माझ्या मांडीवर लागावी. मी वाटेल तितका पैसा खर्च करीन, पण मला त्याच्या मुंजीला हजर देखील राहवणार नाहीं. मी आलोंच तर मोठा जीव करून येणार.'

दत्तूची मुंज आधीं करायची व मग स्वतःच्या मुलांच्या मुंजी करायच्या असें ठरवून त्यांनीं तशा मूळचिठ्याहि पाठवून दिल्या होत्या. टिळकांना पाठविलेल्या मूळचिठ्यांत मात्र तिथि उलट-सुलट घातल्या होत्या. हेतु हा कीं दत्तूच्या मुंजीची तिथि तर त्यांना कळूं नये व मुंज होणार एवढें तर त्यांच्या कानांवर जावें. तीथ

नक्की कळती आणि त्याच वेळेस त्यांनीं मुंजींत कांहीं अडथळा आणला असता तर ?

दत्तूच्या मुंजींत सर्व मंडळी तीन दिवस रडतच होतीं. उपाध्यायाच्या मांडी-वर त्याची मुंज लागली. तोहि बिचारा रडत होता. कारण त्याला मुलगा नव्हता. तो म्हणे, ज्यांना बाप आहे त्या मुलांची ही अवस्था व ज्यांना मुलगे नाहींत त्यांची ही अवस्था. थोडक्यांत म्हणजे पई-पाहुण्यापासून दत्तूच्या मुंजींत सर्वांनीं एका दिलानें खाऱ्या पाण्याची पर्जन्यवृष्टीच चालू ठेवली होती.

रडत-खडत पण कशी तरी निर्विघ्नपणें दत्तूची मुंज पार पाडली. मुलाच्या मुंजीचें देवदेवक बसावयाच्या वेळेस टिळकांचीं भलीं लठ्ठ-लठ्ठ चार पत्रें येऊन पोहोंचलीं. दोघां भावांना दोन, पेंडशांना एक व मला एक. तीं पत्रें म्हणजे त्यांच्या डोक्यांत आलें त्या साऱ्याचे चित्रपटच होते. त्यांत काय नव्हतें ? शिव्यांची लाखोली, सरकार-दरबारचा धाक सारें कांहीं होतें.

मामा म्हणाले, ' मेहुण्यानें अहेर पाठवला. '

* * * *

ज्येष्ठ उजाडला. एक दिवस एक बाई खबर घेऊन आली कीं कुळकर्ण्यांच्या घरीं चोरी झाली व उमाकाकू धाय मोकलून रडत आहेत. चोरी केव्हां झाली, काय झाली हें मात्र कळलें नाहीं.

चोरीची बातमी कळतांच मी भावजयांना विचारून तिकडे गेलें. तेथें जातें तों काकू खरोखरच ओक्साबोक्शीं रडत आहेत.

" काय ग काकू, काय झालं ? "

" काय ग सांगूं ! तुझा भाऊ नाशिकला गेला, त्यानं काढलं लग्न बाबाचं ! आणि आज घरांत पांच-सात हजारांची चोरी झाली. अगदीं मणिमंगळसूत्रालां देखील घरांत सोनं उरलं नाहीं. "

कुळकर्ण्यांचें घर हें दहा जणांचें कुटुंब. दोन मुलांचीं लग्नें झालेलीं. तिसरा लहान.

" चोरी झाली केव्हां ? लग्न कुणाचं ? काकू, तूं काय सांगतेस कांहीं कळत नाहीं. "

उमाकाकूंनीं मला हात धरून आंत माडीवर नेलें व जेथून चोरी झाली तें ठिकाण दाखविलें. आजपर्यंत तेथें मी शेंकडों वेळां गेलेली, पण ह्या जागीं ह्यांची ठेव असेल अशी मला कधीं कल्पनाहि आली नाहीं. एका भिंतींत कपाट. दिसावयाला अगदीं लहान, पण आंत साधारण माणसाला ओणवून उभें राहतां येईल एवढी जागा. ह्या कपाटांत कांहीं विशेष असेल असा कोणाला कधीं संशयहि आला नसता. आम्ही लहानपणापासून शंभर हजार वेळां त्या खोलींत खेळलों होतों. आंत कपाटांत उभें राहिलें म्हणजे वर फळ्यांची तक्तपोशी, त्यांत बोटें मावतील अशी चंद्रकोरीसारखी फट. तींत बोट घालून फळी सरकविली म्हणजे वर उडी मारून आंत पोटावर पडून सरपटत जावयाचें, मग पुढें सात-आठ हातांवर रांजण. त्यांत घरांतलि सारें सोनें-नाणें ठेवून दिलेलें होतें.

काकूंनीं मला त्या कपाटांत सोडलें व सांगितलें, “ आतां ती फळी बाजूला लोट. वर हात टेंकून आंत हो. मग पालथी निजून पुढें सरक. पाहा तुला कांहीं सांपडलं तर. ” मीं तिच्या सांगण्याप्रमाणें केलं. माझा जीव घामाघूम झाला. आंत थोडा प्रकाश होता. रांजणांत दोन-तीन चांदीचीं भांडीं तेवढीं दिसलीं. मी म्हणाले, “ कांहीं नाहीं ग बाई ! दोन भांडीं तेवढीं आहेत. ”

दुष्काळ होता. गांवांत चोऱ्या बऱ्याच होत होत्या. पण ही चोरी बाहेरच्या कोणीं करणें शक्य नव्हतें. चोरांच्या भीतीनें घरांत असलेले दोघी-तिघींचे दागिने बिंदी-पट्ट्यापासून कानांतलि सुंकल्यापर्यंत सर्व कांहीं त्या रांजणांच्या पोटांत भरलें होतें. नथा देखील रांजणाच्याच स्वाधीन केल्या होत्या. आपल्या भावांना कांहीं मिळूं नये म्हणून चोरी दादानेंच केली आहे व आपला संशय येऊं नये म्हणून लग्नाचें निमित्त करून नाशकास चालता झाला असें माझें ठाम मत झालें. दादाचा मधला भाऊ बाबा ह्याचें दुसरें लग्न दादानें काढलें होतें.

दुसऱ्या दिवशीं दादा व वहिनी अक्षत घेऊन आमच्याकडे आलीं. त्या दोघांनीं लग्नाला येण्याची मला फारच गळ घातली. ते म्हणाले,

' इथें तूं रडतच बसणार. त्र्यंबकला कांहीं मनाला विरंगुळा तरी पडेल. ' हो नाहीं करतां-करतां मी व दत्तू निघालों. सात कोसांची मजल. वऱ्हाडी सर्व बैलगाड्यांतच होते. कांहीं गाड्यांना तट्टे होते तर कांहीं तशाच होत्या. वाटेनें आम्हांला पाऊस लागला. शिध्याची गाडी न्हाली, कणकेचीं पोतीं तिंबलीं, साखरेचें पोतें विरघळूं लागलें. पण आमच्या दादाचें मन खंबीर. घरीं चोरीचा कहर व दारीं पावसाचा वर्षाव झाला तरी तें विरघळलें नाहीं, कीं खिन्न झालें नाहीं.

आम्ही पांच-पंचवीस वऱ्हाडी होतों. मी जरी लग्नाला आलें होतें तरी मला प्रशस्त वाटत नव्हतें. ह्या लग्नाच्या मी विरुद्ध होतें. कारण बाबाच्या पहिल्या बायकोंत मला कांहींच वैगुण्य दिसत नव्हतें. रूपांत, गुणांत, कामांत नांव ठेवण्यासारखें तिच्यांत कांहींच नव्हतें. ती कधीं वर मान करावयाची नाहीं. ती मला मावशी म्हणे व तिचा नवरा मला ताई म्हणे. म्हणजे माझें असें दुहेरी नातें होतें. आम्ही जरी देशस्थ कोंकणस्थ होतों तरी आम्हांला आप्तपणा वाटे. तेव्हां त्या सद्‌गुणी पोरीला सवत आणलेली मला कांहीं आवडली नाहीं.

दादांनीं कंबर बांधून दोन दिवसांत लग्न पार पाडलें. वऱ्हाडणींचे दागिने गोळा करून आपल्या नव्या भावजयीचा पोवळा साजरा केला. सोयऱ्यांकडे गडबड झाली कीं बिंदी-पट्ट्याचे जागीं निदान घरांतली नथ तरी. हें दादाच्या कानांवर गेलें तरी तो आपला शांतच! हें पाहून संशय अधिकच बळकट झाला. मी त्याला म्हणालें, " दादा, मला नाही वाटत चोरी झाली आहे असं. ' तो म्हणाला, ' रामाला नि गंगेला ठाऊक काय झालं तें. ' ' कशाला रामाचं नांव घेतोस? मी म्हणतें दादाला नि गीतालाच ठाऊक काय घालं तें. ' ह्यावर त्यानें एवढेंच उत्तर दिलें कीं, ' तसं का होईना! '

सोमवारीं प्रयोजनाची मंडळी जेवणास येऊं लागली. आमच्याच गांवचे विश्वनाथ भट व त्यांची मुलगी सुंदरी त्र्यंबकेश्वराची पालखी पाहाण्यास निघालीं. सुंदरी मला म्हणाली, ' ताई, तुला येतां येत नाहीं तर दत्तूला नेऊं का पालखी

पाहायला ? ' मी म्हणालें, ' ने, पण त्याला संभाळ. ' ती दत्तूला घेऊन गेली.

इकडे पंगत बसली. पहिला भात झाला असेल नसेल तोंच मंडळी आपोष्णी घेऊन उठली ! घरांत चहूंकडे पाहतां-पाहतां शुकशुकाट झाला ! आम्ही दोघी चौघीच काय त्या घरांत राहिलों. उमाकाकू स्वयंपाकघरांत, भीमाकाकू कोठीवर आणि गीतावहिनी व मी माडीवर. घरांत सारा पसारा पडलेला. मला मोठें चमत्कारिक वाटूं लागलें. मीं म्हटलें, ' वहिनी, जेवणं कशी ग इतक्या लौकर आटोपलीं ? ' ती म्हणाली, ' रोज गोड खाऊन मंडळी कंटाळली आतां. '

थोड्याच वेळांत खालून लक्ष्मीबाई टिळक म्हणून हाक आली. मला लक्ष्मीबाई टिळक म्हणून कोणीच हाक मारीत नसत. माहेरीं सारीं मला मनुमावशी म्हणत. तेव्हां ती आरोळी ऐकून माझा अगदीं थरकांप झाला. अंगावर कांटा उभा राहिला. मला वाटलें टिळकांनीं पकड वॉरंट काढलें. इतक्यांत पुन्हां तीच आरोळी आली. माझ्या काळजीनें अगदीं ठाव सोडला. खालीं एक शिपाई उभा होता. त्यानें खालीं बोलावलें. माझ्या मागोमाग गीतावहिनी खालीं आलीं. शिपायानें विचारलें, " तुमचा मुलगा कुठें आहे ? "

" त्याच्याशीं काय काम आहे तुमचं ? मी तर आहें ना ? "

" असं नाहीं तो कुठें चुकला आहे का ? "

हें ऐकतांच गीतावहिनी पुढें झाली व म्हणाली, " हो चुकला आहे, कुठें आहे तो ? "

" त्याच्या अंगावर दागिने होते का ? "

" कांहीं नव्हतं. "

मग त्यानें बाहेर दत्तूला उभा केला होता त्याला आंत आणला ! आतां माझा जीव शांत झाला. कुशावर्तावर तो चुकला होता. सुंदरीचा हात मध्येंच सुटला व त्या गर्दींत जी तांबड्या लुगड्याची व धोतर पांघरलेली बाई दिसेल तिचा तो हात धरूं लागला. पण कोणीच बाई त्याचा हात धरण्यास तयार होईना ? असें करतां-करतां तो गर्दींतून निघून थेट नाशिक

नाक्याकडे गेला. तेथें शिपायाचें व त्यांचें थोडेसें बोलणें झालें. दत्तू म्हणाला, 'माझ्या मामाकडे घेऊन चला. माझ्या मामाच्या घरीं फार लाडू केले आहेत. ते तुम्हांला एक पाटीभर लाडू देतील.' नांवें विचारतां त्यानें वडलांचें नांव 'नाना' व आईचें नांव 'लक्ष्मीबाई टिळक' सांगितलें. गांवांत दोनच लग्नें उतरलीं होतीं. एक जलालपुरचें व एक नाशिकचें. तेव्हां माझा शोध काढण्यास शिपायाला फारसा वेळ लागला नाहीं.

आतां माझ्या ध्यानांत आलें कीं हा जो जेवणाचा गोंधळ झाला तो दत्तूमुळेंच. मागें तेथें असाच एका श्रीमंताचा एकुलता एक मुलगा हरवला होता व पुढें तो किल्ल्यावरून पडून मेलेला सांपडला.

दत्तू आल्यावर घो घो घो घो सारी मंडळी जमली. सुंदरीचें काळीज सुपाएवढें झालें. दादा, मामा पीतांबर नेसूनच इकडे-तिकडे फिरत होते. ते हताश होऊन परत आले तों त्यांना हा प्रकार कळला. दादानें लागलीच आंत जाऊन तीन पायल्यांची लाडवांची पाटी शिपायापुढें आणून ठेवली व कनवठीचे पांच रुपये काढून तो म्हणाला, "बाबा, आज तुम्ही माझ्या तोंडचं काळं पुसलं व माझ्या बहिणीचं धन तिला आणून दिलं." जे आमचे दादा चोरी झाली, पोती भिजलीं तेव्हां डगमगले नाहींत ते दत्तू हरवला तेव्हां घाबरून गेले. गोविंदाग्रजांच्या 'महाराष्ट्र गीतां'तील 'देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी' ही ओळ आज माझ्या डोळ्यांपुढें उभी राहते. माझ्या अनुभवावरून मीं हें म्हणतें कीं कोंकणस्थांपेक्षां देशस्थांचीं मनें अधिक प्रेमळ व अधिक उदार असतात.

हवालदारानें लाडवांच्या एका कणाला किंवा पांचांतील एका पैला स्पर्श केला नाहीं. दादानें त्याला मग माझी सर्व हकीगत सांगितली. गोविंदरावमामांचा हा नातू हें कळल्यावर त्याला आणखी आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं शिपायाच्या सर्व कुटुंबाला जेवावयाला बोलाविलें.

आम्ही जलालपुरास परत आलों. येतांना गंगेवर बाबांच्या पहिल्या बायकोनें हाक मारून विचारलें, "मावशी, आणली कां दुसरी भाची?".

हे शब्द माझ्या हृदयांत रुतलें. मी कांहींच बोललें नाहीं. बिचारीच्या प्राक्तनाचा विचार करीत घरीं आलें.

गृहप्रवेश होतांच नवी नवरी माहेरी गेली व जुनी घरीं आणिली. आतां चोरीची कसून तपासणी सुरू झाली.

" आम्ही नागनारांवळीकरितां गेलों असतां तूं आमचे मागें माहेराहून इथें कशाला आली होतीस ? "

" मला मनूमावशीनें बोलावलं होतं ! "

मीं खरेंच तिला बोलावलें होतें. मीं तिच्यावर एक मोठें हृदयद्रावक गाणें रचिलें होतें व तें तिला शिकवण्याकरतां बोलावलें होतें.

मावशीनें बोलावलें होतें हें ऐकतांच तिचा नवरा मला बोलवावयाला आला. त्याचे ओंठ थरथर कांपत होते. डोळे लालबुंद दिसत होते. त्याला संताप आला होता. तो म्हणाला, " ताई, तुला दादांनीं बोलावलं. "

" का रे बाबा ? काय काम आहे ? "

" तूं ये मग तुला कळेल. "

त्यांच्या घरीं तपासणी चालली असल्याचें आम्हांला ठाऊक होतें. मला कड-कडीत शुक्रवार. मी जावें असें माझ्या भावजयांना वाटेना. माझे दोघे भाऊ घरीं नव्हते. त्या म्हणाल्या, ' पाहा बाई ! नाहीं तर तुमच्यावर येईल कांहीं ! ' मी म्हणाले, ' काय येणार ? सत्याचा वाली देव आहे. ' मी गेलें. तेव्हां दादा, उमाकाकू ही ओसरीवरच होतीं. मी विचारलें, ' काय ग काकू, मला कां बोलावलं ? ' ती म्हणाली, ' पाहा बाई, ती तुझी भाची काय सांगतें तें. '

मी आंत गेलें. तिला पोटाशीं घेऊन खूप रडलें. ' काय ग बाई तुझी ही परवड ? जशी माझी घारू तशी तूं मला आहेस. तुला आई नाहीं. तुझं कसं होणार ? '

दुःखाला दुःख भेटलें. हृदय हलूं लागलें. अश्रु गळूं लागले. तिलाहि माझ्याकरितां वाईट वाटत होतें. तिनें माझ्या गळ्याला मिठी मारली व म्हटलं,

' मी तुझं नांव उगीच सांगितलं ग. '

'मग तुझ्याजवळ हें सर्व खरंच आहे का? नि तूंच नेलंस का? तर मग दे पाहूं सारं!'

'इथें नाहीं, गंगापुरला आहे.'

'काकू, आहे ग सगळं. मी जातें आतां.' असें म्हणून मी निघालें.

'नको ग बाई, आतां तेवढं घेऊन ये.'

आम्ही दोघी जलालपुरहून गंगापुरला निघालों. गंगेला गुडघ्याएवढें पाणी होतें. पाण्याची धार दोघींना ओढीत होती. मनाला वाटे, ही गंगामाई आतांच पोटांत घेवो. पण लागलीच वाटलें दत्तूचें कसें होईल?

आम्ही गंगापुरला गेलों. तिनें ते दोन डबे मला काढून दिले. तोंच अंधाऱ्या खोलींतून आवाज आला, 'टवळे, कशाला कबूल झालीस!'

'माझ्यामुळें त्या मावशीला उगीच त्रास म्हणून!' मी व ती निघालों. इतक्यांत दादा आले. मी म्हणालें, 'आहे रे बाबा सगळं.'

'तूं तें उघडून पाहिलंस का?'

'नाहीं.'

'अहा वेडे! त्यांत दगड कशावरून नसतील?' डबे उघडून पाहिले तो सर्व दागिने होते. मात्र मोडून-तोडून ठेवलेले व चेचलेले होते. डबे घेऊन आम्ही रात्रीं आठाला आलों. काकूला आनंद झाला. ती म्हणाली,

'मने, तूं खरीच लक्ष्मी आहेस. माझी गेलेली लक्ष्मी परत आणलास. गीता, मनूची ओटी भर. मग तिला जाऊं द्या.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २२८०८ वि: ....
क्रमांक ....५३०.... नों: दि: ....

# दिराच्या दारांतून सत्तेच्या घरांत

एक दिवस जेवणें झाल्यावर मोलकरीण भांडीं घेऊन गंगेवर गेली व तीं गंगेंत भिजत टाकून आरडत ओरडत साऱ्या गांवांतून धांवत आली व सांगूं लागली कीं साहेब आला. झालें, जिकडे-तिकडे पळापळ सुरू झाली. घरांत किंवा गांवांतहि पुरुष माणसें कोणीं नव्हतीं. तीं शेतावर गेलीं होतीं. आत्याबाई, माझ्या भावजया, मुलें सगळीं शेतावर गेलीं होतीं. दत्तू, मी व भावाचा एक मुलगा एवढींच आम्ही घरीं होतों. मीं दत्तूला मागील दारच्या भिंतीवरून खालीं सोडून दिला व सांगितलें, वाटेल तिकडे जा. भावाचा मुलगा तापानें पडला होता. त्याला सोडून मी पळून जाणें शक्य नव्हतें. मी तेथेंच दाराच्या दोन्ही बाह्यांना दोन्ही हात टेकून साहेबाची वाट पाहत उभी राहिलें. रस्त्यानें बाया पळतांना दिसत होत्या. एका बाईनें चवाळ्याचा एक पदर हातीं घेऊन बाकीचा भाग जमिनीवर लोळवीत धूम ठोकली होती, तर दुसरी केरसुणी घेऊनच पळत होती, कित्येक बाया मुलांना पाजीत-पाजीत पळत होत्या, तर कित्येक हातांत चाटू, पळी, टिनची चिमणी वगैरे जें हातीं लागेल तें घेऊन पळत होत्या.

माझ्या पोटांत धडकी भरली. मी आपलें आंबट तोंड करून पुढच्या अरिष्टाची मार्गप्रतीक्षा करीत दारांत उभी होतें. इतक्यांत साहेबाच्या रूपानें तें दारांत दत्त म्हणून उभे राहिलें. त्या साहेबाबरोबर पाटील, कुलकर्णी, नाईक, येसकर वगैरे मंडळी व त्याचीं कांहीं माणसें इतकें लटांबर होतें. घराचीं दारें मोकळींच होतीं. त्यानें विचारलें, ‘ घरांत कोण आहे ? ’

" कुणी नाहीं. साऱ्या बाया तुम्ही आल्याचं ऐकून पळून गेल्या. "

" आजारी कोणी आहे का ? "

" कुणीच नाहीं. आंत जाऊन पाहा पाहिजे तर."

त्या माणसांनीं इकडे-तिकडे जरा डोकावलें व तेथून पुढें कूच केलं. माझा जीव खालीं पडला. हळूहळू सारीं माणसें परत जमलीं. माझ्या भावांना ही हकीकत कळतांच ते घाई घाईनें शेतांवरून परत आले. गंगेंत भिजत टाकलेलीं भांडीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरीं आलीं.

मुंजींत मला पुष्कळ पैसे मिळाले होते. ते आतां मजजवळ वळवळ करूं लागले. मीं भावांना म्हटलें, ' मजजवळ साठ-सत्तर रुपये आहेत. मी आतां शेंगांचीं पोतीं घेतें. पैशांनीं पैसा वाढतो. ह्या व्यापारांत फायदा होईल. मग दत्तूच्या विद्येसाठीं मला पैशांची काळजी करीत बसावें लागणार नाहीं.' भाऊ म्हणाले, ' तुला तें जमणार नाहीं. तुला कल्पना नाहीं· हें काम किती अवघड आहे तें. त्यापेक्षां तूं हे पैसे व्याजीं लाव. ' त्यांचें म्हणणें मला पटलें व मीं हळुहळू त्यांनाच माझे सगळे पैसे गरज लागेल तसतसे व्याजीं लावून टाकले. ते पैसे व त्यांचें व्याज अजून मला वसूल करून घ्यावयाचें आहे.

पंढरपुरास दत्तूची प्रकृति जशी होती तशी ती येथें राहीना. त्याला हिंवताप लागला व दिवसांतून दोन-दोन तीन-तीन हिवें त्याला भरूं लागलीं. त्याच्या मामांनीं पुष्कळ उपाय केले पण गुण येईना. मी म्हणें, ' नागपूर पंढरपूर इथें कसं दत्तूला चांगलं वाटत होतं. इथेंच कसं त्याला बरं वाटत नाहीं. ज्याच्या जिवावर मला आपलं आयुष्य कंठायचं आहे त्यालाच जर बरं नाहीं तर इथें राहून करायचं तरी तरी काय ? ' पण जायचें कोठें ? टिळकांच्या भयानें मला घरचीं माणसें कोठेंच जाऊं देणार नाहींत. शेवटीं माझ्या मनानें दिराकडे पंढरपुरास जाण्याचें घेतलें. पण जायचें कसें ? जवळचे सारे पैसे भावांकडे व्याजीं लावलेले ! टिळकांकडे पैसे मागावे तर नगरास पेंडसे आहेत. तेथें नुकतेच मामाहि गेलेले. टिळकांनीं जर त्यांना सांगितलें तर ? शेवटीं मीं टिळकांनाच पत्र पाठविलें कीं 'मी, तुम्हांला एक गुप्त गोष्ट लिहिणार

आहें. तरी मला वचन द्या कीं कोणाला सांगणार नाहीं म्हणून.'

टिळकांनीं पत्र पाहतांच उत्तर पाठविलें कीं, 'माणूस चुकणारा प्राणी आहे. मोठमोठ्या ऋषी-मुनींच्या हातून चुका घडल्या आहेत. झालें त्याबद्दल कांहींच वाईट वाटून घेऊं नको. तुला जरी तुझ्या सर्व नातलगांनीं किंवा जगानें सोडलें तरी मी तुला कधीं सोडणार नाहीं. तूं म्हणत असशील तर मी तुला नेण्यास येतों. प्रकृतीला जपत जा.'

पत्राचें हें उत्तर! मी तर अगदीं हतबुद्धच झालें! हसावें कीं रडावें मला समजेना. एकपरी समाधान वाटलें, कीं त्यांचें माझ्यावर इतकें प्रेम होतें. मीं उलट ताबडतोब त्यांना लिहिलें कीं, 'मी चुकलें नाहीं. माझ्या नातेवाईकांनीं माझा त्याग केला नाहीं. जगानेंहि मला सोडलें नाहीं. पण आज तीन महिन्यां-पासून दत्तूला ताप येत आहे. त्याला घेऊन मला पंढरपुरास जावें असें वाटतें. मात्र जवळ पैसे नाहींत. आणि ते मीं गोळा केले असें समजलें तर नातलग मला जाऊं देणार नाहींत. तरी ही बातमी बाहेर न फोडतां पंढरपुरास जाण्याचें तीन माणसांचें भाडें पाठवा. मी भाउजींकडे जातें.'

त्यांनीं ताबडतोब पैसे पाठविले व दरमहा दहा रुपये भाउजींकडे पाठवीन म्हणूनहि लिहिलें.

पैसे येतांच मीं ताबडतोब पंढरपुरची तयारी केली. आत्याबाईला दत्तूची काळजी लागून राहील म्हणून तिलाहि बरोबर घेतलें.

माझा भाऊ माझ्या जाण्याच्या विरुद्ध होता. तो म्हणे, 'ज्यानें मुंजींत एका पैनेंहि साह्य केलं नाहीं त्यांच्याकडे न बोलावतां तूं जावंस हें मला पसंत नाहीं. तूं जर आपल्या हट्टानें जात असलीस तर पुन्हां मात्र मला तोंड दाखवूं नको.' मीं म्हटलें, 'मीं हौसेनें जात आहें असं नाहीं. मला दत्तूसाठीं गेलंच पाहिजे.' भावजया म्हणूं लागल्या, 'दत्तूकरतां जायचं असेल तर जा. पण तुम्ही आम्हांला मुळींच जड नाहीं. टिळकांकडे मात्र जाऊं नका.'

मीं जलालपूर सोडून बैलगाडीनें नाशिक गांठलें. तेथें एक रात्र माझ्या मावसभावाकडे घालविली. तोहि माझ्या पंढरपुरला जाण्याच्या विरुद्धच होता.

तेथें पुष्कळच लोकांनीं माझ्या जाण्यांत मोडा घातला, पण मी म्हणें, ' मला दत्तूच्या प्रकृतीकडे पाहिलेंच पाहिजे.'

दत्तूच्या अंगांत ताप होता. स्टेशनवर प्लेगची तपासणी सुरू होती. मात्र अशी तपासणी सुरू असल्याचें मला ठाऊक नव्हतें. संध्याकाळच्या वेळीं एकदांची गाडी गांठली. गाडीप्रमाणेंच माझें मन धावत होतें. श्वास जोराजोरानें चालला होता. ' एकदाचं दत्तूला बरं वाटलं म्हणजे झालं. भावानें सांगितल्या-प्रमाणें त्याला शरण जाण्याची पाळी न येवो म्हणजे मिळवली.' असें मला वाटत होतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नवाच्या सुमाराला गाडी अहमदनगरच्या स्टेशनवर येऊन उभी राहिली. टिळक नगरास होते तेव्हां अर्थात् मी कुतुहलानें व आतुरतेनें स्टेशनभर पाहूं लागलें. इतक्यांत एक बाई आमच्या डब्याकडे आली. ती कांहीं निराळींच दिसत होती. कोणी डब्यांत आलें कीं त्याला जागा करून द्यावयाची हीं माझी नेहमींचीच संवय आहे. पण ह्या बाईला मीं मजजवळ बोलावूनच घेतली. तिचें तें बिनकासोट्याचें लुगडें, बांगड्यापर्यंत बाह्या असलेलें जाकीट, हातांतील दोन-दोन बांगड्या, कुंकू नसलेलें कपाळ व शुद्ध मराठी भाषा ह्या सर्व गोष्टींनीं ' ही बाई ख्रिस्ती तर नसेल ना !' अशी शंका मला आली व म्हणूनच मीं तिला मजजवळ बसवून घेतली. आत्याबाई व बरोबर आणलेली काशीबाई दत्तूसह पलीकडच्या बाकावर बसल्या होत्या म्हणून मला समाधान वाटत होतें. कारण आत्याबाई धांदरट, कांहींहि कोठेंहि बोलून जावयाची व मला तर ह्या बाईपासून टिळकांची माहिती काढावयाची होती. मीं हळूच बाईशीं बोलण्यास सुरुवात केली.

" बाई, तुम्हांला कुठें जायचं आहे ? "

" केडगांवास. "

" नगरास तुमचें कोण आहे ? "

" नगरास आमचं घर आहे. केडगांवास माझी वहीण आहे तिला भेटायला मी जात आहें. पण तुम्ही रडतां कां ? "

"ह्या मुलाच्या पाठीवर मुलं जगत नाहींत म्हणून; नि आज ह्यालाहि बरं नाहीं,"

"तुम्हीं कुठून आलां ?"

"राजनांदगांवहून."

"जायचं कुठं ?"

"पंढरपुरास दिराकडे. तिथें मुलाला बरं वाटलं तर पाहूं ?"

"तुमचें नांव काय ?"

"मनू."

"आडनांव काय ?

"जोशी."

"राजनांदगांवला टिळक होते ते तुम्हांला ठाऊक आहेत का ?"

"हो, पण ते आतां ख्रिस्ती झाले आहेत. आमच्या शेजारींच राहत असत तिथें."

"आम्ही पण ख्रिस्ती आहों."

आणि मग बाईंनीं टिळकांविषयीं अगदीं मनमोकळेपणानें माझ्याशीं बोलण्यास सुरुवात केली! दत्तूला ताप बराच भरूं लागला. मीं त्या बाईला विचारलें, 'का हो बाई, ताप तर वाढतो आहे नि आतां पुढं तपासणी होणार! आतां काय करूं?' तिनें सांगितलें, 'त्याच्या हातां-पायांला गार पाणी लावा व वारा लागूं द्या. मग तपासाच्या वेळां त्रास होणार नाहीं.'

"तुम्ही कुठें उतरणार ?"

"दौंडला."

"तुम्हांला तिथेंच उतरायचं तर मग माझी दुसऱ्या गाडींत. बसायची सोय करून द्या ना!"

"अहो, त्यांत काय आहे मोठंसं! ही गाडी जाईल, नंतर दुसरी येईल तीच पंढरपुरला जाईल. हमालाला सांगा कीं तो बसवून देईल."

"तुमचं नांव काय ?

“ राजस कुकडे. ” *

अशा रीतीनें बोलत-बोलत आम्ही दौंडपर्यंत आलों. बाईंनीं सांगितल्याप्रमाणें मीं प्रयोग केल्यानें दत्तूच्या अंगांत ताप लागेनासा झाला. डब्यांतून बाई उतरणार तों मीं तिचा हात गच्च धरून ठेवला.

“ माझी चांगली सोय करा. तुम्ही ओळखलंत का मी कोण आहें ती ?”

“ मी कशी ओळखणार ? ”

“ ज्या टिळकांच्याबद्दल आपण इतका वेळ बोलत होतां त्या टिळकांची मी बायको ! ”

मीच लक्ष्मीबाई टिळक असें कळल्यावर राजसबाईंना फारच चमत्कारिक झालें. ‘ टिळकांच्यासंबंधीं इतका वेळ आपण बोलत होतों. त्यांत कांहीं कमी-अधिक तर शब्द नाहीं ना बोललें मी ’ असें त्यांना वाटलें असावें. पण मी कोण हें कळल्यावर त्यांनीं माझी सर्व व्यवस्था करून दिली आणि मग त्या केडगांवास गेल्या. आम्ही गाडींतून उतरतांच एका भल्या मोठ्या नाड्याच्या वेटोळ्यांत आम्हांला पकडण्यांत आलें. गाडींतल्या साऱ्या डब्यांना कुलपें लावीत व एकएका डब्यापुढें डॉक्टर, पोलिस, शिपाई वगैरे उभे राहून भोंवतालीं एक नाड्याचें वेटोळें करीत. मग कोंडवाड्यांत गुरें सोडावीं त्याप्रमाणें त्या डब्यांतलीं माणसें त्या नाड्याच्या कोंडींत सोडीत. मग डॉक्टरानें सर्वांची तपासणी केल्यावर पास झालेल्या उतारूला पुढें जाण्यास परवानगी मिळे. आमच्या कोंडींतल्या माणसांची तपासणी अशीच झाली. मला दत्तूचें फार भय वाटत होतें, पण त्याचे हात थंडगार केल्यानें तो चटकन पास झाला व आम्ही कुर्डुवाडीच्या गाडीची वाट पाहत दुसऱ्या बाजूला जाऊन बसलों. योग्य वेळीं ती गाडी आली व रात्रीं दहाला आम्ही कुर्डुवाडीच्या स्टेशनवर पोहोंचलों. खालीं उतरतांच बडव्यांची गर्दी आमच्या भोंवतीं जमा झाली. मीं त्यांना

* मुंबईचे कॉरोनर रावबहादूर आठवले ह्यांच्या पत्नी सौ. राजसबाई आठवले यांचें माहेरचें नांव.

सांगितलें, ‘ आम्हांला टिळकांच्या घरीं जायचं आहे. आम्ही कांहीं यात्रेकरू नाहीं. ’ तेव्हां ते गेले. बैलगाडी ठरविली. गाडीवाल्यानें सांगितलें, ‘ चंद्र उगवल्यावर गाड्या निघतील, तोंपर्यंत तुम्ही धर्मशाळेंत निजा. आम्ही तुम्हांला हांका मारूं. ’

आम्ही तिघी व दत्तू धर्मशाळेंत जाऊन निजलों. ह्या वेळेस मजजवळ रोकड व दागिने मिळून हजार-बाराशेंचा ऐवज होता. नथच तीनशेंची होती. ह्या ऐवजाचें बोचकें डोक्याखालीं घेतलें होतें. आत्याबाई मध्यें निजली होती. दगदगीमुळें सर्वांचाच डोळा चटकन् लागला. झोंप लागल्यावर माझ्या पायाला कोणीं चिमटा घेतला. पायाला चिमटा घेऊन माणूस उठलें म्हणजे डोक्याखालचा ऐवज लांबविल्याच्या गोष्टी मीं ऐकल्या होत्या. मी तशीच पडून राहिलें व आत्याबाईला पडल्या-पडल्या मेणबत्ती लावण्यास सांगितलें. मग गांठोडें पोटाशीं घेऊन उठून बसलें. पायांजवळ एक माणूस उभा होता. त्याला मीं दरडावून विचारलें, “ कोण रे तूं ? पोलिसला हांका मारूं का ? ” तो म्हणाला, ‘ बाई, मी उतारू आहें. तुम्ही झोंपा. चंद्र उगवायला अजून अवकाश आहे. ’ पण चोराच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवील ? आम्हीं उरलेला वेळ बसूनच काढला.

आतां माझ्या आत्याबाईला बोलणें सुचलें आणि तें सर्व आपल्या ऐश्वर्याचें. मी तिला दावीतच होतें व ती आपल्या, पेंडशांच्या व माझ्या दागिन्यांच्या गप्पा मारीतच होती.

चंद्र निघाला. गाडी निघाली. पण तेवढीच एकटी गाडी होती. आमच्या गाडीच्या मागें एक माणूस एकसारखा धावत येत होता. मीं त्याला विचारलें, ‘ धावतोस का ? ’ तो म्हणाला, ‘ पुढें चोरांची भीति आहे म्हणून मी येतो आहे ! ’ म्हणजे ह्या चोराच्या उलट्या बोंबा ! मी म्हणालें, ‘ अरे बाबा, चोर आम्हांला काय त्रास देणार नि आमच्या जवळून काय घेणार ? आम्ही चाललों आहों पंढरपूरच्या अन्नछत्रांत भाकरी भाजायला, तूं कशाला उगीच दमतोस ? ’ ह्या बोलण्यानंतर आमचा संरक्षक मागें राहिला व आमच्या मागची एक

"राजस कुकडे." *

अशा रीतीनें बोलत-बोलत आम्ही दौंडपर्यंत आलों. बाईनीं सांगितल्या-प्रमाणें मीं प्रयोग केल्यानें दत्तूच्या अंगांत ताप लागेनासा झाला. डब्यांतून बाई उतरणार तों मीं तिचा हात गच्च धरून ठेवला.

"माझी चांगली सोय करा. तुम्ही ओळखलंत का मी कोण आहें ती?"

"मी कशी ओळखणार?"

"ज्या टिळकांच्याबद्दल आपण इतका वेळ बोलत होतां त्या टिळकांची मी बायको!"

मीच लक्ष्मीबाई टिळक असें कळल्यावर राजसबाईंना फारच चमत्कारिक झालें. 'टिळकांच्यासंबंधीं इतका वेळ आपण बोलत होतों. त्यांत कांहीं कमी-अधिक तर शब्द नाहीं ना बोललें मी' असें त्यांना वाटलें असावें. पण मी कोण हें कळल्यावर त्यांनीं माझी सर्व व्यवस्था करून दिली आणि मग त्या केडगांवास गेल्या. आम्ही गाडींतून उतरतांच एका भल्या मोठ्या नाड्याच्या वेटोळ्यांत आम्हांला पकडण्यांत आलें. गाडींतल्या साऱ्या डब्यांना कुलपें लावीत व एकएका डब्यापुढें डॉक्टर, पोलिस, शिपाई वगैरे उभे राहून भोंवतालीं एक नाड्याचें वेटोळें करीत. मग कोंडवाड्यांत गुरें सोडावीं त्याप्रमाणें त्या डब्यांतलीं माणसें त्या नाड्याच्या कोंडींत सोडीत. मग डॉक्टरानें सर्वांची तपासणी केल्यावर पास झालेल्या उतारूला पुढें जाण्यास परवानगी मिळे. आमच्या कोंडींतल्या माणसांची तपासणी अशीच झाली. मला दत्तूचें फार भय वाटत होतें, पण त्याचे हात थंडगार केल्यानें तो चटकन पास झाला व आम्ही कुर्डुवाडीच्या गाडीची वाट पाहत दुसऱ्या बाजूला जाऊन बसलों. योग्य वेळीं ती गाडी आली व रात्रीं दहाला आम्ही कुर्डुवाडीच्या स्टेशनवर पोहोंचलों. खालीं उतरतांच बडव्यांची गर्दी आमच्या भोंवतीं जमा झाली. मीं त्यांना

---

* मुंबईचे कॉरोनर रावबहादूर आठवले ह्यांच्या पत्नी सौ. राजसबाई आठवले यांचें माहेरचें नांव.

सांगितलें, ‘ आम्हांला टिळकांच्या घरीं जायचं आहे. आम्ही कांहीं यात्रेकरू नाहीं. ’ तेव्हां ते गेले. बैलगाडी ठरविली. गाडीवाल्यानें सांगितलें, ‘ चंद्र उगवल्यावर गाड्या निघतील, तोंपर्यंत तुम्ही धर्मशाळेंत निजा. आम्ही तुम्हांला हांका मारूं. ’

आम्ही तिघी व दत्तू धर्मशाळेंत जाऊन निजलों. ह्या वेळेस मजजवळ रोकड व दागिने मिळून हजार-बाराशेंचा ऐवज होता. नथच तीनशेंची होती. ह्या ऐवजाचें बोचकें डोक्याखालीं घेतलें होतें. आत्याबाई मध्यें निजली होती. दगदगीमुळें सर्वांचाच डोळा चटकन् लागला. झोंप लागल्यावर माझ्या पायाला कोणीं चिमटा घेतला. पायाला चिमटा घेऊन माणूस उठलें म्हणजे डोक्याखालचा ऐवज लांबविल्याच्या गोष्टी मीं ऐकल्या होत्या. मी तशीच पडून राहिलें व आत्याबाईला पडल्या-पडल्या मेणबत्ती लावण्यास सांगितलें. मग गांठोडें पोटाशीं घेऊन उठून बसलें. पायांजवळ एक माणूस उभा होता. त्याला मीं दरडावून विचारलें, “ कोण रे तूं ? पोलिसला हांका मारूं का ? ” तो म्हणाला, ‘ बाई, मी उतारू आहें. तुम्ही झोंपा. चंद्र उगवायला अजून अवकाश आहे. ’ पण चोराच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवील ? आम्हीं उरलेला वेळ बसूनच काढला.

आतां माझ्या आत्याबाईला बोलणें सुचलें आणि तें सर्व आपल्या ऐश्वर्याचें. मी तिला दाबीतच होतें व ती आपल्या, पेंडशांच्या व माझ्या दागिन्यांच्या गप्पा मारीतच होती.

चंद्र निघाला. गाडी निघाली. पण तेवढीच एकटी गाडी होती. आमच्या गाडीच्या मागें एक माणूस एकसारखा धावत येत होता. मीं त्याला विचारलें, ‘ धावतोस का ? ’ तो म्हणाला, ‘ पुढें चोरांची भीति आहे म्हणून मी येतो आहे ! ’ म्हणजे ह्या चोराच्या उलट्या बोंबा ! मी म्हणालें, ‘ अरे बाबा, चोर आम्हांला काय त्रास देणार नि आमच्या जवळून काय घेणार ? आम्ही चाललों आहों पंढरपूरच्या अन्नछत्रांत भाकरी भाजायला, तूं कशाला उगीच दमतोस ? ’ ह्या बोलण्यानंतर आमचा संरक्षक मागें राहिला व आमच्या मागची एक

काळजी दूर झाली.

भाउजींना माझीं व टिळकांचीं पत्रें गेलींच होतीं. तेव्हां ते व माझी जाऊ आमची वाटच पाहत बसलीं होतीं. त्या दोघांनीं रीतिप्रमाणें मला नमस्कार केले व म्हटलें, ‘ घर तुमचंच आहे. आम्हांला दत्तूसारखं समजा. ’

देवब्राह्मण झाल्यावर आत्याबाई व बरोबरची सोबतीण परतल्या. मला माझ्या दिरानें व भावजयीनें घरांत वडील माणसाप्रमाणें मोठ्या माना-सन्मानानें वागविलें. आमचें जावा-जावांचें कधींच भांडण झालें नाहीं. उलट कोणी कांहीं सांगायला मागायला आलें कीं रखमाई मजकडे बोट दाखवी व म्हणे, ‘ त्यांना विचारा. मी मालकीण नाहीं. ’ घरांतील सर्व व्यवस्था माझ्या हातीं सोपवून रखमाई माझ्या हाताखालीं काम करूं लागली. येथेंहि माझा देवधर्म अगदीं जोरांत व कडकपणें चालला होता.

आतां मला सारी काळजी दत्तूची होती. त्याला शाळेंत घातला होता. तरी सकाळ संध्याकाळ मी त्याला शिकवीं. तो नियमानें शाळेंत जात असें.

म्हटल्याप्रमाणें टिळकांची दहा रुपयांची मनीऑर्डर आली. आमचा पत्रव्यवहार जोरांत चालला होता. मधून-मधून त्यांचीं पुष्कळ वाकडीं-तिकडीं पत्रें येत. मी देवळांत जाऊन तासन्तास रडत बसें. दिवसांतून एकदांच मी जेवीत असल्यानें तें मला साधतहि असे.

कधीं-कधीं लोक मला टोचून बोलत त्या वेळीं मला फार वाईट वाटे. कोणाकोणाचे वाग्बाण तर अगदीं ऊर भेदून बाहेर निघून जात. त्यांत एखाद्या वेळीं भाउजीहि भर घालीत. त्यामुळें माझा जीव अगदीं पिसाळून गेला होता. काय करावें कांहींच मार्ग सुचेना.

एक दिवस मीं भाउजींना म्हटलें,

“ भाऊजी, तुम्हांला माझी कांहीं कींव येते का ? मला आतां हें सहन होत नाहीं. तुम्ही एक करतां का ? ”

“ मी काय करूं ? तुम्ही सांगा. ”

“ तुम्ही सर्वांना पत्रें पाठवा कीं मी दत्तूला घेऊन पळून गेलें. मला आतां

कीर्ति-अपकीर्तीचें कांहीं वाटत नाहीं. आतां मला साऱ्यांचा कंटाळा आला आहे. बहिणीची जी काय चीजवस्त मजजवळ आहे तिची यादी करा. ती सारी तुमच्याचजवळ ठेवतें. तिनें असं म्हणायला नको कीं 'बाबा गेला नि दशम्या गेल्या.''

"तुम्ही जाणार कुठें?"

"मला वाट फुटेल तिकडे जाईन. गेल्यानंतर तिथून तुम्हांला पत्र पाठवीन. कुठें जायचं तें माझं ठरलेलं नाहीं. मी दत्तूकडे पाहून दिवस काढीत आहें. त्याची विद्या करून मी आपलें कसं तरी पोट भरीन. कांहीं दिवस तरी सर्वांच्या जाचांतून मी सुटेन."

भाउजींना माझी कल्पना बरी वाटली! आदल्या दिवशीं विठोबाच्या देवळांत मला एक बाई भेटली होती. मला रडत बसलेली पाहून तिनें जवळ येऊन माझी करुण कहाणी मोठ्या सहानुभूतीनें ऐकून घेतली होती. तिचीहि कहाणी करुणच होती. ती अगदीं वृद्ध होती; तिचे पति तिच्याहून वृद्ध होते. त्यांचा एकुलता एक मुलगा नुकताच वारला होता. वृद्धापकाळीं त्यांचें असें कोणी उरलें नव्हतें. तीर्थयात्रा करीत-करीत तीं पंढरपुरास आलीं होतीं. दुसऱ्याच दिवशीं गाणगापुरास जाण्याचा त्यांचा बेत होता. गाणगापुरास उरलेलें आयुष्य तीं घालविणार होतीं. माझी करुण कहाणी ऐकून बाईच्याहि डोळ्यांना पाणी आलें. मी तिला म्हणालें, 'मी तरुण आहें. मला कांहीं दिवस तरी कुणाचा आश्रय पाहिजे. मला तुम्ही आपल्याबरोबर न्या. मजकडून अनायासें दत्ताचीहि सेवा घडेल. तुम्ही माझी धर्माची आई व्हा. मला कांहीं दिवस गुप्त राहण्या-शिवाय गत्यंतर नाहीं.'

ती बाई माझ्या म्हणण्याला कबूल झाली. दुसऱ्या दिवशीं माझें भाउजींशीं आरंभीं सांगितलेलें बोलणें झालें. नंतर आमचें सर्वानुमतें एक विचारानें जाण्याचें ठरलें व मी बांधाबांधी करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही निघणार तों आदल्या दिवशीं सकाळीं भाऊजींना तार आली—' गोसावीज् फादर कमिंग.' खालीं सही वगैरे कांहीं नव्हती. सगळे बुचकळ्यांत पडले कीं हा

गोसाव्याचा बाप कोण येतो आहे. पण दुसऱ्या दिवशीं टिळक येऊन उभे राहिले. त्यांची तार "गो सेज फादर कमिंग" अशी होती. म्हणजे 'मला परमेश्वराचा संदेश आहे, जा आणि मी येतों.' पण तारऑफिसमध्यें परमेश्वराला किंवा त्याच्या संदेशाला कोण विचारतो? तार पाठविणाराला वाटलें गोसाव्याचा बाप येतो असेंच असेल व त्यानें तशीं तार भाऊजींच्या हातांत दिली.

* * *

टिळक वाईहून पंढरपुरास आले होते.

त्यांचें असें झालें. वाईस आशम्माबाई शेख उमर नांवाच्या एक अत्यंत सालस, देवभीरु व प्रेमळ ख्रिस्ती बाई राहत असत. टिळक ह्यांना आई म्हणत.

महाबळेश्वराहून परततांना व महाबळेश्वरास जातांना ते आपल्या ह्या मातेला भेटल्यावांचून व त्यांच्या घरीं चार दिवस राहिल्यावांचून पुढें जात नसत. आशम्माबाईंचे पति व मुलेंबाळें सर्व गत झालीं होतीं परंतु नांवाप्रमाणें त्या मूर्तिमंत आशा होत्या. महाबळेश्वराहून परतलेले टिळक, आशम्माबाईंकडे उतरले होते. रोज सकाळ-संध्याकाळ तीं दोघें माझ्यासंबंधीं परमेश्वराजवळ मोठ्या आग्रहानें प्रार्थना करीत. एक दिवस त्यांनीं फारच आग्रहाची प्रार्थना केली कीं, 'देवा, आमच्यासाठीं नको तर तुझ्या गौरवासाठींच ह्या मायलेकरांस तूं आण.' प्रार्थना झाल्यावर आशम्माबाईंनीं टिळकांना दहा रुपये देऊन सांगितलें कीं, 'तुम्ही तार करा व आत्तांच्या आत्तां पंढरपुरास जा. लक्ष्मीबाई खात्रीनें येणार आहेत.' दोघांनाहि वाटलें कीं टिळकांनीं नगरला न जातां परस्पर पंढरपुरास जावें असा परमेश्वरी संदेश आला आहे. त्याप्रमाणें टिळक निघाले व मी गाणगापुरास निघण्याच्या आधीं बारा तास पंढरपुरास येऊन पोचले.

टिळकांना पाहून मला फार आनंद वाटला. गाणगापूरचे माझे बेत जागच्या जागीं विरले. दोन–तीन दिवस माझे फार आनंदांत गेले.

पेंडशांच्या वेळचे एक फडणीस पंढरपुरास होते. टिळक आलेले समजतांच त्यांनीं मला बोलावणें पाठविलें. मी गेलें. ते म्हणाले, 'तुम्हांला इथून जायचं असेल तर जलालपूरला जा. मी तुम्हांला पैसे देतों. टिळकांबरोबर जाल तर

मी योग्य तो बंदोबस्त करीन हें ध्यानांत ठेवा!' मी म्हणालें, 'मी जलालपुरास जाणार नाहीं. तिथें दत्तू आजारी पडतो. मी इथेंच राहीन' फडणिसांनीं मला 'पाहा! संभाळून राहा!' अशी निघतां निघतां ताकीद दिली!

घरीं येतांच टिळकांनीं विचारलें, 'तुला कशाला बोलावलं होतं?' मी म्हणालें, 'उगाच.' 'उगाच कसं? मला नाहीं कुणीं उगाच बोलावलं?' ते अगदीं माझ्या खनपटीलाच बसले तेव्हां मीं त्यांना काय बोलणें झालें तें सगळें सांगितलें.

ह्या गोष्टीनंतर दोन दिवसांत त्या फडणिसांची पंढरपुराहून बदली झाली. ती कशी झाली हें कोडें शेवटपर्यंत सुटलें नाहीं.

सखारामभाऊजी कोणाशीं बोलेनासे झाले. बायको, भाऊ, भावजय, दत्तू इतकेंच नाहीं तर स्वतःची अकरा-बारा महिन्यांची मुलगी ह्या सर्वांशीं त्यांनीं जणूं अबोला धरला. आम्हां जावा-जावांनां ह्याचें कारण कळेना. ते बोलेनात तेव्हां आपोआपच घरांत सगळ्यांनींच मुक्याचें व्रत धरलें. होतां होतां ह्या स्थितीचा सगळ्यांना कंटाळा आला. शेवटीं टिळकांनीं बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले 'दत्तूच्या शिक्षणाची मला सोय केली पाहिजे. हेंच त्याचं शिकायचं वय आहे. एकदां का शिक्षण मागें पडलं कीं त्याचें जन्माचें नुकसान होईल. तूं मजबरोबर नगरास चल. मी तुला निराळें बिऱ्हाड करून देतों.' मीं म्हटलें, 'नगरासच कशाला? इथें या निराळं बिऱ्हाड करून. मी राहतें इथें.'

'तूं असा पैजेचा विडाच उचलला आहेस. सारा जन्म गेला, मीं सांगितलं नि तूं ऐकलं असं कधींच मला आठवत नाहीं. आतांपर्यंत मीं तुझं ऐकलं. आतां मात्र ऐकणार नाहीं. तुझ्या नादीं लागून मला मुलाचं नुकसान करायचं नाहीं. आज साडे पांच वाजेपर्यंत तुला मी वेळ देतों. तिथपर्यंत काय तें ठरीव. आज साडे पांच वर्षं मीं तुला विचार करायला वेळ दिला. आतां मात्र अधिक वेळ देतां येत नाहीं. मी दत्तूला नेणार. तुम्हीं मला नेऊं दिला नाहीं तर मला दुसरे मार्ग मोकळे आहेत.' त्यांचा सूर बोलतां बोलतां वाढूं लागला. शेवटीं अगदीं पंचम झाला.

आम्ही दोघी घाबरलों व एकमेकींच्या तोंडांकडे पाहूं लागलों. टिळकांनीं पुन्हां खडसावून सांगितलें कीं, ' मी साडे पांच वाजेपर्यंत तुम्हांला वेळ देत आहें. नाहीं तर एका आठ दिवसांत मला काय करतां येतं तें मी तुम्हांला दाखवीन.' असें म्हणून ते फिरायला गेले. मी उठून स्वयंपाकघरांत गेलें. रानांत चहूंकडून एकदम वणवा पेटावा तसें मला वाटूं लागलें. चहूंकडे ज्वाला भडकत आहेत असें मला झालें. इतक्यांत माझी जाऊ आंत आली. तिनें मला मिठी मारली. मग आम्ही दोघी खूप रडलों.

" बाई, मला सांगा मी तुमच्यासाठीं काय करूं ? तुम्ही सांगाल तें करायला मी तयार आहें. "

" तूं काय करणार ? देवाला काय करायचं असेल तें तो करील. सर्वांनींच मला चोहींकडून वेढलं आहे. तूं सारं ऐकलंच आहेस. त्याचा अर्थ मी मुलाला नेतों नि तूं बैस दुसऱ्यांच्या घरीं कष्ट करीत. "

" बाई, असं करण्यापेक्षां तुम्ही त्यांच्याबरोबर जा कशा. ते कांहीं तुम्हांला ख्रिस्ती हो म्हणत नाहींत कांहीं नाहीं नि तसा प्रसंगच आला तर इकडे पत्र टाका, मी तुम्हांला पैसे पाठवीन. "

" तूं कुठून आणशील पैसे ? "

" मी हवें तें करीन. तुम्हांला कुणीच चांगला सल्ला देत नाहीं. ह्यांना हा मार्ग वाईट दिसतो, त्यांना तो वाईट दिसतो. मध्यें तुमचा चेंदा. कुणी म्हणे दुसरं लग्न करून देतात. मांसाचा स्वयंपाक करायला लावतात. कुणाचं तोंड धरवतं का ? तुम्ही कोणत्याहि स्थितींत कोणत्याहि वेळेस परत या. मी माझ्या तोंडचा घास तुम्हांला काढून देईन. जसा माझा हक्क ह्या घरांत आहे तसाच तुमचाहि आहे. त्यांचे भाऊ येतात, मग माझ्या जावेनें कां नाहीं येऊं ? "

संध्याकाळीं दोघे भाऊ घरीं बरोबरच आले. कोणी कांहीं बोलले नाहींत. जेवणें बरोबर झालीं नाहींत. दुसऱ्या दिवशीं रखमाईनें माझी तयारी करण्यास सुरवात केली. एका हातानें उचलणार नाहीं इतकें सामान तिनें बांधलें. तिखटा-मिठापासून मेतकुटापर्यंत सर्व कांहीं त्यांत होतें. सामान बांधतांना

ती रडत होती.

आम्ही दोघींनीं सखारामभाउजींना विचारलें जावें कां म्हणून. त्यांनीं कानांवर हात ठेवले. हेंच त्यांचें बोलणें. रखमाईनें मला न्हाऊं घातलें. त्या वेळेस ती एकसारखी रडत होती. एकीकडे ती बोलत होती, "आतां मी मालीच्या लग्नांत कुणाला नमस्कार करूं! माझी बाई आजच मला मेली!" वगैरे.

गाडी आली. गाडींत टिळक, दत्तू व मी बसलों. भाऊजी गाडी येतांच बाहेर निघून गेले. रखमाई सोंवळें नेसली होती. तशीच मालीला कडेवर घेऊन ती अनवाणी गाडीच्या मागें निघाली. भाऊजींना न विचारतांच आम्ही निघालों. टिळक आपल्या भावजयीची एकसारखी समजूत करीत होते व परत जायला सांगत होते. 'माझ्या बाईला संभाळा, दत्तूला संभाळा' असें ती एकसारखी बजावून सांगत होती. ते म्हणत होते, 'तुझी ती जाऊ आहे पण माझी बायको आहे. तुला तिच्याबद्दल इतकं वाईट वाटतं तर मला किती वाटत असेल ह्याची कल्पना कर.' मी एकसारखी विठोबाच्या देवळाकडे टक लावून बसलें होतें. अलीकडे तेंच माझ्या विसांव्याचें ठिकाण होऊन बसलें होतें. मी मनांतल्या मनांत म्हणत होतें, 'देवा, मी आपल्या दोन्हीं हातांत दोन मशाली घेऊन ह्या डोहांत उडी टाकीत आहें. तुला हवं तर तार नाहीं तर मार. पण कुणाला शरण जाण्याची वेळ आणूं नको.' मी एकसारखी रडत होतें. वरून जरी कठोर मुद्रा करण्याचा टिळक प्रयत्न करीत होते, तरी त्यांचें अंतःकरण स्वभावतः अत्यंत मृदु असल्यानें त्यांना आमची दोघींची स्थिति पाहून गहिंवर येत होता. दत्तूला गाडी बसायला मिळाली म्हणून फार आनंद वाटत होता. पुढें तर त्याला आगगाडींत बसायला मिळणार होतें. येववेल तेथ-पर्यंत रखमाई आमच्या मागें चटपट पाय उचलीत येत होती. पुढें गाडी जोरांत हाकलली. रखमाई गाडीकडे पाहत उभीच होती, थोड्याच वेळांत ती दिसेनाशी झाली. मला हुंदक्यावर हुंदके येऊं लागले. टिळक म्हणाले, "असं काय वेड्यासारखं करतेस? मी तुला कधींच जुलमानें ख्रिस्ती करणार नाहीं. मला तो धर्म आवडला म्हणून मीं तो स्वीकारला. तुला आवडला नि तूं ख्रिस्ती

झालीस तर मला आनंद वाटेल पण मी कधीं जुलूम करणार नाहीं. त्या धर्मा-बद्दल तुला ज्या कांहीं गोष्टी कळल्या आहेत त्या निव्वळ खोट्या आहेत. तुझं कुणाबरोबर लग्न होणार नाहीं. मांसाचा स्वयंपाक तुला करावा लागणार नाहीं. कुणीं हें तुझ्या डोक्यांत भरवून दिलं? डॉ. ह्यूमसाहेबांचं आजच पत्र आलं आहे कीं त्यांनीं एक पंचवीस रुपयांचं भाड्याचं घर तुमच्यासाठीं घेतलं आहे. ब्राह्मणाचंच तें घर आहे. त्यांत भांडींकुंडीं वगैरे सर्व संसार मांडून ठेवला आहे. शिवाय पेंडशांच्या घराजवळच तें घर आहे. उगीच कां रडतेस?" टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरच मला अनुभव आला. आज पस्तीस वर्षें तो येत आहे. आमच्या घरांत कधीं मांस शिजत नाहीं.

कुर्डुवाडीस टिळकांनीं आम्हांला कांहीं फळफळावळ आणून दिली. त्यांना काय? ते गेले मुल्लाभटाच्या उपहारगृहांत. नंतर गाडी आली व आम्हांला घेऊन चालली. तीन वाजतां आम्ही नगरास पोहोंचलों. स्टेशन जवळ-जवळ येऊं लागलें तसतसें माझ्या व दत्तूच्या पोटांत धसधस होऊं लागलें. आम्ही नगरास येत आहोंत ह्याबद्दल पेंडशांना मुळींच माहिती नाहीं अशी आमची कल्पना होती. ज्या दत्ताला भ्यावें तेंच समोर. गाडी स्टेशनांत येऊन उभी राहते नाहीं तों आमच्याच डब्यापुढें नानासाहेब पेंडसे, काकासाहेब मिरीकर वगैरे मंडळी उभी! कोणीसे येणार होते कीं जाणार होते त्यांच्यासाठीं ही मंडळी स्टेशनवर आली होती असें ते म्हणाले. त्यांना पाहतांच दत्तूचे व माझे पाय जागचे उचलेनात. टिळक अगदीं निर्भयपणें निघाले. पेंडशांनीं मला पाहतांच विचारलें,

"मने, तूं इकडे कुणीकडे?"

"दत्तूच्या शिक्षणासाठीं मी इथें आलें आहे. त्याला बरं नव्हतं. मी इथेंच घर घेऊन राहणार आहें."

"बरें, आतां तूं कुठें जाणार?"

"तुम्ही सांगाल तिथें."

नानासाहेबांनीं मला व दत्तूला सामानासह आपल्या घरीं पाठवून दिलें.

टिळक आपल्या बिऱ्हाडीं गेले.

आजचा माझा पाहुणचार कांहीं नवीनच प्रकारचा होता. घरांत गेलें तर कोणी दिसेना. येसू लहान, ती तेवढी पुढें आली व मला विचारूं लागली, 'कां मावशी, कां आलीस?' मी 'उगीच' म्हणून तिची समजूत केली. माझीं कोरीं लुगडीं, चोळया, दागदागिने, वगैरे सारें मी बहिणीच्या स्वाधीन करण्यासाठीं येसूजवळ दिलें. विटाळाचे कपडे धुण्यासाठीं बाजूला काढून ठेवलें. ब्राह्मणानें पाणी तापवून दिलें. अंग धुवून दुसऱ्या दिवसासाठीं, एक लुगडें बिऱ्हाडीं नेऊन वाळत घातलें. बिऱ्हाड जवळच होतें. ते येसूच्या साहाय्यानें शोधून काढलें.

तेथें जातांच घो घो घो घो बायका गोळा झाल्या. कोणी डोळयांनीं, कोणी बोटांनीं, तर कोणी नुसत्या मानेनें एकमेकींना खुणावित होत्या. मला कांहीं समजत नाहीं असा त्यांचा समज होता. पण मला सारें कांहीं समजत होतें.

मीं माझा नवा संसार पाहिला. डॉ. ह्यूमसाहिबांना पंढरपुराहून टिळकांनीं लिहिलें होतें व त्यांनीं एका ब्राह्मणाच्या घरांत जागा घेऊन हा संसार मांडून ठेविला होता. त्यांत ताटवाट्यांच्या जागीं कपबशा व प्लेटी होत्या, व पळ्या ओगराळयाच्या जागीं काटे, चमचे, सुऱ्या होत्या! मीं हे पदार्थ पूर्वीं जन्मांत कधीं पाहिलेले नव्हते, लुगडें वाळत घालून परत आलें तों टिळकांचा निरोप आला "चहा पाहिजे." आतां काय टिळकांचें सत्तेचें बिऱ्हाड होतें, सत्तेची बायको होती. पण घर सत्तेचें नव्हतें. मीं जाऊन त्यांना चहा करून दिला. टिळक म्हणाले, "तूं आतां थकली आहेस तर पेंडशांकडेच जाऊन जेव. मीं कांहीं संध्याकाळीं जेवायला येणार नाहीं. उद्यां येईन." मी जाण्याच्या आधीं घरवाल्यानें त्यांना सांगितलें होतें कीं, "तुम्ही आमच्या घरीं येऊं नका. तुम्हांला यायचें असेल तर तुम्ही आपलं दुसरं बिऱ्हाड पाहा." पण टिळकांनीं मला हें सांगितलें नव्हतें. मी पेंडशांकडे गेलें व ते आपल्या बिऱ्हाडीं गेले. मी आपली मनांत मांडे खात होतें कीं आतां काय मी व भिकूताई शेजारीं-शेजारीं राहूं. पेंडशांच्या घरीं गेलें. तेथें जेवणीं होऊन गेलीं

होतीं. माझ्याशीं कोणी बोलेना. चुलीवर गुळांब्यांचें एक मोठें थोरलें पातलें शिजत होतें. आचाऱ्यानें माझ्यापुढें एक ताट ठेवलें. त्यांत एक चतकोर बाजरीची भाकरी व मीठ! जवळ कोणी उभें सुद्धां राहिलें नाहीं! माझ्या डोळ्यांतून पाण्याच्या सारख्या धारा चालल्या होत्या. दत्तू जेवून स्वस्थ निजला होता. टिळक आपल्या बिऱ्हाडीं जेवून-खाऊन स्वस्थ लिहीत बसले असतील.

टिळकांना आपल्या स्वभावाप्रमाणें काळजी अशी फार क्वचित् वाटत असे. घरवाल्यानें दुसरें बिऱ्हाड पाहाण्यास सांगितलें तेव्हां ते स्वतःची समजूत करून घेऊं लागले कीं हीहि एक परमेश्वरी योजनाच आहे. आपण कशाला काळजी करा. ह्या घरवाल्याला आगाऊ भाडें दिलेंच होतें.

सकाळीं टिळक जेवावयाला येणार; आपल्याला कांहीं तरी केलें पाहिजे म्हणून मी सकाळींच उठून बिऱ्हाडीं आलें. मिठाबरोबर खाल्लेल्या चतकोर भाकरीखेरीज तीन दिवस माझ्या पोटांत अन्न नव्हतें. पंढरपुराहून निघतांना बरोबर जेवण गेलें नाहीं. रस्त्यानें खाणें शक्यच नाहीं व पेंडशांच्या घरीं जेवणाचा हा प्रकार. बिऱ्हाडीं जाऊन मी तें नीटनेटकें लावलें. स्वयंपाक केला व टिळकांची वाट पाहात बसलें. डोक्यांत कल्पनांचें काहूर माजलेलें. घरांतून दारांत, दारांतून खिडकींत अशा माझ्या एकसारख्या येरझारा चालल्या होत्या. दत्तू पेंडशांकडे, मी इकडे व टिळक तिसऱ्याच कोठें. एका गांवांत असून संध्याकाळ झाली तरी आमच्या गांठी नाहींत. दिवसभर टिळक आले नाहींत व रात्रींहि आले नाहींत. मी सारा दिवस उपाशीं होतें. बहिणीकडेहि दुसऱ्या दिवशीं रात्रीं अकरापर्यंत मी गेलें नाहीं. दोन दिवस मला आणखी उपवास घडला. रात्रीं अकरा वाजतां पेंडशांचा शिपाई आला व मला त्यांच्याकडे घेऊन गेला.

मी पेंडशांच्या घरीं गेलें. घरांत सर्व शांतता होती. नानासाहेब ऑफिसांत बसले होते. शिपायानें त्यांना सांगितलें, 'आल्या.' त्या सबंध दिवसांत एवढा एकच शब्द मला ऐकायला मिळाला होता. पेंडसे म्हणाले,

" त्यांना आंत घेऊन ये. " मी आंत आलें.

" काय ठीक आहे ना, मावशी ? मग आतां पुढें काय बेत ? "

" दत्तूचें शिक्षण. "

" तुलाच त्याची काळजी आहे नि आम्हांला कांहीं नाहीं कां ? "

" असं कसं होईल ? सर्वांनाच त्याची काळजी आहे. "

" हें खरं ना ? मग तूं जलालपुरास जा. मी तुला गाडीला पैसे देतो. "

" मला पैसे नकोत. त्याला जलालपुरची हवा सोसत नाहीं. त्याच्याचकरितां मी आलें आहें. "

" हें तुझं नुसतं निमित्त आहे. हवा न सोसायला काय झालं ? तिथें कां कुणी माणसंच राहात नाहीं ? "

" त्यांना सोसत असेल, पण दत्तूला सोसत नाहीं. "

" पाहा विचार कर. "

" विचार केला. ज्याच्या जिवावर मला आपलं आयुष्य कंठायचं त्यालाच बरं नाहीं तर मला काय होय ? "

" फार शहाणी होऊं नको. माझं ऐकून घे. मी तुला शेती लिहून देतों. दरमहा दहा रुपये पाठवीन व पुढें आणखीन् पाठवीन. वीस पुतळ्या देतों. "

" तुम्हीं मला कांहीं द्यावें ह्याकरतां मी आलें नाहीं. त्याची विद्या नि प्रकृति ह्या दोन गोष्टी मजपुढें आहेत. तुम्हीं आपली सारी संपत्ति मला दिली तरी ती मला नको. मला तुम्हीं कांहींच कमी केलेलं नाहीं. पण आतां मी मुळींच परत जाणार नाहीं माझं जें कांहीं होईल तें होवो. "

" बरें तर माझं जें कांहीं तुजजवळ असेल तें परत कर. "

" तें मीं येतानांच काढलं होतं व आल्याबरोबर तें येसूच्या स्वाधीन केलं. मला कशाची आवड नाहीं. माणसानें दिलेलं पुरत नाहीं व देवानें दिलेलं सरत नाहीं हें मी पूर्णपणें जाणून आहें. "

" तुझा शहाणपणा फारच वाहवत चालला आतां ! बरं आतां एक वाजला. नीज तूं. हिला बिछाना द्या रे. "

" बिछाना नाहीं. घोड्याचा खोगीर द्या तिला ! " आंतून आवाज आला. ताबडतोब घोड्याचा खोगीर गड्यानें मजपुढें आणून टाकला.

आज तीन दिवस मांडा म्हणून खाण्यास कोंडाही नव्हता. तेव्हां घोड्यापेक्षां मऊ खोगीर मला चांगला वाटला. त्यावरच मला चांगली गाढ झोंप लागली.

पहांटे उठून मी बिऱ्हाडीं आलें. तेथें येतांच आदल्या दिवशीं करून ठेवलेला चहा, अन्न वगैरे भूमातेला अर्पण करून मी नवीन स्वयंपाकाला लागलें. दोन दिवस मला टिळकांची किंवा दत्तूची भेट झाली नव्हती. दत्तू मावशीकडे सुखरूप होता. त्याची काळजी नव्हती. पण टिळकांचें काय झालें ? त्यांचा तपास तरी कोणीं व कसा करायचा ? मी अगदीं नगरांत असून रानांत पडल्यासारखी झालें होतें. आशा-निराशेचा पिंगा माझ्याभोंवतीं सुरू झाला तोंच दोन गडी व बैलगाडी घेऊन टिळक आले.

" काल तुमची किती वाट पाहिली. तुमचा पत्ता नाहीं. दत्तूहि नाहीं. स्वयंपाक सर्व फुकट गेला. "

" तुझ्यासाठीं दुसरं घर पाहिलं आहे. "

" म्हणजे ? मी नाहीं येत. "

" तूं येत नसलीस तरी हा घरवाला तुला आपल्या घरांत ठेवीत नाहीं. "

" तें कां ? "

" त्याची सत्ता. दुसरं घर ब्राह्मणाचंच आहे. मराठ्याची बाई भांडीं घासायला ठेवली आहे व गुजराथी ब्राह्मण पाणी आणायला ठेवला आहे. इतक्या भानगडी काल दिवसभर कराव्या लागल्यामुळें मला येतां आलें नाहीं. "

दत्तूला आणला. गाडींत सामान गेलें. आम्ही तिघें टांग्यांत गेलों. अजूच बहिणीची भेट झाली नव्हती. दुसरें बिऱ्हाड थाटलें. आतां आत्याबाईंचें सामान उपयोगांत आलें, मीं भातपिठलें केलें व तिघांनीं त्यावर सपाटून हात मारला. टिळक आपल्या घरीं गेले. तेथून त्यांचें घर शंभर

कदमांवर होतें. आतां आपल्याला कसलाच त्रास नाहीं, अशा आनंदांत मी व दत्तू सुखानें झोंपी गेलों.

पण सकाळींच घरवालीचा निरोप आला, कीं 'तुम्ही आमच्या पायखान्यांत जायचं नाहीं!' पायखानेहि कर्मठ झालें! 'मग कुठें जायचं बाई?' 'सार्वजनिक पायखान्यांत जा.' अडली लक्ष्मी मालकिणीचे पाय धरी-सृष्टिनियम कांहीं सोवळं-ओंवळं पाहात नाहीं.

बाई एकदां भांडीं घासून गेली. दुसऱ्यांदा येऊन सांगून गेली कीं भांडीं घासतां येणार नाहींत. मला जातीबाहेर पडावें लागेल. गुजराथ्याचें तर लोकांनीं पाणीच बंद केलें. तो सांगूं लागला, 'बाई सोवळें नेसते, देवपूजा करते, तुम्ही काय म्हणून माझं पाणी बंद करतां?' त्याला उत्तर मिळालें, 'तिचा नवरा ख्रिस्ती आहे ना! तूं आतां प्रायश्चित्त घे.' त्याला बिचाऱ्याला प्रायश्चित्त घ्यावें लागलें व त्यापायीं चार-पांच रुपये दंडाचा माझ्यामुळें बिचाऱ्याला रिकामा भुर्दंड पडला.

आतां पाणी कोठून आणावयाचें? हीं तीन अपरिहार्य संकटें आलीं. आतां पुन्हा बिऱ्हाड बदलण्याखेरीज उपाय राहिला नाहीं.

"आतां आपण फर्ग्युसन गेटच्या कंपाउंडांत जाऊं."

"तें कुठेंसें आहे?"

"इथून जवळच आहे. तिथें ख्रिस्ती लोक राहतात."

"मी त्यांच्या शेजारीं येणार नाहीं."

"नाहीं तर कुठें जायचं? आतां तूंच पाहिलंस ना ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व? ब्रह्म जानाति ब्राह्मणः! हें ह्यांचं ब्रह्म. मी तुला कांहींच त्रास देत नाहीं. तुझेच लोक तुला सोडीत आहेत. त्याला मी तरी काय करूं?"

डॉ. ह्यूमसाहेबांना माझ्या घराची परवड कळली. तसेंच मी ख्रिस्ती लोकां-शेजारीं राहण्यास तयार नसल्याचेंहि कळलें. पावसाळ्याचे दिवस. फर्ग्युसन गेटमधील बिऱ्हाडें काढून त्यांना कोठें ठेवायचें? एकेकाच्या घरीं पांच-पांच सात-सात मुलें. तरी बिचारे सगळे लोक दुसरीकडे राहावयाला गेले.

सर्व कंपाउंड माझ्याकरितां मोकळें केलें. तेथें एकंदर घरें तीन होतीं. घरें एकमेकांना लागून एका रांगेंत होतीं. एकेका घराला चार-चार खोल्या. तीं सर्व आमच्या ताब्यांत दिलीं. टिळकांना आतां बाहेर कुठें राहावयाला जाण्याचें कारण उरलें नाहीं व ख्रिस्ती लोकांनीं—मला आवडत नाहीं म्हणून—आमच्या कंपाउंडांत येण्याचें थांबविलें. आम्ही बैलगाडी करून ह्या नवीन घरांत गेलों. एका गांवांत एका महिन्याच्या आंत तीन बिऱ्हाडें झालीं. तिसऱ्या बिऱ्हाडांतील दोन घरांत दत्तू व मी राहूं लागलों आणि टिळकांनीं तिसरें घर घेतलें.

ह्याच घरांत डॉ. ज्युलिया बिसेल व मिस एमेली बिसेल ह्या मला भेटावयाला आल्या. इतक्या सुंदर मराठी बोलणाऱ्या मडमा मीं कधींच पाहिल्या नव्हत्या. ख्रिस्ती लोकांना टिळकांनीं सांगून ठेवलेलें असल्यानें कोणी माझ्याकडे येत नसत. पण हळूहळू टिळकांच्या घरीं लोक येऊं जाऊं लागले. टिळकांच्या घरांत रोज प्रार्थना, भजन, शास्त्रवाचन दोन्हीं सांज होत असे. माझ्या घरांत माझे सारे देव, देवी, गणपति, तुळशी ह्यांचें पूजन झपाट्यानें चाललेलें असे. त्यांच्याकडे चाकर-नोकर होते. माझ्याकडे कोणी नव्हतें. मराठे मिळेनात व दुसरे खपेनात. मला सगळें हातानें करावें लागे. टिळक जेवावयाला माझ्या घरीं येत.

त्या वाडींत पाणी नव्हतें. मला कमेटीच्या बागेंत जाऊन पाणी आणावें लागे. तेथला नळ खरा-खरा सार्वजनिक होता; किंवा पूर्णपणें ब्राह्मणेतरांचा होता म्हटलें तर अधिक शोभेल. एक दिवस मी तेथें पाणी भरायला गेलें असतां दोन बाया नळावर होत्या. त्या परजातीच्या व त्यांतील एकीच्या अंगावर बरींचशीं पिसें इतस्ततः लागलेलीं दिसत होतीं. मीं म्हटलें, " बाई जरा दूर हो, मला एवढी घागर भरूं दे. " तिनें लागलीच मला उत्तर दिलें, " अग चल व्ह तिकडं. लय बाह्मनीन असलीस तर आम्हांला काय ? बाह्मनीन झाली तर मंग आली कशाला ह्या नळावर ? "

बाया गेल्या. मग मी घागर भरून घरीं आलें. घरीं चटणी वाटून

ठेवली होती. तिच्यावर वाऱ्यानें दोन पिसें येऊन पडलीं होतीं ! हीं पिसें पाहून मला खरें-खरें पिसें लागण्याची वेळ आली. पुन्हा गंगा-यमुनाचें आगमन झालें. टिळक आले. त्यांनीं कारण विचारलें. नळापासून तों चटणीपर्यंत मीं त्यांना सर्व प्रकार सांगितला. ते म्हणाले, " मी काय करूं ? ती वाऱ्यानें उडालीं असतील ! " झालें. मी गप बसलें व आणखी रडलें.

टिळक दर रविवारीं चर्चला जात असत. त्यांच्याबरोबर दत्तूहि जाई. एकदां असाच चर्चनंतर तो त्यांच्याबरोबर मालनबाई कुकडे ह्यांच्याकडे गेला. तेथें एक ब्राह्मण गृहस्थहि होते. चहा-बिस्किटांवर ह्या गृहस्थानें खूप ताव मारला, दत्तूलाहि त्यांनीं आग्रह केला. पण दत्तूनें तेथें कांहीं खाल्लें नाहीं. पुढें एकदां दत्तू पेंडशांच्या घरीं असतां तेथें हेच गृहस्थ आले. चहा आला. दत्तू वसकणावर होता म्हणून तेथून उठून स्वारीनें दूर जाऊन तो मटकावला व तोंड पुशीत-पुशीत दत्तूला म्हटलें, ' काय रे, तुझा बाप बाटला ना ? ' दत्तूनें चटकन उत्तर दिलें, ' तुमच्यापेक्षां त्यांचं बाटणं बरं. ते अगदीं उघडउघड तरी चहा घेतात नि खातात. तुम्ही चोरून खातां. '

" केव्हां रे लबाडा खाल्लं मीं ? ,'

" आदितवारीं त्या बाईच्या घरीं नाहीं का चहा घेऊन कांहींसें खाल्लंत तें ! मला आग्रह करीत होतां ! मीं खाल्लं नाहीं ! "

ह्यावर नानासाहेबांनीं त्याला चूप केलें.

मी आल्यापासून भिकूताईनें अंथरूण धरलें होतें. त्यांचा पुतण्या त्यांना भेटावयाला आला होता. नंतर तो मजकडेहि आला. मी सोंवळें नेसून स्वयंपाक करीत होतें. देवाजवळ समई लावली होती. त्यांच्यावरील गंध फुलें त्याला दिसलीं. तो हंसला. मीं विचारलें, " का हंसतोस ? " तो म्हणाला, " तिकडे तुझी बहीण तूं ख्रिस्ती झालीस म्हणून आजारी पडली आहे नि इथें पाहतों तों निराळाच प्रकार. "

कांहीं-कांहीं बाबतींत त्रास जरी होत होता तरी एकंदरींत महिना सुखाचा

गेला. आतां कोणी ब्राह्मण त्रास देण्यास येण्याची धास्ती राहिली नाहीं.

ब्राह्मण जरी घर सोडा म्हणण्यास आले नाहींत तरी घरांत विघ्नहर्ता गणपति होताच. त्यानें आपल्या वाहानास आज्ञा केली कीं ह्यांना आतां पुन्हा येथून हालवा. एक दिवस दत्तू व मी जेवत वसलों असतां एक मोठा उंदीर येऊन दत्तूच्या ताटाजवळील चित्राहुती खाऊं लागला. 'नगरचे उंदीर भीत नाहींत बरं का' असें म्हणून आम्ही उठलों तर दुसरा आला तोहि चित्राहुती खाऊं लागला. थोडक्यांतच दोन्ही उंदीर गरगर फिरूं लागले व पटकन् मेले, हा प्रकार ऐकिवांत पुष्कळ होता पण प्रत्यक्ष असा त्याच दिवशीं प्रथम पाहिला. टिळक आले. त्यांनीं उंदीर पाहतांच सांगितलें, कीं हा प्लेगचा उंदीर. परीक्षा करण्यास ते पाठविले व तिकडून उत्तर आलें, कीं प्लेगचेच उंदीर आहेत.

डॉ. ह्यूम ह्यांना ही हकीकत कळतांच ते उभ्या-उभ्यानें येऊन गेले. त्यांनीं आम्हां सगळ्यांनाच आपल्या बंगल्यांत राहण्यास बोलावलें. पण मी तेथें त्यांच्या बंगल्यांत माझें-सोवळें-ओवळें कसें काय सांभाळणार ? तेव्हां टिळक गेले त्यांच्याकडे राहावयाला व मी दत्तूला घेऊन मालनबाई कुकडे ह्यांच्याकडे राहण्यास गेलें. मालनबाई ज्या वाडींत राहत तेथें सर्व स्त्रियाच होत्या. मला एका बाजूला एक खोली देण्यांत आली तींत मीं राहूं लागलें. तेथेंच राजसबाई होत्या. आम्हांला एकमेकींना पाहून गाडींतील आठवण झाली व खूप गम्मत वाटली. आम्ही एकत्र आल्याबरोबर एका महिन्याच्या आंतच प्लेगोबांनीं आम्हांला विभक्त केलें.

स्थळप्रत.
वि:
क्रमांक ... नों: दि:

# दोघांचा एक संसार

नगरास प्लेगचा जोर अतिशय वाढला. राहुरीचे मिशनरी रे. डॉ. बालंटाईन हे एम्. डी. असून त्यावेळेस चांगले नांवाजलेले डॉक्टर होते. सरकारनें त्यांना प्लेग ड्यूटीवर नगरास नेमलें व मिशननें त्यांच्या जागीं राहुरीस टिळकांची बदली केली.

आतां मी अगदीं पूर्णपणें ख्रिस्ती लोकांत राहाण्यास आलें. राहुरीस गांवाच्या पश्चिमेस ख्रिस्ती लोकांची वसती आहे. ह्या वसतीच्या पलीकडे अर्ध्या फर्लांगावर डॉ. बालंटाईनसाहेबांचा बंगला आहे. ह्या बंगल्यांत आम्ही सर्व एकत्र राहूं लागलों. माझें व दत्तूचें राहाणें टिळकांबरोबर बंगल्यांत असे, मात्र कंपाउंडांत एक निराळी स्वतंत्र खोली होती, व ह्या खोलींत मी माझा स्वयंपाक व देव देव करावयाची. माझें सोवळें-ओवळें अगदीं पहिल्यासारखें – अगदीं कडकडीत – होतें.

ह्या खोलीच्या शेजारच्या खोलींत बालंटाईनसाहेबांच्या मुलांची 'आया' राहात असे. हिलां सगळेजण आयाबाई म्हणत. आयाबाई अशिक्षित होती. पण दुसऱ्यांच्या सोयी-गैरसोयींकडे पाहण्याचें वळण हिला इतकें होतें, कीं आतां मला त्याची किंमत कळते आहे. नारायणराव गोखल्यांची मी मुलगी. माझें सोंवळें-ओंवळें केवढें कडक असेल ह्याची कल्पना करण्यास ती तेवढी आठवण पुरे आहे.

अशी ही कडक सोंवळी बाई अगदीं ओंवळ्या बाईच्या शेजाराला, तेव्हां साधारणतः खटके उडावयाला पाहिजेत, परंतु तसें कधीं झालें नाहीं.

तिनें आपलें खाणें-पिणें मुळींच सोडलें नाहीं. पण सर्व कांहीं फार युक्तीनें चाले. कधीं कधीं ती टिळकांना जेवावयाला बोलवी. पण हे काय खातात ह्याची मला कधीं कल्पनाहि होत नसे. त्यांना जेवावयाला बोलावलें म्हणजे मला ती शिधा देई. ती आपल्या खोलींत दोरीवर नेहमीं कांहीं वाळत घाली. तिला विचारलें काय आहे तर म्हणे, ‘ अहो बाई प्लेगचे दिवस, तेव्हां कपड्यांना हवा पाहिजे ना लागायला. ’ जेवतांना ती दार लावून घेई. त्याचेंहि मला आश्चर्य वाटे. ‘ कां हो आयाबाई, तुम्ही दार लावून कां जेवतां ? ’ ती म्हणे, ‘ अहो बाई, आमची रीतच अशी. ’ कधीं-कधीं ती जेवावयाला बसली म्हणजे आंत ठोकल्याचा दण दण आवाज येई. मी विचारीं, ‘ आयाबाई, तुम्ही जेवतांना ठोकतां हो काय ? ’ तेव्हां तिनें उत्तर द्यावें, ‘ अहो बाई, घुशीचीं बिळं बुजवतें. ह्या घुशींनीं लै त्रास दिला आहे. ’ एकदां तर दार बंद होतें व आयाबाईच्या घरांतून चमत्कारिकच कांहीं भाषण ऐकूं येऊं लागलें. कोणी म्हणे मी पाय घेईन, कोणी म्हणे मी मुंडकें घेईन. हें आहे तरी काय ! मला मोठी चुटपूट लागून राहिली. मीं म्हटलें, ‘ आयाबाई, हें काय हो चमत्कारिक तुमच्या घरांतून बोलणं येतं ? ’ तिनें चटकन उत्तर केलं, ‘ अहो बाई, काय सांगूं, राखेसाची गोठ लावली होती, त्यांतलं तें बोलणं. ’

मला कामाला बाई वगैरे कोणी नव्हतें. आयाबाईनीं हळुहळू सारीं कोरडीं कामें करावयाला सुरुवात केली. ‘ केर काढला तर काय होतं हो बाई ? ’ मला तिनें हळूच विचारावें. तिच्या गोड स्वभावामुळें मीहि तिला तें करूं देऊं लागलें. पाणी स्वयंपाक हीं मात्र माझी मी करीं.

ह्याच ठिकाणीं माझ्या पहिल्या ख्रिस्ती बंधूची व माझी गांठ पडली. त्यांचें वागणें, कपडे वगैरे अगदीं शुचिर्भूत ब्राह्मणासारखें असे. ह्यांचें नांव बापू नामाजी आढाव. मीं टिळकांना विचारलें, “ हे कोण ब्राह्मण आहेत हो ? ” टिळकांनी सांगितलें, “ हे, गुडशास्त ब्राह्मण आहेत ! ” मीं देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांच्या पोटजाती ऐकल्या होत्या, पण गुडशास्त ही जात मात्र कधीं ऐकली नव्हती. मला त्यांचें म्हणणें पटलें. पुढें कित्येक वर्षांनीं

गुडशस्त ब्राह्मणांचा अर्थ कळला.

बापूराव आमचेकडे दोन-तीन दिवस होते. मला माझ्या नातेवाईकांची आठवण होऊन मी नेहमीं रडें. इतके दिवस टिळकांकरितां रडलें, आतां नातेवाईकांकरितां रडूं लागलें. बापूरावांनीं माझी पुष्कळ समजूत करावी, " तुम्ही रडूं नका. मला तुमचा भाऊ समजा. " आणि म्हटल्याप्रमाणें शेवट-पर्यंत ते माझ्याशीं भावाप्रमाणें वागलेहि.

आम्ही राहुरीला जायच्या आधीं नगरास टिळकांकडे एक गृहस्थ आला. त्याला ख्रिस्ती व्हावयाचें होतें. तो टिळकांना पपा व मला आई म्हणूं लागला. टिळक त्याच्यावर फार प्रेम करीत व त्याला आपल्या मुलाप्रमाणें मानीत. तसें टिळकांनीं कोणावर प्रेम केलें नाहीं ? जो कोणी त्यांना भेटे त्याच्यावर त्यांचा चटकन विश्वास बसे. माणसाची खरी परीक्षा मला आहे असें त्यांना वाटे. उलट मला वाटे माणसाची खरी परीक्षा मला आहे. हा माणूस मला एक लफंगा वाटे तर टिळकांना तो देवदूत वाटे. ते मला म्हणत, " तुला सायकॉलॉजी कळत नाहीं. " मी म्हणें, " मला नसेल कळत, पण मला व्यवहारज्ञान आहे नि हा माणूस लफंगा आहे हें मी माझ्या त्या व्यवहारज्ञानाच्या जोरावरच तुम्हांला सांगतें. " ते म्हणत, " तूं दुराग्रही फार. हा माणूस देवाचा मोठा सेवक होणार आहे. तूं पाहशील.. " मीं त्यांना सांगितलें, " मी सांगतें हा कांहीं होणार नाहीं. एक दिवस डोक्यावर चांगला हात फिरवून निघून मात्र जाईल. "

आमच्याबरोबर तो राहुरीलाहि आला. तेथें त्याचा बाप्तिस्मा झाला. पुढें थोडे दिवसांनीं टिळकांनीं त्याला विसापुरला कसलेंसें काम लावून दिलें. त्याला मीं पाणी प्यावयाचें भांडें, कांहीं फराळाचे व अंथरूण-पांघरूण देऊन वाटेला लाविलें. गेल्यावर त्याचीं नियमानें पत्रेंहि येत. बिचाऱ्याला आपल्यावांचून कोण आहे असें म्हणून टिळक त्याला मधून-मधून मोसंब्यांचीं पार्सलें पाठवीत.

एक दिवस टिळक कांहीं कामाकरितां नगरास गेले. टिळक गेल्यावर दुसऱ्याच दिवशीं त्यांचें पत्र आलें कीं, " आपल्या घरची चोरी झाली आहे.

नवल वाटतें कीं घर कोठेंच फोडलेलें नाहीं, कुळपें जशींच्या तशींच आहेत. सर्व दारें बंद आहेत, पण पायखान्यांतल्या टिनपाटापासून एकूण एक सर्व सामान गेलें आहे. अंथरूण, पांघरूण, चांदीचीं बटणें, शर्ट, कोट, मधाची बाटली ह्यांपैकीं कांहींहि जागेवर नाहीं!" पत्र वाचतांच मला टिळकांच्या मानस-पुत्राशा संशय आला. हें काम दुसऱ्या-तिसऱ्या कोणाचें नसून ह्याच भामट्याचें आहे असें मीं मनाशीं ठरविलें. टिळक लवकरच परत आले. त्यांनीं प्रास्ताविक अशा बऱ्याच लोणकढ्या थापा दिल्यानंतर हळूच म्हटलें, "शेवटीं चोर सांपडला."

मीं आशाळभूताप्रमाणें विचारलें, "सामान सांपडलं का!"

"तूं अशी उतावीळ करूं नको. मी सर्व कांहीं तुला सांगतों."

"बरं सांगा."

"अग तो आपला मुलगा विसापुरांत आहेना? तो होता म्हणून सर्व कांहीं मिळालं. नाही तर एक फुटका तांब्या हातीं लागला नसता."

"म्हणजे तो कांहीं पोलिस-बिलीस झाला आहे कीं काय?"

"नाही ग. चोरानें केली चोरी नि आपल्या नांवाचं भांडं घेऊन गेला बेटा बाजारांत विकायला. तिथें तें ह्यानें ओळखलं. धरला त्याचा हात नि दिला नेऊन पोलिसांत न् काय. किती हुशार माणूस!"

"तुम्ही कांहीं म्हणा. पण चोर पोळपाट लाटणं नि टिनपाट नेऊन काय करणार? हा कुणी तरी माहितींतला भामटा असला पाहिजे. ह्या जिनसा चोराला काय करायच्या?"

"तुला काय ठाऊक! चोर ह्यांचे सुद्धां पैसे करतात."

"बरं मग पुढें काय झालं?

"पुढें काय? विसापुराहून त्याचं पत्र आलं आहे कीं, 'दहा रुपये पाठवा. सामान माझ्या ताब्यांत घेतलं आहे. पैसे येतांच घेऊन येतों.'"

"मग त्याला का आतां पैसे पाठवायचे?

"तर! हीं कामं का कुठें पैशांवाचून होतात? चल, नाहीं तर मीच जाऊन

सामान आणतों. दे पैसे."

मी पैसे आणण्यास आंतल्या खोलींत गेलें. टिळकांचा हाच विषय चालू होता. आमच्या घरांत नेहमीं बाहेरचीं माणसें बोलत बसलेलीं असत आणि घरांतल्या गोष्टी वेगळ्या व बाहेरच्या वेगळ्या असें कधीं नसे. मी आंत आल्यावरचें टिळकांचें बोलणें मला स्पष्ट ऐकूं येत होतें.

"चोरी त्यानेंच केली. डॉ. ह्यूमकडून किल्ल्या आणल्या. चार गाड्या आणून त्यांत सर्व सामान भरलं. लोहारणीनें विचारलं, सामान कुठें चाललं? तर तिला सांगितलं, टिळकांनीं मला मुद्दाम राहुरीहून सामान आणण्यास पाठवलं आहे."

मी हें सगळं ऐकत होतें. पण व्यवहारज्ञानाचा मजजवळ पुष्कळ सांठा असल्यानें मनांत म्हटलें, 'हरकत नाहीं. एवढं मोठं सामान दहा रुपयांत परत मिळतं आहे ना? जाऊं द्या दहा रुपये गेले तर.' मीं बाहेर येऊन टिळकांच्या हातांत दहा रुपये ठेवले.

टिळकांनीं ते दहा रुपये नेऊन त्याच्या स्वाधीन केलें व त्याला सांगितलें मी पुढें जातों तूं सामान घेऊन ये. टिळक परत आले. मी म्हणालें, 'सामान?' ते म्हणाले, 'येत आहे मागून.' मी म्हणालें, 'तुम्हीं सारा संसार त्याला दान केला. त्याची दक्षणा राहिली होती ती आतां देऊन आला वाटतं!'

पण टिळकांना तो आपलें सामान घेऊन येणार अशीच पुष्कळ दिवस खात्री वाटत होती. आला नाहीं कधीं तो!

चार-पांच महिन्यांनीं प्लेगचें मान कमी झालें व डॉ. बालंटाईन राहुरीस परत आलें. ख्रिस्ती झाल्यापासून टिळक उन्हाळ्यांत महाबळेश्वराला जाऊन तेथें युरोपियन व अमेरिकन मिशनरींना मराठी शिकवीत असत. ह्या शिकवण्यांचें त्यांना बरेंच उत्पन्न होत असे. वर्षांतून तीन महिने महाबळेश्वरला व नऊ महिने नगरला ते असत. डॉ. बालंटाईन राहुरीला आलें त्या वेळीं टिळकांची महाबळेश्वरला जाण्याची तयारीच होती. ह्या वर्षी त्यांच्याबरोबर मी व दत्तू होतों.

टिळकांनीं वाईस आपल्या आईला – म्हणजे आशम्माबाईंना – आम्ही येतों म्हणून लिहिलें व त्यांनाहि आमच्याबरोबर महाबळेश्वरला येण्याचें आमंत्रण दिलें. आशम्माबाईंनीं तें आमंत्रण तावडतोब स्वीकारिलें. वाईस त्यांना कोणी म्हणत, ' तुम्ही जाऊं नका. टिळकांच्या बायकोचं नि तुमचं पटणार नाहीं. पटलं नाहीं तर तुम्ही काय कराल? ' आशम्माबाई त्यांना म्हणाल्या, ' नाहीं पटलें तर मी परत येईन. मीं तिथें राहिलंच पाहिजे असा माझा कांहीं त्यांच्याशीं करार झालेला नाहीं. '

वाईसहि आमची व्यवस्था होती. दत्तूसाठीं पेढे, आंबे, माझ्यासाठीं निराळी स्वैंपाकाची सोय. येथेंहि मीं आपल्या हातांनीं स्वैंपाक केला व आम्ही सगळीं जेवलों. नंतर आशम्माबाईंनीं आपलें घर आवरून सर्व बांधाबांध केली व आम्ही बैलगाडीनें महाबळेश्वरला जावयाला निघालों.

आम्हीं सर्वांनीं टोचून घेतलेलें होतें. तरी बैलगाडींतील प्रवाश्यांना प्लेगचें भय अधिक असल्यानें त्यांना मध्येंच दहा दिवस दांडेगरास झोपड्यांत मुक्काम करावा लागत असे! आम्हींहि तेथें मुक्काम केला. माझें सोवळें, माझें देव हें सारें बरोबरच होतें. आसपासच्या झोपड्यांतील लोक आश्चर्य करीत कीं हें आहे तरी कसलें कुटुंब. हा दाढीवाला मनुष्य दिसतो आहे मुसलमान, बरोबरची म्हातारी दिसते आहे ख्रिस्ती, ही तरणी बाई दिसते ब्राह्मण आणि पोरगा तर गळ्यांत जानवें घालून फिरतो आहे!

येथें पाण्याची अडचण भासूं लागली. पाणी दूर होतें. पखालीनें पाणी मिळे पण तें कातड्याच्या पखालींत आणि मुसलमानानें आणिलेलें! मी स्वतः कमरेवर कळशी घेऊन आमच्यापुरतें पाणी आणीं. बाकी पाणी पखालीचें चालूं लागलें. एक दिवस कांहीं अन्न उरलें होतें. तें एका मांगणीला मी देऊं लागलें. ती तें घेईना. ती म्हणे, " बाई, आमी खिरिस्ती लोकांच्या हातचं खात नाहीं. " मला तें ऐकून फारच वाईट वाटलें. मी ढसढसा रडलें. टिळक, आशम्माबाई ह्यांनीं माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण माझें आपलें तेंच. हेहि लोक माझ्या हातचें घेत नाहींत, तर माझें नातलग माझी सावलीहि

घेणार नाहींत ! आशम्माबाई म्हणाल्या, " लक्ष्मीबाई, तुम्ही कांहीं रडूं नका सगळं कांहीं होईल. तुमचे नातलग तुमच्याकडे येतील. तुम्ही त्यांच्याकडे जाल. पण तुम्ही दोन दिवस सोसलं पाहिजे. " ह्या गोड बोलण्याला उत्तर म्हणजे माझें त्यांना ताडताड बोलणें. पण ती माउली विचारी चांगल्या स्वभावाची म्हणून तिनें माझें सगळें बोलणें निमुटपणें ऐकून घेतलें.

दहा दिवस भरल्यावर जाण्याची परवानगी मिळाली. पुन्हां बैलगाड्या जुंपून सामानासह व पावण्या-रावण्यासह निघून महाबळेश्वरीं येऊन पोहोंचलों.

टिळकांचे नोकर-चाकर घरवाला वगैरे कधीं बदलत नसत. ते महाबळेश्वरला येऊं लागल्यापासून सैदू मिस्त्रीचें घर घेत. ह्याहि वेळेला त्याला त्यांनीं आधीं पत्र लिहून ठेविलें होतें. त्यानें सर्व तयारी अगदीं जय्यत करून ठेविली होती. बाज-बिछाना, दूध, तूप, दहीं, लोणी, भाजीपाला, सरपण इतकेंच नाहीं तर ह्या दाढीदीक्षितांनीं पाणी सुद्धां भरून ठेविलें होतें ! काय तो स्वयंपाकच करावयाचा राहिला होता.

दहाचे सुमारास आम्ही महाबळेश्वरास बिन्हार्डी जाऊन पोहोंचलों. घरवाल्यानें घर उघडून दिलें. सामान-सुमान गाड्यांतून काढलें. जो तो आपल्या कामाला लागला. दत्तू खेळण्यास, टिळक लिहिण्यास, आशम्माबाई ड्रॉइंगरूम सजविण्यास व मी स्वयंपाक करण्यास. विहीर घरापासून बाहेर चार हातांवर सडकेच्या बाजूलाच होती. पाण्याची सोय पाहून माझ्या तोंडाला पाणीं सुटलें. मीं पाणी शेंदलें. गार पाणी, थंड हवा व गोड अन्न. मनहि शांत, तेव्हां आम्ही मोठ्या आनंदानें जेवावयाला बसलों. टिळक व आशम्माबाई एका पंक्तीला बसलीं. त्यांना मीं वाढून दिलें व मग मी आणि दत्तू त्यांच्या समोरच दुसऱ्या पंक्तीला बसलों.

बोलतांना मीं विहिरीबद्दल माझा आनंद व्यक्त केला. हा विषय निघेपर्यंत आमचें जेवण मोठ्या सुखा-समाधानानें चाललें होतें. पण पाण्याचा विषय निघतांच डोळ्यांना पाणी व अन्नांत विष अशी स्थिति झाली. टिळक म्हणाले,

'तूं स्वतः पाणी शेंदून आणायचं नाहीं. तें मला शोभत नाहीं. मी ब्राह्मण पाण्याला ठेवतों.' माझ्या पोटांत धस्स झालें. नगरचा अनुभव अगदीं ताजा होता. त्या बिचाऱ्या ब्राह्मणाला माझ्यासाठीं भुर्दंड भरावा लागून जातीबाहेर पडावयाची वेळ आली होती. आमचा थोडासा वाद झाला. पण अगदींच थोडा. पुढें सर्व जेवण संपेपर्यंत दोन्हींकडे गुपचूप.

सभोंवतालीं सारी वसती धावड मुसलमानांची होती. आम्ही जातीचे ब्राह्मण, आमचे सोयरे मुसलमान, अशी आमची स्थिति होती. उद्यां ब्राह्मण कोठला मिळावयाला ? आणि टिळकांना तेथें ब्राह्मण शोधीत बसावयाला वेळ तरी कोठें होता ? पहाटे सहापासून संध्याकाळीं सहापर्यंत त्यांना काम होतें.

तरी मला अजून आधार वाटत होता. मजजवळ अजून दोन घागरी भरलेल्या होत्या. रात्रींचीं जेवणें झालीं. दीड घागर पाणी उरलें. रात्रीं माझी झोप पाणी शोधण्यास गेली ती पहाटे चाराला घरीं आली. जागी झाल्यावर पुढें पाण्याची दीड घागर दिसूं लागली. सारा दिवस मोठ्या कृपणासारखें वागूनहि संध्याकाळला दत्तूला व मला पुरेल इतकेंच पाणी राहिलें. आतां मात्र माझी पांचावर धारण बसली. डोळ्यांचें पाणी पुष्कळ वाहात होतें, त्याचा काय उपयोग ?

टिळक म्हणत, 'आज तूं हें पाणी पी. मी उद्यांपासून दुसरी व्यवस्था करतों.' मी म्हणें, 'एकदां प्यालें म्हणजे प्यालें. मग काय राहिलें ?' नेहमीं-प्रमाणें जेवावयास बसलें. कंठ दाटून येतच होता. कसें तरी अर्धें जेवण उरकलें. घास घशांत अडकला. टिळक म्हणाले, 'शरीर रक्षी तो धर्म. शिवाय पाणी चार हात वाहलं कीं त्याचा विटाळ जातो, असं हिंदुधर्म सांगतो. तूं हें पाणी पी.'

मीं मुसलमानाच्या हातचें पाणी तोंडाजवळ नेलें. हो नाहीं करतां-करतां डोळे घट्ट मिटून एक घोट घेतला, तो आंत फार वेळ घुटमळलाच नाहीं. तावडतोब पोटांत होतें नव्हतें तें घेऊन जोरानें बाहेर आला. माझ्या वांतीमुळें सर्वांचीं जेवणें तेथेंच आटोपलीं. मी तेथेंच पडलें. मला सडकून ताप भरला. टिळकांना आतां आपल्या हट्टाचें फार वाईट वाटूं लागलें. हिला समोरून

पाणी आणूं दिलें असतें तर कांहीं बिघडत नव्हतें असें आशम्माबाई त्यांना म्हणूं लागल्या व त्यांनींहि आपली चूक कबूल केली.

मी अंथरुणावर पडल्या-पडल्या उशीला न्हाऊं घालीत होतें. तीन वाजेपर्यंत मजकडे कोणी आलें नाहीं. टिळकांना आतां फार चोरट्यासारखें झालें होतें. मी मनांतल्या मनांत टाहो फोडून देवाला म्हणत होतें, ' देवा, आज मीं हें काय केलं? आज माझे पूर्वज मला स्वर्गांत काय म्हणत असतील? ह्या पापाचं मला कोणतं प्रायश्चित्त भोगावं लागणार आहे?' अशा एक ना दोन हजारों विचारांनीं माझें मन व्यग्र होऊन गेलें होतें. त्या वेळीं माझे डोळे मिटलेले होते, परंतु एकदम प्रकाश पडल्यासारखा मला भास झाला. प्रकाश पडला म्हणजे मी कांहीं अलंकारिक भाषेंत सांगत नाहीं. खरोखरच सूर्यप्रकाशासारखा चक्क प्रकाश पडल्यासारखा मला भास झाला. माझी तळमळ नाहींशी झाली व पूर्वीं कधीं डोक्यांत आले नव्हते असे विचार आतां माझ्या डोक्यांत थैमान घालूं लागले. टिळकांचा देवावर फार भाव. ते एकसारखे माझ्यासाठीं प्रार्थना करीत होते. दत्तूला घरांतील ह्या भीषण शांततेचा अर्थ कळेना. पण थोड्या वेळानें त्यानें आपला धंदा – म्हणजे खेळण्याचा – सुरू केला व तो आम्हांला पूर्णपणें विसरला.

टिळकांच्या प्रार्थनेला उत्तर आलें. माझ्या मनाला जखडून टाकणाऱ्या जातिभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. एका चुटकीसरसें हें झालें. त्या वेळेस माझ्या मनांत आलेले विचार इतके स्पष्ट होते कीं ते मला आतां जवळजवळ आले तसे तेथें टिपून काढतां येतील. देवानें जाती केल्या का माणसानें? देवानें केल्या असत्या तर माणसा-माणसांत कांहीं तरी फरक ठेविला असता ना? जन्म-मरण, हाड-मांस, बुद्धि, बरें-वाईट जाणण्याचें सामर्थ्य, सुख-दुःख हीं सर्व, सर्व मानव जातीला सारखींच आहेत ना? आणि मनुष्य प्राण्यांत जर देवानें जाती केल्या तर त्याच देवानें प्राणिसृष्टींत कां निरनिराळ्या जाती केल्या नाहींत? ब्राह्मण बैल, शूद्र बैल, वैश्य कावळा, अतिशूद्र कावळा, असले भेद पशु-पक्ष्यांत कोठें आहेत? ब्राह्मण व शूद्र ह्यांत

कोठें फरक आहे ? शूद्राच्या शिरीं नंदीचें शिंग नाहीं कीं ब्राह्मणाच्या कपाळीं महादेवाचें लिंग नाहीं. स्त्री व पुरुष ह्या दोन जाती निरानिराळ्या असल्या तर आहेत. बस्स ! माझा जातिभेद गेला. आजपासून माझ्यांतला जातिभेद समूळ गेला. ह्यापुढें मी सर्वांच्या हातचें खाईन, सर्वांच्या हातचें पिईन.

माझी ही विचारमाला सुरू होतीच. इतक्यांत आशम्माबाई येऊन माझी समजूत करूं लागल्या. 'तुम्ही आतां उठा, पाणी भरा नि स्वैंपाकाला लागा' असें त्या म्हणाल्या. मी म्हणालें, 'मी पाणी आणणार नाहीं, स्वैंपाक करणार नाहीं. तुम्हीं स्वैंपाक करा. मी जेवीन.' त्यांना माझ्या बोलण्याचा आशय कळेना. त्यांनीं जाऊन टिळकांना सांगितलें. टिळक येऊन तेहि मला पाणी आणून स्वैंपाक करण्याविषयीं सांगूं लागले. पण मीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं मी स्वैंपाक करणार नाहीं. ते म्हणाले, 'तूं व्यर्थ स्वतःला त्रास करून घेतेस. मी तुला ह्यापुढें पाण्याबद्दल किंवा स्वैंपाकाबद्दल एक अवाक्षर बोलणार नाहीं. तूं आपली तुला वाटेल तशी वाग.' पण माझें म्हणणें अगदीं निश्चयाचें होतें. मीं त्यांना म्हटलें, 'मी अगदीं मनापासून सांगतें आहें. रागानें सांगत नाहीं.'

टिळकांची जेव्हां खात्री पटली कीं मी खरोखरच मनापासून सांगत आहें तेव्हां त्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले, "थँक गॉड." तेथेंच टिळकांनीं प्रार्थना केली. आशम्माबाईनीं स्वैंपाक केला व आम्ही सर्व मोठ्या आनंदानें जेवलों. परजातीच्या हातचें अन्न खाण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग होता. पाणी प्यालें तेव्हां माझी जी स्थिति झाली ती अन्नसेवनानें झाली नाहीं.

आशम्माबाई कांहीं दिवस राहून परत वाईस आपल्या कामावर गेल्या. त्या गेल्या तेव्हां मला फार वाईट वाटलें. खऱ्या सासूबाईच्या हाताखालीं मी कधीं वागलें नाहीं, कारण माझ्या लग्नाच्या आधींच त्या गेल्या होता. राजनांदगांवला एक सासू मिळाली होती तिनें माझी कशी परवड केली तें मीं मागें लिहिलेंच आहे. पण आशम्माबाई मात्र सासू म्हणण्यापेक्षां आई म्हणणेंच अधिक शोभेल.

टिळकांचा संसार पुन्हां नव्यानें सुरू झाला. आतां खाण्या-पिण्याचा प्रश्नच राहिला नव्हता. मी जरी खिस्ती झालें नव्हतें किंवा खिस्ती होण्याचा माझा बेतहि नव्हता, तरी माझ्यांतला जातिभेद सर्व लयाला गेला. त्यामुळें आमचे दोन निरनिराळे संसार जे इतके दिवस होते ते जाऊन दोघांचा एकच संसार झाला. माझ्या मूर्तिपूजेला टिळक अडथळा करीत नसत व त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं मीं तेथें जाऊन नियमानें बसत असें.

नवीन संसार सुरू झाला तेव्हां पैसे पाहिजेत म्हणून टिळक मिळेल तेवढें काम घेऊं लागले. त्यांना दर तासाला वीस पंचवीस रुपये मिळत व आठनऊ तास काम ते सहज करीत.

टिळकांची हौस कधीं लाजली नाहीं, कधीं एका बाजूला बसली नाहीं. पैसे असले कीं लगेच चहूंकडे ती बागडावयाला लागे. त्यांनीं लग्नाच्या वेळीं फिकिरीची माळ माझ्या गळयांत घातली होती व मीं बेफिकिरीची माळ त्यांच्या गळयांत घातली होती. ज्याप्रमाणें मुंबईतला पैसा मुंबईतच राहतो किंवा लंकेंतल्या सोन्याच्या विटा हिंदुस्थानांत येत नाहींत, त्याचप्रमाणें महाबळेश्वरांत मिळविलेला पैसा महाबळेश्वरांतच खलास करण्याची टिळकांच्या वृत्तींत पूर्वचिन्हें दिसूं लागलीं.

बाजार करण्याची त्यांना एखादा वेळीं फार हौस वाटे. आपल्यासारखा व्यवहारज्ञ कोणी नाहीं असें त्यांना वाटे व ह्यांना कोणींहि फसवावें इतका व्यवहारज्ञानाचा ह्यांचे ठायीं अभाव आहे असें मला वाटे. "मी खरेदी चांगली करतों, मला कोणी फसवीत नाहीं" असें ते म्हणत, तर "तुम्हांला खरेदी मुळींच करतां येत नाहीं, तुम्हांला सारे फसवतात" असें मी म्हणे.

बायको मुलगा आलेलीं, पैसाहि हातांत मुबलक खेळतो आहे, तेव्हां टिळकांनीं खरेदी करण्यास सुरुवात केली. आधीं संसारोपयोगी सामान आलें. कप-बशा, चमचे-काटे, सुऱ्या, शुगर पॉट, मिल्क पॉट, बटर पॉट, किटल्या, सूप प्लेटी, डिनर प्लेटी, फ्लॉवर पॉट, तोंड धुण्याच्या गिंड्या ! सर्व थाट नव्या तऱ्हेचा ! तसेंच पुष्कळसें बेताचें सामान त्यांनीं घेतलें. मला कोणत्या

सामानाचा काय उपयोग करावयाचा हेंहि ठाऊक नव्हतें व त्यांनींहि कांहीं त्या गोष्टींचा विचार केला नाहीं. मला हीं विचित्र भांडीं दृष्टीसमोर आवडत नसत. मी म्हणें, 'ही काच कशाला घरांत भरून ठेवतां ?' पण त्यांना माझ्या बोलण्याचा राग येई. "तुला 'ॲप्रिसिएशन' नाहीं" असें ते म्हणत.

संसार मांडल्यानंतर त्यांची दृष्टि कपड्यांकडे वळली. स्वतःला नवीन चार सूट केले. मलाहि दोन गाऊन केले ! मी म्हणें, 'अहो हें काय करतां ? दोन लुगडीं कां नाहीं आणलीं ह्यापेक्षां ?' टिळक म्हणत, 'तुला 'सायकॉलॉजी' कळत नाहीं. मनुष्यानें कांहीं हौसेनें केलें कीं त्या वेळेस तरी त्याचा हिरमोड करूं नये; तुझं माझं पटत नाहीं तें ह्यामुळेंच. कधीं मीं कांहीं केलं आहे तें तुला पसंत पडलं आहे असं व्हायचंच नाहीं.'

प्रत्येकाला बुटाचे तीन-तीन जोड करविले. माझ्या एकटीच्या बुटाचें बिल चोवीस रुपये झालें ! मीं जन्मांत कधीं साधा जोडाहि पायांत घातलेला नव्हता. दोन-तीन लेक्चरें 'सायकॉलॉजी'बद्दल व 'ॲप्रिसिएशन'बद्दल मिळालीं असूनहि मीं म्हटलेंच, 'काय हा व्यर्थ खर्च, ह्यापेक्षां घरांत सोनं आणलें असतं तर तें अडी-अडचणीला उपयोगीं तरी पडलं असतं.' मला तिसरें लेक्चर मिळालें. त्याचा गोषवारा :

'तुझ्या मूर्खपणाची कमाल आहे. सोनें अंगावर घालून उन्हांत, कांट्यांत अनवाणी फिरणं बरं कीं तें नसून बूट, छत्री ह्यांचा उपयोग करून शरीरताप कमी करणं बरं ?' वगैरे.

निघेपर्यंत मिळालेला सर्व पैसा खर्च झाला होता. आणिलेल्या सर्व सामानाचें निघतांना सदू मिस्त्रीला दान करण्यांत आलें. त्याचें घर पुढच्या वर्षासाठीं आयतें 'फर्निश्ड्' म्हणून पुढच्या खेपेपासून आम्हांला त्या घराचें भाडेंहि अधिक द्यावें लागलें.

असो. महाबळेश्वरचे दिवस फार सुखाचे गेले, गमतीचे गेले. रोट्या कशा करावयाच्या ह्याचं शिक्षण मीं तेथें घेतलें. कोणाकडून तरी फुगवणासाठीं हाफचा पाला आणून ठेविला होता. मला पोटदुखीची व्यथा फार वर्षांपासून आहे. एक

दिवस माझें पोट दुखूं लागलें. टिळकांना पहाटेच कामाला जावयाचें. शेजार-पाजार उपयोगीं पडण्यासारखा कोणाचा नव्हता. त्यांनीं विचारिलें, 'तुला काय देऊं?' मीं कपाटांतून सोनामुखीचा पाला घेऊन त्याचा काढा करून द्या म्हणून सांगितलें. त्यांनीं स्वतः चहा करून घेतला व मला काढा करून दिला. नंतर ते कामाला गेले.

इकडे माझें पोट फुगावयाला लागलें. काय करावें कांहीं सुचेना. जीव कासावीस होऊं लागला. दुपार होऊं लागली तसतसा प्राण जाईल असें वाटूं लागलें. दत्तू व मी अशीं दोघेंच घरीं! शेवटीं दत्तू म्हणाला, 'मी डॉ. जुलिया बिसेल ह्यांना घेऊन येतों.' तो कधीं टिळकांबरोबर जात असे त्यामुळें त्याला डॉ. बिसेल ह्यांचें घर ठाऊक होतें. त्यानें जाऊन डॉ. बिसेल ह्यांना आणिलें.

डॉ. जुलियाबाईनीं माझ्या खाण्या-पिण्याची चौकशी केली. सोनामुखीनें पोट फुगेल कसें? त्या मोठ्या विचारांत पडल्या. शेवटीं उठून स्वैंपाकघरांत गेल्या. चुलीजवळ सगळा पसारा पडला होता. तेथेंच चहाचें व काढ्याचें भांडें होतें. त्यांनीं काढ्याचें भांडें मजकडे आणिलें व म्हटलें, 'अहो लक्ष्मीबाई, तुमच्या पोटांत फुगवण गेलं आहे. हा हाफचा पाला! ही सोनामुखी नाहीं!' त्यांनीं औषध दिलें, त्यानें मला ताबडतोब गुण आला.

आम्हीं महाबळेश्वर सोडलें तेव्हां सर्व सामान अगदीं सुटसुटीत व बेताबाताचें होतें. दोन ट्रंका, दोन ब्यागा व एक बिछाना. जातांना नुसत्या सामानाला एक वेगळी बैलगाडी लागली होती. तर येतांना एका टांग्यांत आम्ही सर्व व आमचें सर्व सामान अगदीं व्यवस्थितपणें मावलें! महाबळेश्वरची हवा मानवली असली तर फक्त शरीराला व मनालाच. सामानाला नाहीं. तें खूप रोडावलें होतें.

वाईस आशम्माबाई आमची वाटच पाहत होत्या. त्यांनीं आमची सर्व तयारी अगदीं जय्यत करून ठेविली होती. तसा आदरातिथ्यांत त्यांचा नेहमींच हातखंडा होता. व्यवस्था, टापटीप, वगैरे सगळें जेथल्या तेथें असे. आमचें सामान पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. मीं कुरकूर केली. टिळक म्हणाले, 'ह्या

सामानाला जेवढं भाडं लागलं असतं तेवढ्यांत नगरास मला नवं सामान आणतां येईल.' त्यांचेंहि म्हणणें बरोबर होतें. पण चूक जी होती ती कोठें व कोणाची हें मात्र कळत नाहीं.

वाईच्या गणपतीपुढें ख्रिस्ती धर्मावर टिळकांचें व्याख्यान झालें. फार गर्दी जमली होती. नंतर पुष्कळ प्रश्नोत्तरें झालीं. टिळकांचा हरजबाबीपणा अशा वेळीं त्यांच्या कसा उपयोगीं पडे ह्याचें एक उदाहरण सांगतें. तेथें एकानें त्यांना विचारिलें, 'काय हो, तुमच्यांत बाप तीस व मा एक असते नाहीं का?' बाप्तिस्मा म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या दीक्षेच्या विधीच्या शब्दावर कोटी होती ती. असले कांहीं वात्रट व अश्लील प्रश्न विचारिले म्हणजे इतर ख्रिस्ती उपदेशक गांगरून जात. पण टिळकांनीं तेथें त्यांना विचारण्यांत आलेल्या प्रत्येक खऱ्या खोट्या शंकेला उत्तर दिलें होतें.

टिळक म्हणाले, 'ख्रिस्ती माणसालाच कां, सर्व मनुष्यमात्राला तीस बाप असून, ह्या बापांची एक आई म्हणजे तुमची आमची आजी आहे! मोजा तीस बाप —

पंच महाभूतें (पृथ्वी, आप्, तेज, वायु व आकाश),
पंच प्राण (प्राण, अपान, व्यान, उदान व समान),
पंच ज्ञानेन्द्रियें (जिव्हा, कर्ण, नेत्र, नासिका व त्वचा),
पंच कर्मेन्द्रियें (हात, पाय वगैरे),
चार अन्तःकरणें (मन, बुद्धि, अहंकार व चित्त),
एक आत्मा.

झाले हे पंचवीस? आतां तुमच्याच शास्त्र्यांनीं सांगितलेले

'जनिता–चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति।
अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृताः॥'

हे पांच बाप ह्यांत आणखी मिळवा. झाले ना तीस बाप? पण ह्या सर्वांची जननी ईश्वरी कृपा आहे. म्हणून ही ह्या तीस बापांची आई व तुमची आमची आजी आहे.

शंकित गार झाला! वासिस्म्याचा टिळकांचा हा अर्थ मुळींच नव्हता, पण वाईच्या उपदेशकांच्या मागची ही एक कुटाळकी टिळकांनीं सदाची बंद केली. एक-दोन दिवसांनी आम्हीं वाई सोडली.

* * *

आम्ही बोलत, विचार करीत, बेत ठरवीत वाठारजवळ आलों. वाठार तीन चार मैल राहिलें. तेथें एक पूल आहे. खालीं पाणी असून तेथें बैलगाड्या, तांगे सुटतात. जवळचें खेडें पिपुरडें म्हणून ओळखलें जातें.

आम्हीं तेथें उतरून फराळाचें सोडलें. पोटभर फराळ केल्यावर टिळक दत्तूला घेऊन इकडे-तिकडे फिरूं लागले. माझ्या मनांत नगरचे पुढचे बेत येतजात होते. मध्येंच वाटेंत पुण्यास दोन दिवस मुक्काम करण्याचें ठरलें होतें.

माझ्यापुढें अन्नाच्या दोन-तीन टोपल्या पाहून हळुहळू भिकारी जमूं लागले. मीहि धोरणी. नगद माल बाजूला काढून ठेवून बाकीच्या अन्नाचा मीं दानधर्म सुरू केला. त्या भिकाऱ्यांत कांहीं मुली होत्या. माझ्या स्वभावाप्रमाणें मला बोलावयाला पुष्कळ हवें असतें. मी त्यांच्याशीं बोलत होतें. त्यांच्या घरची माहिती विचारीत होतें. एकीला मीं विचारलें, 'कां ग, तूं भीक कां मागतेस?' ती म्हणाली, 'बाई मला कुणी नाहीं.'

"चल येतेस का माझ्याबरोबर?"

आमंत्रण मिळतांच ती तयार झाली. जेवढी भीक जमली होती तेवढी सोबतिणीला देऊन टाकून व तिच्या कानांत कांहीं सांगून ती मजजवळ येऊन बसली.

"तूं रडणार नाहींस ना?"

"नाहीं."

"तर अंग धू. तुझं धोतर दे टाकून नि हें लुगडें नेस. ही चोळी घे."

तिनें माझ्या सांगण्याप्रमाणें केल्यावर तिच्यांत किती तरी फरक दिसूं लागला. मुलगी काळी-सांवळी पण नाक-डोळे नीटस असल्यानें ही पांच मिनिटांपूर्वी येथेंच भीक मागत असेल असें कोणीं म्हटलें नसतें. तिचें वय

बारा-तेरा वर्षांचें असेल.

" तुम्हांला मी काय म्हणत जाऊं ? "

" माझें नांव लक्ष्मी आहे. माझा मुलगा मला बाई म्हणतो. तुला वाटेल तें मला म्हण. "

तीहि मला बाई म्हणूं लागली.

मी ख्रिस्ती नव्हतें तरी जवळच टिळकांचें बायबल पडलें होतें तें हातांत घेऊन मनांतल्या मनांत प्रार्थना केली कीं, देवा मी हें काय करीत आहें तें बरोबर आहे किंवा नाहीं तूं मला सांग. नंतर मीं बायबल उघडून एके ठिकाणीं तें वाचिलें. तो मजकूर असा होता, " जें झाड पाण्याच्या ओघाजवळ लाविलेलें असतें तें सुकाळीं फळ देतें व त्याचें पान कोमत नाहीं. " माझ्या मनांत जर कांहीं शंका-कुशंका आल्या असतील तर त्या ह्या वाक्यानें नाहींशा झाल्या. माझी खात्री झाली कीं देवच मला हें करावयाला सांगत आहे. मुलीच्या जातीसंबंधानें मीं चौकशी केली नाहीं कारण माझा जातिभेद व सोवळें-ओवळें महाबळेश्वरींच हवा खात पडलें होतें.

" तुझें नांव काय ग ? "

" माझें नांव नकुशी. "

" तूं मला हवीशी आहेस. तुला मी हौशी म्हणत जाईन.

हें नामकरण होईपर्यंत टिळक दत्तूला घेऊन परत आले. आम्ही दोघी माय-लेकी बोलत बसलों होतों. त्या बाप-लेकांना वाटलें ही कोणी वाटसरू असेल. पण माझेंच लुगडें तिच्या अंगावर पाहून व बोलण्याच्या धोरणावरून टिळकांनीं विचारलें,

" ही कोण ? "

" ही मुलगी आहे "

" तें समजलं. पण ही मुलगी कोणाची ? "

" आपली. "

" आपली ? आपली म्हणजे काय ? हा काय गोंधळ आहे ? "

"हिला कोणी नाहीं. दुष्काळानें हिची फार वाईट स्थिति झाली आहे. अशीच भीक मागून ही कोणाच्या तरी वळचणीला पडते. तिची इच्छा आपल्याबरोबर येण्याची आहे. मीं तिला घेतली."

"बरं, कांहीं हरकत नाहीं."

अर्थात ते अशा कामाला कधींच नाहीं म्हणाले नसते अशी माझी खात्री होती. इतर वेळेला नसलें तरी असल्या परोपकाराच्या कामांत आमचें दोघांचें नेहमीं एकमत होत असे.

आम्ही पिपुरच्याहून निघालों. सामान-सुमान तांग्यांत ठेवलें. आम्ही तांग्यांत बसलों. पण मुलगी तांग्यांत बसायला तयार होईना. ती तशीच तांग्याच्या मागें पळूं लागली! आम्हांला फार वाईट वाटलें. तांगा हळूहळू चालविला. जोडा खालीं टाकला. तो ती पायांत घालीना. शेवटीं अनवाणी तीन मैल तांग्यामागें पळत-पळत ती आमच्याबरोबर स्टेशनपर्यंत आली. आम्ही स्टेशनांत पाय टाकतांच गाडी सुटल्याची घंटा झाली. टिळकांनीं घाईघाईनें सर्वांचीं तिकिटें काढलीं.

इतक्यांत एक म्हातारा आला. हौशी त्याच्याकडे गेली व त्याच्याशीं कांहीं बोलूं लागली. तो म्हणूं लागला, 'माझी मुलगी तुम्ही नेतां तर मला कांहीं पैसे द्या.' टिळक म्हणाले, 'मी कांहीं माणसें खरेदी करायला आलों नाहीं. तूं आपली मुलगी घेऊन जा.' तो म्हणाला, 'मला हिला परत नेतां यायचें नाहीं. हिनें तुमच्या हातचें खाल्लें, तुमचे कपडे ही नेसली, आतां मला हिला परत कशी घेतां येईल?' टिळक म्हणाले, 'नसली घेतां येत तर राहूं दे. आम्ही चाललों.' इतक्यांत गाडी आली व हौशी बापाला सोडून आमच्या डब्यांत येऊन बसली. गाडी चालू झाल्यावर मीं तिला म्हटलें,

"कां ग तूं मला खोटं सांगितलंस?"

"मी त्या मुलीला सांगून बापाला भेटायला बोलावलं. त्यानें उगाच पैसे मागितले. मीं सांगितलें नाहीं. मला सावत्र आई आहे. तिचीं लहान-लहान मुलें आहेत. गांवांत महागाई आहे व माझे फार हाल होतात. म्हणून मीं

खोटें बोललें."

"बरं कांहीं हरकत नाहीं. तूं दुष्काळी मुलगी आहेस. एकदम फार खा-खा करूं नको. आरंभीं थोडें–थोडें खा."

मुलगी फारच चांगली होती. तिनें माझें बोलणें ध्यानांत ठेवावें व त्याप्रमाणें वागावें.

गाडी चालली तशी माझी विचारमालिकाहि वाढत होती. ही मुलगी घेतली खरी. पण ही कशी वागेल? खरकटें अंगाला लावील कीं घरांत कोठें पिंकी टाकील, का थुंकेल?—एक ना दोन हजारों विचारांनीं मन व्यग्र झालें. एकदां मनांत आलें कीं कोठें बोर्डिंगांत हिला टाकून द्यावें. पुन्हां तेंच मन सांगे पुण्याच्या स्टेशनवर द्यावी हिला सोडून. पण मग वाटे तसें कांहीं केलें तर हिचा केवढा विश्वासघात केल्यासारखें होईल. ही माझी म्हणून माझ्यावर विसंबून मजबरोबर आली. माझ्या मुलाप्रमाणें मला बाई म्हणून हांक मारूं लागली आणि हिला दूर लोटूं? शेवटीं विचार ठाम ठरला कीं काय होईल तें होवो हिला दूर लोटावयाचें नाहीं.

ठरल्याप्रमाणें आम्ही पुण्यास दोन दिवस मुक्कामाला म्हणून एका गृहस्थांच्या घरीं येऊन उतरलों. रात्रीपर्यंत सर्व ठीक होतें. पण निजावयाच्या वेळेस त्या रात्रीं माझी झोंप उडण्याचें कारण घडलें. सद्गृहस्थांनीं व बाईसाहेबांनीं मला सांगितलें कीं मुलीला घरांत नाहीं घेतां येणार! टिळकांना हें ठाऊक नव्हतें व मींहि सांगितलें नाहीं. टिळक संतापी व एखादे वेळेस त्यांच्या कानांवर हा दुजाभाव गेला तर ते काय बोलून जातील ह्याची मला खात्री नसल्यानें मीं तें मनांतल्या मनांत ठेविलें. मीं आपलीं दोन लुगडीं तिला देऊन बाहेर निजा-वयाला सांगितलें व मी निजलें. निजलें म्हणजे नुसती पडलें. मला झोंप आली नाहीं. मला वाटे, दत्तूला जर कोणीं असें बाहेर निजविलें असतें तर मी ह्या घरांत पाणी तरी प्यावयाला राहिलें असतें का? दुसऱ्याचें मूल विश्वासानें आपलें म्हणून आपल्याबरोबर आलेलें. त्याला असें बाहेर टाकणें कसें होतें! मला दुसऱ्याचें मूल आपलें म्हणून संभाळतां येत नाहीं तर तें घ्यावयाचें तरी

होतें कशाला? पण मग वाटे हें घर दुसऱ्याचें. आपण परस्वाधीन. येथें हे विचार मनांत आणण्यांत काय अर्थ आहे! पुन्हां वाटे हें घरहि ख्रिस्ती कुटुंबाचेंच ना! मग ह्यांनीं असा दुजाभाव कां बाळगावा? मी निजलें होतें त्याच खोलीच्या बाहेर हौशी निजली होती. मी वरचेवर खिडकींत उभी राहून तिच्याकडे डोकावून पाहीं. तिच्या मनाला कांहींच त्रास होत नव्हता. ती अगदीं शान्तपणें झोंपीं गेली होती. मला मात्र ती रात्र फारच फार लांब वाटत होती. कांहीं केल्या रात्र सरेना व दिवस उजाडेना. मीं आपल्या मनाशीं ठरविलें कीं सकाळींच आपलीं दोन्ही मुलें घेऊन नगरला निघून जावयाचें. टिळक कांहीं नाहीं म्हणणार नाहींत. रात्रीचा प्रकार मात्र त्यांना कळवावयाचा नाहीं. नाहीं तर ते त्यांना कांहीं तरी बोलून जावयाचें.

मी सकाळीं चहाच्या वेळीं टिळकांना म्हटलें, "मी मुलांना घेऊन पुढें जातें. तुम्ही मागून या." टिळकांनीं तें ताबडतोब कबूल केलें. आम्ही बरोबर थोडेसेच पैसे आणिले होते. कारण मिळालेले सगळे महाबळेश्वरास कपडेवाल्याकडे, बूटवाल्याकडे वगैरे ठेवून दिले होते. आतां आमच्या भाड्यापुरते व वर एक रुपया इतकाच खजिना आमच्याजवळ होता. मीं टिळकांचें भाडें ठेविलें व आमचें भाडें व वरचा एक रुपया घेऊन मुलांसह नगरच्या गाडींत बसलें.

हौशीच्या हातांत बांगड्या नव्हत्या. ती फार मागें लागली कीं बाई मला बांगड्या भरा. मी नगरपर्यंत संभाळून आणलेला तो रुपया देऊन तिला मोलकरणीबरोबर बाजारांत पाठविलें. हौशी बांगड्या भरून हसत-हसत घरीं आली व मोठ्या कौतुकानें त्या मला दाखवूं लागली.

"अग हौशे, इतक्या हलक्या बांगड्या कां भरल्यास?"

"मग आपल्याला खर्चायला पैसे नको कां ग?"

मला तिचें मोठें कौतुक वाटलें. पण हौशीनें ओटींत ठेविलेले सर्व पैसे वाटेनें कोठें पडले होते! पैसे इकडे-तिकडे चांचपून ते गेले अशी खात्री होतांच ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. मला वाटलें हिनें पैसे हरवले त्या ऐवजीं चांगल्या बांगड्या भरल्या असत्या तर बरें झालें असतें. पैशांबद्दल

मला वाईट वाटलें नाहीं. कारण टिळक येतांच त्यांनीं 'आगाऊ' बँकेंतून पैसे आणिलेच असते. ही 'आगाऊ' बँक डॉक्टर ह्यूमच्या बंगल्यांत होती व बहुतेक दर महिन्याला तिच्यांतून पैसे येत असत. टिळक दुसऱ्या दिवशीं येतांच त्यांनीं पंधरा रुपये आगाऊ आणिले.

टिळकांचीं बहुतेक माणसें ठरलेलीं होतीं. एक न्हावी, एक धोबी, एक शिंपी तशींच दुकानेंहि कधीं त्यांनीं बदललीं नाहींत. आपल्याला कधीं कोणी फसवीत नाहीं अशी त्यांची अगदीं खात्री होती. आम्ही महाबळेश्वराहून उतरल्यावर अशाच एका नेहमींच्या कापडाच्या दुकानांतून बरेंचसें कापड नेल्याचा हिशेब शेठजींनीं टिळकांना दाखवून हळूच पैशांची गोष्ट काढली. टिळकांनीं पैसे पाठवून देतों म्हणून सांगितलें. घरीं येऊन हौशीकरतां मीं कांहीं उधार आणिलें का म्हणून विचारलें. मीं कांहींच आणिलें नव्हतें तेव्हां नोकराचा संशय आला. आम्हीं आल्यापासून तो आलाच नव्हता. आजाराचें सोंग घेऊन घरीं बसला होता. टिळक त्याच्या घरीं गेले. त्याला पश्चात्ताप झाला, तो रडला. टिळकांची त्यानें क्षमा मागितली. टिळकांनीं ती केली! घरीं येऊन माझी समजूत करूं लागले.

"मीं त्याला खूप धाक घातला आहे कीं जर का पुन्हा असें केलेंस तर तुरुंगांतच घालीन! पुन्हां माझ्या कानांवर असें कांहीं आलें तर याद राख, माझ्याशीं गांठ आहे."

"कां, मी सांगत होतें ना ह्या लोकांवर इतका विश्वास टाकूं नये म्हणून! त्याला पोलीसच्या स्वाधीन कां नाहीं केलें."

"गरिबांमुळें त्याला मोह पडणें साहजिक आहे. शिवाय त्याला आतां मीं चांगली धमकीहि दिली आहे. पोलीसच्या हवालीं त्याला करून आपला कोणता फायदा आहे? उगीच खर्च आणि वेळेचा व्यय. नाहीं तरी आपले पैसे कुठें खर्चत नाहींत? त्या बिचाऱ्याला कुठें उगीच गुंतवून टाकायचें. शिवाय तें सारें विकून तो खाऊनहि बसला आहे. मीं त्याला चांगली धमकी दिली आहे."

'मीं त्याला धमकी दिली आहे ' हें पालुपद चालूच होतें. पण हें उगीच दाखविण्यापुरतें होतें. खरी गोष्ट म्हणजे तो रडला आणि हे विरघळले.

आमची बाळूबाई धोबीण महाबळेश्वराहून आल्यानंतर पहिलीच खेप घेऊन गेली होती. ह्या खेपेंत महाबळेश्वरांतील सर्व नवे कपडे धुण्याला दिले होते. ती आली एक दिवस रडत ऊर बडवीत. तिच्या हातांत एक शर्ट होता. ' साहेब माझें सारें गेलें. सारीं भांडीं गेलीं. सारें सोनें नाणें गेलें. त्यांत तुमचे सारे कपडेहि गेले. '

आम्हांला सर्वांना फार वाईट वाटलें. टिळकांना ती म्हणूं लागली, ' तुम्ही चला आणि माझी कोठें दाद लावा. ' टिळक म्हणाले, ' बाळूताई, आतां तें सांपडणार नाहीं. गेलें सारें तें. ' ती म्हणे, ' तुमचें नुकसान भरून देईन. '

तिला होता सारा एक रुपया पगार. त्यांतून तीं काय नुकसान भरून देणार ! टिळक म्हणाले, ' बाळूताई, तूं सारा जन्म जरी फुकट काम करीत राहिलीस तरी हे पैसे फिटणार नाहींत. तूं कांहीं काळजी करूं नको. माझें गेलें त्याबरोबर तुझेंहि गेलें आहे. आतां पुढच्या महिन्यापासून तुला दोन रुपये पगार देऊं. जा रडूं नको. '

आणि त्यानंतर पुढें पुन्हां पगार वाढेपर्यंत बाळूबाईला दोन रुपये पगार झाला !

महाबळेश्वराहून आम्ही परत आल्यावर एक-दोन महिन्यांनीं डॉ. बालंटाईन-साहेबांच्या आमंत्रणावरून चार दिवस राहुरीस गेलों होतों. राहुरीस आम्हांला एक लहानसें घर चार दिवसांसाठीं दिलें होतें. जेवण डॉ. बालंटाईनसाहेबांकडून वाढून येत असे.

रोज सकाळ-संध्याकाळ आमच्या घरीं शास्त्रवाचन, पोथीप्रार्थना, भजन हीं होत. भजनांत टिळक आपलीं प्रेमळ पद्यें तयार करून म्हणत. प्रार्थनेला नेहमींच शेजार-पाजारची मंडळी जमत. जमलेली मंडळी आपल्याला आवडत असेल तें शास्त्रवचन म्हणजे ' बायबल व्हर्स ' म्हणे. राहुरीला आल्यावरहि हा नियम चुकला नाहीं. मी व दत्तू हिंदु होतों तरी आम्ही नियमानें टिळकांच्या

प्रार्थनेला बसत होतों. मला प्रार्थना आवडूं लागली. आपण आपल्या हृदयस्थ परमेश्वराशीं बोलणें म्हणजे एक नवा आल्हादजनक अनुभव मला वाटूं लागला. बायबलचीहि ऐकून-ऐकून मला पुष्कळ माहिती झाली.

दिवस शनिवारचा होता. अशीच प्रार्थनेला मंडळी जमली होती. जमलेल्या सर्व ख्रिस्ती लोकांनीं शास्त्रवचनें म्हटलीं. दत्तूवर पाळी आली. त्यानें ' देव प्रीति आहे ' हें शास्त्रवचन म्हटलें. मजवर पाळी आली तेव्हां मीं ' हे देवा, मज पाप्यावर दया कर ' हें शास्त्रवचन म्हणालें.

टिळक म्हणाले,

" तुझ्यावर देव कधींच दया करणार नाहीं. "

" कां नाहीं करणार ? "

" तूं मला वचनबद्ध असून जर दूर राहूं लागलीस तर मला तुजबद्दल काय वाटेल ? तसेंच तुझी जर ख्रिस्ताचे ठायीं भक्ति असेल आणि ती असून तूं त्याच्यापासून दूर राहूं लागलीस तर ती प्रतारणा देवाला कशी आवडेल ? तो तुजवर कशी दया करील ? "

प्रार्थना झाल्यावर मी उठलें व बाहेर गेलें. कोठें जातें हें घरांत कोणाला मीं सांगितलें नाहीं. जी उठलें ती थेट डॉ. बालंटाईनसाहेबांच्या बंगल्यावर गेलें व त्यांचें दार ठोठावलें. मला पाहून साहेब चकित झाले.

" कां लक्ष्मीबाई, तुम्ही एकट्याच आल्या ? "

" साहेब, माझा उद्यां बाप्तिस्मा करा. "

" आतां बाई ! तुम्हांला अजून शास्त्राचें ज्ञान नाहीं. तुम्हीं निदान पांच-सहा महिने तरी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करायला पाहिजे. "

" मला ख्रिस्ती धर्माची आतां चांगली माहिती झाली आहे. मला उद्यांच्या उद्यां बाप्तिस्मा पाहिजे. "

" पण बाई, अशी घाई कां ? "

" तें कांहीं नाहीं. तुम्हांला मला बाप्तिस्मा द्यायचा नसेल तर तसें स्पष्ट सांगा... "

" पण तुमची परीक्षा घेतील. त्या वेळीं उत्तरें द्यावीं लागतील. "

" मला तें कांहीं माहीत नाहीं. तुम्ही बाप्तिस्मा देणार कीं नाहीं तें सांगा. नाहीं तर मी चाललें. "

" तुम्ही आतां जा. मला ह्या वेळेस उत्तर देतां येणार नाहीं. "

" साहेब, उद्यां आहे रविवार. माझा, दत्तूचा आणि हौशीचा उद्यांच्या उद्यां बाप्तिस्मा झाला पाहिजे. शास्त्राच्या परीक्षेंत मी उतरलें नाहीं तरी माझा ख्रिस्तावर भाव आहे. मी का खोटें बोलतें आहें? " साहेबांनीं व मीं तेथेंच प्रार्थना केली व दुसऱ्या दिवशीं आमचा बाप्तिस्मा होण्याचें ठरलें.

दुसऱ्या दिवशीं बाप्तिस्म्याचें ठरलें. मी त्या आनंदांत घरीं आलें. बरोबर कंदील देऊन बालंटाईनसाहेबांनीं आपला माणूस पाठविला होता. परत आल्यावर टिळकांनीं कोठें गेली होतीस म्हणून विचारलें. माझ्या तोंडून सर्व हकीगत ऐकून त्यांना मोठा आनंद वाटला.

परदेशीय मिशनरीच्या हातून बाप्तिस्मा घेण्याचें मीं नाकारलें त्यामुळें तो हिंदी पालकाच्या हातून झाला.

# कांहीं संस्मरणीय गोष्टी

त्याच वर्षीची आणखी एक संस्मरणीय गोष्ट म्हणजे माझें भाषण. अहमदनगरास दर दिवाळींत ऐक्यसभा म्हणून एक मोठी सभा भरत असे. ह्या सभेला नगर, सातारा, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतून ख्रिस्ती लोक जमत व तिला एक प्रकारचें यात्रेचें स्वरूप येत असे. नगरचें जुनें देऊळ अगदीं गच्च भरून जावयाचें.

त्या दिवशीं तर अगदीं दारा-खिडक्यांतूनही लोक होते. टिळकांची बायको बोलणार म्हणून ज्याला-त्याला कुतूहल वाटत होतें. टिळकांना फार हौस कीं आपल्या बायकोनें कोणी तरी मोठें व्हावें. लेखिका, कवयित्री, वक्ती तिनें बनावें व ह्या दिशेनें ते नेहमीं प्रयत्न करीत. आधीं-आधीं त्यांना त्यांपैकीं पहिल्या दोन बाबतींत अगदींच निराश व्हावें लागलें, पण मग त्यांना माझ्याबद्दल फार आशा वाटूं लागली. असो. पण वक्ती बनण्याचा माझ्यावर हा पहिलाच प्रसंग होता. ज्या बाईनें दिवा लाविला नाहीं ती आवा पाहण्यास जाणार. ह्यापूर्वी भाषण करणें तर बाजूलाच राहिलें, पण मीं तें ऐकिलेंहि नव्हतें. एक राजनांदगांवला वक्तृत्व समारंभ झालेला मला प्रत्यक्ष माहीत, पण त्यांत मजकडे काम होतें स्वैंपाकिणीचें व वाढपिणीचें !

मला टिळकांनीं भाषण लिहून दिलें होतें व तें पाठ करून घेतलें होतें. किती तरी वेळां त्याची संथा दिली. रानांत दोघांनींच जाऊन मीं त्यांच्यापुढें तें मोठ्या स्वरांत पाठ म्हणून दाखविलें होतें. अशा रीतीनें तयारी तर अगदीं अवाढव्य झाली होती. प्रत्येक वक्त्याला दहा मिनिटें देण्यांत आलीं होतीं.

माझ्या आधीं दोन-चार भाषणें झाली होतीं. माझें नांव निघतांच मीहि मोठ्या ऐटीनें पुलपिटवर जाऊन उभी राहिलें. पुढें लोकांचा अफाट समुदाय पसरला होता. पहिल्याच बाकांवर अगदीं पुढें डॉ. ह्यूम व टिळक बसले होते. माझा पोषाख अगदीं होता तोच, म्हणजे नथ, बुगड्या, कुंकू, कासोट्याचें लुगडें असा थाट होता. ख्रिस्ती लोकांत स्त्रियांचा पोषाख ठरून गेलेला आहे. तेव्हां त्यांच्या डोळ्यांना हें एक निराळेंच दृश्य होतें. तशांत मी नुकतीच ख्रिस्ती झालेली.

असो. मी मोठ्या ऐटींत पुलपिटवर जाऊन उभी राहिलें खरी पण दहा मिनिटांतील नऊ मिनिटें माझ्या तोंडांतून एक शब्द उमटेना. एखाद्या ओंड्या-प्रमाणें मी उभी होतें व एखाद्या चित्राप्रमाणें श्रोतृसमूह बसला होता. माझ्यासाठीं कित्येकजण प्रार्थना करीत होते कीं, ‘ देवा, हिच्या तोंडून चार शब्द तरी निघूं देत. ’ कोणीं पाण्याचा पेला आणून ठेविला, कोणीं लवंगा आणून ठेविल्या. पण मला मुळीं कोरडच पडली नव्हती तर मी ह्यांचा उपयोग तरी कसा काय करणार ! कोणी मनांत म्हणत, ‘ हिच्या हातांत कागद आहेत ते तरी हिला वाचण्याची बुद्धि होवो. ’ दुसऱ्या हातांत रुमाल होता. पण तोहि तोंडाकडे जाईना. रुमालाची संवय नाहीं व कागद वाचण्याची आठवण नाहीं. माझ्या मागून आणखी बरींच भाषणें व्हावयाचीं होतीं तेव्हां डॉ. ह्यूम माझें आभार मानण्यासाठीं उभे राहिले. तितक्यांत मला वाचा फुटली. मी इतकी धडाधड व अस्खलित बोलूं लागलें कीं माझें भाषण ऐकून सर्व लोक चकित झाले. भाषण संपलें. पण मन म्हणे कांहीं तरी चुकून राहिलें. कागदावर डाग पडला होता तेथलें भाषण राहिल्यासारखें वाटतें. शेवटीं पाठ केल्याच्या बाहेरचें मी बोललें ! मोठें प्रसंगावधान राखलें ! मी म्हणालें, “ मला जें सांगायचें होतें तें मीं सांगून टाकलें. आतां ह्यांतील जें कांहीं सांगायचें राहिलें असेल तें आपले प्रिय मिस्टर टिळक सांगतील ! ”

आमचा भ्रमाचा भोंपळा फुटला. मी जागेवर येऊन बसलें. माझ्या जागीं पुलपिटवर टिळक दिसूं लागले. ते म्हणाले, ‘ मला सांगायचें हिनें कांहींच ठेवलें नाहीं. ’ घरीं आल्यावर मी त्यांच्यावर फार रागावलें. ते म्हणाले, ‘ पाण्यांत

उडी टाकल्यावांचून पोहतां येत नाहीं.' मी त्यांना सांगितलें इतःपर मीं कोठें बोलावें असें तुम्हांला वाटत असेल तर मी पाठ करून बोलणार नाहीं. मला माझ्या मनाला वाटेल तसें बोलेन. दुसऱ्याच्या लिहिण्यानें माझ्या मनाचा गोंधळ होतो. त्यानंतर आतांपर्यंत मी पुष्कळ वेळेला सभांमधून भाषणें केलीं पण कधीं लिहून पाठ करून केलीं नाहींत.

मला सभाधीट जर कोणीं केलें असेल तर तें ख्रिस्ती श्रोत्यांनीं. त्या दिवशीं माझ्या पहिल्या भाषणांत नऊ मिनिटें हा एवढा मोठा समाज जो इतका शांतपणें बसला होता त्यानेंच माझी भीड चेपली. ह्या समाजांतील श्रोत्यांची सभेंतील वागण्याची शिस्त कमालीची सहानुभूतीची व शान्ततेची असते.

महाबळेश्वराहून परत आल्यावर चार दिवस बालंटाईन साहेबांनीं आम्हांस राहुरीस बोलावलें. आम्ही तिकडे गेलों व तिकडेच आमचा बाप्तिस्मा झाला वगैरे माहिती मागें आलीच आहे. राहुरीला जातांना आम्ही स्टेशनवर जात असतां भिकूताईनें आमचा तांगा आपल्या बंगल्यांतून पडल्या पडल्या पाहिला. ताबडतोब तिनें आमच्यामागें आपला गडी पिटाळला, तो आमच्या तांग्यामागें पळत होता.

टिळकांनीं तिकिटें काढून आम्हांला डब्यांत नेऊन बसविलें व ते प्लॅटफॉर्मवर कोणाशीं बोलत उभे होते. इतक्यांत तो गडी डब्यांत आला व मला म्हणाला, 'बाईसाहेबांनीं सांगितलं आहे कीं आधीं माझे दोनशें रुपये काढा आणि मग पुढें पाऊल टाका.' हें ऐकून मला मेल्याहून मेल्यासारखें झालें. मजजवळ त्या वेळीं पैसे असते तर मीं ते ताबडतोब देऊन टाकले असते. पण दरिद्राणाम् मनोरथाः अशी आमची नेहमींची स्थिति. मीं टिळकांकडे पाहिलें. टिळक नुसते हसले. गाडी हलूं लागली. गड्यानें खालीं उडी टाकली. हो, त्याच्या धमकावणीचा उपयोग गाडीला ब्रेक्सारखा थोडाच होता?

आम्ही राहुरीहून परत आल्यावर टिळक आपल्या कामावर रूजू झाले. त्यांचें मुख्य काम होतें शिक्षकाचें. तेथें ईश्वरविद्येची शाळा होती तींत ते शिकवीत. विद्यार्थी मोठालीं कुटुंबवत्सल माणसें असायचीं. वर्गाचें काम कांहीं

महिने झाले, म्हणजे त्यांना दीर्घ काल सुटी मिळे व ते आपापल्या गांवीं जात. ह्या सुमाराला आमच्या घरीं त्यांना सहकुटुंब सहपरिवार फराळाचें आमंत्रण आम्ही देत असूं. आणि त्यांत माझी कामाची मोठी धांदल उडायची. ह्या वेळेस मीं खूप भजीं तळलीं आणि मला त्या गर्दीतच ताप भरला. आणि मग गोवर येऊन खूप आजारी पडलें.

आईच्या मागें माझी बहीण मला माझ्या आईच्याच जागीं होती. पण ती स्वभावानें जितकी प्रेमळ तितकी अभिमानी होती. पण गांवांतल्या गांवांत ती असून तिची माझी गांठ नव्हती. दत्तूच्या मुंजींत तिला पाहिली तेवढीच. 'तिला खोगीर द्या निजायला' हे जे नगराला आल्यावर तिच्या तोंडचे शब्द ऐकले तेवढेच. तिच्या मानी स्वभावाची व प्रेमळ स्वभावाची सांगड घालणें मोठें कठीण होतें. ह्या दोन वृत्तीचेंच तिच्या अंतःस्थ तुमुल युद्ध चालून तिला हें दुखणें आलें होतें.

नानासाहेबांचें मजवर मुलीप्रमाणें प्रेम होतें. मात्र भिकूताईमुळें त्यांनींहि आमचें नांव सोडून दिलें होतें, पण मला गोवर आला हें कळतांच नानासाहेबांना राहवेना. ते कोणाला न सांगतांच चोरून मला भेटायला आले. एकमेकांना पाहतांच आम्हां दोघांनाहि सुखदुःखाचे खूप हुंदके आले. ते बराच वेळ बसले. मीं त्यांना म्हटलें, 'माझी व माझ्या बहिणीची भेट करवा.' 'मावशी' तें शक्य नाहीं. तुझ्याविषयींच्या दुःखांत घारूमाईच्या चिंतेची सुपारी पडली आहे.'

माझ्या आठवणींत त्या वेळपर्यंत माझ्या बहिणीच्या आयुष्यांत तिला चिंता-काळज्या कधीं कराव्या लागल्या नव्हत्या. पण आतां एकसे दो भले असें झालें पाठची बहीण व पोटची मुलगी पण ह्याच दोन सुऱ्या तिच्या गळ्यावर ठेवण्यांत आल्या होत्या.

जांवयानें घरांत एक बाई आणली. पैसा कलालाच्या दुकानीं जाऊं लागला. नोकरी गेली. घारूला अत्यंत जाच होऊं लागला आणि त्यांच्या उदरंभरणा-साठीं नानासाहेबांना दरमहा बरीचशी ठराविक रक्कम पाठविणें भाग पडूं

लागले. इतकें करून पुन्हा मुलीला सुख नाहीं तें नाहींच. ह्या साऱ्या संकटांच्या भोवऱ्यांत सांपडून माझी बहीण अगदीं भांबावून गेली. मी नगरास आल्यावर ती आजारी पडली पण घरांतल्या घरांत फिरत तरी होती. पण माझ्या बाप्तिस्म्याचें वृत्त कानीं पडतांच तिनें अगदींच अंथरूण धरलें.

नानासाहेब घरीं गेले. गोवरांतून उठल्यावर एक दिवस मला नेण्यासाठीं त्यांच्याकडून तांगा आला. मी गेलें. घारूमाई माझी वाटच पहात बसली होती. आमच्या भेटींत उन्हापावसाला पूर्ण भरती आली. आमचें प्रेमच तसें होतें. मी मावशी व ती भाची. पण ह्या नात्याच्या प्रेमांत मैत्रीची भर पडली होती व तिच्या दुःखानें तर तिला आतां कोणी तरी अगदीं जवळचें पाहिजेच होतें. माझ्यावांचून पोटांतलें बोलण्यास तिला दुसरें कोणी नव्हतें. हसण्यावांचून व रडण्यावांचून त्या दिवशीं तरी आम्हांला दुसरें कांहींच करतां येईना. अशा स्थितींत पुष्कळ वेळ गेल्यावर ती आंतल्या खोलींत आपल्या आईकडे गेली व मी आल्याचें तिनें तिला सांगितलें. मी आल्याचें कळतांच भिकूताईनें भिंतकिडे तोंड फिरविलें. घारूमाईनें तिची फार मनधरणी केली पण ती कांहीं बोलेना. ती निजली होती त्या माडीवर दुसऱ्या दालनांत घारूनें मला नेलें. मीं तेथून डोकावून पाहिलें. मी काय पाहात होतें! नानासाहेबांनीं सांगितलें तें खरेंच होतें! ‘ तिचं उद्यांचं मरण तूं आजला ओढवून घेशील. ’ त्यांचे हे शब्द मला सारखे भेडसावूं लागले. मी पाऊल न वाजवतां तिच्याजवळ गेलें व हळूच तिच्याकडे डोकावून पाहूं लागलें. घारू तिला म्हणाली, ‘ मावशी आली आहे.’ पण तिनें तोंड वळविलें नाहीं. नुसतें जातांना एवढें म्हणाली, ‘ त्या महारणीच्या पदरांत टाका कांहीं तरी. ’

ते दिवाळीचे दिवस होते आणि आईनें सांगण्याच्या आधींच पाटीभर फटाके व बरेंचसें फराळाचें माझ्याबरोबर देण्यासाठीं घारूनें काढून ठेवलें होतें. तिनें परात भरून हें सारें माझ्या ओटींत टाकलें. मायेला लाज नसते. जिनें दोनशें रुपये मागण्यासाठीं स्टेशनवर गडी पाठविला होता तिनेंच महारणीला वाढायचा हुकूम केला होता.

आतां दर सणावाराला वाहून येऊं लागलें व मी जवळ जवळ दररोज भिकूताईकडे जाऊं लागलें. दत्तूहि माझ्याबरोबर येत असे. हौशीहि कधीं कधीं येई. एक दिवस दत्तू एकटाच तिच्या खोलींत होता. तिनें आपलें आमच्यावरील प्रेम उडालें असल्याचें दाखविण्याचे आटोकाट प्रयत्न केले तरी शेवटीं खरें तें त्या वेळीं बाहेर आलें. त्याला एकट्याला पाहून ती म्हणाली,

'ये बाळ माझ्याजवळ' तो जवळ गेला. 'आणखी जवळ ये.' तिनें आपलें पांघरूण वर केलें व म्हटलें, 'ये माझ्या पोटाशीं चिकटून नीज.'

'पण मावशी, तुला माझा विटाळ होईल.'

'होऊं दे झाला तर' असें म्हणून तिनें त्याला आपल्या पोटाशीं घट्ट धरलें. मी मधल्या दारांतून हें पाहत होतें. आम्ही दोघींहि ढसढसां रडलों. पण तिनें मला पाहिलें नाहीं.

'दत्तू, तूं आणि हौशी मला रोज भेटायला येत जा, तुझी आई नाहीं आली तरी चालेल.'

'येऊं बरं मावशी.'

आणि त्यानंतर हीं दोघें रोज तिला भेटायला जाऊं लागलीं.

पुढें पुढें मीहि तिला डोळ्यांपुढें खपूं लागलें. आणखी कांहीं दिवसांनीं तर मी आलें नाहीं म्हणजे तिचा जीव कासावीस होई. पडल्या पडल्या मनी केव्हां येईल म्हणून खिडकींतून ती सारखी बाहेर पाहत राही. मी आतां कधीं कधीं रात्रंदिवस सुद्धां तिच्याकडे राहूं लागलें. टिळकहि रोज येऊन तिला भेटत.

ज्या बहिणीला खोगीर देण्यास तिनें सांगितलें होतें त्याच बहिणीला आतां कोणी नुसतें जाजम निजायला दिलें तर तें तिला खपेनासें झालें. ती म्हणे, कां? ती का वाटेवरची चोर आहे? तिला चांगला बिछाना द्या निजायला. माझ्याविषयीं कोणी कांहीं बोललें तर तिला फार वाईट वाटे. ती त्याची चांगली खरमरीत हजेरी घेई. एक बाई एक दिवस म्हणाली, कां, इतकें करून शेवटीं बहीण निघून गेली ना? तिनें चटकन तिला गप्प केलें. निघून गेली म्हणजे कोणाचा हात धरून गेली का काय माझी बहीण?

बेबीला मी तिच्याकडे घेऊन जात असें. तिचेंहि ती कौतुक करी. एक दिवस तिला तिनें उचलून घेतलें. 'किती ग जड आहे तुझी पोरगी. मला उचलत नाहीं.'

पण खरी गोष्ट म्हणजे तीच फार क्षीण झाली होती. तिला पोरीला उचलून घेणें तिच्या शक्तीबाहेरचें काम होतें. माझ्याबद्दल पुढें पुढें तिच्या मनांत कांहींहि किल्मीष राहिलें नाहीं. ती म्हणे, 'मने, फार उत्तम झालें तूं गेलीस. आतां माझी एक मोठी काळजी दूर झाली.' टिळक आतां पहिल्यासारखे अस्थिर राहिले नव्हते तेव्हां तिला आमच्या नव्या संसाराकडे पाहून आनंद होई. माझ्याबद्दल मनांत आतां कांहीं राहिलें नाहीं. तरी एक गोष्ट मात्र परत मिळाली नाहीं. ती तिची सुदृढ प्रकृति. ती अधिकाधिक क्षीण होत चालली. शेवटीं तिला आपल्या जन्मभूमीला तरी बरें वाटेल म्हणून तिला नाशकाला नेण्याचें ठरलें. मी स्टेशनवर तिला पोंचवायला गेलें होतें. तेव्हां तिनें हेच उद्गार काढले कीं, मने, फार चांगलें केलेंस, तूं आपल्या नवऱ्याकडे गेलीस.

उन्हाळा आला. टिळकांच्या महाबळेश्वरच्या वारींचे दिवस आले. परंतु ह्या वर्षी महाबळेश्वरला न जाण्याचें त्यांनीं ठरविलें. कारण त्यांच्यापुढें कामाचे डोंगर पडले होते. काम मिशनचें नव्हतें तर लोकांचें होतें. दुष्काळामुळें लोकांचें धंदे अजिबात बुडाले होते. त्यांना साह्य करण्याच्या खटपटींत ते गुंतले होते. कोणाला तगाई मिळवून दे, कोणाला माग घेऊन दे. कोणाला कपडा वाट. आणि हा सर्व पैसा त्यांनीं स्वतः दारोदार हिंडून मिळविला होता. त्यांचें काम पाहून सरकारांतूनहि त्यांना कांहीं साह्य मिळालें होतें. कोमटी, भाजीवाल्या वगैरेंना चार, सहा, दहापर्यंत रुपये देऊन त्यांचे धंदे त्यांनीं उभे केले. त्यांच्याकडे लुगडीं वांटण्याचेंहि काम होतें. ह्यांत एक एक बाई रोज रोज निरनिराळ्या पेहरावानें येऊन चार चार लुगडीं उपटूं लागल्याचें निदर्शनास आल्यानें बायांचीं जुनीं लुगडीं ठेवून घेण्याचें काम मजकडे आलें. पैशाचें व कपड्याचें हें जोखमीचें काम टिळकांच्या अंगावर पडल्यानें व त्यांना पैसा नीट संभाळतां येत नाहीं अशी माझी ठाम समजूत असल्यानें मी बनलें होतें खजिनदार व त्यामुळें मलाहि घर सोडतां येईनासें झालें. ह्या भयंकर दिव्यांतून

बाहेर पडायला तीन चार महिने लागले. ह्या अवधींत मला बहिणीकडे जाण्यास मुळींच झालें नाहीं. पुढें ती नाशकाला गेली पण त्यापुढें कांहीं कळेना. दुष्काळ मवाळ होऊं लागतांच माझ्या बहिणीची काळजी माझ्या मनांत जहाल होऊं लागली. टिळकांकडून मी पत्रांवर पत्रें टाकूं लागलें. पण पेंडशांचें कांहीं उत्तर येईना. जो भेटे त्याला मी वेड्यासारखें माझ्या बहिणीसंबंधीं विचारी. एक दिवस एक गृहस्थ सहज आमच्याकडे आले असतां अशीच विचारपूस केली. ते म्हणाले, 'तुम्हांला माहीत नाहीं का?' 'नाहीं. काय आहे? मला तिची फार काळजी लागून राहिली आहे?' 'अहो, त्यांना तर दहा बारा दिवस झाले आतां!'

माझे हात पाय गळाले. मजवर वज्राघात झाला. माझ्यामुळें भिकूताईला कष्ट, आजार व शेवटीं मृत्यु आला; तेव्हां मला ती बातमी ऐकून काय वाटलें असेल ह्याची शब्दापेक्षां कल्पनेनेंच चांगली जाणीव होईल.

टिळकांनीं पेंडशांना तार केली. तिचें उत्तर पत्रानें आलें. 'माझी रजा संपली. मी दोन तीन दिवसांत येतों. नाशकाला कर्मठपणा अधिक म्हणून मुद्दाम मनीला आधीं कळविलें नव्हतें. कळविलें असतें आणि ही उठून नाशकाला आली असती तर त्या दुःखाच्या प्रसंगांत हिच्या शिवाशिवीचा आणखी गोंधळ.'

पेंडसे परत आले. त्यांना मी भेटायला गेलें. एकमेकांना पाहून आम्हांला जें काय वाटलें तें वर्णन करून सांगतांच येणें शक्य नाहीं.

पेंडशांना जेवायला दुसरीकडे जायचें होतें पण ते मला जेवल्यावांचून परत घरीं जाऊं देईनात. 'मावशी, तुझा मेहुणा वारला व बहीण जिवंत आहे असें समज. मी तुला मुळींच अंतर देणार नाहीं.' असें म्हणून ते माझें जेवण होईपर्यंत मजजवळ बसून राहिले.

* * *

त्या वर्षी आमची महाबळेश्वरची वारी चुकली. कारण आमची बेबी तान्ही होती. आठ महिन्यांच्या बेबीला महाबळेश्वरची थंडी व नगरचा उन्हाळा सोसला नसता म्हणून आम्हीं मधला मार्ग शोधून काढला व वाईला जाण्याचें ठरविलें. वाईला आशम्माबाई होत्याच. त्यांनीं आमच्यासाठीं घर, नोकर,

दूधवाला वगैरे सर्व कांहीं ठरवून ठेवलें.

एक दिवस एक बाई आली. ख्रिस्ती लोकांत आतां मीं एक वर्षावर दिवस काढले असल्यानें त्या समाजांतील पुष्कळ रीति-रिवाज माझ्या ध्यानांत आले होते. बाई आल्याबरोबर मीं उठून तिचें स्वागत केलें. शेकहँड करण्यासाठीं हात पुढें केला. खुर्ची पुढें सारली, पण बाईनें आपला हात पुढें केला नाहीं कीं ती घरांत आली नाहीं. तिनें विचारलें, 'साहेब कोठें आहेत?' मी म्हणालें, 'ते बाहेर गेले आहेत.' 'त्यांनीं मला कामाला बोलाविलें आहे.'

मी म्हणालें, 'आमच्या येथें कांहीं काम नाहीं.' मला मनांत मोठें आश्चर्य वाटलें. ही बाई काय काम करणार? घरांतील कामाला दोन माणसें आम्हीं नगरहूनच आणिलीं होतीं. बाई गेली.

मला फार आश्चर्य वाटलें. बाई काय विचित्र आहे! घरांत आली नाहीं. शेकहँड केला नाहीं. तिच्या अंगावर दागिने किती! सरी, पाटल्या, पुतळ्यांची माळ, नाका-कानांतलें, नेसूं लुगडें चांगलें पंधरा-वीस रुपयांचें! ही बाई आमच्या घरीं काम तरी काय करणार? असेल कांही लिहिण्याचें काम अशी मीं मनाची समजूत करून घेतली.

संध्याकाळीं टिळक आल्यावर विचारूं लागले, 'भंगीण आली होती का? मुलींचे मळीण कपडे धुवायला तिला मीं उद्यांपासून बोलावलें आहे.' माझ्या भ्रमाचा भोंपळा फुटला.

"ती भंगीण का होती?"

"हो. कां?"

"मीं तिला बसायला खुर्ची दिली. अन् शेकहँडकरतां हात पुढें केला. पण ती आपली गप्पच. मोकळें लुगडें नेसली असल्यामुळें ती कोणी ख्रिस्तीच बाई असावी असें मला वाटलें. बरें, हातांत मोहोरेची आंगठी पाहून बाई हिंदु वाटे. म्हणून माझा असा घोटाळा झाला."

"तुला असें का वाटतें कीं फक्त तुझेच लोक तेवढे स्वच्छ राहतात!"

दुसऱ्या दिवसापासून ती कामाला येऊं लागली. आंगण झाडणें, मुलांचे

मळीण कपडे धुऊन आणणें वगैरे कामेंहि ती करूं लागली. मी एक दिवस तिला विचारलें,

" काय ग, तूं इतकी स्वच्छ अन् नीट-नेटकी दिसतेस, तसें तुझें घर आहे का स्वच्छ ? "

"बाई,अशाच चलतां का माझ्या घरीं? नाहीं तर तुम्ही म्हणाल, मीं आधीं झाडून-सारवून मग तुम्हांला दाखवतें. चला अशाच्या अशाच. "

मी तिला घेऊन तिच्या घरीं गेलें.

ती वस्ती कोणत्या लोकांची होती ह्याची मीं चौकशी केली नाहीं. पण तेथील घरें-दारें व रस्ता अगदीं स्वच्छ होता. तिच्या घराचे दरवाजे मोठे होते. आंतमध्यें ताट-वाट्या, पाणी पिण्याचीं भांडीं अगदीं चकचकीत होतीं. घरांत केर-पोतेरें केलेलें, भांड्यांचीं बुडें घेतलेलीं, अंगणांत सडा टाकलेला, दारीं तुळशीवृंदावन. हें सारें पाहून मी आश्चर्यानें थक्कच झालें. स्वच्छता व टापटीप हीं जातीपेक्षां व्यक्तीवर आहेत असें जें माझें मत होत होतें तें आतां अधिक दृढ झालें.

ह्या क्षेत्राच्या ठिकाणीं कोयना-कृष्णांचा संगम होतो. तसें माझें झालें. मी त्या भंगिणीच्या गळ्यांत मिठी मारून विचारलें, " कां ग, तुम्ही आमच्या हातचें कां खात नाहीं ? " ती म्हणाली, ' बाई, आमची जात नांवें ठेवते. ' मी म्हणालें, ' आतां तूं माझें घर पाहिलें आहेस. मलाहि पाहिलें आहेस, आतां हरकत नाहीं. ' ती म्हणाली, ' बाई, माझ्या हातचें खाल तुम्ही ? ' मी म्हणालें, ' हो, काय झालें ? '

झालें. म्हटल्याप्रमाणें त्या भंगिणीनें फराळाचें करून आणिलें. टिळक महाबळेश्वराला डॉ. ह्यूमना भेटावयाला गेले होते. मीं तें फराळाचें घेतलें. घरांतील चाकर-नोकर कुरकुर करूं लागले. मीं त्यांना सांगितलें, ' तुम्हांला नको असेल तर माझा कांहीं आग्रह नाहीं. मी न् माझीं मुलें खाऊं. ' आणि दत्तू, हौशी व मी आम्हीं तिघांनीं तें फराळाचें खाल्लें. आपल्या हातचें ह्या बाईनें इतक्या प्रेमानें खाल्लें म्हणून भंगिणीलाहि फार आनंद झाला.

टिळक दुसऱ्या दिवशीं परत आले. त्यांना हें कळलें तेव्हां ते म्हणाले, " तूं तर माझ्याहि पुढें गेलीस ! "

* * *

वाईहून परत आल्यावर मीं हौशीसारखीच आणखी एक मुलगी घेतली. आतां आमचा संसार पुष्कळच वाढला. हौशी, दया, तारा, बेबी आणि दत्तू इतकीं मुलें घरांत होतीं.

दुष्काळानें आतां अतिशय उग्र स्वरुप धारण केलें. त्यांतच मिशनाला कांहीं तूट आली कीं कांहीं तरी होऊन त्यांनीं बावीस मुलें बोर्डिंगांतून काढून टाकलीं. टिळकांना ही बातमी कळतांच त्यांचें अंतःकरण कळवळलें. ते मजकडे आले आणि म्हणाले, मिशननें अशीं अशीं बावीस मुलें काढून टाकलीं आहेत. तीं अन्नअन्न करून मरतील. आतां काय करावें ?

त्या दिवशीं आमच्याजवळ शिल्लक सव्वा रुपया व घरांत सांठवणींत सव्वा शेर ज्वारी होती. पण आमची मोठ्यांत मोठी शिल्लक म्हणजे देवावरचा विश्वास, ही अगदीं भरपूर होती. आम्हीं दोघांनीं जमिनीवर आपलीं मस्तकें ठेवून मनोभावें परमेश्वराची प्रार्थना केली. नंतर दोघांनीं एकमेकांना वचन दिलें कीं आपलें अन्न व ह्या मुलांचें अन्न ह्यांत कांहींच फरक करायचा नाहीं. जी काय ज्वारी बाजरीची भाकरी मुलांना मिळेल तीच आपणहि खायची व मुलांना घरीं घेऊन यायचें.

दत्तूला बोलावून आम्हीं आमच्याजवळ घेतला. त्याला सांगितलें, ' बाळ, पाहा तुझे भाऊ आज उपाशी रानावनांत फिरत आहेत. आम्ही त्यांना आपल्या घरीं आणणार आहों. ते जें खातील तें तुला खावें लागेल. खाशील ना ? ' दत्तू म्हणाला, ' हो, मी त्यांच्याबरोबर जेवीन, खाईन, भांडणार नाहीं ' आणि पुढें मुलें आणल्यावर तीं जाईपर्यंत तीं खात तेंच अन्न दत्तूनें खाल्लें व आपलें वचन पाळलें.

मुलें आलीं. आतां आमच्यापुढें मोठा प्रश्न येऊन उभा राहिला तो हौशी व दया ह्यांचा. त्यांना कोठें ठेवायचें ! पुण्यास टिळकांनीं सुंदराबाई

पोवार ह्यांना मुली शाळेंत घेतां का म्हणून विचारलें व त्यांनीं तावडतोब मुलींना पाठवून देण्याचें उलट डाकेनें कळविलें. दोन्ही मुली तावडतोब पुण्यास रवाना झाल्या व मुलगे घरीं आले. ह्याच सुमाराला खारें करजुण्याला भिक्याला टिळकांनीं घेतलें.

भिक्या फार लहान होता. तो सर्वांना फार आवडे. त्याचा आपण एक शास्त्रीबोवा बनवूं असें टिळक म्हणत. पण तो अत्यंत मठ्ठ होता. त्याच्या मठ्ठपणाला कंटाळून टिळक रोज त्याला बडवीत. त्याला रामः रामौहि म्हणतां येत नसे. रोज पहांटे चार पांचला उठवून टिळकांनीं त्याला संथा द्यावी पण कांहीं उपयोग होत नसे.

दुष्काळाचें स्वरूप आतां अधिकच भीषण दिसूं लागलें. खायला अन्न नाहीं तर नाहीं पण पिण्यास पाणी मिळण्याची पंचाइत पडूं लागली. १८९५ पासून टिळकांच्या ठरलेल्या नोकर माणसांपैकींच एक पखालवाला भिस्ती होता. त्यानें सांगितलें, 'मी बाजारांत रुपयाला एक पखाल विकतों तरी तुम्हांला नेहमीच्या भावानें देईन. मात्र मला सवडीप्रमाणें पाणी देण्याची सवलत द्या.' तो रात्रीं एक दोनला पाणी आणूं लागला. मागील दाराला कुलूप लावून त्याची किल्ली आम्हीं पखालवाल्याला देऊन ठेवली होती. तो अगदीं विश्वासानें दोन पखाली तोंडों तोंड भरून आणून घरांत पाणी सांठवून ठेवी. घरांतील सारीं भांडीं–अगदीं पाणी पिण्याच्या भांड्यांपर्यंत–तो भरून ठेवी. उधार खात्यामुळें, ह्या पखालीच्या सुखसोयीमुळें व टिळकांच्या उदार अंतःकरणामुळें बाहेरचा एवढा मोठा दुष्काळ घरांत कधींच कोणाला भासला नाहीं.

टिळकांनीं ह्या बावीस मुलांपैकीं कांहींना शाळेंत घातलें, कांहींना छापखान्यांत लावून दिलें व कांहींना असेंच दुसरीकडे कांहीं कामें शिकण्यासाठीं पाठविलें. मुलें आतां त्यांच्या नवीन परिस्थितींत अधिक आनंदांत व समाधानांत राहूं लागल्यानें चांगलीं दिसूं लागलीं. हीं मुलें आमच्याकडे फारच चांगलीं राहिलीं. त्यांनीं कधीं चोरी-लबाडी केली नाहीं. त्यांच्यांतच दत्तू होता.

कामाला दोन बाया होत्या. पण त्यांना सारें काम आटपत नसे. मी

त्यांच्या बरोबरीनें काम करी. पण दळणाचा फार त्रास होऊं लागला. बाहेर दळण्यास द्यावें तर तितका खर्च वाढतो. तेव्हां आमच्या मुलांची मीं सभा बोलावली व तिच्यापुढें हा प्रश्न ठेवला. आणखी एक बाई कामाला ठेवावी लागेल. म्हणजे तुमच्यांतला एक मुलगा काढावा लागेल. दळण तर आम्हांला आटपत नाहीं. आपल्याला रोजचें तीन पायल्याचें पीठ लागतें. तेव्हां बाई ठेवायची नसली तर लहान मुलांनीं एक पायली दळावें व मोठ्या मुलांनीं आम्हांला दोन पायल्या दळूं लागावें. हें म्हणणें मुलांना पटलें. तितकाच आमचा खर्च वांचला. कधीं मुलें आजारी पडलीं तर त्यांचे मळीण कपडे धुण्याचें काम मी करीं. कारण भंगीण आणली तर तिला पैसा द्यावा लागणार. तोच आमच्या भाजीला झाला.

मुलांचा व आमचा संसार अशा रीतीनें फार प्रेमाचा व सुखासमाधानाचा चालला असतां मध्येंच एक संकट आलें. माझी जशी टिळकांच्या बाबतींत पैशासंबंधीं तक्रार होती, तशी डॉ. ह्यूम ह्यांची आम्हा दोघांसंबंधीं व विशेषतः माझ्यासंबंधीं होती. त्यांना वाटे मी व्यर्थ पैसे उडवितें व टिळकांच्या संसारासंबंधीं मला जशी इतके दिवस काळजी कळकळ वाटे तशी आमच्या दोघांच्या संसारासंबंधीं डॉ. ह्यूम ह्यांना वाटे. आम्हीं मुलें संभाळलेलीं त्यांना मुळींच आवडलीं नाहींत. त्यांचेंहि बरोबरच होतें. दर महिन्याला अगदीं पहिल्या तारखेलाच पुढच्याहि महिन्याचा पगार संपलेला असे. इतकी पैशाची ओढाताण करून आम्ही परोपकार करीत बसणें म्हणजे शेवटीं आपल्याकडे अडचणी घेऊन येणें असें त्यांना वाटे. अर्थात् हें सर्व टिळकांवरील त्यांच्या निष्कपट प्रेमामुळें होतें. तेव्हां आमच्या संसारांत त्यांनीं केलेल्या ढवळाढवळीबद्दल आम्हांला त्यांचा राग येई तरी तो फार वेळ टिकत नसे.

डॉ. ह्यूमचें आतां टुमणें सुरू झालें कीं हीं मुलें सोडून द्या. तुमचा पगारच तुम्हांला तुमच्या संसाराला पुरत नाहीं. आम्हीं म्हणावें आम्ही सोडणार नाहीं. जोंपर्यंत त्यांची व्यवस्था लागत नाहीं तोंपर्यंत आम्ही त्यांना संभाळणार.

“ आतां भावा, पण तुम्हांला खर्च फार होतो आहे.”

"आम्हांला जो पैसा मिळतो तो आमचेच चोचले करून घेण्यासाठीं मिळत नाहीं. देवानें त्यांत पुष्कळांचा वांटा ठेवला आहे."

"पण भावा, तुमची अडचण होईल."

मीं म्हटलें, "साहेब, असं कसं हो तुम्ही म्हणतां ! आई खाऊं देईना न् बाप भीक मागूं देईना !"

"आतां बहिणी, तुम्ही काय म्हणतां तें मला समजलं नाहीं."

"मी म्हणतें तुम्ही त्यांची व्यवस्था करीत नाहीं व आम्हांला त्यांना संभाळूं देत नाहीं हा काय न्याय झाला ?"

"बरं भावा, आतां मी जातों. तुम्ही ह्या गोष्टीचा चांगला विचार करा. मीहि करतों" असें म्हणून ह्यूमसाहेब निघून गेले.

आम्हीं खूप विचार केला. टिळक म्हणाले, "आमचे लोक ह्या मिशनरींनीं किती दुबळे करून ठेवले आहेत. जसा कांहीं साह्य करण्याचा मक्ता मिशनरींनींच घेतला आहे. कोणाला साह्य करावयाचें झालें कीं दाखीव मिशनरीचा बंगला. संपलं. तितकंच आपल्या ह्या ख्रिस्ती लोकांचं साह्य. ही त्यांना सवयच लागून गेली आहे. कांहीं झालं तरी मुलांची चांगली सोय होईपर्यंत त्यांना सोडायचं नाहीं."

हो-नाहीं करतां-करतां अकरा महिने आम्हीं तीं मुलें संभाळलीं. मला आतां मुलें संभाळण्याचें जसें कांहीं वेडच लागलें होतें. मी ह्या मोठ्या मुलांच्या गडबडींत दोन महिन्यांचा एक मुलगा व एक पंधरा दिवसांचा मुलगा संभाळला. बेबी लहानच होती. ह्या तीन मुलांच्या पाळण्याच्या दोऱ्या व दुधाच्या बाटल्या सारख्या माझ्या हातांत असत.

डॉ. ह्यूम येऊन माझ्यापुढें उलथी टोपी घेऊन उभे राहत. 'आतां बहिणी, माझ्या ह्या टोपींत तुमचीं मुलं टाका. मला भीक घाला.' मीं म्हणावें, 'देत नाहीं.' हा रोजचा फार्स व्हायचा. कंपाउंडच्या बाहेरूनच 'भय काय आहे तया ज्याचा प्रभू रे' असें शब्दांची उलटपालट केलेलें टिळकांनीं रचलेलें भजन ऐकूं आलें, कीं मी समजें साहेब आले.

एक दिवस अगदीं कंटाळून डॉ. ह्यूम म्हणाले, ' पाहा भावा, तुम्हीं अशी मुलं संभाळतां, तुमची पैशाची अडचण होते, शेवटीं ह्यावरून तुमचं भांडण होईल नि मग माझ्या बंगल्यावर याल तें घेऊन. '

मी म्हणालें, ' साहेब, आमचं लग्न नाहीं तुमच्या बंगल्यावर ठरलं! तेव्हां भांडणहि तोडण्याची यातायात आम्ही तुम्हांला देणार नाहीं. '

" आतां बहिणी, मी तुमच्यासाठीं काय करूं ? "

" साहेब, आमच्यासाठीं परमेश्वराजवळ प्रार्थना करा. "

हीं मुलें मुलांच्या डॉर्मेटरींतून निघालीं होतीं. एक दिवस डॉ. ह्यूमसाहेबांचें पत्र आलें कीं, तुमच्या साऱ्या मुलांची मीं माझ्या बोर्डिंगमध्यें व्यवस्था केली आहे. ती डॉर्मेटरीमध्यें जाणार नाहींत व पुन्हा तेथून त्यांना निघण्याचें भय नाहीं व माझ्या येथून मी त्यांना काढणार नाहीं.

पत्र आलें तेव्हां आम्हां दोघांना फार वाईट वाटलें. आनंदहि झाला होता. मुलें जाणार म्हणून दुःख व त्यांची चांगली व्यवस्था लागली म्हणून आनंद झाला.

त्या दिवशीं मुलें जाणार म्हणून त्यांच्यासाठीं केशरी भात केला. मध्यरात्र उलटून जाईपर्यंत आम्ही सगळीं बोलत बसलों होतों. बोलतां बोलतां आमच्या सगळ्यांच्याच भेटीला गंगायमुना येत होत्या. शेवटीं टिळकांनीं प्रार्थना केली व आम्ही सगळे आपापल्या बिछान्यावर जाऊन पडलों. आमचें हें एक मोठें थोरलें कुटुंब दुसऱ्या दिवशीं मोडायचें होतें. सर्वांना एकमेकांचा लळा लागला होता.

मुलांमुळें आम्हांला पांचशें रुपये कर्ज झालें होतें. त्याचा हिशेब त्याच दिवशीं केला होता. टिळक म्हणाले, ' मुलांनो, तुमच्यासाठीं पुष्कळच कर्ज झालं असेल अशी माझी कल्पना होती पण देवाच्या दयेनें कांहीं विशेष कर्ज झालं नाहीं. अवघे पांचशेंच रुपये कर्ज झालं. आम्हीं हें सारं अगदीं निरिच्छ बुद्धीनें केलं आहे व परमेश्वर खात्रीनें हें फेडण्यास आमचं साह्य करील.' आणि खरोखरच टिळकांच्या विश्वासाप्रमाणें झालें. दुसऱ्याच दिवशीं कोणीं

अमेरिकन गृहस्थानें टिळकांना ५०० रुपयांचा चेक पाठविला. मुलांचें पाऊल बाहेर पडण्याच्या आधींच कापडवाला व दाणेवाला ह्यांचे पैसे चुकते करून आम्हीं ऋणमुक्त झालों. मुलें गेलीं. कर्ज फिटलें.

* * *

नगरांतील तो दुसरा प्लेग. उंदरांनीं जाहीरनामे फडकावले. टोंचणी सुरू झाली. लोक नगर सोडूं लागले. टिळकांनीं दत्तूला राहुरीस एका मित्राकडे नेऊन सोडलें. इतक्यांत बेबी नाचूं लागली. तिला खूप ताप भरला, टिळक टोचणीच्या विरुद्ध होते, पण ते राहुरीला गेल्यावर बेबीखेरीज आम्ही सगळ्यांनीं टोचून घेतलें.

टोंचणी नवीनच होती. लोकांना संवय नव्हती. आमजे सर्वांचें हात सुजून आम्हांला तापहि आला होता. त्यांत बिन टोंचलेलीं बेबीच होती. तिचें खाणें पिणें सगळें आमच्यांतच होत असे. एक दिवस तापांतच तिच्या बिछान्यावर एक प्लेगचा उंदीर फिरूं लागला व तेथेंच उशागतीं पडून तो मेला. मी बाहेर गेलें होतें.

घरीं आलें तों सगुणाबाई सांगूं लागली कीं बेबी धांवत सुटते व म्हणते, ‘मला देवळांत न्या व चांगले कपडे घाला.’ पाहातें तों तिला भयंकर ताप भरलेला ! कांहीं विचारावें तों ती बोलेना.

गडी औषध आणायला गेला तो तिकडेच पळाला. घरांत पैसे मुळींच नव्हते. शेजाऱ्याला बोलावून त्याच्याजवळ मोहोरेची आंगठी मोडायला दिली. तो तसाच हात हालवीत परत आला व सांगूं लागला कीं, कोणी सोन्याबद्दल बोलायला तयार नाहीं. जो तो म्हणतो आम्हीं आपला जीव घेऊन पळायचें का सोनें खरेदी करीत बसायचें. झालें. सरज्याची धांव कुंपणापर्यंत. इतक्यांत कुंपणापलीकडे एक माणूस झपझप पावलें उचलून चाललेला मीं पाहिला. बेबीला प्लेग झाल्याचें जिकडे तिकडे झालें होतें. त्यामुळें आमच्या घरीं कोणी फिरकत नव्हतें. ह्या गृहस्थाला मीं कधीं तीन रुपये उसने दिले होते. मी धांवत धांवत कंपाउंडच्या भिंतीशीं येऊन त्याला थांबविलें. त्याच्याजवळ

माझे तीन रुपये मागितले ! त्यानें पटकन् पांचांची एक नोट काढून माझ्या हवालीं केली व तो तेथून चटकन निघून गेला. मला तरी दुसरें काय पाहिजे होतें ?

बारा वाजतां टिळक राहुरीहून परत आले. त्यांना ही हकीगत समजल्यावर ते म्हणाले, ' कोणी आपल्याला येथून जा म्हणायच्या आधीं आपणच गेलेलें बरें. ' आम्हीं प्रार्थना केली, टिळक म्हणाले, ' ह्यांतहि परमेश्वराची कांहीं विशेष योजना आहे. '

प्लेग कँपमध्यें जाण्याचें आमचें ठरलें; तेथें व्यवस्था करायला टिळक पुढें गेले.

मी जशी कांहीं कोठें परगांवींच हवा बदलायला निघालें होतें. पाट्या-वरवंट्यापासून सर्व सामानाची एक गाडी भरून ' सेग्रिगेशन कँपवर ' ती पाठवून दिली ! इतकें करतां करतां चाराचा सुमार झाला. सगुणाबाईला तांगा आण-ण्यास पाठविलें. पण तांगा कांहीं मिळेना. इतक्यांत सामानाची गाडी परत आली ! इतकें सामान तेथें ठेवूं देत नाहींत. बेताचें काढून घेतलें व बाकीचें परत पाठविलें. पुन्हा सामान उतरून आवरून ठेवावें लागलें.

अंधार पडला. टिळक कंदील लावून कँपमध्येंच कांहीं लिहीत बसले. आम्हीं गाड्यांची वाट पाहात होतों. सगुणाबाईला मीं म्हटलें, ' सगुणाबाई, गडी पळून गेला आहे, तुला जर भीति वाटत असली तर तूं आपली जा. ' ती म्हणाली, 'बाई, मरण कांहीं कुणाला चुकत नाहीं. पण दुष्काळांत तुम्हीं जो मला नि माझ्या मुलीला आसरा दिला तो माझ्या स्मरणांतून जाणार नाहीं. मी कशी बरं बेमान होईन ? ' एका अडाणी बाईचें केवढें मोठें मन हें ! आम्हीं संभाळ-लेल्या मुलांच्या कानांवर जेव्हां आमची अडचण गेली तेव्हां तीं म्हाणालीं, ' दुष्काळांत ज्यांनीं आपल्या तोंडचा घास आपल्याला काढून दिला त्यांच्यावर हा प्रसंग आहे. आपण त्यांच्या साह्याला धांवून गेलं पाहिजे. ' असें ठरवून तीं बोर्डिंग मास्तरांनीं परवानगी नाकारली तरी आमच्या साह्याला धांवून आलीं. आम्हीं प्लेग कँपांत रात्रीं अंधारगुडुप झाल्यावर पोंचलों. डॉक्टरांनीं बेबीला

तपासलें. तिला १०५ डिग्री ताप होता. 'बाई, तुम्ही मुलीजवळ राहूं नका, तुम्हांला प्लेग होईल. ही बाई बसेल.' मी म्हणालें, 'कां ? ती कुणाजवळ बसली होती म्हणून तिला हा प्लेग झाला ? आणि दुसरीकडे मी राहिलें तर मला कशावरून होणार नाहीं ? आणि मीं जर हिला सोडून दूर राहायचं तर ह्या कामाच्या बाईनें काय म्हणून तिच्याजवळ राहावं ?'

डॉक्टर गप्प झाले. मुलें व दया गेली. झोंपडींत मी, सगुणाबाई व बेबी होतों. टिळकांनीं त्या मंडळीला खाण्यास नेऊन दिलें व कांहीं आम्हांला आणून दिलें. पण कशाचें तें खाणें आणि कशाचें पिणें ! पौषाचा महिना. कडाक्याची थंडी. सकाळची वाळलेली भाकरी व तेथील खापराच्या घागरींतील बर्फासारखें थंडगार पाणी. मनांत नाना प्रकारच्या काळज्या. गाडीला दोन रुपये दिले. आतां जवळ एक कवडी नाहीं. झोपडीच्या खालीं व वर हात हात जागा मोकळी. त्यांतून भरभर वारे वहात. काय तर म्हणे हें 'व्हेंटिलेशन.' झोपड्या सर्व पत्र्याच्या. रात्रींतून त्या इतक्या थंडगार व्हायच्या कीं आंतील रोग्यांना व निरोग्यांना सर्वांनाच खरोखरचें थंड होण्याची पाळी यायची. तीन बाजूंस आजारी लोक. त्यांचें ओरडणें, पत्रे वाजविणें, इतकेंच नाहीं तर एखादा रोगी पत्र्यावर चढून धपकन दुसऱ्या खोलींत उडी मारायचा. खालीं जमीन केलेली नाहीं. जमिनीवरील गाटेगोटे पायांना बोचायचे. पोटांत अन्न नाहीं, डोळ्यांना झोंप नाहीं. मुलीच्या आरोळ्या चाललेल्या. मला वाटलें खरोखर जर यमपुरी कोठें असेल तर ती येथेंच आहे. ती जागा भेसूर, ती रात्र भेसूर. भोंवतालची परिस्थिति भेसूर आणि तिनें बनविलेलें स्वतःचें मन भेसूर ! रोग्यांबरोबर त्यांचीं माणसेंहि ओरडत व भांडत. अहो तुमचा रोगी फार ओरडतो त्याला गप्प करा. आमच्या रोग्याचा आत्तांशा कोठें डोळा लागला आहे. कोणी खरेंच आजारी तर कोणी घाबरूनच ओरडायला लागलेले.

दुसऱ्या दिवशीं डॉक्टर आले तेव्हा मी त्यांना म्हणालें, 'अहो डॉक्टर, तुम्ही आपले रात्रीं स्वस्थ घरीं जाऊन निजतां पण इथें काय चाललेलं असतं त्याची तुम्हांला कांहीं कल्पना आहे का ?' त्यांना मीं सर्व चित्र वर्णन करून

दाखविलें व कांहीं झोपेचें तरी औषध द्या म्हणून सुचविलें. डॉक्टरांनीं माझ्या ह्या सूचनेप्रमाणें दुसऱ्या दिवसापासून औषधांत कांहीं बदल केला व रात्रीं शान्त जाऊं लागल्या.

दवाखाना तेथल्या तेथेंच होता. औषध म्हणजे बेलाडोना असे. तें औषध, थर्मामीटर व औषधाचा ग्लास हीं साऱ्या रोग्यांचीं एकच असत. मी मात्र बेबीसाठीं हीं सारीं निराळीं ठेवलीं होतीं व स्वतः जाऊन औषधें आणीत असें. झोपडींत शेगडी ठेवली होती व तिला गरम कपड्यानें फोमेंट करीत असें. सगुणाबाई नाहीं तर मी तिला एकसारख्या मांडीवर घेऊन बसलें होतें. तेथें दहा दिवस रोग्यांना व त्यांच्या बरोबरच्या माणसाला तेथलेंच खाणें मिळत असे, आम्हांला शिधा मिळे व दया स्वयंपाक करी. आम्ही चांगलीं दहा माणसें होतों. दया एकटी त्या सगळ्यांचा स्वयंपाक करी. आमच्याकडे येण्याची कोणाला परवानगी नव्हती. पण कोणी नाहीं असें पाहून मुलें हळूच तारेंतून आंत येत व भेटून जात.

चौदा दिवस झाले. सिव्हिल सर्जन आले; त्यांनीं व दुसऱ्या एका डॉक्टरांनी मुलीला तपासून सांगितलें कीं आतां हिची आशा नाहीं.

टिळकांना भडभडून आलें. सगुणाबाई दूर जाऊन रडत बसली. तिला बेबीचा ळळा लागला होता. तिच्या तिनें खस्ता खाल्ल्या होत्या.

माझी वृत्ति भरपुरीची आहे. कपडे करायचे झाले तरी मी ते अगदीं वाढत्या अंगाचे करवितें. कोल्ह्याच्या शिकारीला जायचें झालें तर मी वाघाच्या शिकारीची तयारी करतें. घरून निघतांना मी गुपचुप एक शेर जवसाचें पीठ, कॅस्टर ऑइल, कोळसे अशा बऱ्याच उपयोगी जिनसा बांधून आणल्या होत्या.

मीहि निराश झालें. दहा पंधरा दिवसांत बेबीची पाठ जमिनीला लागली नव्हती. आज तिला मीं खालीं निजविलें. ती शांत पडली होती. शेगडी पेटलेलीच होती. मीं तें सारें जवसाचें पीठ शिजविलें. गळ्यापासून सर्व छाती–पोटावर तें पोटीस घातलें. एरंडेल, दूध, साखर गरम करून कसें तरी तिच्या पोटांत घातलें. पायांशीं शेगडी ठेवली. ब्लँकिटानें तिला चांगलें गुंडाळून घेतलें.

मग तिला सांगितलें, आतां तूं खुशाल मर. अमुक एक केलें नाहीं असें वाटायला नको.

मग दार लावून तिला एकटीलाच आंत टाकून मी दूर रानांत निघून गेलें. अगदीं एकान्त मिळाल्यावर गुडघे टेकून मोठ्यानें आरोळी मारून देवाजवळ प्रार्थना केली कीं, 'देवा बापा, ही पोर जगूं दे. ही माझी नाहीं, तुझी आहे. तूंच ती मला दिली होतीस व मीं तिचं लालनपालन केलं. तुझी इच्छा असेल तर तूं तिला नेशीलच. हिला जर आराम पडला तर मी इथें आजाऱ्यांचं काम करीन.' असें म्हणून मी गळा काढून मनमुक्त रडलें.

थोड्या वेळानें मी परत आलें. खोलीचें दार उघडण्यास मला धीर होईना. गुडघे टेकून अशी प्रार्थना मीं पूर्वीं कधींच केली नव्हती. उरांत धडकी भरली होती. मोठ्या जुलमानें मीं दार उघडलें. पण मी दार उघडतांच तिनें हांका मारून विचारलें, "ममा, तूं कुठें होतीस? पपा कुठें आहेत?" लहानपणीं ती मला ममा म्हणत असे व त्यांना पपा म्हणत असे. मला इतका आनंद झाला कीं तिला उचलून घ्यावी असें वाटलें. पण तिच्या हार्टवर एखाद वेळेस वाईट परिणाम होईल हें चटकन ध्यानांत घेऊन मी तशीच दार लावून धावतच टिळकांच्या खोलीकडे गेलें. तेथें टिळक इतर मंडळीबरोबर प्रार्थना करीत बसले होते.

मला पाहून त्यांना वाटलें, मुलगी आटोपल्याची बातमी सांगायला ही आली असावी. मीं त्यांना हसत हसत सांगितलें, 'बेबी तुम्हांला बोलावते आहे.' पण त्यांना तें खरें वाटेना. माझें हसणें व बोलणें त्यांना वेड्यासारखें वाटलें. मी पुष्कळच हसत होतें व पुन्हा पुन्हा सांगत होतें कीं, 'बेबी बोलावते आहे.' शेवटीं आम्ही दोघें तिच्या झोपडींत गेलों. त्यांना पाहतांच ती म्हणाली, 'पपा, तुम्ही मला टाकून कुठें गेलां होतां? मला आंबे आणा.'

टिळकांनीं एक रुपया देऊन मुलांना बाजारांत मोसंबीं आणण्यास पाठविलें. पण बाजारांत सारा शुकशुकाट होता. मोठ्या पंचायतीनें त्यांना अगदीं बारीक बारीक वाळलेलीं अशीं पांच सात मोसंबीं मिळालीं.

दुसऱ्या दिवशीं डॉक्टर आले. त्यांनाहि फार नवल वाटलें.

अठरा दिवसांनीं ती झोपडी सोडली. देवानें मुलीला प्लेग कां आणला ह्याचें उत्तर टिळकांना मिळालें तें असें —

एक दिवस कँपमध्यें दुधावरून कांहीं तक्रार झाली. ती गडबड ऐकून टिळक तेथें गेले. ते म्हणाले, ' पाहूं वही ! ' त्यांना उत्तर मिळालें, ' साहेब, तुम्हांला समजणार नाहीं. ' तशीच त्यांनीं वही हिसकावून घेतली आणि पाहातात तों वहींत आंकडा मोठा. प्रत्यक्ष दूध कमी ! टिळक मला येऊन म्हणाले, ' माझ्या प्रार्थनेचं उत्तर मिळालं. बेबीला कां प्लेग झाला तें समजलं. आपल्या इकडे विश्वासू माणसंच कमी. दोन रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत एकावर देखरेख ठेवायला दुसरा लागतो. तसंच इथें आहे. रोग्यांची उत्तम व्यवस्था झाली, त्यांचे खाण्यापिण्याचे हाल झाले नाहींत तर रोगी दगावणार नाहींत. आत्तांच पाहिलं. दूध कागदीं तिप्पट तर प्रत्यक्ष एकपट. न्हाव्या-भटाची सिंहस्थाची पर्वणी तशी ह्या गुलामांची ही प्लेगची पर्वणी आली आहे. माझा झाला निश्चय कीं इथें राहून रोग्यांचं पडेल तें काम करायचं ! तुझी आहे तयारी ? ' मी म्हणालें, ' हो, माझी आहे तयारी. ' देवानें आम्हां दोघांना त्या प्रसंगीं फारच धैर्य दिलें व मोठें मन दिलें. ज्याला कोणत्याच रोगाचें भय नाहीं, कसल्याच घाणीची पर्वा नाहीं अशाचें—म्हणजे भंग्याचें—मन त्यानें आम्हांला त्या वेळीं दिलें. आई देखील जें काम करण्याचा कंटाळा करील तें हा गरीब मनुष्यप्राणी आपल्या कृतघ्न बांधवांसाठीं करीत असतो.

आम्हीं दोघांनीं आपल्या कामाला मनापासून सुरुवात केली.

कँपाजवळच आम्हांला एक झोपडी बांधून देण्यांत आली. पण आतां शिधा बंद झाला होता. पाण्याची पखाल चालूच होती. मुलें साहेबांनीं परत नेलीं, सगुणाबाई आपल्या मुलीला भेटायला आपल्या खेडेगांवीं गेली. टिळकांनीं तिला जातांना लुगडें-चोळी घेतली, खर्चाला चार रुपये दिले, पगार आठ आणे होता तो दोन रुपये केला व चार महिने भरपगारी रजा दिली.

आतां आम्ही चार माणसें कुटुंबांत उरलों. पण तेथेंहि नाहीं नाहीं म्हणतां दोन मुली मीं संभाळण्यास घेतल्या. दोघींच्याहि आया तेथेंच प्लेगला बळी

पडल्या होत्या.

आम्ही दोघेंहि रोग्यांची पडेल ती सेवा करीत होतों. त्यांचें खाणेंपिणें, औषधपाणी, त्यांचीं तोंडें धुणें, त्यांना स्पंजबाथ देणें व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणें हीं सारीं कामें आमच्याकडे होतीं. तेथें सर्व धर्मांचे व सर्व जातींचे लोक येत व आम्ही तेथें आहों हें समजल्यावर त्या कँपची भीति लोकांत कमी होऊन अधिकाधिक रोगी येऊं लागले. ते आमच्याच नांवावर रात्रीं कोणत्याहि वेळेस येऊं लागले.

टिळकांचे एक उधार–कापड–व्यापारी होते. त्यांनी न मागतांच आम्हांला गरम कपडे करून पाठविले.

तेथें कँपांत एक तेली कुलपांत अगदीं बंद करून ठेवलेला होता. त्याला जाऊन नुसतें पाणी पाजायलासुद्धां कोणाला धैर्य होत नसे. आम्हीं आमच्या हातांत व्यवस्था आल्यावरोबर एक नवीन नर्स आणविली. ही ख्रिस्ती होती व अगदीं मनापासून काम करी. पहिल्या दिवशीं मी व जाईबाई त्या तेल्याच्या झोपडीकडे जाऊं लागलों. तों तेथें दारांतच एक शिपाई ! तो म्हणे, ‘ बाई, आंत जाऊं नका, तो माणूस फार भयंकर आहे. ’ आम्हीं म्हटलें, ‘ भयंकर असो कीं कसाहि असो, त्याला दूध देणं, औषध देणं, हें आमचं काम आहे; कुलूप उघडा. ’ सांगितल्याप्रमाणें त्यानें कुलूप उघडलें.

“ सांभाळा बरं, तो अंगावर धावून येतो. ”

आणि दार उघडल्यावर खरोखरच तो आमच्या अंगावर धावून आला. तो तसा येतांच मीं खाडकन् त्याच्या तोंडांत लगावली. काय झालें कोणास ठाऊक पण तो चटकन् पायां पडूं लागला. दूध घे म्हणतांच त्यानें मुकाट्यानें दूध घेतलें. औषध देतांच औषध प्याला !

एक नाना सोनार म्हणून होता. तो म्हणे, ‘ आई, मला बरं वाटूं दे, तुला मी सोन्यानें मढवून काढीन. आम्ही बोलून चालून सोनार, आमचा एक हात सोन्याचा तर दुसरा हात चांदीचा. ’ मी म्हणें, ‘ बरं बाबा, काढ मला सोन्यानें मढवून. पण सध्या तूं सोन्यानें मढविलेल्या भिंती मात्र मला धुवून

काढायला लावतो आहेस.'

अडचणीच्या वेळीं चाकरांना अडवून धरतां येतें. पगार वाढवावा म्हणून एक दिवस भंग्यांनीं एकदम संप पुकारला. बसले ते आपले स्वस्थ हात जोडून. दोन दिवस टिळकांनीं व मीं भंग्याचें काम संभाळलें. तसें त्या सोनारानें आम्हांला तें 'ट्रेनिंग' देऊन ठेवलेंच होतें. तिसऱ्या दिवशीं प्रेतें उचलण्याची पाळी आली. टिळकांनीं आपली कंबर बांधली. मींहि पदर खोंचला. दोन प्रेतें उचलून आम्हीं गाडींत घातलीं. आतां मात्र भंगी लोक चपापले. ते लागलीच धावून आले व म्हणूं लागले, 'साहेब, आमच्या पाठीवर मारा पण पोटावर मारूं नका.' टिळक म्हणाले, 'तुम्हांला अधिक पगार मिळूं नये असं माझं मुळींच म्हणणं नाहीं. मात्र तुम्ही अशा आणि-बाणीच्या वेळीं रोग्यांना अडचणींत पाडणं तुमच्या माणुसकीला शोभत नाहीं. आम्ही तुमचा पगार वाढावा म्हणून अगदीं जरूर प्रयत्न करूं.' पण हे रोगी आतां चांगले बरे होऊं लागले. आम्ही गेलों तेव्हां शेंकडा दहा रोगी जगत. आतां शेंकडा नव्वद जगूं लागले. डॉक्टरांना फार आनंद झाला. त्यांनीं सगळ्यांचा फोटो काढला. आमचे तोंड भरून आभार मानले व एक सर्टिफिकीट बळेंबळें टिळकांना दिलें. त्यावर टिळक म्हणाले, मला काय करायचें तुमचें सर्टिफिकीट. टिळक म्हणत :

**निंदास्तुतिचा जगीं तमाशा ।**
**फंदी तूं त्या पडूं नको ॥**
**मान घडो अपमान घडो तव ।**
**हसूं नको तूं रडूं नको ॥**

टिळकांच्या चरित्रांत मला दोन गोष्टी आढळून आल्या कीं कामाच्या आवडीपुढें त्यांना मानापमानाची पर्वा नसे, तशीच कीर्तीचीहि पर्वा नसे. माझें चरित्र घडलें तसें लिहा हें सांगतांना त्यांना हेंच सांगायचें होतें कीं, माझ्या दोषांवर मुळींच पांघरूण घालूं नका. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्या उच्च ध्येयानें परिपूर्ण अशा चरित्राचा परिणाम दुसऱ्यावर फार चटकन्

होत असे. नाहीं तर नारायणराव गोखल्यांची मुलगी भंग्याचें काम इतक्या आनंदानें व उत्साहानें करण्यास तयार होणें शक्यच नव्हतें. महाराचा नुसता कोठें शिंतोडा अंगावर उडाल्याचा भास झाला तर साऱ्या जन्मभर स्वतःला व घरांतील सगळ्यांना माझ्या वडिलांनीं घासून-पुसून घेतलें होतें. त्याच पित्याची मी कन्या वाईस भंग्याच्या घरचें अन्न खातें काय नि नगरच्या दवाखान्यांत हलकीं समजलेलीं कामें करायला धांवते काय? पण ह्यांत वाणायचें झालें तर तें टिळकांनाच वाणलें पाहिजे. ते माझे ह्या बाबतींत गुरु होते. त्यांनीं मार्ग दाखविला कीं त्या मार्गानें डोळे झाकून बेधडक पळण्याचें काम मात्र माझें असे. मला जर कांहीं यशाचा वांटा असेल तर तो त्यांनीं मार्ग दाखविल्यानंतर न कचरतां त्यावरून बेधडक जाण्यांत आहे एवढेंच.

# राहुरीचें घर

मी मोठी संसारी व माझी संग्राहक बुद्धीहि मोठी अजब. अजूनहि त्या सद्‌गुणानें माझा पूर्णपणें त्याग केलेला नाहीं. टिळकांना जिकडे तिकडे अगदीं स्वच्छ हवें असे; इतकें, कीं पैशाची पिशवी व पेटीहि ते झाडून पुसूत ठेवीत. उलट मला सारा पसारा जतन करून ठेवावासा वाटे. मी मालावरच्या सापासारखी नेहमीं घरांत बसलेली. ही कधीं बाहेर जाते, आणि आपण घर सफाईचें काम कधीं सुरू करतों, असें टिळकांना होई. मी बाहेर गेलें, कीं त्यांची दिवाळी उगवायची आणि नंतर माझा शिमगा सुरू व्हायचा. माझें एक ' स्टोअरच ' असायचें. त्यांत काय कॉय सामान सांपडेल ह्याचा नियमच नसे. कोमट्यासारखीं चिंध्यांचीं गांठोडीं, बाटल्या, फाटका जोडा, तुटक्या वहाणा, मोडकें सूप, उंदरानें करंडलेलें टोपलें; गंजलेले टिनाचे डबे, तुटके सुतळीचे तुकडे, चऱ्हाटें, तुटकीं शिंकीं, मोडका पाट, तुटकी नवार, लहान लहान गाड्याचीं चाकें, विळे, खिळे, इतकेंच नाहीं तर फुटका माठ व त्याचीं खापरेंसुद्धां माझ्या त्या 'स्टोअर ' मध्यें सांपडायचीं.

मी ह्या जिनसा ठेवीं त्या कांहीं त्या विकून पैसा करण्यासाठीं नव्हे तर कधीं अडीअडचणीला काय लागेल ह्याचा नियम नसतो म्हणून ठेवीं.

मुलें गेलीं. त्यांच्यासाठीं केलेल्या २२ गाद्यांचा काथ्या उसवला होता. खोळी धोबणीला द्यायच्या होत्या. त्या काथ्याचा डोंगर पुढें पडला होता. हा डोंगर माझ्या ' स्टोअर 'मध्यें कसा सांठवायचा ह्याचा विचार करीत, कमरेवर हात देऊन, मी त्याच्याकडे पाहात उभी होतें. भोंवतालीं

शेजारी पाजारी जमा झाले होते. इतक्यांत टिळक तेथें आले व त्यांनीं लिलाव पुकारला. ‘ दोन्हीं हातांनीं, दोन खेपांत नेतां येईल तितका काथ्या वाटेल त्यानें न्यावा. अर्थात् फुकटच. पाहातां पाहातां एवढें मोठें ढिगार जमीनदोस्त होऊं लागलें. आपलें काम झालें असें पाहून हात झटकून टिळक आपल्या ऑफिसमेधें निघून गेले. खळ्यावरील माल हलविल्यावर भिकाऱ्यांनीं उरलीं सुरलीं कणसें गोळा करावीं, तसा तो काथ्याचा आवा लुटला गेल्यावर जो थोडा काथ्या हातीं लागला त्याची एक गठडी बांधून माझ्या ‘ स्टोअर ’मधें मीं टाकून दिली.

ह्यानंतर आम्ही महाबळेश्वरला गेलों. ह्या वेळेस आमचा संसार बराच मोठा होता. बावीस मुलांपैकीं एक दोघे आमच्याबरोबर होते. शिवाय मुली होत्या. पण तेथें जवळच एक तरुण माणूस वारल्यानें ही सर्व मंडळी महाबळेश्वरचा सीझन संपण्याच्या आधींच परत धाडून दिलीं व आम्हीं सांगली मिरजच्या बाजूनें सहज फेरफटका करायला निघालों.

मिरजेला तेथील दवाखान्याचें काम पाहून आपणहि नर्सिंगचें काम शिकावें असें माझ्या मनानें घेतलें. पण बेबी नुकतीच प्लेगमधून उठलेली, दत्तूहि अशक्त दिसत होता—आणि माझा ‘ स्टोअर ! ’ टिळकांनाहि माझी कल्पना आवडली व ते म्हणाले, ‘ तूं कांहीं काळजी करूं नको. मी सर्व सांभाळीन व तुला पैसेहि पाठवीन. ’ डॉ. वॉन्लेसना टिळक भेटले व सर्व बेत नक्की झाला.

मला इंग्रजी येत नव्हतें त्यांमुळें मीं नुसतें ‘ प्रॅक्टिकल ’ काम शिकायचें असें ठरलें. मी मिरजेसच राहिलें. टिळक मुलांना घेऊन नगरला गेले.

चार महिने झाले. मला मुलांची खंत आली म्हणून मी त्यांना भेटायला नगरास आलें. मला पाहून सर्वांना नवल वाटलें.

दुसरे दिवशीं डॉ. ह्यूमहि मला भेटायला आले.

डॉ. ह्यूम म्हणाले, “ आतां बहिणी, तुमचं खरं शिक्षण म्हणजे आपल्या नवऱ्याचा व मुलांचा संभाळ करणं. मला वाटतं तुम्हीं मिरजेस जाऊं नये. ”

“ साहेब, तुम्ही म्हणतां तें मला पटतं. ह्यांना सोडून मिरजेस राहण्यांत

# राहुरीचें घर

मी मोठी संसारी व माझी संग्राहक बुद्धीहि मोठी अजब. अजूनहि त्या सद्‌गुणानें माझा पूर्णपणें त्याग केलेला नाहीं. टिळकांना जिकडे तिकडे अगदीं स्वच्छ हवें असे; इतकें, कीं पैशाची पिशवी व पेटीहि ते झाडून पुसून ठेवीत. उलट मला सारा पसारा जतन करून ठेवावासा वाटे. मी मालावरच्या सापासारखी नेहमीं घरांत बसलेली. ही कधीं बाहेर जाते, आणि आपण घर सफाईचें काम कधीं सुरू करतों, असें टिळकांना होई. मी बाहेर गेलें, कीं त्यांची दिवाळी उगवायची आणि नंतर माझा शिमगा सुरू व्हायचा. माझें एक ' स्टोअरच ' असायचें. त्यांत काय कांय सामान सांपडेल ह्याचा नियमच नसे. कोमट्यासारखीं चिंध्यांचीं गांठोडीं, बाटल्या, फाटका जोडा, तुटक्या वहाणा, मोडकें सूप, उंदरानें करंडलेलें टोपलें; गंजलेले टिनाचे डबे, तुटके सुतळीचे तुकडे, चऱ्हाटें, तुटकीं शिंकीं, मोडका पाट, तुटकी नवार, लहान लहान गाड्याचीं चाकें, विळे, खिळे, इतकेंच नाहीं तर फुटका माठ व त्याचीं खापरेंसुद्धां माझ्या त्या 'स्टोअर ' मध्यें सांपडायचीं.

मी ह्या जिनसा ठेवीं त्या कांहीं त्या विकून पैसा करण्यासाठीं नव्हे तर कधीं अडीअडचणीला काय लागेल ह्याचा नियम नसतो म्हणून ठेवीं.

मुलें गेलीं. त्यांच्यासाठीं केलेल्या २२ गाद्यांचा काथ्या उसवला होता. खोळी धोबणीला द्यायच्या होत्या. त्या काथ्याचा डोंगर पुढें पडला होता. हा डोंगर माझ्या ' स्टोअर 'मध्यें कसा सांठवायचा ह्याचा विचार करीत, कमरेवर हात देऊन, मी त्याच्याकडे पाहात उभी होतें. भोंवतालीं

शेजारी पाजारी जमा झाले होते. इतक्यांत टिळक तेथें आले व त्यांनीं लिलाव पुकारला. ' दोन्ही हातांनीं, दोन खेपांत नेतां येईल तितका काथ्या वाटेल त्यानें न्यावा. अर्थात् फुकटच. पाहातां पाहातां एवढें मोठें ढिगार जमीनदोस्त होऊं लागलें. आपलें काम झालें असें पाहून हात झटकून टिळक आपल्या ऑफिसमधें निघून गेले. खळयावरील माल हलविल्यावर भिकाऱ्यांनीं उरलीं सुरलीं कणसें गोळा करावीं, तसा तो काथ्याचा आवा लुटला गेल्यावर जो थोडा काथ्या हातीं लागला त्याची एक गठडी बांधून माझ्या ' स्टोअर 'मधें मीं टाकून दिली.

ह्यानंतर आम्हीं महाबळेश्वरला गेलों. ह्या वेळेस आमचा संसार बराच मोठा होता. बावीस मुलांपैकीं एक दोघे आमच्याबरोबर होते. शिवाय मुली होत्या. पण तेथें जवळच एक तरुण माणूस वारल्यानें ही सर्व मंडळी महाबळेश्वरचा सीझन संपण्याच्या आधींच परत धाडून दिलीं व आम्हीं सांगली मिरजच्या बाजूनें सहज फेरफटका करायला निघालों.

मिरजेला तेथील दवाखान्याचें काम पाहून आपणहि नर्सिंगचें काम शिकावें असें माझ्या मनानें घेतलें. पण बेबी नुकतीच प्लेगमधून उठलेली, दत्तूहि अशक्त दिसत होता—आणि माझा ' स्टोअर ! ' टिळकांनाहि माझी कल्पना आवडली व ते म्हणाले, ' तूं कांहीं काळजी करूं नको. मी सर्व सांभाळीन व तुला पैसेहि पाठवीन. ' डॉ. वॉन्लेसना टिळक भेटले व सर्व बेत नक्की झाला.

मला इंग्रजी येत नव्हतें त्यामुळें मीं नुसतें ' प्रॅक्टिकल ' काम शिकायचें असें ठरलें. मी मिरजेसच राहिलें. टिळक मुलांना घेऊन नगरला गेले.

चार महिने झाले. मला मुलांची खंत आली म्हणून मी त्यांना भेटायला नगरास आलें. मला पाहून सर्वांना नवल वाटलें.

दुसरे दिवशीं डॉ. ह्यूमहि मला भेटायला आले.

डॉ. ह्यूम म्हणाले, " आतां बहिणी, तुमचं खरं शिक्षण म्हणजे आपल्या नवऱ्याचा व मुलांचा संभाळ करणं. मला वाटतं तुम्हीं मिरजेस जाऊं नये. "

" साहेब, तुम्ही म्हणतां तें मला पटतं. ह्यांना सोडून मिरजेस राहण्यांत

मला मोठा आनंद का वाटतो ? पण कोणता वेळ कसा येईल ह्याचा नेम नसतो. म्हणून माणसानें सर्व प्रकारच्या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी करून ठेवलेली असावी. ”

“ आतां भावा, तुमचं काय मत आहे ? ”

“ माझंहि मत तिच्याचप्रमाणें आहे. ”

“ साहेब, मला नाहीं विद्या. तेव्हां मजजवळ पोट भरण्याचं व जनसेवा करण्याचं कांहीं साधन नको का ? ”

“ बरं भावा, नीट विचार करा. तुमची पैशाची नेहमीं अडचण असते. मुलं बरीं दिसत नाहींत. ’ सकाळीं साताच्या गाडीनें मी जाणार होतें. स्टेशनवर आमच्या आधींच डॉ. ह्यूम येऊन बसले होते. गाडी निघतां निघतां त्यांनीं माझ्या हातांत दहा रुपयांची नोट ठेवली.

“ तुम्ही चांगल्या शिका. शिकल्यावर आपल्या नवऱ्याचा व मुलांचा चांगला संभाळ करा. ही माझ्याकडून फूल नाहीं फुलाची पाकळी. ’

“ पण साहेब, मजजवळ आहेत पैसे. मला नकोत हे; मला लागले तर मी मागेन. ”

“ पण बहिणी, ही भावाची चोळीबांगडी. ”

मुलें जरी अशक्त दिसत होतीं तरी टिळकांचा व माझा पुरा निश्चय झाला होता, कीं माझें शिक्षण पुरें करायचें. स्टेशनवर टिळक मला पोचवायला आले. मला रडूं येऊं लागलें. टिळक म्हणाले, ‘ तूं कांहीं काळजी करूं नको. तूं मुलांची आई असलीस तर तितकाच प्रेमळ मी त्यांचा बाप आहें. मी त्यांची चांगली काळजी घेईन. ’ गाडी हलली. मी मिरजेस गेलें.

मिरजेस पोचल्यावर दोन दिवस सर्व कांहीं अगदीं सुरळीत चाललें. तिसऱ्या दिवशीं डॉ. वॉन्लेससाहेबांनीं सांगितलें, ‘ बाई, आम्हांला खोली पाहिजे. ती खालीं करून द्या व तुम्ही नगरास परत जा. तुम्हांला मोठाले रोगी उचलतां येत नाहींत. ’

“ पण डॉक्टर, मला शिकायला पाहिजे. ”

" नाहीं, तुम्हांला हें काम येणार नाहीं. "

" कां नाहीं ? मी माणूस आहें. "

" मला वेळ नाहीं तुमच्याशीं बोलायला. आजच्या आज खोली खालीं करा. "

माझी स्थिति फारच विलक्षण झाली. काय करावें कांहीं सुचेना. मीं आपलें सामान खोलीच्या बाहेर काढून कंपाउंडमध्यें ठेवलें व त्यावर बसलें. नगरचे एक गृहस्थ तेथेंच शेजारी होते. ते बाहेरून आले. त्यांनीं हा प्रकार पाहून विचारलें, " अहो मामी, हें काय ? सामान कां काढलं ? ढेकूण झाले वाटतं ? "

" नाहीं बाबा, साहेबांनीं मला बाहेर काढलं. "

" कां ? तुम्ही पदरचे पैसे खर्च करून शिकतां. मग साहेबांनीं बाहेर काढण्याचं काय कारण ? "

" कारण समजत नाहीं. मीं त्यांचा एक थर्मामिटर फोडला होता. पण तो कधींच आणून दिला. ते म्हणतात, तुम्हांला काम करतां येत नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. तुम्हांला मोठाले रोगी उचलतां येत नाहींत. "

मी एकसारखी रडत होतें. मी म्हणें रोगी उचलतां येत नाहींत ह्यांत माझा काय दोष ? प्रसादरावांनीं जेवण्याबद्दल मला फार आग्रह केला. मीं म्हटलें, ' मला नाहीं जेवायचं. मला माझा खरा दोष काय आहे तें कळलं पाहिजे. मी इथेंच बसून राहीन. ' प्रसादराव डॉक्टरकडे गेले. त त्यांना एकसारखें तेंच सांगत होते कीं बाईला काम करतां येणार नाहीं. प्रसादराव म्हणाले, ' बाई म्हणते मला माझा खरा दोष कळल्याशिवाय मी येथून हलणार नाहीं. ' तेव्हां डॉ. वॉन्लेससाहेबांनीं डॉ. ह्यूमचें पत्र काढून प्रसादरावांना दाखविलें. ' हें पाहा डॉ. ह्यूम म्हणतात, कीं बाईला ताबडतोब परत पाठवून द्या. इकडे तिच्या नवऱ्याचे व मुलांचे हाल होतात. बाईकडे कांहीं दोष नाहीं. वर डॉ. ह्यूमनें हें पाहा लिहिलं आहे कीं माझं पत्र आल्याचं बाईला कळवूं नका. आतां मी काय करूं ? '

प्रसादरावांनीं मला हें सारें बोलणें येऊन सांगितलें. आतां माझ्या डोक्यांत डॉ. ह्यूमनीं दिलेल्या दहा रुपयांचा आवाज खणदिशीं झाला. हे दहा रुपये माझ्या

परत भाड्यासाठीं त्या गृहस्थांनीं देऊन ठेवले होते. मला मरणप्राय दुःख झालें. आतां नगरास मी कोणत्या तोंडानें जाऊं! लोक काय म्हणतील? करावी नाहीं तर एखादी आडविहीर साजरी. नगरच्या विद्यार्थ्यांच्या बायकांनीं माझी समजूत केली. माझें त्यांनीं बरेंच साहाय्यहि केलें व मला गाडींत बसवून दिलें.

मी नगरास पोंचले तेव्हां टिळक नुकतेच चहा घेऊन बाहेर येऊन बसले होते. इतक्यांत माझा टांगा दाराशीं येऊन उभा राहिला.

"कां ग? कशी आलीस?"

"मला शिकतां येणार नाहीं म्हणून!" मीं त्यांना सर्व हकीगत सांगितली; विद्यार्थी नापास झाले म्हणजे जीव देतात तें कां हें आतां मला कळलें. परीक्षा शिक्षण वगैरे काय असतात हें आतां समजलं.

मी आल्याचें डॉ. ह्यूमसाहेबांना कळलें. पण ते भेटायला आले नाहींत!

घरीं आल्यावर मीं आमच्या दारापुढें सुंदरसा बगीचा केला. पन्नास कुंड्या आणल्या. पण डॉ. बालंटाईनची रजा सुरू झाली व आमची राहुरीस बदली झाली. टिळकांनीं त्या कुंड्यांचें दान करून टाकलें आणि आम्ही राहुरीला आलों.

राहुरी गांव आम्हांला फार आवडलें. टिळक म्हणत, अशा गांवीं लांब रानांत मला जर एकान्त स्थळीं घर बांधून राहातां आलें तर मी किती तरी ग्रंथ लिहीन. डॉ. हेन्री फेअरबँक नांवाचे मिशनरी येथें आमच्याकडे आले असतां टिळकांनीं आपल्या घराची कुरकूर त्यांच्याजवळहि केली. फेअरबँकसाहेब म्हणाले, 'टिळक, मला कांहीं पैसे मिळायचे होते. पण मीं त्यांची आशा सोडून दिली आहे. जर हे पैसे मिळाले तर मी तुम्हांला तुम्ही म्हणतां तसं रानांत घर बांधून देईन. मग तुम्हांला पाहिजे तेवढी ग्रंथरचना तुम्ही करीत बसा.' टिळकांनीं व डॉ. फेअरबँकसाहेबांनीं नंतर एकत्र बसून देवाची प्रार्थना केली व तो विषय तेवढ्यावरच राहिला.

तिसऱ्याच दिवशीं साहेब आले व सांगू लागले, 'टिळक, झालं तुमचं झोपडं तयार. मला आज पैसे आले. चला, तुम्हांला कुठें जागा पाहिजे?'

दोघे जण राहुरीपासून मैल दीड मैलावर गेले. तेथें डॉ. बालंटाईनचें एक शेत होतें. तें ठरविलें. डॉ. बालंटाईनची संमति मिळविली व तें शेत २००–२५० रुपयांना खरेदी केलें !

मला जेव्हां हें समजलें तेव्हां आमचा मोठा खटका उडाला. घर बांधून बाधायचें मग तें गांवांत बांधायचें कीं दूर रानांत ! तेथें सोबत नाहीं, शेजार नाहीं, पाणी नाहीं. अडीअडचणीला हाक मारली तर ओ द्यायला कोणी माणूस नाहीं. टिळक म्हणत, ' तुला कांहीं कळत नाहीं व मी कांहीं करायला घेतलं कीं तूं तिथें हटकून मोडा घालणार हें ठरलेलं. पाणी वाहून आणतां येईल. सोबतीला कुत्रीं ठेवतां येतील आणि माणसांना काय करायचं ? तूं मला हाक मार, मी तुला हाक मारीन. '

इकडे घर बांधायला सुरुवातहि झाली. साहेबांनीं स्वतः हातांनीं ह्या घराचें काम इतर मजुरांबरोबर केलें ! पाण्याची मसक, खणण्यासाठीं ब्रेड; डोक्यावर सावलीसाठीं छत्री अशा थाटांत फेअरबँकसाहेब तेथें जाऊन काम करीत. त्यांनीं एक मिनिट फुकट घालविलें नाहीं. तेथें पाण्याचा टिपुस नाहीं कीं झाडाची छाया नाहीं. ऊन म्हणतें मी. छत्री तीहि वाऱ्यानें उलटायची. मी म्हणें, ' साहेब, काय हा तुम्हांला त्रास ! ' ते म्हणत, ' बाई, हरकत नाहीं. हें सारं मलाच केलं पाहिजे. टिळकांना कांहीं समजत नाहीं. ' पांचशें रुपयांच्या जागीं हजार रुपये खर्च झाला व घर स्वतः मेहनतीनें बांधलें असल्यानें दोन हजारांचें झालें. ज्याचें काम त्यानेंच करावें हें खरें. एक महिन्यांत घर तयार झालें. पण घरभरणीसाठीं आमच्याजवळ कोठें काय होतें ? घर साहेबांनीं तयार करून आमच्या स्वाधीन केलें. मग उसने पैसे आणून आम्हीं घरभरणी करून नवीन घरांत राहूं लागलों.

येथें आमची श्री. राजारामजी चांदेकर व भास्करराव भांबळ यांची ओळख झाली. हे दोघेहि आमचे राहुरींतील हितचिंतक होते. राजारामजी दत्तूचे पहिले महत्त्वाचे मास्तर. इंग्रजी पहिलीपासून तों इंग्रजी सातवीपर्यंत त्यांचें प्रत्यक्ष शिक्षण व सल्ला आमच्या फार उपयोगी पडले. दत्तू इंग्रजी पहिली पास

परत भाड्यासाठीं त्या गृहस्थांनीं देऊन ठेवले होते. मला मरणप्राय दुःख झालें. आतां नगरास मी कोणत्या तोंडानें जाऊं! लोक काय म्हणतील? करावी नाहीं तर एखादी आडविहीर साजरी. नगरच्या विद्यार्थ्यांच्या बायकांनीं माझी समजूत केली. माझें त्यांनीं बरेंच साहाय्यहि केलें व मला गाडींत बसवून दिलें.

मी नगरास पोंचले तेव्हां टिळक नुकतेच चहा घेऊन बाहेर येऊन बसले होते. इतक्यांत माझा तांगा दाराशीं येऊन उभा राहिला.

" कां ग? कशी आलीस?"

" मला शिकतां येणार नाहीं म्हणून!" मीं त्यांना सर्व हकीगत सांगितली; विद्यार्थी नापास झाले म्हणजे जीव देतात तें कां हें आतां मला कळलं. परीक्षा शिक्षण वगैरे काय असतात हें आतां समजलं.

मी आल्याचें डॉ. ह्यूमसाहेबांना कळलें. पण ते भेटायला आले नाहींत!

घरीं आल्यावर मीं आमच्या दारापुढें सुंदरसा बगीचा केला. पन्नास कुंड्या आणल्या. पण डॉ. बालंटाईनची रजा सुरू झाली व आमची राहुरीस बदली झाली. टिळकांनीं त्या कुंड्यांचें दान करून टाकलें आणि आम्ही राहुरीला आलों.

राहुरी गांव आम्हांला फार आवडलें. टिळक म्हणत, अशा गांवीं लांब रानांत मला जर एकान्त स्थळीं घर बांधून राहातां आलें तर मी किती तरी ग्रंथ लिहीन. डॉ. हेन्री फेअरबँक नांवाचे मिशनरी येथें आमच्याकडे आले असतां टिळकांनीं आपल्या घराची कुरकूर त्यांच्याजवळहि केली. फेअरबँकसाहेब म्हणाले, 'टिळक, मला कांहीं पैसे मिळायचे होते. पण मीं त्यांची आशा सोडून दिली आहे. जर हे पैसे मिळाले तर मी तुम्हांला तुम्ही म्हणतां तसं रानांत घर बांधून देईन. मग तुम्हांला पाहिजे तेवढी ग्रंथरचना तुम्ही करीत बसा.' टिळकांनीं व डॉ. फेअरबँकसाहेबांनीं नंतर एकत्र बसून देवाची प्रार्थना केली व तो विषय तेवढ्यावरच राहिला.

तिसऱ्याच दिवशीं साहेब आले व सांगूं लागले, 'टिळक, झालं तुमचं झोपडं तयार मला आज पैसे आले. चला, तुम्हांला कुठें जागा पाहिजे?'

दोघे जण राहुरीपासून मैल दीड मैलावर गेले. तेथें डॉ. बालंटाईनचें एक शेत होतें. तें ठरविलें. डॉ. बालंटाईनची संमति मिळविली व तें शेत २००–२५० रुपयांना खरेदी केलें!

मला जेव्हां हें समजलें तेव्हां आमचा मोठा खटका उडाला. घर बांधून बांधायचें मग तें गांवांत बांधायचें कीं दूर रानांत! तेथें सोबत नाहीं, शेजार नाहीं, पाणी नाहीं. अडीअडचणीला हाक मारली तर ओ द्यायला कोणी माणूस नाहीं. टिळक म्हणत, 'तुला कांहीं कळत नाहीं व मी कांहीं करायला घेतलं कीं तूं तिथें हटकून मोडा घालणार हें ठरलेलं. पाणी वाहून आणतां येईल. सोबतीला कुत्रीं ठेवतां येतील आणि माणसांना काय करायचं? तूं मला हाक मार, मी तुला हाक मारीन.'

इकडे घर बांधायला सुरुवातहि झाली. साहेबांनीं स्वतः हातांनीं ह्या घराचें काम इतर मजुरांबरोबर केलें! पाण्याची मसक, खाण्यासाठीं ब्रेड; डोक्यावर सावलीसाठीं छत्री अशा थाटांत फेअरबँकसाहेब तेथें जाऊन काम करीत. त्यांनीं एक मिनिट फुकट घालविलें नाहीं. तेथें पाण्याचा टिपुस नाहीं कीं झाडाची छाया नाहीं. ऊन म्हणतें मी. छत्री तीहि वाऱ्यानें उलटायची. मी म्हणें, 'साहेब, काय हा तुम्हांला त्रास!' ते म्हणत, 'बाई, हरकत नाहीं. हें सारं मलाच केलं पाहिजे. टिळकांना कांहीं समजत नाहीं.' पांचशें रुपयांच्या जागीं हजार रुपये खर्च झाला व घर स्वतः मेहनतीनें बांधलें असल्यानें दोन हजारांचें झालें. ज्याचें काम त्यानेंच करावें हें खरें. एक महिन्यांत घर तयार झालें. पण घरभरणीसाठीं आमच्याजवळ कोठें काय होतें? घर साहेबांनीं तयार करून आमच्या स्वाधीन केलें. मग उसने पैसे आणून आम्हीं घरभरणी करून नवीन घरांत राहूं लागलों.

येथें आमची श्री. राजारामजी चांदेकर व भास्करराव भांबळ यांची ओळख झाली. हे दोघेहि आमचे राहुरींतील हितचिंतक होते. राजारामजी दत्तूचे पहिले महत्त्वाचे मास्तर. इंग्रजी पहिलीपासून तों इंग्रजी सातवीपर्यंत त्यांचें प्रत्यक्ष शिक्षण व सल्ला आमच्या फार उपयोगी पडले. दत्तू इंग्रजी पहिली पास

झाल्यावर त्यांच्याच सल्ल्यानें त्याला पुण्यास शिकायला ठेवलें. पुण्यांतल्या नूतन मराठी विद्यालयांतला तो पहिला ख्रिस्ती विद्यार्थी.

रानांत राहायला आल्यावर डॉ. बालंटाईनसाहेबांच्या कामाव्यतिरिक्त उरलेला वेळ लेखनांत घालवायचा हा तेथें घर करून कायम होण्याचा मूळ हेतु. पण टिळक तो विसरले. आतां त्यांची शेती सुरू झाली! मी शेतकऱ्याची मुलगी. मला शेतांची माहिती! पण मला टिळक बसवीत धाब्यावर कल्पनेचीं पांखरें हाकलायला व स्वतःच शेती करीत.

जमीन नांगरून घेतली. एकानें सांगितलें, 'साहेब, इथें कपाशी फार चांगली येईल.' कपाशी पेरली. रोपें वीत वीत वाढलीं. चार दिवस पाऊस पडला नाहीं. दुसरा म्हणाला, 'अहो साहेब, हें काय केलंत? पाऊस नाहीं, पाणी नाहीं. कपाशी कशी होणार? ह्यांत हरबरा करा.' झालें. दुसऱ्या दिवशीं गडी लावून कपाशी उपटून टाकली व पुन्हा जमीन नांगरली! तेथें दोन पायल्या हरबरे पेरले.

हरबरा चांगला आला. त्याला घाटे आले. मंडळी टिळकांना भेटायला येऊं लागली. जो कोणी येई तो म्हणे, 'साहेब, काय सुंदर हरबरा आला आहे. थोडा टहाळ घेऊं का?' साहेबांनीं मोठ्या आनंदानें परवानगी द्यावी व कवळ-भर हरबरा द्यावा. बरें झालें, गड्यांचा सोंगणीचा त्रास वांचला! बहुतेक सोंगणी कधींच होऊन गेली. दोन पायल्या हरबऱ्यांचे दोन शेर हरबरे घरांत आले.

ह्या घरांत आल्यापासून टिळकांना वाटूं लागलें कीं मिशनचें पगारी काम सोडून द्यावें. देवाचें काम पगार घेऊन करायचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें. आतां 'व्हॉलंटिअर्स' जमा करून एक संघ स्थापण्याचें त्यांचें ठरलें. त्यांनीं मिशनच्या कामाचा राजीनामा दिला व त्यांच्या भोंवतीं आतां व्हॉलंटिअर्स जमा होऊं लागले. एका व्हॉलंटिअरनें सहकुटुंबच आमच्या घरीं तळ दिला. कुटुंब सहाच माणसांचें होतें. शेतावरील चार गडी, राखणदार, त्याच्या तीन बायका, असा त्या रानांत मोठा जनसमूह गोळा झाला होता. दत्तू बाहेरगांवीं.

त्याला दहा रुपये पाठवावे लागत. डॉ. ह्यूमसाहेबांनीं टिळकांच्या ह्या नव्या वृत्तीला आळा घातला नाहीं. पण बुवाचे तुरे लाल, बाईचे बुरे हाल ही स्थिति त्यांना माहीत असल्यानें त्यांनीं परस्पर ट्रॅक्ट सोसायटीकडे खटपट करून त्या सोसायटीचें १०० रुपयांचें संपादकीय काम त्यांना मिळवून दिलें. म्हणजे इकडे ते फुकट काम करीत व चरितार्थासाठीं ट्रॅक्ट सोसायटीच्या कामाबद्दल त्यांना शंभर रुपये मिळत. पुन्हा जरा सुरळीत चालूं लागलें. पण शंभर रुपयांना शंभर वाटा ह्या होत्याच. टिळकांनीं आपल्या व्हॉलंटिअर्सची एक तांतडीची मीटिंग बोलावली. एकदां नगरच्या चार व्हॉलंटिअर्सची गाडी चुकली—का चुकवली देव जाणे. त्यांनीं चार भाड्याच्या सायकली ताशीं चार आणेप्रमाणें करून ते सायकलवर राहुरीला आले व जातांना मजजवळ पगारांतले जे पंधरा वीस रुपये उरले होते ते सगळे सायकल भाडें म्हणून घेऊन गेले !

घरीं सहकुटुंब राहिलेला व्हॉलंटिअर टिळकांची हजामत करी. त्याबद्दल टिळक त्याला चार आणे देत. पुढें पुढें तो आपल्या स्वतःच्या मुलांच्या हजामतीचेहि पैसे टिळकांजवळ मागूं लागला व टिळक त्याला ते देऊंहि लागले. एक दिवस मीं त्यांना साफ सांगितलें कीं मी हे पैसे देणार नाहीं. हा कसला असला व्हॉलंटिअर, कीं आपल्या स्वतःच्या मुलांच्या हजामतीचे पैसे तुमच्याकडून उकळतो ! त्यावरून आमची खूपच खडाजंगी उडाली. ते म्हणत, ‘ तुला अक्कल नाहीं. अशा तुझ्या कृपणपणानेंच चांगल्या कामाला तूं अडथळे आणतेस. सारं जग तुला नांवं ठेवतं तें तुला कळत नाहीं. ’ मी म्हणालें, ‘ मला नांवं ठेवलीं तर ठेवूं द्या पण मी तुमच्यासारखी ह्या भोंदूंना फसणार नाहीं. ज्या माणसाच्या अंगांत खंडीभर आळस, चार मुलं पोसायची ऐपत नसतां जो पहिली बायको मेल्याबरोबर दुसरें लग्न करतो, थापा मारण्यांत ज्याचा पहिला नंबर तो तुम्हांला सांगतो आणि तुम्ही त्याचं ऐकतां. ’

आमची ती रात्र फार वाईट गेली. टिळक लिहीत होते. मी रडत होतें. सकाळचा चहाहि मुकाट्यानेंच झाला व टिळक सायकल घेऊन बाहेर पडले. गांवांत गेल्यावर त्यांनीं घरोघर जाऊन बायांना माझ्या नांवानें चहाला आमंत्रणें

दिलीं व पुढें ते तसेच कोठें निघून गेले.

मी दुपारीं निजलें तों बाहेर चार वाजेपर्यंत एक एक एक एक पाहुणी जमूं लागली. मी आपली आंत घोरतेंच आहें. थोड्या वेळानें बाहेर आलें तों बाहेर बायांचा घोळका. बाया माझ्या तोंडाकडे पाहताहेत, मी त्यांच्या तोंडाकडे पाहात आहें. दोन्हीहि आपापल्यापरी आश्चर्यांत गढून गेल्या आहेत. असा तो अजब देखावा होता. माझे बंधु बापू नामाजी आढाव ह्यांच्या पत्नी सावित्रीबाई व मुली सरू व वारू ह्याहि आल्या होत्या. त्या हळूच माझ्या कानाशीं येऊन म्हणाल्या, 'वन्सं, हा काय प्रकार आहे? आम्हांला तर साहेबांनीं चहाला बोलावलं आहे आणि इथें तर सर्व शांत दिसतं आहे.'

आत्तां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. मी म्हणालें, 'वहिनी, आतां तुम्ही सरू-वारूला हाताशीं घेऊन करा चहा.' सावित्रीबाईनीं चहाला आधण ठेवलें, सरू-वारूंनीं चहाची तयारी केली. गूळ घालून हारोळ्या केल्या. जवळ असलेला एकुलता एक रुपया देऊन नोकराला गांवांत पाठविलें. त्यानें टरबुजें-खरबुजें आणलीं व आमची ती पार्टी साजरी झाली! बाया गेल्या. टिळक आले.

"कां हो बायांना बोलावलें?"

"मग तूं अबोला धरलास तर तुला बोलायला कसं लावायचं?"

आमचा अबोला सुटला.

* * *

टिळक रा. रा. होते ते रेव्हरंड झाले. ती गोष्ट अशी—'व्हॉलंटिअर्स' चळवळ त्यांनीं सुरू केल्यानंतर त्यांच्याकडे पुष्कळ धर्मसमीक्षक येऊं लागले. टिळक म्हणूं लागले, कोणाचा बाप्तिस्मा करायचा झाला तर ज्याला परमेश्वरी संदेश असेल त्यानें तो खुशाल करावा. तेवढ्यासाठीं बाप्तिस्मा करणाराची दीक्षाच झालेली असली पाहिजे असें नाहीं व त्यांनीं रेव्हरेंड—म्हणजे दीक्षित—नसतांहि कांहीं बाप्तिस्मे केले.

टिळकांच्या ह्या कृत्यामुळें कांहीं लोकांना मोठा 'शॉक' बसला. बरें आपल्या मनाची खात्री झाल्यावर एखाद्या गोष्टीपासून त्यांना परावृत्त करण्याची

ब्रह्मदेवाची आज्ञा नव्हती. तेव्हां आतां काय करावें असा पुष्कळांना मोठा पेंच येऊन पडला. लोकांना काय वाटेल ह्याची टिळक थोडीच पर्वा करताहेत ! कोणी बाप्तिस्मा घेण्यास आला कीं ते त्याला एखाद्या रेव्हरेंडकडे पाठविण्याऐवजीं स्वतः त्याचा बाप्तिस्मा करून मोकळे होत. बरें इतक्यावरहि ते स्वस्थ बसत नसत. ते ह्याबद्दल वादविवादहि करीत. राहुरीस त्यांच्या हातून अशा रीतीनें दोन तीन बाप्तिस्मे झाले. मग दीक्षित मंडळींत काय ठरलें कोणास ठाऊक पण टिळकांचीच दीक्षा होणार असें ऐकूं आलें.

मिशनची वार्षिक सभा त्या वर्षी राहुरींत भरणार होती व त्या सभेंतच टिळकांची दीक्षा होण्याचें ठरलें.

तारीख पहिली होती. दीक्षा पुढें पंधरा दिवसांनीं असेल. आतां डॉ. ह्यूमचा पगार नव्हता. वाटेल तेव्हां त्यांच्याकडे जाऊन पैसे आणतां येत. ते आमच्या उधळपट्टीवर रागावले तरी दोन दोन महिने आगाऊ पगार देत. पण आतां पहिली तारीख उलटून गेली तरी पांच पांच सहा सहा दिवस पगार येत नसे. सभेला बाहेरगांवची जेवढी मंडळी आली होती, तेवढ्यांना टिळकांनीं तीन वेळचें जेवणाचें व चहाचें आमंत्रण देऊन ठेवलें. मला नुसती वर्दी दिली. मला काळजी येऊन पडली. आतां ह्यांची व्यवस्था कशी करायची ! मजजवळ तर कांहीं नव्हतें. नाणाजींचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कसे येणार ? टिळकांनीं मला आमंत्रणाची वर्दी देतांच मी एखाद्या कृपणासारखी बोलूं लागलें,

" पण पैसे ? "

" हं ! त्याचं काय घेऊन बसली आहेस ? सारं ठीक होईल. "

" तुमचं ठीक आहे. पाहावं लागेल मला. "

" तुझी फारच घाई. अजून आठ दहा दिवस आहेत. पुढें पाहातां येईल. "

" तुमचं हें असंच. गाडी आली तरी पाहतां येईल अन् ती निघून गेली तरी पाहातां येईल. मग पाहून काय उपयोग ? "

" जगांत मला काय मान आहे पण तुला त्याचं कांहीं वाटत नाहीं. "

" मला वाटत नाहीं कसं ? नाहीं तर मी पाहुण्यांच्या खाण्यापिण्याची

दिलीं व पुढें ते तसेच कोठें निघून गेले.

मी दुपारीं निजलें तों बाहेर चार वाजेपर्यंत एक एक एक एक पाहुणी जमूं लागली. मी आपली आंत घोरतेंच आहें. थोड्या वेळानें बाहेर आलें तों बाहेर बायांचा घोळका. बाया माझ्या तोंडाकडे पाहताहेत, मी त्यांच्या तोंडाकडे पाहात आहें. दोन्हीहि आपापल्यापरी आश्चर्यात गढून गेल्या आहेत. असा तो अजब देखावा होता. माझे बंधु बापू नामाजी आढाव ह्यांच्या पत्नी सावित्रीबाई व मुली सरू व बारू ह्याहि आल्या होत्या. त्या हळूच माझ्या कानाशीं येऊन म्हणाल्या, 'वन्सं, हा काय प्रकार आहे? आम्हांला तर साहेबांनीं चहाला बोलावलं आहे आणि इथें तर सर्व शांत दिसतं आहे.'

आत्तां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. मी म्हणालें, 'वहिनी, आतां तुम्ही सरू-बारूला हाताशीं घेऊन करा चहा.' सावित्रीबाईनीं चहाला आधण ठेवलें, सरू-बारूनीं चहाची तयारी केली. गूळ घालून हारोळ्या केल्या. जवळ असलेला एकुलता एक रुपया देऊन नोकराला गांवांत पाठविलें. त्यानें टरबुजें-खरबुजें आणलीं व आमची ती पार्टी साजरी झाली! बाया गेल्या. टिळक आले.

"कां हो बायांना बोलावलें?"

"मग तूं अबोला धरलास तर तुला बोलायला कसं लावायचं?"

आमचा अबोला सुटला.

* * *

टिळक रा. रा. होते ते रेव्हरेंड झाले. ती गोष्ट अशी–'व्हॉलंटिअर्स' चळवळ त्यांनीं सुरू केल्यानंतर त्यांच्याकडे पुष्कळ धर्मसमीक्षक येऊं लागले. टिळक म्हणूं लागले, कोणाचा बाप्तिस्मा करायचा झाला तर ज्याला परमेश्वरी संदेश असेल त्यानें तो खुशाल करावा. तेवढ्यासाठीं बाप्तिस्मा करणाराची दीक्षाच झालेली असली पाहिजे असें नाहीं व त्यांनीं रेव्हरेंड–म्हणजे दीक्षित–नसतांहि कांहीं बाप्तिस्मे केले.

टिळकांच्या ह्या कृत्यामुळें कांहीं लोकांना मोठा 'शॉक' बसला. बरें आपल्या मनाची खात्री झाल्यावर एखाद्या गोष्टीपासून त्यांना परावृत्त करण्याची

ब्रह्मदेवाची आज्ञा नव्हती. तेव्हां आतां काय करावें असा पुष्कळांना मोठा पेंच येऊन पडला. लोकांना काय वाटेल ह्याची टिळक थोडीच पर्वा करताहेत ! कोणी बाप्तिस्मा घेण्यास आला कीं ते त्यालां एखाद्या रेव्हरेंडकडे पाठविण्याऐवजीं स्वतः त्याचा बाप्तिस्मा करून मोकळे होत. बरें इतक्यावरहि ते स्वस्थ बसत नसत. ते ह्याबद्दल वादविवादहि करीत. राहुरीस त्यांच्या हातून अशा रीतीनें दोन तीन बाप्तिस्मे झाले. मग दीक्षित मंडळींत काय ठरलें कोणास ठाऊक पण टिळकांचीच दीक्षा होणार असें ऐकूं आलें.

मिशनची वार्षिक सभा त्या वर्षीं राहुरींत भरणार होती व त्या सभेंतच टिळकांची दीक्षा होण्याचें ठरलें.

तारीख पहिली होती. दीक्षा पुढें पंधरा दिवसांनीं असेल. आतां डॉ. ह्यूमचा पगार नव्हता. वाटेल तेव्हां त्यांच्याकडे जाऊन पैसे आणतां येत. ते आमच्या उधळपट्टीवर रागावले तरी दोन दोन महिने आगाऊ पगार देत. पण आतां पहिली तारीख उलटून गेली तरी पांच पांच सहा सहा दिवस पगार येत नसे. सभेला बाहेरगांवची जेवढी मंडळी आली होती, तेवढ्यांना टिळकांनीं तीन वेळचें जेवणाचें व चहाचें आमंत्रण देऊन ठेवलें. मला नुसती वर्दी दिली. मला काळजी येऊन पडली. आतां ह्यांची व्यवस्था कशी करायची ! मजजवळ तर कांहीं नव्हतें. नाणाजींचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कसे येणार ? टिळकांनीं मला आमंत्रणाची वर्दी देतांच मी एखाद्या कृपणासारखी बोलूं लागलें,

"पण पैसे ?"

"हं ! त्याचं काय घेऊन बसली आहेस ? सारं ठीक होईल."

"तुमचं ठीक आहे. पाहावं लागेल मला."

"तुझी फारच घाई. अजून आठ दहा दिवस आहेत. पुढें पाहातां येईल."

"तुमचं हें असंच. गाडी आली तरी पाहतां येईल अन् ती निघून गेली तरी पाहातां येईल. मग पाहून काय उपयोग ?"

"जगांत मला काय मान आहे पण तुला त्याचं कांहीं वाटत नाहीं."

"मला वाटत नाहीं कसं ? नाहीं तर मी पाहुण्यांच्या खाण्यापिण्याची

काळजी कशाला करीत बसलें असतें ? सर्व असंच म्हणतील कीं बाबा चांगला, बाई वाईट, पुरेसं पाणी देखील पिण्याला नाहीं. मी पहिल्यापासून म्हणतच होतें रानांत घर बांधूं नका."

"पाण्याचं काय घेऊन बसली आहेस. एकाच्या जागीं दहा पखाली लावूं."

"पण ह्या दहा पखालींतलं पाणी सांठवायचं कशांत ?"

"मला वेळ नाहीं तुझ्याशीं वादविवाद करीत बसायला, वेळेला सारं कांहीं होईल."

असें म्हणून टिळक गेले आपल्या कामाला निघून. व संध्याकाळीं सहा–सात दिवसांकरतां ते सोलापुरास निघून गेले ! त्यांच्यामागें चोरांनीं अगदीं पिसाळून सोडलें. चोरी मात्र कांहीं झाली नाहीं. मीं राजारामजी चांदेकर व भास्करराव भांबळ ह्यांच्याकडे जाऊन त्यांना म्हटलें, 'पाहा बाबांनो, आतां माझी वेळ तुम्ही संभाळा. तुमचे काय पैसे खर्च होतील ते मी पगाराला देईन. सर्व खरी स्थिति ही अशी आहे.' त्यांनीं सांगितलें, 'बाई, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. आम्ही सर्व व्यवस्था करतों' व त्यांनीं खरोखर म्हटल्याप्रमाणें सर्व कांहीं व्यवस्था केली.

टिळकांच्या मागें गोसावी, बैरागी बोकेसंन्यासी नेहमीं गोळा होत. टिळकांना ते आपल्या अडचणी सांगत व त्यांचा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसे. पण ह्यांच्यापैकीं बहुतेक ढोंगी व लबाड असत. हे लोक कांहीं दिवस राहात, खात पीत, लत्ताकपडा उपटीत व मग हळूच आपला मार्ग सुधारीत. कांहीं जण हें सर्व करून मला मुलांना त्रास देत. तरीहि तें कधीं टिळकांच्या लक्षांत येत नसे. ते नेहमीं ह्या गणांचीच कड घेऊन माझ्याशीं भांडत. असाच एक बोवा आला. टिळकांनीं त्याला आश्रय दिला. त्याचा पुढें त्यांनीं बाप्तिस्माहि केला. त्याला कोठेंसें कामालाहि लावून दिलें.

टिळकांच्या दीक्षेच्या वेळीं हे महाराज बरोबर आणखी चार साधू घेऊन आले होते. बरोबर एक बाटलीहि आणली होती. ती मजजवळ देऊन बुवा म्हणाले, 'मा, ये मेरा दवा है. अच्छा तरहसे रख देव.' मीं ती बाटली

कुलुपांत ठेवून दिली. टिळक चर्चमध्यें होते. पोरीसोरी लहानालीं कामें उरकीत होत्या. बाया स्वयंपाक करीत होत्या. मी कमरेला किल्ल्यांचा जुडगा खोवून इकडे तिकडे पडेल तें काम उरकीत होतें. एकाचा सुमार, बुवांची दवा घेण्याची वेळ झाली. 'मा, जरा कुंजी देव.' मीं किल्ली दिली. दवा घेऊन बुवा चुलीकडे गेले. तेथें बसून तिंबलेल्या कणकीचे कवठाएवढाले गोळे करून ते चुलींत पिंडदान करूं लागले. बाया मोठमोठ्यानें ओरडूं लागल्या, मुली घाबरल्या, बुवा उठून मुलींच्या अंगावर धावून गेले.

इतक्यांत निळकंठरावमामा चर्चमधून घरीं आले. त्यांचा आज बाप्तिस्मा होणार होता. टिळकांच्या दीक्षेनंतर तेच त्यांचा बाप्तिस्मा करणार होते. बुवांचा हा गोंधळ माझ्या ध्यानांत यायला व निळकंठराव घरीं यायला एकच गांठ पडली. मी म्हणालें, 'मामा, हा काय दंगा! तुम्ही तरी त्याला बाहेर काढा.' मामा जों त्याला आणायला गेले तों तो त्यांच्याच मागें सुरी घेऊन लागला. 'तूं बदमाष आहेस. पाहातों आज तुझा कसा बाप्तिस्मा होतो तें.' असें म्हणतांच दोघांची झटापट सुरू झाली. जर का मामांच्या पोटांत सुरी गेली असती तर भलतेंच कांहीं झालें असतें. मीं हळूच बुवाच्या हातांतून सुरी काढून घेतली. मग मामांना एका खोलींत जा म्हणून खूण केली. त्यांनीं त्याप्रमाणें करून आंतून कडी लावून घेतली. मीं बुवांना म्हटलें, 'बुवा, माझाहि त्यांच्यावर विश्वास नाहीं. फार वाईट माणूस आहे तो. चला, तुम्हांला दवा पाहिजे ना!' बुवा खुलले. त्यांना दवा असलेल्या खोलींत नेलें व अशा दोन थोबाडींत लगावल्या कीं बुवांच्या डोळ्यांपुढें काजवेच चमकूं लागले असतील. तो चटकन् पायां पडायला लागला. त्याची दारू खाडकन् उतरली. "मा, पांव पडतां हूं! पपा को मत बोलो' असें म्हणून तो पुन्हां माझ्या पाया पडूं लागला. तो नमलेला पाहून मला अधिकच अवसान आलें. मीं त्याला एका कोपऱ्यांत बसायला सांगितलें व तो निमूटपणें तसा बसलेला पाहून बाहेर चटकन् येऊन दाराला बाहेरून कडी लावून घेतली. बाहेर आल्यावर मग मामांची मुक्तता केली.

चर्चमधील सर्व दीक्षाविधि वगैरे आटोपून टिळक घरीं आले. जेवणाच्या वेळीं

त्यांना बुवांची आठवण झाली. मीं त्यांना सर्व प्रकार सांगितला. टिळकांच्या पायांत अगदीं नव्या कोऱ्या वहाणा होत्या. त्यांनींच टिळकांनीं त्याची यथेच्छ पूजा केली व ताबडतोब त्याला तांग्यांत घालून त्याच्या शिष्यगणासह स्टेशनवर रवाना केलें. दोन वर्षांनीं बुवांचें पत्र आलें. त्यांत आपली आतां फार सुधारणा झाली असल्याचें त्यानें लिहिलें होतें. मात्र पुढें कधीं त्याचें वृत्त ऐकूं आलें नाहीं.

दीक्षेच्या पाहुणेमंडळीची व्यवस्था टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं इतकीहि काळजी न करतां पार पडली. संतकाका आले होते. त्यांनीं बरोबर तीस रुपये आणले होते. सामान सांठवून न ठेवतां लागेल तसतसें आणून देण्याचा त्यांचा क्रम होता. ते म्हणत, 'ताई, तुम्ही कांहीं काळजी करूं नका. मी बाजारांत जायला चांगला खंबीर आहें. सामान संपलं कीं मला सांगत चला.' आणि त्यांच्या खरोखरच बाजारांत एकसारख्या खेपा होत होत्या. राजारामजी व भास्करराव ह्यांची मदत पहिल्यापासून होतीच. शिवाय बापू नामाजी आढावांचें सर्वच कुटुंब आमच्या घरीं मदत करीत होतें. तरी ह्या सर्व पाहुणचारांत बापू नामाजीच्या कांहीं बोलण्यावरून कांहीं मंडळी रुसली! मला फारच राग आला होता. ही मंडळी रुसून नदीकांठीं जाऊन बसली होती. त्यांची समजूत करायला मी गडबडीनें तिकडे चाललें होतें. इतक्यांत समोरून डॉ. फेअरबँक आले. त्यांनीं विचारलें, 'बाई, कुठें चाललांत इतक्या गडबडीनें?' मीं म्हटलें, 'माझे व्याही-जांवई रुसले आहेत त्यांची समजूत करायला जातें!' साहेब म्हणाले, 'बरं, तुम्ही जाऊं नका. मी आणतों त्यांची समजूत करून.' रात्रीं आठाच्या सुमाराला शेवटलीं जेवणीं झालीं. राजारामजी चांदेकर, कांबळे वगैरे मंडळी वाढायला होती. जेवणीं झाल्यावर मीं पदर खोंवला व पाहुणे मंडळीला थांबवून म्हणालें, 'तुम्ही सर्व मंडळीचे पुढारी आहां. पुढारीपण असं नसतं. ख्रिस्त सेवा करायास आला आहे, सेवा करून घेण्यास नाहीं असं तुम्ही पुलपीटवरून सांगतां आणि इथें विनाकारण माझ्यावर रुसलांत! उलट तुम्हीं माझं साह्य करायला हवं होतं. आपल्या भाषणांत सांगतां आपण सर्व देवाचीं लेंकरं आहों, सर्व एकमेकांचीं बहीणभावंडं आहों. मी तुमच्या घरीं पाहुणी आलें तर

घरांत जाऊन माझ्या भावजयांचं साह्य करीन. काय करूं काय नाहीं असं तिला विचारीन आणि आज तुम्ही मला तुमच्या मागें धावायला लावलं ! '

माझे श्रोते म्हणाले, ' बाई, आम्ही तुमच्यावर रुसलों नव्हतों. '

' मग बापूराव आढावावर रुसलां होतां ना ? काय हो, त्यांनीं असं काय म्हटलं होतं कीं तुम्हीं त्यांच्यावर एवढं रुसावं ? स्वस्थ आंघोळी करून या एवढंच ना ? मग आतां जेवतांना स्वस्थ होऊं द्या असं म्हटलं तेव्हां नाहीं तुम्ही रुसलां ? ह्यांत राग येण्यासारखं काय होतं ? आतां तुमचा राग गेला ना ? मग ज्यांचा राग गेला असेल ते हात वर करा पाहूं ! '

सर्वांनीं हात वर केले !

इकडे माझें लेक्चर होत होतें तों तिकडे उरलेलें अन्न चोरीस जात होतें. पाहुणे मंडळी गेल्यावर आम्ही उरलेलीं माणसें पाहातों तों भात चोरीस गेलेला ! आम्हीं थंडा फराळ केला.

रानांत घर बांधल्याबद्दल दुसऱ्या दिवशीं टिळकांचा व माझा पुन्हां खटका उडाला.

" आधींपासून व्यवस्था नसली म्हणजे हा असा त्रास होतो पहा. "

" कोणता त्रास ? मला तर नाहीं कांहीं त्रास वाटत विशेष. "

" तुम्हांला नाहींच हो त्रास झाला. पण आम्हांला पाहा ना किती त्रास झाला तो. "

" तूं त्रास करून घेतेस त्याला काय इलाज ? पण त्रास न करून घेतला तर कांहीं राहातं का ? वेळेला सर्व कांहीं होतं. "

" सर्व कांहीं काय होतं ? पाण्याची देखील सोय नव्हती. केवढी पाण्याची तूट पडली. मी आधींपासून सांगत होतें अशा जागीं घर बांधूं नका म्हणून; चोराचा त्रास, माणसांची वाण, पाण्याचा दुष्काळ ! "

" पाण्याचा दुष्काळ ? चिमबाबा, आण रे टिकाव पावडं, आपण विहीर खणूं ! "

चिमबाबा आधींच म्हातारा, त्यांत तीन जागीं वांकडा, तो कमरेवर

हात देऊन त्यांच्यापुढें आ वासून उभा राहिला.

“ साहेब, ह्या जागीं पाणी लागत नाहीं. ”

“ लागत नाहीं म्हणजे काय ? चल मी सांगतों तिथें टाक टिकाव ! ”

चिमबाबा काय नोकरमाणूस. हुकमाचा ताबेदार. त्यानें टिकाव पावडें आणलें व टिळक त्याला घेऊन विहीर खणण्याला निघाले ! घरापासून तीन चारशें हातांवर विहीर खणण्यास सुरुवात झाली. टिळक व चिमबाबा खणीत. मी, दत्तू, तारा आम्ही माती वाहूं लागलों. पाहुणे-राहुणे कमरेवर हात देऊन आमची मजा पाहात; रोज थोडें थोडें करतां कमरेइतकी विहीर खणली. आमच्या विहिरीची बातमी हां हां म्हणतां चहुंकडे पसरली. एक दिवस बेलदार आले. त्यांच्याशीं टिळकांनीं दहा आणे रुमालाची बोली केली व पुढें ते काम करूं लागले. चांदेकरांना हें कळतांच ते धावपळ करीत आले. त्यांनीं टिळकांना सांगितलें, ‘ तुम्ही फसतां आहां. असा भलताच ठराव करूं नका ’ पण टिळकांनीं त्यांचें ऐकलें नाहीं. भास्करराव भांबळ आजारी होते. त्यांना हें कळतांच ते तसे ताप अंगांत असतांच येऊन त्यांनीं माणसें कामावरून बसविलीं. तेवढ्या वेळांत त्यांची गुडघ्याइतकी विहीर खणूनहि झाली होती; पण त्या तेवढ्याची खोदाई रुमालाच्या हिशेबानें जेव्हां काढण्यांत आली तेव्हां टिळकांच्या ध्यानांत आपली चूक आली. त्यांना वाटलें होतें कीं सर्व विहीर एक रुमालभर खोल गेली कीं १० आणे झाले. पण एक रुमाल म्हणजे एक घनफूट असा तो हिशेब होता. त्या हिशेबानें भलतीच रक्कम होऊं लागली. त्याच दिवशीं पगार आला होता. ह्या बेलदारांची कशी तरी समजूत करण्यांत आली. तरी त्यांनीं चार तासांत पंचेचाळीस रुपये नेले ! मग भास्कररावांनीं दुसरीं माणसें आणून दिलीं. विहीर एक पुरुष झाली कीं १० रुपये, दोन पुरुष झाली कीं १५ रुपये. असा त्यांचा चढता पण आटोक्यांत हिशेब होता. पांच पुरुष खोल गेल्यावर विहिरीला पाणी लागलें व तें अगदीं भरपूर व गोड होतें.

राहुरीसच टिळकांनीं पुष्कळ भजनें व अभंग लिहिले. एक दिवस टिळक

कांहीं ख्रिस्ती मंडळीसह फिरायला गेले असतां तिकडून एक दिंडी आली. ख्रिस्ती उपासनापद्धतींत पाश्चात्य संगीताला व पद्धतीला मिळालेलें प्राधान्य कमी झालें पाहिजे असें टिळकांना वाटून त्यांनीं त्याच दिवशीं 'तुज सोडूनी ख्रिस्ता जाउं कुठें,' 'ख्रिस्त गुरु माऊली' वगैरे पुष्कळशीं प्रसिद्ध भजनगीतें रचलीं. भक्तिभावानें ओथंबलेलें त्यांचे पुष्कळसे अभंगहि तेथेंच लिहिले गेले.

१९०५ व १९०६ सालीं त्यांनीं धार्मिक स्वरूपाची कविता फार लिहिली. उपासना संगीतांत ६८२ पैकीं २५४ गीतें त्यांचीं आहेत. ह्याशिवाय 'प्रभुची प्रार्थना,' व 'भजनसंग्रह' हीं त्यांचीं दोन पुस्तकें ह्याच स्वरूपाचीं आहेत. ह्यापैकीं बहुतेक ह्या काळांतील आहेत. ह्या कविता वाचल्यास त्या वेळीं टिळकांची मनस्थिति कशी होती हें दिसून येतें.

आपण बुद्धीनें प्रथम ख्रिस्ती झालों परंतु मनानें ख्रिस्ती होण्यास पुढें दहा बारा वर्षांचा काळ लागला असें टिळक म्हणत. व ह्या सुमारास तो दुसरा बदल त्यांच्यांत होऊं लागला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या अंतरीची तळमळ ह्या वेळच्या कवितांतून दिसून येते. त्यांच्या अंगीं असलेला अभिमान लयाला जाऊन ईश्वराच्या ठायीं शरण्यवृत्ति अधिका-धिक दिसून येऊं लागली.

टिळक कसल्याशा ख्रिस्ती संमेलनासाठीं जालन्यास गेले होते. घरची पाहुणे मंडळीहि पांगली होती. मात्र दत्तू पुण्याहून सुट्टीला घरीं आला होता. निळ-कंठरावमामा, त्यांचें कुटुंब, दोन मुलें, चिमबाबा, बेबी व मी इतकींच माणसें घरीं होतों.

टिळक जाण्याच्या अगोदर शहाजी भिलाला कामावरून काढून टाकलें होतें. पण तो कामावरून दूर होतांच घरावर दगड येऊं लागले. एक दिवस चोर अगदीं घराजवळ आले. निळकंठरावमामा त्यांच्यामागें लागले. जोंधळा गळया-इतका वाढला होता. हें लोळकांडें जात जात कुठल्याकुठें कोनाकोपऱ्याला गेलें होतें. आम्हीं सगळे कंदील, काठ्या वगैरे आयुधें घेऊन त्यांच्यामागें चाललों होतों. पलीकडे जोंधळयांच्या ताटांचा सळसळ आवाज येत होता त्या अनुरोधानें

आम्ही चाललों. चोर मामांच्या हातचा बेदम मार खाऊन पडलेला आढळला. छान झालें. आम्हांला वाटलें आतां चांगली दहशत बसेल चोरांना. आम्हींहि धीर करून त्याला मारायला काठ्या उगारल्या. तों मामा कण्हून सांगूं लागले, 'मी चोर नाहीं. चोर पळाला. मी मामा आहें! खरेंच मामा!' सर्वांनीं मिळून त्यांना उठवून घरांत आणलें. मामा फार म्हणत, कीं माझ्या तावडींतून कधीं चोर सुटणार नाहीं. पण त्या दिवशीं मात्र चोरांच्या तावडींतून तेच सुटले नाहींत. पुन्हां शहाजी मिलाची राखणदार म्हणून स्थापना झाली व नंतर मात्र चोरांचा त्रास कधींच झाला नाहीं.

ह्या ठिकाणीं आल्यावर माझ्या प्रकृतींत फारच सुधारणा झाली. मी इतकी फुगायला लागलें कीं कांहींच्या बाहीच. हातांत बांगड्या व गळ्यांत गळसऱ्या तटाटूं लागल्या. थोडक्यांत म्हणजे राहुरीस गेल्यावर मी चांगलीच वजनदार बायको झालें होतें. कां नाहीं होणार? स्वतःचें सत्तेचें घर, मनाप्रमाणें सर्व कांहीं जेथल्या तेथें व्यवस्था. दारीं एक सुंदर बगीचा केला होता. त्यांत कांहीं एरंडाचींहि झाडें होतीं! एरंड्या निघाल्यावर त्यांचें मडकें भरून ठेवलें. नंतर त्या एरंडाचें गुऱ्हाळ माझ्या डोक्यांत सुरू झालें. प्रत्येक गोष्टीचा कांहीं तरी उपयोग झालाच पाहिजे! सर्व कांहीं स्वतः करायचें व सगळ्या गोष्टींचा उपयोग करून घ्यायचा हें माझें चाललें होतें. त्यांत अगदीं माझ्याच वृत्तीचा चिमबाबा मला मिळाला होता. आम्हीं दोघांनीं मोटांचे नाडे, सैंदर वगैरे जिन्नस मुलांच्या गाद्यांचा दानधर्म करून उरलेल्या काथ्याचे बनविले होते. औषधें वगैरेहि तयार करण्याचा नाद मला होताच. मडकेंभर एरंड्या पाहून त्यांचा सदुपयोग करून घेण्याचें माझ्या डोक्यांत आलें. मी चिमबाबाला म्हटलें, चिमबाबा एक कपभर एरंड्या सोल बघूं. त्यानें त्या सोलल्यावर त्या बारीक वांटून त्यांत दालचिनी व सुंठ घातली व गायीच्या तुपांत त्या भाजल्या. मग साखरेचा पाक करून एरंड्यांची बर्फी बनविली! ती फारच छान लागत होती. एखादा जिन्नस एकटीनें खायचें माझ्याच्यानें कधींच होत नाहीं. पण ही बर्फी तयार होईपर्यंत सारीं माणसें झोपीं गेलीं होतीं. दत्तू तेवढा जागा

होता. दत्तूनें थोडा भुगा खाल्ला. मींहि उरलेल्या भुग्याचा चट्टामट्टा केला. बेबी घेईना. तिला झोप येत होती, मग आम्ही निजलों.

पहांटें दत्तूला अभ्यासाला उठवून बसविलें. पण तो कांहीं बसेना. माझी सरबत्ती सुरूं झाली. 'तूं कधीं अभ्यास करीत नाहींस. पुढें भीक मागायची का? चांदेकर नेहमीं म्हणतात, तूं कधीं अभ्यास करीत नाहींस.' दत्तू म्हणाला, "आई, मी खरंच सांगतों. माझं डोकं फिरतं आहे."

"अभ्यासाच्याच वेळेला कसं तुझं डोकं फिरत असतं?"

माझें हें बोलणें ऐकून तो जुलमानें उठून बसला तों धपकन् खालीं पडला. मी त्याला उठवायला गेलें तर मलाहि सारें फिरतें आहे असें वाटूं लागलें. आणि मग आमच्या दोघांच्या हालाला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत आमची कॉलरा झालेल्या माणसासारखी स्थिति झाली. चिमबाबा घाबरला. तो टिळकांना तार करूं म्हणत होता. शेवटीं मीं त्याला डॉ. बालंटाईनकडे पाठविलें. चिमबाबानें बालंटाईनसाहेबांना सर्व प्रकार सांगितला, साहेब फार रागावले. ते म्हणाले,

"अरे बाबा! ती बाई फार वाईट आहे. ती नेहमीं असेंच भलतें सलतें करून खाते. नवऱ्याला देते. मुलाला देते. मला पाठविते. नवऱ्याचे डोळे तिनेंच असें त्याला कांहीं कांहीं खायला घालून बिघडवून टाकले."

बालंटाईनसाहेबांची कल्पना झाली, कीं मी कांहीं तरी पक्वान्न करून खाल्लें. नुकतेंच एक दोनदां त्यांना मी पुरण्याच्या पोळया व लाडू पाठविले होते. त्यांचें तेव्हांपासून असें मत झालें होतें, कीं मी रोज रोज पक्वान्नें खातें व दुसऱ्यांना खायला घालतें.

असो; पण हे साहेब भडकले होते तरी फार सहृदय होते. त्यांनीं ताबडतोब आम्हांला औषधें दिलीं व नुसत्या मोसंब्यावर आम्हांला ठेवलें. मग आम्हांला आराम पडला. हा प्रकार शुक्रवारीं झाला. मी रविवारीं चर्चला येतें माझ्यांत इतका फरक पडलेला दिसून आला, कीं मला कोणीं ओळखलें सुद्धां नाहीं.

जें तें मला विचारूं लागलें, कीं बाई तुम्ही काय उपाय केला सांगा. पण मी कधीं कोणाला माझा उपाय सांगितला नाहीं व ती बर्फीसुद्धां कोणाच्या हातीं लागूं दिली नाहीं. चिमबाबानें अगदीं विश्वासानें ती खोल पुरून टाकली.

टिळक जालन्याहून आल्यानंतर माझा शारीरिक फरक पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. मात्र अघोरी म्हणून त्यांनीं शेरा मारला.

आम्ही राहुरीस आलों तसे सखाराम भावोजीहि राहुरीस येऊन तेथें वकिली करूं लागले होते. टिळक जालन्याला जातांना त्यांच्या घरीं भेटायला गेले होते. त्यांच्या भावजयीनें त्यांना तवा, कढई वगैरे जिनसा आणण्यास सांगितल्या होत्या. टिळकांनीं त्या अगदीं न विसरतां आणल्या व स्वतः त्यांच्या घरीं त्या नेऊन दिल्या. त्यावेळीं रखमाईनें टिळकांना त्या जिनसांची किंमत विचारली. टिळकांना आपल्या भावजयीचा त्यामुळें फार राग आला व दोघांचें कांहीं भांडण झालें. नंतर टिळक घरीं आले व तें भांडण विसरून गेले.

रात्रीं जेवणीं खाणीं संपून टिळक जाऊन निजले; इतक्यांत दाराशीं एक तांगा येऊन उभा राहिला. आंतून भाऊजी उतरले ते अगदीं घामाघूम झाले होते. त्यांच्या तोंडावर सहा महिन्याच्या दुखणेकऱ्याची कळा आली होती. त्यांना पाहून मी घाबरून गेलें. मी म्हटलें,

"भाऊजी, काय झालें? घरीं सगळीं बरीं आहेत ना?"

"हो! पण नाना कसा आहे?"

"म्हणजे? ते जेवून आतांच निजले. चांगले आहेत ते."

"हें पहा त्यांचें पत्र. मी घरीं आलों तों हें हातीं आलें. ते म्हणतात हेंच तुला माझें शेवटचें पत्र. ह्यापुढें तुला माझें तोंड दृष्टीस पडणार नाहीं."

आतां माझ्या ध्यानांत सर्व प्रकार आला. मीं त्यांना सर्व कांहीं सांगितलें. भाउजींचा जीव खालीं पडला व ते घरीं गेले.

* * *

राहुरीस असतांना आमच्याकडे एक कवि आले होते. त्यांनीं नुकताच

पोलीसच्या नोकरीस रामराम ठोकला होता. पुढें काय करायचें हें त्यांचें ठरलें नव्हतें. पण त्यांनीं खूप कविता रचल्या होत्या. व आणखी खूप रचण्याचा त्यांचा मानस होता. त्यांच्या कवितांतील एका कवितेचा आरंभ 'नको ही पोलिसची चाकरी' असा होत होता. पोलिस खात्यांतील आपले गमती गमतीचे अनुभवहि ते पुष्कळ सांगत. आतां नाटकें रचून पुढचा काळ घालवावा असें त्यांच्या मनांत आलें व त्यांनीं ताबडतोब नाटक लिहिण्यास घेतलें. त्यांचा कारकून दत्तू. त्यांनीं सांगावें व ह्यानें भराभर उतरून घ्यावें. ते कविता तर जणूं कांहीं पाठ म्हणून दाखविल्याप्रमाणें बोलतां बोलतां करीत. नाटक प्राचीन हिंदुस्थानांतील कांहीं ऐतिहासिक कथानकावर होतें. त्यांत "कोणि कोणि चंदनाचि उटणिं लाविती" असें एक गाणें होतें. हें नाटक एखादा अंक लिहून झाल्यावर संपलें! कविराज आपल्याबरोबर एक बायकोहि घेऊन आले होते! अर्थात् ब्राह्मणाची बायको आमच्या घरांत कशी राहील? ती राही शेजारच्या बिरोबाच्या देवळांत—तिकडेच स्वैंपाक करी. फारशी आमच्यासमोर येतच नसे. मी म्हणे कविराज ही ब्राम्हणाची बायको आणि हिच्या गळयांत मंगळसूत्र कसें नाहीं? ते म्हणत, अहो बाई, हिला लहानपणापासून मराठ्यांचा सहवास म्हणून नसेल घालीत.

बायकोला आपला जाच आहे व आपण तिला खूप छळतों असें दाखविण्यासाठीं त्यांनीं आंत जाऊन तिला मारण्याचें नाटक करावें. तिनें खोटेंच रडावें. पण रडतां रडतां मधूनच दोघांचाहि हंसण्याचा आवाज एखादे वेळीं येई. तेव्हां मी ओळखलें होतें कीं हें सारें नाटक आहे म्हणून. पण तशी ओळख मात्र कधीं दिली नाहीं.

असो. ह्या कवींची ही त्यावेळची माहिती कांहींहि असली तरी पुढें ते एक भगवद्भक्त म्हणून फार प्रसिद्धीला आले व त्यांची ती प्रसिद्धी यथायोग्यहि आहे.

* * *

टिळकांना पुन्हां नगरचें आमंत्रण आलें. नगरास डॉ. ह्यूम ह्यांचा ईश्वर-

विद्येचा वर्ग होता. त्यांत शिकविण्याचें काम टिळकांना होतें. पण मध्यंतरीं त्यांनीं मिशनचें काम सोडून देऊन राहुरीस वास्तव्य केलें होतें. आतां डॉ. ह्यूमसाहेबांनीं त्यांना पुन्हां मोठ्या आग्रहानें बोलावलें व टिळकांनीं तें कबूल केलें. पुन्हां नगरास आमच्या जुन्या घरीं रहायला आलों. राहुरीचें घर, शेत, विहीर वगैरे सारें शहाजी भिलाच्या ताब्यांत देऊन आम्ही सारें परत नगरला आलों.

# नगरांतील ते दिवस

राहुरी सोडून आम्ही नगरास आलों ते फर्ग्युसन गेटच्या त्याच जुन्या घरांत राहूं लागलों. बरोबर आम्ही आमच्या चिमबाबाला आणलें होतें. मोठा सज्जन, सरळ आणि विश्वासू माणूस होता तो. शहाजी भिल्ल सहा रुपये दरमहा घेऊन राहुरीला आमचें घर संभाळीत होताच.

नगरास पोंचल्यावर आमच्याकडे एक गोसावी आला. तो आमच्या घरीं राहूं लागला. त्याचें बोलणें नेहमीं विरक्तीचें असे. "देव सच्चिदानंद आहे. तोच एक आहे. बाकी सारें मिथ्या आहे. संसार ही माया आहे. त्यांत प्राणी बुडतो आहे. आपण कोठून आलों व कोठें चाललों याची त्याला जाणीव नाहीं. हा सारा भास, पण ह्या भासालाच भुलून माणूस देवाला सोडून फिरत आहे. कोणाची बायको, कोणाचीं मुलें, पैसा कोणाचा, घर कोणाचें, सर्वसंगपरित्याग करायला पाहिजे."

"गुरुजी, आपण दोघे मिळून कांहीं सेवा करूं. आपल्यामागें कांहीं व्याप नको. कांहीं उपाधी नको. मला वाटतें, आपलें राहुरीचें घर विकून जो कांहीं पैसा येईल त्या भांडवलावर एक दुकान काढूं आणि दुकानांत जो फायदा होईल तो जनसेवेसाठीं खर्च करूं. मग कोणी गरजू आला तरी त्याला कांहीं अडचण पडणार नाहीं." साधुबोवांच्या ह्या असल्या गप्पा चालत, त्या मी लक्ष लावून ऐकत असें. टिळकांनाहि घराची घिरघिर वाटत होतीच. तेहि म्हणूं लागले, कीं घर जर विकलें तर आलेल्या रकमेंतून आपल्याला पुष्कळशा लोकोपयोगी कार्यास हातभार लावतां येईल व पुष्कळ कामें करतां येतील.

एक दिवस घरांत पाण्याचा ठणठणाट झाला. नगरांत त्या वेळीं पाण्याचा आधींच दुष्काळ. टिळक निजले होते. त्यांच्याजवळ बुवा बसले होते. मीं तेथें त्यांच्यापुढें एक भला मोठा पाण्याचा रिकामा हांडा नेऊन ठेवला.

" हं घ्या बुवा ! तुम्हांला सेवा करायला पाहिजे ना ? घरांत आज पाण्याचा थेंब नाहीं. चला तुम्ही, दत्तू व बेबी आज पाणी भरा. हें सर्व स्वप्न आहे, माया आहे. तेव्हां त्याचें मनावर घेण्याचें कारण नाहीं."

बुवा पाणी आणण्याची कां कूं करूं लागले. मी दुसरा डोस दिला,

" हें पहा बुवा, मी भाकरी भाजायला बसलें व हात पोळले म्हणजे माझ्या हाताला येणारे फोड कांहीं मला मायेचे फोड वाटत नाहींत. मला त्या वेदना सहन होत नाहींत. पण तुमची सर्व मायाच असल्यानें तुम्हाला कांहीं हरकत नाहीं. तुम्हांला हो कसला त्यांत विधिनिषेध वाटायला हवा ? "

टिळकांनाहि माझें बोलणें पटतें आहे असें पाहून बुवा पाणी आणण्यास उठले. कण्हत कुंथत एक दोन हांडे पाणी भरल्यावर मीं त्यांना स्पष्ट सांगितलें, कीं तुमची ही माया केवळ आमच्या राहुरीच्या घरावर आहे. ही खोटी माया आहे, तेव्हां उद्यांपासून तुम्ही आपला रस्ता सुधारा !

दुसऱ्या दिवशीं बुवा गेले, पण तेवढ्यानें घरामागची ग्रहदशा आटोपली नाहीं.

एक ख्रिस्ती माणूस कर्जानें अगदीं गांजला होता. होतां होईल तों कर्ज-बाजारी माणसाला कामावर ठेवूं नये असा एक अमेरिकन मिशनचा नियम होता. ह्या माणसाचें काम गेलें तर बिचाऱ्याची फारच वाईट स्थिति झाली असती. टिळकांच्या पोटांत तुटूं लागलें. पण पोटांत तुटून उपयोग काय ? त्याला द्यायला घरांत काय होतें ? टिळकांच्या डोळ्यांपुढें पुनः राहुरीचें घर नाचूं लागलें. पण मी !

शेवटीं एक दिवस राहुरीस जाणार आहें असें सांगून टिळक गेले. दोन तीन दिवसांनीं ते परत आले. आल्याच्या दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मजजवळ सहाशें रुपये ठेवायला दिले आणि सांगितलें हे पैसे ह्यूमसाहेबांचे आहेत, उद्यां अमूक

अमूक गृहस्थ येणार आहेत. त्यांच्यापासून कर्जरोखा लिहून घेऊन पांचशें रुपये त्यांना द्यायचें. मी पक्की होतें! मीं म्हटलें, 'ह्यूमसाहेबांचे पैसे आणि आपण कर्जरोखा लिहून घ्यायचा म्हणजे हें काय प्रकरण आहे?'

'हें बघ, साहेबांना हे पैसे मिसेस ह्यूमच्या न कळत द्यायचे आहेत!' हें बोलणें मला पटलें. मला वाटलें ज्याप्रमाणें टिळकांना माझें भय वाटतें त्याचप्रमाणें ह्यूमसाहेबांना मिसेस ह्यूमचें भय वाटत असेल!

दुसऱ्या दिवशीं गृहस्थ आले, त्यांना पैसे दिले व रोखा लिहून घेतला. उरलेले पैसे बाजूला ठेवून दिले.

हळूंहळूं घर विकल्याची बातमी माझ्या कानांवर आली! आणि तें अगदीं सालंकृत कन्यादान! घर, घरांतील सामान, खुर्च्या, बांक, फळया, घडवंच्या, दिवे, पलंग, पाळणा, चिमबाबानें आणि मीं मिळून वळलेलीं काथ्याचीं दोरखंडें! ह्या वेळेस ताटाबरोबर कांठहि गेला!

नुसत्या विहिरीलाच पांचशें रुपये खर्च आला होता. पण विहिरीबरोबर शेत गेलें आणि शेताबरोबर घरहि गेलें! पण शंभर रुपये वर आले! शिवाय दरमहा शहाजीला द्यावे लागत होते ते सहा रुपये वांचले! हा काय कमी लाभ झाला?

मीं टिळकांना म्हटलें.

"घर विकलें त्याचे पैसे कोठें आहेत?"

"चांगले सुरक्षित आहेत. डॉ. ह्यूमजवळ ठेवले आहेत. उगाच त्रास देऊं नकोस."

"त्यांतील सामान?"

"अग घर गेल्यावर सामान कोठें ठेवायचें?"

"म्हणजे पाळणा दिवे हे विकण्यापर्यंत पाळी आली होती का? तें कांहीं नाहीं, दिवा न् पाळणा मला पाहिजेत. हें काय असें अशुभ!"

"किती खुळचट कल्पना आहेत तुझ्या?"

"पण हें सारें विकायला काय कोठें अडलें होतें?"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

"मी काय म्हणतों तें तुला कळत नाहीं. विनाकारण सहा रुपये महिना द्यावा लागत होता ना!"

दोन तीन दिवसांनीं मिसेस ह्यूम मजकडे भेटायला आल्या, त्यांना मीं विचारलें,

"काय हो मडमसाहेब, आमचे सहाशें रुपये तुमच्याकडे ठेवले आहेत ना?"

"कशाचे?"

"राहुरीच्या घराचे?"

"नाहीं कांहीं! ते तर टिळकांनीं त्या गृहस्थाला कर्ज फेडायला दिले!,"

माझें तोंड अगदीं पाहाण्यासारखें झालें. टिळक घरीं आल्यावर मीं त्यांना विचारलें. ते म्हणाले,

"हो, दिले मीं ते त्या माणसाला! काय म्हणणें आहे तुझें?"

"पण हें तुम्हीं अगोदर कां नाहीं सांगितलें?"

"हो सांगितलेंहि असतें. पण मग तूं मला हे पैसे देऊं दिले असतेस का?"

घर गेलें. घर बांधून देणारे गेले. घेणारे गेले. डोळ्यांचें पाणी गेलें. पाणीदार आठवणी मात्र अजून आहेत. पांचशें रुपये गेले. रोखा तेवढा अगदीं आतांपर्यंत कायम होता. उरलेले शंभर रुपये कांहीं दिवस बँकेंत टाकले नंतर त्यांत आणखी वीस रुपये घालून एक म्हैस घेतली. म्हैस दिसायला फार सुंदर होती. पण दूध बेताचें द्यायची व दर खेपेस तिला व्हायचे टोणगे. तेव्हां तिच्या मालकानें ती आमच्या गळ्यांत बांधली! पण मागाहून तो पस्तावला; कारण आमच्याकडे आल्यापासून तिला साऱ्या पारड्या झाल्या, त्याहि लौकर लौकर झाल्या आणि म्हैस दूधहि भरपूर देऊं लागली!

ह्या म्हशीचें टिळक पुष्कळ करीत. ह्या म्हशीवरूनहि आमचीं मधूनमधून भांडणें होत. एक दिवस मीं म्हटलें, काय करावें, गोवऱ्या वाळत घातल्या, कीं चोरीस जातात. टिळकांनीं विचार करून गोवऱ्या चोरीस न जाण्यालायक एक

नामी युक्ति काढली. जवळच दत्तू आणि बेबी बसली होतीं. टिळक म्हणाले, आपण गडी ठेवून त्याच्याकडून ह्या गोवऱ्या भाजवून घेत जाऊं, एक मोठें चुलंगण करावें. त्यावर पत्रा ठेवून वर गोवऱ्या भाजून घेतल्या व रचून ठेवल्या म्हणजे झालें काम !

टिळकांची ही युक्ति ऐकून आम्ही तिघेहि हसूं लागलों.

"मला तुम्ही सर्वजण इतका का मूर्ख समजतां ? मला कांहींच ज्ञान नाहीं असें तुमचें म्हणणें आहे का ?

"माझें एवढेंच म्हणणें आहे, कीं त्या भाजायला जो खर्च येणार तो गोवऱ्यांच्या किमतीच्या तिप्पट. शिवाय तापल्या तव्यावर टाकलेली गोवरीची राख होऊन जाणार ती वेगळीच."

"हें पाहा असाच तूं माझा जेथें तेथें पाणउतारा करतेस. काय दत्तू, तुला काय वाटतें ?"

"खरेंच पपा ? मलाहि आईप्रमाणेंच वाटतें, कीं एवढ्या खर्चांत आपल्याला लांकडेंच वापरतां येतील."

आतां तर टिळक फारच रागावले. त्यांनीं मंजुळाबाईला हाक मारून सांगितलें, कीं चूल पेटवून तव्यावर एक गोवरी थापून त्यांना आणून दाखवा. मंजुळाबाई हो म्हणून दुसऱ्या दारानें निघून गेली व टिळक आपल्या कामाला गेल्यावर हें गोवऱ्या प्रकरण विझून गेलें.

एकदां मीं ठोंबऱ्यांना सांगितलें, 'ठोंबरे पारडाला पाणी पाज बरं.' ठोंबऱ्यांनीं पाणी पाजलें. पाणी पाजल्यावर परत पारडूं जागेवर आणून बांधायच्या ऐवजीं त्यांच्या मनांत थोडी गंमत करायचें आलें. त्यांनीं पारडाच्या दोरखंडाचें एक टोंक दिलें आपल्या कंबरेला बांधून. पारडूं भरपूर दूध पीत असे त्यामुळें खूप सशक्त झालें होतें. तें लागलें ठोंबऱ्यांना ओढायला. आणि होतां होतां पारडूं पुढें व ठोंबरे मागें असे मार घराभोंवतीं घिरट्या घालूं लागले. मला वाटलें ठोंबरे पारडाला फिरवीत आहेत. पण मग पाहिलें तों प्रकार निराळाच. पारडूं त्यांना ओढीत होतें

व ते हसत होते. पण हें हसणें लौकरच थांबलें. कारण ते खालीं पडून आडवे झाले तरी पारडूं त्यांना ओढीतच होतें व ते जमिनीवर फरपटत लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें चाललेच होते. आतां बरीक ते रडूं लागले. तेव्हां मी धांवलें व पारडाच्या गळ्यांतील दोरखंड सोडून ठोंबऱ्यांना मोकळें केलें. ते एकीकडे हसत होते, एकीकडे रडत होते व एकीकडे माझ्याशीं भांडत होते. 'तुम्हींच हें केलें.' मी म्हटलें, 'मीं काय केलें. मीं पारडूं तुझ्या कंबरेला बांधलें? अन् पारडूं तुला ओढायला लागलें तेव्हां मला हाका कां नाहीं मारल्यास?' मग हळद लावून शेकून दोन तीन दिवसांनीं हा पारडूंप्रताप नाहींसा केला.

एकदां कल्याणी म्हैस सुटली व उधळली. टिळक त्या वेळेस 'लेक्चर हॉलमध्यें' वर्ग घेत होते. फर्ग्युसन गेटपासून कल्याणीबाईचा दौरा जो निघाला तो लेक्चर हॉलवरून पुढें गेला. शिकवितां शिकवितां टिळकांचें लक्ष म्हशीकडे गेलें. ते तसेंच वर्ग टाकून बाहेर पडले. एका विद्यार्थ्याच्या घरून काठी घेऊन म्हशीच्या मागें धांवूं लागले. कोट, पँट, डोक्यांत हॅट, हातांत एक वेळूची लांबलचक काठी अशा अवतारांत टिळक तिच्या मागें पळत होते. त्या दिवशीं म्हशीनें फारच त्रास दिला. ती कांहीं केल्या त्यांचें ऐकेना. शेंवटी एकदांची कशी तरी तिला घरीं आणली.

घरीं आल्यावर टिळक म्हणाले, 'अग म्हशी वळणेंसुद्धां सोपें काम नसतें. गुराख्याला किती श्रम पडत असतील बिचाऱ्याला. आपण गुराख्याला उद्यांपासून राखोळीचे पैसे दुप्पट द्यायची सुरुवात करूं. हे गरीब लोक असतात. बोलत नाहींत म्हणून आपण त्यांना थोडक्या पैशांत राबवून घेतों.' टिळकांच्या इच्छेप्रमाणें आम्ही गुराख्याला जादा राखोळी देऊं लागलों.

* * *

मिशन हायस्कूलमध्यें गॅदरिंग करण्याचें ठरलें. गॅदरिंग म्हणजे नाटक आलेंच. स्त्रीपार्टाखेरीज नाटक कराल तरच नाटकाला परवानगी मिळेल अशी अट शाळाधिकाऱ्याकडून मुलांना घालण्यांत आली. पण स्त्रीपार्टाखेरीज नाटक मिळेना.

तेव्हां नाटक लिहून देण्याचें टिळकांनीं अंगावर घेतलें. तसेंच तें शिकवायचेंहि त्यांनीं ठरविलें. नाटकाचा प्लॉट वगैरे कांहीं ठरला नव्हता व नाटक लिहिण्यास वेळहि नव्हता. लष्कराच्या भाकरी भाजण्यांत त्यांचा कितीतरी वेळ खर्च होत असे. पण मुलें कसलीं तीं. शाळा सुटली, कीं येऊनच बसायचीं ! पहिल्याच दिवशीं नाटकाचें नांव ठेवण्यांत आलें, ' शीलं परं भूषणम्. ' वेळ रोज पांचच्या पुढचा ठरला. पण प्रॅक्टिस कशाची करायची ? मुलांनीं येऊन बसावें तों कोणीतरी भेटायला हटकून यावें. मग टिळकांनीं त्या पाहुण्याशीं बोलत बसावें. कोणी नसलें तर कांहीं तरी लिहीत बसावें. नाहींतर वाचीत बसावें. कधीं कधीं एखादा गहन विषय काढून मुलांशींच वादविवाद करूं लागावें. इकडे मुलांना वाटे, कीं हे आम्हांला नाटक लिहून देतात कधीं आणि आम्हीं तें पाठ करून टाकतों कधीं. त्यांतल्या त्यांत चहाची गर्दी असायची. मध्यें स्टो, केटली, कपसॉसर, दूधसाखर, दऊत, कागद, टाक, चमचे, जवळच जमिनीवर ठेवलेला पोपटाचा पिंजरा, मांजर, दारांत कुत्रा आणि ह्या सर्वांभोंवतीं हायस्कूलचीं मुलें. आपल्यासारखा सायंटिफिक चहा कोणाला करतां येत नाहीं अशी टिळकांची खात्री असल्यानें चहाचें सर्व कंट्राट त्यांच्याचकडे असे. असो. एक दिवस नाटकाचें नांव झाल्यानंतर चारसहा दिवसांनीं पुढें बसलेल्या मुलांना नाटकांतलीं नांवें दिलीं गेलीं. तूं बाळासाहेब, तूं रे ! तूं पिल्या, तूं देवदत्त. तूं चारुदत्त.

" पण पपा, आम्हांला पाठ करायला कांहीं देतां कीं नाहीं ! "

" अरे, मला चहा बिहा तर घेऊं देतां कीं नाहीं ? "

" घ्या ना ! पण इतक्यांत कोणी आलें तर सारेंच राहून जाईल. "

मग एक दिवस एकेकाला कांहीं पार्ट लिहून द्यावा. दुसऱ्या दिवशीं मुलांची पुनः निकड लागली म्हणजे पुन्हां द्यावें, अशा रीतीनें अगदीं ग्यादरिंगच्या वेळेला नाटक लिहून व बसवून पुरें झालें. मुलें अगदीं अधीर झालीं होतीं. हें पुरें होतें, कीं नाहीं असें त्यांना वाटे. टिळक म्हणत, अरे काळजी कां करतां ? होईल पुरें. तीं म्हणत आम्ही लिहून घेतों. तुम्ही सांगा. पण तें कांहीं त्यांच्यानें कधीं झालें नाहीं. नाटक इतकें सुंदर वठलें, कीं कांहीं दिवस नगरास तो एक

चर्चेचा विषय होऊन राहिला होता.

ह्या नाटकांतील दोन तीन जण पुढें निरनिराळ्या क्षेत्रांत प्रसिद्धीला आले. नाशिकच्या कॉलेजांत आतां प्रोफेसरचें काम करीत असलेले प्रोफेसर भा. ल. पाटणकर* देवदत्त झाले होते. नगरचे रेवरेंड रामकृष्णपंत मोडक,** एम्. एल्. सी. ह्यांचा एक प्रमुख भाग होता. प्रसिद्ध नट रा. व्यंकटेश पंढारकर चारुदत्त झाले होते. पंढारकरांचा आवाज त्या वेळेस अत्यंत मधुर होता व माधवराव पाटणकरांनीं त्याच वेळेस टिळकांच्या जवळ उद्गार काढले होते कीं, हा मुलगा जर पुढें मागें नाटकांत गेला तर नांव काढील. आणि पुढें तसेंच झालें. माधवराव पाटणकरांची पाटणकर नाटक मंडळी तेथें होती व ह्यांनीं सजावटीच्या वेळीं खूप मदत केली होती.

* * *

ह्या वेळेस टिळक सोंगट्या फार खेळत व ह्या सोंगट्यांवरून सम्पादून भांडणें होत. टिळक कवड्या जुळवून टाकीत, त्यामुळें त्यांच्याशीं पुढें खेळण्याचेंहि सर्वांनीं सोडून दिलें होतें. मग ते एकटेच रागारागानें खेळायला बसत. एक डाव उजव्या हातानें खेळत तर दुसरा डाव्या हातानें खेळत. असा त्यांचा नेहमींचा क्रम होऊन बसला. एक दिवस आम्हीं सगळ्यांनीं त्यांच्याशीं खेळायचें ठरविलें. त्यांनाहि मोठा आनंद झाला. मात्र अट एवढीच होती कीं, कवड्या पाणी प्यायच्या भांड्यांत घालून हालवून मग टाकायच्या. आम्ही खेळायला बसलों. एका बाजूला टिळक, ठोंबरे आणि बेबी तर दुसऱ्या बाजूला मी, दत्तू आणि भास्कर. पहिल्याच डावाला टिळकांची सरशी झाली. फक्त एकच नरद आंत जायची राहिली होती. तिला दोनच पडायला हवे होते, मग आमच्यावर बिनतोड झाली असती. आणि जर कां दहा पडते तर तिनें उलट खाऊन आपल्या शत्रूच्या समोर प्रस्थान ठोकलें

* आतां हे प्रिन्सिपाल झाले आहेत.

** प्रसिद्ध सिनेमा नट श्री. शाहू मोडक यांचे हे वडील.

असतें व मग मात्र खात्रीनें तिच्या प्राणांवर बेतली असती. कवड्या हातांनीं टाकायच्या असत्या तर एवढी धास्ती नव्हती. पण त्या पाणी प्यायच्या भांड्यांत घेऊन टाकायच्या म्हणजे जरा कठीणच काम होतें! टिळकांनीं दान टाकलें. त्यांत एक कवडी पडली उताणी व एक पडली कुशीवर! एकीकडून पाहिलें तर दोन दिसावे दुसरीकडून पाहिलें तर दहा दिसावे. टिळक एकदम ओरडले दोन. तशीं आम्ही ओरडलों दहा. ते म्हणत, दहा कसे होतील?, आम्ही म्हणूं, दोन कसे होतील? ते जमिनीवर जोरजोरानें बुक्क्या आपटून आमच्या गळीं उतरवूं लागले, ' मी, नारायण वामन टिळक सांगतों, कीं ते दोन होते.' तशी मीहि सांगूं लागलें, ' दोन कसे, मी लक्ष्मी नारायण टिळक सांगतें, ते दहा.' शेवटीं ते ठोंबऱ्यांना व बेबीला विचारूं लागले, काय आहेत रे हे? ठोंबरे म्हणाले, हे दोनहि नाहींत आणि दहाहि नाहींत, दीड आहे! टिळक म्हणाले, म्हणजेच दोन. आम्हीं सारे रागावत होतों व हासतहि होतों. शेवटीं पुन्हां डाव टाका असा आम्हीं आग्रह धरला. पण टिळकांना पुन्हां डाव टाकायला नको होता, कारण पुन्हां खात्रीनें दोनच कशावरून पडतील? शेवटीं त्यांनीं सोंगट्या, पट, कवड्या हीं समोरच्या कंपाउंडांत भिरकावून दिलीं व वर त्यांच्या मागें धांवत जाऊन समोरच्या लोहाराकडे जमलेल्या माणसांना सांगितलें, हें सामान वेंचून घेऊन जा. त्यांना काय? त्यांनीं सारें मोठ्या आनंदानें गोळा करून नेलें!

* * *

टिळकांच्या चीजवस्ता नेहमीं हरवत. हरवत म्हणजे काय तर ते स्वतः ठरल्या ठिकाणीं त्या ठेवीत नसत, ठेवल्या ठिकाणीं पाहात नसत व दुसऱ्यालाहि त्या ठिकाणीं पुन्हां पाहूं देत नसत. दांत, आगपेटी, टोपी, चष्मा, पट्टा ह्या चार पांच जिनसा नेहमींच त्यांच्या हातून निसटत. विशेषतः क्लासला जायच्या वेळेस किंवा एखाद्या गांवाला किंवा लेक्चरला निघायच्या वेळेंत बूट, कोट, मोजे, टोपी, कॉलर, पट्टा, छत्री, वहाणा ही सारीं त्यांच्यांशीं लपंडाव खेळत व त्यांच्याबरोबर आमच्याहि साऱ्यांच्या फुगड्या सुरू होत. कित्येक

वेळेस त्यांना टोपीवांचून जावें लागे, नाहींतर पट्ट्याऐवजीं पारड्‌ं सोडून त्याचेंच दोरखंड कमरेला गुंडाळावें लागे. माझी व्यवस्था कोणीच ठेवति नाहीं, जें तें आपल्याच व्यवसायांत दंग. माझी कोणाला पर्वाच नाहीं, असें ते म्हणत, आणि मग आम्ही सर्वच त्यांची पर्वा करण्यास धावून येत असूं. एकदां असेच दांत हरवले. केवढा गोंधळ! म्हणे ह्या कुत्र्यानेंच माझे दांत लांबविले. नाहींतर ह्या खोलींत तूं खंडीभर सरपण सांठवून ठेवलें आहेस त्याच्याच खालीं उंदरांनीं ते नेऊन टाकले. उपसा रे ते सारें सरपण आणि द्या बाहेर फेंकून. हिला संसाराचा फार आटाट. झालें! सारें सरपण बाहेर कंपाउंडवर धावूं लागलें आणि त्याच वेळेस दांतांचा डबा सांपडला टेबलावर! एकदां हरवली टोपी. ती होती खुंटीवर व तिच्यावर ठेवला होता कोट. टिळकांना जायचें होतें बाहेर. त्यांनीं गडबडींत दुसराच कोट अंगांत घातला व ते टोपी शोधूं लागले. प्रथम त्यांनीं पहिला कोट रागानें जमिनीवर खालीं आपटला. त्याबरोबर त्याच्या खालची टोपीहि तशीच खालीं आदळली. मग काय? सर्पयज्ञांत सर्पांचीं वेटोळींचीं वेटोळीं येऊन अग्निकुंडांत पडूं लागलीं तशी आमच्या घरांतील कपड्यांच्या चुंभळी भराभर त्या ढिगाऱ्यावर येऊन पडूं लागल्या. बिछाने, सतरंज्या, ब्लँकीटें झाडून सारी मंडळी त्या ढिगारांत गोळा झालीं.

"जा जा, त्या मंजुळाबाईला बोलवा! काय करते ती? माझी टोपी शोधून काढा."

मंजुळाबाई आली. हा कपड्यांचा ढिगार पाहून ती थक्कच झाली.

"मंजुळाबाई! काय तुम्ही माणसें असून उपयोग? भाजी करायची कीं काय तुमची? माझी टोपी आत्तांच्या आत्तां शोधून काढा."

"पण पपा, त्या ढिगाराखालीं असेल ती —"

पण ह्यानंतर कोणी बोलणेंच अशक्य होतें. मंजुळाबाई टोपी शोधायला म्हणून त्यांच्या ऑफिसमध्यें जाऊन बसली, ती तिला टिळक तसेच बोडके निघून गेलेले दिसले तेव्हां खालीं आली. टिळक गेल्यावर आम्हीं ते कपडे उचलले तेव्हां

साऱ्या ढिगाखालीं कोटांत अडकलेली टोपी सांपडली ! टिळकांना हें कळलें तेव्हां ते म्हणाले, खरंच कीं मीं काल कोटाखालीं ठेवली होती टोपी.

* * *

एखादे वेळेस टिळक आपल्या क्लासांत शिकविण्यासाठीं मला पाठवीत ! अगदीं पहिल्यानदां जेव्हां मी क्लास घेण्यास गेलें तेव्हांची एक गमतीची आठवण होते. ते म्हणाले, 'तूं जाऊन माझा क्लास घे.' मी म्हणालें 'मी काय त्यांना लेणचीं कशीं घालायचीं, मेतकूट कसें करायचें हें शिकवूं?'

'नाहीं ग. हिंदू चालीरीतीसंबंधीं त्यांना कांहीं सांग म्हणजे झालें.'

क्लासांत तीस चाळीस विद्यार्थी होते, हे विद्यार्थी म्हणजे लहान लहान मुलें नसत तर आमच्या एवढालींच मोठीं माणसें असत. मला पहातांच विद्यार्थ्यांनीं माझें स्वागत केलें.

"कां गुरुमाऊली, आज तुम्ही शिकविणार का काय आम्हांला?"

"हो, मी तुमच्या गुरुजींच्या बदली आलें आहें आज."

मी कांहीं तरी पोपटपंची करून त्यांना त्या वेळेस शिकविलें तर खरें. माझें लेक्चर संपतांच एकजण म्हणाला,

"गुरुमाऊली, एक विचारूं का?"

"हो खुशाल विचारा."

"आमच्या गुरुजींना तुम्हीं मारतां असें ते म्हणत होते हें खरें का?"

"तसें कधीं होईल का? बोलण्याच्या भरांत त्यांनीं तुम्हांला कांहीं तरी सांगितलें असेल. बायका कधीं आपल्या नवऱ्यांना मारतात का? आतां शहाण्याला शब्दाचा मार त्या अर्थानें मारतें कधीं कधीं त्यांना."

अशी कांहीं तरी वेळ मारून मी घरीं आलें. टिळक आपल्या चहाच्या प्रकरणांत त्या वेळीं गुंग होते.

"काय, कसें काय झालें तुझें लेक्चर? कोणता विषय घेतला होतास?"

"वा आजचा विषय तर फार बहारीचा होता!"

"कोणता?"

" बायका आपल्या नवऱ्यांना कां मारतात ? त्यांनीं तसें करणें बरें किंवा वाईट ? "

" म्हणजे तूं काय बरळते आहेस ? "

" बरळत नाहीं. खरंच माझा हा आजचा विषय होता. "

" मग ते काय म्हणाले ? "

" ते म्हणाले, तरीच गुरुजी सांगत होते, कीं गुरुमाऊली आपल्याला मारतात म्हणून. "

" मग तूं काय बोललीस ? "

" मी ? खरें होतें तें सांगितलें. "

" काय ? "

" मी सांगितलें कीं ज्या ज्या वेळेस ते माझें ऐकत नाहींत, पैसा नाहीसा करतात, विनाकारण संतापतात, कधीं वेळेवर घरीं येत नाहींत, त्या त्या वेळीं मी त्यांना चांगला ठोक देतें. "

टिळकांना माझें सारें बोलणें खरें वाटलें. ते म्हणाले,

" मी तुला फार शहाणी समजत होतों. पण आज माझी खात्री झाली, कीं तूं फार मूर्ख आहेस. एखाद्या वेळेस तूं माझी अब्रू घालविशील ! "

* * *

कोणी चालत असेल तर त्याला उचलून कडेवर घेण्याची आम्हांला संवयच होती. त्यांतलेच हे कांहीं प्रकार सांगतें. अर्थात् ह्या बाबतींत आम्हांला दोघांनाहि कधीं कंटाळा येत नसे. उलट असे कांहीं नसलें तर आम्हांला चुकल्या चुकल्यासारखें वाटे.

एक दिवस संध्याकाळीं आमच्या येथें एक पांगळा आला. त्याला अर्धांगवायूसारखें कांहीं झालें होतें. त्याला आम्हीं घरांत ठेवून घेतलें. मी आणि रामभाऊंनीं त्याच्या बऱ्याच खस्ता खाल्ल्या. त्याची शेक शेगडी करायची, त्याला खायला प्यायला द्यायचें, तर कधीं कधीं भरवायचेंहि, त्याचा शेणगोठा करायचा, हीं सर्व कामें आम्ही करीत होतों. त्याची गुइरींहि मला

धुवावीं लागत.

रामभाऊ एक फार मोठा सज्जन माणूस होता. तो ख्रिस्ती होण्यापूर्वी आमच्याकडे आला व पुढें किती तरी वर्षें आमच्या आश्रयाला येऊन जाऊन होता. परंतु बाता मारण्यांत मोठा पटाईत. तसेंच कर्ज करण्यांतहि त्याचा हातखंडा होता. त्याचें धर्मांतर, लग्न, पुढें बायको मेल्यानंतर नऊ महिन्यांच्या चिकीचा सांभाळ हें सारें आमच्याच घरीं झालें. कुठेंहि कामाला राहिला तर फार सुंदर काम करी. पण वरील दोन दुर्गुणांमुळें कोठें टिकत नसे. पण आमच्या स्वभावधर्माप्रमाणें त्याचाहि असल्यानें असल्या कामांत तो अगदीं मनापासून आम्हांला साह्य करी. असो रामभाऊनें व आम्हीं आमच्या तैमूरलंगाला मेहनत करून बराचसा सुधारला.

त्याला रोज दोन आण्यांच्या विड्या लागत. तीन वेळेला चहा लागे, तेंहि सारें यथास्थितपणें त्याला मिळे. बरें वाटूं लागल्यावर तो आमच्याच घरीं चिकटून राहिला व कांहीं दिवसांनीं तो ख्रिस्ती झाला. ख्रिस्ती झाल्यावर मात्र त्यानें आपला नूर पालटला. आपले हात स्वर्गाला पोंचल्याचा त्याला भास होऊं लागला, त्याला पर फुटले. आज काय चहा चांगला झाला नाहीं, उद्यां काय मला वेळेवर विड्या दिल्या नाहींत, परवां काय माझें जेवणच थंड होतें, तेरवा काय बेबी फार गडबड करते! तिला आईनें मुळीं वळणच लावलें नाहीं. बेबीवरून तर रोज कुरबूर होई. टिळक त्याची समजूत घालीत पण त्याचेंच आपलें खरें. टिळक एकदां मुलीला रागें भरले म्हणजे त्याचें समाधान होई. एक दिवस टिळक कशालासे गांवाला गेले होते. त्यांच्या गैरहजेरींत आमचा गोपा आला होता. त्याला जडीबुट्टीची फार चांगली माहिती होती. अर्थात् अर्धांगवायुवरहि त्याच्याजवळ औषध होतेंच! मीं म्हटलें, 'गोपा तूं जा ह्याला तुमच्या गांवीं घेऊन. औषध, वैद्य आणि रोगी एकाच गांवीं असले म्हणजे बरें. मीं त्याला खर्चाला पांच रुपये दिले व ते दोघे गेले. टिळक परत आल्यावर त्यांच्याच गाडीनें गोपाजीचें पत्र आलें, कीं आमचा पेशंट पळून गेला! टिळकांना त्याच्याविषयीं फार वाईट वाटलें.

हें पात्र गेल्यानंतर दुसऱ्यानें प्रवेश केला. आपला सकाळचा चहा नित्या- प्रमाणें आपल्या हातांनीं करून घेऊन व घरांतील सर्व चहाबाजांना अंथरुणांतून उठवून तो पाजल्यावर टिळक बाहेर येऊन उभे राहिले. इतक्यांत त्यांच्यापुढें एक लांब रुंद व्यक्ति दत्त म्हणून उभी ! वर्ण निमगोरा, बसकट तोंड, घारे डोळे, चेहरा रुंद, डोक्यावर जटांचा मुगुट, संन्याशाच्या डोक्याप्रमाणें ओठ व हनुवटी गुळगुळीत, अंगांत घोट्यांपर्यंत स्वच्छ भगवी कफनी, डोक्याला भगवा फेटा, हातांत भगव्या छाटीचें एक लहान गांठोडें अशा थाटांत टिळकांच्यांपुढें उभें राहून आपणच का टिळक म्हणून त्यानें त्यांना प्रश्न केला.

" हो मीच टिळक. " हे टिळकांच्या तोंडचे शब्द कानीं पडतांच त्यानें आपल्या हातांतील गांठोडें खालीं ठेवून त्यांतून एक भला मोठा फुलांचा हार बाहेर काढला व तो टिळकांच्या गळ्यांत घातला.

" मी आज धन्य झालों. माझ्या जन्माचें सार्थक झालें. "

माळ काढीत टिळक म्हणाले, " बुवा, माझ्या पायां नका पडूं, सारा मान महिमा ख्रिस्ताचा आहे. मी काय यःकश्चित् प्राणी. "

बुवा आमच्या घरीं राहूं लागले. टिळकांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द ऐकण्यासाठीं चातकाप्रमाणें टपून बसूं लागले. टिळकांचें त्यांच्यावर फारच प्रेम बसलें. ते दोघे कधीं एकमेकांपासून दूर होत नसत. टिळक यांना ख्रिस्तीधर्माविषयीं सांगत. बुवा लक्ष्य लावून ऐकत. ऐकतां ऐकतां त्यांचा कंठ दाटून येई. डोळ्यांतून अश्रुधारा वहात.

टिळक मला म्हणत हा माणूस कांहीं साधा नाहीं. हा पुढें पौल पेत्रस ह्यांच्या पंक्तीला बसण्यासारखा ख्रिस्तशिष्य होईल. कारण त्याच्या डोळ्यांतून अश्रू गळतात ते डोळ्यांच्या कानाच्या बाजूच्या कोपऱ्यानें गळतात. खऱ्या भक्तिभावाचें व प्रेमाचें हें लक्षण आहे. बेबीहि म्हणे, खरंच आई; त्यांच्या डोळ्यांतून पाणी येतें तें डोळ्याच्या बाहेरच्या कोपऱ्यांतून बाहेर पडतें. आणि मीं देखील पपा म्हणतात तसें कोठें वाचलें आहे. पण मला कांहीं ह्यांचें बोलणें

पटत नसे. मला पुराणिक बोवांच्या गोष्टीची व बोकड हरवलेल्या रडणाऱ्या धनगराची आठवण होई.

बोवा येथेंच थांबले नाहींत. त्यांनीं हळूंहळूं आमच्याप्रमाणें घरांत कामें करण्यास सुरवात केली. कधीं अपशब्द नाहीं, कधीं धुसफूस नाहीं. अत्यंत सालस, गरीब व प्रेमळ गृहस्थ होता तो. टिळकांबरोबर म्हशी धुणें, त्या वळायला नेणें, वगैरे सारें अगदीं घरांतल्या माणसाप्रमाणें तो करी. टिळकांची सेवा तर तो अगदीं मन लावून करी. अगदीं एखाद्या जुन्या काळांतल्या शिष्यानें गुरुगृहीं करावी तशी.

पुष्कळांचा असा समज असतो, कीं कोणी ख्रिस्ती झाला कीं, त्याला खूप पैसा मिळतो. पण ख्रिस्ती झाल्यामुळें पैसा मिळाल्याचें मला एकहि उदाहरण ठाऊक नाहीं. मिशनरी किंवा ख्रिस्ती लोक गरिबांना सहाय्य करतात त्याचा हा असा अर्थ करण्यांत येतो. पण सहाय्य करणें हा ख्रिस्ती धर्माचा एक महत्त्वाचा भाग आहे.

आमच्या बोवांचाहि असाच समज होता. एक दिवस संध्याकाळची प्रार्थना झाल्यावर बोवांनीं हळूंच चौकशी करण्यास सुरवात केली.

"आपल्याला किती मुलें आहेत ?"

"तुम्हांला माहीतच आहे."

"त्यांची विद्या आपण कोठवर करणार ?"

"शिकतील तितकी !"

"पण कांहीं बेत ठरला असेल ना ?"

"बी. ए. पर्यंत किंवा पाहिजे तर इंग्लंड, अमरिकेला जातील."

बुवांच्या तोंडाला पाणी सुटलें, त्यांनीं हळूंच पिल्लूं सोडून दिलें.

"पहा महाराज, एक गरीब बाई आहे. तिला दोन मुली आहेत. त्यांची शिकण्याची फार इच्छा आहे. मी आजपर्यंत तिचें बरेंच सहाय्य केलें. आतां मी त्या मुली एका संस्थेंत ठेवल्या आहेत. मुली फारच हुशार आहेत. ह्या दोघांना कमींत कमी पन्नास रुपये महिना खर्च येतो. मी दहा रुपयांची

व्यवस्था केली आहे. आतां तुम्ही चाळीस रुपये महिना द्या. दोन मुलांची इंग्लंड, अमेरिकेच्या प्रवासाची व खर्चाची तुम्हांला सोय करतां येतें, तीन मुलें आहेत असें समजा व एवढें कराच."

टिळक म्हणाले. "बुवा, दोन मुलांच्याच शिक्षणाची मला पंचाईत पडली आहे तर मी आणखी कशी व्यवस्था करूं? त्या मुलीला इकडे पाहिजे तर आणून ठेवा. मग कांहीं तरी सोय पाहतां येईल. पण पैसे उचलून द्यायला मजजवळच नाहींत."

"पण मला नकोच आहे कांहीं! मी त्या मुलींचा पत्ता देतों. त्यांना परस्पर पाठवीत जा. दोन मुलांचा खर्च जर तुम्हांला करवतो तर आणखी एकीचा करायला काय हरकत आहे? नाहीं तर चाळीस रुपये दरमहा व्याज मिळेल इतकी रक्कम त्यांच्या नांवें करून द्या!"

पुढें बोवासाहेब निराश होऊन गेले ते टिळकांच्यानंतर १९२० सालीं मला मुद्दाम भेटायाला आले होते. त्या वेळीं त्यांच्या डोक्यावर पगडी होती आणि त्यांनीं त्या दोन मुलींपैकीं एकीशीं लग्न केलें असून त्यांना दोन चार मुलांचें पितृत्वहि प्राप्त झालें होतें! लोकमान्य टिळकांनीं आपलें लग्न लावून दिलें असें त्यांनीं सांगितलें. खरें खोटें देव जाणे.

एकदां मुंबईच्या स्टेशनवर टिळकांना एक तरुण ब्राह्मण आढळला. ह्याला कोणी नव्हतें. बुद्धि चलाख असून बाकी अवतार मात्र भडभुंजालाहि लाजविण्यासारखा होता. टिळकांनीं बाबाला घरीं आणला व माझ्या स्वाधीन केला. त्याचें जानवें काळभैरवाच्या गंड्यासारखें दिसत होतें; नी विडीच्या धुरानें दांत काळेकिट्ट पडले होते, साऱ्या अंगाला खरूज होती; मीं पाणी तापवून कामदाराकडून ह्या अवताराला चांगला घासूनपुसून लख्ख केला. नंतर टिळकांचे कपडे घालायला दिले व त्याला स्वरूप आणलें. टिळक ह्याचे फारच लाड करीत. तो त्यांना पपा व मला ममा म्हणे! तो ब्राह्मण आम्ही ख्रिस्ती! जेवतांना त्याच्या मनांत नाना कल्पना येत. वड्यावांग्यांची भाजी असली, कीं त्यानें म्हणावें मटण आहे व जेवतांना उठून जावें. जवसाची चटणी वाढली, कीं

त्यानें म्हणावें बोंबलाची चटणी आहे आणि ताट बाजूस सारावें. मग टिळकांनीं त्याला चार सहा आणे द्यावे व त्यानें बाजारांत जाऊन कांहीं खाऊन यावें. पुढें पुढें टिळक म्हणत, ह्याला माझ्या हापिसांत माझ्या देखत जेवायला वाढ. मीं तें कबूल करून त्याला हापिसांत वाढूं लागलें. त्याला दिवसांतून कमींत कमी पांच सहा वेळेस चहा लागे. तोहि मी देई. शिवाय टिळकांकडून पैसे घेऊन तो बाहेरून चहा पिऊन येई तो निराळाच. टिळक आपल्या पगाराच्या खजिन्यांतून — डॉ ह्यूमसाहेबांकडून — पैसे आणून अशांची भरती करीत. एखादे वेळेस डॉ. ह्यूमहि पैसे देत नसत कारण टिळकांनीं बहुतेक सारा पगार आणलेला असे. मग गुपचूप रद्दी विकून ते ह्या अतिथींसाठीं खर्च करीत. सात आठ दिवसांचीं सारीं वर्तमानपत्रें विकलीं, कीं सहज चार सहा आणे येत.

असो. हे नवीन चिरंजीव अतिशय भित्रे होते. आमचीं घरें सारीं बिनभाड्याचीं होतीं; ती म्हणजे एक एक ब्लॉक मिळून तीन ब्लॉकची चाळच होती. त्यांतील एका ब्लॉकमध्यें मागल्या खोलींत ह्या चिरंजीवांची व्यवस्था करण्यांत आली होती. तिच्या पलिकडच्या खोलींत लांकडें सांठवून ठेविलीं होतीं. तीं जाऊन आणण्याचें कामदारांच्या जिवावर येई. कारण एक तर चिरंजीव आल्यावर तींत घाण येऊं लागलीं होती व आंत शिरतांच पाय रपरप भिजत. ह्यांनीं तेथें दारांतच मोरी केली होती व त्या मोरीचा नळ लांकडांखालीं गेला होता.

टिळकांना सांगितलें, कीं ते म्हणत, तुम्हांला माणूस खपत नाहीं. आतां काय करावें ! मोठी पंचाईत झाली होती ! शेवटीं एक दिवस मी त्याला म्हणालें,

"दादा, तुम्हांला रात्रीं भय वाटतें तर राणूला उठवीत जा. तो तुमच्या जवळच निजतो. जवळ कंदील जळत असतो तो नेत जा. पण हा काय आळस ? आणि पुन्हां जर कांहीं झालें, कीं तुम्ही वर चहाच्या करायला तयार !"

माझ्या ह्या बोलण्यानें दादा संतापले. त्यांचा अपमान झाला. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं दाराला कुलूप घातलें. टिळक बाहेर गेले होते. लांकडें नाहींत ! तो बसला दाराशीं भांडत. कुलूप उघडूं देईना. तो म्हणे, तुम्ही मला मुलगा म्हणतां

आणि किती पक्षपात करतां ! दत्तूला कपडे अन् बूट किती तरी आहेत. मला कांहीं नाहीं.

“अरे बाबा, त्याला शाळेला जायचें असतें, तूं तसा जा मग तुलाहि मिळतील तसे कपडे.”

“तें कांहीं नाहीं. त्याला नवा बूट आणला तसा मला आणायला पाहिजे. असे कोठें असतात का आईबाप ?”

“मुळींच नाहीं. असे आईबाप मुळींच नसतात आणि असे चिरंजीवहि कोठें नसतात. दत्तूच्या मी उद्यां तोंडांत मारली तर तो मला एक शब्द उलटून बोलणार नाहीं आणि तुम्ही मलाच एक शब्द तोंडावाटे काढूं देत नाहीं. नुसतें हूं म्हटलें कीं तुमचा अपमान होतो. चांगले इंग्रजी सातवी इयत्ता झाली म्हणतां आणि इतकें कसें ज्ञान नाहीं तुम्हांला ? चला द्या किल्ली.”

“मी देत नाहीं किल्ली. मी तुम्हांला ओळखत नाहीं.”

“बरें तर मीहि तुम्हांला ओळखत नाहीं. तुम्हीं जेवायला येऊं नका.”

“मी जेवायला येणार नाहीं. माझें जेवण येथेंच मिळेल.”

“बरें पहातें कसें जेवण येथेंच मिळतें तें !”

“पहा.”

टिळक घरीं आल्यावर त्यांच्या कानांवर सर्व कागाळ्या गेल्या. तो टिळकांना म्हणाला,

“तुमच्याकडे पाहून मीं गय केली. असला अपमान मी कोणाचाहि सहन केला नसता. मी आपल्या आईला सुद्धां जोड्यानें मारलें असतें मग ह्यांची काय कथा !”

टिळकांना त्या दिवशीं मुंबईस जायचें होतें. त्यांनीं त्याला मुंबईची तयारी करायला सांगितली. तेथें कोठें तरी सोय लावून देण्याचें त्यांनीं ठरविलें. चिरंजीवांना आपले कपडे बिछाना सारें कांहीं—स्वतःचें कांहींच नव्हतें तसें. होतें तें अर्थात् आम्हींच दिलेलें—सारें लोकांना वाटून टाकलें. रात्रीं बाराच्या गाडीनें जायचें होते. पण फंडांत पैसे नव्हते. पगाराची बँक बंद झाली होती ! झाडून

सारे पैसे गोळा झालेले एका माणसाला मुंबईला पोंचण्याइतके. पण टिळक भयंकर आशावादी होते. आपणांस स्टेशनावर पैसे मिळणार अशी त्यांची खात्री होती. टिळकांचे परमपूज्य स्नेही रावसाहेब स्टेशनवर त्यांना भेटले. त्यांनाहि मुंबईसचं जायचें होतें. रात्रीं बारा साडेबाराची वेळ. टिळकांनीं रावसाहेबांजवळ याचना केली. रावसाहेबांनीं सांगितलें, मजजवळ माझ्यापुरतेच पैसे आहेत. रावसाहेबांना कवितांचा खूप नाद लागला होता पण कवितेनें पैसे थोडेच उत्पन्न होतात! शेवटीं गाडी प्लॅटफॉर्मवर येऊन उभी राहिली. टिळक व रावसाहेब गाडींत बसले. चिरंजीव खालींच राहिले. गाडी हालूं लागली, टिळकांनीं त्याला परत जाण्यास सांगितलें. त्या गडबडींत स्वारी टांग्याचे पैसे सुद्धां मागून घेण्यास विसरली. स्टेशनवरून दोन तीन मैल पायीं घरीं येणें भाग होतें.

थंडीचे दिवस, रात्र बरीच, तीहि अंधेरी, सोबत कोणी नाहीं. टांगे येत. पण झरकन् निघून जात. पुलाखालीं नदींत एखादी चिता जळत असलेली दिसे. आधींच बाबा भित्रा, त्यांत उरांत धडकी भरलेली. कसाबसा फर्ग्युसन गेटच्या फाटकांत येऊन उभा राहिला तों कुत्रा अंगावर धावून गेला. राणू ओसरीवर निजला होता त्याला वाटलें चोर बीर आला. तो काठी घेऊन धावून गेला तों चिरंजीव!

"कां हो आला?"

"आलों बाबा! आईला उठवूं नका."

दुसऱ्या दिवशीं राणूनें सांगितलें, पाहुणे परत आले! मी म्हणालें येऊं द्या. त्यांच्याशीं तुम्ही कोणीं कांहीं बोलूं नका. सर्वांनीं नियमाप्रमाणें आपापलीं कामें उरकलीं व फराळ करून घेतले. त्याला कोणी हांक मारली नाहीं. तोच आंत आला.

"ममा, मी आलों!"

"आलांत? बरें झालें! आतां मी घराची मालकीण आहें. टिळक घरांत नाहींत. तुम्ही कांहीं माझे व्याही जांवई नाहीं. मी तुमची मिजास चालूं

देणार नाही."

त्यानें माझा तोफखाना गुपचिप ऐकून घेतला.

" हा पाण्याचा बॉयलर आहे, तो चहाचा डबा, तो साखरेचा डबा, तुम्ही आपल्या अंथरुणाजवळ ठेवा हें सारें. तो बॉयलर पेटवा आणि त्यांत टाका सारें. चहाची हुक्की आली म्हणजे पडल्या पडल्या नळ तोंडांत सोडून देत जा. मी तुमच्या पुढें पुढें करणार नाहीं.

"आजपासून तुम्हांला घरांतलें सारें काम केलं पाहिजे. मीच आतां पाहुण्यासारखी वागणार आहें. कारण मी कांहीं केलें तरी तुमच्या मनांत येत नाहीं.

"वड्या-वांग्याच्या भाजींत तुम्हाला मटणाचे तुकडे दिसतात आणि लसणाच्या चटणीचा तुम्हांला बोंवलासारखा वास येतो. मला वाटतें, तुम्ही मुळीं ब्राह्मणच नाहीं. कारण ह्या जिनसांचा संशयच ब्राह्मणाला येणार नाहीं. ह्यांची चव घेणाऱ्यापैकीं तुम्ही कोणी तरी असला पाहिजे.

" तुमचा असा समज झालेला दिसतो कीं आम्ही वाटेल तें खातों व दुसरा असा समज दिसतो, कीं आपण सांगूं तें टिळक ऐकतात. पण तुम्ही अजून टिळकांना ओळखलें नाहीं. जर का ते रागावले तर तुमची हड्डी मोकळी करतील."

माझ्या ह्या दत्तक चिरंजीवांना एवढी गोळी प्रमाणाबाहेर लागूं पडली. त्यानें चटकन् माझे पाय धरले.

" लक्ष्मीबाई, पायां पडतों. आतां माझी माफी करा."

आणि तेव्हांपासून तो खरोखरच घरच्यासारखा वागूं लागला. पुढें त्याला चांगलें काम लागलें. टिळकांनीं त्याचा बाप्तिस्मा केला. त्याचें लग्नहि लावलें. त्याच्या बायकोचें बाळंतपण मीं केलें. त्याला बायको फार सुशील मिळाली व मुलेंबाळेंहि गुणी निघालीं.

# बालकवींच्या आठवणी

जळगांवास पहिलें मराठी कविसंमेलन सन १९०७ च्या मार्च महिन्यांत भरविण्यांत आलें होतें. ह्यांत बहुतेक पुढाकार टिळकांचा होता म्हटलें तरी चालेल. मात्र ह्या बाबतींत कर्ज वगैरे झालें असेल तें काव्यरत्नावलीचे हौशी संपादक श्री. नारायण नरसिंह फडणीस ह्यांनींच फेडलें असावें.

टिळकांचे एक कविमित्र होते. त्यांचें नांव कर्नल कीर्तिकर. जळगांवच्या कविसंमेलनाचे तेच अध्यक्ष होते. हे डॉक्टर असून पुष्कळशा लढायांवर जाऊन आलेले होते. कर्नल कीर्तिकर माझ्याबद्दल ' एव्हर डाइंग वाईफ ऑफ युअर्स ' असा टिळकांच्या पत्रांत नेहमीं उल्लेख करायाचे. कारण,मला कांहीं ना कांहीं तरी नेहमीं होत असे व नेहमीं मीं अंथरूण धरलेलें असे. अंथरूण म्हणण्यापेक्षां जमीन म्हटली तर अधिक शोभेल. कारण माझी लोळणफुगडी जमिनीवरच चाले. मात्र भूमि शय्या असली तरी नुसता भुजच तेवढा केवळ उशाला पुरत नसे. उशाला मी काय घेईन ह्याचा कधीं नियम नसे. आठवा, जात्याचा खुंटा, तपकिरीची डबी—थोडक्यांत म्हणजे जें कांहीं हाताला लागेल तें माझ्या उशाखालीं जायचें. असो.

१५ मार्च १९०७ च्या ख्रिस्ती नागरिकांत टिळकांनीं ह्या २६ कवींच्या कवि-संमेलनाविषयीं एक मोठा बातमीपत्रवजा लेख लिहिला आहे. त्यावरून दिसून येईल, कीं ठोंबऱ्यांना ' बालकवि ' म्हणून प्रथम टिळकांनींच संबोधिलें. ते ठोंबऱ्यांविषयीं लिहितात, कीं—

"त्यांतच कुमार त्र्यंबक बापुजी ठोंबरे नावाच्या केवळ तेरा वर्षांच्या बाल–कवीचें शीघ्र कवित्व जमलेल्या मंडळीस पहावयास मिळालें. ह्याची शुद्ध, सुगम, रसाळ कविता ऐकून कवित्वशक्ति ही ईश्वरी देणगी आहे असें कोणाला वाटलें नसेल ? हिंदुस्थानांत असे किती बालकवि, किती बालसाधु, किती बालवीर उत्पन्न होत असतील आणि पुढें फुकट जात असतील ! ह्याचा शोध करून ह्यांना प्रगल्भदशेला आणण्याचें काम कोणीं करावयाचें ? आम्हींच हिंदपुत्रांनीं ना ? असो; ईश्वर ह्या मुलाकडून आमच्या देशाची पूर्णपणें सेवा करून घेवो ! आम्हीं तर सध्यां तोंडपाटिलकी आणि कलमबहादुरी करण्यांत गुंतलों आहों !"

ह्या संमेलनाचें काम येथेंच आटोपलें. परंतु ह्या संमेलनानें महाराष्ट्र सारस्वतासाठीं दोन फार मोठाल्या गोष्टी केल्या. एक बालकवि ठोंबरे ह्यांना उदयाला आणलें व दुसरें अभिनव काव्यमालेची कल्पना येथूनच जन्माला आली. पुढें पुण्यास टिळक गेले व तेथें रा. न. चिं. केळकर वगैरे मंडळींच्या सहकार्यानें अभिनव काव्यमाला सुरू करण्यांत आली.

ठोंबऱ्यांबद्दल टिळकांना चैन पडेना. हा मुलगा कोठें तरी शाळेंत गेला पाहिजे व ह्याचें कांहीं शिक्षण झालें पाहिजे, ह्याच्या काव्यशक्तीला ओहोटी लागेल असें कांहीं होतां कामा नये, म्हणून त्यांनीं कर्नल कीर्तीकरांशीं जोराचा पत्रव्यवहार सुरू केला. कर्नल कीर्तीकर श्रीमंत होते व टिळकांचे मित्रहि होते. त्यांनीं ठोंबऱ्यांना दरमहा दहा रुपये देण्याचें कबूल केलें. मात्र एक अट घातली, कीं ठोंबऱ्यांनीं नगरास येऊन टिळकांच्या देखरेखीखालीं रहावें. त्याप्रमाणें झालें व ठोंबरे नगरास आले

ठोंबरे एकटेच आले, आदल्याच दिवशीं नेहमींच्या रिवाजाप्रमाणें टिळक बाहेरगांवीं गेले होते. मीं वर सांगितल्याप्रमाणें आजारीं होतें. जातांना टिळकांनीं मला सांगून ठेवलें होतें, कीं बालकवि येणार आहेत त्यांची नीट व्यवस्था ठेवा.

नाताळचा दिवस होता. दहाचा सुमार, मी निजलेली, मुलें देवळाला

( चर्चला ) गेलेलीं, घरांत कोणाचा पत्ता नाहीं, चाकर नोकर, शेजारीं पाजारी झाडून सारे देवळाला गेले होते, इतक्यांत ठोंबरे आले. मी विचारलें,

'तुम्हींच का ठोंबरे ?'

"हो." त्यांनीं म्हटलें.

"बसा. मुलें बाहेर गेलीं आहेत. तीं आल्यावर तुम्हांला खाणावळींत घेऊन जातील. दूध, केळीं वगैरे आमच्या घरच तुम्हांला चालत असेल तर देतें." ठोंबऱ्यांनीं कांहीं आढेवेढे न घेतां दूध व केळीं घेतलीं.

थोड्या वेळानें दत्तू आला. त्याच्यावरोबर त्याचे कांहीं मित्र आले. त्यांनीं ठोंबऱ्यांना खाणावळींत नेलें. तेथें ते पुढें जाऊं लागले. राहाणें आमच्याकडेच होतें. एक दोन दिवसांत टिळक आले. त्यांनीं बाजारांत जाऊन कॉडलिव्हर ऑईल आणलें व ठोंबऱ्यांना सशक्त करण्याचें ठरविलें.

ठोंबरे आला तेव्हां तेवढ्यापुरतें एकदांच मीं त्याला अहो जाहो म्हटलें; परंतु लागलीच आमच्यांतला परकेपणा नाहींसा झाला. मी त्याला अरे तुरे करूं लागलें व त्याचाहि खिन्नपणा एका दिवसांत मावळला. आपण कोठें जाऊन पडतों आहों कोणास ठाऊक, असें त्याला झालें होतें. ख्रिस्ती माणसें म्हणजे कोणी राक्षस किंवा भुतें असावींत अशी त्याची भावना होती. आणि त्यानें पुढें तसें कित्येक वेळेला आम्हांला सांगितलेंहि; पण एकदोन दिवसांतच आम्ही माणसें आहों व चांगलीं त्याला आवडतील अशीं माणसें आहों अशी त्याची खात्री झाली. दत्तूची व त्याची ताबडतोब गट्टी जमली. तशीच दत्तूच्या मित्रांची व त्याचीहि तितकीच गट्टी जमली. ठोंबरे घरांतील मुलांप्रमाणेंच वागूं लागला.

तो आला तेव्हां मी लोळतच होतें. त्यालाच सांगितलें, 'बाळ, तें कपाट उघड नि त्यांतून दूध काढून घे.' नंतर बाळानें दूध घेतल्यावर कप तेथेंच ठेवला. तेव्हां पुन्हां सांगितलें, 'बाळ, तेवढा कप उचलून ठेव बरें.' ह्यावरून तो पुढें माझी नेहमीं चेष्टा करायचा, कीं 'लक्ष्मीबाई, पंचम जॉर्ज तुमच्याकडे कधीं आले तर त्यांना सुद्धां तुम्ही सांगाल, कीं 'बाळ तेवढें

फाटक लावून घे बरें येतांना.'

पण माझ्या एकेरी नांवानें त्याला हांका मारण्यामुळें एकदां मोठा अनर्थ झाला. माझें ऐकून भाऊजीहि त्याला एकेरी नांवानें हांका मारूं लागले. ठोंबरे दत्तूबरोबरचा. मोठा कवि झाला तरी बालकविच. त्याला एकेरी नांवानें हांका मारायला काय हरकत आहे असें त्यांना वाटलें असावें. एक दिवस भाऊजी बाहेर आले. तेथें ठोंबरे होता. त्यांनीं त्याला ठोंबरे इकडे ये—का कांहीं म्हटलें वाटतें. तो त्यांचें न ऐकतां तडक स्वयंपाकघरांत माझ्याकडे आला. मी स्वैंपाक करीत होतें. तो माझ्यापुढें बसला.

"लक्ष्मीबाई, मला तुमच्या दिराचें वागणें अगदीं पसंत नाहीं. हे कोण एवढे मोठे? मला सारे मान देतात. टिळकसुद्धां मला अरे तुरे म्हणत नाहींत आणि ह्यांनीं कां मला अरे तुरे म्हणावें? मी त्यांना आतां जाऊन चांगलें समजावतों."

"अरे बाबा, त्यांना कांहीं बोलूं नको. मी नाहीं का तुला अरे तुरे म्हणत?"

"तुमची गोष्ट वेगळी. तुम्हीं माझ्या आईच्या जागीं आहां. तुम्ही माझ्या खस्ता खाल्ल्या आहेत. माझ्या आजारांत हे आले होते का काम करायला? हे कोण?"

"ते माझे दीर! माझ्यासाठीं त्यांना कांहीं बोलूं नको—"

हे बोलणें चाललें आहे तों भाऊजी घरांत माझ्याकडे आले. आपल्या भावजयीशीं ठोंबरे भांडत आहेत व ती त्यांची समजूत करीत आहे! हें काय प्रकरण आहे त्यांना कळेना. त्यांनीं ठोंबऱ्यांना विचारलें, काय झालें. तों तो आणखी उसळला. भाऊजी म्हणाले,

"ठोंबरे, मी अगदीं सहज अरे तुरे म्हणत होतों. पुन्हां नाहीं कधीं म्हणणार. माझी चूक झाली. मला नाहीं वाटलें तुम्हांला इतका राग येईल."

आणि त्या दिवसापासून ते त्याला अहो जाहो म्हणूं लागले.

मीहि त्याला अहो जाहो म्हणूं लागलें. पण मला ते साधेना आणि

ठोंबऱ्याला तें आवडेना. तो एक दिवस माझ्याजवळ येऊन बसला. ' लक्ष्मीबाई, आत्तां किती दिवस असें हें चालायचें ? मला एकदां तुम्ही दिलेल्या नांवानें हांक मारा पाहूं ! '

मी म्हटलें, ' चल मूर्खा ! ' मग तो हांसला आणि मीहि हांसलें. मी त्याला फार प्रेमानें बोलायचें झालें म्हणजे मूर्खा म्हणे व त्यानें त्या दिवशीं मी दिलेल्या पदवीचा उच्चार करून घेतला तेव्हां त्याचें समाधान झालें.

ठोंबरे आमच्या घरीं आल्यावर त्याला विषमज्वर झाला होता. चाळीस दिवस तो एकसारखा तळमळत होता. त्यावेळीं टिळकांचा पैसा, माझे व रामभाऊ धर्माधिकाऱ्यांचे श्रम, सोराबजीचें औषध व देवाची दया ह्यामुळें तो वांचला व महाराष्ट्राला त्याचा इतका उपयोग झाला. त्या वेळीं मला रात्र रात्र झोंप नसे. त्याचें सर्वच मला करावें लागे व म्हणून त्याला व त्याच्या आईला माझ्याबद्दल एक निराळाच स्नेहभाव वाटे. त्याची आई म्हणे, ' लक्ष्मीबाई, नाना माझा नाहीं, तुमचा आहे. तुम्ही होतां म्हणून त्याचा पुनर्जन्म झाला. '

घरांत तो अगदीं घरच्यासारखा—दत्तूप्रमाणें वागे. टिळकांच्यापेक्षां तो माझ्याच मागें मागें असायचा, टिळकांच्या समोर आला म्हणजे मात्र मोठा गंभीरपणाचा आव आणण्याचा प्रयत्न करायचा.

कविता केली म्हणजे त्याची पहिली श्रोती मी. मी इकडे कामदारणीला कांहीं सांगत असलें किंवा कोणाशीं कांहीं बोलत असलें म्हणजे तिकडे त्याची कविता वाचून दाखविण्याची घाई व्हायची. आणि माझें दुर्लक्ष आहेसें दिसलें म्हणजे त्यानें ती कविता रागानें माझ्यापुढें टरकावून फाडून टाकायची. मग दत्तू बेबीनें त्याला चिडवायाचें.

—" अरसिक किती हा मेला
हा कविता फाडुन बाहिर गेला "—

मग त्यानें हंसायाचें व पुन्हां ती लिहून काढायची. ठोंबऱ्याला कविता फाडण्याचा बराच नाद असावा. कारण नगरला येण्यापूर्वीच्या त्याच्या बहुतेक कविता अशाच गेलेल्या आहेत. त्यांतील कांहीं त्याला पाठ होत्या, त्या तो म्हणून

दाखवी. एक किनरीवाला म्हणून कविता होती. एकींत दगडावर चांदणें पडलें होतें तें इतकें पांढरें स्वच्छ होतें, कीं तें हरिणबालकें दूध म्हणून चाटीत आहेत अशी कल्पना होती.

ठोंबरे नगरास आल्यावर हायस्कूलमध्यें जाऊं लागला. तिसरींत किंवा चौथींत असेल तो. तेव्हां दत्तूहि हायस्कूलमध्येंच होता. ठोंबरें शाळेंतून आला, कीं लक्ष्मीबाई गोष्ट सांगा म्हणून माझ्या मागें लागायचा. मी त्याला गोष्टी सांगून दमून गेलें. त्याचा आपला रोजचा लकडा. लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा. त्या वेळची ही गोष्ट.

एक दिवस माझी विहीण—म्हणजे हौशीची सासू-आली होती. तिला जडी-बुटीच्या औषधांची चांगली माहिती असल्यानें तिची माझी मोठी गट्टी असे. तिला गोष्टीहि पुष्कळ माहीत होत्या. शिवाय एकदां तिची ती गोष्ट सुरू झाली म्हणजे चार चार तास ती सहज चाले.

त्या दिवशीं ठोंबरें शाळेंतून आल्यावर म्हणाला,

" लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा ना. "

" हें बघ आज आली आहे माझी विहीण. तिला चांगल्या चांगल्या, मोठ्या मोठ्या, लांब लांब गोष्टी येतात. ती सांगणार आहे आज तुला गोष्ट ! "

माझ्या ह्या बातमीनें ठोंबऱ्याला खूप आनंद झाला.

जेवणीं होऊन निजायला जाण्याच्या वेळेपर्यंत त्यानें बाहेरून आंत व आंतून बाहेर कितीतरी खेपा घातल्या.

नेहमींप्रमाणें आम्ही सारे एका दंडाळीला निजलों. भास्कर, दत्तू, बेबी, मी, माझी विहीण, ठोंबरे वगैरे. मुलांना माझ्या विहिणीच्या गोष्टींचा चांगला परिचय असल्यानें तीं सारीं तोंडावर पांघरुणें घेऊन ठोंबऱ्याला हसत पडलीं होतीं. इकडे आज आपल्याला मोठी गोष्ट ऐकायाला मिळणार म्हणून ठोंबरे आनंदांत होता. त्यानें माझ्या विहिणीशेजारीं जागा पटकाविली, अंथरुणावर खुरमांड्या घातल्या व कान टवकावरून तो गोष्ट ऐकूं लागला. गोष्टीला सुरुवात झाली ती गोष्ट अशी —

" हे बघा भाऊ ! एक उज्जनीचा राजा होता. त्याच्या अस्तुरीला होती एक कार, एक पुत्र. तीं त्याची पहिली अस्तुरी गमावली. त्यानं केली दुसरी अस्तुरी. त्या दुसऱ्या अस्तुरीला सवतीचीं पोरं नको होतीं. तिनं केलं ढोंग, कीं आपले डोळे लई विघडले. ती म्हणाली, मला एका जोशानें सांगितलें आहे, कीं दोन्ही मुलांनीं मिळून वनांत जाऊन त्रासाचं काळीज आणावं व मला खायला द्यावं. मग माझें डोळे वरें होतील. "

" त्रासाचं काळीज ? त्रासाला कसं काळीज असणार ? " ठोंबरे म्हणाला.

" त्रासाचं नाहीं भाऊ तारसाचं. राजानं अस्तुरीचं ऐकून दोन्हीं पोरं वनांत सोडलीं. ते निघाले. एक वन वलांडलं, दोन वनं वलांडलीं, तीन वनं वलांडलीं, चार वनं वलांडलीं, पांच—

" अहो बाई, त्यांनीं हजार वनं वलांडलीं. पुढं काय झालं तें सांगा. " ठोंबरे म्हणाला.

विहीण उत्तरली,

" थांबा ना भाऊ, अशी घाई करूं नका. पांच वनं वलांडलीं, सहा वनं वलांडलीं, सात वनं वलांडलीं. त्यांना भेटला एक राजहंस. त्यानें त्यांच्यावर साया केली. त्यानं बसविलं त्यांना एका रिक्षाखालीं. आणि त्यानं घर बांधण्याचा विचार केला. त्यानं एक समिंद्र वलांडला, दोन समिंद्र वलांडले, तीन समिंद्र वलांडले. "

" बाई, त्यांनीं सात समिंद्र ओलांडले, कबूल ! पण पुढें काय झालें त्या मुलांचें तें सांगा ना ! "

" थांबा ना भाऊ, अशी घाई नका करूं. त्या पक्षिराजानें एक काडी आणली, त्यानं दोन काड्या आणल्या, तीन काड्या आणल्या, चार— "

" बाई त्या पक्ष्यानीं पर्वतप्राय काड्यांचा ढीग केला. पण पुढें काय झालें ? "

" थांबा ना भाऊ ! असं काय करतां ? मग तो पक्षिराज दगड गोळा करूं लागला. त्यानं एक दगड आणला, दोन दगड आणले, तीन दगड आणले—"

" त्यानें मेरू पर्वताएवढी दगडांची रास घातली. कबूल आहे मला. पण त्या

मुलांचें काय झालें तें सांगा ना ! ''

विहीण म्हणाली, '' हें काय बरं भाऊ असं करतां ! मला सांगू द्या ना—''

ठोंबरे कंटाळला. त्याला झोंप येऊं लागली. पण माझ्या विहिणीला गोष्टीचें फारच स्फुरण चढलें. ती जी पडल्या पडल्या गोष्ट सांगत होती ती आतां उठून बसली !

'' भाऊ, उठा ना ! आतां काय अगदीं उलीशी राहिली. उठून बसा ना–''

आमच्या सर्वांच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या. शेवटीं ठोंबरे म्हणाला,

'' बाई, मी तुमच्या पायां पडतों पण आतां मला झोंपूं द्या. '' पण तिनें त्याला तीन वाजेपर्यंत झोंप येऊं दिली नाहीं. तो निजला, कीं ती त्याला हालवून उठवायची व अशा रीतीनें तिनें आपली गोष्ट पुरी केली. पहाटें आम्ही उठलों पण हीं दोघें बराच वेळ निजून राहिलीं. मी स्वैंपाकघरांत होतें. ठोंबरे उठल्या-बरोबर तेथें आला व त्यानें मला अगदीं खरा खरा साष्टांग नमस्कार घातला.

'' लक्षुम्बाई, अगदीं हात जोडून, साष्टांग नमस्कार करतों तुम्हांला, तुमच्या विहिणीला आणि त्या तिच्या गोष्टीला. ही तुमची विहीण मोठी कादंबरीकर्ती बनणार होती पण कोठें माशी शिंकली कोण जाणें. ''

आम्हांला मात्र त्या रात्रीचें हें बिन पैशाचें नाटक पुढें कित्येक महिने पुरलें.

*　　　*　　　*

मासिक मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकांत करंज्यांतील मोदक नांवाची माझी एक कविता प्रसिद्ध झाली होती. ती कविता पुष्कळांना आवडली. विशेषतः

**किति हिंदकन्यका वेड्या ! ह्या म्हणा**
**ह्या किती पावती थोड्या शिक्षणा**
**ह्या करवी रचवी माझ्या कल्पना**
**जागीं राहूं वेड्या अशाच आम्ही बाई !**
**करूं वेड्या इतरां ! यांत न संशय कांहीं—**

ह्या पांच ओळी विशेषच आवडल्या होत्या.

करंज्या केल्या म्हणजे त्याबरोबर एक लहानसा मोदक केलाच पाहिजे.

पुरणाच्या किंवा गुळाच्या पोळया केल्या, कीं त्यांत एक कानवला आलाच; पापड झाले कीं त्यांत एक लाटी तशीच राखून ठेवायची, ही जी हिंदु स्त्रियांची चाल आहे, तिचा अर्थ ह्या कवितेंत सांगितला आहे. मी पापड लाटीत होतें व दत्तू जातां येतां लाट्या लाटीत होता. शेवटीं सर्व पापड लाटून झाल्यावर एक लाटी उरली. त्याचा तिच्यावर डोळा होता. मी ती त्याला घेऊं देईना. तेव्हां त्याला हा सर्व शास्त्रार्थ सांगितला व ही कविता झाली. अर्थात् हिच्यावर टिळकांचा सफाईदार हात फिरलेला आहेच.

ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर मला पंढरपूरहून एका बाईचें पत्र आलें; त्यांत असा प्रश्न केला होता कीं —

**मोदक बहु गोड असे आकारहि सुबक साधला बाई!**
**तव भर्त्याचें त्याला साह्य नसे का कथीं मला ताई?**

हें पत्र वाचल्यावर मला प्रथम टिळकांचा मोठा राग आला. हे मला उगीचच प्रसिद्धी देत बसतात नि माझी अशी फजिती होते! पण माझ्या त्या कोपाग्नीची आंच लागण्यास टिळक मजजवळ होते कोठें? दूर कोठें तरी बसून आपलें ख्रिस्तायन महाकाव्य लिहावें म्हणून नुकतेंच वाईजवळ भुइंज येथें जाऊन राहिले होते.

मला कवितेनें भंडावून सोडलें. पंढरपूरच्या पत्राला कवितेंतच उत्तर देण्याचें माझ्या मनानें घेतलें व माझी सर्वांत मोठी प्रसिद्ध झालेली कविता पतिपत्नी ही मीं त्यावेळीं लिहिली. ही कविता विशेषतः रात्रीं अंधारांत सुचायची. ओळीच्या ओळी डोक्यांत यायच्या. त्या मीं खडूनें जमिनीवर उतरून ठेवायच्या. एखादे वेळेस जवळ टाक नसला कीं आगपेटीची काडीच दौतींत बुडवून टाकाची भूक काडीवर मी भागवी. सकाळीं ठोंबऱ्यांनीं माझी ही रात्रींची बिगार कागदावर उतरून ठेवावी. असें करतां करतां पावणे तीनशें ओळींची कविता तयार झाली.

ती कविता व एक खरमरीत पत्र टिळकांना पाठवून दिलें. हीं दोन्हीं पत्रें अजून दत्तूनें सांभाळून ठेवलीं आहेत.

आमच्या घरादारांत त्यावेळीं सारे कविता करीत असत. ह्या कवितेंत "वर्षें झालीं साठ वयाला, सखा पतीचा माझा गाउं लागला" म्हणून जो उल्लेख आहे तो रावसाहेबांसंबंधीं आहे. रावसाहेब दररोज आमच्याकडे यायचे. दररोज त्यांचें काव्यगायन आम्हांला ऐकावें लागायचें. ठोंबऱ्याप्रमाणें त्यांचीहि मींच श्रोती असे.

एक दिवस रावसाहेब आले. त्यांना टिळकांना कांहीं जरूरीचें पत्र लिहावयाचें होतें. दत्तूनें त्यांना दऊत टाक दिली व जवळच तो व ठोंबरे बसले. रावसाहेब पत्र लिहूं लागले. पत्र लिहितां लिहितां ते काय लिहित तें वाचीत व प्रत्येक वाक्याच्या शेवटीं प्रश्नचिन्हार्थी ऊं म्हणत. मला हूं म्हणावें लागे. पत्र खूप मोठें होतें. दत्तू व ठोंबरे हसत. शेवटीं त्यांना हसूं आवरेना म्हणून ते दोघे उठून बाहेर गेले. रावसाहेबांच्या कांहीं हें ध्यानांत आलें नाहीं. पण माझ्या ध्यानांत आलें. त्यांनीं ऊं म्हटलें कीं मला हूं म्हणावें लागे व मग पोरें गेल्यानें मलाहि हसूं यायला लागलें. पत्र संपलें. आतां पत्ता ! मी दत्तूला व ठोंबऱ्यांना आंत बोलावलें, 'अरे बाबांनो, तेवढा लिहून द्या रे.' आणि बाबा बसले. एकानें पत्ता लिहिण्यास सुरुवात केली.

"रेव्हरेंड. ऊं ?"

दुसऱ्यानें म्हटलें, "हूं."

"नारायण. ऊं ?"

"हूं."

"वामन. ऊं ?"

"हूं."

"अमेरिकन मिशन. ऊं ?"

"हूं."

"भुइंज. ऊं ?"

"हूं."

"जिल्हा. ऊं ?"

" हूं. "

" सातारा. ऊं ? "

" हूं. "

पत्ता लिहिला. रावसाहेब पत्र खिशांत टाकून निघून गेले.

रात्रीं ही ऊं हूंची गम्मत आठवून माझें मलाच हसूं येत होतें. पण मग फार वाईट वाटलें, रावसाहेब वयानें, विद्येनें आमच्यापेक्षां किती तरी श्रेष्ठ आणि आम्हीं त्यांची चेष्टा करावी.

दुसऱ्या दिवशीं असाच प्रकार घडला. ठोंबरे व दत्तू घरावर चढून बसले होते. खालीं भास्कर व बेबी होती. रावसाहेब आले, घरावर चढल्याबद्दल ते त्या दोघांना बोलूं लागले. ठोंबरे त्यांची थट्टा करूं लागले. त्यांना दुसरीं मुलें साथ देऊं लागली. रावसाहेबांना फार राग आला व त्यांनीं आंत येऊन मजजवळ हा सारा प्रकार सांगितला.

मी बाहेर आलें व ठोंबऱ्याला खालीं बोलावूं लागलें. पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. मग रावसाहेबांच्या त्या दिवसाच्या कविता ऐकण्यास मी बसलें. इकडे ठोंबरे खाणावळींत जेवण्यास निघून गेला.

दत्तू, बेबीला मी खूप रागावलें. " रावसाहेबांची थट्टा केलेली मला मुळींच खपणार नाहीं. पुन्हां असें झालें तर मार मिळेल. मी ठोंबऱ्यालाहि सांगणार आहें तो जेवून आल्यावर. त्याच्याशीं मुळींच कोणी बोलायचें नाहीं. "

रात्रीं जें तें आपआपल्या बिछान्यावर गुपचीप पडलें होतें. नऊ वाजतां ठोंबरे जेवून आला. आज जिकडे तिकडे चिडेचिप झालेली पाहून आजचें वातावरण कांहीं निराळेंच असल्याचें त्यानें ओळखलें. तरी तो प्रत्येक बिछान्याजवळ गेला. प्रत्येकाजवळ बोलण्याचा त्यानें प्रयत्न केला. मोठमोठ्यानें हंसून पाहिलें. पण कोणी त्याच्याकडे पाहीना सुद्धां. तो खिन्न झाला. त्याला हा प्रकार काय आहे तें कांहीं कळेना.

मग माझ्यापुढें येऊन तो बसला.

" लक्ष्मीबाई, हा काय प्रकार आहे ? मला हें कांहींच कळत नाहीं. "

" बाबा रे, आम्ही असा बेत केला आहे, कीं जोंपर्यंत तूं आपली चूक कबूल करीत नाहींस तोंपर्यंत कोणीं तुझ्याशीं बोलायचें नाहीं. "

" माझी काय चूक झाली ? "

" मोठ्या माणसांची थट्टा करण्याची. थट्टा करायची झाली तर ती बरोबरीच्या माणसांची करावी. तूं आम्हांला किती आवडतोस ! तुला कोणीं नांवें ठेवलीं म्हणजे आम्हांला किती वाईट वाटतें ह्याची तुला जाणीव नसेल. तूं रावसाहेबांची थट्टा केल्यावर ते तुला चांगला मुलगा म्हणतील का ? त्यांनीं तुला वाईट म्हटलें तर तें मला आवडेल का ? आणि तूं आम्हांला जितका आवडतोस तितकेच रावसाहेबहि आवडतात. तेव्हां जोंपर्यंत तूं कबूल करणार नाहींस, कीं मोठ्या माणसांची थट्टा करणार नाहीं, तोंपर्यंत आम्हीं कोणी तुझ्याशीं बोलणार नाहीं. "

ठोंबरे बालकवि होता. पण कविपेक्षांहि तो बाल अधिक होता. माझें बोलणें ऐकून त्याला इतकें वाईट वाटलें, कीं त्याचें प्रतिबिंब त्याच्या तोंडावर व डोळ्यांत वठलें. त्याच्या डोळ्यांतून आसवें ठिपकूं लागलीं.

" लक्ष्मीबाई, तुमच्या पायाची शपथ मी आजपासून कोणत्याहि वडील माणसाचा उपमर्द करणार नाहीं. "

मग मीं त्याला पोटाशीं धरलें. मलाहि हुंदका आला. आणि बालवृत्तीचा ठोंबरे पुन्हां हसूं खेळूं लागला.

मात्र त्या दिवसापासून त्यानें कधीं कोणाचा उपमर्द केला नाहीं.

* * *

मी एक सामाजिक कादंबरी लिहिण्यास घेतली होती. मला लिहितां लिहितां एखादें जोडाक्षर मध्येंच अडवी; मग पुस्तकाची उलथापालथ करून तो शब्द कोठें आढळला म्हणजे माझी गाडी पुन्हां रुळावर येई. एक दिवस असेंच माझें कादंबरीलेखन अगदीं जोरांत चाललें असतां मध्येंच घोडे अडलें. मला मनुष्य कांहीं काढतां येईना मी हातांशीं होतीं नव्हतीं तेवढीं पुस्तकें उलटीं पालटीं केलीं. पण मनुष्य कोठें सांपडेना. मी चिंतातूर

होऊन बसलें आहें. सभोंवार पुस्तकें अस्ताव्यस्त पडलेली आहेत. घरांत काम हांका मारीत आहे अशा वेळीं ठोंबरे घरांत आले. हा सारा देखावा पाहून ते म्हणाले,

" लक्ष्मीबाई, तुम्ही अशा का बसलां ? कांहीं हवें का तुम्हांला ? "

" काय करूं रे ! मला हवा आहे मनुष्य. इतकी उलथापालथ केली पण तो कुठे सांपडत नाहीं. "

ठोंबरे माझ्यापुढें छातीवर हात ठेवून उभा राहिला.

" कशाला एवढी उलथापालथ करतां. हा पहा. इथें उभा आहे मनुष्य. आणखी हवे असतील तर जरा बाहेर या. हवीं तितकी मनुष्यें दाखवितों. कांहीं तोटा नाहीं. अहो, साऱ्या जगांत मनुष्येंच मनुष्यें. माणसांना काय तोटा ? "

" अरे, मला जगांतलीं नकोत रे माणसें, पुस्तकांतला मनुष्य पाहिजे. "

मग आम्हीं दोघें खूप हंसलों. ठोंबऱ्यांनीं मला मनुष्य काढून दिला.

एक दिवस माझीं तीं कादंबरी मी ठोंबऱ्यांना वाचायला सांगितली. त्यांनीं ती वाचून तिच्यावर खालीं दिलेला अभिप्राय लिहून ठेवला.

अभिप्रायः—सदर कांदबरी
मी संप्रुण वाचली. आशी
कांदबरी समंध माराष्ट्र
भाशेंत दूसरी दीस्णार नाही,

**त्रिंबक बापूजी टोंबरे**

आहामंद नग्र

तारीख. पंदरा. ज्यून येकोणीशाच उदा

**जाइरात**

नावें नोदवा नावें नोदवा नावें नोदवा

अप्रतिम गंथ्र अप्रतिम गंथ्र अप्रतिम गंथ्र

ही संधीपू न्हायेणा रनाहीं

वरील अभिप्रायाचें पान अजून मजजवळ आहे, कादंबरीला नांव ठेवलें नव्हतें. पण वर ठोंबऱ्यांनीं मोठ्या अक्षरांत ‘ लक्ष्मुम्बाईची कांदबरी ’ असें ठेवलें होतें. तें पान काळाच्या उदरांत गडप झालेलें आहे. त्या गोष्टीला आतां एकवीस वर्षें झालीं. आतां मला पुष्कळच चांगलें लिहितां येतें. पण तेव्हांचें माझें लिखाण म्हणजे पोरांच्या थट्टेचा एक विषय होता.

बेबीला पुण्याच्या हुजूरपागेंत टाकलें होतें. आधीं आधीं तिला घरची फार आठवण व्हायची व मोठीं मोठीं लांब लांब पत्रें घरून यावीं असें तिला वाटे. तिच्या दर पत्रांत लांब पत्राची मागणी असे. दत्तू कॉलेजमध्यें, घरीं मी व ठोंबरे. तेव्हां तिची ती इच्छा पुरी करण्याचें काम फक्त आमच्यावरच पडायचें.

एक दिवस बेबीचें पत्र आलें, कीं मला तुमचें लांबलचक पत्र आलें नाहीं, तरी लांब पत्र पाठवा. त्यावेळीं ठोंबरे व मीच घरीं होतों. त्या पत्राला ठोंबऱ्यांनीं उत्तर लिहिलें. पत्र होतें चार सहा बोटें रुंद. कागदाला कागद चिकटवून तें इतकें लांब केलें होतें, कीं तें उघडलें म्हणजे तिच्या डोक्यापासून पायापर्यंत पुरावें. तें पत्र हें —

## कहाणी

अहमदनगर फर्ग्युसन गेट<br>
टिळकांची वाडी<br>
मधलें घर<br>
माठानजीक, जात्याशेजारीं,<br>
लहानसें अंथरुण, त्यावर<br>
निजलेल्या लक्ष्मीबाईंच्या<br>
उशानजीक ता. ३–३–१४

अनेकोत्तम आशिर्वाद विशेष.

आटपाट नगर होतें. तेथें एक गृहस्थ होते. त्यांना एक मुलगी होती. तिचें

म्हणणें मला लांबलचक पत्र पाठवा ! लांबलचक पत्र ! लिहूं नये लिहिलें; कसें लिहावें, काय लिहावें, मार्च महिना, तिसरी तारीख, खिचडी करावी, साध्या पोळ्या, लोणकढं तूप, जेवण करावं, चाकराला भांडीं घासायला द्यावीं. कोठीच्या खोलीला कुलूप लावावं. फाटकंस अंथरावं, तुटकसं पांघरावं, एक वाजायला आला जरा आडवं व्हावं. असं केल्यानं काय होतं, देहमन निचिंत होतं, लांबलचक पत्र लिहिलं जातं.

ऐका ऐका ताराबाई तुमची कहाणी. पुणें शहर, हुजूरपागा हायस्कूल, बोर्डिंगमध्यें. थोडीशी मंगोलियन, थोडीशी बर्मी, थोडीशी जपानी, थोडीशी इंडियन, अर्धी भाकर सगळा कांदा भिकारणीला वाढला ताराबाईचा अवतार घडला.

अरबांतला मुल्ला, तुर्कांचा काजी, ग्रीकमधला शिपाई, रशियांतला रशियन, कोंकणांत गेला भुरका झाला, अंगणांत आला खुडखुडत पडला. मोठ्यानें रडला. सगळ्यांनीं पाहिला, न्हाणलं धुणलं. ऊठ बाबा मोठा हो ! बाबा मोठा झाला !

नागपूर शहर, हिस्लॉप कॉलेज,

इंटर क्लासांत, शिकायला गेला. असली बहीण, असला भाऊ, त्रिखंड शोधून, गेलं पाहूं, थकला भागला निराश झाला, घरचं खावं लष्कराच्या भाकरी भाजाव्या असलं काम कोण करी, काम नाहीं धाम नाहीं तोच असलं काम करी."

बेबीनें एक कविता केली होती. तिची पहिली ओळ 'माझी मांजर माझी मांजर' अशी होती. ही मांजर इंजिनियर खात्यांतून दत्तूच्या प्रधान नांवाच्या मित्रानें बेबीला आणून दिली होती. तिचें हें खालचें वर्णन आहे.

"इंजिनियर खात्यांत मांजर व्याली. तिला तीन पिलें झालीं. एक कुत्र्यानें खाल्लं, एक मांजरानें नेलं, ऊठ भाऊ प्रधानाला सांग 'तारा राणीला मांजर पाहिजे! तारा राणीला मांजर पाहिजे!' कसं पाहिजे काय पाहिजे? रोगी कष्टी मिच मिच दृष्टी, रोडके पाय तणतण करीत नाचत जाय! प्रधानानं दिलं शिपायां हातीं, हाकारे नगारे, पिटा रे नगरामध्यें, तारा राणीचं मांजर आलं! तारा राणीचं मांजर आलं! आतां बाई ठेवूं कुठं नेऊं कुठं, राहुं कुठं, माझी मांजर, माझी मांजर. डोक्यावर घेऊं का खांद्या-वर घेऊं, पलंगावर घेऊं का निजायला जाऊं. दोन सासर दूध पिते. दोन बचक

मांस खाते. दूध काढायचे वेळीं त्रास देते, दुधाच्या बालदींत जीव देते. पण उंदीर पाहून पळून जाते. गरीब झुरळांचा जीव घेते. माझी मांजर माझी मांजर, बन्या बाबाचा हात फोडते, चंपीवर दांत काढते, ब्लॅकीवर फुस् करते. हडहड पाप्या चांडाळा, माझं मांजराचं खाद्य तूं कुठें घेऊन चाललास. म्यांव म्यांव, बन्यानं दिलं बनीनं खाल्लं, किती खाल्लं तरी पुरत नाहीं, दरिद्र कांहीं फिटत नाहीं, हावरेपणा मिटत नाहीं.

आमच्या हातांची शिकार करते. लुगड्या धोतराचं सोंग धरते, सोंगट्या उडवून घरभर भरते, आतां बाई सांगूं किती लिहूं किती. गुण कांहीं संपत नाहीं. वर्णन केल्यावांचून राहवत नाहीं. आतांच, पहा, पत्र फाडलें, नवें जोडलें तेव्हां पुढचें लिहिणें घडलें. बबीपुराण लिहूं नाहीं लिहिलं. कसें लिहावं काय लिहावं काहाणीचं एवढं फळ, पत्राचं काय फळ, तें पत्र मला सांग. गुडगुड गुपित किल्ला कुपित, काय तुझ्या मनांत सांग माझ्या कानांत. तुझ्या मनांतलं मीं जाणलं, लांबलचक पत्र आपलं. पत्राच्या मिषें दौत भेटली, लेखण

भेटली—लांब पत्र लिहिण्याची हौस
फिटली.

[ बेबी ! तुझा कान पुढें कर. हें बघ, फाल्गुन महिना लागलाच आहे, वेड्यासारखी बाजा वाजविण्याची परवानगी कशाला मागायला पाहिजे ? दररोज मनसोक्त बाजा वाजवीत जा. सर्व मंडळीची सदर परवानगी आहे. ] ”

कहाणी अगदीं जुन्या स्त्रियांच्या कहाणीप्रमाणें तालांत व ठसक्यांत झाली होती. त्याच पत्रांत तिनें कार्ल्याचीं लेणीं पहायला जाण्याविषयीं लिहिलें होतें. ती परवानगी देऊन पुढें कार्लेपुराण आहे. ती कहाणी व तें ओवीबद्ध पुराण मिळून पुरुषभर उंचीचें तें पत्र होतें.

* * *

आमच्या घरीं असतांना ठोंबरे नेहमीं आनंदी, खेळाडू, आशावादी असा असावयाचा. पण नगर सोडून गेल्यावर त्याची ही वृत्ति नेहमीं बदले. पुन्हां परत आल्यावर त्याची बालवृत्तीहि परतायची. बाहेर जायचा म्हणजे खानदेशांत नाहीं तर पुण्याला. पुढें पुढें कामानिमित्त तो महाबळेश्वरला जाऊं लागला. पण त्या वेळेपर्यंत त्याची वृत्ति स्थिर झाली होती. तो महाबळेश्वरला जाऊं लागला. तेव्हां ही आंदोली वृत्ति राहिली नव्हती.

एक दिवस खानदेशांतून आल्यानंतर आल्याबरोबर त्यानें माझ्याशीं भांडायला सुरुवात केली.

“ तुम्ही सर्वजण माझ्यावर प्रेम कां करतां ह्याचें मला कारण सांगा. ”

“ मला नाहीं तुझें बोलणें कळत. ”

“ तें नाहींच कळणार. कारण त्यांत तसेंच गूढ आहे. ”

“ ठोंबरे, मला तुझें गूढबीढ कांहीं कळत नाहीं. कोणी प्रेम कर म्हणून करीत नाहीं. नको करूं म्हटल्यानें थांबत नाहीं. ”

“ नाहीं. त्या प्रेमाच्या बुडाशीं दुसराच हेतु आहे. ”

“ कोणता बाबा हेतु ? मला तर कांहींच दिसत नाहीं. ”

“ नाहीं ना ? नाहीं ना ? मग तुम्ही मला दूध कां प्यायला देतां ? ”

" ठोंबरे, मला बाबा तुझें म्हणणें कांहीं कळत नाहीं ! "

" कळतें. हें सारें मी ख्रिस्ती व्हावें म्हणून चाललें आहे ! "

" ठोंबरे ! तूं ख्रिस्ती झालाच तर मला आनंदच होईल. कारण मी ख्रिस्ती आहें व ख्रिस्ती झाल्यानें आत्मिक उन्नति होते असा माझा भरवंसा आहे. पण तेवढ्यासाठीं मी किंवा टिळक तुजवर प्रेम करतों असें म्हणणें मात्र चुकीचें आहे. कारण प्रेम कोणत्या हेतूनें करावयाचें म्हटलें तर तें प्रेमच नाहीं. तें नाटक झालें. तुझ्यासाठीं ज्या खस्ता खाल्ल्या व खातों तें नाटक आहे असें तुलाच वाटत असेल तर गोष्ट निराळी. वाटतें का तुला हें सगळें नाटक आहे म्हणून ? कोणीं तुझ्या मनांत हें वेड भरवून दिलें ? "

ठोंबरे शांत झाला व पहिल्याप्रमाणें वागूं लागला.

* * *

पुन्हां एकदां ठोंबरे असेच पुण्याहून आले होते. आमच्या माजघरांत दोरीचा झोंका बांधला होता. त्यावर ते येऊन बसले. मी तेथेंच स्वैंपाकणींना कांहीं सांगत होतें. ठोंबरे झोंक्यावर बसून झोंक्याला पीळ देत होते. पीळ बसला म्हणजे त्यांच्यासह झोका गरगर फिरे. पीळ निघे व पुन्हां पीळ बसूं लागे. त्यांचें भाषणहि अशाच पिळाचें होतें.

" कुऱ्हाडीचा दांडा मुळाला गोता."

" म्हणजे रे काय ? "

" म्हणजे दांडा असतो तो झाडाचाच. पण तो कुऱ्हाडींत बसला म्हणजे त्यानें झाडाचीं मुळें देखील तोडतां येतात. "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे तुम्ही. "

जसा त्या हिंदोळ्याला पीळ बसला होता तसाच ठोंबऱ्याच्या मनालाहि बसलेला होता. मीं म्हटलें,

" ठोंबरे, तुझ्या मतानें आम्ही दांडा नाहीं कां ? "

" होय ! अलबत्. "

"आणि मुळें तुम्हीं ना ? आणि कुन्हाड रे बाबा ? तुमच्या त्या रूढीची आम्ही पायमल्ली केली, तुम्हांला ती कशी सहन होणार ?"

पण मी बोलत होतें तें माझ्या स्वभावाप्रमाणें सारें हंसत हंसत.

तों तों त्याचा संताप अधिकाधिक वाढत होता. तो म्हणे, मी इतका रागावतों आणि तुम्हांला त्याचें कांहींच कसें नाहीं ? तुम्ही हंसतां. मीं म्हटलें, "अरे बाबा तो झोका आहे ना ? तूं जितका त्याला पीळ देतो आहेस तितका तो बसतो आहे. तो उकलणेंहि तुझ्याच हातांत आहे. माझ्या मनांत कांहीं पीळ नाहीं म्हणून मी हसतें आहे. तूं पीळ उकल म्हणजे तूंहि हंसायला लागशील."

ठोंबरे आम्हांला आमच्या मुलाइतका प्रिय वाटायचा व त्यालाहि आमच्या-बद्दल तेंच प्रेम वाटायचें. पुढें पुढें त्यानें शाळा सोडली व तो पंडिताचें म्हणजे युरोपियन लोकांना मराठी शिकविण्याचें काम करूं लागला. त्यामुळें त्याला कधीं पुण्याला तर कधीं नगरला राहावें लागे. उन्हाळ्यांत तो नेहमीं महाबळेश्वरला जाऊं लागला.

ठोंबरे जे पैसे मिळवी ते मजजवळ ठेवी. एकदां नगरास असतांना मी त्या पैशांतून थोडें थोडें मागें टाकून पन्नास रुपये सांचविले. पण मधेंच टिळकांच्या कांहीं खर्चिकपणामुळें मला हे पन्नास रुपये भर घालून तो खड्डा बुजवावा लागला होता. मी ठोंबऱ्यांना म्हटलें,

"ठोंबरे, मीं तुझे पन्नास रुपये सांचवले आहेत. ते मी खर्च करूं का ? मला कर्ज फेडायला ते हवे आहेत."

"खुशाल खर्च करा."

"मी ते परत कधीं करीन हें सांगतां येत नाहीं. देईन हें मात्र नक्की. आणि मी जर मेलें बिलें तर दत्तूजवळून घे. आणि तुला जर ते फार निकडीनें हवे असतील तर मला निदान एक महिना आधीं कळीव. मी त्याची तजवीज करीन."

"आतां तर तुम्ही ते घ्या. मग परत कसे घ्यावयाचे तें पाहूं."

ह्यानंतर ठोंबरे पुण्यास गेले. थोड्या दिवसांनीं पुण्याहून त्यांचा धाकटा भाऊ बाबू आला व पैसे मागूं लागला ! मला खानदेशांत जायचें आहे, व मला

आत्तांच्या आत्तां पैसे पाहिजेत. मीं म्हटलें, टिळक घरीं नाहींत, पगार झाला नाहीं. पगार झाला, कीं पैसे पाठवून देईन. पण बाबू ऐकेना. तो म्हणे, मला अमृतरावांनीं पाठविलें आहे व लौकर पैसे घेऊन यायला सांगितलें आहे. अमृतराव ठोंबऱ्यांचे वडील बंधु. मी म्हणे, बाबू मजजवळ पैसे असते तर मी ठेविले असते का? ह्यावर बाबू रागारागानें निघून गेला.

बाबू सकाळीं आला होता. तो दुपारीं गेला. संध्याकाळच्या गाडीनें ठोंबरे आला. तो साऱ्या वाटेनें रडतच आला. दत्तू फिरायला चालला होता. त्याला ठोंबरे खालीं मान घालून स्टेशनच्या रस्त्यानें पायीं येत असतांना दिसला. तसा दत्तूहि परत फिरला.

ठोंबऱ्याला पाहतांच मी म्हणालें, ठोंबरे, टिळक आल्याबरोबर मी पैसे पाठवून देईन. ठोंबरे स्फुंदत स्फुंदत म्हणाला, लक्ष्मीबाई मीं ह्या बाबूला पैसे आणायला पाठविलेंच नव्हतें. मला न कळत हे कारभार त्यानें केले. मी तुमची समजूत करायला आलों आहें. मला हें समजल्यावर पुण्यास एक क्षणभर राहावेना. मला पैशाची मुळींच अडचण नाहीं.

ठोंबरे स्वतःच्या कविता जितक्या प्रेमळपणानें म्हणत तितक्याच दुसऱ्याच्याहि म्हणत. त्यांना एखादी कविता आवडली म्हणजे तिच्या बाबतींत त्यांना आपपर भाव कधीं नसे व त्यांच्या कवित्वाची हीच खरी मजा होती. कांहीं कांहीं कवि असे असतात कीं दुसऱ्याची कविता म्हटली, कीं त्यांच्या नाकाला मुरड पडते.

ठोंबऱ्यांना टिळकांची कविता फार आवडे व वनवासी फूल तर ते इतकें उत्तम समजून सांगत, कीं त्याची मजा प्रत्यक्ष तें त्यांच्या तोंडून ज्यांनीं ऐकलें असेल त्यांनाच सांगतां येईल. एकदां टिळकांच्या वर्गाला त्यांनीं वनवासी फूल शिकविलें व विद्यार्थ्यांत खुद्द टिळक तें ऐकत बसले होते. प्रवृत्ति व निवृत्ति ह्या दोन मार्गांविषयी ठोंबऱ्यांचें भाषण ऐकून टिळक इतके खूष झाले, कीं त्यांनीं व्याख्यान संपतांच ठोंबऱ्यांना पोटाशीं धरलें.

एकदां टिळक फिरतीवर गेले होते. दत्तू कॉलेजांत व बेबी पुण्याला होती. ठोंबऱ्यांना भेटला कोणी ज्योतिषी. त्यानें त्यांना सांगितलें, कीं तुम्हीं अपघातानें

मरणार व तें आजच मरणार! तो जो आला तो थेट चुलीपाशीं घेऊन बसला.

"लक्ष्मीबाई, मला ज्योतिष्यानें आज अपघातानें मी मरणार असें सांगितलें आहे."

"अरे ज्योतिषी लबाड असतात. कांहीं तरीं सांगतात झालें. तूं आतां बाहेर जाऊंच नकोस,"

"पण मला गेलेंच पाहिजे. तें भविष्य खोटें कसें ठरणार?"

भविष्य खरें करण्याचा त्याचा बेत जेव्हां बाहेर पडला तेव्हां मी माझें हातांतलें काम तसेंच टाकून दिलें व त्याच्या जवळ बसून राहिलें. दत्तूच्याहि मित्रमंडळीला बोलावून आणलें व त्यांना आमच्या घरींच निजायला या म्हणून सांगितलें. दोन रुपयांची मिठाई आणली. मग ती सारी रात्र कांहीं करमणूक, कांहीं गाणीं, कांहीं गप्पा, ह्यांत जागून घालविली व तो दिवस व ती रात्र टळेपर्यंत ठोंबऱ्यांना दृष्टीपुढून हालू दिलें नाहीं. भविष्य त्या वेळेस खोटें ठरलें पण पुढें पांच वर्षांनीं खरें ठरलें.

टिळकांना साप उंदीर म्हटलें म्हणजे मोठी वीरश्री चढत असे. त्यांनीं मोठाले साप मारले आहेत. पण उंदीर मात्र बहुतकरून त्यांच्या हातांवर तुरी देत. एकदां एक साप उंदीर गिळून वेटोळें घालून बसला होता. टिळकांनी हळूच त्याच्यावर पातेलें नेऊन पालथें घातलें व भोंवतालीं गोवऱ्या रचून पेटवून दिल्या. वणीस असतांना एक मोठा साप माडीवर चढून आला. टिळक बसले होते त्यांच्या मागच्या खिडकींतून तो आंत आला. त्यांचा एक विद्यार्थी पुढें बसला होता. त्यानें सांगितलें गुरुजी, फार मोठा साप आला आहे. साप दोन पेट्यांच्या मागें गेला. टिळकांनीं दोन बाजूंनीं दोन दिवे लावून ठेवले व मध्यें आपण पेटीवर उभें राहून मुसळानें तो साप दाबून धरला व मारला. सवा पुरुष लांबीचा तो साप होता. असे साप त्यांनीं व दत्तूनें किती तरी वेळेला मारले. पण उंदीर मात्र त्यांना सांपडत नसत. रात्रीं कोठें खुट्ट झालें, कीं टिळक जागे व्हायचे आणि मग झोंप येणें फार कठीण होई. हा 'खुट्ट' आवाज बहुतेक उंदराचाच असे. मग काय? साऱ्या घरभर गोंधळ. दिवे लागायचे! काठ्या

गोळा व्हायच्या ! निजलेलीं माणसें सारीं जागीं व्हायचीं ! दारें खिडक्या बंद व्हायचीं ! एका दारांत मुलगा, एका दारांत मुलगी, खिडकींत ठोंबरे, पलीकडे बायको, आणि मधें टिळक काठीनें रपाटे घालताहेत. मी घाबरायची. 'अहो कोणाच्या डोक्यांत काठी पडेल.' ते म्हणायचे, 'हो मला काय वेडच लागलें आहे.' शिकार अगदीं रंगांत आली व उंदीर दाराजवळ आला कीं त्यांच्या मुलांनीं हळूच दार किलकिलें करून द्यायचें. मग हातांतून शिकार निसटलेल्या शिकाऱ्याची जशी स्थिति होते तशी त्यांची व्हायची.

"दत्त्या, तूं सोडला उंदीर."

"नाहीं पपा, तो आतां त्या दारांत दिसत होता."

अशा तऱ्हेचा वादविवाद आणि थोडी आदळआपट होऊन मग उरलेली रात्र झालेल्या श्रमानें झोंप यायची.

आमच्या फर्ग्युसन गेट कंपाउंडच्या—म्हणजे आमच्या घराच्या पाठीमागें लगतच, गांवकूस होतें. ही भिंत थेट प्रत्यक्ष चांदबिबीची ओळख सांगणारी होती व तिच्यांतून निजामशाहीचा इतिहास पाहिलेले सर्प बाहेर पडायचे.

एक दिवस माझ्या उशाखालीं कांहीं तरी हालत असल्याचा भास झाला. मी टिळकांना एकसारखी म्हणें, अहो माझें डोकें कोणी उचलीत आहे. मला काड्याची पेटी द्या पाहूं. पेट्यांचें कोठार टिळकांच्या जवळ असे. ते म्हणत, गप्प नीज. तूं फार भ्रांतिष्ट आहेस. तुझें डोकें उचलणारी तूंच आहेस. ह्या वादांत आम्हांला झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं टिळक आपल्या विद्यार्थीगणाला व दत्तूला घेऊन डोंगर-गणाला गेले. घरांत मी व बेबीच होतों. बेबीला कोणीं कडाका खेळायला दिला होता. त्याच्याच नादांत ती होती. दुसरें कांहीं काम नसल्यानें मी घराची साफसफाई करायला लागलें होतें. आम्ही जमिनीवरच निजत होतों. मी खोली साफ करायला लागलें तेव्हां पेटीमागें एक भला मोठा साप ! त्याचें तोंड माझ्या पायाच्या आंगठ्याजवळ ! मीं ती पेटी बाजूस सारली व चुलीजवळ मंजुळाबाईजवळ जाऊन बसलें. माझ्या तोंडांतून शब्द निघेना. मी

आपलें डोकें दाबून बसलें. मोठा साप निघाला आहे असें मी सांगूं लागलें. तिला वाटलें, मी कांहीं गोष्ट सांगतें आहे. ती आपली खुशाल हुंकार देत होती.

थोड्या वेळानें टिळक, दत्तू, भास्कर हे डोंगरगणाहून परत आले. त्यांना मी सापाबद्दल सांगूं लागलें. जे ते मला बेबीचा कडाका दाखवून हसूं लागले. मी जीव तोडतोडून सांगतच होतें. तेव्हां टिळक उठले व म्हणाले दाखव पाहूं तुझा साप कोठें आहे तो ! टिळकांच्या मागें दत्तू उठला व त्यांनीं दोघांनीं तपास चालविला. तों साप कपाटाच्या मागें दत्तूला दिसला. " हा पहा, पपा केवढा मोठा साप ! " दत्तू म्हणाला. मग सर्वच धावपळ सुरू झाली. काठ्या, छत्र्या, दिवे जें जें सांपडेल तें तें घेऊन मंडळी जमा झाली. भास्कर आपला चष्मा सावरीत सर्व मंडळीच्या खांद्यावरून सूचना देत होता. हा साप पुरुषभर लांब होता. तोच रात्रीं माझ्या उशीखालीं असावा.

आमच्या घरीं आधींच आनंद व खेळाडूपणा पुष्कळ. त्यांत ठोंबरे, दत्तू व त्यांची मित्रमंडळी ह्यांची भर, मग त्या आनंदीआनंदाला काय विचारायला पाहिजे !

सुट्टीचे दिवस असले म्हणजे दत्तू व बेबी घरा यायची. त्यांची मित्रमंडळी जमायची. घरांत सारा दिवसभर धुडगूस असायचा. दुपारीं जादूचे खेळ होत. संध्याकाळीं व्याख्यानें होत. प्रेक्षकांनाहि कांहीं तोटा नसे. टिळक, टिळकांना भेटायला आलेली मंडळी, मी, मजकडे बसायला आलेल्या बाया, हीं सारीं प्रेक्षक बनत. मुख्य भाग असायचा दत्तू, ठोंबरे व बेबी ह्यांचा. प्रेक्षक जमायच्या आधीं काय काय करायचें तें ह्यांचें ठरत असे. ठोंबरे व दत्तू व्हायचे जादूगार व प्रयोग व्हायचे बेबीवर. मागें एका प्रकरणांत सांगितलेले आमचे दत्तक चिरंजीव हेहि त्यांत सामील असत. पण तें बाहेर कोणाला ठाऊक नसे. ते बसायचे विरोधकांत आणि शंकाकुशंका काढायचे. मात्र खेळ सुरू झाला म्हणजे त्यांचा विडी ओढण्याचा सपाटा सुरू व्हायचा.

ह्या मंडळीनें एक पिशवी शिवली होती. तिच्या आंत एक उलटा कप्पा शिवला होता. ह्या पिशवींत टाकलेले जिन्नस उलट्या कप्पांत पडून

ते प्रेक्षकांच्या दृष्टीनें नाहींसें होत व जादूगारांना टाळ्या मिळत. दुसरा खेळ म्हणजे अधांतरीं चेंडू नाचविणें. खेळाच्या जागेंत उतरतें छप्पर होतें व त्याच्या दोन कामट्या सहज पुढें आलेल्या होत्या. त्या खालून दिसत नसत. पण त्यांचा स्प्रिंगसारखा उपयोग होई. मुलांनीं चेंडू त्या कामट्यांच्या पुढें ठेवून द्यायचा. व मागें त्यांपैकीं एका कामटीला बारीक दोरी बांधून ती शेजारच्या खोलींत नेली होती. ती ढिली सोडली कीं, टिचकी मारल्याप्रमाणें मागून चेंडूला धक्का मिळायचा व तो खालीं पडायचा. प्रेक्षकांच्यापैकीं कोणीहि चेंडूला खालीं पडण्याची आज्ञा केली तरी तो जागा सोडीत नसे. पण ठोंबऱ्यांनीं सांगतांच टुणकन् उडी मारून तो खालीं यावयाचा ! मंडळीला अचंबा वाटे. भास्करराव म्हणत ही सारी लबाडी आहे. कांहीं तरी युक्ती आहे. त्यावर ठोंबऱ्यांनीं म्हणावें, भास्करराव, तुम्ही असे मधोमध उभे रहा. मी तुमच्या चष्म्यांची कांच बरोबर मधोमध फोडून देतों. अगदीं हात लावणार नाहीं. नुसतें मी म्हटल्याबरोबर दोन्ही भिंगांत चटकन् दोन चिरा पडतील. अर्थात् हा नुसताच धाक असे; पण भास्करराव म्हणत, ‘ जादूचे खेळ कोणाचें नुकसान करणारे नसावेत. काय करायचें तें तुमच्या चेंडूला नि पिशवीला करा. ’

आणखी एक गमतीचा खेळ असे, तो एखादी मनांत ठेवलेली जिन्नस बेबीला ओळखायला लावणें. दत्तू व ठोंबरे तिला ठराविक खुणा करीत. एकदां प्रेक्षकांनीं ह्या दोघांनाहि बाहेर लावलें. तरी बेबीनें जिन्नस बरोबर ओळखली. हें आमच्या दत्तक चिरंजिवांचें काम होतें. ठरलेल्या जिनसेला तिचा हात लागतांच त्यांनीं विडी पेटवायला फरकन् काडी ओढावी. पण त्या काडीचाहि मंडळीला संशय येऊन त्यांची आगपेटी कोणीं उचलून ठेवली. तरी जिन्नस बरोबर ओळखला गेला ! पण बेबीचा हात ठरलेल्या जिनसेला लागतांच चिरंजिवांच्या विडीच्या धुराचा फवारा बाहेर पडे हें मात्र बेबीवांचून कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं.

ठोंबरे मला नेहमीं म्हणे, लक्ष्मीबाई, अहो माझी जादू कांहीं हलकी सलकी

मराठी ग्रंथ

नाहीं. मी जादूनें काय पाहिजे तें आणूं शकतों. तुम्ही म्हणाल तर आत्तां दत्तोपंतांना नागपुराहून आणून तुमच्यापुढें उभें करतों. मी म्हणे, ठाऊक आहे तुझी जादू. उगाच बाता झोकूं नकोस. दत्तूला एकदां कॉलेजला जाऊन आठदहा दिवस झाले होते. संध्याकाळीं नेहमींप्रमाणें गप्पा मारायला टिळकांकडे मंडळी जमली होती. ठोंबरेहि आले होते. आधीं ठोंबऱ्यांचा धाकटा भाऊ बाबू कांहीं तरी चांचरत चांचरत बोलून गेला होता. मुलांची बहीणहि येऊन गेली होती. ठोंबरे मधेंच उठून बाहेर गेला व परत घाबऱ्या घाबऱ्या आंत आला. त्याच्या अंगाचा लटकांप झाला होता. कपाळावर दरदरून घाम सुटला होता. तोंडानें 'मो मो मो मो ठा सा सा सा सा साप फुस फुस करतो ' असें तो बोलत होता. मीं म्हटलें, ' तुला कंदील घेऊन जायला काय होतें? असाच धांदल्या तूं. '

ठोंबरे घाबरलेले पाहून टिळकांनीं आपली बंदूक उचलली, राहुरीच्या घरासाठीं ही बंदूक घेतली होती. तिचा उपयोग कधींच होत नसे. वाडींत नेहमींच साप निघत पण आजची शिकार फारच मोठी होती. कंदील, काठ्या, छत्र्या, केरसुण्या वगैरे आयुधें घेऊन आम्हीं सर्व ठोंबऱ्यांच्या मागें निघालों. हा गोंधळ पाहून शेजारी पाजारी धावून आले. वीस पंचवीस माणसांचा घोळका हळूं हळूं पावलें टाकीत पायखान्याकडे चालला. टिळक म्हणाले, कोठें आहे साप? ठोंबरे म्हणाला, मधल्या पायखान्यांत. पायखाना खडखड वाजूं लागला. पत्र्याचे पायखाने होते.

सापाच्या चळवळीनें पायखाना वाजूं लागलेला पाहून कांहीं मंडळी एकमेकांला बिलगली, कांहीं मागें मागें सरूं लागली. टिळकांनीं आपली बंदूक उचलली, इतक्यांत खाडकन् दरवाजा उघडला व आंतून दत्तू बाहेर आला!

ठोंबरे म्हणाला, "लक्ष्मीबाई, काढलें कीं नाहीं दत्तोपंतांना जादूनें बाहेर?"

"चल चावट कुठला! आत्तां बंदूक उडून भलतेंच झालें असतें तें!"

"अहो लक्ष्मीबाई, आम्हीं भलतेंच होऊं दिलें कसें असतें?" खूप हशा पिकला व रात्रीं बारा वाजले तेव्हां सारी मंडळी घरोघर जायला निघाली.

दत्तू कॉलेजला गेला खरा पण तेथें गेल्याबरोबर प्लेगमुळें कॉलेज बंद झालें. त्यानें आपल्या मित्रमंडळींना कळविलें होतें व अशी कांहीं गंमत करण्याचें त्यांचें आधींच ठरलें होतें. संध्याकाळीं तो आला तसाच मुळ्यांकडे सामानासह गेला. तेथें जेवण वगैरे उरकून घरीं येऊन जादूनें त्याला बाहेर काढण्याचें ठरलें. पण हें बाबू ठोंबऱ्याच्या पोटांत राहिलें नाहीं. तो आमच्याकडे आला व कांहीं अडखळत अडखळत बोलला.

"आज चांगला चांगला स्वैंपाक करा. भाऊ येतलि."

मीं विचारलें "कशावरून रे?"

"तें नाहीं मला माहीत. पण मला वाटतें."

इतका प्रताप करून तो तिकडे मुळांत गेला. तेव्हां ठोंबऱ्यांनीं आपल्या भावानें केलेला प्रताप ओळखला. "बाब्या, टिळकांच्या घरीं गेला होतास ना! कशाला रे गेला होतास?"

नंतर मुळ्यांच्या बहिणीला त्यांनीं शोध घेऊन येण्यास सांगितलें. तिनें सांगितलें, कीं टिळकांच्या घरीं दत्तोपंत येणार असल्याचा कोणाला संशय आलेला दिसत नाहीं. तरी पण बाबूरावांच्या शहाणपणामुळें आपल्याला पूर्ण गंमत करतां येणार नाहीं. म्हणून दत्तूला जादूनें बाहेर काढण्याचा बेत आयत्या वेळीं बदलून वरील सापाची बतावणी करण्यांत आली.

आमच्या घरीं नाना प्रकारचीं माणसें आलीं आणि गेलीं. पण ठोंबऱ्यासारखें कोणीच नव्हतें. तो मधून मधून भांडे तरी त्याच्यांत कपट नव्हतें, द्वेष नव्हता, स्वार्थ नव्हता. तो प्रेमळ, मनमिळाऊ, आनंदी, थट्टेखोर आणि थोडासा खोडकरहि होता. निदान आमच्या घरीं त्याचें बाळपण कायम राहिलें होतें. तो आला म्हणजे नेहमीं कांहीं तरी गमती व्हायच्या. दंगामस्ती, झाडांवर चढणें, घरांवर उड्या मारणें, भांडणें, कागद घरभर करणें, कविता लिहिणें, त्या वाचून दाखविणें, त्या कोणीं मन लावून ऐकल्या नाहींत तर चिडून फाडून टाकणें, पुन्हां हंसणें, गोष्टी लिहिणें, त्या वाचून दाखविणें, दुसऱ्यांच्या कविता आपल्या कवितांइतक्याच उत्साहानें म्हणणें, कांहीं गमतीच्या कविता असल्या

म्हणजे त्यांची टर उडविणें, घरांतच सभा भरविणें, जादूचे खेळ करणें भास्कररावांच्या चष्म्यावर डोळा ठेवणें, माझ्या लिहिण्याची चेष्टा करणें, रात्रीं अंगणांत निजलें म्हणजे चांदण्यांची मोजदाद करणें, त्या वांटून घेणें, वांटणी बरोबर झाली नाहीं म्हणजे भांडणें, घरांत पसारा करून ठेवणें, मी रागावलें म्हणजे तो आवरूं लागणें, टिळकांच्या पुढें गंभीर तोंड करून बसणें — वगैरे किती तरी बारील सारीक गोष्टी डोळ्यांपुढें उभ्या राहतात व मन उद्विग्न होतें.

**ये आतां घे शेवटचे हे**
**अश्रु दोन पिऊन**
**पांखरा येशिल कधीं परतून**

# नवा संसार

दत्तू बी. ए. मधें होता, तेव्हांची गोष्ट. त्याचें कॉलेज उघडायला चार दिवस होते. समोरच्या लोहारणीनें सांगितलें, ‘ बाई, कोणीतरी घर टेहळून गेलें, सावध असा. ’

आमच्याकडे तीन ‘ ब्लॉक्स ’ होते. ते एकाला एक लागून असल्यानें त्यांना चाळीचें स्वरूप आलें होतें. मात्र त्यांना आंतून दरवाजे पाडल्यानें आम्हांला एका ‘ ब्लॉक ’मधून दुसऱ्यांत जायचें झालें तर बाहेरून यावें जावें लागत नसे.

रामभाऊची बायको मेल्यानंतर त्यानें आपल्या मुलांसह आमच्याकडेच मुक्काम ठोकला होता. त्याच्याशिवाय माझ्याकडे आणखी दोघांचीं भांडींकुंडीं वगैरे संसार राखोळीला होते. मी म्हणे, ‘ देवा माझें सामान हरवूं दे, चोरीस जाऊं दे, मोडतोड होऊं दे ’ पण दुसऱ्याचें सुरक्षित राहूं दे. टिळक मला नेहमीं रागवत, ‘ कीं तुला सांगितलें आहे कुणीं हें दुसऱ्याचें लटाट संभाळायला ? ’

असो. त्या रात्रीं बारापर्यंत आम्हीं जागें होतों. पहाटें मी उठलें तो पुढील दारानें नीट मागील दारापर्यंत गेलें. मागील दारीं पाण्याची ओल दिसली. मीं म्हटलें, पाहिलें बाया असें पाणी नासतात, मग पाण्याची अडचण पडते. आणखी थोडी पुढें झालें तों कोणीं पाळणा पालथा घालून टाकलेला दिसला! पालथा पाळणा पाहून माझ्या पोटांत धस्स झालें. मला तें मोठें अशुभ चिन्ह वाटलें. माझ्या दाराशीं कोणीं हें चिन्ह मुद्दामच केलें असें वाटून आणखी पुढें झालें. तों तो पाळणा नसून चौकटीसुद्धां खिडकी उकरून कोणींतरी दारांत टाकलेली होती. त्याच्यापुढें डोकविलें तों मागलें दार सताड उघडें व आंत घर अगदीं स्वच्छ !

पाणी सांठवावयाचीं सारीं भांडीं,–सर्व पाणी ओतून–नेलीं होतीं, तांब्यापितळेची सर्व भांडीं अगदीं पळीपासून तों पायखान्यांतल्या तांब्यापर्यंत गेलं होतीं.

रामभाऊंकडे जाऊन मी त्यांना उठवूं लागलें.

"रामभाऊ, उठा उठा! चोरी झाली. आतां घरांत तुपाची वाटीसुद्धां नाहीं."

"काय? घर फोडलें? आणि तें कोणीं?"

"चोरांनीं."

"कुठें आहेत ते?"

"तुम्ही नीट जागे व्हा म्हणजे दाखवितें."

रामभाऊ नीट जागे होतांच त्यांचा मोर्चा टिळकांकडे वळला. टिळक म्हणाले,

"काय चोरी? बरें झालें. आतां तरी कांहीं दिवस कुलपें लावण्याचा त्रास चुकला?"

टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें झालें, तसेंच माझ्याहि म्हणण्याप्रमाणें झालें. कारण सामान चोरीला गेलें तें सारें आमचें गेलें. लोकांच्या सामानापैकीं कोणत्याहि सामानाला चोरांनीं हात लावला नाहीं. तें सामान दुसऱ्या घरांत होतें. त्या रात्रीं मी किल्ल्याहि त्याच खोलींत विसरल्यानें चोरांनीं तोहि जुडगा लांबविला. दुधाचें पातेलें दुधासगट नेलें त्यामुळें दुसऱ्या दिवशीं आम्हांला कांहींहि खायला राहिलें नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं आमची चहाची व्यवस्था केली.

दुसऱ्या दिवशीं एक रुपया खर्च करून कुंभाराचीं भरपूर भांडीं आणलीं. हीं चोरीस जाण्याचें भय नव्हतें.

टिळकांनीं चोरांसाठीं प्रार्थना केली. ती पुढें त्यांनीं ज्ञानोदयांत छापली. ती प्रार्थना ६ जुलै १९१६ च्या अंकांतून खालीं दिली आहे —

"इष्ट आणि अनिष्ट, सुख आणि दुःख हे, माझ्या परमप्रिय माउली, ईश्वरेच्छे, तुझेच दोन स्तन आहेत, तूं आमच्या मुखांत हे दोन्ही स्तन आळीपाळीनें देतेस आणि आमचें परिपोषण करित्येस. आज मला कांहीं

प्राप्ति झाली असती तर मी तुझा जितका ऋणी झालों असतों, तितकाच ह्या हानीवरून होतों. आज माझ्या घरचा पांचपन्नास रुपयांचा माल गेला, तो न जातां माझ्या शेजारीं पाजारीं राहणाऱ्या गरीब लोकांतून कोणाचा जर जाता, तर तें फार वाईट झालें असतें, तसें झालें नाहीं म्हणून मी तुझे आभार मानतों. या लहानशा चोरीवरून बेलजिअम्, आर्मीनिआ येथील लोकांच्या सर्वस्वाची आणि त्याबरोबर हजारों निरपराध लोकांच्या प्राणांची हानि म्हणजे काय हें मला पुष्कळच अधिक विशद होत आहे, व त्यांच्या प्रीत्यर्थ माझा कंठ वारंवार भरून येत आहे, ह्याबद्दलहि मी तुझा ऋणी आहें, हे अविनाशी ईश्वरेच्छे, " पृथ्वीवर कसर व कलंक नाश करीतात, व चोर फोडून चोरी करितात तेथें आपणाकरितां संपत्ति सांठवूं नका, तर स्वर्गामध्यें कसर व कलंक नाश करीत नाहींत, चोर फोडून चोरी करीत नाहींत तेथें आपणांकरितां संपत्ति सांठवा; कारण जेथें तुमची संपत्ति आहे, तेथें तुमचें चित्तहि लागेल. " या प्रभू येशू ख्रिस्ताच्या म्हणण्याचा अर्थ मला कितीहि समजला, तरी त्याची मनोमय साक्ष पटून त्या मनाला सारें वेड अविनाशी संपत्तीचें लागायला आजच्यासारख्या अनुभवांची गरज आहे. ही गरज तूं अंशतः भागविलीस म्हणून मी तुझा ऋणी आहें. हे ईश्वरेच्छे, तुला सर्वथा मान्य असा माझा प्रभू, गुरु, तारक, माझें जीवन, माझा सखा येशू निरंतर माझ्याबरोबर आहे. तुझी केवढी अगाध कृपा! तोच मला सांगत आहे, कीं ह्या अज्ञान चोरांना क्षमा कर, आणि त्यांनीं अनुतप्त होऊन तुला शरण यावें म्हणून प्रार्थना कर.

ही क्षमा करतांना मी या चोरांना उत्तेजन येण्याला कारण होऊन आपल्या शहरांतल्या लोकांची हानि होऊं देऊं काय? नको! नको! हें जगाचें संरक्षण करणाऱ्या ईश्वरेच्छे, तूं असें म्हणत नाहींस. राज्य, न्याय, कायदे, पुलीस ही सर्व योजना तुझी आहे. हिचा अव्हेर करून, तुझा अपमान करणें आणि आपल्या शेजाऱ्याच्या हानीस कारण होणें हें मोठें पाप आहे. हें माझ्याकडून होऊं देऊं नको. हे चोर पुलीसाला सांपडोत, कायद्याप्रमाणें त्यांचा निवाडा होवो,

पण मला त्यांना क्षमा करूं दे. मी यांचा हितचिंतक आहें, खरा साह्य करणारा आहें असाच यांना अनुभव येऊं दे. स्वतः माझ्याठायीं हें सामर्थ्य नाहीं; विशेषतः असल्या प्रसंगीं मला प्रभूला आलिंगन देऊन राहूं दे. तो आणि मी एकत्र असलों म्हणजे मी सारें कांहीं तुझ्या सांगीप्रमाणें करीन. अशा प्रसंगीं मला आनंदी, शांत, स्वतःला अधिक बिलगणारा ठेवलें आहेस, म्हणून हे पवित्र ईश्वरेच्छे, मी तुला शतशः वंदन करतों."

चोरीमुळें टिळकांच्या मनावर काय परिणाम झाला हें वरील प्रार्थनेवरून चांगलें व्यक्त होतें. असो.

दत्तू कॉलेजला गेला. तो गेल्यावर त्याच्या पाठोपाठ वर्ध्यांचें व पेंडशांचें पत्र आलें, कीं घारूमाई फार आजारी आहे तरी मावशीला पाठवून द्यावें. घारूमाई मला स्वतःच्या मुलीसारखी होती. तिच्याकडे जाणें म्हणजे मी आपलें कर्तव्य समजत होतें; तर इकडे संसारांत जीव गुंतला होता. त्यांत चोरीचा पोलीस तपास चालू झाला होता. टिळक म्हणत जाऊं द्या गेलें तर मला कांहीं त्याची जरूर नाहीं. पण पोलीस ऐकेनात. त्यांचा तपास आणि जाबजबान्या ह्यांचा जोर होता. शेवटीं पोलिसच्या तपासांत एक चहाचा चमचा सांपडला! तो आमचाच म्हणून आम्हीं ओळखला आणि संपला तेथेंच तपास! पुढें आणखी कांहीं पत्ता लागला नाहीं! आणि आमचा गळा मोकळा झाला.

इकडे घारूमाईचीं पत्रावर पत्रें येत होतीं. टिळक म्हणत, तूं जा. मी तुला नेऊन पोंचवितों. मी येथें सर्व संसार संभाळीन, पण माझा जीव घरांतील म्हशी वगैरे जीवजंजाळांत अडकलेला. धरलें तर डसतें व सोडलें तर पळतें अशी माझी स्थिति झाली. शेवटीं एकदांचा जाण्याचा निश्चय ठरला. मीं आपली सामानाची कडेकोट व्यवस्था केली. बाकी चोरानें बहुतेक वाहून नेलेंच होतें; पण खालीं राहिलेला चिंध्यांचा भारा, टिनाचे डबेडाबे, वगैरेंना कुलपें लावून वर चिठ्ठ्या चिकटवून मी तयार झालें. जीवजनावरांची काळजी वाटतच होती. पण त्यांना थोडेंच मोहोरबंद करून टाकतां येतें. ती उघड्या मैदानांतील संपत्ति उघड्यावर टाकून मी पुण्यास निघालें. टिळक माझ्याबरोबर आले. घरांत

रामभाऊ, ठोंबरे वगैरे मंडळी होती. दत्तू कॉलेजांत व बेबी हुजूरपागेंत होती.

पुण्यास येऊन पहातें तर तेथें फारच भयंकर स्थिति होती. नवराबायको दोघेंहि अंथरुणावर खिळलेलीं! घारूमाईला कॅन्सर झालेला व बच्यांना काळपुळी झालेली! टिळकांनीं सांगितलें, तूं ह्यांना सोडून येऊं नको. मी घराची सर्व व्यवस्था नीटपणें ठेवीन. तेथली तूं काळजी करूं नको. टिळकांचाहि पाय निघेना. माय मरो नि मावशी जगो तसें तेथें अक्षरशः झालें.

मी दोन महिने भाचीजवळ राहिलें. दोन महिन्यांनीं त्या दोघांना जरा बरें वाटल्यावर मी नगरास जायला निघालें. मी जातें असें पाहून घारूमाईला फारच वाईट वाटलें. ह्या दोन महिन्यांत कागदी घोडेस्वार पुण्याहून जात. राज्याचा बंदोबस्त कसा आहे म्हणून चौकशी करीत. दुसरे कागदी घोडेस्वार नगराहून पुण्याला येऊन सांगत, राज्यांत सर्वत्र आबादीआबाद आहे. पण माझें संशयी मन त्यावर फारसा विश्वास ठेवीत नसे.

आणि घरीं येऊन पहातें तों सीलबंद सामान जरी 'अन् टच्ड्' होतें तरी जीव जिवाणूं, त्यांच्यासाठीं सांठवून ठेवलेल्या कडब्यासह व कडबा कापण्याच्या यंत्रासह गुडुप झालेलें! मला तर सारें स्वप्नच वाटलें. पण थोड्या वेळानें भानावर आल्यानंतर कळलें कीं म्हशी विकल्या! रानांत राखोळीला गेलेली कल्याणीची पारडी सोनी तेवढी चुकून राहिली; माझ्या कोंबड्या होत्या त्याहि विकल्या! मला दूध व अंडीं विकून संसाराला फार मोठा आधार देतां येत होता. पण हें सारें शेखमल्लीच्या काचेच्या हाऱ्याप्रमाणें फुटून गेलें होतें.

मी हिशोब घेण्यांत मोठी पटाईत होतें. त्यांच्यापासून दमडीन् दमडीचा हिशोब मीं घेतला आणि त्यांनींहि कवडीन् कवडीचा हिशोब दिला! कर्जदाराचे सारे पैसे देऊन टाकले. मलाहि बरें वाटलें. आतां नवा संसार सर्व बाबतींत सुटसुटीत बनला.

दत्तू नागपूला होता. यंदा त्याची परीक्षा होती, तो सातवींत असतांनाच त्याचें लग्न ठरविलें होतें. तेव्हां रूथ पांचवींत होती. लग्न ठरविलें होतें तरी दोघांचा अभ्यास चांगला चालला होता. मुलगी सगळ्या मुंबई विश्वविद्यालयांत

मॅट्रिकमधें पहिली आली.

पण ह्याच सुमारास आमच्या नव्या संसाराला सुरवात झाली होती. घरांतील भांडींकुंडीं जाऊन नव्या संसाराला साजतील अशीं मडकीं गाडगीं आलीं होतीं. टिळकांच्या मनांत आतां फार येऊं लागलें कीं आपण सर्वसंगपरित्याग करून केवळ देवाच्या व जनतेच्या सेवेला स्वतःला वाहून घ्यावें. आतां माझ्याहि मनाची तयारी झालेली होती. दत्तूच्या लग्नाला लागणारा खर्च व त्याचा संसार मांडून देण्यापुरतें सामान मला हवें होतें. तेवढीच काळजी मला होती.

नगरास कॉंग्रिगेशनल चर्च आहे. जे ख्रिस्ती उपासक ख्रिस्ताला मात्र चर्चचा एकटाच अधिपति समजून सिद्धांतासंबधानें किंवा चर्चच्या नियमासंबंधानें कोणत्याहि एका विशेष व्यक्तीचा अगर अनेक व्यक्तींच्या बनलेल्या विशेष संस्थेचा अधिकार मानीत नाहींत, परंतु हे अधिकार प्रत्येक स्थानिक चर्चच्या स्वाधीन असावे असें समजतात असे लोक कॉंग्रिगेशन्यालिस्ट.

ह्या शब्दाला दोन तीन मराठी प्रतिशब्द सुचविण्यांत आले. टिळकांनीं एका व्याख्यानांत ‘ ख्रिस्ताचा दरबार ’ असें मराठी प्रतिरूप सुचविलें. कारण दरबार या शब्दांत राजा आणि त्याचे लोक असा बोध होतो. म्हणून ख्रिस्ताचा दरबार म्हणतांक्षणींच ख्रिस्तावांचून जेथें राजा किंवा अधिकारी नाहीं व त्याच्या अनुज्ञेनें जेथें त्याचेच लोक सर्व कामें पहात आहेत अशी संस्था हा बोध होतो. त्यांचें असेंहि म्हणणें होतें कीं दुर्दैवानें चर्च हा शब्द ऐक्यापेक्षां विग्रहाचाच अधिक व्यंजक झाला असून त्याच्या योगानें मानवी अधिकार, कार्यापेक्षां संस्थेचा आणि कायद्याचा अधिक बडेजाव, इत्यादि अनिष्टें ध्वनित होतात. तशीं ‘ दरबार ’ ह्या शब्दानें होत नाहींत म्हणून ख्रिस्ताचा दरबार हे शब्द वापरण्यास कोणती हरकत आहे ?

ह्या वर्षीं टिळकांच्या अंतःकरणांत मोठी खळबळ उडून राहिली होती. त्यांनीं कीर्तनकलाप लिहिण्यास सुरवात केली होती. मजकडून तीं पाठ करवून घेऊन कीर्तन कसें करावें ह्याची मला ते संथा देत होते. माझ्यामागें माणसेंहि जमविलीं होतीं. तसेंच भजनाचा प्रचार व्हावा म्हणून त्यांनीं ह्याच वर्षीं आपली सुप्रसिद्ध

अभंगांजली लिहिण्यास सुरवात केली. भजन, कीर्तन व पुराण ह्या त्रयींनीं ख्रिस्ती धर्माचा परकीपणा अगदीं काढून टाकतां येईल अशी त्यांची पूर्ण खात्री होती. अभंगांजलीसंबंधीं ते म्हणतात —

"भजन, कीर्तन, प्रवचन किंवा पुराण यांचें धर्मोपासनेंत व धर्मप्रचारांत निदान या देशांत तरी केवढें महत्त्व आहे हें आम्हीं आपल्या ख्रिस्ती बंधु-भगिनींच्या लक्षांत वारंवार आणून दिलें आहे. आम्हीं अत्यानंदपूर्वक ईश्वराचे उपकार मानतों, कीं ख्रिस्तविलीन रे. हॅरि विसल् यांनीं प्रथमतः हातांत चिपळ्या घेऊन भजनाचा प्रचार पाडल्यापासून केवळ सात आठ वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांत शेंकडों भजनी मेळे होऊन त्यांच्या योगानें त्यांच्या-मधली भक्तिमत्ता एकसारखी उद्दीप्त होत आहे. तथापि या मेळ्यांच्या हातीं जुन्या व नव्या मिळून दोन अडीचशें भजनपर पद्यांवांचून कांहीं नाहीं. ही अडचण अंशतः तरी दूर व्हावी म्हणून आम्हीं ज्ञानोदयांतून जसा कीर्तनकलाप तशीच अभंगांजली प्रसिद्ध करूं लागलों आहों. यांचा उपयोग करणारे पुष्कळ आहेत; त्यांचें आम्ही उपकार मानतों."

देवाचा दरबार ही टिळकांची चळवळ ह्याच वर्षांतली. हिचा उगम ह्या व्याख्यानांत व त्यांच्या मनांत ह्या वर्षीं उडालेल्या खळबळींत असावा. ह्या खळबळीची तयारी मात्र वीस वर्षें चालली होती हें त्यांच्या निरनिराळ्या काव्यांवरून व उद्गारांवरून दाखवितां येणें शक्य आहे. परंतु ह्या वर्षीं ह्या सर्व कल्पना केंद्रित झाल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. कीर्तनकलाप, अभंगांजलि व ह्यांच्या बरोबरीला आपलें ख्रिस्तायन पुरें करावयाचें असें टिळकांनीं ठरविलें. ही झाली काव्याची बाजू. परंतु त्यांच्या स्वभावाला एवढें खाद्य पुरेसें नव्हतें. त्यांचे विचार केवळ कागदावरच पडून रहाणारे नव्हते. काव्यांच्या जोडीला देवाच्या दरबाराला सुरवात झाली. नगरास त्यांना पुष्कळ दरबारी मिळाले. टिळकांनीं निराळीं दरबार गीतें रचलीं. ही दरबारी मंडळी बहुतेक नव्या पिढींतील होती. ह्या मंडळीनें आपलें भजनाचें काम फार उत्साहानें चालविलें. टिळकांनीं दरबारचा संकल्प छापून काढला व साऱ्या महाराष्ट्रांतील ख्रिस्ती

लोकांत ही चळवळ सुरू केली. देवाच्या दरबाराचा संकल्प येणेंप्रमाणें होता.

१. मीं प्रभु येशू ख्रिस्ताला आपला गुरु केलें आहे. यास्तव मी त्याच्या चरित्राचें, शीलाचें, हेतूंचें आणि उपदेशाचें मनन करीन.

२. हें मनन योग्य रीतीनें करितां यावें म्हणून मी बायबलचा व या विषयावरील इतर ग्रंथांचा नित्यनेमानें अभ्यास करीन. ( १ पेत्रस २:२ ).

३. प्रभु येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना म्हणत आहे, कीं मी तुमचें जीवन आहे; तरी मी त्याला आपलें जीवन समजून त्याला घेऊन विचार करीन व त्याला घेऊन सारीं कामें करीन. ( योहान्न १५:४ ).

४. मी आपल्या दीनचर्येच्या आरंभीं, मध्यें व अंतीं म्हणजे सकाळीं, दुपारीं व रात्रीं निजायला जाण्यापूर्वीं एकच पवित्र, प्रेमस्वरूप माझा पिता जो परमेश्वर त्याची प्रार्थना करीन. ( मात्थी ७:७,८ )

५. मी देवाच्या दरबाराच्या प्रत्येक दरबाऱ्याला आपला बंधु किंवा भगिनी समजेन. त्याचें किंवा तिचें निरंतर अभीष्ट चिंतीन, संकटाच्या समयीं त्यांचें साह्य करीन, तीं दुःखी असतां त्यांचें शांतवन करीन, त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मान देईन, त्यांची जी अब्रू ती माझी असें समजेन. सारांश, देवाच्या दरबारच्या दरबाऱ्यांचें बंधुप्रेम पाहून जगानें आश्चर्यभरित होऊन देवाचें गौरव करावें हेंच माझें यापुढें ब्रीद असेल. ( मात्थी १२ : ४७–५० योहान्न १७:२१ )

६. मी राहतों त्या ठिकाणीं आणखीं एक किंवा अधिक दरबारी असतील, तर त्यांच्याबरोबर ठरलेल्या दिवशीं ठरलेल्या वेळेस आठवड्यांतून एकदां ईश्वरोपासनेला हजर राहीन व उपासना करीन.

७. माझा गुरु स्वतःला " देवाचा पुत्र " म्हणत आहे तसाच " मनुष्याचा पुत्र "हि म्हणत आहे व मनुष्याच्या सेवेवांचून देवसेवा पुरी होत नाहीं असें मला शिकवीत आहे, म्हणून मी नियमानें मनुष्याची कोणती तरी निष्काम सेवा करीन.

८. मी ईश्वराची प्रार्थना करून तो बुद्धि देईल त्याप्रमाणें दरबारच्या सर्व

जबाबदाऱ्या स्वतःच्या समजून दरबाराला नित्यनैमित्तिक रीतीनें द्रव्यदान करीन.

९. मी दर बारा महिन्याच्या अवकाशांत निदान एक तरी नवा दरबारी मिळवून देईन.

ह्याच परिस्थितींत ख्रिस्तायन लिहिण्यास शांतपणा मिळावा म्हणून टिळकांनीं आपलें नगरचें बिऱ्हाड हालवून साताऱ्यास नेण्याचें निश्चित केलें.

परंतु साताऱ्यास आलों तरी टिळकांची फिरती कमी झाली नव्हती, मात्र ह्या फिरतींत फार महत्त्वाचे प्रसंग घडून आले. मद्रास इलाख्यांत दिंदिगल येथें त्यांना आमंत्रण आल्यावरून तेथील ख्रिस्ती लोकांना त्यांनीं जाऊन व्याख्यानें दिलीं. महाराष्ट्रांतील ख्रिस्ती लोकांत दिसून न येणारी एक विशेष गोष्ट टिळकांच्या पाहण्यांत तेथें आली. हे लोक ख्रिस्ती झाले तरी त्यांनीं ख्रिस्ती होतांना स्पृश्यास्पृश्यतेचें गांठोडें झटकून न टाकतां तसेंच आपल्या उराशीं बाळगून आपल्याबरोबर आणलें आहे. कांहीं लोक चर्चमध्यें आंत बसत तर कांहीं अस्पृश्य (?) ख्रिस्ती लोक बाहेर बसत !

टिळकांच्या वृत्तीला हें सहन होणें शक्य नव्हतें. एक दिवस ते आले ते बाहेरच्या लोकांत जाऊन बसले. आंतल्या मंडळीकडे ते ढुंकून पाहीनात. बाहेरच त्यांनीं बोलण्यास सुरुवात केली. तेव्हां आंतल्या मंडळीला लाज वाटून एक एक एक एक बाहेर येऊन बसूं लागला. टिळकांनीं नंतर तेथें असा नियमच केला, कीं असा भेदभाव ज्या ठिकाणीं असेल तेथें आपण बोलणार नाहीं. व त्याचा इतका चांगला परिणाम झाला, कीं त्यांना त्या फेरींत पुढें कधीं भेदभाव दिसून आला नाहीं.

ह्याच सुमाराला राहुरीस ख्रिस्ती व्यवसायी ( ख्रिश्चन एन्डेव्हर सोसायटी ) मंडळाचें संमेलन होतें. त्यांत टिळकांना आमंत्रण असून तेथें ते गेले होते.

जवळ जवळ ख्रिस्ती झाल्यापासूनच आपण मिशनचे पगारी नोकर राहूं नये असें त्यांना वाटे. मागें एक दोन वेळेस त्यांनीं पगार घेण्याचें थांबविलें व मिशनचें पूर्वीं होतें तेंच काम विनावेतन केलें. परंतु आतां त्यांना एक फार मोठें व निराळें कार्य अंगावर घ्यायचें होतें व तें घेण्यासाठीं पूर्वतयारी

म्हणजे मिशनची नोकरी सोडून देणें. राहुरीहून १ सप्टेंबर १९१७ रोजीं त्यांनीं हें पत्र प्रसिद्ध केलें —

## विज्ञापना

" माझ्या देशाप्रित्यर्थ व ख्रिस्ताच्या दरबाराप्रित्यर्थ मला यापुढें प्रेम आणि सेवा यांचे अनुबंध शिवाय करून अन्य रीतीनें कोणत्याहि मानवी संस्थेला बांधलेला राहतां येत नाहीं. माझा यापुढें सर्व हेतूस्तव सारा हितसंबंध ख्रिस्ताशीं व शुभवर्तमानाशीं मात्र असला पाहिजे. म्हणून देवाच्या वाणीला मान देऊन मी आजपासून मिशनचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि मानवी संस्थेचा आश्रित किंवा वेतन घेऊन काम करणारा चाकर नाहीं. मी एक ख्रिस्ती संन्यासी, म्हणजे विरागाच्या नव्हे—तर अनुरागाच्या मार्गें जाणारा संन्यासी आहें. मला आजपासून देव जो आत्मा, तो सांगेल तसा होण्याचे व तो सांगेल तें करण्याचे प्रयत्न करावयाचे आहत.

ज्यांचें ख्रिस्तावर, हिंदुस्थानावर व मजवर प्रेम आहे, त्यांनीं आपणां सर्वांचा पिता जो परमेश्वर त्याच्या दयासनासमोर मजकरितां मध्यस्थी करावी, हें साह्य मी मागत आहें.

नारायण वामन टिळक"

ह्याखालीं ' कांहीं गोष्टींचा खुलासा ' दिलेला आहे, तो असा —

१. हा माझा निश्चय प्रसिद्ध करण्याचीं कारणें तीन आहेत.

( अ ) मला पुन्हां माणसांवर अवलंबून राहण्याचा मोह झालाच तर हें प्रसिद्धीकरण माझ्यापुढें उभें राहील व मला पुष्कळ अंशीं आंवरून धरील.

( ब ) माझें उदाहरण पाहून हिंदी ख्रिस्ती समाजांत जे लोक असेंच करावयाला पाहात असतील त्यांना उत्तेजन येईल.

( क ) हा निश्चय तडीस जायला मला पुष्कळांच्या प्रार्थनांची गरज आहे.

२. मी करीत आहें या कामाचें काय होणार.

( अ ) अमेरिकन मराठी मिशन मला माझ्या आईच्या ठिकाणीं झालेलें आहे. माझ्या मनांत कृतज्ञतेचा नुसता लवलेश जरी असेल, तरी मी माझ्या या मातृ-

तुल्य मिशनला अडचणींत पाडणार नाहीं. यापुढें मला याचा पगार मात्र नको. यांचें प्रेम, सहानुभूति, प्रार्थना हें सारें पाहिजे आहे. मी यांचीं जीं कामें करीत आहें, तीं अशींच करीत राहणार. माझ्या ह्या नवीन स्थित्यंतरांत सुद्धां मला यांचें साह्य पाहिजे. आणि तें होणार आहे.

( ब ) मी " जनसेवा ही ईश्वरसेवा ! " समजणारा मनुष्य आहें. एवढ्या-वरून माझ्या शुभवर्तमानाच्या सेवेविषयींच्या समजुतींत कोणकोणत्या कामांचा समावेश होतो हें लक्षांत येण्यासारखें आहे.

**ना. वा. टिळक**

तुम्ही संन्यास घेतला म्हणजे कुटुंबाचा त्याग केला काय असा त्यांना एका ख्रिस्ती गृहस्थांनीं प्रश्न केला. ह्यांनाहि टिळकांप्रमाणेंच आपण लोकसेवा करावी असें वाटत होतें. परंतु त्यांच्यावर कुटुंबभरणाचा मोठा बोजा होता. त्यांच्या पत्राला टिळकांनीं एक मोठें उत्तर धाडलें आहे. त्यांत ते म्हणतात —

" ख्रिस्ती संन्यास म्हणजे पत्नीचा त्याग नव्हे, तिचें आपणांवर व आपलें तिच्यावर निष्काम प्रेम असणें, परस्परांनीं परस्परांला इहलोकींच प्रभु ख्रिस्ताच्या इच्छेप्रमाणें व उपदेशाप्रमाणें स्वर्गांत नेऊन अधिष्ठित करणें, म्हणजे ख्रिस्ती संन्यास. आपल्या सामर्थ्याच्या बाहेर आपल्या कुटुंबाची वाढ होणें ही भयंकर आपत्ति होय. हिला मी भयंकर म्हणतों याचें कारण ही प्रत्यक्ष मातापितरांकडून स्वतःच्या संततीच्या शरिराचा, मनाचा, आत्म्याचा नाश करविणारी आपत्ति होय. फाजील संतति ही ईश्वराची देणगी नव्हे. ईश्वराचे संदेश जगाला देणारा साधुवर्य पौलस इंद्रियदमनाची गणना पवित्र आत्म्याच्या फळांमध्यें करीत आहे. ( गलती ५;२२,२३; ) याचा अर्थ इतकाच, कीं देवाचा आत्मा—पवित्र आत्मा—देव जो आत्मा तोच पतिपत्नीला इंद्रियदमन करून असा असें सांगत आहे.

आपण इतपत संन्यास घेतला, तरी आपण गृहत्याग करूं नये. आपलें काम किंवा वेतन सोडूं नये. आपलें कुटुंब मोठें आहे, आपण आपल्याच संततीला अन्नान्नदशेला लावाल, तर तें महापाप होय. देव आपल्या भक्तांचा योगक्षेम

पहातो. त्यांनीं त्याबद्दल चिंता करूं नये. या अर्थाचे आदेश व उपदेश पवित्र शास्त्रांत पुष्कळ ठिकाणीं सांपडतील; पण त्यांपैकीं एकाचाहि अर्थ अजून जगाला कळावा तसा कळत नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे या सर्वांचा खरा सारांश, 'कामकरी मजुरीस योग्य आहे,' ह्या ख्रिस्ताच्या एका वचनांत आला आहे."

आमच्या ह्या नव्या संसारांत बरेंच गांभीर्य उत्पन्न झालें होतें; तरी त्यांतील 'आमचेपणा' कमी झाला नव्हता व गमतींनाहि कांहीं तोटा नव्हता.

सातारला आम्ही आलों तरी टिळकांचें नगरला जाणें येणें होतेंच. सातारला जाऊन पोंचल्यावर दहा महिन्यांनीं त्यांनीं पगार घेण्याचें सोडलें. ज्ञानोदयाच्या संपादनाचें व नगरच्या ईश्वरविद्येच्या वर्गाला शिकवायचें काम-( तो वर्ग चालू असला म्हणजे )-ते करीतच होते. पण विनावेतन.

असेच एकदां टिळक नगरास गेले. तेथें कल्याणीची पारडी सोनी होती. ती ते येतांना विकून आले. पन्नास रुपयांना विकली असें म्हणाले. मला काय सोनी गेली एवढें खरें. विकली असो वा दिली असो. ते पैसे कांहीं हातीं आले नाहींत.

येतांना नाम्या नांवाचा एक टोणगा मात्र ते घेऊन आले. नाम्या अत्यंत भोळा, बोबडा व कामसू होता. कंटाळा असा त्याला नसे. त्याला जेवून खाऊन एक रुपया पगार व कपडे ही बोली होती. टिळक नाम्यावर आपला वेळ खर्च करूं लागले. त्याला ते रोज "प्रभूच्या प्रार्थनेच्या" संथा देत. त्यांनीं म्हणावें 'हे आमच्या आकाशांतील बापा'; तर नाम्यानें हटकून म्हणावें 'हे आमच्या आईच्या बापा.'– पण टिळकांनीं कधीं कंटाळून त्याला शिकविण्याचें सोडलें नाहीं.

एकदां आमच्याकडे बॅरिस्टर आठवले आले व त्यांच्या पत्नी सौ. मीनाबाई पाहुणीं आलीं होतीं. नाम्यानें मला विचारलें हे कोण आहेत? मीं सांगितलें ही माझी मुलगी आहे व ते जांवई. जांवयाला कोण कोण आहेत? नाम्यानें पुन्हां विचारलें. 'त्यांना एक भाऊ आहे.' मीं म्हटलें. 'ते काय कलतात?'

मीं म्हटलें, त्यांनाच विचार जा. नाम्या बोबडें बोलत असे. नाम्या हातांत केरसुणी घेऊन जांवईबुवांकडे गेला.

"काय हो जांवईबुवा ? तुम्ही काय काम कलता ?"

"हजामतीचें !"

"अन् तुमचा भाऊ ?"

"बटलरचं !"

नाम्या हें ऐकून हतबुद्धच झाला ! टिळकांनीं आपली मुलगी हजामाला कशी दिली ह्याचें त्याला मोठें कोडें पडलें. तो पुन्हां माझ्याकडे आला आणि निषेधात्मक स्वरानें म्हणाला,

"अहाहा ! काय जांवई पाहिला आहे. एक हजाम तर त्याचा भाऊ बटूल ! भाऊला मुलगी कुठली पाहिली तल मुंबईची. त्याच्यापेक्षां माझ्या शलावन-मामाची मुलगी किती चांगली. ती कां नाहीं केलीत भाऊला !"

ह्या वेड्या गोळ्याचें आमच्या घरांत फार कौतुक होई.

एकदां नाम्याला मीं एका आजारी बाईकडे निजायला धाडलें होतें. ती बाई दुसऱ्या दिवशीं पहांटें मेली. पहांटेंच नाम्या घरीं येऊन निजला. टिळकांचा चहा झाला. त्यांनीं एक कप बेबीजवळ देऊन नाम्याला द्यायला सांगितला. बेबी जवळ जाते तों नाम्या ताठ ! टुकूंटुकूं पाहात होता. पण हालेना कीं बोलेना.

"नाम्या ! अरे असें काय करतोस ? हा चहा घे !"

पण नाम्याचें हूं नाहीं कीं चूं नाहीं. शेवटीं आम्हीं सगळे त्याच्या-भोंवतीं जमा झालों तेव्हां त्यानें सांगितलें,

"मी बोलूं कसा ? त्या बाईसालखी माझी दांतखीळ बसली आहे ना !"

सातारला आल्यावर दत्तूचें लग्न निघालें. तो मुंबईला कामाला होता रूथ ह्याच वर्षीं बी. ए. झाली होती. तेव्हां आतां लग्न लांबविण्यास कांहींच कारण नव्हतें.

देवाच्या दयेनें मला बरेच मानसपुत्र व मानसकन्या आहेत. साताऱ्यास

असाच एक मानसपुत्र होता, त्याचें नाव अर्नेस्ट. त्याची बायको डॉक्टरीण होती. तेव्हां त्याला 'डॉक्टर अर्नेस्ट' म्हणत. आता दत्तूच्या लग्नाची तिथि, वार, गांव हीं ठरलीं. आम्हांला वऱ्हाड व वऱ्हाडाचा प्रवासखर्च पाहिजे होता. डॉक्टर अर्नेस्टजवळ मीं दोनशें रुपये मागितले. कर्जरोखा तोंडी. रोख्याच्या अटी येणेंप्रमाणें—बाबारे, तूं मला पैसे दिले त्याला साक्षी· दार फक्त देव. जसे तूं मला अंधारांत पैसे दिलेस तसे मी ते अंधारांत परत करीन. मुदतीचा प्रश्न नाहीं. मी मेलें गेलें तर दत्तूपासून पैसे घ्यावे. विश्वास असेल तर दे, नाहींतर नाहीं म्हणून सांग. मला कांहीं वाटणार नाहीं. व्याज मजजवळ कांहीं मिळणार नाहीं.

माझ्या कर्जदारानें ह्या सर्व अटी कबूल करून माझ्या शब्दाच्या तारणावर दोनशें रुपये मला दिले.

टिळकांची तयारी होत आली. घरीं हाताशीं एक कारकून होताच. त्याच्या-कडून व कांहीं स्वतः लिहून 'विवाह-पद्धती'च्या नकला करण्याचा त्यांनीं सपाटा लावला.

एवढ्या तयारीवर मुंबईस दत्तूचें लग्न मोठ्या थाटांत करण्यांत आलें व मी त्या एका मोठ्या जबाबदारींतून मोकळी झालें.

आम्ही सातारला आलों तेव्हां आमची चिकीहि आमच्या बरोबर आली. येथेंहि ती शाळेंत जात असे. पण उरलेला वेळ ती माझ्या मागें मागें राहून मला सहाय्य करायची.

चिकीला आजा आजीचा थोरपणा दाखवायला फार आवडे. कोणीं विचारलें, कीं 'चिके जेवलीस का ग ? काय केलें होतें आज जेवायला ?' तर लागलीच तिनें थोरामोठ्यांच्या घरीं शोभणाऱ्या पदार्थांची जंत्री द्यावी. बाकी इकडे आम्हीं भाजीभाकर का खाल्लेली असेना !

एकदां मीं सहज पशाचें पुरण घातलें. चिकीनें जाऊन साऱ्या मास्तरणींना आमंत्रण दिलें ! माझ्यावर तिचा फारच जीव होता. एकदां तिला मास्तरणींनीं सांगितलें, 'अग चिके, तुझी आजी मेली.' ती इतकी भोळी होती कीं,

मी मेल्याचें ऐकतांच पाटी दप्तर शाळेंतच टाकून ती ओक्साबोक्शीं रडत घरीं आली. मीं विचारलें, ‘ चिके, अग कां रडतेस ? घरीं कां आलीस ? ’ तेव्हां तिनें सांगितलें ‘ आजी, तूं मेलीस म्हणून रडतें. मला मास्तरणींनीं असें सांगितलें. ’

एकदां ती कविता पाठ करीत होती. ‘ नीज न ये तर गीत म्हणावें। कोण करी हें जीवें भावें। ती माझी आई.’ ती ही कविता आळवून आळवून म्हणत होती. तसतशा माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा पडत होत्या. तिनें तें पाहातांच धांवत येऊन माझ्या गळ्याला मिठी मारली.

“ आजी, तूं कां ग रडतेस ? ”

“ बाइ, तुला आई नाहीं म्हणून रडतें. ”

“ आजी, तूंच नाहींस का माझी आई ? तूं नसतीस तर मी कुठें असतें ? ” तिच्या ह्या गोडपणानें माझे अश्रु थांबले नाहींत. अधिक जोरानें वाहूं लागले.

सातारला एक सुखवस्तु आया एका मिशनरीबाईच्या कृपेनें रहात असे. तिला त्या मिशनरीबाई पेन्शन देत असत. ही म्हातारी माझ्या उपयोगी पडे. काम नसल्यामुळें तिनें आमच्याकडे बराच वेळ घालवावा. माझ्या जन्मस्वभावाप्रमाणें मीहि तिला हाताशीं घेऊन तिच्याकडून शिवण, टिपण, निसण हीं कामें करून घ्यावींत, तीहि कधीं चहा तर कधीं जेवण आमच्याकडे उरकीत असे. मधून मधून पैसेहि तिला आमच्याकडून मिळत.

मातृदिनाच्या दिवशीं कांहीं तळण तळलें होतें. त्या दिवशीं तो पदार्थ तिला दिलाहि होता. कढई मात्र तशीच चिंच घालून उकळत ठेवली होती. आंतमध्यें मी एकीकडे भाजणी भाजीत बसलें होतें. तर बाहेर आयाबाई व चिकी निवडीत बसल्या होत्या. आयाबाईनें चिकीला विचारलें, आजी काय करते ग ? चिकी फुकट मिजासी ! तिनें सांगितलें, माझा दत्तूकाका येणार आहे, त्याच्याकरितां आजी लाडू, अनरसे, करंज्या, शंकरपाळे वगैरे करते आहे. चिकीनें तिच्या हातांत हें कोलीत देतांच त्याची उष्णता तिच्या एका ढिल्या स्क्रूमधून

डोक्यांत शिरली. तिच्या डोक्यानें घेतलें कीं ही बाई हें फराळाचें आपल्याला चोरून करीत आहे.

इतक्यांत टिळकांच्या चहाची वेळ होऊन ते आपल्या तयारीला लागले. त्यांची चहाची तयारी म्हणजे तें एक बडें प्रकरण असे. मात्र ते तो बहुतकरून स्वतःच करून घेत. मी स्वैंपाकघरांत भाजणी भाजीतच होतें. इतक्यांत आयाबाई आंत आल्या.

" काय करतां बाई ? "

" कांहीं नाहीं, दत्तू येणार म्हणून भाजणी भाजून ठेवतें. त्याला थालीपीठ फार आवडतें. "

" नाहीं म्हटलें ! तुम्ही जरी कांहीं केलें तरी आम्हांला थोडाच पैसा द्यावा लागतो ! तुमचा मुलगा ! पैसा तुमचा ! करणार तुम्हीच ! ह्या कढईत काय आहे ? "

" कांहीं नाहीं. परवां भजीं तळलीं तशीच आहे. ती अजून तुम्हांला घासायला दिली नाहीं. "

" वा ! मीं तर घासली ती त्या दिसीं. "

" नाहीं हो, मीं ती उकळत ठेवली आहे. तुम्हांला चोरून काय करायचें ? तुम्ही का थोडेंच उचलून नेतां ? "

" नाहीं हो ! मुलें कधीं खोटं बोलत नसतात. बाकी माझें काय हो ! पण मुलांची साक्ष सरकारांतहि बरोबर धरतात. "

" म्हणजे ? तुम्ही काय म्हणतां मला नाहीं कळत ! "

" नाहींच कळणार ! पण लेंकरूंच तें. त्याला काय कळतं ! कोणत्या गोष्टी सांगाव्या, कोणत्या सांगू नये ह्याचा कांहीं मुलांना सुमार का असतो ? "

" म्हणजे चिक्कीनें कांहीं सांगितलें कीं काय ? "

" चाललेंच आहे ! तिचा तरी काय दोष ? जें खरें तेंच लेंकरूं बोलणार ! तिला बिचारीला तुम्हीं सांगून ठेवायला हवें होतें कीं असल्या गोष्टी बोलूं नये."

" कोणत्या गोष्टी ? तुम्ही काय म्हणतां ? "

" कांहीं नाहीं. तुमचा मुलगा येणार त्यासाठीं तुम्हीं जे जे पदार्थ केले ते ते तिनें सांगितले. त्यांत तिचा काय दोष ? "

" अहो दोष कोणाचाच नाहीं ! पण तुमच्या खोपडींत हें काय शिरलें कळत नाहीं. "

" नाहींच कळणार, पोरीचा काय दोष ! ती खरेंच बोलणार ! "

इतका वेळ टिळक शांत होते. आमचें हें बोलणें त्यांना ऐकूं जात होतें; त्यांनीं चिकीला हाक मारली

" तूं हें काय सांगितलेंस ? "

चिकी कांहीं बोलेना. मी म्हणालें,

" तिला आपल्या घरांतील थोरवी गायला आवडते. ती असा मोठेपणा नेहमीं सांगत फिरते. त्याचें काय मनावर घ्यायचें ? "

" म्हणजे ? उद्यां ती सांगत फिरेल कीं आजोबांनीं कोणाचें डबोलें चोरून आणलें ! "

चिकीचा हात पकडून टिळकांनीं तिला ठोक देण्यास सुरुवात केली. आयाबाईचें गाणें सुरूं झालें,

" जाऊं द्या साहेब ! ती का खोटें बोलते ? मुलें नेहमीं खरें बोलतात. "

" बाई, तुम्हांला कांहीं अक्कल नाहीं. उद्यां ती माझ्यावर कांहीं तोहमत घेईल."

" त्यांत काय साहेब ? आधीं लेकरांना बोलूं नको म्हणून सांगून ठेवलें णजे मग तीं थोडींच बाहेर बोलतात ? "

जों जों टिळकांच्या रागाचा अग्नि भडकूं लागे तों तों ती बाई आपल्या हाणपणाचें एक एक दांडूक आंत टाकी. त्या आगीवर मधल्या मध्यें चेकीच्या पाठीचें धिरडें मात्र चांगलें चुरचुरूं लागलें. शेवटीं मीं चिकीला ओढून घेतलें.

लग्नानंतर दत्तू व रूथ सातारला आले होते. ते परत जायला निघाले.

नाम्यानें मुंबई प्रथम दत्तूच्या लग्नांतच पाहिली. त्याला वाटूं लागलें

आपण पुन्हां जावें मुंबईला. दत्तू व रूथ जायला निघाले तेव्हां तो रडून बसला. मग त्याची कशी तरी समजूत केली. त्यानें जें जें मागितलें तें तें त्याला कबूल केलें.

"आंगठी पाठवाल ? बूट पाठवाल ? आणि रिस्टवॉच ? टोपी ?"

"हो. मी हें सर्व तुला मुंबईस गेल्याबरोबर पाठवीन."

हें सारें पाठविणें कठिण नव्हतें. दोनचार आण्यांत सारे सामान येण्यासारखें होतें! दत्तू गेल्यावर नाम्याला मोठी काळजी पडली. तो म्हणे, भाऊ ह्या जिनसा पाठवितील त्या मधल्यामधें पोष्टाच्या शिपायानें घेतल्या तर ? त्याची कितीहि समजूत केली तरी त्याचें आपलें तेंच खरें.

तो कांहीं तरी भांडण काढी. मुंबईस जायला कांहीं तरी निमित्त काढायला त्याला पाहिजे होतें.

एक दिवस चिकी परातींत मडकें ठेवून तें धूत होती. त्यानें तिच्याकडे पाहून कांहीं विचार केला. मग मान तुकवून म्हटलें,

"काय कलतेस ? मलकं बुलेल ना पाण्यांत !"

मीं म्हटलें, "बुडूं दे. पपा आतां गांवाहून पुष्कळ मडकीं आणतील !"

"खलं ? किती आणतील ?"

"गाडाभर मडकीं आणतील."

"मग मी जातों शेशनवल ! तीं मडकीं घलीं कोण आणील जपून ?"

हो हो करतां करतां मला पुरेवाट झाली. शेवटीं नाम्याला त्या मडक्यांच एवढी काळजी वाटूं लागली कीं तो उपाशीच उठून स्टेशनवर चालता झाल त्या वेळेस रिक्रूट भरती होती. त्यांत नामा लढाई करण्यासाठीं घरच्या निघून गेला. हा वेडा आहे, ह्याला कांहीं कळत नाहीं असें टिळकांनीं पुष्कळ सांगून पाहिलें पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मुंबईस गेल्यावर मा आपल्याला लढाईचें कांहीं सांगितलें नाहीं, साहेबाचा पंखा ओढायचें काम आहे म्हणून सांगितलें असा त्यानें जबाब दिला व तेथून त्याला हांकलून देण्यांत आलें. नाम्याची गोष्ट येथेंच संपली. पुढें जनसमुद्रांत हा बिंदु कोठें

गडप झाला कांहीं कळलें नाहीं.

केरपोतेऱ्यापासून टिळक आतां घरांतलें सर्व काम माझ्या बरोबरीनें करीत. ते म्हणत, ख्रिस्ताला कुठें चाकर नोकर होते ? त्याला कुठें घरें माड्या होत्या ? त्याला डोकें टेंकायलासुद्धां जागा नव्हती मग आपल्यालाच कशाला हे चोचले पाहिजेत ? त्यावर त्यांनीं दोन अतिशय प्रसिद्ध अभंग रचले आहेत.

टिळकांचे ह्या दोन वर्षांतील आध्यात्मिक जीवन त्यांच्या अभंगांजलींत चित्रित झालें आहे.

टिळक रोज सकाळ संध्याकाळ भजन करीत. पायांत चाळ, हातांत झांज, चिपळा, मागें तबला नाहींतर पखवाज अशा रीतीनें त्यांचें भजन चाले व त्यांत 'ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी' अशी त्यांची स्थिति व्हावयाची. ते भजन करतां करतां नाचत; पण पाश्चात्य उपासनापद्धतीला आदर्श उपासना-पद्धति समजणाऱ्या येथील एका मिशनरीबाईला हें मुळीच खपत नसे. तिनें आपल्या कामदारांना आमच्या येथें येऊन भजनांत भाग घेण्याची बंदी केली. ते ऐकत ना. बंदी झाली तरी ते तसेच येत. त्यावरून तिचे व कामदारांचे खटके उडत. तिनें एक दोघांना कामावरून काढून टाकलें. तशीं टिळकांनीं त्यांना ताबडतोब कामें लावून दिलीं. ह्या बाईच्या जांचावर त्यांनीं खालील अभंग लिहिला —

**मरतांना सात वेळा । जरि देहाला येईल ॥**
**तरी हा मी सिद्ध देवा । एक अनुग्रह व्हावा ॥**
**तुझ्या नांवें अरेरावी । तुझ्या राज्यांत नसावी ॥**
**तुझीं पाहणें लेंकरें । नको झालीं जनावरें ॥**
**दास म्हणे डोळे फोड । नको दर्शन हें द्वाड ॥**

त्याच मिशनरीबाईला उद्देशून हा आणखी एक अभंग आहे —

**नव्हे हिंदुस्थान लेकुरांच्या चेष्टा । नव्हेत प्रतिष्ठा भंडाच्या या ॥**
**इथेंच जाहाले महाधर्मवीर । जयां थरथर विश्व कांपे ॥**
**इथेंच जहाले मुनी योगीश्वर । अहो आजवर प्रभा ज्यांची ॥**

आपण पुन्हां जावें मुंबईला. दत्तू व रूथ जायला निघाले तेव्हां तो हट्टून बसला. मग त्याची कशी तरी समजूत केली. त्यानें जें जें मागितलें तें तें त्याला कबूल केलें.

" आंगठी पाठवाल ? बूट पाठवाल ? आणि रिस्टवॉच ? टोपी ? "

" हो. मी हें सर्व तुला मुंबईस गेल्याबरोबर पाठवीन. "

हें सारें पाठविणें कठिण नव्हतें. दोनचार आण्यांत सारे सामान येण्यासारखें होतें ! दत्तू गेल्यावर नाम्याला मोठी काळजी पडली. तो म्हणे, भाऊ ह्या जिनसा पाठवितील त्या मधल्यामधें पोष्टाच्या शिपायानें घेतल्या तर ? त्याची कितीहि समजूत केली तरी त्याचें आपलें तेंच खरें.

तो कांहीं तरी भांडण काढी. मुंबईस जायला कांहीं तरी निमित्त काढायला त्याला पाहिजे होतें.

एक दिवस चिकी परातींत मडकें ठेवून तें धूत होती. त्यानें तिच्याकडे पाहून कांहीं विचार केला. मग मान तुकवून म्हटलें,

" काय कलतेस ? मलकं बुलेल ना पाण्यांत ! "

मीं म्हटलें, " बुडूं दे. पपा आतां गांवाहून पुष्कळ मडकीं आणतील ! "

" खलं ? किती आणतील ? "

" गाडाभर मडकीं आणतील. "

" मग मी जातों शेशनवल ! तीं मडकीं घलीं कोण आणील जपून ? "

हो हो करतां करतां मला पुरेवाट झाली. शेवटीं नाम्याला त्या मडक्यांच एवढी काळजी वाटूं लागली कीं तो उपाशीच उठून स्टेशनवर चालता झार त्या वेळेस रिक्रूट भरती होती. त्यांत नामा लढाई करण्यासाठीं घरा निघून गेला. हा वेडा आहे, ह्याला कांहीं कळत नाहीं असें टिळकां" पुष्कळ सांगून पाहिलें पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मुंबईस गेल्यावर मा: आपल्याला लढाईचें कांहीं सांगितलें नाहीं, साहेबाचा पंखा ओढायचें काम आहे म्हणून सांगितलें असा त्यानें जबाब दिला व तेथून त्याला हांकलून देण्यांत आलें. नाम्याची गोष्ट येथेंच संपली. पुढें जनसमुद्रांत हा बिंदु कोठें

गडप झाला कांहीं कळलें नाहीं.

केरपोतेऱ्यापासून टिळक आतां घरांतलें सर्व काम माझ्या बरोबरीनें करीत. ते म्हणत, ख्रिस्ताला कुठें चाकर नोकर होते? त्याला कुठें घरें माड्या होत्या? त्याला डोकें टेंकायलासुद्धां जागा नव्हती मग आपल्यालाच कशाला हे चोचले पाहिजेत? त्यावर त्यांनीं दोन अतिशय प्रसिद्ध अभंग रचले आहेत.

टिळकांचे ह्या दोन वर्षांतील आध्यात्मिक जीवन त्यांच्या अभंगांजलींत चित्रित झालें आहे.

टिळक रोज सकाळ संध्याकाळ भजन करीत. पायांत चाळ, हातांत झांज, चिपळा, मागें तबला नाहींतर पखवाज अशा रीतीनें त्यांचें भजन चाले व त्यांत 'ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी' अशी त्यांची स्थिति व्हावयाची. ते भजन करतां करतां नाचत; पण पाश्चात्य उपासनापद्धतीला आदर्श उपासना-पद्धति समजणाऱ्या येथील एका मिशनरीबाईला हें मुळीच खपत नसे. तिनें आपल्या कामदारांना आमच्या येथें येऊन भजनांत भाग घेण्याची बंदी केली. ते ऐकत ना. बंदी झाली तरी ते तसेच येत. त्यावरून तिचे व कामदारांचे खटके उडत. तिनें एक दोघांना कामावरून काढून टाकलें. तशीं टिळकांनीं त्यांना ताबडतोब कामें लावून दिलीं. ह्या बाईच्या जांचावर त्यांनीं खालील अभंग लिहिला —

**मरतांना सात वेळा। जरि देहाला येईल ॥**
**तरी हा मी सिद्ध देवा। एक अनुग्रह व्हावा ॥**
**तुझ्या नांवें अरेरावी। तुझ्या राज्यांत नसावी ॥**
**तुझीं पाहणें लेंकरें। नको झालीं जनावरें ॥**
**दास म्हणे डोळे फोड। नको दर्शन हें द्वाड ॥**

त्याच मिशनरीबाईला उद्देशून हा आणखी एक अभंग आहे —

**नव्हे हिंदुस्थान लेकुरांच्या चेष्टा। नव्हेत प्रतिष्ठा भंडाच्या या ॥**
**इथेंच जाहाले महाधर्मवीर। जयां थरथर विश्व कांपे ॥**
**इथेंच जहाले मुनी योगीश्वर। अहो आजवर प्रभा ज्यांची ॥**

**श्रद्धा हेंच ज्यांचें जीवितसर्वस्व। आपुलेंच विश्व घर ज्यांचें ॥**
**असे भक्तराज इथेंच जन्मले। हृदीं विराजले ज्याच्या त्याच्या ॥**
**इथें नाचवून भलतीच सोंगें। करुनिया ढोंगें अर्थ काय ? ॥**
**मिळवाल तेंही घालवाल अंतीं। घालील फजीती माळ कंठीं ॥**
**दास म्हणे येथें प्रभु येशू ख्रिस्त। पाहिजे संतत उभा केला ॥**

ह्या मिशनरीबाईला ते मंबाजी म्हणत व मंबाजी म्हणून त्यांचा एक अभंगहि आहे.

टिळक घराला कड्या लावूं देत नसत. कुलूप तर नाहींच नाहीं. मी म्हणें, 'असें कसें करतां ?' ते म्हणत, 'खरोखर परमेश्वरावर आपला इतका भाव असला पाहिजे, कीं आपल्याला कांहीं सांठवून ठेवण्याची इच्छाच होतां कामा नये व आपलें जें असेल तें साऱ्यांचें असलें पाहिजे. तुझें-माझें हा भेदभाव कांहीं उपयोगी नाहीं. ह्याहि विषयावर त्यांनीं सुंदर अभंग रचले आहेत.

टिळकांचा तापट स्वभाव, राग वगैरे जवळ जवळ नाहींसे झाले होते. आतां रागाची जागा कींव घेई. कोणी कांहीं विरुद्ध बोललें किंवा छळ होऊं लागला तर ते म्हणत; वाः ह्या गोष्टी तर मला माझ्या कामांत स्फूर्ति देतात. ह्यावर त्यांनीं खालील अभंग रचले आहेत.

**जों जों जगाला मी होईन अप्रिय। तों तों माझें ध्येय माझें झालें ॥**
**जों जों निंदा छळ तों तों वाढे बळ। उज्ज्वळ उज्ज्वळ आत्मनिष्ठा ॥**
**जों जों जग कोपे दूर दूर जाई। तों तों तेंच येई हारीं *माझ्या ॥**
**भय काय आम्हां ? जगज्जेता गुरू। आमुचें तो करूं पाहिजे तें ॥**
**आमुचें कशाचें कुठें त्याचा पत्ता। विराजली सत्ता सारी त्याची ॥**
**दास म्हणे ख्रिस्त अवघाच ख्रिस्त। हळू हळू अस्त पावलों मी ॥**

मात्र त्यांना सात्त्विक संताप अतिशय येई, स्वतःचा अपमान झाला म्हणून रागावत नसले, तरी हिंदी ख्रिस्ती लोकांतील कित्येक दुर्गुणांची तसेंच मिशनरींनीं

---

* आहारीं

त्यांना आणलेल्या पांगळेपणाची त्यांना अत्यंत चीड येई. एकदां तर वाईच्या चर्चमध्यें उपदेश करतांना, त्यांचा आवेश इतका परमावधीला गेला, कीं त्यांनीं बोलतां बोलतां पुढें असलेल्या टेबलावर बुक्की मारली व एका बुक्कीसरशीं तें टेबल ताडकन फुटून गेलें.

# आयुर्मार्गी आक्रमण नवा

टिळकांच्या आयुष्याचें हें शेवटलें वर्ष परंतु हें एकच वर्ष पुष्कळ दृष्टींनीं दहा वर्षांच्या किमतीचें होतें. ते म्हणत, आपल्या देशाची खरी उन्नति ख्रिस्ताचें शिक्षण आचरणांत आणल्याशिवाय होणार नाहीं व हिंदुस्थान ग्रंथापेक्षां किंवा पंथापेक्षां व्यक्तीकडे अधिक लक्ष देतो. " नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती परी ख्रिस्त ख्रिस्त। पाहिजे सतत उभा केला " असें ते आतां आपल्या धर्मबांधवांना सांगूं लागले. ख्रिस्ताला त्यांची अशी प्रार्थना असे कीं, " माझा आत्मा जसा आरसा पाहो जन त्यामाजि तुला। रहा विचारीं, मम उच्चारीं आचारीं तूं रम विमला ! "

ह्या विचारसरणीमुळें त्यांचें व त्यांच्या भोंवतालच्या परिस्थितीचें पटेनासें होई. ख्रिस्ती माणूस ख्रिस्तासारखा पाहिजे व हिंदी ख्रिस्ती माणूस पौर्वात्य ख्रिस्तासारखा असायला पाहिजे असें ते म्हणत व आपण स्वतःच तसें होण्याचा त्यांनीं आटोकाट प्रयत्न सुरू केला. ह्या वर्षाची त्यांच्या जीवनक्रमाची तयारी आधीं दहा वर्षांपासून चालली होती. त्यांनीं दहाबारा वर्षांपूर्वीं म्हटलें होतें " पुष्कळ अजुनी उणा प्रभू मी पुष्कळ अजुनी उणा। खंडींतुन रति नाहिं फेडिलें बंधु भगिनिच्या ऋणा। तुझा ऋणी तर सदाच राहिन अगा पतित पावना ! ' व हें उणेंपण नाहींसें करण्याचा त्यांनीं आटोकाट प्रयत्न केलेला होता. त्यांनीं जन्मतांच आणलेले कित्येक दोष ह्या दहा वर्षांच्या काळांत हळूहळू नाहींसे होत होत ह्या शेवटल्या वर्षांत अजिबात नाहींसे झाले होते असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाहीं. उदाहरणार्थ, त्यांचा रागीट स्वभावच

घेतल्यास ते स्वतःचा अपमान झाला म्हणून पूर्वीसारखें एकदांहि रागावलेले दिसले नाहींत.

टिळकांना आतां पगारी काम नव्हतें. लिहिण्यावर थोडेसे पैसे व तेहि कधीं कधीं मिळत तेवढेच. गरीबी आमची पहिल्यापासून होती तशीच आतांहि होती. मात्र आतांच्या गरिबींत व पूर्वींच्या गरिबींत एवढें अंतर होतें कीं आतां आम्हांला कर्ज नव्हतें.

कर्ज नव्हतें तरी कर्जदार मधून मधून दत्त म्हणून उभे राहात.

वांबोरीस एक गरीब ख्रिस्ती मनुष्य होता. त्याचें नांव रामभाऊ ससाणे. ह्याला सहाय्य म्हणून टिळक कित्येक वर्षें दरमहा दोन रुपये पाठवीत असत. पण सातारच्या ह्या गडबडींत दोन महिने पैसे पाठवावयाचे राहून गेले होते शिवाय आतां पैसेहि नव्हते.

आम्ही साताऱ्यास पोंचल्यावर एक दोन आठवड्यांतच ससाण्याची स्वारी आपलें गांठोडें व काठी सावरीत बंगल्यांत शिरली !

" सलाम साहेब ! "

" ससाणे ? तुम्ही कसे आलां ? "

" आगगाडीनें ! "

" कां आलांत ? "

" पैशासाठीं. "

" अहो ससाणे दोन दिडक्यांत मला पत्र आलें नसतें का ? "

" म्हटलं आठवण राहते न राहते. म्हटलें जावें झालें स्वतःच. "

" अहो तें खरें, पण खर्च किती झाला ह्याची कांहीं कल्पना ? "

" नाहीं म्हटलें ! आपण ते द्यालच ! मीं उसने आणले ते पैसे. "

" वा ससाणे ! मोठा शहाणपणा केलांत. आतां उशीर झाला तर असे येऊं नका. आलांत तर मी पैसे बंद करीन. "

असें म्हणून त्याचें जातांयेतांचें भाडें दहा रुपये व मागच्या दोन महिन्यांचे चार रुपये असे चौदा रुपये त्या म्हाताऱ्याला देऊन वाटेला लावलें व पुढें न

चुकतां दोन रुपयांची मनीऑर्डर पाठवायला पुन्हां सुरुवात केली.

कर्ज नव्हतें. तसेंच देवाच्या कृपेनें पूर्वीप्रमाणेंच भरपूर माणसेंहि होतीं.

आमच्या कीर्तनांत साहाय्य करण्यासाठीं टिळकांनीं मुंबईहून मिस् मिलार्ड ह्यांच्या आंधळ्यांच्या शाळेंतून लिंबाजी नांवाचा एक आंधळा तरुण बोलविला होता. तो आंधळा, त्याची बायको एका डोळ्याची, पण चार डोळ्यांऐवजीं ह्या एकाच डोळ्यांत त्यांची प्रेमामुळें फार चांगली गुजराण होत होती. आम्हीं त्याला दहा रुपये व घर दिलें. पण आतां परवां मीं ऐकलें, कीं त्याला दहा रुपयांच्या ठिकाणीं आतां चाळीस रुपये पगार मिळतो व एक डोळ्याच्या जागीं त्याच्या घरांत आतां नऊ डोळे आहेत !

भिन्न जातींचें, भिन्न धर्मांचें, भिन्न विचारांचें व एका दिलाचें संमेलन आमच्या घरीं होतें. त्यांत कोणी धर्माचा विचार करणारे, कोणी केलेले तर कोणी ख्रिस्ती झालेले असत. दररोज दोन वेळेला आमच्या घरीं भजन होत असे. त्यासाठीं एक तास आणला होता. तो वाजला कीं वार्डांतील माणसें जमत. कधीं कधीं गांवांतील माणसें येत. दारावरून जात असला तर तो येऊन बसे.

पैशांच्या अभावामुळें टिळक भगव्या कफन्या घालूं लागले. कारण त्यामुळें धोब्याचा खर्च वांचला. त्या कफन्याहि त्यांनीं जुन्या धोतरांच्या बनविल्या होत्या. सर्व मंडळी बसून भजन करीत. टिळक मात्र उभे राहत. प्रत्येका-जवळ झांज चिपळा असत. कोणी तबला किंवा नाल वाजवी. कधीं कधीं टिळक पायांत चाळ बांधून तल्लीन होऊन नाचत. " ब्रह्मानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी " अशी त्या वेळीं त्यांची व सर्व श्रोत्यांची आणि भजनी-मंडळीची स्थिति होऊन जाई व हें किती तरी वेळ चाले.

आमच्याकडे जाती, वय, धर्म, अधिकार ह्यांचा भेदाभेद नसे. ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत कोणीहि येऊन बसे, ख्रिस्ती लोक येत व त्यांत मिशन कामदारहि असत. मिशनमध्यें काम न करणारे असेहि ख्रिस्ती लोक असत. जे कोणी येतील ते सर्व आम्हांला आमचे सगेसोयरे वाटत. दुजाभाव

मुळीं राहतच नसे.

अगदीं पहिल्यापासून आम्हांला दोन गोष्टी नेहमीं मनासारख्या मिळत गेल्या. एक बिनभाड्याचें घर व दुसरें गांवांत अगदीं घरच्यासारखा डॉक्टर. साताऱ्यास डॉ. केळकर असेच आमचे जवळचे दोस्त बनले.

एक दिवस गांवांत माझें कीर्तन व्हायचें होतें. पण आदल्या दिवशीं मला बराच ताप आला. टिळकांनीं डॉ. केळकरांना चिठ्ठी पाठविली, तिला बरें नाहीं. तावडतोब या. चिठ्ठी संध्याकाळीं गेली. डॉक्टर घरीं नव्हते, कोठें खेड्यावर गेले होते. घरीं येतांच टिळकांची चिठ्ठी ! बरें, काय होतें काय नाहीं हें चिठ्ठींत कांहींच नाहीं. रात्रीं दहाचा सुमार. डॉक्टरसाहेबांच्या हातांखालीं त्या वेळेस माणूस नाहीं, पोटांत कावळे कोकलतच होते. बरोबर काय काय औषधें घ्यायचीं हें ठरवितां येईना. तेव्हां मला जेवढे रोग होणें शक्य होतें तेवढ्यांची आठवून आठवून त्यांनीं औषधें व आयुधें एका भल्या मोठ्या बॅगमध्यें भरलीं. तांगा होता. पण तांगेवाला नव्हता. तेव्हां तांगा स्वतःच जोडला. ती बॅग तांग्यांत ठेवली व डॉक्टरसाहेब तांगा हाकलीत आमच्या बंगल्यावर दाखल झाले. त्या वेळपर्यंत माझा ताप उतरला होता. डॉक्टर म्हणाले, " अग थेरडे, तुला झालें होतें तरी काय ? साप डसला का कॉलरा झाला का झालें तरी काय ? मी किती घाबरून गेलों. " मला हसूं येऊं लागलें व वाईटहि वाटलें. मीं म्हटलें, " डॉक्टर, माझें आहे उद्यां कीर्तन. तेव्हां म्हटलें ताप-बीप नको उद्यां यायला. " डॉक्टरांनीं औषधाऐवजीं आपल्या हातांतल्या छडीचे दोन तडाखे माझ्या पाठींत लगावले. अर्थात् ते प्रेमाचे असल्यानें त्यावर त्यांना पुन्हां औषध चोळावें लागलें नाहीं. नंतर डॉक्टरांनींच मला कांजी करून पाजली.

दुसऱ्या दिवशीं माझें कीर्तन झालें. आतां कीर्तनास दुसरीकडचींहि आमंत्रणें येऊं लागलीं. फ्रिच्ले नांवाच्या एका युरोपियन गृहस्थाचेंहि आमंत्रण आलें. फ्रिच्ले मिशनरी नव्हते. एक शिल्पकार होते. त्यांना कोणीं आमच्या-बद्दल सांगितलें होतें. ते अत्यंत धार्मिक वृत्तीचे गृहस्थ असल्यानें त्यांनीं

आम्हांला बोलावलें. दत्तूचें लग्न झाल्यानंतरचा हा पहिलाच नाताळ होता. दत्तूनें सूनबाईसह सातारला यावें असें माझें मत होतें. पण दत्तूचें पत्र आलें कीं आम्हींच मुंबईस यावें. टिळकांना आढेवेढे घेण्याची कधींच संवय नव्हती. आम्ही मुंबईस जाऊन नाताळ साजरा करायचा आणि मग कीर्तनासाठीं लोणावळ्यास जायचें ठरविलें.

येतांना मी तयारीनें आलें होतें. तळणमळण तेवढें राहिलें होतें. तें बेबीनं व चिकीनें अंगावर घेतलें. सुनेला कांहीं येत नव्हतें किंवा ती करण्याची टाळाटाळ करीत होती असें नाहीं, पण तिच्याच्यानें कांहीं होतच नव्हतें. तरी तिनें तसेंच मुलींना हातांबोटांशीं धरून थोडें थोडें केलेंच. माझें कीर्तन होतें तेव्हां मी त्या गडबडींत होतें. हा आमचा सर्वांचा शेवटलाच नाताळ. आम्ही तो मोठ्या आनंदांत घालविला. सुनेनें सासऱ्याला कपबशा व केटली वगैरे चहाचें सामान नाताळाचें बक्षीस दिलें व मला लुगडें दिलें. नाताळ झाला. नव्या वर्षासाठीं आम्ही लोणावळ्यास जाण्याचें ठरविलें. येथें फ्रिच्ले साहेबांनीं आम्हांला भजनकीर्तनासाठीं बोलावलें होतें. पत्रव्यवहारानें व एक दोन भेटींनींच त्यांची व आमची फार चांगली ओळख होऊन त्यांना टिळकांबद्दल अत्यंत आदर वाटूं लागला होता.

लोणावळ्यास आम्ही नव्या वर्षाच्या आदल्या दिवशीं गेलों. माझें कीर्तन झालें. रात्रीं 'वॉच नाईट' झाली. १९१९ च्या पहिल्या दिवशीं आम्ही फ्रिच्ले साहेबांचेच पाहुणे होतों. दुसऱ्या दिवशीं निघतांना साहेबांनीं टिळकांच्या हातांत पांचशें रुपयांचा चेक ठेवला. नंतर आम्ही पुण्यास गेलों. तेथेंहि माझीं कीर्तनें झालीं. आणि आम्ही पांचशें रुपयांच्या गठडीसह साताऱ्याला पोंचलों. आल्याबरोबर डॉ. अर्नेस्टचे अंधारांत घेतलेले रुपये त्याला अंधारांत परत केले व माझा जीव खालीं पडला. पांचशें रुपयांपैकीं दोनशें रुपये कर्ज फेडलें. शंभर रुपये देवाच्या दरबारांत खर्चे केले व दोनशें रुपये बाजूला टाकले. ह्या पैशाचा पुढें योग्य वेळीं उपयोग झाला.

टिळक नेहमीं प्रार्थना करीत, कीं देवा मला दरिद्री ठेव. मला पैसा नको. मी प्रार्थना करी देवा, मला कर्ज नको. आमच्या दोघांच्या प्रार्थना देवानें ऐकल्या.

टिळकांची एक कविता आहे कीं, " ह्या पैशाचे नकोत अमुच्या करास, हृदया चटके " आमच्या दोघांच्या प्रार्थना परमेश्वरानें ऐकल्या व त्यानें त्या आमच्या दोघांच्या वृत्तींत फरक करवून ऐकल्या. मला पैसा हवासा वाटेना, हें टिळकांच्या प्रार्थनेचें उत्तर व टिळकांनीं कर्ज करण्याचें सोडून दिलें, हें माझ्या प्रार्थनेचें उत्तर.

सृष्टीनें उग्र स्वरूप धारण केलें. शेतकरी आपल्या काळीची मशागत करून पाळी-गोपाळी करून बसले. सर्वांची दृष्टि चातकाप्रमाणें मेघमंडळाकडे लागून राहिली. फटाटोपो भयंकरः ह्याप्रमाणें मेघ गर्जना करी. आकाशांत चहूंकडे धुराचे पोकळ फसवे ढग इकडून तिकडे सैरावैरां उनाड पोरांप्रमाणें धांवत असत व ह्या पोरांना दृष्ट लागूं नये म्हणून मधेंच किंचित कोठें बारीकसा, तीट लावल्याप्रमाणें, एखादा काळा ढग दिसे. पावसाचें पाणी नसल्यानें जनतेच्या तोंडचेंहि पाणी पळालें. मुसलमान, ख्रिस्ती आपापल्या परीनें परमेश्वराची प्रार्थना करीत होते. ब्राह्मण लोकांनीं अनुष्ठानें आरंभिलीं. देवळांतील देवांना पाण्यांत कोंडलें. गोरगरीब देवाला हाका मारूं लागले. जनतेच्या अंतःकरणानें ठाव सोडला. धारण कडकडली. आईला मूल जड झालें.

टिळकांचा सारा विश्वास प्रार्थना व उपवासांवर होता. ते आतां एकच वेळेस जेवीत. कधीं कधीं तेंहि वर्ज्य करीत. जेवायला बसले कीं एखादे वेळेस त्यांचा कंठ दाटून येई. ते म्हणत, माझे आप्तमित्र अन्नाला महाग झालेले पाहून मी हें अन्न खाऊं तरी कसें ? ह्यापेक्षां दे तें माझ्या भुकेल्या बंधुभगिनींना. घरांत असेल नसेल तें पीठ मीठ ते गरजू लोकांना वाटूं लागले.

दुष्काळांत तेरावा महिना. पिसा झाल्या. पिंजरे घरोघर येऊं लागले. चहूंकडे डांबर जाळल्याचा वास येऊं लागला. टोंचणी सुरू झाली. लोक बाहेर पडले. आज हा तर उद्यां तो अशा बातम्या पसरूं लागल्या. त्या वेळीं टिळकांनीं एक

धुरी कोठें वाचली व ती मजकडून तयार करवून घेतली. जो कोणी येईल त्याला ते ही ओंजळ ओंजळ धुरी वांटूं लागले. ह्या धुरीनें उंदीर, घुशी, डांस, पिसवा जातात. देवाच्या कृपेनें व माणसाच्या कर्तबगारीनें प्लेगोबा थोपले तर वाघोबा कोपले. दुष्काळामागें दुखणें ही दुक्कल पाहून काळजाचें पाणी पाणी व बोलण्याची शिराणी झाली. साताऱ्यास पहिली मानमोडी झाली. हिनें प्लेगावर ताण केली. कुटुंबांतील दहापैकीं एक उभा. बाकी सर्व बिछान्यावर. रानांतील जनावरें रानांत व घरांतील धर्मखुंटी डांबलेलीं. त्यांना चारा वैरण देण्याकरतां कोणीच नाहीं. खायला पैसा नाहीं. बत्तीला तेल नाहीं. पाणी देण्यास माणूस नाहीं, असें त्या वेळेस ऐकलें कीं एका माणसानें जवळ पैसा नसल्यामुळें आपली एक गाय देऊन दोन डाळिंबें खरेदी केलीं! ही करुणाजनक स्थिति पाहून टिळकांनीं अल्प दवाखाना व स्वल्प अन्नछत्र खुलें केलें. एक काढा रोज मी तीन चार शेर कढवून ठेवी. हें औषध, दूध, साबूदाणे, साखर, घासलेट व आगपेट्या ह्या जिनसा टिळक सकाळीं आठपासून बारापर्यंत वांटीत. कर्मठ, मराठे, महार ह्या साऱ्या लोकांना ह्या जिनसा वांटण्यांत येत.

टिळकांचें भजन सकाळ संध्याकाळ चालूच असे.

दुष्काळ व मानमोडीच्या कचाट्यांतून हवालदिल झालेली जनता एकदांची बाहेर पडली. ह्या दिवसांत टिळकांनीं पुष्कळ अभंग लिहिले.

दत्तूच्या लहानपणापासून मला पोटदुखीचा त्रास आहे व एखादे वेळीं ही फारच उचल खाते. त्याप्रमाणें माझें पोट दुखत होतें. टिळक पहांटे उठत व आधीं शेगडी पेटवून माझ्या खाटेखालीं ठेवीत. नंतर आपण चहा घेत. अलीकडे माझ्याजवळ ते फार बोलत. म्हणजे तसा त्यांचा माझ्याशीं पूर्वी अबोला होता असा अर्थ नाहीं. आतां म्हणजे त्यांना वेळ नसूनहि ते वेळांत वेळ काढून येऊन माझ्याशीं बोलत बसत. मला त्यांचें बोलणें मुळींच आवडत नसे-मी कधीं त्यांना हुंकार देत असें तर कधीं म्हणें, "पुरें हें तुमचें चऱ्हाट. मला तें मुळींच आवडत नाहीं. कशी वेळ येईल ठाऊक नसते. नेहमीं शुभ बोलावें. घराभोंवतीं देवाचे दूत असतात. ते अस्तु अस्तु म्हणतात." ते म्हणत, "मी काय

वाईट बोलतों आहें ? दोन प्रवाशी वाटेनें जातात. एकाचें स्टेशन आधीं येतें. एकाचें मागाहून येतें. त्यांत काय आहे ? भिण्यासारखें काय झालें ? मी आपला बोलायला कांहीं विषय हवा म्हणून काढला. कोणती वेळ केव्हां येणार हें का ठाऊक असतें ? आधीं तशी नोटीस थोडीच येते ? लेकराला बाहेर किती वेळ राहूं द्यायचें हें एक आईलाच कळतें. तें खेळून दमलें थकलें कीं ती पुढें होऊन त्याला उचलून आपल्याजवळ घेते. त्याला विसावा देते. तसेंच देव करतो. आज नाहीं उद्यां तो असाच प्रत्येकाला उचलून घेईल. आपण हात पाय झाडण्या-ऐवजीं त्याची उत्सुकतेनें वाट पहायला हवी. मनुष्यानें आपल्या परिस्थितीहून एक मूठभर मोठें व्हायला पाहिजे. नाहींतर दोघांपैकीं एक गेल्यावर मागें राहणारानें रडत बसणें म्हणजे त्या परिस्थितीचें गुलाम होणें व ईश्वरी इच्छेचा अनादर करणें आहे. ''

" एकाद्या बाईचा नवरा मेला कीं, ती दुःखातिरेकानें मूर्ख बनते. आपल्या-वर मुलांबाळांसंबंधीं कांहीं जबाबदारी आहे हें ती विसरून जाते. वाटेल त्या वेळेस वाटेल तेथें ती रडत बसते. आपल्या शोकाचा परिणाम कोणा कोणावर होतो आहे इकडे तिचें कधीं लक्षच राहात नाहीं. आणि दुःखाचें समाधान करण्यास ज्या आयाबाया येतात त्या तर मेलेल्या माणसाचे असतील नसतील ते गुण आठवून तिच्या शोकाग्नींत आणखी तेल ओतीत असतात. तिचें समाधान करण्याचें बाजूसच राहतें. मृतांच्या आप्तांना कोणती गरज आहे, त्यांचें साह्य कसें करतां येईल, आपल्या दुःखाचा त्यांना कसा विसर पडेल, इकडे कोणाचें लक्ष नसतें. ज्यानें त्यानें तिला रडवावें, दुःखाच्या खपल्या काढाव्या, शंभर माणसांनीं यावें, शंभर वेळेस तिनें रडावें व घरांतील वातावरण कायमचें उदास करून टाकावें. त्या बाईचे डोळे रडून रडून फुटतात व मुलाबाळांच्या शरीरप्रकृतीवर परिणाम होतो. ''

त्यांचें असें बोलणें ऐकून माझ्या काळजाचे कोणी लचके तोडीत आहे असें मला वाटे.

" ज्याप्रमाणें वैष्णवाच्या मुखावर मुद्रा असली कीं तो वैष्णव समजावा.

त्याप्रमाणें ख्रिस्ती लोकांच्या घरीं मृत्यु झाला कीं ते त्याच्या ड्रेसवरून कळतें, मला तें मुळींच आवडत नाहीं. काळी गाडी, काळा घोडा, काळी पेटी, काळें लुगडें, काळ्या फिती, पत्राभोंवतीं काळी बॉर्डर ! हें आहे काय ? देवाकडे जाणें, हें का अशुभ आहे ? जो अमर, जो पवित्र त्याच्याकडे जाणें अशुभ आहे का ? पावित्र्याचें द्योतक काळें का पांढरें ? मी जर तुझ्या अगोदर गेलों तर असें कांहीं करूं नका. मला सर्व शुभ्र असूं द्या."

"हें तुम्हीं काय आरंभिलें आहे मला कांहीं कळत नाहीं."

"मीं तुझ्या आधीं जाणेंच अधिक हिताचें आहे."

"त्यांत कोणतें हित आहे आणि कोणतें अहित आहे मला कळत नाहीं."

"पुढें कळेल. मी मेल्यावर तूं किंवा मुलें मुळींच शोक करीत बसूं नका. माझी खात्री आहे, कीं देवाकडे आपल्याला जायचें आहे व त्यांत शोक करण्या-सारखें कांहींच नाहीं. तोच मला नेईल व तोच तुमची पुढें व्यवस्था करील."

टिळकांना भेटलेला 'मंबाजी' त्यांना आतां अधिकच प्रतिबंध करूं लागला. बंगला सोडा म्हणून तगादे येत. पण बंगला कांहीं सुटला नाहीं. दोन्ही वेळेस भजनें चालत. 'मंबाजी'चे कामगार दोन्ही वेळेस न चुकतां धाकांना व ताकिदींना न जुमानतां भजनाला येत. मग टिळक नेहमीं चर्चमध्यें उपदेश करूं लागले. त्या वेळीं चर्चची नवी इमारत नसल्यानें उपासना शाळेंतच भरे व हेंच देऊळ समजण्यांत येई. पण शाळा 'मंबाजी'च्या ताब्यांत. तेव्हां 'मंबाजी' वारंवार ती बंद करीत. टिळक म्हणत, "शेरावाशाचें का होईना पण स्वतःचें तुमच्या हातांनीं बांधिलेलें मंदिर तुम्हीं बांधा. दुसऱ्यांच्या ओंजळीनें किती दिवस पाणी पिणार ? ताटाखालचीं मांजरें किती दिवस राहणार ? एक शतक झालें तुम्हांला ख्रिस्ती होऊन. अजून तुम्ही रांगतीं बाळेंच रहाणार का ? तुमचे वाडवडील असेच होते का ? तुम्हांला त्यांचा अभिमान नको कां ? कां तुम्ही आपली मान दुसऱ्यापुढें वांकवितां ?"

मिशनरींना ते सांगत, "आम्हांला तुम्ही आपल्या हातांनीं किती दिवस भरविणार ? आपल्या पायांवर आम्हांला उभें राहूं द्या. मधें मधें येऊं

नका, आम्हांला पोहूं द्या, गटांगळ्या खाऊं द्या, बुडूं द्या, वाहूं द्या, मरूं द्या, पण तिरायाला शिकूं द्या. ”

मला ते म्हणत, “ पाहा, अशी वेळ येईल कीं ख्रिस्ती लोक व मिशनरी माझ्या विरुद्ध होतील. पण मला जें ह्यांच्या हिताचें वाटतें तेंच मी बोलणार व करणार. मी छळ सोशीन पण मरेपर्यंत त्यांचें हित करीत राहीन. ”

पण एका ‘ मंबाजी ’खेरीज कोणीच ख्रिस्ती माणसानें किंवा मिशनरीनें टिळकांचा छळ केला नाहीं. उलट सगळे अगदीं सग्यासोयऱ्याप्रमाणें वागले.

माघ सरतां सरतां किंचित् उन्हाळा भासूं लागला होता. सूर्यापेक्षां वाळूच अधिक ताप देऊं लागली होती. रविवारीं ‘ मंबाजी ’नें उपासनेच्या वेळीं किल्ल्या दिल्या नाहींत. शाळा बंद; ‘ मंबाजी ’चा निश्चय कीं आज कांहीं झालें तरी किल्ल्या द्यावयाच्या नाहींत.

मंडळी टिळकांकडे सांगायला आली. आज स्वर्गाचीं द्वारें बंद झालीं! टिळक म्हणाले, होऊं द्या. देव देवळांत रहात नाहीं. जेथें कोठें दोघे तिघे एका दिलानें मजकरतां जमाल तेथें मी आहें असें प्रभु म्हणतो आहे. चला, आपण मैदानांत झाडाखालीं मंदिर उघडूं. टिळक निघाले. त्यांच्यामागें मंडळी निघाली.

‘ मंबाजी ’नें हें दुरून पाहिलें. लागलीच एक मुलगा धावत धावत, किल्ली घेऊन ह्या मंडळीच्या मागें आला व सर्वांस त्यानें मागें फिरविलें. जें बंद होतें तें देवाचें मंदिर खुलें झालें. त्या दिवशींच्या टिळकांच्या भाषणानें मंडळींचे डोळे ओले झाले. त्यांच्याच एका अभंगांतील शेवटली ओळ आज त्यांच्या उपदेशाचें प्रतीक–“ दास म्हणे ख्रिस्ता तुझ्या कंथेवरीं। मला जागा करी थोडकीशी ॥ ” होतें. भाषण संपतां संपतां टिळकांनीं सांगितलें, आज माझा हा शेवटला उपदेश आहे. मी पुन्हा ह्या मंदिरांत पाय टाकणार नाहीं. मी येथून जाईन तो पुन्हा ह्या साताऱ्यांत पाणी पिणार नाहीं. लोक रडूं लागले. टिळकांचें म्हणणें खरें झालें. तो त्यांचा त्या मंदिरांतील शेवटला उपदेश ठरला. परंतु परमेश्वराची योजना किती विलक्षण असते!

ज्या सातारच्या मंडळीला उपदेशासाठीं शाळेंत जमावें लागे त्याच सातारच्या

मंडळीला टिळकांच्या मृत्यूनंतर एक नवीन सुंदर मंदिर मिळालें व त्या मंदिराचें नांव टिळक-स्मारक-मंदिर ठेवण्यांत आलें !

ज्याप्रमाणें एखादा लबाड माणूस आपलें कार्य साधण्यासाठीं कांहींतरी कारण शोधीत असतो त्याचप्रमाणें मृत्यूला कांहींहि कारण पुरतें. ठेंच, गुचकी वगैरे वगैरे कांहींहि त्याला चालतें. अलीकडे गुऱ्हाळें सुरू झालीं होतीं. भजन झाल्यावर उसाचा रस आणीत व इतरांबरोबर कधीं कधीं टिळकहि तो घेत. तो त्यांना बाधला असावा. ते आजाऱ्याप्रमाणें दिसत. तरी त्यामुळें त्यांच्या व्यासंगांत कांहीं व्यत्यय आला नाहीं. ते रात्रीं हवें तेव्हां उठून लिहीत बसत.

मीं त्यांच्या मागें पुन्हा भुणभुण लावली. आजाराला-अडचणीला आपल्या जवळ एकहि पैसा नाहीं. आपल्याला कांहींच करतां येऊं नये म्हणजे काय? पैसा तुम्हाला वैऱ्यासारखा दिसतो. आतां पुढें औषधपाण्याचें कसें होणार ?

ते म्हणत, " आम्हीं काय खावें व काय प्यावें, हें देव जाणतो. माझी खात्री आहे, कीं तो औषधपाण्याला कमी पडूं देणार नाहीं. माझ्या अंत्यविधीलाहि तो कमी पडूं देणार नाहीं. माझ्या मागें एक महिनाभर तुम्हाला दुःखांत बसून खायलाहि तो देईल. पुढें मात्र तुमचें तुम्हीं पाहून घेतलें पाहिजे. एक महिना दुःखाला पुरे झाला. "

आतां डॉ. केळकर वरचेवर येऊं लागले.

एक दिवस रात्रीं तीन वाजतां टिळक उठून माझ्या खोलींत आले. ते मला झोपेंतून कधींच उठवीत नसत कारण मला झोपेंतून उठविलें म्हणजे कांपरें भरतें. मला उठवून ते म्हणाले, 'मीं तुला आजपर्यंत फार त्रास दिला. मला क्षमा कर.'

" आज तुम्हाला त्याची काय आठवण झाली? तुम्हांला कांहीं होतें कीं काय ? "

मीं घाईघाईनें उठून शेगडी पेटवली व शेजारीं धनाजींकडे जाऊन त्यांना उठविलें. आम्ही परत आलों तों टिळक लिहीत बसले होते.

" कसें वाटतें गुरुजी ? "

" बरें आहे. "

धनाजी गेले व मीहि निजलें.

रात्रीं बसून टिळकांनीं आपलें मृत्युपत्र तयार केलें. जवळ एक दिडकी नसतांना टिळकांनीं मृत्युपत्र कसलें केलें असें वाटेल म्हणून त्यांतील कांहीं भाग खालीं दिला आहे. ह्याची एक नक्कल त्यांनीं दत्तूकडे पाठविली, एक मिशनकडे पाठविली व एक स्वतःजवळ ठेवली.

" देवावर, ख्रिस्तावर व सौंदर्यावर ( सौंदर्याची माझी स्वतःचीच कांहीं कल्पना आहे ) जर माझें खरेंखुरें प्रेम नसतें, येशूवर जर मी खरा प्रेम करणारा नसतों तर मी कांहीं वेगळाच मनुष्य झालों असतों, याचें कारण माझें जीवितासंबंधीं असलेलें विशिष्ट मत. कीर्ति किंवा अपकीर्ति मला बुडबुड्यासारखी वाटते, माझ्या मृत्यूनंतर माझी अपकीर्ति केल्यानें जर मनुष्यांचा कार्यभाग होणार असला तर त्यांनीं ती खुशाल करावी; मला त्याचें कांहीं वाटत नाहीं. कालमर्यादा ही माझी जीविताची व्याख्या नाहीं; तर उपयुक्त कार्यकर्तृत्व ही आहे; उपयुक्त कार्य जर माणसाच्या हातून होत नसेल तर त्यानें मरावें हें बरें. मला जगांत जिकडे तिकडे एक सौंदर्य किंवा कुरूपता या दोन गोष्टी मात्र दिसतात. सौंदर्यावर माझी आवड आहे, म्हणून मी त्याच्यावर प्रेम करतों. ख्रिस्तावर माझें एवढें प्रेम असल्याचें कारण तो अशा सौंदर्याचा सागर आहे—नव्हे, सौंदर्यसर्वस्व आहे. तो स्वतःच ह्या सौंदर्याचा पुतळा आहे. स्वर्गप्राप्तीच्या आशेनें किंवा नरकप्राप्तीच्या भीतीनें कोणाला या सौंदर्यावर खरेंखुरें प्रेम करतां येणार नाहीं. प्रेम निरिच्छ आहे. माझी या सौंदर्यावर आवड आहे म्हणूनच मी त्याच्यावर खरेंखुरें प्रेम करितों. स्वर्ग व नरक या दोन अवस्था असून आत्मा या दोहोंतून एका अवस्थेप्रत जातो असें माझें मत आहे. या मताच्या मनुष्यामधून जर ख्रिस्ताचें वास्तव्य नाहींसें झालें तर तो माणूस अगदीं भयंकर बनेल.

" ज्या ठिकाणीं माझ्या अस्थि ठेवण्यांत येतील तेथें जर एखादी कबर उभारावी अशी माझ्या आप्तमित्रांची इच्छा असली, तर त्यांनीं त्या कबरेवर ' पुष्कळ अजुनीं उणा । प्रभू, मी पुष्कळ अजुनीं उणा ॥ ' हा चरण

कोरावा. माझ्या नांवाचें पूर्वी त्यांनीं रेव्हरंड अगर मि. अगर रा. रा. यांतलें कोणतेंहि उपपद लावूं नये. त्यांनीं एन्. व्ही. टिळक असें इंग्रजींत लिहूं नये, तर मराठींत नारायण वामन टिळक असें लिहावें. माझ्या आप्तमित्रांना माझें असें कळकळीचें सांगणें आहे, कीं कवि किंवा एखादा सन्मानदर्शक शब्द माझ्या नांवापूर्वीं न घालण्याची त्यांनीं अवश्य खबरदारी घ्यावी.

" देवाज्ञा कधीं होईल हें कांहीं कुणाला सांगतां येत नाहीं व तिचा उगाच कुणींहि विचार करीत बसूं नये. देवाज्ञेला मी कधींहि 'मृत्यु' म्हणणार नाहीं; कारण ती देवाची आज्ञा आहे, देवाचें बोलावणें आहे. ती नवजीवनजागृति आहे. या मृत्यूचा विचार माझ्या मनांत आला तर तो मला कधींहि निरुत्साही करीत नाहीं. 'अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम्' ( मरतांना त्रास नाहीं व जिवंत असतांनाहि त्रास नाहीं ) हा ख्रिस्ती मनुष्याचा हक्क आहे व हा ख्रिस्ताच्या द्वारें मी कल्पनेच्या पलीकडे अनुभवीत आहें.

" मी जितकी आपल्या देशावर प्रीति करितों तितकी आपल्या आईबापांवर, बायकोवर, लेंकरांवर, मित्रावर, फार काय स्वतःवरहि केलेली नाहीं असें मला वाटतें.

" हिंदी ख्रिस्ता भक्ताला आपल्या चर्चेसची वृद्धि करण्याचा, त्यांना खरेंखुरें स्वतंत्र, चैतन्यपूर्ण करण्याचा अगदीं निदिध्यास लावावा. "

आपल्या मृत्यूनंतर आपल्या शरिराचें दहन करावें, प्रेतयात्रेच्या वेळीं काळा रंग वर्ज्य करावा, आपल्या अस्थि अहमदनगरच्या 'सिमेटरींत' ठेवाव्या व नगरच्या ईश्वरविद्येच्या वर्गात स्वतःचें व डॉ. ह्यूमचें चित्र शेजारीं लावून डॉ. ह्यूमच्या चित्राखालीं 'ह्यानें' व स्वतःच्या चित्राखालीं 'ह्याला संभाळिलें' असे शब्द लिहावे असेंहि त्यांनीं मृत्युपत्रांत लिहून ठेवलें होतें.

डॉ. ह्यूमच्या एक कन्या मिसेस ली ह्या साताऱ्यास असत. त्यांनाहि त्याच वेळीं त्यांनीं एक इंग्रजी पत्र टाईप करून ठेवलें होतें; त्यांत पहिलेंच वाक्य असें आहे.

1. THE MISSION, I hope, will take care of my wife. She is an angel but she has her weakness. Will you be her sister ?

आपल्या मृत्युपत्राच्या प्रती टिळकांनीं ज्या टपालानें पाठविल्या त्याच टपालानें पुण्याच्या डॉ. दौलतराव गोऱ्यांनाहि त्यांनीं एक पत्र टाकलें. डॉ. केळकर नेहमीं येतच असत. टिळकांना ते आपल्या घरींहि ठेवण्यास तयार होते. पण त्यांचें हॉस्पिटल नव्हतें. डॉ. गोऱ्यांचें पत्र आलें कीं, तुम्ही वाटेल तेव्हां पुण्यास या. तुमची सर्व प्रकारें व्यवस्था आम्ही ठेवूं. आम्ही सातारा सोडलें. टिळकांनीं उपासनेच्या वेळेस सांगितल्याप्रमाणें त्यांचें पाऊल पुन्हा सातारला लागलें नाहीं.

म्हटल्याप्रमाणें डॉ. गोरे यांनीं सर्व व्यवस्था उत्तम ठेवली. स्वतंत्र खोली, वॉर्ड-बॉय, औषधें हें सारें फुकट मिळण्याची देवानें योजना केली. तसेंच भांडीं, शेगड्या, आंघोळीला गरम पाणी, किरकोळ वस्तु हें सर्व पुरविण्याचा मक्ता एका माउलीनें घेतला. येथपर्यंत सर्व ठीक झालें. पण मुख्य गोष्ट राहिली ती दामाजीची. पण दामाजीहि जणुं हात जोडून पुढें उभे होते ! जहाल मंजुळाबाईचा मुलगा, टिळक आजारी असल्याचें कळतांच आम्हांला मुद्दाम भेटायला पुण्यास आला. त्यानें कांहीं फळें व पन्नास रुपये मला आणून दिले व म्हटलें, " आई, हे तुम्ही पपासाठीं खर्च करा. मीं हे पगारांतून सांचविले आहेत. " मला आनंद वाटला व वाईटहि वाटलें. हा केवढासा आणि मला हें देतो ! ज्याला आम्हीं द्यायचें व करायचें व ज्याच्याकरितां थोडेंबहुत केलेंहि, त्याची अशी फेड घेणें मला कसेसेंच वाटलें पण त्याचा हिरमोड मला करायला नको होतें. मीं ते पैसे घेऊन बाजूला ठेवून दिलें. दुसऱ्या दिवसापासून कुठून ना कुठून पैसे येऊं लागले. दूध, सोडा, फळें तसेंच आमचा व आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांचा खर्च जवळ जवळ रोजीं सहा सात रुपये होत असे पण इतका खर्च होऊन मजजवळ थोडी बहुत शिल्लक रोजच्या रोज उरे ! रविवार खेरीज करून एका रुपयापासून शंभर रुपयांपर्यंत पैसे येत ! कामाला बाई होती व साह्याला रामभाऊ धर्माधिकारी होते. तो बिचारा रात्रंदिवस उभाच्या

उभा असे.

—जगन्नाथ बाप आई ! उणें मला कांहीं नाहीं —ह्या टिळकांच्या अभंगाचा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागला. येथेंहि टिळक निजून नव्हते. इतर रोग्यांकडे ते जात प्रार्थना करीत, भजन करीत. एक दरबारी त्यांना भजन म्हणूं लागत. त्यांत बऱ्याच अभंगांचा जन्म झाला. कधीं तें भाषणेंहि करीत पण कधीं कधीं ते इतके कासावीस होत कीं मी घाबरून जाई. मी केव्हांहि डॉ. गोऱ्यांकडे धूम ठोकली कीं ते हजर असत, तोंडांतला घास पानांत तसाच टाकून ते उठत. ऑपरेशन–रूममध्यें असले म्हणजेच तेवढे डॉक्टर हातीं लागत नसत.

आम्हांला जाईचें पत्र आलें. जाई जहाल मंजुळाबाईची मुलगी. हिच्यावर टिळकांचें मुलीप्रमाणें प्रेम होतें. नागपुरास ही नर्सिंगचें काम करीत होती. तेथेंच ती आजारी पडली. टिळक साताऱ्याहून निघायच्या आधीं ती त्यांना भेटण्यासाठीं नागपुराहून निघाली. पण मधेंच तिची स्वतःची प्रकृति अतिशय बिघडल्यानें ती नागपुरास परत गेली. आतां तिचें पत्र आलें कीं, पपा, मी इकडे जितकी आजारी आहें तितकेच तिकडे तुम्ही आजारी आहां ! माझी तर आशा आतां डॉक्टरनें सोडली आहे. आपली भेट आतां होणें अशक्य आहे.

भावालाहि तिचें पत्र आलें होतें कीं, येतां आलें तर मला येऊन भेटून जा. तो तें पत्र घेऊन आमच्याकडे आला. आम्हीं त्याला आग्रह करून त्याचे पन्नास रुपये त्याला परत घ्यायला लावून नागपुरास पाठविलें. पंडिता रमाबाईंनीं मनोरमा-बाईंना आमच्याकडे भेटायला पाठविलें. मनोरमाबाई शंभर रुपये व फराळाचें बरोबर घेऊन आल्या. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें खूप आबादानी झाली. सुट्टी घेऊन मुंबईहून बेबी आली. दत्तूनेंहि कांहीं दिवस रजा घेतली. सुनेला बरें नव्हतें तरी तेवढ्यांतल्या तेवढ्यांत तिनें कांहीं कांहीं जिनसा करून दत्तूबरोबर पाठविल्या.

सुनेचा आजार तिच्या आईबापांना मानवला तसाच आम्हांलाहि मानवला होता. आपण आजोबा होणार म्हणून टिळकांनाहि त्या आजारांत मधून मधून आनंद होत असे. मीं तेवढ्या गडबडींत नातवाचें शिवण काढलें होतें. त्यांतील

एक गोधडी टिळकांनीं आपल्या हातांनीं शिवली होती.

टिळकांना एवढा मोठा असाध्य रोग तरी कोणता झाला होता ? तर मुळव्याध ! पण त्या मुळव्याधीच्या दुखण्यानें त्यांचा जीव मधून मधून अतिशय कासावीस होत असे. ते डॉ. गोऱ्यांच्यामागें लागले होते कीं मुळव्याधीचें ऑपरेशन करून टाका. त्यांना थोडासा ब्रॉंकॅटिस झाला होता. तेव्हां डॉ. गोरे म्हणत, तुम्हांला क्लोरोफॉर्म देतां येणार नाहीं. औषधानेंच हळुहळू बरें वाटेल. त्यांनीं आणखी एक दोघां डॉक्टरांना टिळकांची प्रकृति दाखविली व त्यांचेंहि म्हणणें डॉ. गोऱ्यांप्रमाणेंच पडलें.

टिळकांना जितका जितका त्रास होई तितके तितके त्यांनीं अधिकाधिक गोड असे अभंग लिहावे. पुण्याच्या दवाखान्यांत त्यांनीं तीसपस्तीस अभंग लिहिले आहेत. जाईच्या मृत्यूची बातमी येथेंच आली व त्यावर त्यांनीं एक अभंग लिहिला. गोविंदाग्रज कवींच्या मृत्यूसंबंधीं लिहिलेली कविता येथलीच आहे.

थोड्या दिवसांनीं त्यांना बरें वाटूं लागलें. मुलें परत मुंबईला गेलीं. पण बरें जरी वाटत होतें, तरी टिळकांचें मन त्यांना बरें सांगेना. चांगले खात, पीत, लिहीत, वाचीत, चालत, बोलत, गात पण आपलें ऑपरेशन झालेंच पाहिजे असें त्यांच्या डोक्यानें पूर्णपणें घेतलें होतें. त्याच वेळेस माझ्या व्याह्यांचें पत्र आलें कीं, जे. जे. हॉस्पिटलमध्यें कोणी फार चांगला सर्जन आलेला आहे. ह्याच्या मागोमाग फ्रिच्लेसाहेबांचेंहि पत्र आलें कीं जे. जे. हॉस्पिटलांत फार चांगला सर्जन आला असून तो माझा मित्र आहे. मी तुमची तेथें जाण्याची व्यवस्था करतों.

इकडे पुण्यांतील दवाखान्यांतील सर्व मंडळी त्यांच्या जाण्याच्या विरुद्ध होती. डॉ. गोऱ्यांनीं टिळकांना शंभर वेळेस सांगितलें कीं तुम्हीं जाऊं नका. मी तुमची सर्व व्यवस्था येथेंच करतों. ऑपरेशननें भलतेंच होईल. माझी इच्छा नाहीं तुम्हीं ऑपरेशन करावें अशी.

टिळक म्हणाले, मला पुष्कळ कामें आहेत. मला चांगलें बरें झालें पाहिजे. ख्रिस्तायन आहे, देवाचा दरबार आहे. तुम्ही देवाच्या इच्छेविरुद्ध येऊं नका. ह्यावर डॉ. गोरे निरुत्तर झाले.

तिकडे सून जरा कोठें लोळून घोळून उठते तोंच दत्तू आजारी पडला. आम्हांला इतकेंच कळलें होतें कीं त्याला साधारण बरें नाहीं पण त्याला झाला होता टायफॉईड व सुनेला होता सहावा महिना.

शेवटीं टिळकांचें मुंबईस जाण्याचें ठरलें. फिन्लेसाहेबांनीं त्यांच्यासाठीं सेकंड क्लासचा डबा रिझर्व केला. टिळक निघाले तेव्हां दवाखान्यांतील लोकांना फार वाईट वाटलें. डॉ. गोऱ्यांच्या डोळ्यांना पाणी आलें. त्यांची पक्की खात्री होती कीं आज आपण गुरुमहाराजांची ही प्रेतयात्राच पाहात आहों. ते व त्यांच्या पत्नी टिळकांना गुरुमहाराज म्हणत असत.

आम्ही रात्रीं पुण्यास गाडींत बसलों ते दुसऱ्या दिवशीं पहांटें भायखळ्याच्या स्टेशनवर उतरलों. जे. जे. हॉस्पिटलमधून टिळकांना नेण्यासाठीं स्ट्रेचर पाठविण्यांत आलें होतें. तें पाहून टिळक हसूं लागले. त्यांनीं तें परत केलें व स्वतः जाऊन गाडी वगैरे ठरविली. आम्ही दत्तूच्या दाराजवळ उतरलों. टिळकहि वर जात होते पण मलेलू पाळक म्हणाले, " तुम्ही आतां येथें थांबूं नका. एकदम दवाखान्यांत जा. "मला दत्तूला भेटूं द्या. प्रातर्विधि उरकूं द्या." असें ते म्हणाले. पण ऊं हूं. त्यांना काळच बोलावीत होता. ते पायरीदेखील चढले नाहींत. एका कफनीनिशीं स्वतः चालून ते जे. जे.त गेले. परस्वाधीन जिणें आणि पुस्तकी विद्या असें झालें. ज्या दिवशीं टिळक पायीं गेले त्याच्या नवव्या दिवशीं चौघांच्या खांद्यावर जे. जें. तून ते बाहेर आले !

टिळक जे. जें. त गेले. मी व बेबी माडीवर गेलों. भायखळ्याच्या स्टेशनवरच माझी जी कंबर खचली व जे हातपाय गळाले ते बेसुमारच. वर येऊन पहातें तों दत्तू अगदीं सहा महिन्यांचा आजारी ! त्याला पाहून माझ्या तोंडचें पाणी पळालें. मी जरी आजारी नव्हतें तरी एकसारखी पडून राहीं. सुनेला दत्तूचें बरेंच पहावें लागे. टिळकांची खबर घेण्यास घरांत कोणीच नाहीं. मुंबईंत पाय पडतांच आम्ही त्यांना मुकलों व ते आम्हांला मुकले. पुढील भाकीत जाणून मीं पाकळांच्या हातीं निरोप पाठविला कीं, डॉ. गोरे ऑपरेशनच्या विरुद्ध आहेत. पाळकांच्या हातीं परत निरोप आला कीं, मीं का हजामतीचा धंदा करतों का ?

शहाण्याला कोण शिकवणार ? तो बिचारा कोणता का धंदा करीत असेना, पण केस हातीं घेतल्याच्या तिसऱ्याच दिवशीं त्यानें इंग्लंडला प्रयाण केलें ? तेव्हां त्याच्या सर्जरींत व न्हाव्याच्या धोपटींत कांहीं अंतर असल्यास माझ्यासारख्या अडाणी बाईला कसें कळणार ?

सिंहस्थाची पर्वणी व गंगापुत्रांचा सुळसुळाट, तशीच जे. जें.त ह्या वेळेस परीक्षेची पर्वणी व विद्यार्थ्यांचा सुकाळ होता. प्रत्येक रोग्याच्या अवयवागणिक होतकरू डॉक्टर रोगांची चिकित्सा करण्यास जमत. टिळकांची परीक्षा कसून जोरांत चालू झाली. आमचें घर म्हणजे आतां रोगांचें माहेरघर बनलें होतें. सून अशक्त, मुलगा बिछान्यावर पडून, मीं मुंबईस पाय ठेवतांच पथारी धरलेली, चिकीला मुंबईची हवा न मानवल्यामुळें ती कशीतरी दम धरून राहिलेली. देवाच्या कृपेनें बेबी तेवढी बरी होती. जवळ दुसरें कोणी माणूस नव्हतें. बेबी दवाखान्यांतून विचारपूस करून यायची. प्रोफेसर पाटणकर त्या वेळेस मुंबईस होते. ते आपलें काम संभाळून उरला वेळ आम्हांला मदत करण्यास येत. तो मे महिना असल्यानें उन्हाळा घालविण्यास पुष्कळ ओळखीचे लोक बाहेरगांवीं गेलेले होते. बाकी आपापल्या कामधंद्यांत ! आमचे व्याही विहीण माथेरानला गेले. आमची सून त्यांची एकुलती एक कन्या, तिची स्थिति ही अशी. तेव्हां साहजिकपणेंच तिलाहि बरोबर न्यावें असें त्यांना वाटत होतें. पण तिचा कांहीं पाय निघेना. ती मुंबईसच राहिली. त्या वेळीं बेबी, बाबू पाटणकर व मनोहरराव उजगरे ह्यांनीं जें कांहीं केलें तें अमोलच होतें. पांच दिवसांनीं बेबीनें मला बळेंच दवाखान्यांत नेलें. तों तेथेंहि टिळक पडल्यापडल्या लिहीत होतेच. ज्ञानोदयांतील लेख व अभंग त्यांनीं मृत्यूशीं झगडत असतां लिहिले.

माझें अखेरचें भाषण व ते शुद्धींत असतांनाची भेट ह्या मुलीमुळेंच झाली.

" मी आतां बरा आहें. लौकरच बरा होईन. काळजी करूं नको. मला माझीं दोन मोठालीं कामें अजून करायचीं आहेत. ख्रिस्तायन व देवाचा दरबार. "

" माझें आवडतें गाणें कोणतें आहे सांग पाहूं ! "

" शत्रु गराडा घालून बसले
बसोत त्यांना कोण पुसे
पिता परात्पर ज्याचा त्याहुन
पर्वतशतही धीर नसे
आकाशाची कुऱ्हाड आली
कुऱ्हाड आली येऊं द्या
पिता परात्पर ज्याचा त्याला
खेळाया होईल सध्यां—
आधी व्याधी उभे पुढें, हें–
— जरामरण पाठीमागें
पिता परात्पर ज्याचा त्याशीं
शक्त न हे लढण्याजोगें "

" १९१९ साल हें लक्षांत ठेवण्यासारखें होणार आहे. "

हा उपदेश मला आहे हें मीं ओळखलें. माझें अंतःकरण भडभडून आल. माझे ओले डोळे त्यांच्या दृष्टीस पडूं नयेत म्हणून मी हळूच बाहेर आलें व मनसोक्त रडलें. त्याच दिवशीं सूनबाई खबरीस गेली. तिला जवळ घेऊन त्यांनीं आशीर्वाद दिला व सांगितलें, कीं तुला आतां मुलगा होणार आहे.

दुसऱ्या दिवशीं मेडिकल कॉलेजामधील दत्तूचा एक विद्यार्थी-मित्र येऊन सांगूं लागला कीं टिळकांना ताप आला आहे. पण काळजीचें कांहीं कारण नाहीं. तोच ताप १०५ पर्यंत चढला. तिसऱ्या दिवशीं बाबू पाटणकर रात्रभर त्यांच्याजवळ बसून राहिला.

शुक्रवार ता. ९ मे १९१९ दुपारीं दोन. वाजतां बेबी जे. जें.त भेटायला गेली. मी व दत्तू निजूनच होतों. दत्तूचें मन त्याला सांगूं लागलें, पपांना भेटायला जावें. तो अजून अंथरुणांतून उठतसुद्धां नव्हता; तरी तो तसाच उठून मजकडे आला व म्हणूं लागला, चल, आपण दोघेजण जाऊन येऊं. पण माझें

धैर्य होईना. शेवटीं आम्ही पायींच निघालों. तो मला व मी त्याला आवरीत चाललों. कसेंतरी करून एकदांचा दवाखाना गांठला. दाराशीं बेबी एका झाडाला टेकून उभी होती. आम्ही तडक त्यांच्या वार्डांत गेलों. त्यांना मॉर्फियाचें इंजेक्शन देण्यांत आलें होतें! जवळच मनोहरराव उजगरे व प. वा. काशिनाथ रघुनाथ मित्र होते. आणखी एकदोघे होते. अखेर टिळकांना आपला मुलगा भेटला. त्यांनीं त्याच्याकडे डोळे भरून पाहिलें. बोलवत नव्हतें, पण त्यांनीं तोंडाकडे बोट दाखविलें. दत्तूनें त्यांच्या तोंडांत चमचाभर पाणी घातलें व त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. ते रोज सकाळीं म्हणत ती भूपाळी मला आठवली.

**ऊठ ऊठ माझ्या जिवा। वंदुनि दिनरजनींच्या धवा**
**आयुर्मार्गीं आक्रम नवा। कर, गौरवा देवाच्या**

बेबी बाहेर उभी होती. तिला येऊन मीं मिठी मारली. "बेबी, तुझी आई गेली, बाप जिवंत आहे असें समज. मी तुला मुळींच कमी पडूं देणार नाहीं. तुझें शिक्षण मी पुरें करीन."

आम्ही दोघी घरीं आलों; थोड्या वेळानें श्री. मित्रांनीं व मनोहरराव उजगऱ्यांनीं दत्तूला घरीं आणून पोंचविलें. चिकी दाराशींच आमची वाट पहात उभी होती. तिनें विचारलें,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वमत
अनुक्रम ............ वि: ..........
नों: दि: ..........

"आजोबा कसे आहेत?"

"आतां बरे आहेत."

"मग मला कां नाहीं नेत त्यांना भेटायला?"

"ते तुला उद्यां भेटतील."

आमच्या घरांत मृत्यूनें पाय टाकल्याचें चिन्ह देखील दिसत नव्हतें. शेजारीं पाजारीं कोणाला कळलें देखील नाहीं. टिळकांच्या इच्छेप्रमाणें येथवर तर पार पडलें. मनोहरराव उजगरे ह्यांच्या मनाला व शरिराला विसांवा मिळाला किंवा नाहीं हें एक देव जाणे. पुढील सर्व व्यवस्था त्यांनीं न सांगतां आपल्या अंगावर घेतली. तारा करणें, टेलिफोन करणें, छापखान्यांत जाणें, वेळ ठरविणें हें सारें सारें त्यांनीं मलेल्यांच्या संमतीनें केलें. टिळकांच्या विलप्रमाणें

सारें करावें अशी महाबळेश्वराहून मिशनरींची तार आली, तेव्हां आम्हांला त्या विलची आठवण झाली. मनोहरराव म्हणाले, काय करायचें ? सारें टिळकांच्या इच्छेप्रमाणें करायचें असें आम्हीं उत्तर दिलें.

ज्या घरांतून सहा महिन्यांपूर्वीं नाताळाचा सण करून टिळक बाहेर पडले होते त्या घरांत ता. १० मेला टिळकांना परत आणण्यांत आलें. चिकीला आतां खरा प्रकार कळला ! पुष्कळ मंडळी बाहेरगांवीं गेली होती तरी वर्तमानपत्रें, तारा, टेलिफोन, ह्यांच्यामुळें नगर, अलिबाग, पुणें, लोणावळें, वगैरे ठिकाणांहून लोक जमा झाले. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें काळा रंग अजिबात वर्ज्य केला होता व काळ्या किंवा पांढऱ्या गाडीचा प्रश्नच आला नाहीं; कारण त्यांची पेटी हातोहातीं उचलून नेण्याचें मंडळीनें ठरविलें.

भायखळ्याचें उपासनामंदिर मंडळीनें गच्च भरून गेलें. त्यांत हिंदूहि होते व ख्रिस्तीहि होते. मी रडत नव्हतें तरी भानावर नव्हतें. उपासना झाल्यावर मंडळीनें भजन करीत करीत ती पेटी वरळीला दहनभूमीकडे नेली व दुसऱ्या दिवशीं एका लहानशा पेटींत अस्थि गोळा करून आणल्या.

भजनी मंडळीनें प्रेतयात्रेंत म्हणण्यासाठीं निवडलेलें भजन टिळकांचेंच होतें व त्यांचे सूर व शब्द आज सोळा वर्षें झालीं आहेत तरी माझ्या कानांत तसेच घुमत आहेत असें वाटतें. तें भजन हें —

**भय काय तया प्रभु ज्याचा रे — ध्रु०**

**सर्व विसरली प्रभुमय झाली पूर्ण जयाची वाचा रे – १**
**जगांत विचरे उपकारास्तव परि नच तो जगताचा रे – २**
**येथें निर्धन परत्र ज्याचा सर्व धनाचा सांचा रे – ३**
**देह तयाचा परंतु आत्मा त्यांत वसे ख्रिस्ताचा रे – ४**
**आधिव्याधी मरणावरती पाय अशा पुरुषाचा रे – ५**

# श्रीमती

टिळकांच्या अस्थी पेटींत जातांच माझें अस्तित्व जाणवूं लागलें. दुसऱ्याच दिवसापासून मला पुष्कळशीं समाधानाचीं पत्रें येऊं लागलीं. त्या पत्रावर माझ्या नांवामागचें नेहमींचें परिचयाचें सौ. हें अक्षर जाऊन त्या जागीं श्रीमती हीं अक्षरें आलेलीं पाहून माझें मन व्यग्र होऊन जाई. श्रीमती नांव जरी मोठें सन्मानाचें असलें तरी मला तें मोठें अशुभ वाटे. टिळकांच्या धर्मांतरानें प्रथम आमचा वियोग झाला तेव्हां ज्या सखीनें मला सोबत केली तीच आतां पुन्हां माझ्या साहाय्याला धावून आली. ती माझी सखी म्हणजे कविता. टिळकांच्या नंतर लिहिलेली माझी पहिलीच कविता 'श्रीमती' ही होय. नंतर तीन महिन्यांनीं माझ्या नातवास पाहून पुन्हा मीं कविता लिहिली. टिळकांच्या मागें मीं रचलेली ही दुसरी कविता. मुलें म्हणूं लागलीं, "आई, बरें केलेंस कविता केलीस. आतां तर लोकांना म्हणतां येणार नाहीं ना कीं तुला पपाच कविता करून देत होते म्हणून?" मी म्हणालें, "अरे, लोक म्हणतील त्यांनीं हे सारे प्रसंग कल्पून आधींच कशावरून नसतील ह्या कविता रचून ठेवल्या?"

मुंबईस मिशनमध्यें मलाहि काम मिळतें आहे असें कळलें. मला कोणतें काम मिळणार? असेल भजन कीर्तनाचें, असें मला वाटलें! परंतु तें भजन-कीर्तनाचें काम नव्हतें. 'श्रीमती' ला साजेल असें काम माझ्यापुढें वाढून ठेवलें होतें! काम मेट्रनचें होतें! बहुतकरून हें काम करणाऱ्या 'श्रीमती' च

असतात. दरमहा पंचेचाळीस रुपये पगार व राहाण्यास ऐसपैस जागा. दत्तूलाहि ऐसपैस जागा. दत्तूलाहि तेथें राहातां येणार! मग माझ्या आनंदाला काय विचारतां?

टिळक गेले तरी मुलगा, सून व मुलगी जवळ राहाणार म्हणूनच मला फार समाधान झालें पण 'घी देखा लेकीन बडगा नहीं देखा!'

मीं बिगारी इयत्तेंत पाऊल टाकलें. श्रीमती झालें असल्यामुळें ह्या इयत्तेला 'श्री' पासून आरंभ केला म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां माझ्यापुढें पाटी आली. भाकरीची पाटी, भाजीची पाटी, बाजाराची पाटी, धोब्याची पाटी, दळणाची पाटी, लिहिण्याची पाटी, कचऱ्याची पाटी, अशा नानाविध पाट्या माझ्यापुढें आल्या. मुलांच्या लहानपणीं मीच त्यांची शिक्षक होतें. पण आतां तीं माझीं शिक्षक झालीं. बाजाराचा हिशेब इंग्रजींत तपासावा लागे. तेव्हां मुलांनीं मला एक युक्ति सांगून ठेवली होती. त्यांनीं मला इंग्रजी आंकडे शिकवून ठेवले होते व शब्दाचें पहिलें अक्षर पाहून व माल पाहून सह्या करण्याचें तंत्र मला सांगितलें होतें, C = खोबरें. S = साखर. P = बटाटे. T = चहा अशा रीतीनें मी हिशेब पाहीं.

वयाच्या अकराव्या वर्षापासून म्हणजे अगदीं बालपणापासून माझें आयुष्य एकसारखें टिळकांच्या बरोबर व बरोबरीनें चाललें होतें. मधें पांच वर्षें आम्ही विभक्त होतों पण त्या पांच वर्षांत टिळक एकहि क्षण माझ्या पुढून हालले नाहींत, कीं मी त्यांच्यापुढून हाललें नाहीं. मी जी आहें ती केवळ टिळकांच्या-मुळें. टिळकांनीं आपलीं ध्येयें ठरवावीं, मी डोळे झाकून तीं आचरणांत आणावीं. त्यांनीं कविता रचाव्या, मीं त्या गाव्या. त्यांनीं भीक मागावी व मी त्यांची झोळी धरून चालावें. आमच्यामध्यें जे खटके उडत ते जेव्हां जेव्हां मला त्यांच्या प्रगतीचा वेग सहन होत नसे तेव्हां तेव्हां. डेक्कन क्वीनच्या मागें एखादा खटारा बांधला व ती आपल्या पूर्ण वेगांत निघाली म्हणजे त्या खटाऱ्याची जी आदळ आपट होईल ती माझी होत असे. त्यांचा वेग मला मानवेल इतपत असला व मला त्यांचीं ध्येयें

पटवून घेण्यास अवसर मिळाला कीं मग मात्र आमचें गाडें सुरळीत चालें. एंजिनच्या अंगीं असलेली स्वयंशक्ति ती टिळकांच्या अंगीं असे. एकदां रुळावर माझी गाडी लागली कीं मात्र ती कोणाला थांबवितां यायची नाहीं.

पण आतां माझा सूत्रधार गेला. नवीनच जग माझ्याभोंवतीं उत्पन्न झालें. नवीनच आयुष्याला सुरुवात झाली.

माझ्या शिक्षणाला व मनाला न झेपणारें हें काम होतें.

मडमसाहेब रोज दोन वेळेस येत. त्या कां येतात हें मला समजेना. अशा तऱ्हेचें काम करण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. पण मुलींकडूनच मला कळलें कीं मेट्रननें रोज दोन वेळेस तरी मडमसाहेबांच्या कानाशीं लागावें असा शिरस्ता आहे. ह्या कानगोष्टी म्हणजे अमकीला चोरून पत्र आलें, तमकीनें डोळा वाकडा केला, ती उद्धटपणें बोलली, ही तिच्याशीं बोलत होती. मग कानगोष्टी झाल्यावर त्या त्या अपराधाच्या मगदुराप्रमाणें तशा तशा शिक्षा व्हायच्या.

साऱ्याच मुली चांगल्या कशा असणार? अडीचशें ठिकाणच्या अडीचशें मुली. एका गांवांतील, एका घरांतील, एका आईबापांचीं मुलें असलीं तरी त्यांच्यांत सुद्धां किती भिन्नपणा आढळून येतो व त्यांतच तर मजा आहे. नाहींतर साऱ्याच पुणेरी बाहुल्या असून उपयोग काय? वाईट नसतें तर चांगलें कळलें नसतें.

मीं साऱ्या आयुष्यांत कोणाच्या चहाड्या केलेल्या नाहींत कीं कोणाची हांजी हांजी केलेली नाहीं. सरळपणा नि मोकळेपणा हा आमचा विशेष. पण ते येथें दुर्गुण समजले जात होते आणि त्यामुळें दोन तीन वर्षांत आम्ही येथें अगदीं नकोसे झालों. पण आम्हांला काढायचें कसें हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढें येऊन पडला.

* * *

येथें माझ्या आयुष्यांतील एक अत्यंत कठिण प्रसंग येऊन गेला.

अलीकडे आमच्या मडमसाहेबांना व त्यांच्या पतींना पोहण्याचा बराच

नाद लागला होता. ' आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ तयांलागीं.' त्यांनीं मुलींनाहि पोहण्यास नेण्यास सुरुवात केली. आज शाळेलाहि सुट्टी होती व मनांतहि हौस होती. तेव्हां मुलींना घेऊनच पोहण्यास जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

साहेबांनीं पोहण्यासाठीं आधींच निवान्त व निर्जन अशी जागा ठरवून ठेवली होती. मुली, मास्तरणी, मी वगैरे सर्वांनीं जमून निघायचें असें आदल्या रात्रींच ठरलें होतें. सर्वजणींनीं पहांटेंच उठून आपापलीं कामें उरकून घेतलीं. मोठाल्या माणसांना सुद्धां अशा वेळेस कांहीं सुचत नाहीं. मग लहान लहान मुलींचा उत्साह तो काय विचारावा ? आज त्यांच्या आनंदाला भरती आली होती. दोन दोन घांस खाऊन जिनें तिनें सर्व कांहीं व्यवस्था बिनबोभाट करून सहाला सर्वजणी तयार होऊन उभ्या राहिल्या. रात्रींच सर्वजणींनीं आपापले दागिने काढून मजजवळ ठेवले होते. दागिने ते काय असणार ? पण होतें तें किडुक मिडुक मिळून बरेंच झालें.

साहेब मोटारीनें माहीमपर्यंत गेले. मडमसाहेब आमच्याबरोबर आगगाडीनें आल्या. त्या माहीमास उतरून साहेबांबरोबर पुढें गेल्या. आम्ही चालत गेलों.

स्टेशनवर उतरतांच आम्हांला एका मुलीचे वडील भेटले. आमच्याबरोबर ते बरेच बोलले. ती त्यांची एकुलती एक मुलगी होती. तशीं त्यांना मुलें बरींच होतीं. पण ही शेवटचीच व सर्वांच्या पाठीवर पाय देऊन आलेली होती. ती फार बुद्धिमान व हुशार असल्यामुळें सर्वांना हवीहवीशी वाटे.

मीं आजपर्यंत अधिकाराचीं कामें कधीं केलीं नसल्यानें अधिकार कसा तो मला कधींच गाजवितां आला नाहीं. मुली व मी नातेवाईकांप्रमाणें वागत होतों. एखादी काकी, मावशी किंवा आजी असावी तशा त्या माझ्याशीं वागत व मी त्यांच्याशीं वागें. मात्र कोरडीच हो.

आम्ही सर्वजणी खेळीमेळीनें चाललों होतों. सर्वजणी माझीच थट्टा करून बोलत होत्या. कोणी म्हणे,

" पाहूं आजी कशा धावतात. "

" अग त्यांना चांगलें झरझर चालतांहि येत नाहीं नि धावताहेत कसच्या ? "

" आजी पडल्या तर ग ? "

" तर मी त्यांना उचलून घेईन. "

" तुला एकटीला नाहीं उचलली तर ? "

" अग चार माणसं आणून आजीला उचलून नेऊं. "

" नाहींतर डोली करून नेऊं. "

" अन् जखमी झाली तर ? "

" पट्ट्या बांधूं. "

" अन् बुडाली तर ? "

" पाण्यांतून काढूं. "

" अन् मेली तर ? "

" आपण रडूं. "

" अग नका ग आजीला असं बोलूं. "

" बायांनो, मला बोला पण तुम्ही सुखरूप असा. बोलतांना नेहमीं सुधें बोलावें. व्हायचें तें होतेंच. "

आम्ही सरासरीं साडेदहाला जुहूला पोंचलों. सामानसुमान लावलें. कोणी आपल्या सतरंज्या हंथरल्या. कोणी लोळूं लागल्या, कोणी वाचीत बसल्या. कोणी इकडे तिकडे बागडूं लागल्या. पोर व ढोर सारखेंच. ढोराला चारा असला कीं चाललेंच तें पुढें पुढें. पोराला गंमत दिसली कीं लागलेंच तें तिच्या मागें मागें.

मडमसाहेब म्हणाल्या, " असलें ठिकाण कधींच मिळालें नाहीं व पुढेंहि मिळणार नाहीं. हें फारच आठवणीजोगें आहे. "

त्यांचें हें भाकीतच ठरलें.

मी गोदातटींची, माझी व सागराची जानपछान नव्हती. तशी नुसती नजरभेट झालेली होती इतकेंच.

निघतांना बऱ्याच जणांनीं मोडा घातला होता कीं, " आज नागपंचमी

आहे. तेव्हां भरतीच्या वेळेस तुम्ही जाऊं नका." पण आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना भरती दोनला येणार असें कोणीं सांगितलें होतें व त्यावरच ते अवलंबून होते.

आम्ही गेलों तेव्हां पाणी कोठेंच नव्हतें. मला गंगेचें पाणी पाहण्याची संवय. तेव्हां हें सारें उघडें वाळवंट पाहून मला नवल वाटलें. मी म्हणे, "येथें घोटा भिजण्याची मारामार. येथें ह्या पोहणार कशा?"

मुली म्हणाल्या, "आतां भुका लागल्या आम्हांला, कांहीं तरी खायला द्या." आपल्या देशाची रीत कीं भुकेचें नांव काढल्यावर खाल्ल्यावांचून जाऊं द्यायचें नाहीं. तर जेवल्यावर आंघोळ करायची नाहीं अशी पाश्चात्य रीत. येथें माझा व मडमसाहेबांचा मतभेद होऊन त्यांनीं आधीं आंघोळ व मग जेवण असें फर्माविलें.

एकीमागें एक अशा सर्वच मुली निघाल्या. कांहीं मोठ्या व मध्यम मुली शिंपा वेचीत वेचीत आमच्यापासून बऱ्याच दूर गेल्या. कांहीं मुली पोहायला शिकण्याजोग्या मडमसाहेबांजवळ होत्या व तीस चाळीस लहान लहान मुली माझ्याजवळ होत्या. दत्तू, बेबी आलीं नाहींत म्हणून मला वाईट वाटत होतें. ह्या मुलींत एक लहानसा डे स्कॉलर मुलगाहि आला होता. तो आपल्या आईबापांचा एकुलता एक मुलगा होता. आंधळ्यांची शाळाहि आली होती.

अकराचा सुमार. पाणी येऊं लागलें. पाणी फारच संथ होतें; आत्तांशा कोठें घोट्याचें पाणी गुडघ्याला लागूं लागलें. पाणी गढूळ व गरम होतें. माझें डोकें सुपीकच. मला वाटलें आतां बाराचा सुमार झाला आहे तेव्हां सर्व गिरण्या सुटल्या असतील व त्यांचें हें सोडलेलें गरम पाणी असेल. आतां पायांखालची वाळू सरकूं लागली तोंच एक आरोळी ऐकूं आली. "भरती आली, बाहेर व्हा." जवळ नाहीं माणूस, हातांत नाहीं काठी. पायांजवळ नाहीं दगड. मोकळें मैदान. कोणाचा शब्द कोणाला ऐकूं येईना. मडम पोहण्याच्या नादांत. मुली शिंपांच्या नादांत. मडम म्हणाली होती कीं हीच मुलींना पोहण्यास योग्य जागा आहे. कारण येथें पांखराचा वारा नाहीं, कीं माणसाचा वारा नाहीं. मला

त्या बोलण्याचा अनुभव आला. एवढी बारा कोसांची मुंबई, माणसांनीं गजबजलेली पण तेथें चिटपांखरूं नसावें. घोट्याचें पाणी गुडघ्याला लागलें, गुडघ्याचें कमरेला लागलें, पण अगदीं संथ. कमरेला पाणी लागूं लागलें, तें माझ्या बरोबरीच्या लहान लहान मुलींच्या गळ्याशीं आलें. पाणी संथ असल्यानें व त्या परिस्थितीच्या भयानकपणाची जाणीव मला नसल्यानें मला माझ्याजवळच्या सर्व मुली पाण्यांतून काढतां आल्या. कोणाचे केस तर कोणाचें खवाटें, कोणाचीं ज्याकिटें, तर कोणाचीं मनगटें धरून मी त्या मुली भराभर पाण्याच्या बाहेर काढल्या. तोंच कोळी लोक आपल्या होड्या घेऊन आले. त्यांनीं आंधळ्यांच्या शाळेंतील एक बुडणारा मुलगा काढला. त्यांची शाळा आमच्यापासून बऱ्याच अंतरावर उतरली होती.

आमच्याकडे सर्व स्त्रीराज्यच होतें. माझ्याभोंवतीं सर्व लहान लहान मुली होत्या; पण त्यांत वीरस्वामी नांवाची एकच मुलगी मोठी होती. ती अशक्त व आजारी म्हणून मागें राहिली होती. माझ्या बरोबरीच्या मुली पाण्यांतून काढून त्यांना हुर्र हुर्र करीत कशी तरी हाकीत त्या मोठ्या मुलीजवळ घेऊन गेलें. ती तेथें पडलेल्या सामानाजवळ बसली होती.

ह्या मुली भोरड्याप्रमाणें इकडून तिकडे सैरावैरा धावूं लागल्या. शिपांच्या मागें गेलेल्या मुलींचे चेहरे अंधुक दिसत होते. कोणी वर हात करून आपल्याकडे बोलावीत, कोणी उंच दगडावर चढून बसत, पण कोणाचे आवाज ऐकूं येत ना. आतां मात्र समुद्रानें उग्र स्वरूप धारण केलें. कोळी पांचशें रुपये मागूं लागले. मी त्यांना म्हणालें, “पांचशें रुपये देतें पण मुली पाण्यांतून काढा.” ते म्हणत, “आधीं पैसे द्या.” कारण माझ्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवतो? एक नूर आदमी व दस नूर कपडा. मी नेहमींचीच लंकेची पार्वती. माझे कपडे चांगले नसले तरी मजजवळ त्या वेळेस विम्याचे अडीच हजार रुपये आलेले होते. माझी खात्री होती कीं मीं ते सारे पैसे देऊन टाकले असते तरी टिळकांनीं मला कधीं मना केलें नसतें व दत्तूहि नाहीं म्हणणार नाहीं. पण त्या कोळयांना पैशांचें वचन हवें होतें मडमसाहेबांकडून आणि मडमसाहेब

जवळच्या मुली काढून साहेबांना टेलिफोन करण्यास गेल्या होत्या. साहेब परत गेले होते व थोड्या वेळानें येणार होते.

हा सर्व खेळ साडेअकरापर्यंत चालला. दोनाची भरती साडेदहाला आली ! बाराला मुली किनाऱ्याला लागल्या. नाशिक पंचवटीप्रमाणें हें असेल. मुलींना दुसऱ्या तीरावर कोणी धरील. मग आपण त्यांना चांगली शिक्षा करूं असें मी म्हणत होतें.

पण समुद्राला त्या मुली पचविणें अशक्य झालें. त्यानें ताबडतोब स्वतः होऊनच त्या किनाऱ्याला आणून टाकल्या.

साडेबारा झाले. सकाळपासून सगळे उपाशी. लहान लहान मुली कळो कळो भुकेनें व्याकूळ झाल्या. साहेब आले. त्यांनीं आपली शिदोरी सोडली व पाण्याला आधार केला. तोंच आसपासच्या बंगल्यांतून लोक हळूहळू जमून आमच्या-भोवतीं कडें गरून उभे राहिले व आम्हांला प्रश्न विचारूं लागले, " मुली होत्या किती ? बुडाल्या किती ? त्यांना कोण कोण आहे ? का साऱ्याच ऑर्फन ? तुम्ही आज आलांत हेंच मुळीं चुकलें. आज धादान्त नागपंचमी. देवाला हें रुचणार कसें ? आणि तुम्ही खात तरी कसे बसलां आहां ? "

शेवटलें वाक्य ऐकतांच बिचाऱ्या साहेबमडमेनें आपल्या तोंडांतले घास तसेच टाकले.

माझा पदर बांधलेलाच होता. मी त्या कड्यांत उभी राहून कमरेवर हात देऊन एक खणखणीत व्याख्यान दिलें.

" ह्यांत तुम्ही आम्हांला एक बोट तरी लावतां आहां का ? तुम्ही सर्व नुसता तमाशा पाहायला जमलां आहां. चला सारे बाजूला व्हा. आमचें आम्हांलाच ओझें वाहिलें पाहिजे. "

आतां तें कडें फुटलें व सर्व पांगापांग झाली. पहिली जी मुलगी आली ती इंग्रजी सहावींतली. ह्या मुलीचा जन्म माझ्याच हातचा. हिला मींच न्हाऊं घातलेलें. तिची आई बाळपणींच वारलेली. त्यानंतर तिच्या बापानें व बहिणीनें तिला जतन केलेलें. काल तिचा वाढदिवस होता. काल मीं तिच्या डोक्यांत

फुलांची वेणी घातली होती ती अजून तशीच तिच्या डोक्यांत! तिच्या हातांतील बांगड्या तीन दिवसांपूर्वी मींच भरल्या होत्या.

एका मागें एक अशा अकरा मुली व बारावा मुलगा—बाहेर आलीं!

हें सारें खरें का स्वप्न? मी हाताला चिमटा घेऊन पाहिला. स्वप्न नव्हतें. एक खटारा भरून त्यांत ह्या मोळ्या टाकल्या व जे. जें.त पाठविल्या. माझी अक्कल माझ्याचपुरती. मला वाटलें कीं ह्यांना कुंभाराच्या चाकावर घालून पोटांतलें पाणी काढतील आणि त्या बऱ्या होतील. साहेबांना विचारलें, 'ह्या बऱ्या होतील?' त्यांनीं म्हटलें, 'होतील.' एक गाडी भरून चार पांच मुली उरल्या. त्या साहेबांनीं आपल्या मोटारींत भरल्या. मला ते म्हणाले, 'आजी, आतां तुम्ही थकलां असाल. मोटारमध्यें या.' मी म्हणालें, 'मी बसणार नाहीं. ज्यांच्या जिवावर मी पोट भरतें आहें त्या दुःखांत पायीं आणि मी मोटारमध्यें? मला हें पसंत नाहीं.' पुढें पोलिसांनीं मोटर अडवली. साहेब असो नाहींतर राजा असो, त्यांना काय? तेथून साहेब सहीसलामत सुटून पुढें गेले. आम्ही सारीं पायदळच परत आलों. पण येतांनाच तो हुरूप, तो उल्हास, तो आनंद हें आतां चटसारें नाहींसें झालें होतें. त्यांची जागा आतां भेसूर अंधःकारानें व्यापिली होती. पायांचा गळाठा, उरांत धडधड, मनांत चिंता! आतां आमचे पाय मात्र चालत होते. तोंड उघडून बोलण्याची इच्छा होत नव्हती. साऱ्या वाटेनें त्या मुली दिसत होत्या. अमकी असें बोलली, तमकीनें तिला तसें उत्तर दिलें, एक ना दोन. वैऱ्यावर असा प्रसंग येऊं नये.

आम्ही स्टेशनवर आलों. पुन्हां तीच व्यक्ति. त्यानें विचारलें, 'माझी मुलगी कुठें आहे?' आम्ही स्टेशनवर पोचण्याच्या आधींच टेलिफोननें जिकडे तिकडे ही अशुभ वार्ता पसरली होती.

तो जिला तिला विचारी. सर्वजणांनीं माझ्याकडे बोट दाखविलें. मी वरिष्ठ. त्या आपल्या मोकळ्या झाल्या. माझ्या पोटांत मोठी धोंड उभी राहिली.

"कां बाई? बोलत नाहीं? काय झालं? माझी मुलगी कुठेंच दिसत नाहीं! सांगा! चोरून नका ठेवूं."

मी काय बोलणार ? आपला केवढाहि वैरी असला तरी त्यालाहि असली अशुभ वार्ता सांगण्यास धीर होणार नाहीं. प्रिय वाचकहो, माझ्यावर केवढें हें मोठें संकट आलें होतें. खरें बोलूं का खोटें हेंच मला कळेना. खरें बोललें तरीहि पाप आणि खोटें बोललें तरीहि पाप. जें आहे तें पुढें येणारच. मीं सांगितलें, मला कांहीं बरोबर माहीत नाहीं. कदाचित् ती मागें असेल. कदाचित् पुढेंहि गेली असेल.

आम्ही कशी तरी गाडी गांठली.

सात वाजतां आम्ही आपल्या व साहेब आपल्या ठिकाणीं पोंचलों.

बंगल्यावरून साहेबांचा निरोप आला कीं फाटक बंद करा. कोणाला आंत येऊं देऊं नका व परवानगीवांचून कोणा मुलीला जाऊं देऊं नका.

डॉ. गुरुबाई करमरकर व मि. ब्युएल भेटून गेलीं. माझे व्याही व विहीण येऊन गेलीं. कांहीं म्हणाले, बरें झालें हें अधिकाऱ्यांच्या समक्ष झालें.

आम्ही हुकमाचे बंदे गुलाम ! आम्हीं फाटक बंद केलें. चौकीवर जहागीरदार मांडा ठोकून बसले. जहागीरदाराच्या हातांत एक सोटा होता. त्याची जात मुसलमान आहे. ह्या गृहस्थानें चाळीस वर्षें ह्या ठिकाणीं इमानेंइतबारें चौकीदाराचें काम केलें आहे. गेटच्या बाहेरच्या बाजूनें लोकांची झुंबड उठलेली. बाहेर काव्यांचे आवाज एकसारखे होत होते. भिंतीवरून दगडांचा वर्षाव होत होता. जो तो म्हणे, दार उघडा, नाहीं तर आम्हीं तें मोडूं. मग काय होईल तें सांगवत नाहीं. मेलों तरी बेहत्तर. सरकार कांहीं कुठें गेलें नाहीं. आमच्या मुली आम्हांला दाखवा नाहीं तर खून पडतील.

घरांत चहुंकडे रडारड व बाहेर हें काहूर. दे माय धरणी ठाय, असें होऊन गेलें. पृथ्वी दुभंग होऊन आतां पोटांत घेईल तर बरें होईल असें वाटूं लागलें. आंतमध्यें धीर देणारे तिघेच पुरुष. दत्तू, नारायणराव व जहागीरदार. कामदारणी बायांपैकीं एकीची गेलेली बहीण, तर एकीची मानलेली मुलगी. तेव्हां त्या आपापल्याच दुःखांत चूर. घरांत अन्न पुष्कळ होतें पण तें घेण्यास कोणाचा हात उचलेना व खाण्यास तोंड उघडेना. जागोजागीं

मोटकुळीं पडल्याप्रमाणें मोठाल्या मुली पडल्या होत्या व लहान मुली मास्तरणींच्या आश्रयाला पडल्या होत्या. मोठीं माणसेंहि असल्या हलकल्लोळांत गांगरतात तर त्यांची बिचाऱ्यांची काय कथा ?

रडारड, आरडाओरडा हीं चाललींच होतीं. मी फाटकापाशीं गेलें व मोठ्यानें ओरडून बाहेरच्या माणसांना सांगितलें —

" मी दार उघडतें, तुम्ही माझें हवें तें करा. मी भीत नाहीं. पण तुम्ही असा दंगा करूं नका. मला कोणाच्याच मुली ओळखून दाखवितां येणार नाहींत. पण मी चोहोंकडची पॉवर उघडतें. तुम्ही आंत येऊन आपापल्या मुली ओळखा. "

इतकें बोलून मीं कुलूप काढलें. घो घों घों घों माणसें आंत शिरलीं. जितक्यांच्या मुली होत्या तितक्यांचे नातलग आले. त्यांच्याबरोबर माझाहि तपास करण्यास एक बाई आली.

प्रत्येकानें मला व माझ्या अधिकाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली. कित्येकांनीं आपल्या मुली त्याच वेळीं नेल्या. मीं म्हणालें,

" अधिकाऱ्यांचा हुकूम नाहीं. तुम्ही त्यांना विचारून मुली न्या. "

" आम्ही तुला आणि तुझ्या त्या अधिकाऱ्याला भीक घालीत नाहीं. तुम्ही आपल्या अधिकारावर घासलेट ओता आणि काडी लावा. एवढ्या मुली मेल्या आणि तुम्ही ग कशा वांचलांत ? "

ती रात्र म्हणजे वैऱ्याचीच, दत्तू, मी व नारायणराव रात्रभर उभेचे उभेच, बाहेर जहागीरदार उभा. मुंबई व आसपासचीं गांवें इकडून माणसें मुलींच्या तपासाला येऊं लागलीं. लहान मुली घाबरून गेलेल्या. कोणी पहिल्याच आजारी, तर कोणी आजारी झालेल्या अशा एक ना दोन, कितीतरी भानगडी. कोणाला चहा, तर कोणाला कॉफी, कोणाला सोडा तर कोणाला मोहोऱ्या, शेंगड्या, गरम पाणी, रोटी, लोणी काय लागेल त्याचा नियम नव्हता. माडीवरून खालीं व खालून वर. पुन्हा पाहुण्यांची मनधरणी. कोणाचें समाधान करणें, कोणाला धीर देणें, कोणाला बाबापुता म्हणून परत लावणें. एका रात्रींत

माझे वीस पंचवीस रुपये. वरच्या वर खर्च होऊन गेले. पुन्हा पोटांत धडकी. लहान मुली राहून राहून मोठ्यानें ओरडत,

" आजी चमिंद्र, चमिंद्र. "

. तेथें श्रीधरराव गायकवाड मॅनेजर होते. एखाद्या लग्नाच्या वेळेस वडील माणसास विचारावें कीं मुलीला अमके अमके मागताहेत द्यायची का तेथें ? त्याप्रमाणें मला वडीलकीचा मान द्यायला ते आले. पेट्या किती लागतील, त्यांची लांबी, रुंदी, उंची किती धरावी वगैरे. मला तरी काय दगड कळत होतें. मी नुसती होस हो करीत होतें.

सकाळींच साहेब आले.

" आजीबाई, तुम्ही मुली ओळखाल का ? "

" हो. "

" त्यांचीं नांवें सांगाल का ? "

" हो. पण कोणापुढें ? "

पण माझ्या प्रश्नाचें कांहीं उत्तर न देतां साहेब निघून गेले. पण माझ्या उरांत धडकी भरली. डोक्यांत चक्र सुरू झालें. आतां जर कां नांवें बरोबर न सांगितलीं तर काय होईल? पहिल्यांदा साहेबच माझ्याबरोबर होते. त्यांनींच मला नांवें सांगितलीं. मला एकहि मुलगी ओळखूं आली नाहीं मग नांवें कसलीं मी सांगणार ? पण नांवें सांगण्याचा प्रसंगच आला नाहीं.

माझ्या जीवानें सर्व अनुभव घेतले आहेत. पण अद्याप कधीं कोर्टाची पायरी चढण्याचा मजवर प्रसंग आला नव्हता. पण अकराच्या सुमारास कोर्टाची व टिळक गेल्यानंतर पहिनदांच जे. जे. ची पायरी चढलें. तेथें लोकगंगेला भरती आलेली होती. दाराशीं मोटारी व बग्या ह्यांची गर्दी उसळली होती. सायकलीहि असंख्य होत्या व पायदळांची तर कांहीं गणतीच नव्हती.

मला कोणी आळशी म्हणा किंवा गचाळ म्हणा, पण माझ्या अंगावर समुद्रावर अंग धुतांना जें लुगडें होतें तेंच अजून होतें. माझा त्या वेळेस जसा पदर बांधलेला होता तसाच अजून होता. तें लुगडें तसेंच ओलें अंगावर वाळलें

होतें. माझ्या शरिराचें घुसळण चालूंच होतें. आधींच माझी मान हालते त्यांत हें वारें. मग काय ? सारेंच शरीर ताजाचा कळस बनलें. मी टांग्यांतून उतरलें व चिक्कीच्या बापानें मला उचलून आंत ज्यूरीपुढें उभें केलें. त्या गर्दींत मला माझ्या जीवाभावाची एक व्यक्ति दिसली ती म्हणजे डॉ. गुरुबाई करमरकर. त्यांच्याजवळ मी जाऊन बसलें. माझें नांव पुकारतांच ही थरथरणारी मैना पिंजऱ्यांत अडकली. आतां जबानीला सुरवात झाली. तेंच लुगडें व तोच पदर. दोन्ही हात कठड्यावर टेकलेले. जणूं काय लक्ष्मुबाई डेराच घुसळण्यास उभ्या आहेत. सर्व अंग हालतें आहे. पाठीवर मोकळे केस लोळत आहेत. पुढें कठड्यावर मान आपटत आहे. आतां ऊद कापराचाच उशीर, कीं हें वारें लागणार बोलायला. जबानीला सुरुवात झाली, पण त्या थाटांत तोंडांतून शब्दच निघेना.

इतक्यांत डॉ. गुरुबाई उभ्या राहिल्या. त्या म्हणाल्या, " मला ज्यूरीला एक विनंति करायची आहे. कृपा करून मला ह्या बाईच्या पाठीमागें उभी राहूं द्या. मी तिला कोणतीच सूचना करणार नाहीं. पण मागें उभें राहून तिची मान धरली तर ती बोलेल. " त्याप्रमाणें त्यांना परवानगी मिळून त्यांनीं माझी पाठराखण केली.

पुढें पाहातें तों रावबहादुर आठवले ! मला थोडा धीर आला. आमचीं प्रश्नोत्तरें येणेंप्रमाणें झालीं —

" तुम्ही गेलांत तेव्हां पाणी किती होतें ?

" मुळींच नव्हतें. "

" मुलांजवळ कोण कोण होतें ? "

" आम्ही दोघी. "

" तुम्ही कशा बुडालां नाहीं ? "

" तें मी काय सांगूं ?

" पाणी कोणीकडून आलें व कोणीकडे गेलें ? "

" मला भूगोल येत नाहीं, पण डावीकडून आलें व उजवीकडे गेलें. "

झाली माझी जबानी. मुलींचे पुढील सोहोळे पाहण्यास मी गेलें नाहीं. जे.

जें.तील देखावा वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. आयाबहिणी दगडाच्या जमिनीवर धडाधड अंग टाकीत होत्या. नको ती आठवणसुद्धां असह्य होते.

*　　　*　　　*

आमच्या घरीं सुरू झालेल्या ह्या मृत्युसत्रांतील पहिली आहुती ठोंबऱ्यांची. नंतर टिळक. त्यांच्यानंतर लागोपाठच माझे वडील बंधु केशवरावमामा. आम्ही बोर्डिंगमध्यें येऊन स्थिरस्थावर होतों न होतों तों केशवरावमामांची अशुभ बातमी कानीं पडली. त्यानंतर आमची चिकी, मग भाऊजी, मग माझ्या व्याह्यांची बहीण, मग ज्यांना मी मुली नाती समजत होतें त्या अकरा मुली, मनोरंजन मासिकाचे रा. मित्र, रेंदाळकर कवि, काकासाहेब मिरीकर, पंडिता रमाबाई, माझे व्याही – अशीं एकंदर वीसबावीस माणसें त्या वीसबावीस महिन्यांत काळानें हिरावून नेलीं. मृत्युच्छायेच्या खिंडींतून आम्ही चाललों होतों. मधल्यामधें कोण उचललें जाईल ह्याचा नियम नव्हता.

टिळक जाण्याच्या आधींपासून चिकीला फारसें बरें नव्हतें. पण त्या गडबडींत चिकीकडे फारच दुर्लक्ष झालें व त्याचें मला एकसारखें वाईट वाटतें. माझ्यामागें काम धावत होतें व पुढें पोट धावत होतें. दिवाळीच्या सुट्टींत मुली आपापल्या घरीं जाण्यास निघाल्या. आपणहि जावें असें चिकीला वाटूं लागलें. तशी चिकी फार हौशी मुलगी होती. फिरायला जाणें, वनभोजन करणें, चांदण्यांत बसणें, गांवाला जाणें, ह्या साऱ्या गोष्टी तिच्या मनासारख्या तिला कोणी करूं देत नसे. तिच्यासाठीं आणि तेवढ्यांतल्या तेवढ्यांत असल्या धूमधडाक्यांत पैसा व वेळ कोण खर्च करतें ? तिचा बाप इकडे तिकडे कोठें तरी कामाची धरसोड करीत फिरत होता. त्यानें दुसरें लग्न केलें होतें. त्या आईकडे मला पुण्यास पाठीव म्हणून ती एकसारखी माझ्यामागें लागली. ह्या मायलेकींनीं कधीं एकमेकींचीं तोंडेंहि पाहिलीं नव्हतीं. तेव्हां अनायासेंच मुलींची सोबत होती म्हणून मीं तिला पुण्यास पाठविलें, पण तिची चांगलीच हवालपालट झाली. पुण्याहून जी आली ती अधिकच आजारी होऊन. आतां बरीक माझें लक्ष तिच्याकडे गेलें. डॉक्टरांचें औषध तिला सुरू केलें. पण बैल गेला नि झोपा

केला, ह्याप्रमाणें तें झालें. दत्तू बेबी, रूथ, ह्यांनीं तिची बरीच काळजी घेतली, डॉक्टर रोज येत. तशी ती कांहीं निजून नव्हती. एक दिवस ती मला म्हणाली,

"आजी, रोमन कॅथॉलिक लोकांचें मरण किती चांगलें. मेणबत्त्या, उदबत्त्या, तशींच कितीतरी फुलें! मला तसें मरण फार आवडतें."

"चिके, तूं मरूं बिरूं नकोस हं. बघ, तूं मेलीस तर आजोबा तुला चांगला ठोक देतील," बेबी म्हणाली.

"खरं कां ग आजी? स्वर्गांत ते कसे मारतील? ते मारायला लागले तर मी टेबलाखालीं लपेन."

मरायच्या आधीं तिनें फार नाद घेतला कीं, 'आजी, तूं आपल्या हातानें मला न्हाऊं घाल.' मला काम होतें. मी म्हणालें, 'चिके, असें काय करतेस? तुला आत्या घालील न्हायला. नाहीं तर बाई घालील.' पण ती ऐकेना. ती म्हणे, 'आजी, तुला काम असतें ग, पण मला तुझ्याच हातानें न्हाऊं घाल. तुझ्याच हातानें मला आवडतें.' मीं तिला रागारागानें न्हाऊं घातलें.

कामाच्या बाईला तिनें एका बाजूला सांगितलें, 'हें बघ, माझ्या आजीचा बिछाना घालून ठेवीत जा आणि तिचें पाणी पिण्याचें भांडें घासून ठेवीत जा. ती कामामुळें दमून जाते आणि तशीच कांहींतरी खाते पिते नि कशीतरी निजते.'

चिकी फारच काळजी घेत असे माझी. माझीच असें नाहीं. घरांतील सर्वांच्याच ती फार उपयोगी पडे. इतर मुलींच्याहि ती खस्ता खाई. ती फारच प्रेमळ मुलगी होती. लवकरच आपल्या गोड आवाजानें 'आजी, येतें हं. आजी, मी लौकरच येईन...' असें म्हणत म्हणत तिनें प्राण सोडला. तिचे ते शब्द अजून कधीं कधीं माझ्या कानांत घुमतात. त्यामुळें दुःख होतें.

औषधाचें बिल चाळीस रुपये झालें. तें मीं डॉक्टरांना देण्यासाठीं गेलें पण त्यांनीं त्यांतील एका रुपयाला हात लावला नाहीं. ते म्हणाले, 'आई, तुम्हीं तिच्यासाठीं इतकीं वर्षे इतकें केलें. मीं तिला थोडेंसें औषध दिलें त्यांत काय झालें.'

नऊ महिन्यांची संभाळलेली माझी चिकी बारा वर्षें सुख देऊन गेली.

तिच्याबद्दल १५ जुलै, १९२० च्या ज्ञानोदयांत खालीं दिलेला लहानसा मृत्युलेख आला आहे —

" —एका लहान प्रेमळ मुलीला ता. ११ जुलै रोजीं देवाज्ञा झाली. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत ज्या ज्या व्यक्तींचा ह्या बाळाशीं संबंध आला, त्या त्या व्यक्तीला ही बातमी ऐकून चुकल्यासारखें वाटल्यावांचून राहाणार नाहीं. जगाच्या थोड्या दिवसांच्या ह्या मुशाफराचें नांव सुभद्रा रामभाऊ धर्माधिकारी."

* * *

मुंबईस आम्ही जेमतेम दोन वर्षें टिकलों. आम्ही तेथें पचले जात नव्हतों व हें आमच्या लक्षांतहि येत होतें.

पण एकालाहि उघड उघड येऊन बोलण्यास धैर्य होईना. माझ्या प्रकृती-विषयीं आतां सर्वांना एकदम काळजी वाटूं लागली ! तसें माझ्या प्रकृतीला कांहींहि झालें नव्हतें, पण ह्या इतरांच्या काळजीनें मात्र होणार होतें खास ! मला कांहीं होण्याऐवजीं त्यांनाच मात्र आमचा खोकला लागला होता व तो सुंठीवांचून कसा घालवावा ह्याची ज्याला त्याला काळजी वाटायला लागली होती. जो कोणी मला भेटे, तो म्हणे, आजीबाई, तुम्ही हवा बदलण्यास जा.' मी म्हणें, 'झालंय काय मला ? मी जाऊं कशाला ?' मला कांहीं झालें नव्हतें तरी माझा जीव मात्र मला ह्यांच्या काळजीनें नकोसा झाला होता. उघड उघड धडधडीत बोलण्यास कोणाचें भय थोडेंच होतें ? पण हा सुसंस्काराचा परिणाम. डोळा फोडायला नको, काडी मोडायला नको.

कोणी जरा न कळत डोकावलें तरी आमच्या घरीं चोरून लपून कधींच कांहीं होत नसे ; सारें काहीं उघड उघड होत असे. आम्ही बोलत बसलों असतांना आमचीं दारें व खिडक्या सताड उघडीं असत. पडदा-पद्धतीचें आम्हांला नेहमींच वावडें असे. कानोसा घेऊन, चोरून पाहून, कल्पना करून, जेव्हां माझ्यांत लपंडाव दिसून येईना, तेव्हां हें हवा बदलण्याचें बंड उठलें.

ह्याच गडबडींत एक दिवस एका सभ्य स्त्रीनें येऊन आग्रहाचें बोलणें लावलें, 'आजीबाई, तुम्ही खरोखरच कुठें तरी जा. तुम्ही दिसाव्या तशा दिसत नाहीं.'

मी म्हणालें, 'हें पाहा, तुम्हां सर्वांना वाटतें आहे कीं मला तुमचें बोलणें कळत नाहीं. मला सारें कळतें. अलीकडे माझ्या प्रकृतीबद्दल तुम्हा सर्वांनाच एकदम फार काळजी उत्पन्न झाली आहे. पण माझी आतां एवढीच इच्छा आहे कीं हें काम बिनपगारी करावें. दत्तूची टर्म भरेपर्यंत मला राहायला जागा पाहिजे आहे.' सभ्य स्त्री म्हणाली, 'पण बाई येथें मला दवाखाना काढायचा आहे.' मीं म्हटलें, 'काढा दवाखाना. मी हाताची नीट आहें. मी मिठाईचें दुकान काढीन आणि त्यावर माझ्या नांवाची पाटी लावीन.'

कराचीच्या डॉ. ताराबाई ह्याच वेळीं आमच्याकडे परीक्षेसाठीं आल्या होत्या. त्यांची आई मला आपली बहीण मानी व अगदीं बहिणीप्रमाणें वागे. ताराबाई म्हणाल्या,

"मावशी, कराचीला येतां का? मी बेबीला आणि वहिनीला काम लावून देतें. मग भाऊ वकिलीचा अभ्यास करायला मोकळा होईल."

"कराचीच काय, इंग्लंडला सुद्धां जायची माझी तयारी आहे. स्वदेशीं चोरी आणि परदेशीं भीक."

दत्तू पारोळ्यास हवा बदलायला गेला होता. तो तेथें आजारी पडला. पण तो आजारी होता त्याची मला दादच नव्हती. हीं मुलें मला कांहींच सांगत नसत. ताराबाई, पाटणकर, बेबी ह्यांचीं पारोळ्यास तारा नि पत्रें येत जात. फळांचीं पार्सलें जात, पण मला त्याची गंधवार्ताहि नसे. इकडील हकिगतीचीं पत्रें दत्तूला जात.

परीक्षा झाल्यावर ताराबाई कराचीस गेल्या. त्यांनीं तेथें जातांच मुलींच्या कामाची खटपट चालविली. आतां दत्तूला बरें वाटूं लागल्यानें तो सहकुटुंब सहपरिवार परत आला. आतां सर्व एकत्र झालों. काळजी काय ती खाण्याची व नाण्याचीच उरली होती. बाकी आजारविजार कांहींच उरला नव्हता. नाहीं म्हणायला लोकांनीं आणलेला तेवढा आजार होता. पण त्याला डॉक्टर काय करणार?

लौकरच ताराबाईचें पत्र आलें. परीक्षेच्या रिझल्टसारखी आम्ही ह्या पत्राची

वाट पाहात होतों. एकदांचा निकाल लागला. ही परीक्षा म्हणजे आमच्या नशिबाची परीक्षा होती. तींत आम्ही उतरतांच वरचा वर्ग गांठला.

ताराबाईचें पत्र आलें, कीं आमची व्यवस्था झाली. बेबीला पगार १३० रुपये व रूथबाईला पगार १५० रुपये ठरविला आहे. तीस रुपयांचें घरहि पाहून ठेविलें आहे. तरी तावडतोब तारेनें तुमचें म्हणणें कळवा.

कराचीस तार गेली व आमची आवराआवर व बांधाबांध सुरू झाली. तसाच बाजारहाटहि सुरू झाला. दत्तूची राहाण्याची सोय त्याच्या सासूकडे केली.

मीं कामाला लागल्यापासून माझ्या अधिकाऱ्यांना कधीं जेवायला बोलाविलें नव्हतें, कीं कधीं त्यांना कांहीं वाढून पाठविलें नव्हतें. कारण मेट्रनच्या कामांपैकीं हेंहि एक काम असतें असा समज झालेला आहे. वाढून पाठविणें किंवा जेवायला बोलावणें ह्यापेक्षां चोख कामानें आपलें वरिष्ठ अधिकारी आपल्याला संतुष्ट ठेवतां येतात अशी माझी समजूत होती. आतां काम सोडायचें आमचें नक्की ठरलें असल्यानें व सारी सोय व तयारी जय्यत करून ठेवली असल्यानें मी आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना पहिलें व शेवटलें जेवायला बोलावलें. माझ्या स्वभावाच्या विरुद्ध पण दत्तूच्या आग्रहामुळें मी जेवणाचा दिवस काम सोडण्याच्या बरोबर एक महिना आधींचा धरला. जेवण संपेपर्यंत आम्ही कोणी कामाबद्दल कांहीं बोललों नाहीं. सर्व वेळ मोठ्या आनंदांत घालवला. मग साहेब व मडमसाहेब निघण्याच्यां वेळेस त्यांच्या हातांत राजीनामा व महिन्याची नोटीस ठेवली.

राजीनामा अशा तऱ्हेनें हातीं पडल्यावर त्यांना मोठें आश्चर्य वाटलें.

" तुम्ही कोठें जाणार ? "

" देव नेईल तिकडे ! "

" ह्या एवढ्या सामानाचें काय करणार ? "

" सामानाची आम्हीं सोय केली आहे ! "

मडमसाहेब म्हणाल्या, " मी तुम्हांला सर्टिफिकेट पाठवून देईन. "

" मला त्याची गरज नाहीं. माझें हें पहिलें व शेवटलें काम आहे. मीं कोणाची ताबेदारी केली नव्हती व पुढें करणार नाहीं. "

नाताळाची सुट्टी आली. इकडचें काम पहिलीपासून सोडलें होतें. कराचीचें दुसरीपासून सुरू होत होतें. आम्ही नाताळांत कराचीला जाण्यास निघालों. दत्तू आम्हांला पोचविण्यास आला.

बंदरावर आमची मित्र मंडळी पोचविण्यास आली होती. म्हणजे आम्हांला हारतुरे द्यायला नव्हती आली. कारण आम्ही असला कांहीं पराक्रम गाजवायला निघालों नव्हतों. पण सामानाची व्यवस्था करायला व मुलांबाळांना उचला-साचलायला ही मंडळी आली होती.

बोटीनें कर्णा फुंकला. ती आम्हांला पोटाच्या वाटेकडे घेऊन निघाली. आम्ही दूर सरकणाऱ्या मुंबईकडे व तिच्या कांठांवर उभ्या असलेल्या आमच्या मित्रमंडळीकडे आनंदानें पाहात होतों. सागर शांत होता. पाण्याचे रंग मधून मधून बदलत होते. आमच्याहि मनांत निरनिराळे विचार येत होते. जगाच्या दृष्टीनें नसलें तरी आमच्या दृष्टीनें कराची म्हणजे आम्हांला इंग्लंड वाटत होतें. इतक्या दूरच्या परकीय प्रदेशांत केवळ तीन मुलें व तीन बायकांनीं जाऊन तीन वर्षे काढायचीं होतीं ! आम्ही एकीकडे व दत्तू एकीकडे. जवळ पुरुष माणूस नाहीं. तसे आमच्या जवळ दोन पुरुष होते, पण त्यांचा उपयोग पंगतीचाच. संगतीचा मुळींच नाहीं. एक पुरुष अडीच वर्षांचा होता व दुसरा पुरुष दीड वर्षाचा होता.

स्वतंत्रता ! टिळकांचें एक गाणें ह्या वेळेस आठवलें.

**सांग कुठें पाहुं तुला सखि स्वतंत्रते**
**जानें विजनीं सांग कुठें रमशि सुवृतें**
**फिरिव मला दाहि दिशा**
**कर मम अन्नान्न दशा**
**परि तूं हो साक्षी एकदां —**
**तुजविण मज जगत सकल विकल भासतें.**

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
... 23.785 ... वि: ...
...ऋ... ग्रं... नों: दि: ३०।५।५८
ग्रंथांक ... 538 ...

# आई

( लेखक : देवदत्त नारायण टिळक )

माझ्या आईनें, पत्नीनें व भगिनीनें केवढें धैर्य दाखविलें ह्याची कल्पना फार थोड्यांना करतां येईल. आपला देश सोडून, लहान लहान तीन मुलें घेऊन केवळ बायांबायांनीं शेकडों मैल दूर जाऊन निराळ्या संसाराला आरंभ करणें ही सोपी गोष्ट नव्हती. सर्व संसार आईच्या अंगावर टाकून ह्या दोघी कामाला जात. आईच्या निश्चयी, प्रेमळ व विनोदी स्वभावामुळें तोहि काळ मोठा मजेंत गेला. मी मुंबईत राहून वकिलीचा अभ्यास करूं लागलों. मीं एल्एल्. बी. होईपर्यंत मुंबईस रहावें व ह्या मंडळींनें कराचीस रहावें असें आमचें ठरलें होतें. ठरल्याप्रमाणें दोन अडीच वर्षांनीं कराचीचा संसार मोडून त्या पुन्हां महाराष्ट्रांत आल्या. आम्हीं परत महाराष्ट्रांत यावें अशी डॉ. ह्यूमची फार इच्छा व आग्रहहि. परंतु येथें येऊन उतरायचें कोठें ? आम्हांला पुन्हां मिशनमध्यें काम नको होतें. नाशकांत जाऊन स्थायिक व्हावें असें वाटे. कारण आईचें तें माहेर होतें. पण तेथें गेल्याबरोबर माझा वकिलीचा धंदा चालणार कसा ? अनुभव मुळींच नव्हता व ओळखी अजिबात नव्हत्या. पण. माझी पत्नी अद्याप काम करायला व मला साह्य करायला तयार होती. डॉ. ह्यूमचा पुन्हा फायदा झाला. त्यांचें सरकारी दरबारीं फार वजन असे. त्यांनीं कांहीं खटपट करून रुथला ताबडतोब नाशकास नवीनच स्थापन झालेल्या मुलींच्या सरकारी शाळेंत

काम लावून दिलें, व १९२४ सालीं आम्ही नाशकास आलों. पहिल्या रात्रीं आम्हांला डोकें टेकायला जागा नव्हती.

माझी अजून परिक्षा संपली नव्हती तेव्हां मी मुंबईसच राहणार होतों. पण आई आपल्या सुनेस व नातवंडांस घेऊन नाशकास पोचली. तसा त्यांची सोय लावून द्यायला मी त्यांच्या पाठोपाठ नाशिकला आलों. आदल्या दिवशीं ही मंडळी आली व आल्याबरोबर प्रो. पाटणकरांच्या घरीं उतरली. पाटणकर एकटेच होते. पण तेथला पायखाना बाटूं लागल्यामुळें दुसऱ्याच दिवशीं तें घर सोडून रक्तपित्यांच्या मुलांसाठीं बांधलेल्या लेडी पोलवर्थ होममध्यें मोठ्या पंचायतीनें आम्हांला जागा मिळाली; तेथें जाऊन राहावें लागलें. असें वाटे कीं स्वतःचें मालकीचें घर असतें तर ह्या त्रासांतून सुटलों असतों.

पुढें सात आठ वर्षांत आमचा तेथें चांगला जम बसून आईच्या डोळयांदेखत आमचें स्वतःचें घर झालें.

घर बांधायच्या वर्ष दोन वर्ष आधीं एक दिवस आई आपल्या नातवंडांना घेऊन आग्रा रोडनें फिरायला गेली. नवरात्राचे दिवस, अतिशय गर्दी व गाडीघोंडेहि त्या गर्दींत भरपूर. एक गाडी अशीच वाटेनें जोरांत येत असतां नाना धावपळींत पडला. आई तेथेंच वडाच्या झाडाखालीं मुलांना घेऊन बसली. तिच्या डोक्यांत विचार घोळत होते. येथेंच आपल्याला जागा मिळाली, दत्तूनें येथें जर घर बांधलें तर किती छान होईल. अर्थात् ही तिची कल्पना सत्यस्वरूप बनणें अशक्यच होतें; कारण ती गोल्फ ग्राउंड होती आणि दत्तूजवळ घर बांधण्याइतका पैसा कोठें होता? पण तिला आपलें तसें वाटलें. तिनें बसल्या बसल्या त्या ठिकाणीं घर असल्याची जागेपणाचीं स्वप्नें पाहिलीं व प्रार्थनाहि केली कीं, देवा बाप्पा त्या कल्पनेला मूर्त स्वरूप येऊं दे.

ही गोष्ट आईनें घरीं आल्यावर आम्हांला सांगितली. मग आम्ही ती सर्व विसरून गेलों.

पुढें आई मुंबईस गेली. नंतर वाईस जाऊन मिसेस् ब्रूमजवळ राहिली. ती

वाईला होती तेव्हां. आम्हीं जागा घेतली व घर बांधायला काढलें. परत आल्यावर तिला जेव्हां घराची जागा दाखवली तेव्हां ती म्हणाली, " अरे हीच ती जागा—येथेंच मीं बसून प्रार्थना केली होती ! "

अशा रीतीनें शेवटीं आमचा प्रवास व धावपाळ संपून आम्ही नाशकास स्थायिक झालों. तीस वर्षांनीं आई पुन्हा आपल्या माहेरी परत आली.

प्रत्यक्ष आजी होण्याच्या किती तरी आधीं चिकीनें आजी म्हणून आईच्या घुगऱ्या वाटल्या होत्या. नाशकास अगदीं आरंभीं ती मनी होती, मग मनूताई झाली, मनू मावशी झाली व तिच्या शेवटल्या काळांत आजीबाई झाली. सारीं तिला आजीबाई म्हणत व तें नांव तिला शोभेहि. येथील कवि कुसुमाग्रजांनीं तिच्यावर एक सुंदर कविता लिहिली आहे तींत ते म्हणतात, " **फुलांमधें फुलपाखरुं होइल, होइल कोकिल वा । अशा उत्फुल्ल वसंतांत** ॥' आणि ' **आणिक सरुनी वसंत, होतां पुढें वाळवंट । तरीहि येईल मजसंगें** ।। "

टिळकांची आध्यामिक उन्नति त्यांच्या शेवटल्या शेवटल्या काळांत जशी कमालीची झाली तशी आईची बौद्धिक उन्नति तिच्या ह्या शेवटल्या काळांत अतिशय झाली. ज्या बाईला धड लिहितां येत नव्हतें तिनें स्मृतिचित्रांसारखें गद्य लिखाण व ख्रिस्तायनासारखें महाकाव्य लिहावें हा एक चमत्कार नव्हे काय ?

नाशकास सन १९३३ सालीं कविसंमेलन भरविण्यांत आलें होतें. आईची कांहीं कांहीं मासिकांद्वारें कवयित्री म्हणून प्रसिद्धी झालेली होती. कांहीं कांहीं ख्रिस्ती सभांतून तिनें आपलें वक्तृत्व दाखविलेलें होतें. समाजसेविका म्हणून तिची प्रसिद्धी न बोलणाऱ्या, न लिहिणाऱ्या जनतेनें आयुष्यभर केलेली होती. परंतु ह्या कोणत्याहि गोष्टींनीं तिची प्रसिद्धी झाली नव्हती इतकी प्रसिद्धी ह्या कविसंमेलनांत केलेल्या स्वागताध्यक्षीय भाषणानें एकदम झाली.

कविसंमेलनांत ती जेव्हां आपलें अस्खलित भाषण करूं लागली तेव्हां नाशकांतील कितीतरी साहित्यिक आश्चर्यचकित होऊन गेले. भाषण संपल्यावर

कित्येकांनीं मुद्दाम येऊन माझें अभिनंदन केलें. मुलांनीं कांहीं पराक्रम गाजवला म्हणजे आई-बापांचें अभिनंदन करण्यांत आलेलें माहीत होतें. परंतु असा प्रसंग फारच थोड्या मुलांना अनुभवण्यास मिळाला असेल. आईनें आपलें भाषण एकदांहि कागद न उघडतां अस्खलितपणें केलें. स्त्रीवक्त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तें मुळुमुळू किंवा हळुहळू नसून अगदीं खणखणीत होतें व सर्वांना आश्चर्य वाटलें तें ह्याचेंच.

कविसंमेलनाचा शेवटला कार्यक्रम काव्यगायनाचा होता. थिएटर चिक्कार भरलें होतें व लोक अतिशय गडबड करूं लागले. अमुक एका कविनेंच म्हणावें, दुसऱ्यांनीं तोंडहि उघडूं नये असा लोकांनीं आग्रह सुरू केला. कार्यकारी मंडळानें होतां होईल तो प्रत्येक कवीला आपली एक एक कविता म्हणण्याचा प्रसंग द्यावयाचें ठरविलें होतें. एका हायस्कूलच्या मुलानेंहि त्यांत आपली वर्णी लावून घेतली होती. पण त्याचें कोणी ऐकून घेईना. मुलाचा आवाज कोता, त्यांत तो घाबरलेला. शेवटीं आईला राहवेना. ती स्टेजवर येऊन उभी राहिली. त्या एवढ्या मोठ्या श्रोतृसमूहापुढें, त्या साऱ्या गोंगाटाला मागें सारणाऱ्या खणखणीत आवाजांत तिनें जे चार शब्द सांगितले ते इतके परिणामकारी झाले कीं, नंतर शेवटपर्यंत, टाचणी पडली असती तर तिचा आवाज स्पष्ट ऐकूं आला असता, इतकी शांतता राहिली.

कविसंमेलनानंतर आईनें आपलें लेखन व वाचन पुन्हा जोरांत सुरू केलें. तिचें बहुतेक लक्ष आतां ख्रिस्तायनांत गुंतलें होतें व त्यांत होतां होईल तों व्यत्यय येऊं नये अशी तिची खटपट असे. टिळकांनीं ह्या महाकाव्याचे साडेदहा अध्याय पुरे केले होते. ह्या साडेदहा अध्यायांत ख्रिस्ताच्या बालपणापलीकडे ख्रिस्त-चरित्राची गोष्ट गेलेली नव्हती. हें प्रचंड काम आतां तिनें आपल्या हातीं घेतलें व त्यांत ६४ अध्यायांची भर घालून तें पुरें केलें. तिचें तें काम चालूं असतां माझ्यापुढें एक अवघड प्रश्न येऊन पडला. निपाणीस ख्रिस्ती साहित्यसंमेलनाचा मी अध्यक्ष होतों. त्यानंतरचें संमेलन नागपूरच्या ख्रिस्ती लोकांनीं भरविण्याचें ठरविलें. पण त्यांना कोणी अध्यक्ष मिळेना किंवा त्यांना मीच अध्यक्ष पाहिजे

होतों. त्यांचीं पत्रांवर पत्रें व तारांवर तारा येऊं लागल्या. मला पुन्हा लागोपाठ दुसऱ्याच वर्षीं तें अध्यक्षस्थान स्वीकारणें प्रशस्त वाटेना. तेव्हां मीं आईला माझी अडचण सांगितली. पाटणकर नेहमींप्रमाणें आमच्या साहाय्याला ह्याहि वेळेस धावून आले व त्यांनीं सुचविलें कीं आईनेंच अध्यक्ष व्हावें. ही सूचना नागपूरच्या मंडळीला पसंत पडली व आईच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें तिनें चटकन् हो म्हटलें. संमेलनाचें अध्यक्षीय भाषण लिहिण्यास तिनें ताबडतोब सुरुवात केली.

त्या वर्षीं त्याच वेळेस नागपुरास मराठी साहित्यसंमेलनाचें अधिवेशन होतें. त्यांतील पुष्कळसे पाहुणे ख्रिस्ती साहित्यसंमेलनास हजर राहात. आईचें वक्तृत्व त्या वेळेस अधिक मोठ्या व जाणत्या समाजापुढें प्रगट झालें व तिचें तेंहि भाषण फार गाजलें.

नाशकास १९३३ सालीं झालेलें कविसंमेलन व त्यांतील तें भाषण, १९३४ सालचें नागपूरच्या ख्रिस्ती साहित्यसंमेलनांतील भाषण, १९३५ सालांत प्रसिद्ध झालेले स्मृतिचित्राचे भाग, १९३५ च्या शेवटीं झालेला तिचा सत्कार-समारंभ व १९३६ सालांतील तिचा आजार ह्या गोष्टींनीं तिच्या आयुष्यांतील शेवटलीं चार वर्षें अत्यंत संस्मरणीय केलीं आहेत.

* * *

मुलगी, बहीण, आई व आजी ह्या नात्यांनीं आयुष्यभर तिनें जे भेटतील त्यांची, जी करतां येईल ती सेवा केली. ती करीत असतांना उच्च नीच भावांचा तर प्रश्नच उरत नसे, पण तिला चुकून कधीं किळस देखील आली नाहीं. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें "ह्या सृष्टींतील दिव्यपण तेंच तेंच हें मनुजपण" असा तिचा पक्का विश्वास असल्यानें आपण असें वागतों ह्याची तिला जाणीवहि नसे. तसें वागणें हा तिचा एक स्वभावच बनून गेला होता.

एखाद्या दिवशीं सकाळींच आई बाहेर पडायची. घरांतील प्रत्येकजण कामांत गुंतलेलें असल्यानें दिवसभर तिची आठवण होत नसे. पण संध्याकाळ झाली, मग रात्र झाली म्हणजे आम्हांला काळजी वाटायला लागे. तिकडे आई कोणा

मावशीकडे नाहींतर आत्याकडे तिच्या कोणा नातलगाची कोणी मैत्रीण अडलेली असेल तेथें बसलेली असायची, नाहींतर घरीं येण्यास निघतां निघतां वाटेंतच कोणाला ताप आलेला कळून परत फिरलेली असायची. पण तिला घरची काळजी मात्र अतिशय. घरीं आम्ही ताटकळून काळजी करीत बसलों असूं हें तिला माहीत असे व तशा स्थितींत कोणालातरी दादापुता करून तिनें घरीं पाठवावें व आपण अमूक अमूक ठिकाणीं आहों, काळजी करूं नका असा निरोप धाडावा.

माधव मनोहर आपल्या आठवणींत लिहितात —

"श्री. टिळकांच्या समोरच माझे स्नेही प्रो. जोगळेकर राहातात. गेल्या सालीं कशानेंशा सौ. कमलाबाई जोगळेकर खूप आजारी होत्या. कोणतेंहि परिचयाचें माणूस आजारी आहे अशी नुसती ओझरती वार्ता आईंना कळायचा अवकाश कीं मग आईंना कांहीं क्षणभर घरीं स्वस्थ बसवत नसे. मग ती वेळ कशी व कोणतीहि असो आणि त्या आजारी माणसाचें घर कितीहि दूर असो, आई लगेच तेथपर्यंत तशा वेळीं पायीं चालत जायला निघायच्या. आई घरीं नसल्या कीं त्या कोणाच्या तरी समाचारासाठीं गेलेल्या असायच्या आणि मग काळावेळाची, थंडीवाऱ्याची, आपल्या स्वतःच्या उतार वयांतल्या सदारुग्ण परिस्थितीची यत्किंचितहि पर्वा न करतां त्यांनीं त्या आजारी माणसाच्या शुश्रूषेला प्रारंभ करावा. मग त्या आजारी माणसाच्या रुग्णशय्येशेजारचें आईचें आसन किती तास व किती दिवस स्थिरावेल हें कांहीं कुणाला सांगतां येत नसे. सौ. कमलाबाई जोगळेकर आजारी आहेत असें कळल्याबरोबर स्वतः आजारी असूनसुद्धां आई त्यांच्या समाचारासाठीं आपल्या खोकल्यासह आल्या आणि लगेच झाला त्यांच्या शुश्रूषेला प्रारंभ!"

एकदां भर बारा वाजतां शरणपूरच्या रस्त्यावर एका झाडाखालीं आई जरा विसावा घेत असलेली तिकडून येणाऱ्या एका गृहस्थांच्या दृष्टीस पडली. ओचे खोवलेले, पायांत वाहाणा, खांद्यावर पदर, हातांत एका हिरव्या कागदाची घडी, अशी आई तेथें सावलीला उभी राहिली होती. गृहस्थांनीं विचारलें, "आजीबाई, तुम्ही इतक्या उन्हाच्या कुठें निघालां?"

"ह्या हिच्याकडे जाऊन येतें. तिला सिनेमाची जाहिरात मिळत नाहीं. आमच्याकडे हे लोक आणून टाकतात. तिकडे नेऊन टाक म्हटलें तर अळंटळं करतात."

गृहस्थांनीं जातां जातां मला ही गोष्ट येऊन सांगितली व मीं आईला छत्री पाठविली."

नाशिकच्या श्री. सौ. ताईसाहेब विंचुरकर म्हणतात, "माझें त्यांचें आजी नातीचें नातें होतें. बहुतेक ठिकाणीं त्या आजीबाई म्हणून ओळखल्या जात होत्या व आमच्या स्त्री-मंडळाच्या पण त्या आजी होत्या.

त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें त्या सर्वांना हव्याशा होत्या. त्यांना कोठेंहि जावयास मज्जाव नसे. गरीब, श्रीमंत, लहान, तरुण व वृद्ध अशा सर्व मंडळींना त्या प्रिय असत व जेथें जातील तेथें त्यांचें स्वागत होत असे.

त्यांच्या उपदेशाची मला आतां पावलोपावलीं आठवण होते. त्या नेहमीं म्हणत, 'अग, दुसरें कसेंहि वागलें तरी आपण नेहमीं त्यांच्याशीं चांगलें वागावें.'

महिना पंधरा दिवसांतून एकदां आपल्या इष्टमित्रांच्या घरीं जाऊन समाचार घेऊन आल्याशिवाय त्यांना बरें वाटत नसे. त्यांना नाती, लेकी, सुना ह्यांचें फार कौतुक असे. कांहीं नवीन घातलें किंवा घरांत पाहिलें कीं त्यांना आनंद होई व अत्यंत आपलेपणानें त्या चौकशी करून समाधान व्यक्त करीत. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची तर त्यांना भारी हौस. कोणाला औषध करून दे, तर कोणाला घरीं सोबत निजावयास जा, आजाऱ्याच्या सोबतीला जा, तर कोणाला बाई ( नोकर ) पाहून दे. असे अनेक व्याप त्यांच्यामागें सदा असायचेच. ऊन-पाऊस, तहान-भूक सर्व बाजूला ठेवून दुसऱ्याचीं कामें त्या फार आस्थेनें करीत.

आमच्या स्त्री-मंडळाच्या सभेला त्या नेहमीं हजर असायच्या. त्यांना आमचा फार अभिमान असे. एकदां दुसऱ्या गांवच्या एक वयस्कर बाई मंडळांत भाषण करावयास आल्या होत्या व त्यांनीं बोलतांना आम्हां तरुण स्त्रियांवर बरेच कोरडे ओढले. त्यांचें भाषण संपतांच आमच्या आजीबाई उठल्या व आवेशानें त्यांनीं आमच्यावरील आक्षेप खोडून काढले व सर्व मुली

( बायका ) खऱ्या आर्य स्त्रिया असून अत्यंत सुशील आहेत असें प्रतिपादन केलें. आजीबाईंनीं आमची बाजू घेतली तेव्हां आम्हांला किती आनंद झाला असेल बरें ! खऱ्या आपलेपणानें वागत असतां त्या आम्हांला परक्या कशा वाटतील? आमचें कोठें चुकलें तर मात्र आम्हांला त्यांचीं बोलणीं खावीं लागत असत.

एकदां सभेंत एका प्रोफेसरसाहेबांना व्याख्यान देण्याकरितां विनंति करावयास मंडळाच्या सेक्रेटरी विसरल्या. आतां काय करायचें? आयत्या वेळीं प्रोफेसरसाहेबांना विनंति करण्याचें धाडस आमच्यानें होईना, कारण अगदीं वेळेवर कोण हो म्हणणार? मग आम्ही आजीबाईंना पुढें केलें. आमच्यासाठीं आजी उन्हांतून प्रोफेसरसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांना बा बेटा करून लेक्चर देण्यास कबूल केलें. त्यांना आईचा शब्द मोडवेना व अशा रीतीनें आजींनीं नातींचा हट्ट पुरविला. एकदां मंडळांत आम्हीं त्यांना काव्यगायन करण्यास सांगितलें, तेव्हां त्यांनीं तें एका अटीवर कबूल केलें कीं प्रत्येकीनें तिच्या घरचे जुने व टाकाऊ कपडे आजीबाईंच्या घरीं पोचते करायचे. २–३ दिवसांनीं आजीबाई जुन्या कपड्यांचा गठ्ठा घेऊन भंगीवाड्याकडे जातांना दिसल्या.

एक दिवस सकाळीं ८॥ वाजतां आजीबाई माझ्याकडे आल्या व म्हणाल्या, ‘ तुझ्या घरचे जुने, लहान होत असलेले कपडे दे पाहूं ! आज दिव्याची अवस आहे तर वेळ गमावूं नकोस. ’ मला कांहींच समजेना. मीं म्हटलें, ‘ हें काय आजीबाई? आज कोठली दिव्याची अवस? तुमचं आपलं कांहीं तरीच ! ’

तेव्हां त्या हसल्या व म्हणाल्या, ‘ हें पहा आज हरिजन–दिन आहे. वर्षांतून एक दिवस त्या लोकांना आंघोळी, कपडे व खाऊं घालून कौतुक करायचें. दिव्याच्या अवसेला नाहीं का आपण ठेवणींतल्या समया काढून स्वच्छ करीत. अग असेंच हें आहे. ’

आईला कोणतेंहि काम मनापासून करायला आवडे. हरिजन दिनाच्या मिरवणुकी व महार मांगवाड्यांची त्या दिवसापुरती साफसफाई तिला अगदीं आवडत नसे. ती हरिजन–दिनाला दिव्याची अवस म्हणे. खरोखर प्रकाश पडायला हवा तर दिवे रोज घासायला पाहिजेत. ती मात्र हे दिवे जरी

घालण्याचा प्रयत्न करी.

पतित स्त्रियांच्या बाबतींत तिला फार काळजी वाटे व १९०८–१९०९ पासून तिनें ह्या बाबतींत भाषणें करून व लेख लिहून लोकमत बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.

एक पत्नि जिवंत असतां दुसरी करूं नये असा तिचा ठाम विश्वास होता. त्यासाठीं तिला अगदीं स्वतःच्या मुलाप्रमाणें प्रिय असलेल्या माणसांशीं तिनें तंटे केले. लाक्षणिक नव्हे तर खरोखरच त्यांचे कान तिनें पिरगाळले. तेहि–जरी करायचें तेंच केलें तरी–आईच्या कानपकडीनें बुजून गेले नाहींत; उलट त्यांच्या मनांत तिच्याबद्दल असलेला आदर व प्रेम हीं तिच्या ह्या निःस्पृहणानें द्विगुणित झालीं असें मला खात्रीपूर्वक वाटतें.

आईला मुलगे, मुली, नातवंडें तेव्हांच सांपडायचीं. तसेंच सोपानदेव चौधरी यांचें झालें. त्यांत ते आमच्यासमोरच राहाण्यास आले.

एक दिवस आई सोपानदेवांकडे निजली होती. रात्रीं दोनाच्या सुमाराला तेथें ती उठून लिहायला बसली. लिहितां लिहितां तिला आठवण झाली कीं आदल्या दिवशीं आपण आपल्या लिखाणाचें बाड शांतिसदनाच्या ओसरीवर टाकलें. ती तशीच उठली. त्यांच्या व आमच्या घरामधला रस्ता अगदीं झाडींतून व अंधारांतून होता. पण आईला भीति ही कशी ठाऊकच नव्हती. ती तशीच घरीं आली व बाड घेऊन परतली. म्हातारी पदराखालीं कांहीं घेऊन जाते आहे हें दोघां चोरट्यांनीं पाहिलें. ती झाडींत जातांच ते तिला आडवे झाले. पण आई दचकली नाहीं कीं भ्याली नाहीं. तिनें त्यांनाच दरडावून ‘ काय पाहिजे ? ’ म्हणून विचारलें. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, “ कांहीं नाहीं, आम्हांला वाटलें चोर आहे. ” आई म्हणाली, “ काय रे, चांदण्या रात्रीं कोणी चोर असा उघड उघड चोरी करील का ? ” ते दोघे ह्यानंतर निघून गेले. दुसऱ्या दिवशीं तिनें आम्हांला ही गोष्ट सांगितली.

सोपानदेवांकडे एक दिवस एक कविमित्र पाहुणे आले होते. ते मध्यरात्रीं जागे झाले. आंत चाललेलें संभाषण त्यांना स्पष्ट ऐकूं येत होतें. तेहि घाबरले.

पण सकाळपर्यंत कांहीं बोलले नाहींत.

" अरे सोपानदेव, ऊठ बाबा. बन्याचें चिन्ह ठीक दिसत नाहीं. जर ब्रँडी असली तर दे पाहूं."

" आई, तुम्ही केव्हां उठलां ?"

" अरे सारी रात्र मी जागीच आहें. बन्या माझ्या मांडीवरच आहे.

बन्याला ब्रँडी पाजली, बन्या जगला.

सकाळीं पाहुणे विचारतात कोण आजारी होतें ?

सोपानदेवांनीं आजाऱ्याला त्यांच्यापुढें धरलें. तो बन्या बोका होता !

आमचा एक कुत्रा होता, त्याच्यासंबंधींची आठवण आईच्याच शब्दांत देतों.

" म्हशी गेल्या, कोंबड्या गेल्या, पोपट होता तो उडून गेला, आतां राहतां राहिला ब्लॅकी कुत्रा व त्याची बायको. ब्लॅकी आमच्याकडे तेरा वर्षें होता. एक कुत्री राहुरीस आमच्या घरीं व्याली व त्यांतील एक पिलूं आम्हीं ठेवून घेतलें होतें. चार वर्षें एक कुत्री ब्लॅकीजवळ राहिली. शेवटीं तो मेल्यावर तीहि अन्नपाणी सोडून मरून गेली ! ती रात्रंदिवस आमच्या वाडींत राहत असे. ब्लॅकी म्हातारा झाला तेव्हां त्याला शारीरिक पीडा फारच होऊं लागली. पण चंपी मात्र त्याला सोडून कोठेंच जात नसे. ब्लॅकीकरतां खाट, शेगडी आणविली होती. त्याच्या अंगाला मी औषध चोळी. लोक हसत. पण तो कुत्राहि सारें माणसासारखें करून घेत असे. डोळ्यांत औषध घालणें, पोटांत घेणें, खाटेवर पडून राहाणें, हे सोपस्कर तो करून घेई. दुःख फार झालें म्हणजे तो कुंथे. तशी चंपी धावत धावत घरांत येऊन माझा पदर ओढून मला त्याच्याकडे घेऊन जाई. एक दिवस दुपारच्या दोनच्या सुमाराला चंपी आली व मला बाहेर घेऊन गेली. मी पाहातें तों तो फारच कण्हत होता मला पाहातांच तो खाटेखालीं उतरला. त्यानें माझे पाय चाटले व तेथेंच पडून प्राण सोडला. त्याचीं चार लहान पिलें त्याच्या अंगावर उड्या मारूं लागलीं. चंपी मोठमोठ्यानें गळा काढून रडूं लागली. टिळकांना व मला हा देखावा पाहावेना. आम्ही तिला आंतल्या खोलींत कोंडलें व ब्लॅकीला तेथेंच कंपाउंडांत

पुरलें. पण चंपी सुटतांच तिनें ती जागा शोधून काढली व पुढें महिनाभर तेथें ती बसून रडत असे. तिनें अन्नपाणी वर्ज्य करून शेवटीं दुःखानें प्राण सोडला. धन्य बिचारी."

सोपानदेवांच्या शेजारीं एक गृहस्थ राहात असत. त्यांचा पुतण्या वयानें अठरा वर्षांचा झाला होता, पण बुद्धीनें तीन वर्षांचाच राहिला होता. लहानपणीं टायफाईड होऊन त्याचा परिणाम त्याच्या मेंदूवर झालेला होता. आईला त्याची फार कींव येत असे. तिनें रोज सकाळीं त्याला फिरायला नेऊन शिक्षण देण्याचें ठरविलें. आईनें त्याला म्हणावें,

"हं बिंदू, हें झाड कसलें?"

"वडाचें."

पण तें असायचें पिंपळाचें. दुसरें झाड वडाचें असलें कीं बिंदूनें हटकून पिंपळाचें म्हणून उत्तर द्यावें.

एकदां सोपानदेव म्हणाले, "आई, तुम्ही कशाला खटपट करतां? आबासाहेबांनीं करतां येईल तें सारें केलें आहे. कांहीं करायचें ठेवलें नाहीं. तुम्ही वडाचें झाड दाखविलें कीं तो पिंपळाचें म्हणतो नि तुम्ही पिंपळ दाखविला कीं तो वड म्हणतो."

ह्यावर आई म्हणाली, "अरे त्याचेंच काय घेऊन बसला आहेस, मोठमोठे लोक वडाची साल पिंपळाला लावतात नि पिंपळाची साल वडाला लावतात. हा तर बोलून चालून पोरच आहे."

अशिक्षित परंतु अत्यंत सुसंस्कृत अशा उदार आणि प्रेमळ वृत्तीच्या 'लक्ष्मुम्बाई'चा सत्कार करावा असें नाशकांतल्या कित्येक संस्थांनीं ठरविलें आणि ह्या सार्वजनिक आजीबाईनीं त्या गोष्टीला संमति दिली.

आयुष्यभर अनेक विचित्र परिस्थितींशीं झुंज देत देत तिनें येथपर्यंत मजल मारली होती. पंचवीस वर्षांपूर्वीं तिनें एक कादंबरी लिहायला घेतली होती. त्या 'कादंबरी'ची आम्हीं पोरांनीं चेष्टा करून तिला त्या वेळीं भंडावून सोडलें होतें. पण आजच्या तिच्या लिखाणाची चेष्टा करण्याची आमच्यापैकीं कोणाचीहि

योग्यता नव्हती. त्या पोरांपैकीं जितक्यांना ह्या सत्कारसमारंभासाठीं येतां येईल तितक्यांनीं कसेंहि करून यावें म्हणून मीं व प्रो. पाटणकरांनीं आमच्या सह्यांचीं पत्रें आमच्या बालमित्रांना धाडलीं. त्यांत सहज असें एक वाक्य लिहिलें होतें कीं ' आईचें वय आतां फार झालें आहे हें लिहायला नकोच. ' पण ह्या वाक्याचा परिणाम असा झाला कीं पंधरापैकीं दहाजण सत्कारसमारंभाला हजर झाले. हे झालें आमच्या मित्रमंडळीसंबंधीं. साहित्यिकांपैकींहि कितीतरी हजर होते.

ता. १५ डिसेंबर १९३५ रोजीं हा सत्कारसमारंभ नाशिक येथें सर्कल थिएटरमध्यें झाला. स्मृतिचित्रांचे पहिले दोन भाग प्रसिद्ध झाले होते व तिसरा ह्या समारंभांत प्रसिद्ध व्हायचा होता. उत्तम लेखिका म्हणून आईची प्रसिद्धी ह्याच ग्रंथानें झाली होती.

आम्हां सगळ्यांपुढें तिचें चरित्र उभें राहिलें. एक 'मनुष्य' शब्द शोधायला जिला एकदा एक घंटाभर खटपट करावी लागली होती तिचेच शब्द आतां इतके मोलाचे ठरले होते, कीं शेकडों माणसें एक घंटाभर आधीं, तिचें कौतुक करण्यासाठीं थिएटरकडे जमा झालीं होतीं. जागा मिळेना. कित्येकांना बाहेरच उभें राहावें लागलें. घरीं पाहुण्यांची व्यवस्था करायची असल्यानें मला तेथें जायला उशीर झाला. पण तेथें जातों तों मलाहि आंत प्रवेश मिळणें कठिण झालें. माझ्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू उभे राहिले. त्या वेळीं एक एका संस्थेतर्फे आईच्या गळ्यांत पुष्पहार घालण्यांत येत होते. शेवटीं तिच्या माहेरच्या नातलगांतर्फे तिला माळ घालण्यांत आली ! नाशिक सोडून ती पतीकडे गेली त्या वेळीं हें दृश्य कोणाला कल्पनेनेंहि रंगवितां आलें नसतें.

व्यासपीठावर मध्यें सत्कारसमारंभाचे अध्यक्ष रा. प्र. के. अत्रे, त्यांच्या एका बाजूस ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, दुसऱ्या बाजूस आई व सभोंवतालीं तिला प्रिय वाटणारी इतर मंडळी बसली होती.

भाषणें झालीं. फार सुंदर भाषणें झालीं ! त्यांचा विशेष हा होता कीं तीं सर्व

भाषणें आपुलकीच्या भावनेनें ओलावलेलीं होतीं. त्यांत रा. पांगारकरांपासून रा. अत्र्यांपर्यंत सर्वांनीं सारखाच महत्त्वाचा भाग घेतला होता.

अत्रे म्हणाले, " लक्ष्मीबाईंना टाक देखील वापरतां येत नाहीं. त्यांनीं आपलें पुष्कळसें लिखाण आगपेटीच्या काडीच्या टोकानें लिहिलेलें आहे. आपणांपैकीं पुष्कळ साहित्यसेवक फाउंटनपेन वापरतात! पण त्यांना ' स्मृतिचित्रां 'इतका हृदयंगम ग्रंथ निर्माण करतां आलेला नाहीं. ज्या काडीनें लक्ष्मीबाई लिहीत असत त्या काडीच्या टोकाशीं असलेली जळजळीत आग त्यांनीं आपल्या वाङ्मयांत ओतली आहे. इतर लेखक फाउंटनपेन वापरीत असले तरी त्यांच्या फाउंटनपेनच्या शाईतून त्यांचें हृदय झरत नाहीं.

" आतां मी सर्वांच्या वतीनें लक्ष्मीबाईंच्या पायांवर डोकें ठेवतों आणि शेवटीं त्यांना अशी कळकळीची विनंति करतों कीं, आपण मराठी साहित्याची इतकी उदंड सेवा केली आहे कीं आतां आणखी लिहा असें आम्ही तुम्हांला सांगणें म्हणजे आम्हांला अंतःकरण नाहीं, आम्हीं निर्दय, कठोर आहों असा अर्थ होतो. आपल्या उतार वयांत आपण पूर्ण विश्रांति घ्यावी व आपलें आयुष्य अत्यंत आनंदांत व विसाव्यांत जावो अशी मी प्रार्थना करतों."

शेवटीं आईनें भाषण केलें. त्यांत ती म्हणाली, ' ज्या दिवशीं मला पूर्ण विराम मिळेल त्याच दिवशीं माझ्या लेखनाला पूर्ण विराम मिळेल.'

आणि खरोखरच म्हटल्याप्रमाणें शेवटपर्यंत ती लिहीत होती. त्यांत तिनें खंड पडूं दिला नाहीं. स्मृतिचित्रांच्या चौथ्या भागाचें अर्धें लिखाण पुरें झाल्यावर व ख्रिस्तायनाचा ७४ वा अध्याय लिहिल्यावर तिनें लेखणी खालीं ठेवली आणि सत्कारसमारंभांतील भविष्यवाणी तीनच महिन्यांत खरी केली.

* * *

आठ दिवस राहिले!

आई जळगांवला सौ. आनंदीबाई शिर्के ह्यांच्याकडे गेली होती. तेथें तिला इन्फ्लुएंझा झाला. तिला तेथून तिच्या मानसकन्येनें म्हणजे डॉ. पद्माबाई शिंदे ह्यांनीं आपल्याकडे भुसावळला नेलें. माझी पत्नी आजारी होती. तिला घेऊन

मी अकोल्याला गेलों होतों.

आईला इन्फ्लुएंझा झाल्याचें डॉ. पद्मावाईंच्या पत्रावरून आम्हांला कळलें. भुसावळहून खामगांवला जाण्याचा आईचा बेत आम्हांला त्याच वेळेस कळला. पत्नीला अकोल्याला ठेवून मी नाशकास परत आल्यावर मला चैन पडेना. मी नानाला जळगांवला पाठविलें. तो दुसऱ्या दिवशीं आईला घेऊन आला. ती बरी दिसली. आजारी होती असें डॉ. पद्मावाईंचें पत्र पाहून मीं जी कल्पना केली होती तशी ती मुळींच दिसली नाहीं. आल्याबरोबर भेटतां येईल तेवढ्यांना ती भेटून आली. मीं म्हटलें, "आई, आतां तूं दमली आहेस. नुकतीच तापांतून उठली आहेस, तेव्हां आतां कांहीं दिवस विस्तायन राहूं दे." तिनें माझें म्हणणें कबूल केलें. इतक्यांत सोपानदेव रेकॉर्डिंगसाठीं मुंबईला जायला निघाले व त्यांच्या पत्नींना सोबत म्हणून आई त्यांच्याकडे निजायला गेली. आजीबाईबरोबर मुलेंहि गप्पा मारायला गेलीं. साडेआठ नवाच्या सुमाराला मुलें येऊन सांगूं लागलीं कीं आजीबाई 'धर्मात्मा' पहायला निघाल्या !

मीं नानाला पळत जाऊन तिला थांबवायला सांगितलें. पण नाना परत येऊन सांगूं लागला कीं त्या गेल्या.

मला आईचा मोठा राग आला. नुकतीच आजारांतून उठलेली. थंडीचे दिवस. नवाच्या शोला गांवांत सिनेमाला जाऊन रात्रीं बारा एकला परत यायचें. पण तिच्या उत्साहाला कधीं सीमाच नव्हत्या.

पपा वारल्यावर आई म्हणे, 'टिळकांनीं आपलें मरण ओढवून घेतलें. स्वर्गांत त्यांची गांठ पडली म्हणजे मीं त्यांच्याशीं आधीं सम्पादून भांडेन.' आईला जसें पपांशीं भांडावेंसें वाटलें तसें आज मला तिच्याशीं भांडावेंसें वाटतें. दुसऱ्या दिवशीं बोललों नाहीं पण तिसऱ्या दिवशीं बोललों. तों ती म्हणाली, 'अरे परवां गेलें नि कालहि पुन्हा गेलें होतें !' मीं अगदीं हतबुद्धच झालों. तिला म्हटलें, 'आई, आतां तें कांहीं चालायचें नाहीं. तूं आतां इकडे निजायला ये पाहूं कशी आजपासून.' तेव्हां तिनें कबूल

केलें कीं आतां जपेन व सोपानदेव परत येतांच घरीं घेईन.

पण तो योगायोग आला नाहीं. त्याच रात्रीं दोन तीनच्या सुमाराला लीलाबाई घाबऱ्या घाबऱ्या येऊन हाका मारूं लागल्या. नाना व मी खालींच निजलों होतों. लीलाबाई सांगूं लागल्या, ‘आई फार घाबरल्या आहेत. चला, त्यांना फार थंडी वाजते आहे.’ मी पुढें धावत गेलों. नानानें व अशोकनें मागाहून पाणी गरम करून रबरी पिशव्या व औषधें वगैरे आणलीं. आईला इतकी कमालीची थंडी वाजून आली होती कीं सारीं पांघरुणें घातलीं, वर अशोक व नाना निजले, आंत गरम पाण्याच्या पिशव्या ठेवल्या तरी ती थडथड थडथड उडत होती. सोपानदेवांच्या घरीं कोणी पुरुष माणूस नव्हतें. दोन लहान लहान मुलें तेवढींच. लीलाबाई, नाना, अशोक व मी पहांटपर्यंत बसून राहिलों. पहांटे आईला ताप भरला.

मला त्या दिवशीं नांदगांवला काम होतें व दुसऱ्या दिवशीं जळगांवला काम होतें. जळगांवचें काम दुसऱ्या दिवशीं सकाळींच करून परत तापाच्या पाळीपर्यंत येतां येण्यासारखें होतें. पण पाय निघेना. आई सारखी म्हणत होती कीं तूं कामाला जा. तिचे प्रेमळ शब्द अजून माझ्या कानांत घुमतात.

‘बाळया, जा बरं. मी बरी आहें. काळजी करूं नको. जा बरं बाळया.’

ती मला कधीं बाळया म्हणत नसे. पण त्या दिवशीं मी जाईपर्यंत अत्यंत प्रेमळ स्वरानें तिचें एकसारखें हेंच चाललें होतें. हाताला ताप लागत नव्हता. पण अंगांत बराच ताप असला पाहिजे किंवा तिच्या मानानें तो ताप बराच असला पाहिजे. मीं डॉक्टरना आणलें व त्यांनीं मलेरिया आहे अशी खात्री दिल्यावर मी निघालों. जातांना तिच्याजवळ जाऊन उभा राहिलों. तिचे डोळे मिटलेले होते. झोप लागली असावी असें मला वाटलें. पण मी जवळ जातांच ‘बाळया, जा बरं. मी बरी आहें. काळजी करूं नको.’ असें ती म्हणाली. मला कसें तरी वाटलें. पण मी तसाच निघालों. नांदगांवला कसें तरी काम आटोपून तसाच रात्रीच्या गाडीनें जळगांवास पोचलों. मध्यरात्र टळून गेली होती. स्टेशनांत गाडी शिरतांच प्लॅटफार्मवर रा. फडणीस

दिसले. त्यांना पाहतांच पोटांत धस्स झालें.

‘ चला, घरीं चलतां ? पण मला वाटतें तुम्हीं आतांच परत जावें. आतां गाडी आहे. पाटणकरांची तार आली आहे. ’

मीं तार वाचली. तारेंत मला परत बोलावलें होतें. पण कां हें कांहीं कळवलें नव्हतें. त्यामुळें मी अगदींच घाबरून गेलों. आपण नाशिक सोडल्यावर कांहीं कमजास्त झालें कीं काय कळेना. सारी रात्र बसून काढली. पहांटे नाशकास उतरलों. आतां काय झालें आहे समजायचें कसें ? घरीं येतांच आधीं समोर सोपानदेवांच्या घराकडे नजर फेकली. बाहेर एक कंदील जळत होता. इकडे आमच्या घरांतहि सामसूम दिसत होती. पुन्हा घाबरलों. नानानें दार उघडतांच आजीबाईचें कसें काय आहे म्हणून विचारलें. तो म्हणाला, ‘ आजीबाई बऱ्या आहेत. ’ माझ्या जिवांत जीव आला.

पाटणकरांना रात्रीं डॉ. वर्टींनीं सांगितलें होतें कीं हार्टला अतिशय अशक्तता आलेली आहे. तें ऐकून पाटणकरांनीं मला ती तार केली होती. कांहींहि असलें तरी ती बरी आहे. हें ऐकून आनंद वाटला.

त्या दिवशीं तिला भेटायला खूप माणसें आलीं. ताप आला नाहीं मात्र विनोदाला व प्रेमळपणाला भरतें आलें.

कांहीं स्त्रिया भेटायला आल्या तेव्हां आई त्यांना म्हणाली, ‘ अग तुम्ही माझा सत्कारसमारंभ केलात ना ? तेव्हां मला लागली आहे दृष्ट. थोड्याशा मीठमोहऱ्या ओवाळून टाका माझ्यावरून. ’

सर्वांना मोठी गंमत वाटली व त्या हसूं लागल्या. तिचें पोट आतां अतिशय दुखूं लागलें तरी ती दुसऱ्यांना हसवीत होती व त्यामुळें आम्हांला सर्वांना मोठा धीर येत होता. पांगारकरबुवा भेटायला आले त्यांना ती म्हणाली, ‘ या बुवासाहेब, आत्मा व कुडी ह्यांचा झगडा चालला आहे. पाहूं या आतां कोण जिंकतें तें ! ’

संध्याकाळीं डॉ. वर्टी म्हणाले, ‘ हें पाहा, पोटांत असें मध्येंच टेंगळासारखें कांहीं तरी दिसतें आहे. मला वाटतें तुम्ही दुसऱ्या एखाद्या डॉक्टरला

कन्सल्टिंगकरतां आणा.' डॉ. वाबळे ह्यांनीं कानडा हॉस्पिटलच्या डॉ. रॉबिन्सनना आणलें. त्या तिघांनीं मिळून बराच विचार केल्यावर डॉ. वाबळे व डॉ. रॉबिन्सन ह्यांनीं सर्जन मेजर ग्रे ह्यांना आणलें.

इकडे ही गडबड चालली आहे तों जहाल मंजुळाबाईंची मुलगी तुळसाबाई येऊन दाखल झाली. त्यांना आई आजारी असल्याची गंधवार्ताहि नव्हती. तुळसाबाईंना पाहून आईला आनंद वाटला.

डॉक्टर लोकांनीं चिकित्सा करून ठरविलें कीं इन्टेस्टाईनल ऑब्स्ट्रक्शन आहे व त्याचें ऑपरेशन झालें पाहिजे. त्यांचें बोलणें इंग्रजींत चाललें होतें. पण आईला तें सारें कळत होतें. मला एका बाजूला घेऊन डॉ. रॉबिन्सन म्हणाल्या, 'ऑपरेशन करायला पाहिजे. तुमचें काय म्हणणें आहे?' मीं म्हटलें, 'मीं तिला विचारतों.' इतक्यांत लीलाबाई आईला सांगू लागल्या, 'आई, तुम्ही भिऊं नका. ऑपरेशन करणार नाहींत कांहीं.' पण आई त्यांना म्हणाली, 'अग, ऑपरेशन करायचेंच असलें तर केलेंच पाहिजे. मला ऑपरेशनचें कांहीं भय वाटत नाहीं.'

आईचे हे शब्द ऐकून मी म्हणालों, 'आई! ऑपरेशन करायचें आहे. तुझ्या मनाची तयारी आहे ना?' ती म्हणाली, 'मीं अगदीं तयार आहें.'

'वीक हॉर्ट' म्हणून मला तार आली होती! वास्तविक तेथें असलेल्या आमच्यापैकीं एकाचेंहि 'हार्ट' तिच्याइतकें सशक्त नव्हतें.

आईला डॉ. वाबळेंच्या मोटारमध्यें निजविल्यावर निघतां निघतां आई म्हणाली, 'अग, माझ्या बहिणीला सांगा मी परत येईन, काळजी करूं नको.' ही बहीण म्हणजे माईसाहेब बेदरकर. त्या बिचाऱ्या आजारी होत्या. पण त्या तशाच उठून काठी टेकीत टेकीत बाहेर आल्या व त्यांनीं आईला भेटून घेतलें. रात्रभर दवाखान्यांत ऑपरेशनवांचून जें करतां येण्यासारखें होतें तें सारें मेजर ग्रेनीं करून पाहिलें. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. सकाळींच आठ वाजतां ऑपरेशन करण्याचें ठरलें.

तिच्या खोलींतून बाहेर जाण्याच्या आधीं नर्सबाईंनीं तिचे केस विंचरून

दोन वेण्या घातल्या. मी ध्रुवाला घेऊन तिच्याकडे गेलों,तर ती त्याला म्हणाली, 'बघ ध्रुवा, कसे लहान पोरीसारखे माझे सोपस्कार करताहेत.'

स्ट्रेचरवर घालून तिला ऑपरेशनरूममध्यें नेतांना तोंडावर ऊन येत होतें म्हणून डॉ. शेखबाईंनीं तिच्या तोंडावर चादर घातली. ती दूर सरकवून त्यांना आई म्हणाली, 'अग, मला का तूं भित्री समजतेस?'

ऑपरेशनरूमच्या बाहेर आम्ही सगळे चिंताग्रस्त मनानें उभे होतों. आईला आंत नेल्यावर एक घंटाभर तरी तिचें बोलणें ऐकूं येत होतें. मला वाटे ऑपरेशन रहित झालें बरें का. तेवढेंच समाधान वाटलें. इतक्यांत एक नर्स कशालाशी बाहेर आली. तिला विचारतां ऑपरेशन चालू असल्याचें तिनें सांगितलें. आई डॉक्टरांशीं गप्पा मारीत होती व तेथेंहि थट्टा विनोद चालला होता! शेवटीं मेजर ग्रेनींच तिला बोलूं नका म्हणून सांगितलें. अर्धा आधी ऑपरेशन स्पायनल इंजेक्शननें झालें. शेवटी थोडा क्लोरोफॉर्म दिला. एकंदर अडीच तास ऑपरेशन चालून तें अगदीं यशस्वी झालें.

मेजर ग्रेनीं मला तेथेंच एक खोली दिली होती. त्यामुळें मला आईजवळ राहातां आलें. तुळसाबाई तर एकसारखी बसूनच होती.

ऑपरेशन संपल्यावर अर्ध्या पाऊण तासानें आई शुद्धीवर आली व मला म्हणाली, 'दत्तू, ध्रुव आला होता ना रे? त्याची माया आहे रे मजवर. तो बिचारा बाहेरच डोकावून जातो.'

मीं ध्रुवाला आणून तिच्यापुढें उभा केला. त्याच्या पाठीवर हात फिरविल्यावर तिला फार समाधान झालें. नाना तिच्याजवळ उभा राहिला होता. त्याची मॅट्रिकची परीक्षा जवळ आली होती. त्याला तिनें आग्रहानें परत पाठवून दिलें. माझ्या पत्नीला मीं झाल्या हकिकतीचें पत्र टाकलें व कळविलें येण्याची घाई करूं नको, कारण घरांत दोन आजारी माणसांचें करणें फार कठिण जाईल. पण आपण येथील सामानसुमानाची बांधाबांधी आटपतांच नाशकास येत असल्याचें तिचें पत्र आलें! मी येऊं नको म्हणून तिला तार केली

इकडे अशी तार केल्याचें मीं आईला सांगितलें असूनहि तिनें दोन वेळेस ‘ रूथ आली का ’ म्हणून विचारलें, तेव्हां मला मोठें चमत्कारिक झालें. तार नसती केली तर बरें झालें असतें असें मला वाटूं लागलें. पण माझ्या तारेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. रूथ आली व आईच्या उशाशीं जाऊन उभी राहिली तेव्हां आम्हां तिघांनाहि समाधान झालें. ऑपरेशन उत्तम झालें. तिसऱ्या दिवशीं आईनें मला सांगितलें, ‘ आतां एकच टांका काढायचा राहिला. ’ मला आनंद वाटला. पण आतां तिला खोकला येऊं लागला व छाती भरूं लागली. आतां दोन दिवस राहिले होते. ह्या दोन दिवसांत तिनें जें धैर्य दाखविलें, जी उदारवृत्ति दाखविली, जी उमेद दाखविली ती खरोखर अवर्णनीय होती. रोगी अतिशय अशक्त झाला असल्यानें भेटायला कोणाला येऊं देऊं नका असें डॉक्टरांनीं मला बजावून सांगितलें होतें. तरी दिवसभर सर्व दर्जाचे स्त्रीपुरुष एकसारखे येत. त्यांची समजूत करतां करतां आमची पुरे वाट होत होती. इकडे पुढल्या दारानें मीं माणसें लावून द्यावीं तर मागल्या दारानें माणसें आंत येऊन बसत आणि ह्यांत तिच्या मांग विद्यार्थी-विद्यार्थिनीं-पासून तों विद्वान मित्रमंडळीपर्यंत सर्वच तऱ्हेच्या श्रीमंतांचा व गरिबांचा भरणा होता.

ह्या दोन दिवसांत तेथें घडलेल्या बारीकसारीक गोष्टींची माहिती नंतर सोपानदेवांनीं मिळवून जें लिहिलें आहे त्यांतून कांहीं आज खालीं देत आहें.

“ असल्या तऱ्हेच्या पोटाच्या ऑपरेशनचे रोगी सांभाळणें नर्सेसना फार अवघड होतें. कित्येक वेळेस त्यांचे हात पाय देखील बांधून ठेवावे लागतात. परंतु आमच्या आईचें नांव हॉस्पिटलमधील सर्व लोक घेत आहेत कीं त्यांनीं औषध घेण्याच्या, बाबतींत इंजेक्शनच्या बाबतींत किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत यत्किंचितहि त्रास दिला नाहीं. हॉस्पिटलमधील तीन दिवसांत एकदांच त्यांनीं वाकडें तोंड केलें. कारण त्यांनीं जन्मांत कधींहि मांस खाल्लें नव्हतें. तरी नापसंतीदर्शक शब्द तोंडांतून काढला

अनुक्र. 23808

नाहीं. आपल्याला वेदना होतात असें त्यांनीं नर्सला केव्हांहि भासूं दिलें नाहीं. त्यांच्याजवळ आलेल्या तुळसाबाई श्री. भाऊसाहेबांना बाहेर घेऊन दोनदां तीनदां सांगून गेल्या कीं आई म्हणतात, 'प्रायमस स्टोव्ह येथून काढ व वातीची चूल आणून ठेव.' भाऊसाहेबांना वाटलें, आईनीं अशक्तपणामुळें हा असा नाद घेतला असावा, परंतु त्यांना आईनीं जवळ बोलावून सांगितलें, 'या नर्सेस मोठ्या अचपळ असतात. एखादी पदर-बिदर जाळून घेईल. म्हणून हा स्टोव्ह काढून वातीची चूल ठेव.' स्वतः दुःखांत असतांनाहि दुसऱ्याची काळजी घेण्याची त्यांची वृत्ति पाहून परिचारिकांना आश्चर्य वाटलें असेल!

"बिछान्यावर आणल्यावर त्यांच्या अंगाला एक कुसळ टोचलें तें चांचपून त्यांनीं हातांत घेतलें व जवळच्या परिचारिकेला दाखवून म्हटलें, हीच का ग तुमची व्यवस्था? माझ्या जागीं एखादी लेकुरवाळी बाई असती तर लेकराला किती त्रास झाला असता! आतां ह्यापुढें चादरी चांगल्या तपासून घेत चला.' ही गोष्ट सांगतांना परिचारिका डोळ्यांत पाणी आणून म्हणाल्या, 'असा आपलेपणानें आम्हांला कोणीं उपदेश केला नव्हता."

"एका खासगी परिचारिकेचें थर्मामिटर फुटलेलें आईनीं पाहिलें. त्यांनीं लागलीच भाऊसाहेबांना आपल्याजवळ बोलावून सांगितलें, 'बिचारीचा थर्मामिटर फुटला आहे तो तिला विकत घेऊन दे. तुला खर्चाला पैसे हवे असतील तर माझ्या कपाटामध्यें डेली लाईट पुस्तकाच्या पोटांत पैसे आहेत ते घे.'

*

"आपल्या कांहीं आशा अपुऱ्या राहिल्या आहेत असें त्यांनीं मुळींच दाखविलें नाहीं. मरणाचें त्यांना भय वाटत नव्हतें, मात्र आपलें थोडेसें काम व्हायचें उरलें आहे, असें त्यांना वाटत असावें कारण त्या एका परिचारिकेला म्हणाल्या, 'माझी भाकर तव्यावर भाजून झाली. आतां फक्त विस्तवावर शेकायची राहिली आहे. ह्याकरितां ती शेकावीशी वाटते. माझ्या लेकरांना ती बाधायला नको.' स्मृतिचित्रांचा चौथा अर्धवट राहिलेला

तिच्या चेहऱ्यावरील स्मित व समाधान हीं नाहींशीं झालीं नाहींत ! प्रेतयात्रेस सर्व धर्मांचे, सर्व तऱ्हेचे, सर्व विचारांचे युरोपियन व हिंदी स्त्री-पुरुष नाशिकहून व परगांवाहून आले होते.

आईच्या चरित्राकडे व शेवटच्या घटकेकडे पाहिल्यावर मला त्या दिवशीं टिळकांची एक कविता एकसारखी आठवत होती. शेवटीं शवपेटिका स्मशानभूमीकडे नेतांना कोणतें गीत म्हणावें म्हणून मला भजनी मंडळीनें विचारलें व मीं तेंच गीत सांगितलें.

जिंकुन मरणाला मरणाला
जीव कुडींतून गेला
अक्षयतेचा अधिकारी हा
इकडून तिकडे झाला
विश्वासाचा जिना चढोनी
दिव्य मंदिरीं शिरला
मेला नाहीं निजला क्षणभर
पुन्हा सुखानें उठला
प्रभुनें ह्याला किती दयेनें
अजरामर हो केला.

◆◆◆

-0009837
राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
...क्रम 23...
...मांक ....................

भाग व ख्रिस्तायनचे शेवटचे अध्याय तपासावयाचे राहिले आहेत, ते संपवून मग आपली जीवितयात्रा संपवावी असा त्यांचा मानस असावा."

तेवीस तारीख. रात्रीं पाटणकर दवाखान्यांतून परत गेले. त्यांनीं मला सांगितलें, 'डॉक्टर म्हणतात आतां बरें आहे, तेव्हां तूं नीज. तुळसाबाई तुला उठवितील.' मला तें खरें वाटलें. पाटणकरांची रात्रीं तेथेंच आई-जवळ राहाण्याची इच्छा होती. पण इतिहासाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून मुद्दाम ते गेले. पपांच्या मृत्यूच्या आदल्या रात्रीं पाटणकरच त्यांच्याजवळ होते व ह्या वेळेस मुद्दाम जाणूनबुजून तो प्रसंग टाळला म्हणून, नाहींतर ह्याहि वेळेस तेच आईजवळ रात्रींचे बसले असते.

मला मोठें समाधान वाटलें. मी समाधानानें जाऊन निजलों. पाटणकर व ...थ मी निजल्यावर केव्हां गेलीं कोणास ठाऊक. मध्यरात्र टळून गेल्यावर कि...बाईनीं येऊन मला उठविलें.

ही गोष्ट सांगला; आई बोलावतात.'

आपलेपणानें आम्हालास मिनिटें झालीं होतीं. आईनें मजकडे पाहिलें नाहीं,

"एका खासगी परिरीं. तिला झोंप लागत होती. तिचे डोळे मिटलेले लागलीच भाऊसाहेबांना पूर्णपणें विलसलेलें होतें. मृत्युछायेच्या खिडीं-थर्मामिटर फुटला आहे ती मृत्यु तिच्यावर परिणाम करीत असलेला पैसे हवे असतील तर माझ्या के

आहेत ते घे.' ...ा बेतांत होत्या. मीं त्यांना बाहेर लोटलें.

* ...प्रवाश्याला आपल्या रडण्याओरडण्यानें

"आपल्या कांहीं आशा अपुऱ्या मला रडूं आवरेना. पण तो प्रसंग दाखविलें नाहीं. मरणाचें त्यांना भय ...नीला शोभेल अशा रीतीनें पार काम व्हायचें उरलें आहे, असें त्यांना ...ईची मनांतल्या मनांत प्रार्थना परिचारिकेला म्हणाल्या, 'माझी भाकर त...प्रभावानें त्या प्रसंगाला तिला फक्त विस्तवावर शेकायची राहिली आहे. ह्याकरि...

माझ्या लेकरांना ती बाधायला नको.' स्मृतिचित्रांचा चौथ... यात्रेच्या वेळेपर्यंत

REFBK-0009837